म. ग्रं. सं. ठाणे.
निबंध
३५८६२




REFBK-0026547

संदर्भ निबंध
३७६२
२६५४५
६।७।९९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

२९३

13 AUG 1997

30 AUG 1997

30 AUG 1997

10 SEP 1997

७।७।९८
18/9/98

21 MAR 1998
22/3/2000

(कृ.मा.पहा.)

१६०००/११-९९

# नपावलो.



# सोनपावले.

निबंध
3४६२
२६५६०
१५।3।०२

# G.A. कुलकर्णी

# सोनपावले

संपादक

सु. रा. चुनेकर

REFBK-0026547

परचुरे प्रकाशन मंदिर,
मुंबई-४०० ००४.

कोलन वर्गीकरण O 155,3 N 23 x N 91
डेसिमल वर्गीकरण 891.463 708 Ku/Chu

**प्रकाशक**
विष्णू गजानन परचुरे
परचुरे प्रकाशन मंदिर
२०३/४, मेहता भवन,
३११, राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४

**मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ**
पं. हृदयनाथ मंगेशकर

© सर्वाधिकार सुरक्षित

**आवृत्ती पहिली**
११ डिसेंबर १९९१
(जी. ए. स्मृतिदिन)

**पृष्ठे** : ४२८

**लेझरजुळणी**
अक्षय फोटोटाइपसेटर्स
कुलदीपक सोसायटी,
जुन्या महानगरपालिकेशेजारी,
ठाणे-४०० ६०१

**मुद्रक**
अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप प्रा. लि.
२०१, इंडिया हाऊस,
४२, आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई-४०० ०३१

**मूल्य २०० रुपये**

**बालकवि –**

जी. एं. च्या भावनिक, वाङ्मयीन
घडणीत तुमचाही वाटा मोठा होता.

# वाटचाल

जी. ए. कुलकर्णी यांच्या अप्रकाशित, व प्रकाशित परंतु असंकलित साहित्याचे संकलन ''सोनपावले'' या संग्रहात केले आहे.या संग्रहातील बहुतेक साहित्य जी. एं. च्या लेखनाच्या आरंभीच्या काळातील आहे – उगवत्या सूर्याची ही सोनपावले आहेत.

जी. एं. च्या पश्चात् त्यांच्या काही साहित्याचे दप्तर जी. एं. ची मावसबहीण (कै.) प्रभावती सोलापूरकर [मृत्यु १५ मे १९९०] यांच्याकडून 'परचुरे प्रकाशन मंदिरा'चे श्री. चंद्रकांत परचुरे (जी. एं. चे 'सी. के.') यांना मिळाले. ''सोनपावले''चा प्रारंभिक, महत्त्वाचा आधार म्हणजे हे दप्तर आहे. नंतर त्यामध्ये अधिक शोध घेऊन काही भर घातली आहे. जी. एं. च्या या दप्तरात त्यांचे काही अप्रकाशित, हस्तलिखित साहित्य होते; तसेच, काही प्रकाशित, पण संग्रहांत न आलेल्या लेखनाची कात्रणे होती. यांतील बरेचसे कागद जीर्ण झाले होते, त्यांचा काही भाग फाटला होता, किंवा त्यांना भोके पडली होती; काही ठिकाणी मजकूर लागत नव्हता. त्यांतील जे लेखन प्रकाशित झाले होते, त्यांच्या प्रती त्या त्या नियतकालिकांतून मिळवण्याचा प्रयत्न केला; पण सर्वच प्रकाशित लेखनाच्या प्रती मिळवणे शक्य झाले नाही. त्यामुळे काही थोड्या ठिकाणी काही शब्द, काही मजकूर संदर्भानुसार जुळवून घ्यावा लागला आहे. पण अशी ठिकाणे फारच थोडी आहेत; आणि तेथे असा जुळवून घ्यावा लागलेला मजकूर चौकटी कंसात [ ] घातला आहे. कागदाच्या जीर्णतेमुळे जेथे मजकुरात संदिग्धता, अबोधता राहिली असेल तेथे, तेवढ्यापुरतेच संपादकीय संस्करण केले आहे. जी. एं. च्या पश्चात् या संग्रहाचे प्रकाशन होत असल्याने संपादनाचे काम नाजुकही झाले आहे, जोखमीचेही आहे, आणि बिकटही आहे. तथापि जी. एं. सारख्या अभिजात साहित्यकाराचे साहित्य जास्तीत जास्त मुळाप्रमाणे, शुद्ध स्वरूपात वाचकांपर्यंत पोचवण्याची जास्तीत जास्त दक्षता घेतली आहे.

या संग्रहात समाविष्ट केलेल्या साहित्याशिवाय जी. एं. च्या त्या दप्तरात आणखीही काही हस्तलिखित कागद आहेत. परंतु ते विस्कळीत असून त्यांचा संदर्भ लागत नाही. येथे त्यांचा थोडक्यात परिचय करून देत आहे.

या दप्तरात एक पंधरा पृष्ठांचे हस्तलिखित आहे. ''एक अरबी कहाणी'' वळणाच्या कुठल्या तरी कादंबरीच्या भाषांतरातील ही पाने असावीत. हा कच्चा खर्डा आहे. त्यामध्ये अधूनमधून मराठी शब्दांबरोबर मूळ इंग्रजी शब्दही जी. ए. कंसात ठेवून देतात – नव्या,

अधिक समर्पक शब्दाच्या शोधासाठी. यावरून जी. एं. ची अनुवादरीती, त्यांचा साक्षेप हेही दिसून येतात.

या दप्तरात एक सुटे, लाल शाईने लिहिलेले पान आहे. तेही तुटक, कच्चे लेखन आहे. पण त्यामधील 'गावातील एक भट बावळट शाळा', पठाण मास्तर, त्यांचे हॉकीचे प्रेम, शाळेचा शिपाई, अशासारख्या मजकुरावरून हे लेखन "माणसे : अरभाट आणि चिल्लर"च्या वळणाचे असावे असे वाटते.

" 'जी. ए.' नावाचे स्वप्न"मध्ये श्री. अप्पा परचुरे यांनी जी. एं. नी केलेल्या एका इंग्रजी नाटकाच्या मराठी भाषांतराचा उल्लेख आहे. 'हे भाषांतर जी. एं. नी केवळ आपल्या वैयक्तिक समाधानासाठी केले असले पाहिजे. ते जे काही लिहीत असत ते सर्वच प्रकाशनार्थ नसे. ...त्यांनी भाषांतर केलेल्या या नाटकाच्या हस्तलिखितावर 'हे प्रकाशनार्थ नाही.' असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. या भाषांतरित नाटकाचे नाव आहे, "दिवस तुडवत अंधाराकडे." '[१]

जी. एं.च्या अप्रकाशित-असंकलित लेखनात त्यांच्या वयाच्या सोळा-सतराव्या वर्षापासूनचे लेखन आहे. "शालापत्रक" मासिकाच्या १९४० च्या एका वार्षिक संचातच त्यांचे कितीतरी आणि वेगवेगळ्या प्रकारचे लेखन आहे. (यावरून शक्यता आहे की, या सुमारास या वर्षाच्या आगेमागेच्या अंकांतही जी. एं. चे लेखन आले असावे.) त्यात बालसाहित्य-बालकथा, 'करून तर पहा', कोडे, 'हास्यलहरी' असले फुटकळ हौशी लेखन आहे. जी. एं. च्या महाविद्यालयीन काळातीलही एक कथा या दप्तरात आहे. १९४०-४२ च्या सुमारास जी. एं. च्या कितीतरी कथा तत्कालीन वेगवेगळ्या मासिका-साप्ताहिकांतून आल्या आहेत. लक्षात घेण्यासारखी विशेष गोष्ट म्हणजे जी. एं. नी आपले हे कौमारकालीन लेखन साक्षेपाने जपून ठेवले होते! क्वचित् त्यातल्या काही कथांवर त्यांनी काही संस्कारही करून ठेवले होते, काही शेरे लिहून ठेवले होते. 'मोती'सारख्या कथेमध्ये त्यांनी काही वाक्यांची भर घातली होती. 'जुना कोट' कथेच्या कात्रणावर 'To be rewritten' असे लिहून ठेवले होते.

जी. ए. आपल्या प्रकाशित कथा संग्रहात घेताना त्यांच्यांत काही बदल, संस्करण सहसा करीत नाहीत; जे काही संस्करण करावयाचे ते प्रथम-प्रकाशनापूर्वी. असे सामान्यत: असल्याने या संबंधात इथे एक नोंद करण्यासारखी आहे. त्यांची 'दूत' नावाची एक कथा 'हंस' मासिकाच्या नोव्हेंबर १९६७च्या अंकात आली आहे. पण

---

[१] 'जी. ए.' नावाचे स्वप्न, अप्पा परचुरे; शब्दरूप : पुरुषोत्तम धाक्रस; परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई-४; मार्च १९९०; पृ. ४०-४१.

''काजळमाया'' संग्रहात घेताना तिचे नाव बदलून 'पुनरपि' केले आहे. 'दूत' या नावाची त्या संग्रहात दुसरी एक कथा आहे.

जी. एं. च्या कथांचे नियतकालिकांतील प्रकाशन, आणि त्यांचा संग्रहात समावेश यासंबंधाने आणखीही काही गोष्टींचा उल्लेख येथे करणे युक्त होईल. प्रस्तुत संग्रहात त्यांच्या 'दीक्षा' ('सत्यकथा', सप्टेंबर १९७०), आणि 'सांगाती' ('सत्यकथा', ऑक्टोबर १९७०) या दोन कथा आहेत. या कथा त्यांच्या आधीच्या संग्रहात आलेल्या नाहीत. पण याच कथांच्या आधी 'सत्यकथे'च्या ऑगस्ट १९७० च्या अंकात त्यांची आलेली 'पत्रिका' ही कथा ''सांजशकुन'' मध्ये समाविष्ट केलेली आहे. मग त्याच कथेच्या पाठोपाठ आलेल्या या दोन कथांचा समावेश त्या संग्रहात का नाही? या दोन्ही कथा निश्चितच ''सांजशकुन'' मध्ये सहजच सामावून जाणाऱ्या आहेत. मग या कथा हेतुत: मागे ठेवल्या, की लेखक-प्रकाशकांच्या अनवधानाने निसटल्या?

जी. एं. ची 'वहाणा' ही कथा 'सत्यकथे'च्या एप्रिल १९५६ च्या अंकात आली आहे. त्यानंतर जी. एं. चे ''निळासावळा'' (१४ जानेवारी १९५९), आणि ''पारवा'' (सप्टेंबर १९६०) हे दोन कथासंग्रह निघाले, पण त्यांत या कथेचा अंतर्भाव नाही. आणि त्या कथेच्या प्रकाशनानंतर सहा वर्षांनी निघालेल्या ''हिरवे रावे'' (सप्टेंबर १९६२) मध्ये ती कथा आहे. यामागे काही विशेष धोरण असावे असे वाटत नाही. जिथे जी. एं. सारखा मोठा लेखक आपल्या कथांच्या संग्रहाबाबत स्वभावत: काहीसा उदासीन असतो, तिथे प्रकाशकांनी अधिक अवधानी असावयाला हवे!

''सोनपावले'' मध्ये समाविष्ट केलेल्या जी. एं. च्या लेखनाचे स्थूलपणाने सात वर्ग केले आहेत, आणि त्या त्या वर्गातील लेखनाचा अनुक्रम कालानुसारी आहे. असे वर्गीकरण कधीच काटेकोर असू शकत नाही; काहीसे सोयीसाठी ते केलेले असते.

पहिल्या वर्गात जी. एं. नी साहित्यविषयक काही थोडे लेखन केले आहे, ते आहे. सॉमरसेट मॉमने आपल्या एका कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा १९४८ मध्ये 'चेकॉव्ह आणि मोपासाँ' हा स्वैर अनुवाद जी. एं. नी केला होता. वयाच्या पंचविशीत केलेल्या या अनुवादात कळत नकळत जी. एं. चीही कथालेखनविषयक भूमिका व्यक्त झाली आहे. एका परीने त्यांच्या कथालेखनाचीच ही प्रस्तावना होऊ शकेल. ती मुद्दाम या संग्रहाच्या सुरुवातीला घेतली आहे.

'अनाकलनीयाचे आकर्षण' हे एक पत्र 'मौज' साप्ताहिकाच्या २० फेब्रुवारी १९५५ च्या अंकात, 'आणखी एक वासुकी' या टोपण नावाने आले आहे. एक तर, ते जी. एं. च्या दप्तरात होते; आणि ते वाचल्यावर तत्काळ लक्षात येते की, जी. एं. खेरीज ते कोणी लिहू शकणार नाही. एवढा त्या पत्रावर जी. एं. चा ठसा आहे. 'मौजे'च्या ३१ ऑक्टोबर

१९५४च्या अंकात, पृष्ठ ७ वर, वा० सु० की० या टोपण नावाने, 'अनाकलनीयाचे आकर्षण' या मथळ्याचे, मर्ढेकरांच्या काव्यविषयक भूमिकेवर टीका करणारे टिपणपर पत्र आले होते. या पत्राचा प्रतिवाद करणारे दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे पत्र 'मौजे'च्या २१ नोव्हेंबर १९५४च्या अंकात आले आहे. त्याच वा० सु० की० यांच्या प्रतिपादनाचा समाचार घेणारे जी. एं. चे हे पत्र. मर्ढेकरांच्या संबंधातले जी. एं. चे बहुधा हे एकमेव लेखन, मर्ढेकरांच्या भूमिकेचे समर्थन करणारे, म्हणून या पत्राचे विशेष महत्त्व.

दुसरा वर्ग जी. एं. च्या अप्रकाशित नाटिका-कथांचा आहे. यांचे लेखन कधी झाले याची माहिती मिळाली नाही. पण 'मारून मुटकून पुरोगामी'चे लेखन १९५०च्या आसपास झाले असावे असे त्याच्या अंतःस्वरूपावरून वाटते. येथे 'मारून मुटकून वैद्यबुवा' या हरिभाऊ आपट्यांनी, मोलियरच्या कथेवरून रूपांतरित केलेल्या कथेचे शीर्षक सहजच आठवते. या नाटिकेवरून जी. एं. चे समकालीन वाङ्मयीन व्यक्ती, प्रवृत्ती, घडामोडी यांच्याकडे किती बारीक लक्ष होते, आणि त्यांचे त्यांनी कसे मार्मिक विडंबन केले आहे, कसा उपरोध साधला आहे याचे चांगले प्रत्यंतर येते. या सुमारच्या वाङ्मयाकडे बघण्याची जी. एं. ची दृष्टी कशी होती हे यावरून समजते. १९३०-३५पासून पुढे पंधरा-वीस वर्षे मराठी साहित्यात 'पुरोगामी साहित्य', मार्क्सवाद, कला आणि जीवन-वाद इत्यादी वाद पुष्कळ गाजले. आचार्य जावडेकर, ना. सी. फडके, सानेगुरुजी, वि. स. खांडेकर, लालजी पेंडसे, पु. य. देशपांडे वगैरेंनी या वादात हिरिरीने भाग घेतला. त्या सर्वांची आठवण ही नाटिका वाचताना होते. कथन आणि संवाद यांच्या संमिश्रणाने लिहिलेली जी. एं. ची अशीच एक नाटिका 'चांदण्यातील सावल्या' 'वाङ्मयशोभा' मासिकाच्या १९४८च्या दिवाळी अंकात आली आहे.

'कपाळवाट' ही कथा आता जरी प्रकाशित झाली असली ('रविवार सकाळ', ७ जुलै १९९१), तरी ती मुळात, जी. ए. असेतोपर्यंतच्या काळात अप्रकाशितच होती; आणि 'रविवार सकाळ'मध्ये प्रकाशित झाली तीही, पुढे प्रकाशित होणाऱ्या जी. एं. च्या प्रस्तुत अप्रकाशित-असंगृहीत साहित्याच्या संग्रहामधूनच, तशा टीपेसह. या कथेच्या स्वरूपावरून ती उत्तरकालीन असावी असे वाटते.

यानंतरचा तिसरा वर्ग जी. एं. च्या प्रकाशित, परंतु असंगृहीत कथांचा आहे, आणि हा वर्ग स्वाभाविकपणे या संग्रहाचा मोठा व महत्त्वाचा भाग आहे. या वर्गामध्ये (अ) स्वतंत्र, आणि (ब) अनुवादित, आधारित, किंवा स्वैर रूपांतरित असे दोन विभाग आहेत. 'स्वतंत्र कथा' या विभागातील 'मृत्युलेख' ही कथा आधारित असावी की काय, अशी शंका येते; पण त्या कथेवर तसा काही निर्देश नसल्याने ती स्वतंत्र कथांच्याच विभागात घेतली आहे.

याच विभागातील 'दया (अ) धर्माची दायी' या कथेवर लेखक म्हणून 'गोपीनाथ कुलकर्णी, बेळगाव' असे नाव आहे; पण तेथेच कात्रणावर पेन्सीलने 'गोपीनाथ' खोडून

'गुरुनाथ' केले आहे. ही कथा जी. एं. च्या दप्तरात मिळाली, आणि तिचे वळणही या काळातील जी. एं. च्या कथेच्या वळणाशी जुळणारे आहे. म्हणून तिचा समावेश या संग्रहात केला आहे.

'अनुवादित किंवा आधारित' विभागातील 'खोल खोल' कथेवरही अनुवादित किंवा आधारित असल्याचा निर्देश नाही. पण तिचे स्वरूपही अनुवादित कथेचे आहे, आणि या काळातील 'हंस'मध्ये येणाऱ्या जी. एं. च्या कथा अनुवादित, रूपांतरित अशा स्वरूपाच्याच आहेत. म्हणून या कथेचा अंतर्भाव 'अनुवादित किंवा आधारित' कथांच्या विभागात केला आहे.

चौथ्या विभागात 'चांदण्यातील सावल्या' ही निवेदनात्मक संवादात्मक नाटिका आहे.

पाचव्या विभागात जी. एं. चे दोन ललित लेख घेतले आहेत. (ललित लेख किंवा कथा यांच्या सीमारेषा कशा धूसर असतात याचे जी. एं. च्याच एका कथेचे उदाहरण देण्यासारखे आहे. त्यांची 'अंधाराची पावले' ही ''निळासावळा'' या कथासंग्रहातील कथा 'सत्यकथे'त जेव्हा प्रकाशित झाली (मार्च १९५५) तेव्हा अनुक्रमणिकेत तिचा निर्देश दुर्गा भागवत यांच्या 'सुगंधाची कळ' या लेखाबरोबर 'ललित लेख' या वर्गात केला होता.)

सहाव्या विभागात आचार्य प्र. के. अत्रे यांच्या 'दिनूचे बिल' या बालकथेचा जी. एं. नी केलेला इंग्रजी मुक्त अनुवाद आहे. मुळात ही कथा 'नवयुग वाचन माले'त (भाग ४) आलेली. डॉ. स. गं. मालशे, श्रीमती शिरीष पै, सौ. मीना देशपांडे – संकलित व परचुरे प्रकाशन मंदिर प्रकाशित ''फुले आणि मुले'' या संग्रहात (१९८२) ती समाविष्ट केली आहे. आचार्य अत्र्यांच्या या पुस्तकातील सुंदर बालकथांचे इंग्रजीत अनुवाद करवून घ्यावेत, आणि त्यांचे पुस्तक काढावे अशी कल्पना श्री. अप्पा परचुरे यांच्या मनात आली. असे अनुवाद करण्यासाठी त्यांनी जी. एं. ना विचारले. जी. एं. नी त्या संग्रहातील पहिल्या 'दिनूचे बिल' या कथेचा अनुवाद करण्याचा प्रयत्न करण्याचे मान्य केले, आणि तसा त्यांनी अनुवाद केला. ('' 'जी. ए.' नावाचे स्वप्न'', पृ. २३-३०.) पण हा अनुवाद म्हणजेही अत्र्यांच्या कथेची पुनर्निर्मितीच झाली. त्या कथेला जी. एं. चा स्पर्श झाला, आणि तिचे रूपच पालटून गेले. जी. एं. ची अनुवादनिर्मितिप्रक्रिया कळावी म्हणून 'दिनूचे बिल' ही मूळ कथाही या मुक्त अनुवादासोबत 'परिशिष्ट' म्हणून दिली आहे.

सातवा विभाग हा मुख्यत: जी. एं. नी कुमारवयात 'शालापत्रक' या मासिकातून केलेल्या लेखनाचा आहे. जी. एं. ची अगदी पहिली पहिली पावले या लेखनामधून उमटलेली दिसतील. याच विभागात जी. एं. नी आपल्या भाच्या सौ. सुनीता (नंदा) पैठणकर यांच्या, तेव्हा लहान असलेल्या मुली मुग्धा व मनीषा यांना ध्वनिफितीवर मुद्रित करून पाठवलेले पत्र घेतले आहे. हे पत्र प्रत्यक्षत: मुग्धा-मनीषांना उद्देशून असले, तरी त्याचे आवाहन व्यापक, सर्वच किशोरवयीन मुलामुलींना आहे. ते सुंदर पत्र '' 'जी. ए.'

नावाचे स्वप्न''- मध्ये उद्धृत केले आहे; पण तेथेच ते अडकून न पडता अधिक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध व्हावे म्हणून या संग्रहात घेतले आहे. कुमारवयीन जी. एं. चे स्वतःचे लेखन, आणि प्रौढ जी. एं. नी कुमारांसाठी उच्चारलेले वाङ्मय यांचा या विभागात एकत्र अंतर्भाव केला आहे. 'चेकॉव्ह आणि मोपासाँ' या लेखाने एका परीने ''सोनपावले''ची प्रस्तावना झाली, तर 'प्रिय मुग्धा, प्रिय लिट्ल मनीषा' यांना लिहिलेल्या पत्राने या संग्रहाचा समारोप साधला आहे.

संग्रहाच्या[२] शेवटी जी. एं. च्या, ''सोनपावले''त समाविष्ट असलेल्या साहित्याखेरीज सर्व कथासंग्रहांतील समग्र कथांची सूची आद्याक्षरानुसार जोडली आहे.

कथांचे उपलब्ध प्रथम-प्रकाशन स्थल-काल दिले असून, त्या कोणत्या संग्रहात आहेत याची नोंद केली आहे. प्रथम-प्रकाशन स्थल-कालाच्या नोंदी पूर्ण नाहीत. अधिक शोध घेतला तर आणखी कथांचेही प्रथम-प्रकाशन स्थल-काल मिळू शकतील. परंतु एवढीही कथा-सूची यापूर्वी झालेली नसल्याने, ही सूचीही अभ्यासक-वाचकांना उपयुक्त ठरू शकेल.

जी. एं. चे अधिकांत अधिक अप्रकाशित व असंगृहीत साहित्य उपलब्ध करून देण्याचा या संग्रहामध्ये प्रयत्न केला आहे. तथापि हा शोध पूर्ण झाला आहे असे नाही. अद्यापही शोधाला अवसर आहे. अजूनही योजनाबद्ध, पद्धतशीर शोध घेतला, निरनिराळ्या नियतकालिकांचा आणखी धांडोळा घेतला तर जी. एं. चे आणखीही साहित्य सापडण्याचा संभव आहे. – आणि तसा शोध घ्यावयाला पाहिजे. मर्यादित हेतूने, मर्यादित अवकाशात शोध घेऊन संकलित केलेला हा संग्रह आहे. तथापि तोही चारशे पृष्ठांपर्यंत वाढला.

या संग्रहाच्या बाबतीत असाही प्रश्न निर्माण करणे शक्य आहे की, जे जी. ए. स्वतःच्या साहित्याच्या, संग्रहांच्या प्रकाशनाबाबत अत्यंत दक्ष, चोखंदळ, आग्रही असत, त्यांनी त्यांच्या हयातीत प्रकाशित, संगृहीत न केलेले साहित्य त्यांच्या पश्चात् प्रकाशित, संगृहीत करणे योग्य होईल का? या संबंधातली संपादनामागची येथील भूमिका स्वच्छ

---

[२] या लेखनावरील प्रकाशनकालीन जी. एं. चे वेगवेगळ्या प्रकारांनी झालेले निर्देशही गंमतीने बघण्यासारखे आहेत. त्यांतून जी.एं.ची शैक्षणिक, व्यावसायिक, वाङ्मयीन वाटचाल कळू शकते. 'शालापत्रक' (१९४०) मध्ये त्यांचा उल्लेख 'श्री. जी. ए. कुलकर्णी' असा आहे. पुढे 'जी. ए. कुलकर्णी, बेळगाव', 'जी. ए. कुलकर्णी, बी. ए.', 'जी. ए. कुलकर्णी, बी. ए. (ऑनर्स)', 'जी. ए. कुलकर्णी, एम. ए.', 'प्रा. जी. ए. कुलकर्णी' असे हे वेगवेगळे निर्देश आहेत, आणि अखेर 'जी. ए. कुलकर्णी' ही नाममुद्रा स्थिर झाली आहे.

आहे. मोठ्या, महत्त्वाच्या साहित्यकाराचे जे जे लेखन उपलब्ध होईल, ते ते प्रकाशित व्हावयाला पाहिजे. त्याच्या सम्यक् आकलनाला ते उपयुक्त, आवश्यकच आहे. त्या लेखकाची वाङ्मयीन जडणघडण समजण्याला, त्याचा साहित्यकार म्हणून विकास कसा झाला हे समजावयाला, त्याची निर्मितिप्रक्रिया समजावयाला असे लेखन निश्चितच उपयुक्त होईल. जी. एं. च्या पूर्ववयातील साहित्याचा शोध घेण्यामध्ये, ते संपादित-प्रकाशित करण्यामध्ये हीच भूमिका आहे. जी. एं. च्या लेखनाच्या उगमाचा हा शोध आहे. वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षापासून केलेले त्यांचे हे लेखन पाहिले, म्हणजे प्रारंभावयापासूनच त्यांना साहित्याची आवड होती, लेखन-प्रकाशनाची हौस होती, आकांक्षा होती हे लक्षात येते; आणि हे स्वाभाविक व रास्तही आहे. जी. एं. नी आपले हे लेखन संकलित, प्रकाशित केले नसेल; पण त्यांनी ते नष्टही केले नाही – तसे करता आले असते. यावरून जी. एं. नाही आपल्या पूर्ववयातील लेखनाबद्दल कसे साक्षेपी ममत्व वाटत असावे ते ध्यानात येते; आणि गांभीर्यपूर्वक साहित्यव्यवहार करणाऱ्या लेखकाला ते असावयालाही हवे! या लेखनामध्येही, पुढे जी. एं. च्या विकसित झालेल्या अनेक प्रवृत्तींचे, वाङ्मयीन गुणविशेषांचे दर्शन घडते. इतकेच नाही, तर त्यांच्या या उमेदवारीच्या काळातील साहित्यातीलही पुष्कळसे साहित्य स्वतंत्रपणे वाङ्मयीन गुणांनी संपन्न आहे; त्यामध्ये जी. एं. च्या 'जीए'पणाचा प्रत्यय येतो. आजपर्यंत जी. एं. च्या प्रसिद्ध झालेल्या, परिचित साहित्यापेक्षा वेगळ्या प्रकाराचेही त्यांचे साहित्य वाचण्यात एक निराळा आनंदही आहे.

''सोनपावले''मधून जी. एं. चे एक वेगळे दर्शन त्यांच्या सुजाण चाहत्यांना, अभ्यासकांना, आणि सर्वसामान्य रसिक वाचकांनाही होईल; आणि ते जी. एं. च्या इतर संग्रहांतील साहित्यातून घडणाऱ्या दर्शनापेक्षा, कदाचित् थोडे अधिकच मनोज्ञ होईल.

हा संग्रह संपादित करीत असताना अनेकांचे साहाय्य झाले. (कै.) प्रभाताईंकडून श्री. चंद्रकांत परचुरे यांना मिळालेले जी. एं. च्या साहित्याचे दप्तर हा तर या संग्रहाचा मूलाधार. श्रीमती शांताबाई शेळके यांनी 'शालापत्रका'तील जी. एं. च्या लेखनाकडे लक्ष वेधले, आणि तो संच उपलब्ध करून दिला. 'हंस'मधील कथांचा शोध घेण्यासाठी श्री. आनंद अंतरकरांनी सर्वतोपरी साहाय्य केले. 'सत्यकथे'तील लेखनाचा शोध घेण्यासाठी श्री. प्रभाकरपंत भागवतांनीही असेच आत्मीयतेने साहाय्य केले. 'वेड' ही कथा श्री. शंकर सारडांनी स्वत:च्या संग्रहातून दिली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे अशा प्रकारच्या संशोधकीय कामाचा नेहमीच प्रमुख आधार असते. तेथील सेवकांनीही मन:पूर्वक सहकार्य केले.

जी. एं. वरील डोळस प्रेम, अभिजात वाङ्मयप्रेम, आणि व्यक्तिगत लोभ यांमुळेच हे साहाय्य या सुहृदांनी केले. त्याचे स्मरणही सुखावह आहे.

जी. एं. च्या लेखनाची ही सोनपावले
सूर्योदयाच्या अगदी पहिल्या पहिल्या काही क्षणीं
गिरिशिखरांवर, उंच उंच तरुशिरांवर अत्यंत सुकोमलपणाने,
जाणवेल न जाणवेल अशी प्रभातरल किरणांमधून उमटलेली.
त्या प्रकाशप्रभूची ही सोनेरी माया.....
अंधारावर उमटलेली,... आश्वासक... स्नेहमयी
सोनपावले.....
कदाचित् –
– कदाचित् जी.ए. हेच एक परमेशाचे
सोनपाऊल असेल.....

सु. रा. चुनेकर
११ डिसेंबर १९९१
(जी.ए.-स्मृतिदिन)

'शतदीप', एस्-४
३५९ ब/२, मॉडेल कॉलनी
पुणे ४११०१६

# "सोनपावलं"ची चाहूल

सूर्य पृथ्वीवर प्रथम अवतरतो तो 'सोनपावलां'नी. त्याचे पहिले किरण पृथ्वीवर पसरतात तेव्हा सर्वत्र एक दिव्य आभा पसरते. सकाळ उजाडते तेव्हाच्या आकाशातल्या त्या गुलाबी छटा, ती सोनेरी किरणे, तो सौम्य तेजात न्हालेला कोवळा सूर्य...

हे वर्णन सूर्य उगवतो त्या वेळेचे आहे की, प्रतिभावंत साहित्यिकाच्या साहित्यात केलेल्या पहिल्या पदार्पणाचे आहे? वाङ्मयात प्रथम प्रवेश करणारी प्रतिभावंताची पहिली 'सोनपावले' सूर्याच्या पहिल्या किरणांसारखीच नसतात का? येणाऱ्या तेजस्वी प्रकाशाची ती बोलकी पूर्वचिन्हेच असतात.

'जीएं'च्या प्रारंभीच्या काळातील लेखनाचे दर्शन पं. हृदयनाथ मंगेशकरांना सूर्योदयाच्या रूपाने हे असे झाले. हा योगायोग नसून एका प्रतिभावंत संगीतकाराने दुसऱ्या प्रतिभावंत साहित्यकाराला रेषांतून आणि रंगांतून वाहिलेली ही एक विनम्र आदरांजली आहे. पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी श्रीमती शिरीष पै यांच्या आग्रहाखातर जी.ए. च्या पहिल्या वहिल्या लिखाणाच्या या संग्रहाचे सुंदर बहिरंग तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन.

पुस्तक उघडण्यापूर्वीचे हे सूर्योदयाचे चित्र 'जीएं'च्या पहिल्या लेखनाचे प्रतीक आहे, तर पुस्तक मिटल्यावर नजरेला पडणारे दुसरे चित्र हे 'जीएं'ची प्रतिभा पूर्ण विकसित झाल्यानंतर मराठी कथेच्या क्षेत्रात मराठी वाचकांना केवळ थक्क करून सोडणारा जो चमत्कार तिने करून दाखविला त्याचे मर्म उकलून दाखवणारे आहे. 'जीएं'च्या स्वामी ह्या कथेवरूनच हे चित्र पं. हृदयनाथ मंगेशकरांना सुचले.

जीवनाची मूलगामी रहस्ये शोधत प्रतिभावंताचा आत्मा अस्तित्वाच्या वेगवेगळ्या थरांतून अंती आपल्या मूळ गर्भात प्रवेश करतो. तिथं गवसलेला जीवनाचा अर्थ प्रगट करण्यासाठी स्वत:ला झाकोळणाऱ्या खडकांचे कठीण थर पार करीत, कोमल हिरवी वेल होऊन, अदृश्य वाटा शोधीत तो आवेगाने रक्तकुसुमाच्या रूपाने बाहेर पडतो. त्या वेलीला उद्देशून स्वत: 'जीए' म्हणतात –

तू असाच वर जा.

अंधाऱ्या सांदरीतून निघालेले तुझे आयुष्य न चिरडल्या जाणाऱ्या ईर्ष्येने वर वर जाऊन एका तृप्त क्षणी सूर्यप्रकाशाला भेटू दे.

तुला जर फुले येतील –

आणि तुला सोन्याच्या लहान पेल्यांसारखी फुले यावीत व त्यांच्या स्पर्शाने पराग सांडून बोटांची टोके पिवळी सुगंधी व्हावीत.

तुला जर फुले येतील, तर अशा सहस्र फुलांना घेऊन तू तुझ्यावर वाकलेल्या आभाळाला सामोरे जा व त्याच्या निळ्या साक्षीने तू त्यांच्यांत सूर्यप्रकाश साठवून घे.

तुला जर फळे येतील –

आणि तुला दर पानाआड लहानसे लाल फळ यावे व ते इतके रसरशीत असावे की, त्या प्रत्येकाच्या लाल रंगात सूर्यप्रकाशाचा एक एक कण सतत सुखाने नांदत राहावा.

तुला जर फळे येतील, तर त्यांच्यासह तू क्षितिजाकडे पाहा. कारण तू अशा अंधारातून त्याचाच शोध घेत त्याच्याकडे आला आहेस.

मग तुझ्या बीजांची फळे सर्वत्र विखरून त्या तुझ्या विजयाच्या खुणा सर्वत्र रुजू देत.

जर कणाएवढ्या प्रकाशाचा काजवा तुला कधी दिसला तर तू त्याचे स्वागत कर.

त्या कणाच्या अभिमानाने त्याने रात्रीच्या अमर्याद अंधाराला आव्हान देऊन त्याचा एक कण जिंकून प्रकाशित केला आहे.

आभाळात एखादे लहान पाखरू उडताना दिसले तर तू त्याला आतिथ्य दाखव.

कारण दोन कोवळ्या पंखांच्या आत्मविश्वासाने ते आभाळाला किंचित् मागे रेटत आहे.

जर कधी एखाद्या मुलाने तुझे एक रसरशीत पान घेऊन दुमडून ते पुन्हा आडवे उघडले व पानाचा आरसा केला; किंवा कधी तुझे पिवळे फूल तोडून बोटे पिवळ्या धुळीने माखून घेतली; अगर तुझे एक लाल फळ खुडून ते दोन बोटांत चेंगरत रसाचा लाल धागा काढला, तर तू त्याच्यावर क्रुद्ध होऊ नकोस.

कारण, कुणास ठाऊक, अब्जामध्येच एक आढळणारे असे ते मूल असून तेदेखील भोवतालच्या अंधाऱ्या अजस्र भिंती फोडून सूर्यप्रकाशाकडे येण्याची कधीतरी धडपड करणार असेल.

*आणि तसे असेल तर ते तुझ्या रक्तानात्याचेच आहे.*
*म्हणून तू त्याच्यावर क्रुद्ध होऊ नकोस.*
*एक पान गेल्याने तुला दारिद्र्य येणार नाही.*
*एक फूल गेल्याने तुझे सौंदर्य उणे भासणार नाही.*
*एक फळ नाहीसे झाल्याने तुझ्या आयुष्यात नैराश्य येणार नाही.*
*इतके तुला वैभव आहे. इतके वैभव तुला मिळो!*

*या साऱ्यात मला विशेष सुख आहे, कारण तुझे एक पान म्हणजे माझा एकेक श्वास आहे. म्हणून तू म्हणजे मीच स्वत: आहे. मी संपलो नाही तर मी केवळ बदललो आहे. तू आपले सारे सामर्थ्य घेऊन आभाळाखाली सूर्यप्रकाशात वर आला आहेस एवढे इतरांना समजू दे.*

*मी अंधारात लाल प्रकाशात दडपून चिरडला गेलो नाही, तर मीच हिरव्या कारंजाप्रमाणे वर आलो आहे, हेदेखील इतरांना कळू दे.*

*म्हणून तू असाच वर जा.*

जॉली ऑफसेटचे श्री. सदानंद वैद्य, अक्षय फोटोटाइपसेटर्सचे श्री. अरुण फडके व अक्षर प्रतिरूपचे श्री. अरुण नाईक या सर्वांनी हे पुस्तक सर्वांगसुंदर होण्यासाठी मोलाची मदत केली आहे. या सर्व हितचिंतकांचा मी आभारी आहे.

या सोनपावलांची चाहूल प्रथम डॉ. सु. रा. चुनेकर व माझे बंधू श्री. चंद्रकांत परचुरे यांना लागली. डॉ. चुनेकरांच्या अथक परिश्रमांमुळेच ही 'सोनपावले' मी आपल्यापर्यंत आणू शकलो यात काय संशय? मी या दोघांचाही ऋणी आहे.

पुस्तक कसे असावे याबद्दल 'जीएं'च्या काही कल्पना होत्या व त्यांनी त्या माझ्याजवळ बोलून दाखविल्या होत्या. 'जीएं'च्या मनात असलेल्या कल्पना मी प्रत्यक्षात आणू शकलो की नाही, हे जाणून घेण्यासाठी माझे 'जीए' व त्यांच्या भगिनी प्रभाताई आज हयात नाहीत. मुद्रणालयातून तयार झालेल्या कोऱ्या करकरीत प्रती त्यांच्या तसबिरीसमोर ठेवून तसबिरीतल्या सोनपावलांना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेणे एवढेच आता माझ्यापाशी उरले आहे.

मुंबई
११ डिसेंबर १९९१

अप्पा परचुरे

# अनुक्रमणिका


## १. साहित्यविचार

१) चेकॉव्ह आणि मोपासाँ : 'प्रसाद', जुलै १९४८ — २३

सॉमरसेट मॉमने आपल्या एका कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा एक भाग.

२) अनाकलनीयाचे आकर्षण : 'मौज', २० फेब्रुवारी १९५५ — ३४

'आणखी एक वासुकी' या टोपण नावाने.

## २. अप्रकाशित नाटिका, कथा

१) मारून मुटकून पुरोगामी — ३९

२) कपाळवाट : 'रविवार सकाळ', ७ जुलै १९९१ — ६९

## ३. प्रकाशित असंकलित कथा

### अ) स्वतंत्र

१) मोती : लिंगराज कॉलेज, मिसलेनी — ७९

२) जुना कोट : 'संध्या', जून १९४०, वर्ष १, अंक २ — ८४

३) धीरे गाडी हाक रेऽऽ : 'विविधवृत्त', २३ जून १९४० — ९०

४) मृत्युलेख : 'चित्रा', २३ जून १९४० — ९६

५) भिकारडा ! : 'विविधवृत्त', ११ ऑगस्ट १९४० — ९९

६) दोन चांदण्या ! : [?] ऑक्टोबर १९४० — १०४

७) दया (अ)धर्माची दायी : [?] 'आशा', २ फ्रेबुवारी १९४१ — १०८

८) हल्लीच्या मुली : 'सत्यकथा', मार्च १९४१ — ११२

९) दुसरे बालपण ! : 'धनुर्धारी', २२ नोव्हेंबर १९४१ — १२१

१०) पगाराचा दिवस ! : 'सत्यकथा', फेब्रुवारी १९४२ — १२६

११) डायरीची कथा : 'सत्यकथा', मे-जून १९४२ — १३०

१२) संध्या-छाया : 'चित्रमयजगत', जून १९४२ — १४१

१३) गुलाबाची फुले : 'सत्यकथा', जुलै १९४२ — १४९

१४) घडीचे प्रवासी : 'मौज', १५ जुलै १९४२ — १५४

१५) हृदयातील अश्रू : 'सत्यकथा', ऑक्टोबर १९४२ — १६०

१६) प्रामाणिक जग! : 'मौज', ३ मार्च १९४३ १६४
१७) दुबळे जीव : 'नवयुग', ६ फेब्रुवारी १९४४ १६८
१८) निळा झगा : 'वसंत', फेब्रुवारी १९४५ १७४
१९) घड्याळ वाजे टिक् टिक् टिक् : 'वसंत', फेब्रुवारी १९४४ १८६
२०) भागीदार : 'अभिरुची', एप्रिल १९४६ १९३
२१) रझिया : 'हंस', ऑगस्ट १९४७ १९५
२२) दीक्षा : 'सत्यकथा', सप्टेंबर १९७० २०६
२३) सांगाती : 'सत्यकथा', ऑक्टोबर १९७० २१२

## ब) अनुवादित किंवा आधारित

१) कागदाचा तुकडा : [?] २२१
२) भुर्र : 'वसंत', फेब्रुवारी १९४६ २२३
३) देवदूत : 'हंस', जून १९४६ (वासंतिक पुष्प) २३०
४) शिकार : 'हंस', एप्रिल १९४७ २३५
५) फुलांची भेट : 'हंस', मे १९४७ वर्ष १, अंक १ २३९
६) खोल खोल : 'हंस', जुलै १९४७ २४३
७) आयुष्यातील एक पान (चेकॉव्हवरून) : 'वाङ्मयशोभा', ऑगस्ट १९४७ २४७
८) आत्महत्या! : 'मनोहर', सप्टेंबर १९४७ २५५
९) स्त्री-पुरुष (इंग्रजीवरून) : 'वाङ्मयशोभा', ऑक्टोबर १९४७ २५८
१०) आंधळ्यांचे जग : 'हंस', फेब्रुवारी १९४८ २६१
११) वादळ : 'हंस', मार्च १९४८ २६५
१२) नारिंगी हातरुमाल : 'वाङ्मयशोभा', दीपावली १९५० २७१
१३) उकाडा : 'हंस', ऑक्टोबर १९५६ २८२
१४) घड्याळ : 'हंस', जानेवारी १९५७ २८७
१५) सौदा : 'हंस', ऑगस्ट १९५७ ३०१
१६) चित्रांचा माणूस : 'हंस', ऑगस्ट १९५८ ३१४
१७) तिसरा डोळा : 'हंस', जानेवारी १९५९ ३२३
१८) कोजागिरी : 'हंस', ऑगस्ट १९५९ ३३३
१९) चांदणे : 'वाङ्मयशोभा', दिवाळी अंक १९५९ ३४१
२०) वेड : 'रहस्यरंजन', डिसेंबर १९६० ३५२

४. नाटिका
१) चांदण्यातील सावल्या : 'वाङमयशोभा', दीपावली १९४८ ३६७

५. लघुनिबंध, ललितलेख
१) प्रेम, प्रेम, प्रेम : 'नवयुग', ९ जून १९४० ३८३
२) जीवनचित्रे : 'सत्यकथा', जुलै १९५० ३८६

६. इंग्रजी कथा – मुक्त अनुवाद
१) Dinu's Bill
परिशिष्ट : (मूळ कथा) दिनूचे बिल, आचार्य अत्रे. ३९१

७. बालसाहित्य
१) वीरांचे स्मारक : 'शालापत्रक', मार्च १९४० ४०१
२) नवीन कोडी – कोडे नं. १, 'शब्द ओळखा', :
'शालापत्रक', मार्च १९४० ४०३
३) करून तर पहा ! – निकामी ग्लोब : 'शालापत्रक', मार्च १९४० ४०३
४) अब्राहम लिंकन : 'शालापत्रक', जून १९४० ४०४
५) करून तर पहा – 'जादूचा गोळा', : 'शालापत्रक', जून १९४० ४०४
६) यातील गंमत शोधा : 'शालापत्रक', जुलै १९४० ४०५
७) हास्यलहरी : 'शालापत्रक' सप्टेंबर १९४० ४०५
८) माणसाची शिकार : 'शालापत्रक', सप्टेंबर १९४० ४०६
९) एक कोडे : 'शालाप्रत्रक', सप्टेंबर १९४० ४०७
१०) पैशाची किंमत कोणाला ? : 'शालापत्रक', ऑक्टोबर १९४० ४०७
११) मनोहरची दिवाळी : 'शालापत्रक', दिवाळी अंक, नोव्हेंबर १९४० ४०७
१२) 'प्रिय मुग्धा, प्रिय लिट्‌ल मनीषा –' : पत्र " 'जी. ए.' नावाचे स्वप्न" ४१०

परिशिष्ट
कथा-सूची ४२१

विभाग पहिला

# साहित्यविचार

# चेकॉव्ह आणि मोपासाँ

(Somerset Maugham ने आपल्या एका कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा एक भाग. भाषांतर अगदी स्वैर आहे.)

टीकाकारांमध्ये विस्तृत वाचन व तरल रसिकता यांच्या जोडीला जगाचा तितकाच विस्तृत अनुभव क्वचितच आढळतो. पण या दोन्ही गोष्टी एकत्र असलेल्या माझ्या एका टीकाकार-मित्राने माझ्या कथांवर मोपासाँच्या कथांची अतिशय दाट छाया पडली आहे असा अभिप्राय दिला आहे. पण त्यात फारसे आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. माझ्या लहानपणी फ्रान्समधील सर्वश्रेष्ठ कथालेखक म्हणून त्याचे नाव सर्वत्र ऐकू येत होते, व मी त्याच्या काही कथाही अधाशीपणाने वाचल्या होत्या. मी पंधरा वर्षांचा असेन नसेन, पण त्या वेळेपासूनच मी ज्या ज्या वेळी पॅरिसला जात असे त्या दर वेळी मी माझा सारा वेळ ओडियन गॅलरीमध्ये पुस्तके चाळण्यात घालवीत असे. माझ्या आयुष्यात अशा उत्कृष्ट आनंदाचे क्षण पुन्हा क्वचितच आले असतील. पुस्तके पाहत पाहत हिंडणारे तेथे पुष्कळच लोक असत. परंतु त्या कफनीप्रमाणे लांब शर्ट घातलेल्या तेथील नोकरांचे अशा लोकांकडे फारसे लक्ष नसे, त्यामुळे तेथे निरनिराळी पुस्तके अगदी तासन् तास वाचण्यास सहज मिळत. तेथे एका शेल्फमध्ये मोपासाँची पुस्तके रांगेने मांडून ठेवली होती, पण त्या प्रत्येकाची किंमत साडेतीन फ्रँक होती. आणि त्या वेळी पुस्तकांसाठी एवढे पैसे खर्च करणे मला अजिबात शक्य नव्हते. त्यामुळे ती पुस्तके मला तेथे उभ्या उभ्याच वाचणे भाग होते. पुष्कळदा न फाडलेली पाने आली की मान अगदी वाकडी करून मला वाचावे लागे. पुष्कळदा नोकरांचे लक्ष नाहीसे पाहून मी घाईघाईने एखाददुसरे पान फाडीत असे व मग माझे वाचन पुढील पानापर्यंत सुरळीत चाले. परंतु नंतर सुदैवाने ती पुस्तके पंचाहत्तर सेंटला मिळू लागली व दर खेपेला मी त्याचे एक तरी पुस्तक घेऊ लागलो. अशा तऱ्हेने मी अठरा वर्षांचा असतानाच त्याच्या जवळजवळ साऱ्या उत्कृष्ट कथा वाचल्या होत्या. आणि त्यामुळे मी स्वत: ज्या वेळी कथा लिहिण्यास आरंभ केला त्या वेळी त्याच्या कथांचाच आदर्श माझ्या दृष्टीपुढे असल्यास नवल नाही. ती एक सुदैवाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. कारण त्या वयात त्याच्यापेक्षा कमी दर्जाच्या लेखकाचे आकर्षण वाटून तो आदर्श होणे अगदी शक्य नव्हते का?

मोपासाँचे नाव हल्ली पूर्वीइतके ऐकू येत नाही. त्याच्या लेखनात मनाला उबग आणणाऱ्या पुष्कळच ओंगळ गोष्टी आहेत हे आज कुणालाही मान्य करावे लागेल. फ्लूलेटच्या लेखनात दिसून येणारी गुळचट भावनाविवशता आणि जॉर्ज सँडच्या कादंबऱ्यांत आढळणारी बेगडी उन्मादकता यांच्याविरुद्ध ज्या फ्रेंच लेखकांनी बंड उभारले त्यापैकी मोपासाँ हा एक होता. तो स्वभावाने अतिवास्तववादी होता व काहीही करावे लागले तरी हरकत नाही, पण संपूर्ण सत्य चव्हाट्यावर आलेच पाहिजे या पंथाचा त्याने स्वीकार केला. अर्थात् त्याने अशा रीतीने चव्हाट्यावर आणलेली सत्ये एकांगी असल्यामुळे आज आपणांस उथळ वाटतात ही गोष्ट निराळी. कथेमधील व्यक्तींच्या स्वभावाचे धागेदोरे तो कधीच उकलून दाखवीत नाही, व एखादी घटना घडली की तिच्या मुळाशी कोणत्या भावनांचा संघर्ष आहे याच्याकडेही त्याचे क्वचितच लक्ष जाते. मनुष्याच्या हातून घटना घडतात एवढेच त्याला ठाऊक आहे. पण त्या तशाच का घडतात हा प्रश्न त्याला अजिबात महत्त्वाचा वाटत नाही. तो एके ठिकाणी म्हणतो, ''कथा अथवा कादंबरीमधील स्वभावचित्रण म्हणजे दुसरेतिसरे काही नसून बाह्य घटनांच्या द्वारे स्वभावाचा अगदी कानाकोपरा उजळणे हेच होय.'' हे सारे ठीक आहे व हेतूही मोठा उच्च आहे. परंतु निवळ बाह्य घटना दाखवल्या म्हणजे त्यामागील कारणपरंपराही समजतेच असे नाही. त्यामुळे मोपासाँच्या कथांमध्ये मानवी मन फारसे गुंतागुंतीचे राहिलेच नाही. या साधेपणामुळे त्याच्या काही कथा जरी विलक्षण परिणामकारक झाल्या असल्या तरी शेवटी ''हे सारे इतके सोपे असत नाही. मानवी आयुष्य यापेक्षा कितीतरी गुंतागुंतीचे असते.'' असे राहून राहून वाटू लागते. आणखी एक चमत्कारिक गोष्ट वाचकाच्या मनात सारखी डाचत राहते. आपणास भेटणाऱ्या चाळीस वर्षांखालील प्रत्येक स्त्रीशी काहीतरी भानगड करणे हे जणू प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे, ही कंटाळवाणी कल्पना तत्कालीन अनेक फ्रेंच लेखकांप्रमाणे मोपासाँमध्येही आढळते. या स्वत:विषयी वाटणाऱ्या चमत्कारिक मोठेपणासाठीच केवळ त्यांची कथांमधील पात्रे मोकाटपणे वागू लागतात. या लोकांची स्थिती काहीशी भूक नसतानाही निवळ आपला बोज राखण्यासाठी कॅव्हिएरसारखे विशेष व श्रीमंत खाद्यपदार्थ खाणाऱ्या लोकांसारखी आहे. त्याच्या स्त्रीपुरुषांच्या आयुष्यात केवळ एकच भावना खऱ्या उत्कटपणे दिसते – लोभ. या भावनेचा अगदी धागान् धागा मोपासाँला माहीत होता. जरी तिच्याबद्दल त्याला घृणा वाटे तरी त्याबरोबर त्याला तिच्याविषयी एक प्रकारची छुपी सहानुभूतीही वाटे. त्याच्या एकंदर स्वभावामध्ये काहीतरी उथळ व सामान्य होते यात शंका नाही.

पण या साऱ्यामुळे तो एक श्रेष्ठ दर्जाचा कलावंत नव्हता असा कुणी निष्कर्ष काढील तर मात्र तो पार चुकीचा ठरेल. तसे पाहिले तर कोणताच लेखक निर्दोष असू शकत नाही. म्हणूनच एखाद्या लेखकाचे सारे दोष मान्य करणे जरूर आहे. एवढेच नव्हे, तर

गुणाच्या बाजूला हे दोष ठेवल्यानेच समतोल मूल्यमापन शक्य आहे. मोपासाँच्या बाबतीत आज नेमके हेच घडत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. बहुधा कालाच्या ओघात एखाद्या लेखकात जे काही चांगले असते तेवढेच नेमके घेण्यात येते, बाकीचे सारे फेकून देण्यात येते. काही काही वेळा तर टीकाकार या बाबतीत फारच पुढे जातात. पुष्कळदा अगदी क्षुल्लक शब्दांतून मोठा आशय शोधण्याचा प्रयत्न हे विद्वान् टीकाकार करू लागले की, साधारण वाचक अगदी भांबावूनच जातो. अशी उदाहरणे शेक्स्पियरच्या बाबतीत अनंत घडली आहेत. निव्वळ घिसाडघाई, एकदा लिहिलेले पुन्हा वाचण्याचा कंटाळा, यामुळे त्याच्या नाटकांत पुष्कळच अर्धेकच्चे भाग आढळतात. पण हे बडे टीकाकार मात्र त्यांतून अत्यंत गहन तत्त्वज्ञान शोधून काढण्याची डोकेफोड करताना अद्याप दिसतात.

मोपासाँच्या कथा साऱ्या वाचनीय आहेत. सांगण्याच्या पद्धतीबरोबर सांगितलेल्या घटनाही मोठ्या मनोवेधक आहेत, व त्या कुणीही जेवण्याच्या वेळी सांगितल्या तर ऐकणाऱ्यांना मनोरंजक वाटतील. व्यक्तिश: मला हा एक अतिशय महत्त्वाचा गुण वाटतो. तुम्ही कितीही अडखळत, कंटाळवाण्या तऱ्हेने त्याच्या काही कथांची कथानके सांगितलीत तरी ऐकणाऱ्याला ती आकर्षक वाटलीच पाहिजेत. मोपासाँच्या कथांमध्ये सुरुवात, मध्य, शेवट, अशी काहीतरी पद्धत आहे. त्या कथा वाचल्या म्हणजे या लेखकाला म्हणावयाचे तरी काय आहे असे वाटून अस्वस्थता वाटत नाही. सुरुवातीपासून तो शेवटपर्यंत कसे सारे अगदी रेखीव आहे! हां, त्या कथांमध्ये मन भारून टाकणारी गूढ शक्ती नाही हे खरे. मोपासाँचा तो हेतू मुळी कधी नव्हताही. स्वत:च्या वाङ्मयीन महात्मतेविषयीच्या त्याच्या कल्पना फारशा मोठ्या नव्हत्या, व आपण मोठे तत्त्वज्ञ आहो असाही भलताच गैरसमज त्याने कधीच करून घेतला नाही. तसे पाहिले तर ते एका दृष्टीने बरेच झाले असे म्हटले पाहिजे. कारण चुकून एखाद वेळी तो जेव्हा तत्त्वचिंतनाचा आव आणतो तेव्हा त्याला अगदी शिळ्या व सामान्य विचारांखेरीज काही सुचतच नाही.

परंतु आपल्या विशिष्ट मर्यादेत मात्र तो अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा लेखक होता. निरनिराळ्या तऱ्हेची व्यक्तिचित्रे सहज रंगविण्याची त्याची हातोटी अत्यंत वाखाणण्याजोगी आहे. अगदी थोड्या पानांत आठदहा व्यक्तिचित्रे तो इतक्या सफाईने चितारतो की, त्यांच्याविषयी जरूर ती सारी माहिती मिळून आपणास ती अगदी ओळखीची वाटू लागतात. ती चित्रे रेखीव व जिवंत असतात खरी, परंतु त्यांचे जीवन आपणाला फारसे घडामोडींचे अथवा गुंतागुंतीचे वाटत नाही. दैनंदिन आयुष्यात हरघडी प्रत्ययास येणारी अस्थिरता, अथवा आकस्मिक घटना, व त्यांमुळे होणाऱ्या जीवनातील एक प्रकारच्या गूढतेची जाणीव या साऱ्याची उणीव तीव्रपणे वाटते. खरे म्हणजे कथानकाच्या सोयीसाठी त्या साऱ्यांचे जीवन मुद्दाम साधे व रेखीव केले आहे. पण तेवढ्यामुळे त्यांची सजीवता

आहे. मोठ्या, महत्त्वाच्या साहित्यकाराचे जे जे लेखन उपलब्ध होईल, ते ते प्रकाशित व्हावयाला पाहिजे. त्याच्या सम्यक् आकलनाला ते उपयुक्त, आवश्यकच आहे. त्या लेखकाची वाङ्मयीन जडणघडण समजण्याला, त्याचा साहित्यकार म्हणून विकास कसा झाला हे समजावयाला, त्याची निर्मितिप्रक्रिया समजावयाला असे लेखन निश्चितच उपयुक्त होईल. जी. एं. च्या पूर्ववयातील साहित्याचा शोध घेण्यामध्ये, ते संपादित-प्रकाशित करण्यामध्ये हीच भूमिका आहे. जी. एं. च्या लेखनाच्या उगमाचा हा शोध आहे. वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षापासून केलेले त्यांचे हे लेखन पाहिले, म्हणजे प्रारंभावयापासूनच त्यांना साहित्याची आवड होती, लेखन-प्रकाशनाची हौस होती, आकांक्षा होती हे लक्षात येते; आणि हे स्वाभाविक व रास्तही आहे. जी. एं. नी आपले हे लेखन संकलित, प्रकाशित केले नसेल; पण त्यांनी ते नष्टही केले नाही – तसे करता आले असते. यावरून जी. एं. नाही आपल्या पूर्ववयातील लेखनाबद्दल कसे साक्षेपी ममत्व वाटत असावे ते ध्यानात येते; आणि गांभीर्यपूर्वक साहित्यव्यवहार करणाऱ्या लेखकाला ते असावयालाही हवे! या लेखनामध्येही, पुढे जी. एं. च्या विकसित झालेल्या अनेक प्रवृत्तींचे, वाङ्मयीन गुणविशेषांचे दर्शन घडते. इतकेच नाही, तर त्यांच्या या उमेदवारीच्या काळातील साहित्यातीलही पुष्कळसे साहित्य स्वतंत्रपणे वाङ्मयीन गुणांनी संपन्न आहे; त्यामध्ये जी. एं. च्या 'जीए'पणाचा प्रत्यय येतो. आजपर्यंत जी. एं. च्या प्रसिद्ध झालेल्या, परिचित साहित्यापेक्षा वेगळ्या प्रकाराचेही त्यांचे साहित्य वाचण्यात एक निराळा आनंदही आहे.

"सोनपावले"मधून जी. एं. चे एक वेगळे दर्शन त्यांच्या सुजाण चाहत्यांना, अभ्यासकांना, आणि सर्वसामान्य रसिक वाचकांनाही होईल; आणि ते जी. एं. च्या इतर संग्रहांतील साहित्यातून घडणाऱ्या दर्शनापेक्षा, कदाचित् थोडे अधिकच मनोज्ञ होईल.

हा संग्रह संपादित करीत असताना अनेकांचे साहाय्य झाले. (कै.) प्रभाताईंकडून श्री. चंद्रकांत परचुरे यांना मिळालेले जी. एं. च्या साहित्याचे दप्तर हा तर या संग्रहाचा मूलाधार. श्रीमती शांताबाई शेळके यांनी 'शालापत्रका'तील जी. एं. च्या लेखनाकडे लक्ष वेधले, आणि तो संच उपलब्ध करून दिला. 'हंस'मधील कथांचा शोध घेण्यासाठी श्री. आनंद अंतरकरांनी सर्वतोपरी साहाय्य केले. 'सत्यकथे'तील लेखनाचा शोध घेण्यासाठी श्री. प्रभाकरपंत भागवतांनीही असेच आत्मीयतेने साहाय्य केले. 'वेड' ही कथा श्री. शंकर सारडांनी स्वत:च्या संग्रहातून दिली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे अशा प्रकारच्या संशोधकीय कामाचा नेहमीच प्रमुख आधार असते. तेथील सेवकांनीही मन:पूर्वक सहकार्य केले.

जी. एं. वरील डोळस प्रेम, अभिजात वाङ्मयप्रेम, आणि व्यक्तिगत लोभ यांमुळेच हे साहाय्य या सुहृदांनी केले. त्याचे स्मरणही सुखावह आहे.

जी. एं. च्या लेखनाची ही सोनपावले
सूर्योदयाच्या अगदी पहिल्या पहिल्या काही क्षणीं
गिरिशिखरांवर, उंच उंच तरुशिरांवर अत्यंत सुकोमलपणाने,
जाणवेल न जाणवेल अशी प्रभातरल किरणांमधून उमटलेली.
त्या प्रकाशप्रभूची ही सोनेरी माया.....
अंधारावर उमटलेली,... आश्वासक... स्नेहमयी
सोनपावले.....
कदाचित् –
– कदाचित् जी.ए. हेच एक परमेशाचे
सोनपाऊल असेल.....

'शतदीप', एस्-४
३५९ ब/२, मॉडेल कॉलनी
पुणे ४११०१६

सु. रा. चुनेकर
११ डिसेंबर १९९१
(जी.ए.-स्मृतिदिन)

# ''सोनपावलं''ची चाहूल

सूर्य पृथ्वीवर प्रथम अवतरतो तो 'सोनपावलां'नी. त्याचे पहिले किरण पृथ्वीवर पसरतात तेव्हा सर्वत्र एक दिव्य आभा पसरते. सकाळ उजाडते तेव्हाच्या आकाशातल्या त्या गुलाबी छटा, ती सोनेरी किरणे, तो सौम्य तेजात न्हालेला कोवळा सूर्य...

हे वर्णन सूर्य उगवतो त्या वेळेचे आहे की, प्रतिभावंत साहित्यिकाच्या साहित्यात केलेल्या पहिल्या पदार्पणाचे आहे? वाङ्मयात प्रथम प्रवेश करणारी प्रतिभावंताची पहिली 'सोनपावले' सूर्याच्या पहिल्या किरणांसारखीच नसतात का? येणाऱ्या तेजस्वी प्रकाशाची ती बोलकी पूर्वचिन्हेच असतात.

'जीएं'च्या प्रारंभीच्या काळातील लेखनाचे दर्शन पं. हृदयनाथ मंगेशकरांना सूर्योदयाच्या रूपाने हे असे झाले. हा योगायोग नसून एका प्रतिभावंत संगीतकाराने दुसऱ्या प्रतिभावंत साहित्यकाराला रेषांतून आणि रंगांतून वाहिलेली ही एक विनम्र आदरांजली आहे. पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी श्रीमती शिरीष पै यांच्या आग्रहाखातर जी.ए. च्या पहिल्या वहिल्या लिखाणाच्या या संग्रहाचे सुंदर बहिरंग तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन.

पुस्तक उघडण्यापूर्वीचे हे सूर्योदयाचे चित्र 'जीएं'च्या पहिल्या लेखनाचे प्रतीक आहे, तर पुस्तक मिटल्यावर नजरेला पडणारे दुसरे चित्र हे 'जीएं'ची प्रतिभा पूर्ण विकसित झाल्यानंतर मराठी कथेच्या क्षेत्रात मराठी वाचकांना केवळ थक्क करून सोडणारा जो चमत्कार तिने करून दाखविला त्याचे मर्म उकलून दाखवणारे आहे. 'जीएं'च्या स्वामी ह्या कथेवरूनच हे चित्र पं. हृदयनाथ मंगेशकरांना सुचले.

जीवनाची मूलगामी रहस्ये शोधत प्रतिभावंताचा आत्मा अस्तित्वाच्या वेगवेगळ्या थरांतून अंती आपल्या मूळ गर्भात प्रवेश करतो. तिथं गवसलेला जीवनाचा अर्थ प्रगट करण्यासाठी स्वत:ला झाकोळणाऱ्या खडकांचे कठीण थर पार करीत, कोमल हिरवी वेल होऊन, अदृश्य वाटा शोधीत तो आवेगाने रक्तकुसुमाच्या रूपाने बाहेर पडतो. त्या वेलीला उद्देशून स्वत: 'जीए' म्हणतात –

तू असाच वर जा.

अंधाऱ्या सांदरीतून निघालेले तुझे आयुष्य न चिरडल्या जाणाऱ्या ईर्ष्येने वर वर जाऊन एका तृप्त क्षणी सूर्यप्रकाशाला भेटू दे.

तुला जर फुले येतील –

आणि तुला सोन्याच्या लहान पेल्यांसारखी फुले यावीत व त्यांच्या स्पर्शाने पराग सांडून बोटांची टोके पिवळी सुगंधी व्हावीत.

तुला जर फुले येतील, तर अशा सहस्र फुलांना घेऊन तू तुझ्यावर वाकलेल्या आभाळाला सामोरे जा व त्याच्या निळ्या साक्षीने तू त्यांच्यांत सूर्यप्रकाश साठवून घे.

तुला जर फळे येतील –

आणि तुला दर पानाआड लहानसे लाल फळ यावे व ते इतके रसरशीत असावे की, त्या प्रत्येकाच्या लाल रंगात सूर्यप्रकाशाचा एक एक कण सतत सुखाने नांदत राहावा.

तुला जर फळे येतील, तर त्यांच्यासह तू क्षितिजाकडे पाहा. कारण तू अशा अंधारातून त्याचाच शोध घेत त्याच्याकडे आला आहेस.

मग तुझ्या बीजांची फळे सर्वत्र विखरून त्या तुझ्या विजयाच्या खुणा सर्वत्र रुजू देत.

जर कणाएवढ्या प्रकाशाचा काजवा तुला कधी दिसला तर तू त्याचे स्वागत कर.

त्या कणाच्या अभिमानाने त्याने रात्रीच्या अमर्याद अंधाराला आव्हान देऊन त्याचा एक कण जिंकून प्रकाशित केला आहे.

आभाळात एखादे लहान पाखरू उडताना दिसले तर तू त्याला आतिथ्य दाखव.

कारण दोन कोवळ्या पंखांच्या आत्मविश्वासाने ते आभाळाला किंचित् मागे रेटत आहे.

जर कधी एखाद्या मुलाने तुझे एक रसरशीत पान घेऊन दुमडून ते पुन्हा आडवे उघडले व पानाचा आरसा केला; किंवा कधी तुझे पिवळे फूल तोडून बोटे पिवळ्या धुळीने माखून घेतली; अगर तुझे एक लाल फळ खुडून ते दोन बोटांत चेंगरत रसाचा लाल धागा काढला, तर तू त्याच्यावर क्रुद्ध होऊ नकोस.

कारण, कुणास ठाऊक, अब्जामध्येच एक आढळणारे असे ते मूल असून तेदेखील भोवतालच्या अंधाऱ्या अजस्र भिंती फोडून सूर्यप्रकाशाकडे येण्याची कधीतरी धडपड करणार असेल.

*आणि तसे असेल तर ते तुझ्या रक्तानात्याचेच आहे.*
*म्हणून तू त्याच्यावर क्रुद्ध होऊ नकोस.*
*एक पान गेल्याने तुला दारिद्र्य येणार नाही.*
*एक फूल गेल्याने तुझे सौंदर्य उणे भासणार नाही.*
*एक फळ नाहीसे झाल्याने तुझ्या आयुष्यात नैराश्य येणार नाही.*
*इतके तुला वैभव आहे. इतके वैभव तुला मिळो!*

*या साऱ्यात मला विशेष सुख आहे, कारण तुझे एक पान म्हणजे माझा एकेक श्वास आहे. म्हणून तू म्हणजे मीच स्वत: आहे. मी संपलो नाही तर मी केवळ बदललो आहे. तू आपले सारे सामर्थ्य घेऊन आभाळाखाली सूर्यप्रकाशात वर आला आहेस एवढे इतरांना समजू दे.*

*मी अंधारात लाल प्रकाशात दडपून चिरडला गेलो नाही, तर मीच हिरव्या कारंजाप्रमाणे वर आलो आहे, हेदेखील इतरांना कळू दे.*

*म्हणून तू असाच वर जा.*

जॉली ऑफसेटचे श्री. सदानंद वैद्य, अक्षय फोटोटाइपसेटर्सचे श्री. अरुण फडके व अक्षर प्रतिरूपचे श्री. अरुण नाईक या सर्वांनी हे पुस्तक सर्वांगसुंदर होण्यासाठी मोलाची मदत केली आहे. या सर्व हितचिंतकांचा मी आभारी आहे.

या सोनपावलांची चाहूल प्रथम डॉ. सु. रा. चुनेकर व माझे बंधू श्री. चंद्रकांत परचुरे यांना लागली. डॉ. चुनेकरांच्या अथक परिश्रमांमुळेच ही 'सोनपावले' मी आपल्यापर्यंत आणू शकलो यात काय संशय? मी या दोघांचाही ऋणी आहे.

पुस्तक कसे असावे याबद्दल 'जीएं'च्या काही कल्पना होत्या व त्यांनी त्या माझ्याजवळ बोलून दाखविल्या होत्या. 'जीएं'च्या मनात असलेल्या कल्पना मी प्रत्यक्षात आणू शकलो की नाही, हे जाणून घेण्यासाठी माझे 'जीए' व त्यांच्या भगिनी प्रभाताई आज हयात नाहीत. मुद्रणालयातून तयार झालेल्या कोऱ्या करकरीत प्रती त्यांच्या तसबिरीसमोर ठेवून तसबिरीतल्या सोनपावलांना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेणे एवढेच आता माझ्यापाशी उरले आहे.

मुंबई
११ डिसेंबर १९९१

अप्पा परचुरे

# अनुक्रमणिका


**१. साहित्यविचार**

१) **चेकॉव्ह आणि मोपासाँ** : 'प्रसाद', जुलै १९४८ २३

सॉमरसेट मॉमने आपल्या एका कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा एक भाग.

२) **अनाकलनीयाचे आकर्षण** : 'मौज', २० फेब्रुवारी १९५५ ३४

'आणखी एक वासुकी' या टोपण नावाने.

**२. अप्रकाशित नाटिका, कथा**

१) **मारून मुटकून पुरोगामी** ३९

२) **कपाळवाट** : 'रविवार सकाळ', ७ जुलै १९९१ ६९

**३. प्रकाशित असंकलित कथा**

**अ) स्वतंत्र**

१) **मोती** : लिंगराज कॉलेज, मिसलेनी ७९

२) **जुना कोट** : 'संध्या', जून १९४०, वर्ष १, अंक २ ८४

३) **धीरे गाडी हाक रेऽऽ** : 'विविधवृत्त', २३ जून १९४० ९०

४) **मृत्युलेख** : 'चित्रा', २३ जून १९४० ९६

५) **भिकारडा!** : 'विविधवृत्त', ११ ऑगस्ट १९४० ९९

६) **दोन चांदण्या!** : [?] ऑक्टोबर १९४० १०४

७) **दया (अ)धर्माची दायी** : [?] 'आशा', २ फ्रेबुवारी १९४१ १०८

८) **हल्लीच्या मुली** : 'सत्यकथा', मार्च १९४१ ११२

९) **दुसरे बालपण!** : 'धनुर्धारी', २२ नोव्हेंबर १९४१ १२१

१०) **पगाराचा दिवस!** : 'सत्यकथा', फेब्रुवारी १९४२ १२६

११) **डायरीची कथा** : 'सत्यकथा', मे-जून १९४२ १३०

१२) **संध्या-छाया** : 'चित्रमयजगत', जून १९४२ १४१

१३) **गुलाबाची फुले** : 'सत्यकथा', जुलै १९४२ १४९

१४) **घडीचे प्रवासी** : 'मौज', १५ जुलै १९४२ १५४

१५) **हृदयातील अश्रू** : 'सत्यकथा', ऑक्टोबर १९४२ १६०

१६) प्रामाणिक जग ! : 'मौज', ३ मार्च १९४३ १६४
१७) दुबळे जीव : 'नवयुग', ६ फेब्रुवारी १९४४ १६८
१८) निळा झगा : 'वसंत', फेब्रुवारी १९४५ १७४
१९) घड्याळ वाजे टिक् टिक् टिक् : 'वसंत', फेब्रुवारी १९४४ १८६
२०) भागीदार : 'अभिरुची', एप्रिल १९४६ १९३
२१) रझिया : 'हंस', ऑगस्ट १९४७ १९५
२२) दीक्षा : 'सत्यकथा', सप्टेंबर १९७० २०६
२३) सांगाती : 'सत्यकथा', ऑक्टोबर १९७० २१२

## ब) अनुवादित किंवा आधारित

१) कागदाचा तुकडा : [?] २२१
२) भुर्र : 'वसंत', फेब्रुवारी १९४६ २२३
३) देवदूत : 'हंस', जून १९४६ (वासंतिक पुष्प) २३०
४) शिकार : 'हंस', एप्रिल १९४७ २३५
५) फुलांची भेट : 'हंस', मे १९४७ वर्ष १, अंक १ २३९
६) खोल खोल : 'हंस', जुलै १९४७ २४३
७) आयुष्यातील एक पान (चेकॉव्हवरून) : 'वाङ्मयशोभा', ऑगस्ट १९४७ २४७
८) आत्महत्या ! : 'मनोहर', सप्टेंबर १९४७ २५५
९) स्त्री-पुरुष (इंग्रजीवरून) : 'वाङ्मयशोभा', ऑक्टोबर १९४७ २५८
१०) आंधळ्यांचे जग : 'हंस', फेब्रुवारी १९४८ २६१
११) वादळ : 'हंस', मार्च १९४८ २६५
१२) नारिंगी हातरुमाल : 'वाङ्मयशोभा', दीपावली १९५० २७१
१३) उकाडा : 'हंस', ऑक्टोबर १९५६ २८२
१४) घड्याळ : 'हंस', जानेवारी १९५७ २८७
१५) सौदा : 'हंस', ऑगस्ट १९५७ ३०१
१६) चित्रांचा माणूस : 'हंस', ऑगस्ट १९५८ ३१४
१७) तिसरा डोळा : 'हंस', जानेवारी १९५९ ३२३
१८) कोजागिरी : 'हंस', ऑगस्ट १९५९ ३३३
१९) चांदणे : 'वाङ्मयशोभा', दिवाळी अंक १९५९ ३४१
२०) वेड : 'रहस्यरंजन', डिसेंबर १९६० ३५२

**४. नाटिका**

१) चांदण्यातील सावल्या : 'वाङमयशोभा', दीपावली १९४८ ३६७

**५. लघुनिबंध, ललितलेख**

१) प्रेम, प्रेम, प्रेम : 'नवयुग', ९ जून १९४० ३८३

२) जीवनचित्रे : 'सत्यकथा', जुलै १९५० ३८६

**६. इंग्रजी कथा – मुक्त अनुवाद**

१) Dinu's Bill

परिशिष्ट : (मूळ कथा) दिनूचे बिल, आचार्य अत्रे. ३९१

**७. बालसाहित्य**

१) वीरांचे स्मारक : 'शालापत्रक', मार्च १९४० ४०१

२) नवीन कोडी – कोडे नं. १, 'शब्द ओळखा', :
'शालापत्रक', मार्च १९४० ४०३

३) करून तर पहा! – निकामी ग्लोब : 'शालापत्रक', मार्च १९४० ४०३

४) अब्राहम लिंकन : 'शालापत्रक', जून १९४० ४०४

५) करून तर पहा – 'जादूचा गोळा', : 'शालापत्रक', जून १९४० ४०४

६) यातील गंमत शोधा : 'शालापत्रक', जुलै १९४० ४०५

७) हास्यलहरी : 'शालापत्रक' सप्टेंबर १९४० ४०५

८) माणसाची शिकार : 'शालापत्रक', सप्टेंबर १९४० ४०६

९) एक कोडे : 'शालाप्रत्रक', सप्टेंबर १९४० ४०७

१०) पैशाची किंमत कोणाला? : 'शालापत्रक', ऑक्टोबर १९४० ४०७

११) मनोहरची दिवाळी : 'शालापत्रक', दिवाळी अंक, नोव्हेंबर १९४० ४०७

१२) 'प्रिय मुग्धा, प्रिय लिट्ल मनीषा –' : पत्र '''जी. ए.' नावाचे स्वप्न'' ४१०

**परिशिष्ट**

कथा-सूची ४२१

विभाग पहिला

# साहित्यविचार

# चेकॉव्ह आणि मोपासाँ

(Somerset Maugham ने आपल्या एका कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा एक भाग. भाषांतर अगदी स्वैर आहे.)

टीकाकारांमध्ये विस्तृत वाचन व तरल रसिकता यांच्या जोडीला जगाचा तितकाच विस्तृत अनुभव क्वचितच आढळतो. पण या दोन्ही गोष्टी एकत्र असलेल्या माझ्या एका टीकाकार-मित्राने माझ्या कथांवर मोपासाँच्या कथांची अतिशय दाट छाया पडली आहे असा अभिप्राय दिला आहे. पण त्यात फारसे आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. माझ्या लहानपणी फ्रान्समधील सर्वश्रेष्ठ कथालेखक म्हणून त्याचे नाव सर्वत्र ऐकू येत होते, व मी त्याच्या काही कथाही अधाशीपणाने वाचल्या होत्या. मी पंधरा वर्षांचा असेन नसेन, पण त्या वेळेपासूनच मी ज्या ज्या वेळी पॅरिसला जात असे त्या दर वेळी मी माझा सारा वेळ ओडियन गॅलरीमध्ये पुस्तके चाळण्यात घालवीत असे. माझ्या आयुष्यात अशा उत्कृष्ट आनंदाचे क्षण पुन्हा क्वचितच आले असतील. पुस्तके पाहत पाहत हिंडणारे तेथे पुष्कळच लोक असत. परंतु त्या कफनीप्रमाणे लांब शर्ट घातलेल्या तेथील नोकरांचे अशा लोकांकडे फारसे लक्ष नसे, त्यामुळे तेथे निरनिराळी पुस्तके अगदी तासन् तास वाचण्यास सहज मिळत. तेथे एका शेल्फमध्ये मोपासाँची पुस्तके रांगेने मांडून ठेवली होती, पण त्या प्रत्येकाची किंमत साडेतीन फ्रँक होती. आणि त्या वेळी पुस्तकांसाठी एवढे पैसे खर्च करणे मला अजिबात शक्य नव्हते. त्यामुळे ती पुस्तके मला तेथे उभ्या उभ्याच वाचणे भाग होते. पुष्कळदा न फाडलेली पाने आली की मान अगदी वाकडी करून मला वाचावे लागे. पुष्कळदा नोकरांचे लक्ष नाहीसे पाहून मी घाईघाईने एखाददुसरे पान फाडीत असे व मग माझे वाचन पुढील पानापर्यंत सुरळीत चाले. परंतु नंतर सुदैवाने ती पुस्तके पंचाहत्तर सेंटला मिळू लागली व दर खेपेला मी त्याचे एक तरी पुस्तक घेऊ लागलो. अशा तऱ्हेने मी अठरा वर्षांचा असतानाच त्याच्या जवळजवळ साऱ्या उत्कृष्ट कथा वाचल्या होत्या. आणि त्यामुळे मी स्वतः ज्या वेळी कथा लिहिण्यास आरंभ केला त्या वेळी त्याच्या कथांचाच आदर्श माझ्या दृष्टीपुढे असल्यास नवल नाही. ती एक सुदैवाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. कारण त्या वयात त्याच्यापेक्षा कमी दर्जाच्या लेखकाचे आकर्षण वाटून तो आदर्श होणे अगदी शक्य नव्हते का?

मोपासाँचे नाव हल्ली पूर्वीइतके ऐकू येत नाही. त्याच्या लेखनात मनाला उबग आणणाऱ्या पुष्कळच ओंगळ गोष्टी आहेत हे आज कुणालाही मान्य करावे लागेल. फ्लूलेटच्या लेखनात दिसून येणारी गुळचट भावनाविवशता आणि जॉर्ज सँडच्या कादंबऱ्यांत आढळणारी बेगडी उन्मादकता यांच्याविरुद्ध ज्या फ्रेंच लेखकांनी बंड उभारले त्यांपैकी मोपासाँ हा एक होता. तो स्वभावाने अतिवास्तववादी होता व काहीही करावे लागले तरी हरकत नाही, पण संपूर्ण सत्य चव्हाट्यावर आलेच पाहिजे या पंथाचा त्याने स्वीकार केला. अर्थात् त्याने अशा रीतीने चव्हाट्यावर आणलेली सत्ये एकांगी असल्यामुळे आज आपणांस उथळ वाटतात ही गोष्ट निराळी. कथेमधील व्यक्तींच्या स्वभावाचे धागेदोरे तो कधीच उकलून दाखवीत नाही, व एखादी घटना घडली की तिच्या मुळाशी कोणत्या भावनांचा संघर्ष आहे याच्याकडेही त्याचे क्वचितच लक्ष जाते. मनुष्याच्या हातून घटना घडतात एवढेच त्याला ठाऊक आहे. पण त्या तशाच का घडतात हा प्रश्न त्याला अजिबात महत्त्वाचा वाटत नाही. तो एके ठिकाणी म्हणतो, "कथा अथवा कादंबरीमधील स्वभावचित्रण म्हणजे दुसरेतिसरे काही नसून बाह्य घटनांच्या द्वारे स्वभावाचा अगदी कानाकोपरा उजळणे हेच होय." हे सारे ठीक आहे व हेतूही मोठा उच्च आहे. परंतु निवळ बाह्य घटना दाखवल्या म्हणजे त्यामागील कारणपरंपराही समजतेच असे नाही. त्यामुळे मोपासाँच्या कथांमध्ये मानवी मन फारसे गुंतागुंतीचे राहिलेच नाही. या साधेपणामुळे त्याच्या काही कथा जरी विलक्षण परिणामकारक झाल्या असल्या तरी शेवटी "हे सारे इतके सोपे असत नाही. मानवी आयुष्य यापेक्षा कितीतरी गुंतागुंतीचे असते." असे राहून राहून वाटू लागते. आणखी एक चमत्कारिक गोष्ट वाचकाच्या मनात सारखी डाचत राहते. आपणास भेटणाऱ्या चाळीस वर्षांखालील प्रत्येक स्त्रीशी काहीतरी भानगड करणे हे जणू प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे, ही कंटाळवाणी कल्पना तत्कालीन अनेक फ्रेंच लेखकांप्रमाणे मोपासाँमध्येही आढळते. या स्वत:विषयी वाटणाऱ्या चमत्कारिक मोठेपणासाठीच केवळ त्यांची कथांमधील पात्रे मोकाटपणे वागू लागतात. या लोकांची स्थिती काहीशी भूक नसतानाही निवळ आपला बोज राखण्यासाठी कॅव्हिएरसारखे विशेष व श्रीमंत खाद्यपदार्थ खाणाऱ्या लोकांसारखी आहे. त्याच्या स्त्रीपुरुषांच्या आयुष्यात केवळ एकच भावना खऱ्या उत्कटपणे दिसते – लोभ. या भावनेचा अगदी धागान् धागा मोपासाँला माहीत होता. जरी तिच्याबद्दल त्याला घृणा वाटे तरी त्याबरोबर त्याला तिच्याविषयी एक प्रकारची छुपी सहानुभूतीही वाटे. त्याच्या एकंदर स्वभावामध्ये काहीतरी उथळ व सामान्य होते यात शंका नाही.

पण या साऱ्यामुळे तो एक श्रेष्ठ दर्जाचा कलावंत नव्हता असा कुणी निष्कर्ष काढील तर मात्र तो पार चुकीचा ठरेल. तसे पाहिले तर कोणताच लेखक निर्दोष असू शकत नाही. म्हणूनच एखाद्या लेखकाचे सारे दोष मान्य करणे जरूर आहे. एवढेच नव्हे, तर

गुणाच्या बाजूला हे दोष ठेवल्यानेच समतोल मूल्यमापन शक्य आहे. मोपासाँच्या बाबतीत आज नेमके हेच घडत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. बहुधा कालाच्या ओघात एखाद्या लेखकात जे काही चांगले असते तेवढेच नेमके घेण्यात येते, बाकीचे सारे फेकून देण्यात येते. काही काही वेळा तर टीकाकार या बाबतीत फारच पुढे जातात. पुष्कळदा अगदी क्षुल्लक शब्दांतून मोठा आशय शोधण्याचा प्रयत्न हे विद्वान् टीकाकार करू लागले की, साधारण वाचक अगदी भांबावूनच जातो. अशी उदाहरणे शेक्स्पियरच्या बाबतीत अनंत घडली आहेत. निव्वळ घिसाडघाई, एकदा लिहिलेले पुन्हा वाचण्याचा कंटाळा, यामुळे त्याच्या नाटकांत पुष्कळच अर्धेकच्चे भाग आढळतात. पण हे बडे टीकाकार मात्र त्यांतून अत्यंत गहन तत्त्वज्ञान शोधून काढण्याची डोकेफोड करताना अद्याप दिसतात.

मोपासाँच्या कथा साऱ्या वाचनीय आहेत. सांगण्याच्या पद्धतीबरोबर सांगितलेल्या घटनाही मोठ्या मनोवेधक आहेत, व त्या कुणीही जेवण्याच्या वेळी सांगितल्या तर ऐकणाऱ्यांना मनोरंजक वाटतील. व्यक्तिशः मला हा एक अतिशय महत्त्वाचा गुण वाटतो. तुम्ही कितीही अडखळत, कंटाळवाण्या तऱ्हेने त्याच्या काही कथांची कथानके सांगितलीत तरी ऐकणाऱ्याला ती आकर्षक वाटलीच पाहिजेत. मोपासाँच्या कथांमध्ये सुरुवात, मध्य, शेवट, अशी काहीतरी पद्धत आहे. त्या कथा वाचल्या म्हणजे या लेखकाला म्हणावयाचे तरी काय आहे असे वाटून अस्वस्थता वाटत नाही. सुरुवातीपासून तो शेवटपर्यंत कसे सारे अगदी रेखीव आहे! हां, त्या कथांमध्ये मन भारून टाकणारी गूढ शक्ती नाही हे खरे. मोपासाँचा तो हेतू मुळी कधी नव्हताही. स्वतःच्या वाङ्मयीन महात्मतेविषयीच्या त्याच्या कल्पना फारशा मोठ्या नव्हत्या, व आपण मोठे तत्त्वज्ञ आहो असाही भलताच गैरसमज त्याने कधीच करून घेतला नाही. तसे पाहिले तर ते एका दृष्टीने बरेच झाले असे म्हटले पाहिजे. कारण चुकून एखाद वेळी तो जेव्हा तत्त्वचिंतनाचा आव आणतो तेव्हा त्याला अगदी शिळ्या व सामान्य विचारांखेरीज काही सुचतच नाही.

परंतु आपल्या विशिष्ट मर्यादेत मात्र तो अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा लेखक होता. निरनिराळ्या तऱ्हेची व्यक्तिचित्रे सहज रंगविण्याची त्याची हातोटी अत्यंत वाखाणण्याजोगी आहे. अगदी थोड्या पानांत आठदहा व्यक्तिचित्रे तो इतक्या सफाईने चितारतो की, त्यांच्याविषयी जरूर ती सारी माहिती मिळून आपणास ती अगदी ओळखीची वाटू लागतात. ती चित्रे रेखीव व जिवंत असतात खरी, परंतु त्यांचे जीवन आपणाला फारसे घडामोडींचे अथवा गुंतागुंतीचे वाटत नाही. दैनंदिन आयुष्यात हरघडी प्रत्ययास येणारी अस्थिरता, अथवा आकस्मिक घटना, व त्यांमुळे होणाऱ्या जीवनातील एक प्रकारच्या गूढतेची जाणीव या साऱ्याची उणीव तीव्रपणे वाटते. खरे म्हणजे कथानकाच्या सोयीसाठी त्या साऱ्यांचे जीवन मुद्दाम साधे व रेखीव केले आहे. पण तेवढ्यामुळे त्यांची सजीवता

नष्ट झाली आहे असे मात्र म्हणता येणार नाही. कारण मोपासाँची दृष्टी जीवनाच्या गाभाऱ्यापर्यंत जरी कधीच पोहोचली नाही तरी कथानक परिणामकारक होण्यास जरूर असलेल्या गोष्टी मात्र ती चट्‌कन् टिपून घेत असे. वातावरणनिर्मितीच्या बाबतीतही हीच गोष्ट दिसून येते. अगदी मोजक्या ओळींतच कथानकासाठी तो रंगभूमी सजवतो, परंतु तो नॉर्मंडीमधील नयनरम्य दृश्यांचे वर्णन करीत असो, अगर शहरातील कुंद हवेने असह्य होत असलेल्या दिवाणखान्यातील भाषणे सांगत असो, आपला उद्देश अशा तऱ्हेची निवळ वर्णने करावयाचा नसून आपणास एक कथानक सांगावयाचे आहे, या गोष्टीचा त्याला कधीच विसर पडत नाही. काही विशिष्ट मर्यादित मोपासाँइतका श्रेष्ठ लघुकथालेखक अन्य कुणी झाला आहे अथवा होईल असे मला वाटत नाही. आज त्याचे नाव फारसे ऐकू येत नाही याचे कारण एकच आहे. ते म्हणजे नेहमी त्याची चेकॉव्हसारख्या अत्यंत कुशल, हृदयस्पर्शी परंतु सर्वस्वी भिन्न लेखकाशी तुलना केली जाते हेच होय.

आज मोठमोठ्या टीकाकारांत चेकॉव्हइतका मान दुसऱ्या कुणालाच मिळत नाही. खरे म्हणजे त्याच्यापुढे बाकीच्या लघुकथालेखकांची अजिबात पत्रास उरली नाही. आपणांस चेकॉव्ह आवडतो असे म्हणणे वाङ्मयाभिरुचीचे एक लक्षण होऊन बसले आहे. उलट, चेकॉव्ह आपणांस समजत नाही असे सांगणे म्हणजे आपण निवळ एक शिराळशेट (Philistine) असून आपणांस वाङ्मयामधील काहीच समजत नाही अशी कबुली देण्यासारखे आहे. आज साऱ्या तरुण लेखकांपुढे चेकॉव्हच्या कथाच आदर्श म्हणून असतात. वरवर पहिले तर मोपासाँसारख्या गोष्टी लिहिण्यापेक्षा चेकॉव्हसारख्या गोष्टी लिहिणे सोपे वाटते. निवेदनपद्धती व निवेदन करण्याचे कथानक या दोन भिन्न गोष्टी आहेत, व आकर्षक असे कथानक शोधून काढणे फारसे सोपे नाही; ती एक निसर्गदत्त देणगी आहे. थोड्या परिश्रमाने अथवा विचाराने आपण ती साध्य करू असे कुणी म्हणेल तर ते त्यास शक्य होणार नाही, आणि ही देणगीही फारच थोड्या लेखकांत आढळते. चेकॉव्हमध्ये अन्य बरेच गुण आहेत, पण त्यात हा मात्र नाही. चेकॉव्हच्या एखाद्या कथेचे कथानक सांगण्याचा तुम्ही प्रयत्न केलात तर सांगायला कथानकच मुळी नाही असा चमत्करिक प्रसंग निर्माण होतो. आजूबाजूच्या चौकटीमधून मध्यवर्ती घटना जर बाजूला काढली तर ती पुष्कळदा क्षुल्लक व नि:सत्त्व वाटू लागते. ज्या लोकांना लघुकथा तर लिहावयाच्या होत्या, पण एखादे भरदार कथानक शोधण्याची मात्र कुवत नाही, अशा लोकांना चेकॉव्ह हा अतिशय मोठा आधार मिळाला. कथानक लघुकथेत महत्त्वाचे तर नाहीच, पण पुष्कळदा अजिबात कथानकाशिवायच कथा लिहिता येतात हे पाहून त्यांना विलक्षण हायसे वाटले असल्यास नवल नाही. दोनतीन कोणत्याही व्यक्ती घ्यावयाच्या, त्यांची नेहमीच्या व्यवहारातील साधी व पुष्कळदा असंबद्ध बोलणी दाखवून परस्परसंबंध दाखवावयाचे की झाली लघुकथा तयार! पाहिलंत, कलानिर्मिती किती सहज आहे!

परंतु एखाद्या लेखकाच्या दोषांचे दैवत करावयाचे व त्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून त्याप्रमाणे लेखन करावयाचे, ही फारशी शहाणपणाची गोष्ट आहे असे मला वाटत नाही. जर शक्य असते तर खुद्द चेकॉव्हनेदेखील बांधीव व कलाटणीदार कथाच लिहिल्या असत्या अशी माझी खात्री आहे. पण ते त्याच्या स्वभावातच नव्हते. साऱ्या श्रेष्ठ कलावंतांप्रमाणे चेकॉव्हलाही आपल्या मर्यादेची जाणीव होती. गटेनेच नाही का कुठेतरी म्हटले की, कलावंताचा मोठेपणा त्याच्या स्वतःच्या मर्यादेच्या जाणिवेतूनच निर्माण होतो म्हणून? जर आपण लघुकथेची व्याख्या 'जवळजवळ काल्पनिक व्यक्तीविषयी लिहिलेले गद्य' अशी केली तर चेकॉव्हइतक्या श्रेष्ठ दर्जाच्या कथा फारच थोड्या लेखकांनी लिहिल्या आहेत हे आपणांस मान्य केलेच पाहिजे. पण काही जण या व्याख्येला संमती देणार नाहीत. त्यांच्या मते लघुकथा म्हणजे एका मर्यादित लांबीच्या संपूर्ण व सलग घटनेचे चित्रण होय. आणि ही व्याख्या जर आपण स्वीकारली तर चेकॉव्हमध्ये मोठी उणीव आहे हे समजून येते. त्या बाबतीत त्याने आपले मत स्पष्टच लिहून ठेवले आहे : "जगाचा तिटकारा येऊन एक मनुष्य सबमरीनमध्ये बसून उत्तर ध्रुवाकडे जातो व त्याची प्रिया ऊर बडवीत समुद्रात उडी घेते. असल्या आतषबाजीच्या कथा लिहिण्यात काय स्वारस्य आहे? त्या असत्य व फसव्या वाटतात व अशा हकिकती दैनंदिन आयुष्यात क्वचितच घडतात. साध्या जीवनातूनदेखील लेखकाला वाटेल तेवढी कथानके सुचतील. पीटरचे मेरीशी कसे लग्न झाले? बस्स, असल्या साध्या घटना अगदी पुरेशा आहेत."

परंतु एखाद्या रोमहर्षक व विलक्षण प्रसंगावरून लेखकाने कथा का लिहू नयेत कुणास ठाऊक! काही प्रसंग आपल्या जीवनात हमेशा घडतात म्हणूनच काही विशेष ठरत नाहीत. अशा तऱ्हेच्या कथा वाचल्यानंतर "होय बुवा, अशा गोष्टी दररोज घडतात खऱ्या," असा विचार येऊन ओळख पटल्याचा जो एक आनंद होतो तो, खरे पाहिले तर, कलानंदात अगदी कनिष्ठ तऱ्हेचा असतो. एखाद्या कथेत नाट्यात्मक काही नाही हा काही तिचा गुण होऊ शकत नाही. मोपासाँनेदेखील अगदी डोळ्यांसमोर दिसणाऱ्याच व्यक्ती निवडल्या व त्यांच्या नेहमीच्या रुक्ष जीवनातदेखील काहीतरी नाट्यात्मक घडू शकते हे दाखवून दिले. तो प्रथम एखाद्या अर्थपूर्ण प्रसंगाची निवड करतो, व मग त्यातून जास्तीत जास्त नाट्यात्मकता कशी शोषून घेता येईल याच्याकडे त्याचे लक्ष लागून राहते. बाकीच्या पद्धतींत ही पद्धत कमी दर्जाची आहे असे मुळीच नाही. उलट अशाने लघुकथा निर्विवाद मनोवेधक होतात. वास्तवता ही एकच काही महत्त्वाची कसोटी नाही. एके काळी, निवळ रक्तसंबंधामुळे कैक वर्षांपासून हरवलेला मुलगा अथवा भाऊ ओळखता येतो, अथवा प्रेमामुळे झुरणीस लागलेल्या नायिका पुरुषाच्या वेषात खुशाल वावरू शकतात, व त्यांना कुणी ओळखू शकत नाही, असल्या गोष्टींवर वाचक डोळे मिटून

खुशाल विश्वास ठेवीत असे. वास्तवता, वास्तवता म्हणून काही ठराविक लांबीरुंदीची वस्तू नाही. एखादी कथा वाचकांनी स्वीकारली की झाले. तेथे वास्तवता निर्माण झालीच.

खुद्द चेकॉव्हनेदेखील आपले तत्त्व सोईस्कर तेथेच पाळले आहे. त्याची 'The Bishop' नावाची अत्यंत सुंदर व हृदयस्पर्शी कथा घ्या. मृत्यूची जवळ जवळ ऐकू येणारी पाउले चेकॉव्हने किती विलक्षण हळुवार हाताने वर्णन केली आहेत! पण त्या बिशपच्या मृत्यूचे कारण तरी काय आहे? तंत्राविषयी जास्त कदर करणारा लेखक असता तर त्याने मृत्यूच्या त्या कारणावरच सारी लघुकथा उभारली असती. चेकॉव्हने शुकीनला एकदा लिहिले होते, "मूळ कथेशी ज्याचा कोणतांच संबंध नाही ते सारे अगदी सरळ बाहेर फेकून दिले पाहिजे. जर पहिल्या प्रकरणांत भिंतीवर बंदूक आहे असा उल्लेख आला तर तिसऱ्याचौथ्या प्रकरणांत ती बंदूक कुणीतरी वापरते आणि मग काहीतरी महत्त्वाचे घडते असे आलेच पाहिजे."

पण चेकॉव्हची हीच कसोटी त्याच्याच कथेला लावली तर काय आढळून येते? जर त्या बिशपने बिघडलेले मासे खाल्ले व थोड्याच दिवसांनी तो टायफॉइडने मेला, तर दोनच गोष्टींची शक्यता आहे. त्या माशांमुळे जर तो मेला असेल तर तो टायफॉइडने मेला असे म्हणणे कसे बरोबर होईल? तो वास्तविक विषबाधा होऊन मेला. पण मग वर्णन केलेली सारी लक्षणे टायफॉइडची असल्यामुळे सारी चूक ठरतील. पण चेकॉव्हला त्याची पर्वा नाही. हा सहृदय व दयाळू बिशप मेलाच पाहिजे, आणि तेही एका विशिष्ट आजारानेच असे त्याने प्रथमच ठरवून मग कथा लिहिली. चेकॉव्हच्या गोष्टी म्हणजे जीवनाच्या सुबक फाकी आहेत असे पुष्कळदा म्हणण्यात येते. त्याचा अर्थ काय असेल तो असो, पण तो अर्थ जर त्याच्या कथांतून दैनंदिन जीवनाचे यथार्थ दर्शन घडते असा असेल तर मात्र तो मला अजिबात मान्य नाही. हां, त्या कथांमधून जीवनदर्शन घडते असे मलाही वाटते, पण ते एका विशिष्ट अर्थानेच. ते दर्शन नेहमीच्या सर्वसाधारण जीवनाचे नाही; तर एका दु:खी, निराशावादी व कामाच्या बोजाखाली दडपल्या गेलेल्या व्यक्तीला जसे आढळले त्या जीवनाचे ते आहे, आणि चेकॉव्हने आपल्या त्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसतील अशीच कथानके नेमकी निवडली आहेत. अर्थात् त्यामुळे मी त्याला त्याबद्दल दूषण देतो अशातला भाग नाही. कारण कोणताही लेखक झाला तरी जीवनाकडे तो वैयक्तिक दृष्टिकोणातून पाहतो व त्याप्रमाणे जीवनदृश्ये रंगवतो. पण महत्त्वाची गोष्ट ही आहे की, जीवनाची हुबेहूब नक्कल हे कलेचे ध्येय होऊ शकत नाही. वास्तवतेशी अनुरूपता हे एक साधे बंधन आहे, आणि हे बंधन कल्पना बेफाट होऊन नि:संगपणे धावू नये म्हणून स्वत: लेखकाने आपण होऊन स्वीकारले आहे इतकेच.

चेकॉव्हच्या साऱ्या कथांकडे पाहिले म्हणजे चट्कन् एक गोष्ट ध्यानात येते. जीवन हा एक डाव आहे, व त्यात काळावर अथवा परिस्थितीवर आपण क्वचितच मात करू

शकतो ही कल्पना सर्वत्र आढळते. जर आयुष्यात एखाद्या वेळी प्रेम अथवा यश मिळालेच तर ते जीवन विझत चाललेल्या निखाऱ्याप्रमाणे वाटू लागते. अशा वेळी ते प्रेम अथवा यश फार उशिरा मिळते. निराश झालेल्यांचे आयुष्य यश मिळून सुखी झाले नाही म्हणून चेकॉव्हला दुःख वाटते. आळशी लोक काम करीत नाहीत, उनाडटप्पू लोक प्रामाणिकपणे वागत नाहीत, दारुड्याचे दारूशिवाय चालत नाही म्हणूनही तो खिन्न होतो. या त्याच्या मनोवृत्तीमुळे त्याच्या कथेमधील व्यक्तींवर एक प्रकारचे तलम आवरण पडल्यासारखे होते, व त्या अस्पष्ट दिसू लागतात. चारसहा ओळींमध्ये जेवढ्या कौशल्याने रेखाचित्र रेखाटणे शक्य आहे तेवढे कौशल्य तो अगदी सहज दाखवू शकतो. पण उलट, जर तो विस्ताराने वर्णन करू लागला तर मात्र व्यक्तींवरील त्याची पकड सैल होते, व त्या सावल्याप्रमाणे होतात. त्याच्या कथांत सावल्यांप्रमाणे दबून हालचाल करणाऱ्या, काहीतरी चांगले, उच्च करण्याची इच्छा असलेल्या परंतु ते कृतीत आणण्याची तडफ नसलेल्या माणसांचाच भरणा विशेष आढळतो. कथेतील स्त्रिया हळव्या आणि वेंधळ्या वाटतात. व्यभिचार हे पाप आहे असे जरी त्यांना माहीत असले तरी विचारायची फुरसत की त्या व्यभिचारास उद्युक्त होतील. पण त्याचे कारण त्यांच्या सुप्त भावना एकदम उफाळून येतात अथवा त्या चोरट्या सुखाचा अनुभव घेण्याची इच्छा अत्यंत अनावर होते, हे मुळीच नाही. पण विचारल्यास नाही म्हणण्याचेदेखील त्यांच्यांत त्राण नाही हे कारण होय. पण तरुणींविषयी लिहिताना मात्र चेकॉव्हच्या लेखनात एक प्रकारचा हृदयस्पर्शी हळुवारपणा येतो. समोर नशीब आपला विक्राळ जबडा उघडून बसले आहे, पण त्याचा विसर पडून जीवनाचा खेळ आनंदाने त्या खेळत असतात असेच त्याला जणू म्हणावयाचे असते. त्यांच्या साध्याही हालचालीत भरून राहिलेली आकर्षकता आणि त्यांच्या हास्यातील निर्भरता यांनी त्याचे मन मोहून जाते. पण या स्निग्ध प्रकाशातही एक घनदाट छाया आहेच. या साऱ्यांमधून निष्पन्न तरी काय होणार? या जीवनाचा हेतू तरी काय? तर काही नाही. आपले सुख मिळविण्यासाठी त्या कधीच आवेशाने झगडत नाहीत. उलट, समोर एखादे साधे संकट आले तर त्यांचे धैर्य पार ओसरून जाते, व काळाच्या प्रचंड ओघात त्यांच्या जीवनाचे शतशः तुकडे होऊन जातात.

माझ्या या वरील शब्दांवरून चेकॉव्हसारख्या अत्यंत श्रेष्ठ दर्जाच्या लेखकाविषयी मला आदर वाटत नाही असे जर कुणाला वाटेल, तर ते चुकीचे होईल. कोणताच लेखक निर्दोष असत नाही हे मी वर म्हटलेच आहे. शिवाय एखाद्या लेखकाच्या गुणाविषयी आदर वाटणे यात वावगे काहीच नाही. पण त्याच्यात दोषच नाहीत अथवा त्याचे ते दोष म्हणजे सामान्य मनुष्याला न समजणारे गुणच आहेत असे म्हणणे फारसे शहाणपणाचे होणार नाही. यापासून फायदा तर नाहीच नाही, उलट, त्या लेखकाच्या बाबतीत अन्यायच होण्याचा संभव असतो.

चेकॉव्हच्याही कथा अत्यंत वाचनीय आहेत. वाचनीयता यावर हल्ली कुणी फारसा भर देत नसले तरी तो एक अत्यंत महत्त्वाचा गुण आहे, व तो चेकॉव्ह आणि मोपासाँ या दोघांमध्येही फार मोठ्या प्रमाणात आढळतो. दोघांनीही वाङ्मय हे उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारले होते व चरितार्थासाठी त्यांना नियमितपणे लेखन करावेच लागे. त्यामुळे नेहमीच त्यांच्या हातून श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण झाले असे म्हणता येणार नाही. मधूनमधूनच एखाददुसरी असामान्य कथा त्यांनी लिहिली असली तरी पहिल्या ओळीपासून शेवटच्या ओळीपर्यंत वाचकांचे मन वेधून घेणार नाही अशी एकही कथा कधी त्यांनी लिहिली नाही हेही तितकेच खरे आहे. त्यांना वर्तमानपत्रे व मासिके यांच्यासाठी कथा पुरवाव्या लागत. हल्ली काही टीकाकार एखाद्या लघुकथासंग्रहाविषयी "ऊं:, वर्तमानपत्रे-मासिकांतील गोष्टी!" असे उद्गार काढून नाक मुरडतात हे अगदी वेडेपणाचे आहे. कलेचा कोणताही प्रकार जनतेमध्ये आवड व मागणी उत्पन्न झाल्याखेरीज निर्माणच होत नाही. जर वर्तमानपत्रे आणि मासिके यांनी लघुकथा प्रसिद्ध केल्या नसत्या तर कुणी लघुकथा लिहिल्याही नसत्या. त्यामुळे साऱ्याच कथा वर्तमानपत्रीच असतात, अशा कथा लिहिताना वाचकवर्ग मिळवावयाचा असेल तर लेखकाला काही बंधने स्वीकारावीच लागतात, ही बंधने काळाप्रमाणे बदलतात, पण तशा बंधनांमुळे एखाद्या लेखकाचे सामर्थ्य खच्ची होते, यावर माझा फारसा विश्वास नाही. दुय्यम दर्जाच्या लेखकांना ती एक सबळ सबब वाटू शकेल हे मात्र खरे आहे. चेकॉव्हच्या पुष्कळशा कथांत आटोपशीरपणा हा जो महत्त्वाचा गुण दिसतो त्याला मासिकातील पानांचे बंधन बऱ्याच अंशी जबाबदार आहे असे मला वाटते. लघुकथांना सुरुवात, मध्य, शेवट असा ठराविक साचा कधीच असू नये असे तो नेहमी म्हणे. पण त्याचा शब्दश: अर्थ घेतला जावा असा त्याचा हेतू असणे शक्य दिसत नाही; कारण तसे म्हणणे म्हणजे माशाला डोके, शेपूट नसावे असे म्हणण्यासारखे आहे, आणि डोके, शेपूट नसेल तर तो मासाच होणार नाही. खरे पाहिले तर खुद्द चेकॉव्हच्या कथेची सुरुवात अत्यंत नमुनेदार असते. अगदी सुरुवातीलाच तो साऱ्या जरूर त्या गोष्टी सांगून टाकतो. महत्त्वाचे काय आहे हे नेमके हेरण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यामुळे कथानकात कोणत्या तऱ्हेच्या व्यक्ती आहेत अथवा त्यांचे जीवन कोणत्या तऱ्हेचे आहे हे सारे आपणास प्रथमच समजते. मोपासाँची पद्धत याहून निराळी आहे. तो आपल्या कथांची सुरुवात वाचकांमध्ये एका विशिष्ट तऱ्हेची मनोभूमिका तयार व्हावी अशा प्रस्तावनेने करतो. अशा पद्धतीत धोके आहेत, व ती यशस्वी झाली तरच योग्य म्हणता येईल. पुष्कळदा ती कंटाळवाणी होते. वाचकांचे लक्ष भलतीकडे गुंतण्याचाही संभव बराच असतो. सुरुवातीस काही पात्रांविषयी उत्सुकता वाटू लागते, पण ती पात्रे विशेष कुणी नसून दुसरीच पात्रे महत्त्वाची आहेत असे मग आढळून येते. कथानकात चित्राप्रमाणे बांधीवपणा असावा याबाबत चेकॉव्हचा

कटाक्ष असे. पण दीर्घ कथांमध्ये त्याला तो क्वचितच साधला आहे. त्याला सामाजिक व नैतिक प्रश्नांविषयी फारशी आस्था वाटत नाही असे लोक बोलत, आणि ही गोष्ट त्याच्या मनाला लागे. त्यामुळे दीर्घकथेत पुरेसा वाव मिळताच तो असले प्रश्न उगाचच कथेत आणीत असे व आपणालाही तसल्या प्रश्नांविषयी काहीतरी वाटते हे दाखवण्याचा प्रयत्न करी. जवळच्या काळात रशियातील लोक जुलुमातून मुक्त होतील, गरिबांना पोटभर अन्नासाठी वणवण हिंडावे लागणार नाही, आणि रशियाच्या खंडप्राय देशात सहानुभूती, सुख, आणि बंधुभाव दिसू लागेल, अशा तऱ्हेचे विचार तो निरनिराळ्या पात्रांच्या तोंडून लांबलचक व बहुधा कंटाळवाण्या संवादांतून प्रकट करीत असे; पण हे सारे त्याने केवळ जनमताच्या दडपणाने केले. कलावंत हा समाजसुधारक, तत्त्वज्ञ, आणि भविष्यवादी असलाच पाहिजे हा आग्रह साऱ्याच देशांत केव्हा ना केव्हा आढळतोच, आणि तो रशियातही दिसल्यास नवल नाही. पण आपल्या लहान कथांमध्ये चेकॉव्हने जी रेखीवता आणली आहे, ती मात्र केवळ आश्चर्यकारक आहे.

आणि एखाद्या जागेविषेयी, संभाषणाविषयी, अथवा काही मर्यादित एका व्यक्तीविषयी अत्यंत हळुवारपणे आपुलकीचे वातावरण निर्माण करण्यात तर चेकॉव्हचा हात धरणारा कुणीच नाही. ही भावना निर्माण करताना त्याने प्रदीर्घ वर्णन अथवा निवेदन यांचा आधार घेतला आहे असेही नाही. तो फक्त झालेल्या गोष्टी आमच्यापुढे ठेवतो व त्यांतूनच ती विलक्षण भावना निर्माण होते. जगाकडे निर्भयपणे पाहण्याची देणगी त्याला लाभल्यामुळे त्यास हे शक्य झाले. रशियन लोक अर्ध सुसंस्कृत आहेत, त्यामुळे आयुष्यातील साऱ्या घटना जणू अलग, अधांतरीच घडतात असे समजण्याची भावना अद्यापिही त्यांच्यांत आहे. उलट, पाश्चात्य लोकांची संस्कृती अतिशय गुंतागुंतीची असल्यामुळे प्रत्येक प्रसंगाभोवती विचार व भावनांचे एकेक जाळेच बनून राहिले आहे. रशियन लोक जीवनाच्या अविरत प्रवाहामधून एखादी घटना अलगद जणू बाजूला काढू शकतात. रशियातून बाहेर पडलेल्या पुष्कळशा निर्वासित लेखकांच्या कथा अनेकांच्या पाहण्यात आल्या असतील. त्यांच्यातही सर्वसाधारणपणे हाच गुण दिसून येतो. जरी त्यांच्या कथा सद्य:स्थितीवर आधारल्या असल्या तरी त्यांचे एकंदर स्वरूप मात्र चेकॉव्हच्या दुय्यम कथांप्रमाणे असते. त्यांच्यामध्ये एक प्रकारची जीवनाकडे सरळ पाहण्याची दृष्टी आढळून येते. ही एक राष्ट्रीय देणगीच आहे आणि या देणगीचा विकास चेकॉव्हप्रमाणे अन्य कुणा लेखकांत झालाच नाही.

पण माझ्या मते चेकॉव्हचा जो सर्वश्रेष्ठ गुण आहे तो मी अद्यापि सांगितलाच नाही. मी काही टीकाकार नाही, व टीकेमध्ये वापरण्यात येणाऱ्या शैलीचा मला फारसा परिचयही

नाही. तेव्हा मला काय वाटते हे सरळ माझ्याच शब्दांत सांगणे हा एकच मार्ग माझ्यापुढे मोकळा आहे. त्याच्या कथेतील व्यक्तींत पुष्कळदा मोपासाँमध्ये आढळणारी जाडीभरडी, दणकट व पुष्कळदा पाशवी जीवनलालसा आढळत नाही हे खरे; पण चेकॉव्ह त्यांच्याभोवती अशा काही विलक्षण तऱ्हेचे वातावरण निर्माण करू शकतो की, त्यांच्यामध्ये एक प्रकारचे गूढ भावनामय जीवन भरून राहिले आहे असे आपणांस सतत वाटू लागते. या व्यक्ती दैनंदिन आयुष्याच्या रुक्ष, कठोर व झगझगीत प्रकाशात हिंडताना क्वचितच आढळतील. त्यांचे सारे जीवन हृदयास हुरहूर लावणाऱ्या संधि-प्रकाशासारख्या सौम्य प्रकाशाने भारल्यासारखे वाटते, आणि त्या प्रकाशात त्या जणू शरीरहीन आत्म्याप्रमाणे हालचाल करीत असतात. त्यांच्या मनोव्यापाराकडेच आपले सारे लक्ष वेधून राहते. त्यांच्या बाबतीत सुप्त मन पृष्ठभागावर येते, आणि शब्दांच्या अडथळ्याशिवायच त्या एकमेकांपाशी आपले हृदय उघडे करू शकतात. त्यांची बाह्य वर्णने एखाद्या म्यूझियममध्ये निरनिराळ्यां वस्तूंवर लावलेल्या निवळ चिठ्ठयांपेक्षा फारशी जास्त महत्त्वाची वाटत नाहीत. आणि या साऱ्या व्यक्ती डांटेला पाताळात दिसलेल्या त्रस्त व दु:खी जीवांप्रमाणे वाटू लागतात. कोणत्या तरी दूर, अज्ञात, व जवळजवळ अंधाऱ्या जगात, एक अफाट जनसमूह भ्रमिष्टाप्रमाणे इकडे तिकडे भटकत आहे, अशा तऱ्हेची विलक्षण भावना आपल्यात निर्माण होते व मन भयचकित व अस्वस्थ होते. निरनिराळ्या तऱ्हेची व्यक्तिचित्रे रंगवण्यात चेकॉव्ह फारसा कुशल नव्हता हे मी वर सूचित केलेच आहे. निरनिराळ्या नावांखाली, निरनिराळ्या परिस्थितीत, तीच ती पात्रे वरचेवर येतात – जणू काही त्यांच्या अंतर्जीवनाकडे पाहिल्यावर त्यांच्यामधील बाह्य, उथळ, फरक नाहीसा होतो, व ती सारी एकसारखी दिसू लागतात. ही पात्रे पुष्कळदा स्वतंत्र सलग व्यक्ती नसून एकाच व्यक्तीचे अनेक भाग असल्याप्रमाणे एकमेकांत पार मिळून जातात. एखाद्या लेखकाचे महत्त्व त्याच्या विशिष्ट अद्वितीयतेवर अवलंबून असते. मनामनातील मूक पण अर्थपूर्ण भाषा दाखवणे चेकॉव्हइतके अद्याप कुणालाच साधले नाही, व त्या बाबतीत मोपासाँची चेकॉव्हशी तुलना केली तर मोपासाँ उथळ व गांवढळ वाटू लागतो.

या दोन श्रेष्ठ कलावंतांच्या कथा वाचल्यावर एकाच बोचक आणि अस्वस्थकारक विचाराचा पगडा मनावर राहतो. त्या दोघांनी मानवाकडे अगदी सर्वस्वी भिन्न अशा दृष्टिकोणातून पाहिले; परंतु मानवी जीवनाविषयीचा त्यांचा निर्णय मात्र विलक्षण सारखा आहे. एकाने आपली नजर निवळ ऐंद्रिय व बाह्य जीवनावरच रोखली; तर दुसऱ्याने जास्त कुशलतेने अंतर्जीवनाचे धागे न् धागे उकलून दाखवले. पण शेवटी त्या दोघांचाही निर्णय हे जीवन अत्यंत कंटाळवाणे व क्षुद्र आहे, आणि ते जीवन जगणारी माणसे हीन, आडदांड व केविलवाणी आहेत, हाच ठरला.

माझ्या स्वत:च्या कथा पुढे ठेवताना वरील दोन लेखकांविषयी केलेली ही प्रदीर्घ चर्चा पाहून वाचक अधीर होऊन किंचित् चिडेल हे मला माहीत आहे. परंतु हे सारे अगदी जरूरच आहे. त्या दोघांच्या कथांचा लघुकथेवर झालेला परिणाम अत्यंत मोठा आहे. व तो आजही तितकाच जोरदार टिकून राहिला आहे. त्यामुळे त्यांच्यामागून येणाऱ्या कोणत्याही लेखकाच्या कथा त्यांच्या कथांच्या कसोटीवरच तपासल्या जातील हे उघडच आहे.

निबंध
३४६२
२६५५६
५।३।८२

# अनाकलनीयाचे आकर्षण

गेल्या ऑक्टोबरमध्ये 'मौजे'च्या एका अंकात 'वासुकी'ने एक लांबलचक पत्र लिहिले होते. एखाद्या कलाकृतीचा सुसंगत तार्किक अर्थ नीट अकलन झाला नाही, तरी त्या कलाकृतीत सौदर्य असू शकते का, किंवा ते जाणवणे शक्य आहे का, अशी शंका त्यात प्रदर्शित करण्यात आली होती. त्यावर सुचलेले हे विचार : जे स्पष्ट आहे ते त्यामुळे मर्यादित आणि म्हणूनच पुष्कळदा अगदी निर्जीव वाटते, हे मान्य करण्याजोगे माझे मन शिष्ट बनले आहे. जीवनामध्ये अनेक भावना व अनुभव अनाकलनीय, अवर्ण्य वाटतात, त्यांना कोणत्याही शब्दाचे मखर बसवता येत नाही, हे कबूल करण्यात कोणालाही कमीपणा वाटू नये. सायंकाळी निश्चल पाण्यावर संधिप्रकाशाची अंगुली फिरू लागली, की मनाला जी हुरहूर लागते, आर्ततेचा ओलावा भासू लागतो, त्याचे कारण, त्याचा अर्थ सारे अनाकलनीय (आणि आकर्षक) असते. बालकवींच्या 'औदुंबर' कवितेत 'पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर' ही ओळ वाचताच मन का थरारते, तृप्त होते, हे काही केल्या समजत नाही. ''Nymphs and Fairies shall dance no more'' ही ओळ वाचताना या शब्दाच्या अर्थापलीकडून काही सूर येतात व मन कुसकरू लागतात, अशी ए. ई. हाऊसमन याने जी आठवण नमूद केली आहे ती काही बावळटपणाची नाही. ''When waters flow, and petals fall'' या शब्दांत असे काय आहे की ज्यामुळे नाजुक रेशमी हुरहुरीचे वस्त्र वाऱ्यावर थरथरू लागावे ? कवितेचा अर्थ समजण्यापूर्वी तिच्या संगीताची मोहिनी आपल्यावर पडते, आणि काव्यानंदासाठी अर्थाची जरुरी आहेच असे नाही, हे कोलरिजचे शब्दही परिचित आहेत. (बालकवींच्या 'ओवाळणि घाली भाई' या कवितेचा अर्थ काय ?) कथा, वर्णने, उपदेश यांमधून पार पडून सारे काव्य पलीकडे शुद्ध संगीताकडे जाण्याचा प्रयत्न करते; त्या वेळी अर्थाचे ओझेही कमी होत जाते. अर्थ पूर्णपणे जाणार नाही, कारण स्वरांप्रमाणे निव्वळ नाद असून अर्थ नसणारे शब्द भाषेत असत नाहीत. चित्रात रंगसंगती व काव्यात शब्दरचना (pattern) यांच्या मदतीने सौंदर्यनिर्मिती अशक्य नाही. अशा काव्याला एखाद्या सुंदर पर्शियन गालिच्याला जेवढा अर्थ असेल तेवढाच अर्थ असू शकेल. काही अनुभव सुचवता येतील, वर्णन करता येणार नाहीत. काव्यानुभव ही मुख्यत्वेकरून जाणीव आहे. माझी दहा मिनिटे देतो, दोन ओळींचा अर्थ व चार शब्दभर तात्पर्य टाक, असा भाजी मार्केटमधला तो काही सौदा नाही.

पुष्कळदा रेडिओचा काटा फिरवता फिरवता कुठून तरी एका गाण्याचे स्वर येतात, आणि रंगीबेरंगी रिबनांप्रमाणे आठवणीभोवती गुंडाळून जातात. गाण्याचा अर्थ तर राहोच, पण त्या भाषेचे नावही पुष्कळदा माहीत नसते; ते स्वर अनेकदा स्वत:शीसुद्धा उच्चारता येत नाहीत. काय असतो त्यांचा अर्थ ? परंतु काव्यातील, कलेतील अशा कोमल, अबोध अनुभवांनीच आयुष्यातील स्वप्ने विणली जातात. त्यांच्यापुढे दैनंदिन जीवनात वापरून वापरून निबर, निगरगट्ट किंवा मळकट, निर्लज्ज झालेल्या शब्दांच्या बंदिखान्यात आनंदाने बसणाऱ्या क्षुद्र अर्थाची पर्वा काय ? अर्थ सांगण्यासाठीच जर काव्य लिहावयाचे, तर मनुष्याने काव्य कधीच लिहिले नसते. हा अर्थ गद्यात सरळ सांगता येतो. अन्यत्र श्रम वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या मानवाने लय, संगीत, यमक, उपमारूपके इत्यादी वळ्ये उठविली तरी असती कशाला ? आणि अन्वयार्थच सांगायचा आहे, तर त्यासाठी एखादा कवीच कशाला खर्ची घालायला पाहिजे ? गिरीश आणि काव्यविहारी देखील ते काम करू शकतील. कृष्णाकाठी कुंडल नाही म्हणणाऱ्या लोकांसाठी चारचार आण्यांची भूगोलाची चोपडी देण्याची गडकऱ्यांनी तयारी दाखविली होती. अर्थासाठी तळमळणाऱ्या लोकांकरिता मामलेदाराच्या स्वागतासाठी शाळामास्तरांनी लिहिलेल्या स्वागतगीतांची एक सस्ती आणि घरेलू आवृत्ती कोणी अर्थवाला प्रकाशक प्रसिद्ध करेल काय ?

आणि ते 'ग्रेट युनिव्हर्सल थीम्स' म्हणजे तरी काय ? किती लोकांना मिळाला म्हणजे एक अनुभव 'ग्रेट युनिव्हर्सल थीम' सनातन माणुसकीचा गाभा ठरतो बरे ? त्या शब्दांचा शब्दश: अर्थ घेतला तर जन्म आणि मृत्यू हे दोनच विषय 'युनिव्हर्सल' ठरतात. त्या निकषाने मग बेळगावच्या म्युनिसिपालिटीतील जननमरणाचे दप्तर जगातील महाप्रचंड महाकाव्य ठरायचे ! या ठिकाणी परसात वाती वळत बसलेल्या आजीबाईपासून उजदारी गटारात खेळणाऱ्या बाब्या आणि बेबीपर्यंत सगळ्यांनी एकत्र येऊन जे वाचावे ते वाङ्मय, अशी कोणी तरी केलेली सोज्ज्वल, बोटचेपी व भोंगळ व्याख्या मला आठवते. काव्य किंवा कला म्हणजे साऱ्यांच्या जीवनात हजर असलेल्या भावनांचा लघुतम साधारण विभाज्य नव्हे.

यात मर्ढेकर मात्र निष्कारण सापडले. अशा तऱ्हेच्या अबोल, अबोध फुंकर टाकणाऱ्या, फुलवणाऱ्या कविता साऱ्या देशांत लिहिल्या गेल्या आहेत. चारसहा ओळींच्या चिनी भाषेतील कवितांमधील सूचक, अस्पष्ट, ओढणीतले सौंदर्य चिनी रेखाचित्रकारांच्या रेखेतील सौंदर्याप्रमाणे कुलवंत, जिवंत व गर्भरेशमी आहे. आर्थर वेलेने भाषांतर केलेल्या कवितेतून अशी अनेक उदाहरणे दाखवता येतील.

विभाग दुसरा

# अप्रकाशित नाटिका-कथा

# मारून मुटकून पुरोगामी

## (एक किरकोळ "अरेरे, बिचारा!" न्तिका)

(**स्थळ** :– विसूभाऊ रानडे यांचे घर. केसांवरून हात फिरवीत विसूभाऊ लिहिण्याच्या टेबलासमोर बसले आहेत. टेबलाच्या डाव्यां बाजूला नऊदहा बदामी कागद अक्षर वाङ्मयाने अलंकृत होण्यासाठी रांगेत राहिले आहेत. उजव्या हाताला शेंगदाण्यांचा छोटासा पिरॅमिड आहे. विसूभाऊंच्या मागे पुस्तकांचे कपाट आहे. पण त्यावरील धूळ पाहिली तर त्याला चारपाच महिने तरी कोणी तसदी दिलेली दिसत नाही. भिंतीला लागून असलेल्या पलंगावर राधाबाई बसल्या बसल्याच डुलक्या घेत आहेत.)

विसूभाऊ यांची ओळख करून देणे जरा कठीण आहे. खरे म्हणजे दर शुक्रवारी रेशनसाठी एकही जागा न चोरता सभ्यपणे उभी राहणारी ती एक निरुपद्रवी व्यक्ती होती. मनुष्य स्वभावाने तर इतका साधाभोळा की, जर बाळासाहेब खेर नसते तर निव्वळ त्या जोरावर ते सहज मुख्य प्रधान होऊन गेले असते. दररोज शेजारचे वर्तमानपत्र आणण्याखेरीज ते कधी दुसऱ्यांच्या वाटेला जात नसत. एखाद्या स्त्रीकडे जर त्यांनी पाहिले तर ते निवळ समोरून सुवासिनी आली की काय हे पाहण्यासाठीच, असे पुष्कळदा त्यांचे त्यांनाही वाटे. परंतु एकंदरीने मनुष्य जरा भेंडाळलेलाच. अगदी स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीदेखील त्यांना गळ्याचे बटन मोकळे सोडावेसे वाटले नाही. क्रांतीची आग पेटण्यापूर्वीचे धुराचे अजस्र लोट त्यांना कधीच दिसले नाहीत. एवढेच नव्हे, तर रेशनचे अन्न खाऊन अपचन वाटले, तरीही कधी त्यांना रक्तचिन्हांकित निशाण स्वर्गाकडे जात असल्याचा दिव्य साक्षात्कार झाला नाही. पण सध्या सारे जगच पुरोगामी होत चालले आहे (त्यांच्या मोलकरणीनेही आता आपला पदर घड्या घालून स्वयंपाक्याच्या पंचाप्रमाणे खांद्यावर ठेवण्यास सुरुवात केली होती.) तेव्हा आपणच कशाला मागे रहा असा सुज्ञ विचार करून त्यांनीही तसा प्रयत्न चालू ठेवला होता. पण पुरोगामी हा एखाद्या कवीप्रमाणे किंवा तिरव्या डोळ्याप्रमाणे जन्मावाच लागतो. त्यांनी एकदा आपल्या पाचव्या (हस्तलिखित) कादंबरीमध्ये नायकाला एका विवाहित स्त्रीविषयी चारपाच मिनिटे कसेसेच वाटावयास लावले होते. पण या आपल्या धाष्टर्याने ते एवढे घाबरले की, त्यांनी हळूच इकडेतिकडे पाहात खिडकी लावून टाकली व मगच पुढे लिहिण्यास सुरुवात केली. पण त्यावेळी बाहेरच्या जगात इंटरपर्यंत शिकलेल्या गुलाब, जाई यांसारख्या साजुक नावांच्या

नायकिणीच्या मुली उगाचच झुरू लागल्या होत्या, आणि बेफाम मोटरसायकली हाकणारे नायक खडकाळ शब्दांवरून धावत तीनदा लग्ने झालेल्या स्त्रियांसहवर्तमान बंधनापलीकडील नव्या जगात जाऊ लागले होते. गद्यात पुरोगामी होण्याचा प्रयत्न सोडून त्यांनी "सैबेरियातील धवल प्रदेशात अग्निचिन्ह" नावाची क्रांतिरसाने अगदी ठासून भरलेली कविता लिहिली, पण ती अगदी निगरगट्टपणाने समयक झाली. त्यावेळी बाकीची कविता प्रतिचरणी चारचार आवर्तने घेणाऱ्या मुक्तच्छंदाबरोबर स्वैर गिरण्यागल्ल्यांतून हिंडत होती. या अपयशामुळे पुरोगामी होण्याचा नाद त्यांनी तात्पुरता (on a purely temporary basis) सोडून दिला होता. पण आपण तसे काहीतरी खरोखरीच पुरोगामी लिहिले तर "आता आपली मूल्ये बदलली" म्हणून उपरणे झाडण्याची त्यांची तयारी होतीच. परंतु सध्या ते फावल्या वेळात आपल्या अतिप्राचीन इतिहासाचे संशोधन करीत होते. कारण साऱ्या जगाला अंधाराच्या गर्तेतून प्रकाशाकडे नेण्याची सारी जबाबदारी स्वतंत्र हिंदुस्थानवर येऊन पडली होती ना? त्यांनी नुकताच पहिल्या माधवरावाच्या तसबिरीत त्यांच्या हातात असलेले फूल कोणते यावर एक प्रबंध लिहून संपवला होता व आर्य चाणक्याने जिला गाठ न मारण्याची प्रतिज्ञा केली होती, त्या शेंडीची अगदी सूक्ष्म लांबी व जाडी घेऊन त्यांचा मौर्य घराण्याच्या आयुष्याशी काही संबंध जमतो की काय यावर सध्या त्यांचा विचार चालू होता.

आज विसूभाऊ मोठ्या खुषीत आहेत, कारण सकाळीच अगदी त्यांच्या मतानेही पुरोगामी अशी एक कविता त्यांनी लिहिली होती.

**विसूभाऊ** : (दौतीत टाक बुडवीत) ला लाऽऽ ला!

(राधाबाई सर्व शांत आहे अशा समजुतीने डोळे उघडतात, तोच विसूभाऊ खाली वाकून लिहू लागतात. त्या "हाय रे देवा!" असे उद्गारून मागील उशीचा नेम धरून बेशुद्ध पडण्याच्या विचारात असतात. पण बेशुद्ध पडून तरी काय उपयोग असा विचार करून त्या उठतात.)

**राधाबाई** : (केव्हा ना केव्हा हा प्रसंग येणारच अशा आवाजाने) बस्स करा ते! सतत चालू असते विड्या फुंकणे आणि कागद नासाडणे! मी जोपर्यंत घरात आहे, तोपर्यंत असले भिकेचे डोहाळे चालावयाचे नाहीत. म्हणे कथाकादंबऱ्या लिहितो! उद्या म्हणाल सिनेमात जातो. (पण काहीतरी तडजोड पदरात पडावी म्हणून फाळणीस मान्यता देतात.) बरं, निदान त्या मला तरी वाचून दाखवत जाऊ नका. गेल्या आठवड्यात माझे वजन एकशे सत्याण्णवावरून शहाण्णवावर आले. (त्या एक दीर्घ नि:श्वास सोडतात, व जणू तो हरवलेला एक पौंड कुठे असावा याचा विचार करू लागतात.)

**विसूभाऊ** : जरा गप्प बस ग, तुझी काय कटकट चालू आहे! आमच्या गळ्यात अशी पूर्णपणे गद्य बायको कशी पडली कुणास ठाऊक! (ते मोठ्या लगबगीने डाव्या

हातातील विडी उजव्या हातात घेतात व झुरका घेऊन ती दौतीत बुडवू लागतात. दौत लवंडते आणि टेबलक्लॉथवरील पोपट कावळा होतो. किंचित् ओठ हलवून ते पुढे लिहू लागतात.)

**राधाबाई** : अस्सं, माझी कटकट काय! मी आत्ताच्या आत्ता शहापूरला जाते. तुम्ही महिनाभर घर सांभाळा (जरा विचार करतात. त्यांना स्वत:लाच ही कल्पना फार आवडते) तुम्ही खानावळीत जा जेवायला, अथवा घरीच करा हाताने. म्हणजे एक जेवण चुकवा. चळवळीलाही मदत होईल व पैसाही वाचेल थोडा. मी अशा काटकसरीने संसार करते म्हणून दोन घास मिळतात तरी.

**विसूभाऊ** : काय बडबड चालू असते तुझी! इथं माझी नायिका सर्वस्वाचा त्याग करून कशी छान थेट परळचे तिकीट काढते, आणि तिची वाट पहात बसलेल्या दोन हजार मजुरांना गमभन शिकवू लागते, आणि तुझे सुरू आहे संसारपुराण! (महान तत्त्व सांगण्याच्या गंभीर मुद्रेने) अग, एक बायको गेली तर दुसरी मिळतेच, पण कदाचित ती असताही दुसरी मिळू शकते – परवा परवापर्यंत मिळू शकत होती. पण वेडे, (ते किंचित् हसतात) एक सुंदर कल्पना, एक ललितरम्य शब्द गेला की तो कायमचाच! शिवाय कादंबरी प्रसिद्ध तरी होऊ दे, तिच्या मुद्रणाचे, भाषांतराचे, पटकथेचे सारे हक्क तुझ्या स्वाधीन! आणि जर का तो डाकबंगल्यावरील सीन रंगला तर कादंबरी अश्लील ठरण्याचा योग आहे. (हा रम्य भावी काळ त्यांच्या डोळ्यांपुढे क्षणभर तरळतो.) तू काहीही म्हण, नागपूर-वऱ्हाडकडील हवाच पुरोगामीपणाला अनुकूल! नाहीतर आमचा जन्म चालला आहे वाया असल्या आडप्रांतात.

**राधाबाई** : आग लावा तुमच्या त्या हक्कांना. कादंबऱ्या चुलीत घातल्या तर लाज वाटेल अग्नीला जाळण्याची. अजून दुसऱ्या लग्नाची मिजास आहे काय? बराय, मीही बघीन. (त्या आत जातात व जोराने दरवाजा लावतात. त्या धक्क्याने वरून थोडी माती व एक कोळी विसूभाऊंच्या डोक्यावर पडतो.)

**विसूभाऊ** : (एक शेंगदाणा तोंडात टाकत) त्या नॉर्वेच्या की स्वीडनच्या इब्सेनने सारा घोटाळा करून ठेवला आहे. हल्लीच्या प्रत्येक स्त्रीला वाटतं, आपण इब्सेनची नोराच आहो! अहो, फाडफाड बोलतात काय, धाडदिशी दरवाजा काय लावतात, आणि घराबाहेर काय पडतात! प्यू –!

(चड्डी वर ओढीत शेजारचा बाळू आत येतो.)

**बाळू** : (धापा टाकल्यासारखे करीत) अहो विसूभाऊ, तो लालचंद मारवाडी मला आत्ताच कोपऱ्यावर दिसला.

**विसूभाऊ** : (हातातील विडी, बूच न लावलेली दौत व सर्वस्वाचा त्याग करणारी नायिका यांना एकदम ड्रॉवरमध्ये टाकून एकदम उठून उभे राहतात) आं! खरे की काय?

(कोट टोपी हातात घेऊन वाहाणांत पाय ढकलत ते जवळजवळ धावतच बाहेर पडतात. ते गेलेले पाहून बाळू जरा हसतो व टेबलावरील शेंगदाणे खिशात घालून बाहेर जातो. नवीन पिढीच्या जीवनात असले असत्य आलेले पाहून भिंतीवर लावलेली "बरे सत्य बोला"ची कागदी पट्टी शरमेने अश्रू ढाळत आहे असे कुणालाही वाटले असते. अर्थात् तेथे कुणी नाही ही गोष्ट निराळी)

## दृश्य २ रे

(राणीचा बाग – या भागाला बाग का म्हणावयाचे हे टिळकवाडीच्या म्युनिसिपालटीला एकदा विचारलेच पाहिजे. पण तोपर्यंत आपण त्या भागास राणीचा बागच म्हणू. हा भाग एखाद्या किरकोळ कम्युनिस्टाच्या व्याख्यानाप्रमाणे भकास वाटतो. इकडे कामाचा माणूस सहसा दिसावयाचा नाही. पण टिळकवाडीतील एकुलत्या एक दिलरुबा टॉकीजकडे येथून एक जवळचा रस्ता जातो.

कपाळावरील घाम पुसत विसूभाऊ येतात. कोटाचे नंबर दोनचे बटन एकच्या कानात अडकवल्यामुळे तेथे मोठी नाविन्यपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. टोपी घाईघाईने डोक्यावर ठेवल्यामुळे एखाद्या जादू-इ-स्टंट चित्रपटाला थर्डमध्ये उशिरा आलेले लोक ज्याप्रमाणे म्हटले तर बसले आहेत, म्हटले तर नाहीत अशा डळमळीत अवस्थेत असतात, त्याप्रमाणे दिसते.)

**विसूभाऊ** : (खाली बसून "किस्मत"च्या पुस्तकाने वारा घेत) हुश्श! त्या लालचंद मारवाड्याने तर पिच्छाच पुरवला. सकाळ संध्याकाळ घिरट्या घालतो पाचशे रुपड्यांसाठी! काल तर भर दुपारी आला होता. दुपारी लोक झोपलेले असतात त्यांना उठवून त्रास देऊ नये हा साधा शिष्टाचारही माहीत नाही गाढवाला! (बाजूच्या गवतात टोपी टाकतात व "किस्मत"चे पुस्तक उघडून गाणे म्हणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात.) 'अब तेरे सिवा कौन मेरा कृष्ण कन्हय्या. भगवान्-भगवाऽऽन' (परंतु शेवटच्या हृदय – अर्थात् त्यांचे स्वतःचेच – हलवून सोडणाऱ्या तानेला त्यांची दमछाट होते.)

(रस्त्याने "ज्योतिषी" अशी लहान तांबडी पाटी घेतलेला एक किरकोळ भविष्यवादी चालला आहे. "भगवान्, भगवाऽन!" असे आर्त उद्गार ऐकून तो आत वळतो व विसूभाऊंसमोर उभा राहतो.)

**भविष्यवादी** : आँ! झालं तरी काय? विव्हळता मोठ्याने!

**विसूभाऊ** : (मान वर करतात व आश्चर्याने सर्द होतात. त्यामुळे त्यांचे तोंड इतके उघडते की तिकडे जरूर असलेल्या जादा कातडीच्या पुरवठ्यासाठी त्यांना एक डोळा मिटावा लागतो.) वा! तुम्ही होय! तुमचीच वाट पाहात होतो. छान, मग आणखी जरा पुढे या ना.

**भविष्यवादी** : (निर्भेळ आश्चर्याने) ते कशाला?

**विसूभाऊ** : (नम्रपणे) म्हणजे तुमच्या पायावर डोके ठेवून मी धन्य होईन व तुम्हाला पुढे जायला मोकळीक होईल.

**भविष्यवादी** : अहो, असं काय करता? मी भविष्य सांगेन तुमचं. शिवाय मी इन्शुरन्स एजंट आहे. उंदीरछाप टूथ पावडरचा फिरता विक्रेता आहे. मी साक्षरताप्रसार करतो. दारूबंदीविरुद्ध अथवा बाजूने ज्याप्रमाणे जरूर असेल त्याप्रमाणे भाषणे करतो. अमुकच पाहिजे म्हणून अडून बसणारा प्राणी मी नव्हे. पण गड्या, खरं सांगू का? भविष्यासारखा धंदा नाही. (तो पटकन विसूभाऊंच्या खांद्यावर हात टाकतो व ते दचकतात.) चारसहा जणांना निरनिराळी भविष्ये सांगावयाची. त्यांतील एखादे खरे होणार. मग लगेच त्याच्याकडून सर्टिफिकेट घ्यावयाचे. अहो, गेला सारा आठवडा मी सर्टिफिकेटांची रद्दी विकून काढला आहे! तुमच्या चेहऱ्यावरून तुम्हाला आठवा गुरू दिसतो!

**विसूभाऊ** : माझ्या चेहऱ्यावरून तुम्हाला शंभरावा राहू दिसायला हवा होता त्या लालचंदाचा! बरं, भविष्यच सांगतो म्हणता, तर मला एक कपाची साखर कोणत्या वर्षी मिळणार? (भविष्यवादी मोठ्या लगबगीने खिसे चाचपू लागतो हे पाहून विसूभाऊ एकदम अस्वस्थ होतात.) नको नको, साखरेच्याऐवजी तिखटाचा चहा प्या म्हणून कुणा मंत्र्यांचे भाषण तुम्ही वाचून दाखवणार ना? ते मला माहीत आहे. आमच्या सौभाग्यवतींनी तो सल्ला भलत्याच उत्साहाने ऐकला.

**भविष्यवादी** : मग मी पाच मिनिटे दारूबंदीवर बोलू? की सर्वोदयाची सर्वांगीण चर्चा करू? (पण विसूभाऊंच्या चेहऱ्याकडे पाहून त्याचा नाइलाज होतो व तो बाहेर जातो.)

**विसूभाऊ** : भगवाऽन् भगवाऽऽन (पण ते पुन्हा थांबतात.)

गावातून राणीबागेकडे येणाऱ्या रस्त्याने कांचनगौरी साठे मोठ्या लगबगीने येत आहे. टिळकवाडीमध्ये असून तुम्हाला कांचनगौरी माहीत नाही? ती एक आधुनिक तरुणी आहे. त्यामुळे तिने मोतिया रंगाचे पातळ नेसले आहे, त्याला शोभेलसा ब्लाऊज तिने निवडला आहे; पाठीवर शेपटा असावा, पण तो दिसत नाही कारण तिने तो पदराखाली झाकला आहे. कानांत लांबलचक कोळ्याच्या जाळ्यासारखी इयररिंज घातली आहेत इत्यादी आधुनिक वाङ्मयीन तरुणीमध्ये दिसणारे सारे गुणधर्म तिच्यात दिसतात. एवढेच नव्हे, तर हातात पर्सही आहे.

पण तिच्याही आयुष्यात काही दिव्य अग्निक्षण येऊन गेले आहेत. १९४२ च्या चळवळीत तिने आपल्या शाळेचे एक तावदान हळूच फोडले होते. त्यावेळी देशाकरिता आपण काहीतरी केलेच पाहिजे याची तिला तीव्र जाणीव झाली व त्या भरात तिने गावातील कॉलेजवरही सतरा मिनिटे पिकेटिंग केले. पण अडवण्यासाठी अथवा आवेशपूर्ण

भाषण करण्यासाठी कुणी विद्यार्थीच आले नाहीत. मघा ती दुर्बिणीसारखा चष्मा लावणारी गोदू पाटील थोडाच वेळ उभी होती, त्यावेळी विद्यार्थ्यांचा नुसता लोंढाच आला होता. तिने कितीतरी विद्यार्थ्यांच्या ओळखी करून घेतल्या. एकाने तर तिला स्टार रेस्टॉरंटमध्ये चहाला नेले! आणि आता सारा शुकशुकाट! समाजातील ही विषमता पाहून तिचे मन पार विटून गेले व ती बॅडमिंटन खेळायला निघून गेली. आतापर्यंत तिने तीनशे लघुकथा व लेख लिहिले होते व सध्या ती काश्मीरच्या (छे, कश्मीरच्या!) पार्श्वभूमीवर आधारलेली कादंबरी लिहीत होती. तिचे लग्न झाले नाही. पण स्त्रीसंघात तिने घटस्फोटावर इतकी मर्दानी चर्चा केली की, संघाच्या अध्यक्षीण कलेक्टरीणबाई जरा अस्वस्थ झाल्या. इतकी महत्त्वाची गोष्ट आपल्या घरी नाही याचे त्यांना वैषम्य वाटले व तेवढ्यासाठी आपणही कधीतरी घटस्फोट घ्यावयाचा असा त्यांनी निश्चय केला. लायब्रीच्या कपाटाच्या काचांत पाहात केसांवरून हात फिरवीत ती (ती म्हणजे कांचनगौरी, कलेक्टरीण नव्हे) मार्क्सचा विरोधविकासवाद, स्वप्नरंजन की इच्छापूर्ती?, सौंदर्य व्यक्तिनिष्ठ, वस्तुनिष्ठ की राजनिष्ठ, हिंदुस्थानातील स्त्रियांनो, कुठे? इत्यादी विषयांवर आजूबाजूच्या विद्यार्थ्यांना ऐकू जाईल अशा आवाजात चर्चा करीत असे.

ती मोठ्या गडबडीने बागेत आली आहे, त्यामुळे तिचा श्वासोच्छ्वास जलद होत असून तिचे उन्नत वक्षस्थल वगैरे नेहमीचे वर्णन. साठेबंधूंच्या चौकोनी बिस्किटाएवढा हातरुमाल काढून ती कपाळावरील घाम टिपते व रस्त्याकडे पाहते.

**विसूभाऊ** : (देशाच्या तरुण पिढीकडे यांचे नेहमीच लक्ष असते. आज आपणाला काहीतरी सेन्सेशनल पाहायला मिळणार या आनंदाने) कोण कांचनगौरी का? आज इकडे फिरायला?

**कांचनगौरी** : (पाण्यात घातलेल्या नवीन कपड्याप्रमाणे एकदम आकसते.) कोण, विसूभाऊ? (किंचित् हसण्याचा प्रयत्न करीत 'किस्मत'चे पुस्तक उचलते.) फिरायला आले नाही. अभ्यास करकरून डोके फुटायची वेळ आली. अहो, ज्युनिअरचा अभ्यास म्हणजे काही विचारू नका. या वर्षी मला पास झालंच पाहिजे. नाहीतर आणखी एक वर्ष राहावे लागेल ना ज्युनिअरमध्ये! (कसे बनवत आहे विद्वानांना! अशा चेहऱ्याने ती विसूभाऊंकडे पाहते.)

(विसूभाऊंना स्वतःला कॉलेजशिक्षण न मिळाल्याने ते त्या निरुपयोगी शिक्षणाकडे किंचित् तुच्छतेनेच पाहतात. आपला तिरस्कार दाखवण्यासाठी ते खिशातून विड्यांचा जुडगा काढू लागतात, पण लगेच तो दडपून ठेवतात.)

**कांचनगौरी** : आम्हाला फिरायला वेळ तरी कुठे आहे? आत्ताच पहा ना, येताना मी अभ्यासाचे थोडे पॉइंट्स लिहून आणले.

**विसूभाऊ** : लिहून आणलेस? कशावर?

**कांचन** : (किंचित् गोंधळते. पण लगेच 'किस्मत'चे पुस्तक दाखवते.) या पुस्तकात! म्हटले, मध्येच वाचावे, मध्येच गाणे म्हणावे, मग पुन्हा वाचावे.

**विसूभाऊ** : (हात न कळत विड्यांकडे जातो, पण ते वेळीच सावध होतात.) अस्सं! अस्सं! छान. बरं, ते वाचायचं, गाणं गुणगुणायचं सारं झालं म्हणजे ते पुस्तक माझं मला परत कर.

**कांचन** : ('तू आपल्या घरी स्वत: स्वयंपाक करतेस.' असे कुणीतरी म्हटल्याप्रमाणे संतापून) म्हणजे?

**विसूभाऊ** : काही नाही. ते पुस्तक आमच्या शेजारच्या बाळूचे आहे. दररोज रात्री एखाददुसरे गाणे तो मोठ्या भक्तिभावाने ओरडत असतो.

("या निष्ठुर पुरुषांना स्त्रियांच्या शिरीषकुसुमवत् भावनांची किंमत नाही." असे पुटपुटत त्याविषयी एक कथा 'स्त्री' मासिकाकडे पाठवण्याचे ती ठरवते. बिचारी कुस्करलेली कळी!)

(थोड्या वेळाने ती अस्वस्थपणे इकडेतिकडे पाहते व हातातील घड्याळाकडे नजर टाकते. मध्येच येऊन आपले तांदूळ-सुपाऱ्यांचे गाठोडे घेऊन जाणाऱ्या भटाकडे ज्या दृष्टीने एकादे नवपरिणित जोडपे पाहते, त्याप्रमाणे ती विसूभाऊंकडे पाहते.)

**विसूभाऊ** : (जणू स्वत:शीच) आता माझे नेहमीचे गोल्डफ्लेक पाकीट असते तर काय गंमत झाली असती. माझ्याकडे दहाची नोट आहे, पण काही केल्या मोडच मिळेना.

**कांचन** : (एवढ्यावरच ही कटकट जाणार या विचाराने मे महिन्यातील गुलमोहोराप्रमाणे बहरते.) च्च्! हल्ली मोडेची सुद्धा काय अडचण झाली आहे! (दयेने वितळते व पर्स उघडून आतील अधेलीचे नाणे त्यांच्या हातावर ठेवते.) पण तुम्ही उगाच अडचण करून घेऊ नका. तुम्ही आणून घ्या सिगरेट. पैसे नंतर दिले तर चालतील. अगर दिले नाहीत तरी चालेल (खरं, मेहेरबानगी करून जा!)

**विसूभाऊ** : (एकदम) तू कोणाची तरी वाट पाहतेस वाटतं?

**कांचन** : छे, कोण मी? मी एका मैत्रिणीकडे चालले आहे, नव्हे, मी अभ्यासाला आले आहे.

**विसूभाऊ** : (ते काय करायचं आपल्याला! आपण आपले सहज विचारले अशा आवाजाने!) अस्सं! अस्सं!!

(आता दोन दिवस तरी विड्यांची सोय झाली या समाधानाने ते बाहेर पडतात. कटातील विडी काढून ती पेटवणार, इतक्यात समोरून लगबगीने येणारा ललितचंद्र वैद्य त्यांना दिसतो. या ललितचंद्राविषयी फारसे सांगण्यासारखे काही नाही. त्यामुळे कोणतीही चाळीस पानांची कोरी वही त्याचे संपूर्ण चरित्र होऊ शकेल. हा फार तर एखाद्या

ललितरम्य कादंबरीचा अथवा प्रणयप्रधान चित्रपटाचा नायक होऊ शकेल. विसूभाऊ विडी खिशात घालतात व राजकारणी मुद्रेने हसतात.)

**विसूभाऊ** : अरे ललितचंद्र, अगदी धक्का मारून जातोस आणि बोलत नाहीस?

(त्यांच्याकडे पाहूनच ललितचंद्र निम्मा कोलमडतो व कपाळावर हात मारतो.)

**ललितचंद्र** : (बसलात एकदा आमच्या राशीला येऊन!) (सभ्यपणे हसून) जरा चाललो होतो. राणीबागेपर्यंत. म्हटलं, फार दिवस झाले, यावे तेथपर्यंत फिरून.

**विसूभाऊ** : (या त्याच्या कल्पनेचा आपणालाही मोठा आनंद झाला आहे असे दाखवून) होय का? योगायोग म्हणतात तो याला! चल की मग, मीही येईन तेथपर्यंत.

**ललितचंद्र** : (एकदम घाबरतो व थांबतो) राणीच्या बागेकडे म्हणजे तिकडेच नाही. प्रथम मी कँपकडे जाणार आहे. तेथून तेथून – (एकदम हसतो) मी इराण्याकडे जाणार आहे. (भुताला ब्रह्मगाठ दाखविल्याप्रमाणे) तेथे खिमा असा मस्त मिळतो.

**विसूभाऊ** : (हलक्या आवाजात) मलाही ते हॉटेल दाखवून ठेव. मला डॉक्टरांनी अन्नात बदल करायला सांगितला आहे. आपण तसल्या अभक्ष्याला हात लावला नसता. पण डॉक्टरपुढे कुणाचे काही चालले आहे?

**ललित** : (हे पुराणपुरुषा, तुझ्यापुढे एक मणभर पोटॅशियम सायनाइड खाऊ की काय!) (हसण्याचा जीव तोडून प्रयत्न करीत) खरं सांगू का, मी सिनेमाला चाललो होतो.

**विसूभाऊ** : (त्यांचे लक्ष त्याच्या खिशातील सिगरेटच्या पाकिटाकडे जाते व ते एक दीर्घ नि:श्वास सोडतात) हल्ली या मोडेची काय अडचण आहे! दहा रुपयांची मोड घेऊन मी गावभर हिंडलो, पण मला सिगरेट मिळाली नाही.

**ललित** : (चिडून) हे घ्या माझं पासिंग शोचं पाकीट. पासिंग शो चालेल ना तुम्हाला?

**विसूभाऊ** : पण –

**ललित** : हो, तेही आहे माझ्या ध्यानात. तुम्हाला काड्याची पेटी हवी ना? (त्रस्त समंधा, झालास ना आता शांत?)

**विसूभाऊ** : (समाधानाने) मग सिनेमाला जाणार म्हणतोस? चल, मी त्या बागेपर्यंत येतो. (ललितचंद्र नेहमीची भाषा सोडतो व भावनेने ओथंबलेले दोन शब्द पुटपुटून चालू लागतो.)

**विसूभाऊ** : (एक गुपित सांगण्याच्या आवाजाने) आज त्या कांचनगौरी साठेने – (खोकण्यासाठी थांबतात.)

(ललितचंद्र एकदम गोठतो व ऐकू लागतो.)

**विसूभाऊ** : (आपले तिकडे लक्ष नाही असे दाखवत) त्या कांचनगौरीने आज मला मुद्दाम बोलावले आहे गंमत पाहण्यासाठी. राणीच्या बागेतील एक अजब प्राणी दाखवते म्हणाली बुवा ती.

**ललित** : (दात ओठ खात पुटपुटतो.) मी अजब प्राणी काय? आइस्क्रीम पाहिजे, सिनेमा पाहिजे, आणि या महाभागापुढे माझे असे वर्णन काय?

**विसूभाऊ** : (निष्पापपणे) तू काही म्हणालास?

**ललित** : (बोडकं म्हणालो तुमचं!)

(ते दोघे राणीच्या बागेत येतात. विसूभाऊ मोठ्या ऐटीत सिगरेटचा धूर सोडतात. संतापाने फुरफुरत ललितचंद्र पुढे चालला आहे. त्याला पाहताच कांचनगौरी उभी राहते, पण विसूभाऊंना पुन्हा पाहताच तिचा चेहरा दक्षिणोत्तर होतो.)

**कांचन** : (सिगरेट पाकीट घेऊन हा वेताळ आहेच का पुन्हा?) (ललितचंद्र बाजूच्या झाडाकडे साऱ्या आयुष्यात आपण प्रथमच झाड पाहात असल्याप्रमाणे पाहतो.)

**विसूभाऊ** : हा ललितचंद्र सिनेमाला चालला होता. त्याने म्हटले चला हो राणीच्या बागेपर्यंत. मी म्हटलं, बरं बुवा, चल.

**कांचन** : (आज मला सिनेमाला न्यायचं नव्हतं म्हणून हे बुजगावणं आणलंस की काय? ठीक आहे. मीही याचा वचपा काढीन.)

**ललित** : (मी राणीबागेतील अजब चीज का? अरे वा! आणि तुला पाहताच डिंकाच्या बाटलीकडे पाहिल्यासारखं वाटतं की!)

**विसूभाऊ** : अरे ललित, तू जा, तुला वेळ होईल सिनेमाला. शिवाय कांचन येथे अभ्यासाला आली आहे. तिला त्रास नको आपल्या बोलण्याचा. (ललितचंद्र कांचनगौरीकडे पाहात दिलरुबा टॉकीजकडे जातो.)

**कांचन** : (ही मिजास आहे का? उद्या लाल घोटत ये म्हणजे सांगते. दिसतंय तरी ध्यान कसे मलेरिया झालेल्या प्रश्नचिन्हासारखे! मी तुझ्या नाकावर टिच्चून आज सिनेमाला जाते.) (ती दिलरुबा टॉकीजकडे जाऊ लागते. पण आता पर्समध्ये काही नाही याची तिला आठवण होते. आपणास आता दुसरेच महत्त्वाचे काम आहे असा आविर्भाव करून ती वळते व चालू लागते.)

**विसूभाऊ** : तुझे वाचून झाले असल्यास ते 'किस्मत'चे पुस्तक परत देऊनच जा ना!

(ती संतापाने फाडदिशी पुस्तक फेकते. जाता जाता तिचा पाय विसूभाऊंच्या टोपीवर पडतो व तिची देशी फेल्ट हॅट होते.)

## दृश्य ३ रे

(कांचनगौरीचा बंगला. ती अस्वस्थपणे खिडकीबाहेर पाहात आहे. आज राजा देशपांडे व वसंत काळे यांपैकी कुणाबरोबर सिनेमाला जावे याचा निश्चय अद्याप न झाल्याने विचाराने तिचा चेहरा थोडा म्लान झाला आहे. आज तिने जॉर्जेटचे निळे पातळ नेसले आहे. बाकी सारे कालच्याप्रमाणेच आहे. म्हणजे कालच्या क्षोभक प्रसंगानंतरही तिने आपले मनोधैर्य व शांती ढळू दिली नाही हे दिसते.)

**कांचन** : (हृदयावर हात ठेवून मान वाकडी करीत कंपित आवाजाने) म्हणजे खरोखरच रागावून ललितचंद्र आज येणार नाही की काय! काल त्याच्याबरोबर न जाता राजा परांजपेबरोबर सिनेमाला जाताना मला कित्ती कित्ती वाईट वाटले! (आपणाला त्यावेळी किती वाईट वाटले याचा ती अंदाज करू लागते.)

(पावले न वाजवता ललितचंद्र आत येतो. हा जरा भावनाप्रधान आहे. आज त्याने भांग पाडला नाही व अर्धा दिवस सरला तरी त्याचे सिगरेट पाकीट संपले नाही. यावरून कालच्या प्रकाराचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झालेला दिसतो.)

**ललित** : मोठ्या शिकस्तीने आपण ही ओळख जुळवली होती. आता आयुष्यात काय अर्थ आहे? आता कॉलेजमधून फक्त डिग्रीच घेऊन बाहेर पडावयाचे!

(कांचनगौरीचे त्याच्याकडे लक्ष जाते.)

**कांचन** : (श्वास आवरून) ललितचंद्र!

**ललित** : (श्वास आवरून) कांचनगौरी!!

(हे दोन्ही शब्द इतक्या मृदू तऱ्हेने उच्चारले जातात की, त्यांना जर हात लावला तर पोल्सन बटरला हात लावल्याप्रमाणे हात बुळबुळीत होईल.)

(बाहेर सूर्यप्रकाशात एक प्रकारचे नवचैतन्य सळसळू लागते. वाऱ्यावर एक अत्यंत आल्हादकारक सुगंध तरंगत येतो व सारे दृश्यमान विश्व हर्षभरित झाल्यासारखे वाटू लागते वगैरे वगैरे.)

**कांचन** : (एकदम हसून) थांबा हं, चहा करायला सांगून येते. (ती आत जाते व फिल्म इंडियाचा ताजा अंक वाचत बसते.)

(ललितचंद्र बाजूच्या कोचावर बसतो व वालरससारख्या मिशा असलेल्या एका गृहस्थाच्या समोरील फोटोकडे पाहू लागतो. तिकडे भीत भीत पाहात तो टेबलावरील सिगरेट पाकीट हळूच फोडतो. पण इतक्यात कुणीतरी येते. लगेच पाकीट खाली ठेवून तो त्या मिशांतील केस मोजू लागतो. हातात झाडणी घेऊन गडी येतो.)

**गडी** : साहेब, त्या खुर्चीवर बसता का? ही जागा लोटायची आहे. (लगेच तो मोठ्या लगबगीने झाडणी फिरवू लागतो. तिचा एक फटकारा ललितचंद्राच्या रेशमी पँटवर बसतो. घाईघाईने उठून ललितचंद्र त्या गड्याने दाखवलेल्या खुर्चीवर बसतो.)

(आतून तात्यासाहेब बाहेर येतात)

**तात्या** : अरे ललित, त्या वेताच्या खुर्चीवर बसतोस का जरा? सध्या माझा टाइम्स तुझ्या खाली आहे.

(ललितचंद्र वेताच्या खुर्चीवर बसतो न बसतो तोच स्वयंपाकीणबाई बाहेर येतात, व अंग वेळावीत त्याच्याकडे पाहून हसतात. ललितचंद्र अस्वस्थपणे हातरुमाल चेहऱ्यावरून फिरवतो.)

**स्वयंपाकीण** : तुम्ही त्या स्टुलावर बसता का? वर माझं लुगड्याचं गाठोडं जरा – (तो उठावयाच्या आतच त्या गाठोडे काढू लागतात. त्यांचा धक्का लागून बाजूच्या फळीवरील गीतारहस्य व वेब्स्टरची डिक्शनरी ललितचंद्राच्या खांद्यावर उतरतात. त्याच्या मन:स्थितीवर रहस्यातील कर्मयोगाचा फारसा उपयोग झाला नसता, व तो जे शब्द पुटपुटला त्यांचे प्रतिशब्द त्या डिक्शनरीतून शोधून काढणे किंचित् कठीणच झाले असते. दारात कुणाची तरी सावली पडते. ही व्यक्ती आत येताच जर पहिले कोणते काम करणार असेल तर ते आपणाला स्टुलावरून उठावयास सांगणे हे होय, असा विचार करून ललितचंद्र आधीच दाराजवळच्या बाकावर जाऊन बसतो.

एक लाचार चेहऱ्याचा मनुष्य आत येतो. मान शरीरावर बसवताना खालचा मणका सैल राहिल्याप्रमाणे त्याची मान इकडे तिकडे सारखी वळवळते. पोटात सतत ढवळत असल्याप्रमाणे चेहरा बावळट दिसतो व एकदा कायमचा शिक्का मारल्याप्रमाणे एक बुळबुळीत हास्य त्यावर दिसते. म्हशीने तोंड घालून गवत अर्धवट कुरतडावे त्याप्रमाणे त्याची दाढी दिसते. तो आत येताच अधिकच लाचारीने हसतो व ललितचंद्राला नमस्कार करतो.)

**लाचार चेहऱ्याचा माणूस** : तुम्ही तात्यासाहेबांकडे आला होता का?

**ललित** : (डोके गच्च दाबून.) (ठीक बाबा, तू एक कमी होतास.) तुम्ही कोण?

**लाचेम** : (पडवळाप्रमाणे मान इकडेतिकडे वळवत) मी? मी आचार्य.

**ललित** : (ओरडून) महाराष्ट्रात पंचवीस गुरुजी आणि छप्पन्न आचार्य आहेत.

**लाचेम** : (दाढी खरखरत) मी आपला साधा आचार्य. सारी गल्ली मला आचार्यच म्हणून ओळखते. भारतमातेचा मी एक नम्र सेवक आहे. मी दरिद्री आहे, पण माझी सेवा निष्काम आहे. (जरा पुढे सरकून) बाळ, मी तुला गोष्ट सांगू?

**ललितचंद्र** : (एकदम अंग आवळून) गोष्ट? मला कशाला गोष्ट?

**लाचेम** : होय. मी गोष्टी सांगतो. कुणालाही सांगतो. केव्हाही सांगतो. (मेण वितळू लागल्याप्रमाणे डोळे आर्द्र होतात) एक होता राजा. एक होती राणी. राजा फार प्रेमळ, मोठ्या हृदयाचा, धर्मराज. राणीही अतिसाध्वी...

**ललितचंद्र** : (ललितचंद्राविषयी सांगायचे काय कपाळ! तो जिवंतही नाही!)

**लाचेम** : बरं बाळ, गोष्ट संध्याकाळी सांगेन हं. आता आपण हिंदू-मुसलमान एकीची प्रार्थना करू. एकाच देवाची आपण लेकरे; एका ताटाची दोन कणसे, एका घोड्याचे दोन कान, एका शेळीचे दोन स्तन...

(ललितचंद्र एकदम जिवंत होऊन हसतो.)

**लाचेम** : जोड हात बाळ. मी एक कविता लिहिली आहे. ती म्हणू आपण. कविता हृदयातून आली आहे. लोकवाङ्मय आहे. तिला ना वृत्त ना मात्रा. म्हणताना पुढे मागे करून सेवा गोड करून घ्यायची. (ते उठून हात जोडतात व चिरलेल्या बांबूडाप्रमाणे आवाज काढतात.)

भेंडीबझार गिरगाव एक है
ममद्या म्हाद्या साथ साथ है
(चाल पोवाड्याची) शेंडीची गाठ बसे दाढीला
हिंदु-मुसलमान एक झाला
ऐक्याचा खिमा रसरसला
स्वर्गात शब्द दुमदुमला। ग्यानबा तुकाराम हैदोस दुल्ला
बोला 'ग्यानबा तुकाराम हैदोस दुल्ला'

(वारकरी रंगात आले म्हणजे ज्याप्रमाणे इकडून तिकडे उड्या मारून भजन करतात त्याप्रमाणे 'ग्यानबा तुकाराम' करीत आचार्य कोचखुर्च्यांमागे हिंडू लागतात.)

(या ठिकाणी ललितचंद्राचे सूक्ष्म मनोविश्लेषण अशक्य आहे. पण सुदैवाने याच वेळी आतून कांचनगौरी बाहेर येते.)

**कांचन** : अहो ललित, आमच्या मोहनने सिनेमानटीचे एक नवीन आल्बम केले आहे. अगदी पूर्णपणे रंगीत आहे.

(याच अनमोल क्षणासाठी आपण इतका वेळ जीव धरून होतो असा चेहरा करून ललितचंद्र ताडदिशी उडी मारून उभा राहतो व तिच्यापुढे तीन तीन पायऱ्या चढून जिना चढतो. आचार्यांचा 'टेंपो' आता भलताच वाढला आहे. ते आता टेबलावर उभे राहून आळीपाळीने एक एक पाय उचलतात व किंचित् खाली वाकून गरजतात 'ग्यानबा तुकाराम हैदोसदुल्ला.'

ललितचंद्र आणि कांचनगौरी बराच वेळ बोलत राहतात. बाहेर पुष्कळशा जांभळ्या तांबड्या तलम वस्त्राआड पश्चिम दिशा सोन्याच्या रसाने धुतली जात आहे व हा सोहळा पाहण्यासाठी पक्ष्यांचे थवे पुराणाला निघालेल्या बायकांप्रमाणे बडबडत तिकडे जात आहेत इत्यादी.)

**ललितचंद्र** : (या जगात उतरून) अस्सं काय! आम्हाला चांगलंच बनवलं म्हणायचं! बराय, त्याबद्दल त्याला हात दाखवलाच पाहिजे. पण आज पिक्चरला जायचं का?

(त्याच्या हळुवार भावनांना नकाराचा धक्का असह्य होईल म्हणून मोठ्या नाखुषीने कांचनगौरी त्याला संमती देते व माधव देशपांडेबरोबर दुसऱ्या दिवशी जाण्याचे ठरवते.) (खालून – ग्यानबा तुकाराम हैदोसदुल्ला!)

**कांचन** : (त्याचे प्रक्षुब्ध मन शांत करण्याच्या चिंतेने) जाताना आपण 'रेजिना'मध्ये आइस्क्रीम घेऊ म्हणजे तुम्हाला बरे वाटेल. आले हं मी.

(आता चहा येईल, मग येईल म्हणून ललितचंद्र वाट पाहतो. पण तोच कांचनगौरी तयारी करून बाहेर येते.)

(खालून – ग्यानबा तुकाराम हैदोसदुल्ला!)

**कांचनगौरी** : चला, आपल्याला उशीर होईल.

(खालून – ग्यानबा तुकाराम हैदोसदुल्ला)

**ललित** : (स्थितप्रज्ञतेने) चला.

(कांचनगौरी जिना उतरत असता मध्येच थांबते व खिडकीबाहेर बोट दाखवते.)

**कांचन** : तो पहा, इंद्रधनुष्याचा केवढा तरी पट्टा पसरला आहे.

**ललित** : (चहाची आशा सोडून) खरंच!

(कसले कपाळाचे इंद्रधनुष्य घेऊन बसला आहात? तेथे काहीसुद्धा नसते!)

(खालून – ग्यानबा तुकाराम हैदोसदुल्ला!)

### दृश्य ४ थे

स्थळ – बस स्टँड. शहापूरकडे जाणारी बस येथे थांबते. ललितचंद्र आणि कांचनगौरी शहापूरच्या नव्या 'पियाझा' हॉटेलमध्ये आम्लेट कसे होते हे पाहण्यासाठी चालले आहेत. बससाठी जमलेल्या लोकांची तिच्याभोवती एकदम गर्दी होते. त्यातील पाचजण तर तिच्या बाजूला येऊन उभे राहतात.

त्यापैकी तात्या केतकर हा पुरोगामी साहित्य संघाचा चिटणीस आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जिचा विस्तार आहे ती आपली जन्मभूमी कोकण कशी आपल्या मुठीत आहे हे तो वेळी अवेळी लोकांना ऐकवत असतो. तो सतत ऐकवत असलेल्या आणखी दोन गोष्टी होत्या. इंटरनॅशनल ब्रिगेडमध्ये स्पेनमध्ये लढत असता आपली राल्फ फॉक्स आणि क्रिस्टोफर कॉडवेल यांची कशी गाठ पडली व त्यांनी आपणास महाराष्ट्राचे राल्फ फॉक्स व क्रिस्टोफर कॉडवेल असे अनुक्रमे कसे म्हटले याचे रसभरित वर्णन व दुसरी गोष्ट म्हणजे स्थानिक कामकरी मेळाव्याला तीन रुपयांची देणगी देताच आपला 'व्याघ्र' साप्ताहिकात फोटो व 'उपक्रम स्तुत्य' स्फुट कसे आले याचे पुराव्यासहित भारूड.

**तात्या** : (कांचनला ऐकू जाण्यासाठी) या खेपेला आपले साहित्य संमेलन कसे जमणार कुणास ठाऊक? याच वर्षी आपण चिटणीस झालो हे आपले दुर्भाग्य! (इतक्यात आपण जरी तसे दिसलो तरी कुणी लफंगे नसून अखिल भारतभर शाखा असलेल्या एका संघाचे नम्र प्रतिनिधी आहोत, याची त्याला आठवण होते) पण मीदेखील असा तसा कुणी नाही. मागे 'व्याघ्र' मध्ये माझा फोटो आला होता.

**बलवंत रामनामे** : (पाचांपैकी नंबर दोन) ऊं, 'व्याघ्र' होय? अरे, मला माहीत आहे. टाटाबिर्लांनी पन्नास लाखाची देणगी दिली तर त्यात बातमी यायची नाही. पण तेच चिपळूणच्या साने भटाने चुरमुऱ्याचे पोते दिले तर 'स्तुत्य' म्हणून त्यात एक कॉलम आलाच. (आपल्या लग्नाची बातमी 'व्याघ्र'ने छापली नाही म्हणून त्याचा त्यावर लालभडक राग आहे.)

**तात्या** : (त्या दोघांमध्ये विडी पेटवण्यासाठी काडी जात नाही) बलवंत, तू काही म्हटलेस?

**बलवंत** : छे, मी नाही. ते माझ्या सुप्त मनातील विचार होते. तुझ्या बाबतीत माझे सुप्त मन फारच जागृत होऊ लागले आहे. फ्राइडने –

(आता एक शब्दबंबाळ व्याख्यान ऐकावयास मिळणार म्हणून प्रत्येक जण कावराबावरा होतो. एक जण त्याला घाईघाईने विडी देतो, दुसरा काडी ओढून तयार राहतो. बलवंत ऐटीत धूर सोडतो व सारे तात्पुरते विसरतो.)

**तात्या** : (मागून पुढे चालू) पण मीही असा तसा कुणी नाही. जीव गहाण टाकून संमेलन यशस्वी करीन.

**सरलानाथ भोळे** : (आश्चर्याने) म्हणजे गहाण ठेवण्याजोगे तुझ्याजवळ अद्याप काही तरी आहे म्हणावयाचे! बरं, ते जाऊ दे, अध्यक्षांची तू बिलकूल काळजी करू नको. आपण जरूर पडल्यास अप्टन सिंक्लेअर अथवा पर्ल बकला तार करू. (आपण मनात आणत नाही ही गोष्ट निराळी, पण आणले तर साऱ्या पृथ्वीला आकाशगंगेच्या पाण्यात लाथेने उडवून देऊ असा आत्मविश्वास त्याच्या चेहऱ्यावर दिसतो)

**इंदुकांत काळे** : (हा मद्राशाप्रमाणे लुंगी नेसतो. याचे केस काळेभोर असून मोठ्या सुंदर तऱ्हेने वळवले आहेत. त्या एकाच गोष्टीकरिता त्याला पुरोगामी साहित्य संघातून काढून टाकण्याचा ठराव आणला गेला होता. पण त्यावेळी त्याने स्वसमर्थनार्थ 'समाजातील साहित्यवाद' या विषयावर एवढे जबरदस्त भाषण केले की, त्याचे भाषण संपत आले तरी अध्यक्ष दुसऱ्याच वाक्यातील क्रियापद शोधत राहिले. याच्या मते कॉनरॅड, टागोर, हार्डी इत्यादी सारे लोक तुच्छ आहेत. कारण त्यांच्या लेखनात तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब दिसत नाही. नदीच्या काठी जेवायला बसल्यावर आत टाकलेल्या पत्रावळी पाण्यावर वाहात जातात, त्याप्रमाणे एखादी राजकीय घटना घडली रे घडली की

तिचे अवशेष वाङ्मयगंगेत आले पाहिजेत असा याचा अगदी निर्भेळ आग्रह आहे. १९४२ च्या वेळी कोणा कवीने एक प्रेमगीत लिहिले हे ऐकून त्याला एवढा जबरदस्त धक्का बसला की, त्या दिवशी त्याने प्रत्यक्ष स्वत:च्या पैशाने स्वत:करिता विड्या घेतल्या. पुरोगामी संघातील हा रेजिसर असून इंग्रजी व रशियन रंगभूमीचा याचा व्यासंग अत्यंत गाढा आहे. एकदा त्याने एका इंग्रजी संवादात, एक नोकर रशियाहून आलेले पत्र घेऊन उजवीकडून येतो व पत्र टेबलावर ठेवून डावीकडे जातो असे काम अतिशय सुंदर केले होते. हा बोलण्याकरिता तोंड उघडतो, पण बलवंत पुन्हा आपले घोडे पुढे दामटतो.)

**बलवंत** : या खेपेला आपण निकोलव्हिच रिकोस्काव्हला बोलावू. त्याला जर काही कौटुंबिक अडचण असेल तर बोरीस कार्लोफला बोलावण्याची मी हमी घेतो. (व्हिच आणि व्हावने संपणारी नावे याच्या हातचा मळ आहे.)

(उरलेला धैर्यधर. हा 'टिळकवाडी टाइम्स' या द्विसाप्ताहिकाचा संपादक आहे. याचे पूर्ण नाव गोपाळ अण्णाजी ग्रामोपाध्ये. पण हा धैर्यधर या टोपणनावाखाली 'टाइम्स' मध्ये लिहितो. याचे खरे नाव फक्त मंगळवारी प्रकट होते. कारण त्या दिवशी गेल्या आठवड्यातील बऱ्याचशा गोष्टींविषयी तो माफी मागत असतो. टिळकवाडीच्या कोणत्याही समारंभाला ही व्यक्ती हजर असल्याखेरीज शोभा आली नाही. कोणत्याही कार्यात सगळ्यांचे डोळे आपल्याकडे लागतील अशा ठिकाणी असावे असे त्याला फार वाटे. एखादी लग्नाची वरात चालली असेल तर त्याला नवरा मुलगा व्हावेसे वाटे आणि जर ती प्रेतयात्रा असेल तर तेवढ्यासाठी त्याची प्रेत होण्याचीही तयारी असे. पण दुर्दैवाने त्याला अवघी साडेचार फूट उंची मिळाल्याकारणाने त्याचे काही चालत नाही व त्यामुळे त्याच्या मनात थोडा न्यूनगंड निर्माण झाला आहे.)

**धैर्यधर** : (भीत भीत) हा निकोलव्हिच रिकोस्काव्ह कोण ?

(बाकीचे सारेजण त्याच्याकडे प्रज्वलित डोळ्यांनी पाहू लागतात. तो सगळ्यांची माफी मागतो.)

**सर्वजण आळीपाळीने** : काय करावं, अध्यक्षच नाही !

(अरे, कशाला बाहेरचा अध्यक्ष. तूच होऊन टाक ना ! असे बाकीच्यांनी आपणास म्हणावे म्हणून ते एकमेकांकडे पाहतात व कोणीही तसे म्हणत नाही म्हणून एकमेकांवर जळफळतात.)

(बाजूने एक आवाज येतो.)

**आवाज** : काय, तुम्हाला अध्यक्ष नाही ? मी अध्यक्ष होतो. हवं तर कायमचा अध्यक्ष व्हायलाही माझी तयारी आहे.

(सारे जण तिकडे वळतात. हातात 'ज्योतिषी' पाटी घेतलेला भविष्यवादी उभा आहे.)

**भविष्यवादी** : (खाली बसत) मी धंदेवाईक वक्ता आहे. मी दारूबंदीच्या बाजूने बोलतो; विरुद्धही बोलतो. नेहरू सरकारचे हात बळकट करा असे सांगितल्यावर लगेच त्यांनी राजीनामा द्यावा हेही मी पटवून देतो...

(सारेजण त्याच्याकडे खाऊ की गिळू अशा तऱ्हेने पाहतात, पण त्याच्या पोषाखाकडे पाहताच त्यापैकी काहीही करायची त्यांची छाती होत नाही.)

**कांचनगौरी** : म्हणजे तुम्हाला अध्यक्ष नाही का कुणी ?

**भविष्यवादी** : आहे, आहे, मी आहे.

(त्याला मागे ढकलून सारेजण – धैर्यधरसुद्धा – बोलण्यासाठी पुढे सरकतात. पण सरलानाथ साऱ्यांना मागे ढकलून पुढे होतो. या त्याच्या शारीरिक भांडवलशाहीच्या निषेधार्थ त्याला संघातून काढून टाकण्याचा धैर्यधराखेरीज प्रत्येक जण निश्चय करतो. बऱ्याच विचारानंतर, असा जर ठराव आणला गेला तर आपण त्याला दुजोरा मात्र देऊ असे धैर्यधर ठरवतो.)

**सरलानाथ** : (लाचारपणे) होय, सध्या कुणीच नाही. प्रो. फडके यांच्या वाङ्मयाला शिव्या देण्याच्या अटीवर आम्ही एकाची निवड केली होती. पण अगदी शेवटच्या क्षणी त्याने चक्क सांगितले, की फडके यांच्या गुजगोष्टी आपणाला इतक्या आवडतात की, त्यांवर लेखक म्हणून आपण आपल्या नावाची चिठ्ठी चिकटवून टाकली आहे. बोला, काय म्हणावे या बूर्ज्वा वृत्तीला ? (किंचित् हसून) आता तुम्ही अध्यक्ष झालात तरी आमची हरकत नाही.

(छे, छे, बिलकूल हरकत नाही, अशा आशयाने बाकीचे एका मागोमाग माना डोलावतात.)

**भविष्यवादी** : पण मी अध्यक्ष आहे. मला प्रवासखर्च नको, चहा नको, फार काय खुर्चीही नको. मी उभे राहून भाषण करीन –

(आता मात्र पुरोगाम्यांचे पित्त खवळते. तात्या केतकर त्याची गांधी टोपी काढून धैर्यधराकडे देतो. मोठ्या लगबगीने ती उकलून धैर्यधर तिची पिशवी करतो व खस्सदिशी त्या भविष्यवाद्याच्या डोक्यावरून तोंडावर ओढतो व ती लाकडी पाटी उचलून फटदिशी त्याच्या डोक्यावर मारतो. थोडा वेळ भविष्यवादी स्तब्ध आहे. धैर्यधराचे हे प्रसंगावधान पाहून बाकीचे त्याच्यावर खूष होतात व त्याच्या फ्रेंच कटाबद्दलही त्याला क्षमा करण्याचे ठरवतात.)

**कांचनगौरी** : (विनयाने) छे, मी कशाला ? पण या गावातच एक महान पुरोगामी लेखक राहतात. ते फार पुढे गेलेले आहेत. इतके की ते सारा प्रवास करून पुन्हा पहिल्या ठिकाणी आले आहेत. पण ते स्वभावाने इतके विनयशील आहेत की, आपण पुरोगामी

आहोत हेही त्यांना माहीत नाही. पण अहो, त्यांनी पाच रुपये किंमतीच्या टाइम्सच्या रद्दीइतके पुरोगामी लेखन केले आहे.

(सगळेजण अगदी थक्क होतात. धैर्यधर तर आश्चर्यातिशयाने घामाघूम होतो व घाम पुसण्यास हातरुमाल काढण्यासाठी म्हणून आपल्याच अशा समजुतीने तात्याच्या खिशात हात घालतो. तेथे त्याच्या हाताला लिमलेटची गोळी लागते. ती तो तोंडात टाकतो व त्याला बरे वाटते. बाकीचे सारे जण 'एवढा मोठा साहित्यिक टिळकवाडीमध्ये असून तुला माहीत नाही' अशा आशयाने एकमेकांकडे पाहतात.)

**ललितचंद्र** : अहो, इतक्या शुद्ध पिंडाचा पुरोगामीच तुम्हाला मिळायचा नाही. त्यांनी मार्क्सच्या 'कॅपिटल'चे भावगीतासह तीन अंकी नाटक केले आहे!

(सगळेजण स्वतःच्या प्रकृतीला न सोसवण्याइतके चाट होतात. तात्या केतकर मागे धैर्यधर आहेसे पाहून त्याच्या अंगावर बेशुद्ध पडतो. तो शुद्धीवर आल्यावर त्याची जागा बळवंत रामनामे घेतो.

इतक्यात बस येते. लोक भराभर चढू लागतात. कांचनगौरी ललितचंद्राला 'आपण नंतरच्या बसने जाऊ या, बसला फार गर्दी आहे.' असे सांगते. हे शब्द त्या लोकांच्या कानांवर पडतात व ते भराभर खाली उतरतात. आपणही दुसऱ्या बसने गेल्यास चालण्याजोगे आहे असे त्यांना वाटते व प्रत्येक जण 'छे हो, या बसला फारच गर्दी' असे दुसऱ्याला सांगतो. इतक्यात धापा टाकत राधाबाई येतात. विसूभाऊंवर अवलंबून न राहता स्वतःच मोलकरीण बंद करण्यास त्या थांबल्यामुळे त्यांचे जाणे जरा पुढे ढकलले गेले होते. आपली बस चुकली नाही एवढेच नव्हे, तर ती सारी मोकळीच आहे याचा त्यांना फार आनंद होतो. त्या आत जाऊन बसतात व बस जाते.)

**कांचन** : त्यांनी ज्ञानेश्वरीमधील क्रांतीला अनुकूल असा भाग शोधून काढून त्यावर पटकथात्मक संशोधन निबंध लिहिला आहे.

(बळवंत रामनामे आता शुद्धीवर येतो. पण आता धैर्यधरच मागील खांबाला टेकून मूर्च्छित होतो.)

**कांचन** : पण एक गोष्ट ध्यानात ठेवा. आपण पुरोगामी आहोत असे कबूल करण्यासही ते तयार होणार नाहीत. पण वाटेल ते करा, पण त्यांनाच अध्यक्ष निवडा. प्रसंगी मनधरणी करा, धमक्या द्या, पैसे उसने मागा अथवा मार दिला तरी हरकत नाही. वाङ्मयासाठी आणि साखरेसाठी माणसाने काय करू नये? (शुद्धीवर येत असलेला धैर्यधर ओठ हलवतोसे पाहून) हां, त्या प्रश्नाचे उत्तर देऊ नका. या वर्षी त्यांच्याइतका लायक अध्यक्ष मिळायचा नाही तुम्हाला.

**ललित** : त्यांनी आपल्या आगामी सत्तेचाळीस पुस्तकांची यादीसुद्धा मुक्तच्छंदात छापली आहे. तुम्हाला हॅवलॉक एलिसचे नाव माहीत असेल. ते वास्तविक यांचेच टोपण

नाव. काही ठिकाणी तुम्ही त्यांचा फोटोही पाहिला असेल. त्यावेळी त्यांनी जी खोटी दाढी लावून घेतली ती मीच त्यांना आणून दिली होती, मिस्टर, आहात कुठं तुम्ही? (तो तात्याच्या पाठीवर थाप मारतो) शिवाय त्यांनी बोरीबंदर ते व्ही.टी. म्हणून असा एक मर्मभेदी 'रिपोर्टाज्' लिहिला आहे की, त्याच्या प्रती खाली टाकताच फ्रॅन्कोची एक बटॅलियन गारद झाली.

**तात्या** : (एकदम आठवल्यासारखे करून) हो तर, मी त्यावेळी तेथे होतोच की! एवढेच नव्हे, तर मारण्यासाठी खाली दुसरी बटॅलियन येईपर्यंत काही प्रती हवेत तरंगत होत्या पाच मिनिटेपर्यंत! बस्स ठरलं, आपले संमेलन यांच्याच अध्यक्षतेखाली होणार!

**कांचन** : त्यांचा पत्ता, विसूभाऊ रानडे, पंचायतनाच्या देवळाजवळ.

**ललित** : आणि हे पहा – (इतक्यात त्याच्या खांद्यावर मागून कुणी तरी हात ठेवते. तो मागे वळून पाहतो तो बुळबुळीत हास्य असलेला आचार्यांचा चेहरा दिसतो.)

**आचार्य** : बाळांनो, या सारी इकडे. मी तुम्हाला गोष्ट सांगतो. हृदयाच्या मोठेपणाची, गरिबाच्या श्रीमंतीची, श्रीमंताच्या गरिबीची –

(सुदैवाने त्याच वेळी दुसरी बस येते. कांचनगौरीला आचार्यांची माहिती होतीच. ती व ललितचंद्र जणू आता सारे जीवन आत सुखरूप चढण्यावर अवलंबून आहे अशा बेफाम वेगाने धावत जाऊन बसमध्ये चढतात. त्यांच्यामागून बाकीचे पस्तीस लोकही एकदम चढू लागतात. एकाचा पाय धोतरात अडकून धोतर फाटते. कानाला बांधलेला दोरा तुटल्यामुळे दुसऱ्याची चाळशी असहाय लोंबू लागते. त्याच्यामागील म्हाताऱ्याचा 'केसरी'चा अंक खाली पडतो. बाजूला उभा असलेला चुरमुरेवाला तो पटकन उचलतो व चुरमुरे-शेंगदाणे ओरडत निघून जातो.)

**आचार्य** : (स्वतःशीच) गरिबाच्या श्रीमंतीची, श्रीमंताच्या गरिबीची, गरिबाच्या गरिबीची, श्रीमंताच्या श्रीमंतीची...

**तात्या** : अध्यक्षाची तरी चिंता दूर झाली.

**सरलानाथ** : (कपाळावर हात मारीत) पण पत्ताच विचारायचा राहून गेला.

**धैर्यधर** : (सतत उपयोगी पडण्याच्या धडपडीने) पण सांगितला त्यांनी. माझ्या ध्यानात आहे. विसूभाऊ रानडे –

(सगळेजण त्याच्याकडे जळजळीत डोळ्यांनी पाहतात. तो भेदरून 'सॉरी' म्हणतो.)

**बलवंत** : वत्सा, अध्यक्षांचा नव्हे, त्यांचा स्वतःचा.

**धैर्यधर** : ऑं? त्या कोण? त्यांचा पत्ता कशाला?

(सारेजण त्याच्याकडे, 'शर्थ आहे तुझ्यापुढे, मोरू, तू इतका कसा रे बुरणूस बुद्धीचा' अशा चेहऱ्याने पाहतात. मागून आचार्य येतात.)

**आचार्य** : (नमस्कार करून) मी भारतमातेचा एक नम्र सेवक. सेवकाची सेवा निष्काम आहे. गोड करून घ्यावी. मी तुम्हाला गोष्ट सांगू दोन भावांची! भरतभूमीमध्ये दोन भाऊ होते. मोठे प्रेमळ, स्वभावाने फार गोड, अगदी रसरसलेल्या उसासारखे –

(सगळ्यांचे चेहरे ऊन ऊन ऑम्लेटवर झुरळ दिसल्याप्रमाणे होतात. ते पूर्ण एक मिनिटभर आचार्यांकडे एक इंच व्यासाच्या डोळ्यांनी पाहतात. नंतर एकदम खूण करून ते निरनिराळ्या दिशेने धावत जाऊन अदृश्य होतात. आचार्य उजव्या डोळ्यातून एक सी.सी. (One CC) परिमाणाचा अश्रू झटकून टाकतात व डाव्या डोळ्याने इकडे तिकडे पाहतात.

भविष्यवाद्याची हालचाल सुरू झाली आहे. थोडी धडपड करून तो तोंडावरील गांधी टोपीचा तोबरा काढतो व इसापनीतीतला गरुड अंगात रुतलेल्या बाणाच्या पिसाकडे ज्या विषण्णतेने पाहतो त्या विषण्णतेने तो आपल्या लाकडी पाटीकडे पाहातो. आचार्य त्याच्याकडे येतात व त्याच्या बाजूला जमिनीवर बसतात.)

**आचार्य** : मी भूमीवर बसतो. भूमी माझी आई आहे. भूमीमधूनच आपणाला अन्न मिळते ना? आपले हात भूमीने भरले पाहिजेत. हृदय आसवांनी धुतले पाहिजे. (मानेला झटके देत) मी तुम्हाला दोन उंदरांची गोष्ट सांगू? हिमालयाच्या अरण्यात दोन उंदीर होते. फार गोजिरवाणे, एकाचे नाव माणिक, दुसऱ्याचे मोती...

**भविष्यवादी** : (त्यांच्याकडे पाहून चेहरा वेडावाकडा करीत) तुमच्या चेहऱ्यावरून जेवढे दिसते, तेवढे जर खरोखरच तुम्हाला मळमळत असेल, तर एका कडेला जाऊन तुम्ही काही का करीत नाही त्याबद्दल?

**आचार्य** : आभारी आहे या प्रेमाबद्दल. या सेवकाला काही झाले नाही. जवाहरलालपासून पुष्कळशा पुढाऱ्यांनी सहज बोलताबोलता मला हेच सांगितले. पण त्यांना मी आपल्या प्रेमळ राष्ट्रभाषेत हेच सांगितले, "जी, मेरी सुरतही वैसी है." मग एकदा माणिक मोतीला म्हणाला –

(भविष्यवादी हातातील गांधी टोपीकडे विचारपूर्वक पाहतो. नंतर आचार्यांच्या डोक्याकडे पाहून त्याचा विचार पक्का होतो. तो धैर्यधराच्या लगबगीने पुढे सरकून टोपीचा तोबरा आचार्यांच्या प्रेमळ डोक्यावर चढवतो, व धैर्यधराइतक्याच जोराने, किंबहुना एक टणत्कार सरसच, ती पाटी त्यांच्या डोक्यावर आपटतो. आचार्य आपल्या आवडत्या भूमीवर आडवे होतात. भविष्यवादी पाटीकडे प्रेमाने पाहतो व या साऱ्या संगरात आपणाला गांधी टोपी गमावावी लागणार हा विचार झटकून निघून जातो.)

## दृश्य ५ वे

(विसूभाऊंचे घर. विसूभाऊ कादंबरीलेखनात गढून गेले आहेत.)

त्यांचा नायक अमर दोन गिरणी संप चालवून आला आहे. इतक्यात समोरच्या घरात राहणाऱ्या चंपा नावाच्या तरुणीकडे त्याची नजर जाते. समाजातील कितीतरी दुष्ट रूढींमुळे तिला सध्याच्या वाममार्गाचा अवलंब करावा लागला आहे याची त्याला तीव्र जाणीव होते. त्या भरात सर्वांना नवआयुष्य देणाऱ्या जगड्व्याळ क्रांतीची वाट पाहा असा संदेश देऊन येताना एक पानपट्टी चघळत यावे की काय असा विचार त्याच्या मनात येतो. पण त्याला आज जास्तच दमल्यासारखे वाटते व तो बंगल्यात येतो. आल्यावर दहा मिनिटांन (कदाचित् बारा असतील) तो मार्क्स-लेनिनचे सारे ग्रंथ वाचतो आणि उद्याच्या राष्ट्राचा मॅनिफेस्टो तयार करतो. तोच बाहेरून मोटरचा हॉर्न ऐकू येतो. भुवया कोरलेली व प्रसाधनाने नटलेली कमलेशकुमारी आत येते व लगेच ''सख्या रे, मनिं वसंत फुललाऽऽऽ'' म्हणत एक गिरकी घेते. पण एवढ्या आवाजानंतरही अमरचे तिच्याकडे लक्ष जात नाही. ''काय, चंपाची आराधना चालली आहे वाटते ?'' ती रागाने विचारते.

ही चंपा पुढे मजुरांच्या वस्तीत जाते व आपल्या मजूरविषयक कार्याने त्यांची आवडती चंपाराणी होऊन बसते. मग एक दिवस पन्नास लाख मजुरांचा उगाचच संप होतो. पण गिरणीवर पहारा असल्याने पुढे जाण्यास कुणी धजत नाही. इतक्यात जॉर्जेटचे पातळ नेसलेली चंपाराणी गर्जना करून पुढे येते व ''भ्याडांनो, अशाने कुठे क्रांतीचा दिवस उगवतो की काय'' म्हणून भाषण करते व युनियनचा बावटा सत्तर फूट धुराड्यावर चढून लावून येते. ही बाई पुढे येताच सारे लष्कर गर्भगळित होते व समोरच्या इराण्याच्या दुकानात चहा प्यावयास जाते. पण हा इराणी आतल्या बाजूने मजुरांच्या बाजूचा असतो. शिवाय त्याचे चंपाराणीवर उदात्त प्रेम असल्यामुळे, चहात दुधाची भुकटी घालण्याऐवजी तो गुंगीची पूड घालतो व सारे लष्कर मोठ्या आनंदाने झोपी जाते. पण त्यापैकी एक जण मद्रासी कॉफी पीत असल्यामुळे त्याच्यावर त्या पुडीचा काही परिणाम होत नाही. तो बंदूक घेऊन बाहेर येतो व धुराड्यावर चढलेल्या चंपाराणीवर गोळी झाडतो. ती सत्तर फुटावरून खाली येते, पण तोच अमर गर्दीतून धावत धावत येतो व तिला अगदी वरच्यावर झेलतो. त्यांनतर संप मिटतो. नंतर दोनचार दिवसांनी बोरीबंदरवर रूळ काढण्याचा प्रयत्न करीत असता चंपाराणी पंच्याण्णव गोळ्या लागून जखमी होते. पण खोटी दाढी लावलेला अमर तिला सोडवतो. पण थोड्या बोलण्यानंतर त्याचे आपल्यावर प्रेम नसून दुसऱ्याच तरुणीवर आहे असे तिला समजते व ती अतिशय निराश होते. कल्याण स्टेशनवर पोर्टरकडून ती दहाबारा माणसे गोळा करून सभा घेते व अखेरचा दिव्य संदेश दिल्यावर ॲस्प्रोची गोळी खाऊन ती आत्महत्या करते.

तो इराणीही आपले ते दुकान विकून टाकतो व ग्रँटरोडवर नवीन दुकान उघडून एकाकी आयुष्य काढतो. कारण नंतर त्याला समजते की, चंपा खरोखरी त्याची बहीण आहे. तिचा बाप पहिल्या महायुद्धात मेसापोटेमियात गेला असता तेथे त्याने गुप्तपणे लग्न केले होते. अशा रीतीने प्रिया आणि भगिनी दोन्ही एकदमच नाहीशी झाल्याने त्या इराण्याला आयुष्यात काहीच अर्थ वाटत नाही. त्याचे मन आता इतके विटले आहे की सध्या तो साखरेखेरीज कशाचाच काळाबाजार करीत नाही.

अमरच्या बाबतीतही असेच झाले. सर्वसाधारण लोक त्याला नानासाहेबांचा मुलगा समजत. आपण ज्यांचे नाव लावतो त्यांचेच खरोखरी आपण चिरंजीव असावे याची त्याला नेहमी खंत वाटे. पण शेवटी असे निष्पत्तीला येते की, तो नानासाहेबांचा मुलगा नसून बाबासाहेबांचा आहे. त्या सर्वज्ञानी परमेश्वराने आपले आयुष्य जणू एखादे प्रतिभासाधनाचे पुस्तक समोर ठेवूनच घडवले आहे या विचाराने त्याचे हृदय भरून येते व स्वतःचे आयुष्य कोणत्या तरी उच्च ध्येयाला वाहून टाकण्याचे तो ठरवतो, व तशा अर्थाचें पत्र (फोटोसहित) गावातील वर्तमानपत्राकडे पाठवून देतो. पण हा धक्का कमलेशकुमारीला असह्य होतो. ती आपली मोटर बाहेर काढते, व अंधाऱ्या रात्री आकाश सहस्र नयनांनी पाहात असता बेफाम वेगाने ती धोबीतलावाच्या कडेने धावू लागते. पण दुर्दैवाने तिचा मोटरीवरील ताबा सुटतो. तिची मोटर धोबीतलावात पडते, व एक सुगंधी जीवनपुष्प पाणीमोल होते.

''हजारोंनी जगावे म्हणून दोन जिवांना मी मारले!'' अमर उद्गारतो, व आगामी वीस कादंबऱ्या, सात पटकथा व एक सुभाषितसंग्रह यांच्या जाहिरातीनंतर कादंबरी संपते. अर्थात् या साऱ्या हकीकती पुढील आहेत. विसूभाऊ तेथपर्यंत आले नाहीत.

विसूभाऊ आता आपली छोटी तांबडी वही काढतात. त्यात ते निरनिराळ्या प्रसंगी उपयोगी पडणाऱ्या कोट्या लिहून ठेवीत असतात. आता कमलेशकुमारी आणि अमरच्या संवादात कोणत्या कोट्या घालता येतील याची ते निवड करतात. इतक्यात पुरोगामी लोक आत शिरतात, व दोन खुर्च्या, खाली अंथरलेली गादी, व कोपऱ्यातील इझिचेअर आक्रमतात. विसूभाऊ त्यांच्याकडे शांतपणे पाहतात व नंबरवार आपले अंदाज सांगतात.

**विसूभाऊ** : (तात्या केतकरास) तुम्ही कशाकरिता आलात हे मला माहीत आहे. पण मी तुमच्या खास ब्राह्मणांनी चालवलेल्या चर्मवस्तुभांडारास काहीही मदत करू शकत नाही. (बलवंत रामनामेस) सध्या आमच्या घरी लग्नकार्य वगैरे काही नसल्यामुळे आम्हाला स्वयंपाक्याची गरज नाही. (सरलानाथास) हे पहा, मला काहीही झाले नाही. तेव्हा माझी प्रकृती तपासण्याची जरुरी तरी काय? शिवाय माझा होमिओपाथीवर विश्वासही नाही. (इंदुकांतास) तुम्हाला कोणीतरी बनवलेले दिसते. डॉक्टर तर राहोच, पण मी साधा महाळुंगपाकवाला वैद्यही नाही. तेव्हा तुम्ही आपली प्रकृती खरोखरीच्याच डॉक्टरला

दाखवा. (ते धैर्यधराकडे पाहतात, पण आवंढा गिळून ते गप्प होतात. धैर्यधराचा चेहरा एकदम पडतो, व तो माफी मागणार तोच सरलानाथ बोलतो)

**सरलानाथ** : आम्ही पाच जण पुरोगामी आहोत. (सारेजण आपण सिनेमातील हिरो असल्याप्रमाणे आजूबाजूच्या जगाकडे पाहतात.) सध्या आम्ही एक पुरोगामी साहित्य संमेलन भरवण्याचे ठरवले आहे ही बातमी तुम्हाला टिळकवाडी टाइम्सवरून समजलीच असेल. (धैर्यधराचा चेहरा एकदम उजळून निघतो, व तो मोठ्या आशेने विसूभाऊंकडे पाहतो)

विसूभाऊ : (सारा शिष्टाचार बाजूला ठेवून) टिळकवाडी टाइम्स होय? प्यू! त्यात असतात काय तर फक्त नोटिसा! मी तुझी लग्नाची बायको आहे, तू माझा लग्नाचा नवरा आहेस, तुझ्या अंगावर पाचशेचे दागिने होते, मला पाचशे रुपये कर्ज झाले. म्हणे टिळकवाडी टाइम्स! (धैर्यधराचा चेहरा एकदम विझतो.)

**इंदुकांत** : (एकदम मुद्यावर येऊन) त्या संमेलनाचे तुम्ही अध्यक्ष व्हावे असे आमचे मत आहे.

**सरलानाथ** : (रविवारी प्रार्थना वाचणाऱ्या पाद्र्याच्या गांभीर्याने) तुम्ही पुरोगामी लेखक आहात. तुम्ही बूर्झ्वा लेखन केले आहे असे तुमचा जिवलग मित्रही म्हणणार नाही. क्रांतीचा ध्वज घेऊन मोठ्या निधड्या छातीने पुढे पुढे –

**धैर्यधर** : (स्वत:शीच) पुढे कुठे कुणास ठाऊक?

**सरलानाथ** : – पुढे घेऊन जाणारे तुम्ही आमचे नायक आहात.

**विसूभाऊ** : (गोंधळून) तुम्ही काय म्हणता हे मला समजत नाही.

**धैर्यधर** : हा आपला विनय आहे हे सांगण्याची आम्ही परवानगी घेतो. (लगेच आपणाकडे कुणी रागाने पाहते की काय हे पाहतो. पण त्याच्याकडे कुणाचेच लक्ष नसते.)

**विसूभाऊ** : तुम्हा मंडळींवर चहाचादेखील अंमल चढतो असे दिसते एकंदरीत. तुम्ही सारे शुद्धीवर आल्यावर तुम्हास काय हवे ते सांगा.

**तात्या** : तुम्ही आमच्या संमेलनाचे अध्यक्ष व्हा.

**विसूभाऊ** : पण मी पुरोगामी नाही.

**तात्या** : (त्यांची कीव करत) ज्या दिवशी तुम्ही लेखणी हातात धरली त्याच दिवशी तुम्ही पुरोगामी झालात.

**इंदुकांत** : (हुकुमाचा एक्का टाकल्याच्या उन्मादाने) कार्ल मार्क्सच्या पुस्तकाचे तुम्ही तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब दाखवणारे एक तीन अंकी नाटक लिहिले आहे, ज्ञानेश्वरीवर पटकथात्मक निबंध तुम्ही लिहिला आहे, हे काय आम्हाला माहीत नाही? (विसूभाऊ खुर्चीवरून उठून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सरलानाथ** : शोलोकाव्हने तुम्हाला रशियाला येण्यासाठी स्टॅलिनतर्फे आमंत्रण दिले आहे हेही आम्हास माहीत आहे. ('बोला, आता यावर तुमचे काय म्हणणे आहे?' अशा आशयाने त्यांच्यावर डोळे रोखतो)

**धैर्यधर** : (भीत भीत) आणि हॅवलॉक एलिस या नावाखाली तुम्ही लिहिलेल्या साऱ्या कविता मी वाचल्या आहेत.

**तात्या** : (किंचित् आठवून) आणि तुम्ही खोटी दाढी लावून जो फोटो काढून घेतलात त्यासाठी ती दाढीही कोणी आणून दिली हे मला माहीत आहे.

**विसूभाऊ** : (अगदीच न राहवून) कुणी दिली?

**तात्या** : (सहज हसून) अहो मीच! (अर्धवट उठलेले विसूभाऊ खुर्चीत कोसळतात.)

**सगळेजण** : (कोरसप्रमाणे) मग होणार ना तुम्ही आमचे अध्यक्ष?

(इतक्यात त्यांचे लक्ष बाहेर जाते, व सारेजण जमिनीवर सपाट पडतात. बाहेर रस्त्याने भविष्यवादी चालला आहे)

**विसूभाऊ** : (कमलेशकुमारी आणि अमर काय बोलणार आहेत हे जाणण्याची उत्सुकता लागून राहिल्याने ही पुरोगामी कटकट घालवण्याच्या इच्छेने) का एखाद्याचा छळ आरंभता? तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी काहीही केले नाही. तुमचा तो कार्ल मार्क्स हा तीन मार्क्स बंधूंपैकी कोणता हेही मला माहीत नाही. त्याच्या पुस्तकाचे मी नाटक लिहिले नाही. (पण ही कबुली अगदीच केविलवाणी आहे याची त्यांची त्यांनाच जाणीव होते.) म्हणजे, माझा अजून एकच अंक तयार झाला आहे. पण मी पुरोगामी नाही.

**सगळेजण** : (गर्जून) तुम्ही पुरोगामी आहात.

(आता खुद्द विसूभाऊंचीही खात्री होते. पण आपण सुरुवातीपासून पुरोगामी असून ती गोष्ट आपणास आज समजते याचे त्यांना अत्यंत आश्चर्य वाटते. पण इतके दिवस आपली वंचना झाल्याने ते संतप्त होतात.)

**विसूभाऊ** : (रणाकरिता बिगुल फुंकल्याप्रमाणे) मी साफ तुमचा अध्यक्ष होणार नाही.

(आता साहित्यिक कोंडी निर्माण होते. "आता हे स्टॅलिनग्राड कसे लढवावे?" अशा आशयाने सरलानाथ एकदम खोकतो. धैर्यधर दचकतो, व कपाटावर आदळतो. कपाटावरील दोनतीन पुस्तके विसूभाऊंच्या डोक्यात पडतात. टेबल किंचित् पुढे सरकवून ते रागाने उठतात, व कपाटावरील पाण्याचा तांब्या धैर्यधराच्या डोक्यावर रिकामा करतात. टेबल पुढे सरकवताना त्यावरील दौत टाक तात्याच्या अंगावर पडतात. तो टाक उचलून सट्दिशी इंदुकान्त विसूभाऊंकडे फेकतो, व तो विसूभाऊंच्या शर्टात अडकून बसतो. टेबलाचा एक पाय सरलानाथाच्या पायावर चढल्यामुळे दोनतीन प्रतिगामी शब्द उच्चारून तो दौत विसूभाऊंच्या अंगावर फेकतो. विसूभाऊ कपाटावरील दंतमंजनाची बाटली, एक

जुनी टोपी, कॅनव्हासचे दोन फाटके बूट, पेपरवेट, व डिंकाची बाटली सामुदायिक रीत्या पुरोगामी लोकांकडे फेकतात व मोठ्या लगबगीने कपाट उघडून आतील पुस्तके फेकण्याच्या तयारीत राहतात.

पुरोगामींकडे शस्त्रपुरवठा कमी असल्याने ते तात्पुरती माघार घेतात व जरा बाजूला जाऊन खलबत करतात. ते पुन्हा विसूभाऊंभोवती गोळा होतात, व वातावरण जास्त खेळीमेळीचे होते.)

**तात्या** : जाऊ द्या हो. नाही तर नाही. आपला काही कुणावर आग्रह नाही. पण या साऱ्यामध्ये तुमचा अतिशय सुंदर शिवलेला कोट मात्र निष्कारण खराब झाला. कुणी शिवला बुवा हा ?

**विसूभाऊ** : (एकदम विरघळून) कॅंपमध्ये एन. धोंडू म्हणून शिंपी आहे ना त्याने. आपले काम नेहमी चोख असते. स्टेशनरीसाठी सरळ नॉव्हेल्टी स्टोअर्समध्ये. कपडा पाहिजे असेल तर कापडवाला आणि सन्सखेरीज बात नाही. इतकंच नव्हे, तर हॉटेलमध्ये जायचे तर कॅफे डिलाइटखेरीज दुसरीकडे नाव नाही.

(सगळेजण – धैर्यधर सोडून – विजयोन्मादाने हसतात. धैर्यधर कॅमेऱ्याचे शटर उघडून लगेच मिटावे त्याप्रमाणे दोन दात दाखवून तोंड मिटतो)

**सरलानाथ** : (दोन कदम आगे येऊन) तो धोंडू तुमचा शिंपी काय ? छान, त्याच्याकडून कोट शिवून घेतलात. पण त्याचे पैसे कुठे आहेत महाराज ? तो माझा अगदी जिगर दोस्त आहे. आत्ताच बोलावून आणतो त्याला. (गडबडीने दरवाजापर्यंत जातो व हळूच विसूभाऊंकडे पाहतो.

वाटेतील खुर्ची धैर्यधराच्या अंगावर ढकलून विसूभाऊ ताशी साठ मैल वेगाने धावत जातात व त्याला घेऊन येतात.)

**बलवंत** : तो कापडवाला तर माझ्या चुलतभावाचा घरमालक आहे. त्याच्याकडून आणलेल्या कापडाचे बिल कुठे आहे ? आणतोच त्यालाही बोलावून. (विसूभाऊ त्यालाही अडवतात. कुठच्या कुठे आपण हा भस्मासूर निर्माण केला असा त्यांना पश्चात्ताप होऊ लागतो.)

**इंदुकांत** : मग सगळ्यांची परिषदच होऊ द्या. त्या कॅफेचा श्रीनिवासन् माझा चांगलाच मित्र आहे. दर दोन दिवसांनी माझी चौकशी करायला गडी पाठवतो.

(सगळ्यांकडे विसूभाऊ धापा टाकीत पाहू लागतात.)

**विसूभाऊ** : बरं मंडळी, तुमचे म्हणणे तरी काय आहे ?

**तात्या** : विशेष काही नाही, तुम्ही आमच्या संमेलनाचे अध्यक्ष व्हा.

**विसूभाऊ** : बराय, मी माझी संमती देतो.

**धैर्यधर** : (या क्षणाकरिता तो जणू जिवंत आहे.) मी तुमचे हस्तलिखित टिळकवाडी टाइम्समध्ये पाहतो. तेव्हा तुमचे काही छोटेसे पुरोगामी लिखाण व संदेशही हवा.

**विसूभाऊ** : (आपले काहीतरी छापले जाणार या आनंदाने) हो, माझी एक कविता आहे 'जीवनाची फोर्ड गाडी' म्हणून. आणि संदेश म्हटला तर (जरा विचार करून) हो, हा घ्या 'लगाव जाऊ देत अगदी खालच्या थरापर्यंत वाङ्मय!'

(धैर्यधर कविता वाचून पाहतो व त्याचा चेहरा आज आपण ब्रह्म पाहिले असा होतो.)

जीवनाची फोर्ड गाडी

कर्रर कर्रर, खस, पाम पाम
पाम् पाम् भुर्ररऽऽ
जीवनाची फोर्ड गाडी
जुनी मोडकी चाले वाट
पिस्टनात नाही नेट!
लुब्रिकेशन सारे
जीवनाच्या रस्त्यावरी रे
सारे गळाले, सारे गळाले
रिकामी टाकी, पेट्रोलचा दर्प
आणि फ्रंट काचा फुटलेल्या!
वैराण रस्त्यावरी
जीवनाच्या रस्त्यावरी
कडेकडेने उभ्या निळ्या नारी
परि जीवनाची फोर्ड गाडी
जुनी मोडकी मरतुकडी
थांबत नाही, थांबत नाही
(पुढेच चाले बोंबलत)
ब्रेक सारे झिजवट
पिस्टनात नाही नेट
कर्रर कर्रर खस् पाम पाम
कुंथत चाले वाट
जीवनाची फोर्ड गाडी..

**धैर्यधर** : ही कविता महाराष्ट्राची Waste Land ठरणार, व – (पण उत्साहाने त्याचा गळा भरून येतो व तो विसूभाऊंच्या गळ्याभोवती हात टाकतो.)

**विसूभाऊ** : (त्याला बाजूला करीत) पण माझे अध्यक्षीय भाषण करण्यासाठी मला इतर पंचवीस भाषणे तरी आणून द्या.

**तात्या** : ठीक आहे. धैर्यधर, यांना लागतील तेवढी भाषणे आणून दे. (धैर्यधराचा चेहरा संशयास्पद रीतीने उजळतो.) पण हां, तू मिशन स्कूलमध्ये केलेले मात्र भाषण नको. (त्याचा चेहरा पडतो.

सगळेजण बाहेर पडतात.)

**बलवंत** : मी त्या धोंडूकडे कधीच गेलो नसतो. मीच त्याचे दहा रुपये द्यावयाचा आहे.

**तात्या** : पण अध्यक्ष तरी मिळाला.

**सरलानाथ** : आणि त्या कापडवाल्याला उद्या पैसे आणून देतो म्हणून सांगून चार वर्षे झाली.

**तात्या** : पण अध्यक्ष तरी मिळाला.

(पण इतक्यात धैर्यधर एकदम हतवारे करू लागलेला पाहताच ते समोर पाहतात. भविष्यवादी हळूहळू त्यांच्याकडेच येत असतो. सारे पुरोगामी एकदम विरुद्ध दिशेने चालू लागतात. पण तेथून एका घरातून आचार्य बाहेर पडतात.)

**आचार्य** : नमस्कार बाळांनो. मी तुम्हाला –

(नंतर पाच मिनिटे काय होते समजत नाही. पण नंतर पुरोगामी मंडळीपैकी कुणी दिसत नाही हे मात्र खरे.)

## दृश्य शेवटचे

(एन.एम. कॉलेजचा फिलॉसॉफी हॉल. हा हॉल म्हणजे कॉलेजातील सर्वात शेवटची खोली. पण पुष्कळदा तिचा जास्त व्यावहारिक उपयोग केला जातो. कॉलेजमधील गडी आपल्या झाडण्या, चुन्याचे डबे इत्यादी वस्तू येथील कुलूप नसलेल्या कपाटात आणून भरतात. हॉलमध्ये खुर्ची, टेबल व चार बाके एवढे फर्निचर आहे. म्हातारा मारुती खोकत खोकत खोली झाडत आहे.

इतक्यात सारे पुरोगामी आत शिरतात. धैर्यधराच्या हातात थोडे कागद आहेत. त्याच्याबरोबर विसूभाऊ रानडे, अध्यक्ष, पुरोगामी साहित्य संमेलन (१९५०) चालले आहेत. चारपाच माणसे गंभीर चेहऱ्याने चालली आहेत व त्यांच्यांत एक लाचार चेहऱ्याचा माणूस खाली मान घालून जातो आहे हे पाहून आजूबाजूच्या चारसहा पोरांना, त्या माणसाने त्यापैकी कुणाच्या तरी [... ...] असावे याची खात्री होते. प्रकरण पुढे कसे रंगते हे पाहण्यासाठी तीही मागोमाग येतात. भावी पिढीच्या या सहकार्याने कार्यास विशेष शोभा येणार आहे हे पाहून तात्याच्या उत्साहाला भरती येते. सर्वजण हॉलमध्ये एकदम शिरतात हे पाहून मारुतीला एवढे आश्चर्य वाटते की, त्याच्या हातातील झाडणी

खाली पडते. आता हे लोक करणार तरी काय हे पाहण्यासाठी तो खाली बसतो व विडी पेटवतो. अर्थात् जुन्या पिढीतील पण क्रांतिप्रवण गतिमान जीवनाच्या जुन्या व्यक्तींचा तो प्रतिनिधी बनतो.

तात्या केतकर गंभीरपणे अध्यक्षांची ओळख करून देण्यास उभा राहतो. आपले लक्ष या अशाश्वत गोष्टीकडे नसून कुठल्या तरी गूढ संवेदनेकडे लागले आहे अशा तऱ्हेचा भकास चेहरा करून विसूभाऊ सारा वेळ इकडे तिकडे पाहतात.

**तात्या** : मित्र हो, आपल्या विद्वान अध्यक्षांचे स्वागत करण्यास मला फार आनंद होत आहे. (आपणास आनंद झाला आहे हे दाखविण्यासाठी तो हसून सर्वसाधारणपणे जगाकडे पूर्ण एक मिनिटभर पाहतो. आपले हास्य फार मोहक आहे अशी याची अगदी पक्क्या रंगाची समजूत आहे.) आजच्या अध्यक्षांची ओळख करून देणे मला जरूर वाटते ही एकच गोष्ट आपल्यात साहित्यिक झब्बूशाही किती माजली आहे हे दाखवण्यास पुरे आहे. त्यांनी मार्क्सच्या लेनिनचे (छे, काहीतरी चुकल्यासारखे वाटते) लेनिनच्या मार्क्सचे (छे, नव्हेच) पण, तुम्हाला तो प्रख्यात ग्रंथ माहीतच आहे. (सगळेजण माना डोलावतात.) त्याचे सुंदर तीन अंकी नाटक लिहिले आहे.

(भावी पिढी उघडपणे निराश होऊन बाहेर जाते. 'थूत्तिच्या!' म्हणत जुनी पिढीही उठते. आपण बोलायला उठलो की आधीच थोडे असलेले लोक नाहीसे होऊन त्या जागी बाके-खुर्च्या दिसू लागतात, हा तात्याचा नेहमीचा अनुभव होता. तेच दृश्य आज पुन्हा दिसताच अद्याप तरी आपल्याकडून काही चुकले नाही याची त्याला खात्री वाटते व त्यास धीर येतो.)

**तात्या** : (पुढे चालू) त्यांनी यज्ञेश्वरी नावाच्या आख्यानाच्या आधारावर एक महान् प्रचंड क्रांतिकारक पटकथात्मक प्रबंध लिहिला आहे.

(विसूभाऊ तोंडाजवळ हात आणून जांभई देऊ लागतात.)

**तात्या** : मी अध्यक्षांना आपले भाषण सुरू करण्याची विनंती करतो.

(विसूभाऊ जांभई अर्धीच थांबवून घाईघाईने उठतात व खिशातून कागदाचे एक पुडके काढतात. सान्त व अनंत यांच्या सीमेवर उभे राहून आपण दिक्कालातीत संदेश देणार आहो अशा ब्रह्मज्ञानपूर्ण मुद्रेने ते उभे आहेत. इंदुकांत, सरलानाथ, बलवंत केव्हाच डुलक्या घेऊ लागले आहेत. तात्याही जांभया देऊ लागतो. फक्त धैर्यधरच जड डोळ्यांनी पण अद्याप जागेपणीच अध्यक्षांचे भाषण ऐकत आहे. बलवंताच्या डुलक्यांची फेरी परिघाने जास्त आहे. मघाशी त्याचे डोके परिणामकारक रीत्या धैर्यधराच्या डोक्यावर आदळले. तेव्हापासून पहारा करण्यासाठी तो जागा राहिला आहे. बलवंताचे डोके इकडे इकडे येऊ लागले की, तो मागे कलू लागतो व आपली फेरी परतवून ते परत गेले की चार पाच मिनिटे तो निर्धास्त राहतो.

विसूभाऊंच्या अध्यक्षीय भाषणात काही लोकांना आपले विचार दिसण्याचा संभव आहे. पण एक विचार दोन व्यक्तींना स्वतंत्रपणे सुचू शकतात व निव्वळ बोलण्याची संधी आधी मिळाली म्हणून काही त्या विचारावर त्यांची मालकी प्रस्थापित होत नाही. पहा त्यांचे भाषण समजते का ते!)

**विसूभाऊ** : (हातातील तुकड्याकडे आर्द्रतेने पाहात) या पूज्य अध्यक्षस्थानावरून बोलताना माझ्यापूर्वी हेच अध्यक्षस्थान भूषवणाऱ्या विद्वद्वर्यांच्या नावाची एकच मंडपघसणी माझ्या दृष्टीसमोर होत आहे. (एकाग्रतेने नाकाच्या शेंड्याकडे नजर लावतात.)

**धैर्यधर** : (बाकीचे लोक झोपलेले असल्याकारणाने आपणास माफी मागावी लागणार नाही या विश्वासाने जास्त धीट होतो) पण अहो – (या ठिकाणी बलवंताचा धोका पुढे पुढे येत असलेला पाहून धैर्यधर एकदम आकसतो. बलवंताचे डोके भ्रमण करून परत जाते.) पण अहो, हे आमचे पहिलेच संमेलन असल्याने यापूर्वीचे अध्यक्ष येणार कुठून?

**विसूभाऊ** : (तिकडे दुर्लक्ष करून) मराठी वाङ्मयामध्ये आजकाल प्रेमवाङ्मयाचा सुळसुळाट झाला आहे. अशा कामुक वाङ्मयाने आपल्या देशाला कलंक लावू नका. आजचा स्वतंत्र हिंदुस्थान साऱ्या जगाला मार्गदर्शन करणार आहे. ज्या देशात व्यास वाल्मिकीसारखे ऋषी झाले, त्याच देशात सिगरेटवर निबंध लिहिणारे, अथवा पिकली पाने वेचणारे लेखक निर्माण व्हावेत ही शरमेची गोष्ट होय. (टाळी) प्रो. फडके यांनी आणखी एक 'कॅपिटल' का लिहू नये? अत्रे व खांडेकरांनी एक दिवस बसून एक नवा 'मॅनिफेस्टो' अथवा एस्किमोमधील श्रमजीवी वर्गाचा क्रांतिइतिहास का लिहू नये? तुम्ही, आम्ही, अगदी प्रत्येकाने कशाची तरी का होईना, पण अगदी शिकस्त करा असे मी तुम्हाला डोळ्यांत पाणी आणून हात जोडून सांगतो. (डोळ्यांत पाणी काही आणत नाहीत, पण हात मात्र जोडतात.)

कलावंताने समाजाला संपूर्ण सत्य सांगितले पाहिजे हे पुष्कळजण विसरतात. ते सत्य सांगण्यासाठी त्याला जुगारी अड्ड्यावर किंवा वेश्यांच्या माडीवर जावे लागले तरी हरकत नाही. (वास्तविक तेथे जाणारे लोक याच उद्देशाने जातात. पण तेथे गेल्यावर त्यांना आपल्या हेतूचा विसर पडतो त्याला काय करणार? मनुष्य स्खलनशील प्राणी आहे.) आज लोकांना क्रांतिसंदेश देणारे वाङ्मय हवे. रशियाकडे पहा. मुलांना पोसण्यासाठी आपल्याकडे बालामृताच्या बाटल्या निघतात, त्याप्रमाणे क्रांतीला पोसण्यासाठी तिकडे कथा, कादंबऱ्या निघतात. (नऊवारी पातळे नेसू नका, पाचवारी नेसा या आवेशाने) लोक हो, प्रेमगीते लिहू नका, क्रांतिगीते लिहा. घरट्यात बसू नका, परळला जा. (या आपल्या वाक्यावर विसूभाऊ बेहद्द खूष आहेत. उद्याच्या टिळकवाडी टाइम्समध्ये हेच वाक्य शीर्षक म्हणून येणार याची त्यांना खात्री आहे.) हातात मुरली घेऊ नका, तरवार घ्या. व्हायोलिन होऊ नका, अलार्म घड्याळ व्हा. कोकिळा होऊ नका, कोंबडा व्हा. (अरे, अरे, काय ही

आतषबाजी! स्वाक्षऱ्या व संदेश यांना वर्षभर पुरणारी वाक्ये आपण पाच मिनिटांत उधळून टाकतो आहो याची त्यांना आठवण होते. ते एकदम षड्जमध्ये ओरडतात.) मी साहित्यिक नाही, वृत्तपत्रकार आहे.

(या गर्जनेने सारे खाड्कन जागे होऊन एकमेकांकडे पाहू लागतात. पण काही विशेष नाही हे पाहून पुन्हा डुलक्या घेऊ लागतात.)

**विसूभाऊ** : (त्या आवाजाने ते स्वतःच घाबरतात व एकदम चार पाने उलटून पुढे वाचू लागतात) आज फडके यांचे वाङ्मय विशेष लोकप्रिय आहे हे आपल्या अधोगतीचे लक्षण आहे. माझ्या मते (अहो, स्वतःचे काहीतरी सांगितलेच पाहिजे ना?) त्यांच्यामध्ये एक फार मोठा दोष आहे. ते जे काही लिहितात ते सगळ्यांना समजते. आपण वणवण अन्नपाण्यावाचून तीन दिवस खंडाळ्याच्या घाटातून हिंडत आहोत असे वाटण्याजोगे त्यांच्यांत पुरोगामी अशा गोष्टींचा, पहिल्या दुसऱ्या पाच पन्नास लाटा व भुका यांचा पूर्णपणे अभाव आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, जरी आज आपण साहित्यिक भांबावलेले असलो, तरी आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे की, ब्रह्मज्ञान हेच सर्वोच्च ज्ञान आहे व त्यास अनुसरून आपण लोकांसाठी लोकांचे वाङ्मय निर्माण केले पाहिजे व समाजाला संपूर्ण सत्य सांगून घरट्याबाहेर पडता पडता क्रांतिरस लोकांत निर्माण केला पाहिजे. (एकदम भावनावश होऊन) बाप हो –

**धैर्यधर** : कुणाला बाप हो म्हणता? माझं तर लग्नही झालं नाही अद्याप! (तो एक चार फूट लांब उसासा सोडतो. पण इतक्यात बलवंतची फेरी येते व धप्पदिशी आवाज होऊन धैर्यधर बेशुद्ध होतो.)

**विसूभाऊ** : बाप हो, तुम्हीही आपापल्या लहान मोठ्या काठ्या उंच करा व – व – (पण भाषणातील पुढील कागद कुठे आढळत नाही. ते गोंधळतात, पण समोरील श्रोतृवृंदातील कुणीच जागे नाहीत हे पाहून त्यांना धैर्य येते व एका प्रदीर्घ रूपकाच्या द्वारे ते भाषण संपवतात.) आकाशात संचारणाऱ्या नवविचारांना या काठ्यांनी टचाटच भोके पाडा व समाजावर क्रांतीचे पाणी शिंपडून त्यास मोहनिद्रेतून जागे करा.

(ते खाली बसतात व भाषणाचे कागद खिडकीबाहेर फेकून देतात.

धैर्यधर शुद्धीवर येतो व भाषण संपलेले पाहून टाळ्या वाजवतो.

विसूभाऊ उठतात व शेवटच्या कार्यक्रमासाठी घरी येऊ लागतात. पण कोपऱ्याला लालचंद मारवाडी दिसल्याने ते राणी बागेकडे जातात. त्याच वेळी कांचनगौरी आणि ललितचंद्र मॅटिनीहून येत असतात.)

**कांचन** : (चॉकोलेट चघळत) नमस्ते अध्यक्षमहाराज.

**विसूभाऊ** : (तिकडे अगदी लक्ष नाही असे दाखवून) अब तेरे सिवा कौन मेरा –

(हातात ज्योतिषी पाटी घेतलेला भविष्यवादी आत येतो.)

**भविष्यवादी** : अरे, आज पुन्हा विव्हळण्याचा आवाज येतो. ही काय भुताटकी आहे की काय ?

(त्याची व विसूभाऊंची नजर एक होते. त्याच्या डोक्यात हजारो मेणबत्त्यांचा लख्ख प्रकाश पडतो. **Awkward Pause.**

विसूभाऊ एकदम तीरासारखे समोरच्या झुडुपातून पलीकडे जातात. तेथे विशाल वडाच्या झाडाखाली आचार्य दोन गोजिरवाण्या गाढवांची गोष्ट स्वतःला सांगत बसले आहेत. विसूभाऊंची उरलीसुरली शुद्धी नष्ट होऊन ते खाली पडतात.

हळूहळू संधिप्रकाश नष्ट होतो व सारे जग घन अंधारात बुडून जाते!)

# कपाळवाट

इतके दिवस तो टेकडी चढून जात होता. पण दर वेळी कोपऱ्यावरील वळणाला असलेल्या वठलेल्या झाडापाशी आला की, त्याला पिंडऱ्या ताणल्यासारख्या वाटत व तो रंगवलेली काठी धुळीत रुतवत क्षणभर थांबे. फार मागे अंगात पिसे भरले होते त्यावेळी त्याच पायांनी त्याने अनेक गावे तुडवली होती, गोसाव्यांच्या फडाबरोबर भटकत असता संध्याकाळी चुलीची तिकाटी पेटली, की बहुतेक सारे मरगळून गेलेले असत. भात कच्चा राहिला तरी त्यांना ते समजत असे की नाही कुणास ठाऊक. पण तो मात्र अगदी देवकापसाच्या बोंडाप्रमाणे टाणटूण असे. त्याच वेडाच्या भरात हरद्वार ऋषिकेश झाले, पायांना गंगेचे पाणी लागले आणि तेच पाय रामेश्वराच्या मऊ वाळूत फिरले. पण आता वेड ओसरून गेल्यावर पायांतील प्राणच गेला की काय कुणास ठाऊक! ते चालत, ओढत. पण त्यांच्यांतील ईर्ष्याच संपली होती. ही एवढीशी टेकडी. लोक तिला आपुलकीने डोंगर म्हणत इतकेच. पण ती चढून जायचे म्हणजे पायांतील सुतळ्या एकदम सैल झाल्याप्रमाणे होत व कुठे तरी, अगदी या पारावरदेखील बसून राहावे असे त्याला वाटू लागे.

हे वठलेले झाड पिंपळाचे होते. तो येथे प्रथम आला तेव्हा पिंपळ थोरल्या पोराच्या उंचीचा होता. पाहता पाहता कोवळी लाल पाने मिरवत तो दोनतीन पुरुष उंच झाला. भोवतालच्या लोकांनी पै-पैसा गोळा करून त्याच्याभोवती पार बांधला. टेकावरील मल्हारीच्या देवळाला जाऊन येणारी माणसे उतरताना त्यावर टेकू लागली. पण नंतर त्याची मुळे पायाप्रमाणेच दमून गेली, की सगळीकडेच असलेला जांभळसर मऊ खडक त्यांना लागला कुणास ठाऊक, तो मरून गेला. आता तर त्याचा अर्धा खडखडीत बुंधाच तेवढा पारात उरला होता. तो त्याच्याजवळून हजारदा गेला असेल. त्याला पिंपळाबद्दल दररोज भेटणाऱ्या शेजाऱ्याप्रमाणे आपुलकी होती. रात्री त्याची पाऊससळसळ वर गुहेपर्यंत ऐकू येत असे. त्याच्यावरील बाजूची पाने एकदम झळ लागल्याप्रमाणे वाळली तेव्हा त्याला पोटात घास ढकलता आला नाही. खरे म्हणजे जवळपास एक मैलात कुठेही पिंपळ नव्हता. हे बी कुठून तरी वाऱ्यावर आले, अकारण रुजले, अकारणच नाहीसे झाले. त्याला अनेकदा वाटे, हा पिंपळ काही मेला नाही. त्याला एकदम सारेच नकोसे वाटू लागले. एकदा मध्यरात्री तो उठला, झाडातून बाहेर आला आणि टेकडी ओलांडून पलीकडे निघून

गेला. अजूनही कुठे तरी तो वाढतदेखील असेल एखाद्या देवळाशेजारी. जेथून दूरवरची नदी दिसते, पांढरी चौकोनी घरे दिसतात असल्या ठिकाणी. पण असे वाटताच त्याला एकदम कळवळल्यासारखे वाटे. मग तो सगळी चित्रे अंगावर अधीरपणे चढलेल्या वारेमुंग्यांप्रमाणे झटकून टाकत असे. जाताना तो येथे थांबे, पण पारावर बसावेसे त्याला कधी वाटले नाही. त्याने तेथूनच काळजीपूर्वक आता पाहिले. आत हातभर गवत उगवले होते, व मधून मधून केन्याची पाने फुलांच्या निळ्या टिकल्या घेऊन वाढली होती. त्याची नजर सर्वत्र फिरली, पण आतल्या भिंतीवर अगर गवतात कुठे पिवळ्याधमक रंगाचा दोर दिसला नाही. त्याला वाटले, ठीक आहे. मलाही काही घाई नाही. मला तरी कुठे आता हिमालयावर पणती ठेवायला जायचे आहे? आता आपले पाय इथेच रुजणार, संपणार. मी वाट पाहीन!

पण केन्याची पाने बघताच त्याची जीभ किंचित हुळहुळली. डाळीच्या पिठात घालून पाने तळली की, ताटभर [ढीग] खाल्ली तरी अद्याप जीभ हावरीच असे. पीठ तळून कुरकुरीत होत असे, पण आतले पान कसे ऊबदार मऊ होत असे.

एवढ्या जंजाळात राहिलं काय तर, त्या पानाची हवी असलेली तरी नकोशी वाटणारी मऊ जुनी आठवण!

"केदारी, अरे केदारी, कुठे मसणात जाऊन बसलाय खेकडा कुणास ठाऊक!" रस्त्याच्या खालच्या बाजूलाच कुणी तरी नारळ फोडल्याप्रमाणे एकदम ओरडला.

तो एकदम दचकला, पण त्याचे अंग एकदम घाबरे होऊन किंचित् थरथरले व तो तत्काळ उठून उभा राहिला. म्हणजे इतक्या वर्षांनंतरदेखील भूत काही सुटले नाही. (तसे त्याला कुणी हाक मारून आता वर्षेच्या वर्षे होऊन गेली होती आणि आता तर काय गावात...) त्याने भेदरून मागे पाहिले, तेव्हा जवळच जानव्वा थोडा चढ चढून वाटेवर येत होती. ती जणू खालच्या जमिनीचे लचके तोडून गिळत असल्याप्रमाणे पाय टाकत आली व त्याच्यासमोर उभी राहिली. ती धापा टाकत होती. तिच्या अजस्र अंगाला लागणारी धाप पाहून आपण थोडा वेळ श्वास आवरावा की काय असे कुणालाही वाटले असते. कारण जानव्वाकडे पाहिले की, प्रथमच हत्तीचा मागचा भाग कुठे वाटेतच राहिला की काय असे वाटावे इतकी ती अजस्र होती. पाऊल रोवून ती उभी राहिली की थोड्याच वेळात त्याला मुळे सुटली असती. अंबाड्यासारख्या पांढऱ्या अस्ताव्यस्त केसांखाली तिचा सैलसर चेहरा जुन्या गोणपाटी पिशवीसारखा दिसे (आणि तिच्या हाताचे सुपलीसारखे पंजे बघितले की वाटे हे हात...)

ती मागच्या मागेच पारावर टेकली तेव्हा तो थोडा दचकला व तेथे बसू नको म्हणून सांगण्यासाठी शब्द अगदी त्याच्या ओठांवर आले. पण त्याने स्वत:ला सावरले व सावधपणे विचारले, "हा केदारी कोण?" "कोण माती आणि मसण," त्याच्यावरच

खेकसत ती म्हणाली, "आहे माझ्या मावसबहिणीचं उंडगं पोर. काल आणून ठेवलं घरी आणि आता बघावं तर झालं हडप! गेलं वाटतं परत आईकडे. चार पाच पोरं धरून आणली बघ, कुणीतरी असावं घरात म्हणून. तर सगळी एकजात असली निघाली बोकडासारखी. इतक्या पोरांना मी जगात आणलं, नाळ तोडली, ती सगळी कुठं ना कुठं वाढत आहेत, मिशा घेऊन केसाळ होतात, पोरं वितात, पण मला मात्र स्वतःचं पोर तर नशिबात नव्हतंच. पण एक तरी लाभावं, हट्, नाव कशाला? आणि तिने रागाने बडवण्यासारखे दिसणारे हात झाडले.

त्याला एकदम इतके हायसे वाटले की तो थोडा हसला. म्हणजे केदारी हे त्या कुठल्या पोराचे नाव होते तर! नाहीतर ती हाक ऐकून त्याचे सगळे अंग एकदम शिणल्यासारखे झाले होते. तिच्या सुपलीसारख्या दिसणाऱ्या पंजाकडे पाहून त्याला नेहमी वाटे, हे हात तिरुपतीच्या प्रसादाचा लाडू करण्यासाठी अगर गोमटेश्वराएवढ्या बाहुल्या करण्यासाठीच निर्माण झाले असावेत! तो प्रथम त्या टेकडीवर आला व देवळाखालच्या गुहेत बसला, तेव्हाची आठवण तर त्याला अजून होती. त्याने एका झुडुपाच्या फांद्या बांधून थोडी साफसूफ केली होती व तो पिशवी बाजूला टाकून बसला होता. खरे म्हणजे तो सात-आठ मैल चालून आला होता आणि आता खाली बसताच अंग सुखाने सैल व्हायला हवे होते. पण तो बराच वेळ भ्रमिष्टासारखा बसून होता. इतक्या वर्षांपूर्वी अंगात भूत संचारल्याप्रमाणे तो निघून गेला होता. पावले नेतील तिकडे भटकत राहिला. त्याच आकस्मिकपणाने मग ते भूत ओसरले, पण तशाच झपाटल्या पायांनी तो ओढत आल्याप्रमाणे पुन्हा परत आपल्या मातीकडे आला होता. या टेकडीवरून समोर पाहिले, की पंधरावीस मैलांचा विस्तार दिसे. प्रथम चौकोनी हिरव्या तुकड्याप्रमाणे दिसणारी शेते; त्यात काही वेळा तपकिरी रुमालाच्या टिकल्या, पांढऱ्या बैलांच्या कवड्या सरकताना दिसत. पुढे वरून हिसकल्याप्रमाणे दिसणाऱ्या एका खेड्यातील झोपड्यांच्या रेषा. अगदी क्षितिजाजवळ मठाचे पांढरे शुभ्र गोपूर. ते त्याला पलीकडच्या आपल्या गावातूनही दिसत होते. ते गाव सोडलं आणि त्याच गावाच्या ओढीनं जवळ येऊन दूर राहिलो. गोपूराकडे पहाताच तर काळजात सल हलल्यासारखे झाले व वैतागाने निघून जावे असे त्याला वाटले. आता खरे म्हणजे गाव राहिलेच नाही. त्या ठिकाणी म्हणे आता धरण झालं होतं, गाव पाण्याखाली गेलं होतं. कुणाला दोनशे रुपये मिळाले, चारशे मिळाले. माणसं पांगली, पाणी अडवल्यानंतर पसरून वाढले ते थेट मठापासून दहा हातावर येऊन जिभा चाटू लागले. ही हकीकत त्याला समजली तेव्हा तो अगदी जिकिरीला आला. सगळी घरे पाण्यात गेली. आपलं, बसवंताचं, पारूमावशीचं, तिवणाचं काडीच्या पेटीएवढंच काड्यांच्या पेट्यांचं दुकान. मग त्याच्या मागचे लाल गोल उंबरे देणारे झाडदेखील आडवे झाले असणार. त्याला एकदम विलक्षण उत्सुकता वाटली. घरात फारसं सामान नव्हतं,

पण ते कुणी नेलं होतं? जुनी पेटी? तांब्याचं घंगाळ? त्या घराला कुणीतरी गाडीचे एक जुने चाक आणून तिरपे टेकून ठेवले होते. त्याने खूप चौकशी केली, पण ते कुणाचे होते कधी कळलेच नाही. मग त्या खाली हातभर गवत वाढले, ते भिंतीत थोडे रुतले, त्याची लोखंडी पट्टी गंजली. ते चाक अखेर कुणी नेलं असेल की अद्याप तसेच पाण्यात असेल? चाक पाण्यातच पण त्याच ठिकाणी नेटानं राहिलं. आपणाला मात्र तो ताठा राहिला नाही. सारं संपून गेलं, तेव्हा इकडे पावले वळली. कुणीही ओळखणार नाही, कुणी आठवण उकरणार नाही अशी खात्री वाटल्यावर.

पण खरं म्हणजे काय संपून गेलं? असं कधी काहीसुद्धा संपत नाही. आतादेखील अंधार पडला, मठाचे गोपूर चुन्याचे बोट भिंतीला पुसल्याप्रमाणे दिसू लागले की, सगळी घरं पाण्याखाली एकत्र भेटत असतील आणि सारं काही त्यांच्यांत घडलेलं एकमेकांना जिव्हाळ्यानं सांगत असतील.

आणि आपल्यात तरी काय संपलं? भटकत्या पावलाखाली सारं चिरडून टाकलं असं आपल्याला वाटत होतं. पण तो भ्रम होता. काहीसुद्धा मेलं नव्हतं. गंगा यमुना यांच्या पाण्याने सारे बुडाले नाही, ते या एवढ्या टीचभर गावड्या नदीच्या धरणाने बुडणार? गाव पाण्याखाली बुडालं, पण ते सारंच सारं अगदी तसंच आपल्यात रेखीवपणे आहेच. अगदी आपले मधूनच केंबळा खाली टाकणारे घर, कोरीव काम असलेला देव्हारा... साप मारण्यासाठी केलेली जाड वेताची काठी आणि... आणि गौरी...

त्याला वाटले होते, पिशवी उचलावी व पुन्हा माघारी जावे भटकत. भुतांच्याजवळ. पुन्हा एवढे जवळ आलो हेच चुकले. आणि त्याचवेळी जानव्वा एखादे वडाचे झाड चालत येऊन समोर उभे राहिल्याप्रमाणे आली आणि हात जोडत म्हणाली, "बसलात होय स्वामी?"

दोन अशक्त शिंपले जुळल्याप्रमाणे ते हात पाहताच तो खाडकन् घाबरला. त्याला वाटलं, इथं बसायला काय धर्मशाळा आहे की काय म्हणून खेकसणार, पण तिने 'बसलात होय स्वामी' म्हणताच तो अगदी शरमून गेला. पांढरे चांदवे लावलेला कांबळ्याचा झगा आणि गळ्यात रुद्राक्ष बघून तिची गैरसमजूत झाली होती. आपण कसले स्वामी? कधी कसला संस्कार मनावर झाला नाही, कधी काही जिकलं नाही, काही समजलं नाही. आयुष्यात केल्या त्या दोनच गोष्टी. सतत लहान मोठे साप मारले आणि सतत भटकून कुठे म्हणून मातीला कोपरा नसतो हे पाहिलं. हा पोषाख, वाढलेली दाढी, सारा एक मुखवटा.

"मी कसला स्वामी, ताई!" तो म्हणाला, "घरदार नसलं की, स्वामी होता आलं तर माकडंदेखील स्वामीच होतील. इथं जरा टेकलो इतकंच. ही जागा तुमची असेल तर मी जातो निघून."

जानव्वाने विस्मयाने त्याच्याकडे पाहिले व ती मनमोकळेपणाने हसली, "माझी का माझ्या बाची ? कुत्री, मांजरं राहतात, तर तुम्ही राहिलात तर वाईट होय ? तुम्हाला येताना पाहिलं होतं म्हणून झाडणी घेऊन आले मी. रहा की खुशाल. नाहीतर इथं एकटं वाटतं मला. वर्षाचा कचरा काय असा काड्याकुट्यांनी सरणार हा ?" ती आत शिरली व चाबूक हाणत असल्याप्रमाणे झाडणी फटकारत तिने जमिनीवरची सगळी धूळ डोक्यापर्यंत उधळली. पण थोड्या वेळाने जमीन स्वच्छ झाली. ती खोकत म्हणाली, "राहणार असशील तर दोन दिवसांत आरशासारखी सारवून देईन मी."

"तुम्ही इथं कसलं काम करता ?" त्याने विचारले.

"मला तुम्ही म्हणणारं शहाणंच दिसता की!" ती म्हणाली, "मी करते काम मसणात." तिने हात झटकले. त्या हालचालीने दूरच्या फणसाच्या झाडाचा फणस तुटून पडला असता. ती एकदम तिरसट का झाली हे त्याला समजले नाही व तो एकदम विरमून गप्प झाला. दोन-चार दिवसांतच तिने जागा सारवून दिली, कुठून तरी एक जुनी तट्टी आणून तिने आडोसा केला व पाण्यासाठी एक मडके आणून ठेवले.

नंतर त्याला समजले की, ती तिरसटपणे बोलली नव्हती, खरेच सांगितले होते.

टेकडीच्या टोकावर सपाट माथ्याचे मल्हारीचे देऊळ होते खरे, पण मठापलीकडील उतारावर दोन निंबांच्या छायेत पांढरे शुभ्र थडगे होते. त्याच्याभोवती नेहमी स्वच्छ असे, व त्यावरील गिलाफ कधी मळलेला नसे. मागे टेकडी संपे, तेथे गावचे स्मशान होते. त्यातील अलीकडच्या भागात प्रेते पुरत. तेथे खड्डे खणणारा रेवण्णा बहुधा मोटर अड्ड्यावर गुडघे पाठीला आपला लाल रुमाल बांधून तीन पानी तरी खेळे किंवा ताडीच्या दुकानासमोरच्या बाकावर पुन्हा ताडी ढोसण्यासाठी पहिली ताडी उतरण्याची वाट पाहात बाकावर अस्ताव्यस्त पडलेला तरी असे. अडलेली माणसे गुपचुपपणे जानव्वाला हाक मारत आणि ती पाहता पाहता खळगा तयार करे. तिने आधीच काही खड्डे करून ठेवले आहेत की काय असे वाटे. मग कधीतरी रेवण्णा तोंड वेंगाडत तिच्या मागे मागे हिंडे व ती बेगुमानपणे काहीतरी पैसे त्याच्या हातावर टिकवे. पण सारा वेळ तिचे लक्ष असे ते पिराकडे. स्मशानात आलेली माणसे येऊन जाऊन तिच्याकडे येणार होती. दर गुरुवारी पिराकडे जायला माणसांची रांग लागे, बैलगाड्या, टांगे खाली थांबून माणसे टाकत व निघून जात. गर्दीत सगळ्या जातीची माणसे असत आणि चारपाच जणांत एकतरी पोट टमाम फुगलेली बाई नाही असे घडत नसे, कारण पीर बाळंतपणाला लाभत असे. मग पोर वर्षाचे झाले की एकदा, चालू लागले की एकदा असा रतीब सुरू होत असे. त्यामुळे गुरुवारी कुणी तरी मेले की जानव्वा चरफडत असे. ती सारा वेळ वाटेला बसून पोटकुळ्या बायकांकडे नजर लावून बसे. काही वेळा तत्परतेने ती त्यांना हात देई अगर हातातले गाठोडे घेई. मग बाळंतपणाची काही व्यवस्था झाली की नाही हे विचारत असे व शेवटी

उत्साहाने म्हणे, "त्यात कसली अडचण? ही जानव्वा आहेच की सुईण. आतापर्यंत हजार पोरांची नाळ तोडली मी, एक पोर येऊन वाया गेलं नाही."

आणि मग करार होऊन चकाराचा एखाददुसरा रुपया चोळीच्या काठात गुंडाळला की, एक पूर्ण अखंड गुरुवारच गुंडाळून ठेवल्याप्रमाणे ती खूष होत असे.

झाडाला अद्याप फळ आले नसल्याप्रमाणे, अद्याप शिखर वाढायचे असल्याप्रमाणे दिसणारे बसके देऊळ, मागील कुणी अज्ञात पीर, खाली पसरलेले तळे आणि त्या ठिकाणी मधून मधून येणाऱ्या गाड्या. त्याला बसल्या बसल्या वाटे, नवा जन्म देणाऱ्या पोटकुळ्या दमलेल्या बायका आणि तेथेच मागच्या बाजूने जन्म संपवल्यावरही मखरात नटून येणारी प्रेते... या असल्या टेकडीची जानव्वा ही टेकडाई आहे. प्रत्येक टेकडीत अशी एक आई असते आणि प्रत्येकाच्या आत अशी एक टेकडी असते, वठल्या पिंपळाची, ठिकठिकाणी झिपऱ्या फिसकारलेल्या झुडुपांची आणि त्यात मध्येच सळसळत जाऊन सळकून गेल्याप्रमाणे काळ्या, हिरवट, तपकिरी, पिवळ्याधमक सापांची.

त्यावेळी मठाच्या पांढऱ्या शिखरामागे कातरलेल्या नखासारख्या दिसणाऱ्या रस्त्यावर अद्याप गाव होतं. केदारी दादाजीच्या शेतावर राबत होता. इतरांच्या घरून भाकरी येत, तासभर गप्पाटप्पा होत, पण गौरी मात्र कधी जेवण घेऊन आली नाही. पण केदारीला ते कधी विशेष जाणवले नाही. उलट, तासभर तो मोकळ्या बैलासारखा बांधाबांधावरून हिंडे, एखादे बीळ किंवा वारूळ दिसले की, उगाचच काठी ढोसे. एखादे वेळी काळ्या अगर पिवळ्या रंगाचा पट्टा उसळून फुसकन बाहेर येई. पण पुन्हा डोके उचलायच्या आतच त्याची मान मोडलेली असे. असे एखादे जनावर तरी काठीवरून आणल्याखेरीज त्याला तरतरीत वाटत नसे. दादाजी तर वैतागून कधी थट्टेने म्हणे, "केदारी, दोनपैकी एक गोष्ट घडणार बघ. नागपंचमीला गावात नाग उरणार नाही, नाहीतर तुला तरी काळानिळा पुरावं लागेल बघ आम्हांला. अरे ही कसली बोटावर कोयता घालून आत रक्त आहे हे पाहण्याची गाढवी हौस!"

पण केदारी नुसता हसे. बिळातून साप निघाला की काय होतसे कुणास ठाऊक. सगळे अंग तापल्यासारखे होत असे आणि हात, डोळे मात्र पिरगळून तयार होत. समोर झगझगीत प्रकाशात सारे नाहीसे होऊन सापाची रेषा तेवढी जळजळीत दिसू लागे. हातातील काठी व फुसणारे तोंड यापैकी कुणी झेप आधी टाकायची यातच सारे टांगते व्हायचे आणि तोंड पुढे येत असता किंचित् मोठे व्हायच्या आतच काठीने सापाची हाडे मोडली जात. मग त्याला वाटे, "हा साप. मी. क्षणापूर्वी जिवंत सळसळणारा. पण आता तो नाही. मी आहे."

खबदाडाच्या काठावर पाय टाकून केदारी बसला होता व उताराच्या खाली भस्माच्या एका पट्ट्याप्रमाणे दिसणाऱ्या पाऊलवाटेकडे पाहात होता. आज गुरुवार होता आणि

सकाळपासून तीन चार जणांचे घोळके मल्हारीच्या देवळाला वळसे घालून खालच्या पिराकडे वळत होते. तेथून उदाचा वास काही वेळा इतका गडद होता की, घसा खवखवल्यासारखा होत होता. आता ऊन उतरू लागले होते व देवळाची सावली उतारावर लचकून खाली पसरली होती. पण तिच्यातून पुढे येताच माणसे एकदम उजळत व जणू ती भूतकाळात निसटून स्वच्छ ताज्या चालू क्षणात येत. पिराकडे लक्ष देत जानव्वा देवळाखालीच ठाण मांडून बसली होती. तिने दोन चार बायकांशी बोलणी केली होती. पण दर वेळी त्या निघून गेल्यावर तिने जाड हात झटकले होते. केदारीला वाटले, त्या जाड बोटांच्या पंजात आज कुणी सापडले नाही. तेव्हा सांज झाली की जानव्वा येणार आणि तासभर कोरडा गडगडाट होणार.

डोळ्याच्या कोपऱ्यात कसलीशी हालचाल झाली आणि त्याचे सारे शरीर दोरी आपोआप ताणल्याप्रमाणे ताणले. अंग न वळवता त्याने बाजूला पाहिले. थोड्या अंतरावर वाटेच्या बाजूला घाणेरीचे झुडूप होते व त्यावर ठिपक्यासारख्या कंगुण्या होत्या. खाली हातभर गवत भोवताली वाढले होते. मध्येच पाती वाकली व हळूच बाहेर केशरी तोंड आले. ते क्षणभर विसावून पुढे सरकता एक हातभर वळसा आला आणि त्यावर ऊन पडताच तो रेशमी कदाच्या चिंधीसारखा चमकला.

केदारी हळून उठून उभा राहिला. आता त्याला टेकडी, देऊळ, पिराकडे जाणारे तुरळक लोक यांचा एकदम विसर पडला. आता डोळ्यांपुढे उरला तो चमकदार वळसा, त्याचे गवतात स्थिर झालेले डोके. गुहेतील काठी आणण्यासाठी त्याने एक पाऊल मागे घेतले. वळशाला आणखी एक वळसा मिळाला आणि त्याच वेळी भस्मवाटेवर, कुणाची तरी पावले वाजली. वीतभर उंच पोर फुगा वाजवत पुढे आले. वळसे एकदम लांब लांब झाले व नाग नीरवपणे पुढे सरकला आणि खडकाच्या वळशाला लाल रेषा फुटत गेल्याप्रमाणे वळून दिसेनासा झाला.

केदारी एकदम ओसरल्यासारखा झाला व त्या पोराविषयी एकदम त्याच्या मनात इसाळ चमकून गेला. आतापर्यंत तो नाग इतका उघड्यावर आणि जवळ कधी दिसला नव्हता. केदारीला करपल्यासारखे झाले व त्या पोरावर एकदम खेकसावे असे त्याला वाटले. पण ते पोर मात्र फुगा भ्यों करत, त्या फुग्यानेच ओढत नेल्याप्रमाणे निघून गेले. केदारीचे मन चुरगळल्यासारखे झाले होते. त्याला वाटले, आता अंधार पडेपर्यंत थोडे भटकून यावे. तेथून मागच्या बाजूला शेताचे चौकोन होते व मध्येच एका बांधावर लालभडक फुलांचे सावरीचे झाड होते. नाग सात-आठ दिवसांपूर्वी तेथे दिसला होता आणि बसापा रुमाल काखेत मारून ओरडत आला होता. केदारी काठी घेऊन जाईपर्यंत तो जणू त्याची वाट पाहातच उन्हात होता. तेवढ्यात ती म्हातारी आली आणि ओरडली, ''नको रे बाबा, त्याला मारू. सावरीचा देव असेल की तो.''

तीच काठी त्या म्हातारीच्या टाळक्यात हाणावी असे त्याला वाटले. त्या सावरीखाली कसला तरी तेल्कुंकू माखलेला दगड होता. सुगीच्या दिवसांत एकदा चांदण्यात तेथे बकरे कापले जाई. जेवण होत असे.

साप उलगडून लांब झाला व जणू त्याच्याकडे पाहात खिजवत नाहीसा झाला होता. केदारीला वाटले, ''नाही, ही माणसे आपल्याला जगू द्यायलाच तयार नाहीत. गेल्या किती तरी महिन्यांत असा क्षण आला नव्हता. त्यावेळी, भुतासारखे दिवस, हुलक्या चेहरा हे काही उतरले नव्हते आणि एका धुंद जाणिवेत तो तरंगत राहिला नव्हता. जणू तो एक टाकलेली कात होता आणि त्याच्यातील हा झगझगीत, लवचिक, सामर्थ्याने जगणारा नाग मात्र त्याच्याकडे पाहात खिजवत भोवतीच हिंडत होता.

विभाग तिसरा

# प्रकाशित असंकलित कथा – अ) स्वतंत्र

# मोती

तात्यासाहेबांनी हातातील पुस्तक बाजूला टेबलावर टाकले व कुठेतरी फिरून यावे म्हणून ते उठले. कोणीतरी आपल्याबरोबर आल्यास फिरणे जास्त आनंदाचे होईल असे त्यांस वाटले व कुणास हाक मारावी याचा ते विचार करू लागले.

लीलाताई जवळच खुर्चीवर कसलेसे पुस्तक चाळत होती. तिच्या उजव्या हाताला सुधा सकाळी आलेल्या साप्ताहिकामधील सिनेमाचे पान पाहात होती.

"लीलाताई, आमच्याबरोबर जरा येता का तलावापर्यंत फिरावयाला?" तात्यासाहेबांनी जरा भीत भीत विचारले.

"मी? वा, आता तर माझ्या कॉलेजमधील मैत्रिणी येणार आहेत. आमची सुधाबेन मग त्यावेळी काव्यगायन करणार आहे. हो ना ग सुधे?" लीलाताई आपल्या धाकट्या बहिणीकडे वळून म्हणाली.

"हो हो, मी म्हणून दाखवू का तात्या तुम्हाला?" सुधा मोठ्या उत्साहाने म्हणाली.

ढळला रे ढळला दिन सखया
संध्याछाया भिवविती हृदया,
अतां मधूचें नांव कासया
लागले रे नेत्र पैलतीरीं

पण तात्यासाहेबांचे तिकडे लक्ष नव्हते. ते लीलाताई सुधेकडे मोठ्या कौतुकाने पाहात होते. आपल्या मुलीच्या सौंदर्याचा त्यांना नेहमी अभिमान वाटे. तिने आज आपले जॉर्जेटचे निळे पातळ काढले होते व ते तिला अतिशय शोभून दिसत होते. तोंडावर येणाऱ्या केसांच्या बटा मागे सारीत असता सुधेच्या कानांतील लालभडक डूल एकसारखे हलत व त्याबरोबर तिच्या गालावर पडलेला तांबूस प्रकाशही हले.

लीलाताई सुधा यांचेकडे पाहिले म्हणजे तात्यासाहेबांना नेहमी वाटे, सुंदर चित्राला सुंदर चौकट पाहिजे. अशा मुली श्रीमंतीतच शोभतात. आपण लहानपणी जे दरिद्री जीवन काढले त्या जीवनाच्या नुसत्या झळीनेच त्या करपून गेल्या असत्या! आणि मग आपल्या मुलींना तरी पूर्ण सौख्यात ठेवण्याजोगी सुस्थिती आपण मिळविली या गोष्टीचे त्यांना विलक्षण समाधान वाटे.

त्या दिवाणखान्यात एक उंची जाजम अंथरले होते. सुंदर पॉलिश केलेल्या सात आठ खुर्च्या भिंतीला लावून ठेवल्या होत्या. मध्ये एक अष्टकोनी टेबल होते व त्यावर नकशीदार पात्रामध्ये फुले घालून ठेवली होती. भिंतीवर मध्यभागी सोनेरी चौकटीमध्ये आईवडिलांचे भव्य फोटो दिसत. त्या खाली एकाच वेळी पूर्ण आकृती दिसेल एवढा भव्य आरसा उभा केला होता. कोपऱ्यातील संगमरवरी त्रिकोणी टेबलावर रेडिओ होता. या साऱ्या वस्तूंकडे पाहिले म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वाविषयी तात्यासाहेबांना किंचित् अभिमान वाटे. आणि ते साहजिकच होते. कारण या साऱ्याच्या मुळाशी त्यांचे परिश्रमच कारण होते.

तात्यासाहेब सोप्यावर आले. त्यांचा थोरला मुलगा दीनानाथ क्लबाला जाण्याच्या तयारीत दिसत होता. त्याने आपले केस मोठ्या काळजीपूर्वक परतलेले दिसत होते. आरशात पाहून तिरप्या काड्या असलेला टाय त्याने व्यवस्थित बसवला व हँगरवरील कोट घेतला. त्याच्याकडे पाहून "माझ्याबरोबर तलावापर्यंत फिरावयास येतोस का ?" असे विचारण्याचे तात्यासाहेबांना धैर्यच झाले नाही.

"तात्या, काम होतं का काही ?" दीनानाथने मागे वळून विचारले.

"छे छे, काही नाही; काही नाही. म्हटलं, जरा तलावापर्यंत फिरून... छे, काम नाही, काही नाही." त्याच्याकडे पाहून तात्यासाहेब म्हणाले. त्यांचे लक्ष समोर असलेल्या आनंदच्या फोटोकडे गेले. आनंदाला नुकतेच किंग्ज कमिशन मिळाले होते व सध्या तो लाहोरला होता. काहीतरी बोलावयाचे म्हणून ते म्हणाले, "अरे, हा आनंदाचा फोटो येथे आल्याबरोबर एकदम नजरेत भरेल अशा जागी लावला पाहिजे." त्यांनी हसण्याचा प्रयत्नही केला व ते घाईने बाहेर पडले.

बंगल्यातून बाहेर पडताच, मैदानातून तलावाकडे गेलेल्या पायवाटेने ते चालू लागले. चांगल्या रुंद ब्रशाने तपकिरी रंगाची पट्टी ओढावी त्याप्रमाणे हिरव्याचार गवतात ती पायवाट दिसत होती. मध्येच थांबून त्यांनी उगाचच मागे वळून पाहिले. दीनानाथसाठी निराळी घेऊन दिलेली निळी मोटर सफाईदारपणे बाहेर पडत होती. पण त्यांना आनंद झाला तो दुसऱ्या गोष्टीचा. त्यांचा आवडता छोटा कुत्रा मोती त्यांच्या मागोमाग येत होता. तो बराच मागे होता म्हणून तात्यासाहेब जरा थांबले. तो जवळ आल्यावर "मी बोलावले नाही तरी तू येणारच, नाही ?" अशा आशयाचा कौतुकमिश्रित दृष्टिक्षेप करून ते निमूटपणे चालू लागले. नेहमीप्रमाणे तलावापासून जरा अंतरावर असलेल्या उंचवट्यावर ते जाऊन बसले.

सूर्याचे शेवटचे लालसर किरण सायंकाळच्या झुळुकीने कुठच्या कुठे उडून जात असल्यासारखे दिसत होते. फळासारख्या दिसणाऱ्या तांबड्या पिवळ्या ढगांनी आकाश भरले होते. तलावाच्या पाण्यात सूर्यप्रकाश पडल्यामुळे सोनेरी रंग ओतल्याप्रमाणे पाणी दिसत होते. तलावाच्या वर असलेल्या झाडांच्या सावल्या खूप लांबलचक पसरल्या होत्या.

तात्यासाहेबांच्या आजूबाजूलाच मोती उड्या मारीत होता. एकदा तो अगदी मुख्य रस्त्यापर्यंत जाई, तर एकदा अगदी त्यांच्या पायाजवळ येई. अगदी क्षितिजाजवळ कुंकवासारखा लालभडक रंगाचा एक अरुंदसा पट्टा पसरला होता व त्यावर अत्यंत आकर्षक असा जांभळा रंग विरल होत होत जाऊन अखेर निळ्या रंगात विलक्षण मोहक तऱ्हेने मिसळून गेला होता. काळसर झाडाच्या मागे दिसणारे दृश्य तर तात्यासाहेबांना अतिशय सुंदर वाटले.

तात्यासाहेबांनी जरी अगदी म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर जरी नाही, तरी वार लावून घेऊनच त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले होते. पुढे कधीतरी आपणास टिळकवाडीला चार बंगले घेता येतील, दोन मोटरी ठेवता येतील ही कल्पना त्यांच्या जरी स्वप्नात आली असती तरी त्यांनी ती अतिशयोक्तीची मानली असती. पण सत्य हे पुष्कळदा कल्पनेपेक्षा विलक्षण असते. कारण आज त्या सर्व गोष्टी त्यांनी साध्य केल्या होत्या. त्यांचा बंगला सर्व टिळकवाडीत सुंदर होता. दीनानाथची प्रॅक्टिस सर्व नवीन वकिलांत जास्त होती. आनंदला नुकतेच किंग्ज कमिशन मिळाले होते. लीलाताई तर आपल्या कॉलेजमध्ये सर्वांत पुढे असे. ते स्वत: कैक वर्षे म्युनिसिपालिटीचे मेंबर होते व गेल्याच वर्षी त्यांनी नगराध्यक्षाचा मान नाकारला होता. त्यांची पूर्वस्थिती माहीत असलेले लोक त्यांना आदराने म्हणत, "तात्यासाहेब, स्वत:च्या कर्तृत्वावर तुम्ही जीवनामध्ये यशस्वी झालात." विनयाने त्या स्तुतीचा ते स्वीकार करीत, पण त्यांच्या हृदयात खोल कुठेतरी वाटे, "नाही, आपण पूर्ण यशस्वी झालो नाही, जीवनातील कुठल्या तरी सौख्यास आपण मुकलो."

दीनानाथ, लीलाताई, सुधा यांचे जग वेगळे, आपले वेगळे. आपण ज्या गावातून बाहेर पडत आहो, त्या गावात त्यांचा नुकता प्रवेश होत आहे. त्यांच्यांत व आपल्यात फार अंतर आहे. त्यांना मघाच्या सुधेने म्हटलेल्या ओळी आठवल्या. खरेच, आपले नेत्र आता पैलतीरावर रोखले आहेत व उरलेला प्रवास आपणाला कुणाच्या सोबतीशिवाय केला पाहिजे.

इतक्यात मोती त्यांच्याजवळून पळत गेला. तात्यासाहेबांनी लूलूलूलू करून त्यास जवळ बोलाविले व त्याच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवला. त्याच्या रेशमासारख्या मऊ केसांचा स्पर्श त्यांना विलक्षण आनंददायक वाटला. लगेच मोतीने आपली सुटका करून घेतली व तो दूर पळाला.

हळूहळू संधिप्रकाश पसरू लागला. सर्व वस्तूंवर झिरझिरीत पडदा टाकल्याप्रमाणे त्या अस्पष्ट दिसू लागल्या. इतक्यात एक केविलवाणे ओरडणे ऐकू आले व तात्यासाहेबांनी चमकून पाहिले. मोती रस्त्यावर पडला होता व रस्त्याच्या टोकाला एक भली मोठी मिलिटरी मोटर धुळीमध्ये अदृश्य होत होती. त्यांनी जवळ जाऊन पाहिले. नुसता मांसाचा

गोळा. थोड्या वेळापूर्वी खेळणारा मोती! आपल्या हृदयाला कोणीतरी हजारो सुया टोचीत आहे असे त्यांना वाटले.

फुटबॉल खेळून परतणारी मुले आपापसात मोठ्याने बोलत जात होती. एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून जाणाऱ्या कॉलेज विद्यार्थ्यांच्या सायकली जवळून जात होत्या. मोती यापुढे पुन्हा कधीही हलणार नाही या गोष्टीची कुणालाच कदर नव्हती. जग बेफिकीरपणाने चालले होते. तात्यासाहेबांनी पुन्हा एकदा त्याकडे पाहिले व जड पावलांनी ते परतले.

वाऱ्याच्या झुळुकीमध्ये तीव्र शीतलता आली होती. जाताना वाळलेली पाने पायाखाली सापडत व ती चुरमडल्याचा आवाज येई. थोड्या अंतरावर त्यांचा बंगला दिसत होता. विजेच्या दिव्याच्या प्रकाशाने तो नुसता धुवून निघत होता.

अगदी सावकाश दरवाजा उघडून ते आत आले. लीलाताईच्या मैत्रिणी नुकत्याच येऊन गेल्या असाव्यात. कारण रामा गडी बालदीमध्ये कपबशा भरीत होता. लीलाताई त्या आरशासमोर उभी राहून केसांवरून हात फिरवीत होती. दीनानाथ जवळच एका खुर्चीवर बसला होता. कोण आले हे पाहण्यासाठी त्या दोघांनी माना वळवल्या, पण तात्यासाहेबांना पाहताच "ऊं! तात्या!" अशा आशयाचा आव त्यांच्या चेहऱ्यावर दिसला. "तात्या, आज आमचा कार्यक्रम असा सुंदर झाला!" लीलाताई म्हणाली; पण तात्यासाहेब काही बोलत नाहीत असे पाहून तिने कपाळावर एक आठी चढविली व रामाला तुटकपणाने ती म्हणाली, "रामा, दरवाजा लावून टाक."

"पण त्यांचा तो मोती यावयाचा असेल की अजून!" किंचित् उपहासाने दीनानाथ म्हणाला.

"मोती होय? मोती..." तात्यासाहेब सांगण्याचा प्रयत्न करू लागले, पण त्यांना शब्दच सुचेनात. शब्दासाठी चाचपडत ते थोडा वेळ स्तब्ध राहिले.

जांभई देत लीलाताई उठली. "लागले रे नेत्र पैलतीरी" असे गुणगुणत सुधा तिच्या मागोमाग गेली. "रामा, दुसऱ्या शोला गाडी तयार ठेव म्हणावं शोफरला." अंगातील कोट काढीत आपल्या खोलीकडे जाता जाता दीनानाथ म्हणाला.

रामा गडी व स्वत: तात्यासाहेब यांखेरीज दिवाणखान्यात कोणी राहिले नाही. कपबशा बालदीत टाकताना त्या एकमेकांवर आपटीत व त्याचा विचित्र आवाज होई. तात्यासाहेब खिडकीबाहेर पाहात होते. बाहेर उदास चांदणे पसरले होते. जणू भुते चालत गेल्यामुळे त्यांच्या उमटलेल्या पावलांप्रमाणे झाडांच्या सावल्या वेड्याविद्र्या दिसत होत्या. काळ्याभोर डोळ्यांमधून अश्रू ठिबकावे त्याप्रमाणे खिडकीसमोरील आंब्याच्या दाट पानांमधून, पलीकडील एकदोन तारे मधून मधून दिसत. अखेर तात्यासाहेबांनी मन घट्ट केले व ते रामाला घोगऱ्या आवाजात म्हणाले, "रामा, मोती मोटरखाली सापडला!"

"कटकट गेली. रोज धुण्याचा त्रास वाचला." रामा स्वतःशी म्हणाला. पण उघडपणे त्याने काही म्हटले नाही. शेवटच्या दोन बशा त्याने बादलीत घातल्या व तो बादली हेलकावीत निघून गेला.

दिवाणखान्यात दुसरे कुणी राहिले नाही.

ज्यांचा त्यांना नेहमी अभिमान वाटावयाचा त्या खुर्च्या, टेबले वगैरे वस्तू त्यांना डोळ्यासमोरही नकोशा वाटू लागल्या. मोतीविषयी बाकीच्यांना आपल्यासारखे वाटत असेल ही त्यांची कल्पना फोल ठरली.

अस्थिरपणे जिन्याच्या पायऱ्या चढताना त्यांच्या डोळ्यासमोर मोतीचे चित्र उभारले. आपण जात असता आपल्यामागे उड्या मारीत मोती पुन्हा कधीही येणार नाही याची त्यांना तीव्र जाणीव झाली, व या अफाट जगात त्यांना अगदी एकटं एकटं वाटू लागले!

# जुना कोट

– आणि घरी आलो तो विजयानंदातच!

जवळ जवळ सात रुपयांचा कोट अवघ्या अडीच रुपयांत!

त्याचे असे झाले!

शनिवारी दुपारी आठवड्याच्या परीक्षेचे पेपर तपासावयास बसलो होतो मी. आज एवढे पेपर तपासून फेकून दिले की उद्या "सुखाचा शोध" "मॅटिनी." मी मनोराज्य करीत पहिला पेपर उघडला तोच आठवण झाली की, निळी तांबडी शिसपेन कोटातच राहिली! पुन्हा चरफडत उठून शिसपेन्सिल आणिली आणि काय –? तांबडे टोकच मोडून गेले होते. मी रागारागाने पेपरचा गठ्ठा कपाटावर फेकून दिला आणि नंतर काय करावे असा विचार करू लागलो तोच मनोहर आत शिरला.

"काय शिष्ट, स्वस्थ बसला! येणार काय बाजारात –"

"आता उन्हाचं नाही बुवा..."

"आइस्क्रीम देतो, चल रे..."

अगदीच नाइलाजाने मी त्याच्याबरोबर जाण्यास तयार झालो. मी हँगरवरचा सुताडी कोट घेतला.

"असला काय जाडाभरडा कोट घालता? लोकरीचा एक कोट करून घ्या ना!" शीला मला म्हणे.

"आत्ताच काय जरूरी आहे? आणि उगाच कपड्यात काय पैसा घालायचा?" मी तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करी. रोज मी शाळेतून आलो म्हणजे शीला मला विचारी, "कोट शिवायला टाकलात का?" आणि मीही रोज सांगे, "सध्या नको. आणखी कधीतरी."

"कधी येतंय कोणास ठाऊक ते कधीतरी." किंचित् रागाने म्हणून हिरमुसल्या चेहऱ्याने ती आत निघून जाई. मला का चांगले कपडे वापरायला नको होते, पण –

"चल ना रे..." मनोहर पायरीवर उभा राहून मला हाक मारीत होता.

मी कोट घातला व त्याच्याबरोबर निघालो. आम्ही मुलींच्या शाळेजवळ आलो आणि मग लक्षात आले की, आज शनिवार – बेळगावचा बाजार!

मी माझे फाउंटन बाहेरच्या खिशातून काढून आतल्या खिशात ठेवले व कोटाची बटणे व्यवस्थित लावली.

"चल रे, आज कपडे पुष्कळ आल्यासारखे दिसतात मोडक्या बाजारात...." मनोहर माझा हात धरून मला ओढीत म्हणाला.

खुर्च्या, टेबले, दिवे, पुस्तके यांचा खच पडला होता नुसता. एक गलेलठ्ठ मुसलमान पायरीवर ऐटीत बसला होता व तितक्याच बेफिकीरपणाने मालाच्या किंमती सांगत होता. आम्ही वळसा घालून त्याच्या जवळ गेलो आणि सांगितले की, आम्हाला कपडे पाहावयाचे आहेत.

नंतर त्याने एक खूप मोठी पत्र्याची पेटी उघडली व तिच्यातील दोन कोट हातात दिले माझ्या. त्यांतील एक मला अतिशय आवडला. लाल रंगाचा मऊ मऊ लोकरीचा होता तो. स्वस्तात मिळाला तर टाकावा घेऊन व दाखवावा शीलाला म्हणून मी विचारले, "साब, इसका क्या किंमत ?"

"खाली सात रुपिया. सब नवीन है साब..."

मी निराशेने परतलो. सात रुपये ? एक महिन्याचे घरभाडे होईल.

"देने का ?" तरी मला अजून आशा होती.

"छे रुपये, कम नही..."

आम्ही जरा पुढे गेल्यावर त्याने आम्हास बोलावले.

"तुम क्या देंगा ?"

"दो रुपिया." मी पाकीट चाचपीत म्हणालो.

"बहुत कम होती साब. अडीच रुपया दो" मीही ओळखले की, जास्त ताणून धरण्यात अर्थ नाही. मुकाट्याने त्याच्या हातावर अडीच रुपये ठेवले व आइस्क्रीमसाठी न थांबता घरी आलो.

सोप्यातच शीला हातरुमाल विणत बसली होती. मी दाणदाण पाय टाकीतच घरी शिरलो. त्यावरूनच ओळखले असावे तिने, आज काही तरी विशेष आहे. मी हातातला कोट टेबलावरच ठेवला व तिच्याकडे लक्ष न देता 'हुश्श' म्हणून हातरुमालाने तोंड पुसू लागलो.

शीला माझ्या बाजूला आली व कागदात काय आहे हे दाबून पाहू लागली.

"चूप ! हात लावायचा नाही त्याला..."

"काय आहे त्यात ?"

"चांगलं जरीचं पातळ आहे तुझ्याकरिता. बरं, चहा कर दोन कप." मी म्हणालो.

"इश्य, कोट करून घ्या म्हणतानं मला पातळ कशाला आणलंत ! बरं, आता चहा घ्यायची वेळ नव्हे..."

"लग्न करायला वय आणि चहा प्यायला वेळ लागत नाही..." मी कोठेतरी वाचलेले दडपून दिले.

"मामंजींनी लिंबे पाठविली आहेत. सरबत करते..."

"मामंजींनी ?"

"होय. तो तात्या आला होता बाजाराला. त्याच्याकडून पाठविली..."

आश्चर्य वाटले मला! अण्णांनी पाठविली लिंबे? शक्यच नाही ते. माझ्या लग्नात ते किती रागावले! खेडेगावातली एक अशिक्षित मुलगी पाहिली होती त्यांनी माझ्याकरिता.

"शहरच्या मुलींच्या तोंडात मारते बघ." आई म्हणाली.

"हो हो. आपल्यापेक्षा शहाणे व स्वच्छ लोक या जगात आहेत." म्हणून रागाने मी सांगितले असेल. मी हट्टाने शीलाशी लग्न केले. आई समारंभात मुकाट्याने भाग घेत होती. पण आम्ही दोघे तिला नमस्कार करावयास गेलो तो –

"बाबू, किती स्वार्थी रे तू! सुखानं रहा झालं कोठेही." ती डोळ्यांत पाणी आणून म्हणाली.

मला अतिशय वाईट वाटले. आपण चूक तर केली नाही ना!

मी एकदा अतिशय आजारी पडलो. डॉक्टरला आणावयास तर आईजवळ पैसा नाही. तिच्याजवळ तर काय असणार? अवघे दोन तीन दागिने. माझी बाळलेणी व तिच्या तांदळ्या. अखेरीस तिने माझ्याकरिता – त्या बाळलेण्यांस हात न लावता त्या तांदळ्या विकल्या व डॉक्टरला आणले.

अण्णा जरा रागावलेच म्हणे तिच्यावर.

"बाबूपेक्षा तांदळ्या का जास्त आहेत?" ती म्हणाली.

– आणि आज मी तिला दुखविले!!

लग्नानंतर अण्णा माझ्याशी फारसे बोलत नसत. कधी काळी गेलो तर आईबरोबरच जरा बोले मी.

आणि अण्णांनी आज लिंबे पाठवावी!

"नमस्कार."

"नमस्कार" मी शिष्टाचार म्हणून नमस्कार केला. वास्तविक तो माणूस कोण हे मला माहीत नव्हते. डोक्यावर मळकी झालेली गांधी टोपी, अंगात एक ठिगळांचा कोट. त्याचे धोतर मात्र जरा स्वच्छ दिसत होते.

"कोण पाहिजे?" मी विचारले.

"तुम्हीच. तुम्हीच तो कोट विकत घेतला ना?"

मी आश्चर्यचकित झालो.

"तुम्ही तो कोट मला विकणार काय?"

अतिशय चमत्कार वाटला मला त्याचा. पहिले, तो सरळ येऊन घरात बसतो काय व कोट विकणार काय म्हणून विचारतो काय! दुसरे म्हणजे या दरिद्री माणसाला करायचा काय हा कोट घेऊन?

"छे, छे. मी विकण्याकरिता घेतला नाही तो."

हिरमुसला झाला त्याचा चेहरा. पण तो जाग्यावरून उठलाच नाही. जणू काही तो कोट घेऊन जाण्याच्या निश्चयाने आला होता.

"मला कशाला तो कोट पाहिजे हे सांगतो. ते ऐकूनही जर तुम्ही न द्याल तर दुर्दैव माझे." तो जरा विचार करू लागला. अखेरीस तो म्हणाला,

"मी एका मराठी शाळेत बारा रुपयांवर मास्तर आहे – नव्हे, होतो! घरी मी व माझी बायको. पण बारा रुपयांत कसे चालणार दोघांचे? पाच रुपये आधी भाड्यासच जात. मला बायको मात्र रत्नासारखी मिळाली. मी जेवल्यानंतर – तेही पोटभर जेवलो की नाही हे पाहून – आपण जेवायची. कधी पुरेसे उरे, कधी तेही नाही. अन्न थोडे व काम फार यामुळे ती जरा अशक्तच झाली.

मी एक दिवस तिला म्हटले, "तू आताशा वाळत चाल्लीस."

ती हसून म्हणाली, "आपली माणसं नेहमीच आजारी दिसतात. बघा मला काय झालंय?"

एक दिवस आमचे हेडमास्तर आमच्या घरावरून चालले होते. मी तिला हाक मारली व म्हटले, "हेच बघ आमचे मास्तर."

"त्यांचा कोट किती लाल लाल आहे. तुम्ही एक घ्या तसला करून."

ती रोज विचारी मला. मी निरनिराळ्या अडचणी सांगे. पण पुन्हा ती दुसरे दिवशी माझ्या हाताकडे आशेने पाही व लगेच निराश होई. मी तिची पुष्कळ समजूत घातली. हेडमास्तरांसारखं वागून कसं चालेल आपणांस वगैरे, पण अंहं.

एक दिवस माझ्या हातावर तिने दहा रुपये ठेवले.

"दादाकडून आले आहेत. कोट करा आता त्याचा."

मला वाटले टाकावा एकदा करून. बिचारी कधी दागिन्यासाठी हट्ट धरते का? एकच तेवढा हट्ट आणि तोही माझ्याकरिता!

पण घरची परिस्थिती? घरीच खर्चले तर दोघांना खावयाला होईल.

"शपथ आहे माझी! हे पैसे आले नसते तर घरी काय खर्चला असता?" ती रागावल्यासारखे करून म्हणाली.

तीन चार दिवसांत तयार झाला माझा कोट. इस्त्री वगैरे करून शिंप्याने कागदात गुंडाळून ठेवला होता. मी ऐटीत काखेत घेऊन घरी येत होतो. हाताला मऊ मऊ स्पर्श

झाला म्हणजे मजा वाटे. मी घरी गेल्यावर हा कोट घालून तिच्यासमोर उभा राहणार. मग ती आनंदाने हसणार. मी नकशीदार अक्षरांत लिहिलेलं नाव तिला दाखविणार. मग ती अडखळत वाचेल, "शा-न्ता-रा-म..." आपण आपल्या नवऱ्याचेच नाव वाचीत आहो हे पाहून ती लाजेने चूर होईल, पण –

आपण मानव का परमेश्वर आहो? परमेश्वराने 'होवो' म्हणताच सृष्टी उत्पन्न झाली, पण आपल्या इच्छा –?

मी येत होतो तोच मला कोणीतरी हाक मारली. डॉक्टरीणबाई होत्या त्या.

"अरे शांता, गेल्या रविवारी तुझी बायको ते सोन्याचे फूल विकावयास आली होती..."

सोन्याचे फूल? मी खूप आठवण केली तो लक्षात आले, तिच्या आईने मरताना तिला आठवण म्हणून दिलेले एक जुन्या तऱ्हेचे फूल होते!

"त्या वेळी ते म्हणत होते, तिला क्षय झाला आहे. लवकरच काळजी घे बुवा..."

डॉक्टरीणबाईंनी आपुल्कीने सांगितलेले शब्द, पण केवढा कल्लोळ उडविला त्यांनी. क्षय! क्षय!! क्षय!!!

मी घरी आलो. अंथरुणावर ती खोकत निजली होती. मी एका वैद्याला बोलावून आणण्यास निघालो.

"घाला ना तो कोट..." डोळे किलकिले करीत ती म्हणाली.

मी कसाबसा कोट चढविला. काळवंडून आलेल्या आकाशातून विजेची एक क्षणभरच चमक दिसली. ती म्हणाली,

"किती छान दिसता हो तुम्ही..." तिला खोकल्याची उबळ आली आणि तेच तिचे शेवटचे शब्द! नंतर पंधरा दिवसांनी ती मला सोडून गेली. शेवटपर्यंत तिला बोलायची ताकद नव्हती. मी हेडमास्तरांकडे तो कोट गहाण ठेवून तीन रुपये आणले फळफळावळास –

काल मी तो कोट बाजारात पाहिला. पण पैसे कोठे झाडास का लागतात! गोळा होईतोपर्यंत तुम्ही घेतला..."

त्याने सांगितलेल्या ठिकाणी मी पाहिले. सुबक अक्षरांत लिहिले होते,

"शांताराम देसाई"

मी मुकाट्याने अडीच रुपये घेतले, व तो कोट – कोट कसला, राणीने राजाच्या सुखाकरिता बांधलेला प्रेमाचा ताजमहालच तो – त्याच्या हवाली केला.

"इश्श, किती वेळ बसला तो." शीला एका हातात सरबताचा कप व दुसऱ्या हातात लिंबाच्या साली व एक चिठोरा घेऊन बाहेर आली.

"लिंबाच्या करंडीत चिठ्ठी आहे बघा एक."

चिठ्ठी लहानच होती.

"बाळ, तुझ्या आईच्या सांगण्यावरून करंडी पाठवीत आहे. कोठेही रहा, पण सून-मुलगा सुखी असू देत असे म्हणते ती. सोबतचे कुंकू चि. सूनबाईकरता पाठवीत आहे."

अण्णा

मला वाटले, बायका म्हणजे किल्ला. शत्रूचे गोळे अंगावर घेऊन आपल्या सुखाचा त्याग करून आतील लोकांचे रक्षण करतील. किंवा त्यांना दिवा म्हणणे जास्त शोभेल. आपण ज्या जागी उभारतो तेथे अंधार करून आपल्या त्यागाने दुसऱ्याचे जीवित प्रकाशमान करतील.

मी बाहेर पाहिले!

लिंबाच्या साली उन्हात चमकत होत्या. जणो म्हणत होत्या,

"बाबारे, जीवनसर्वस्व त्यागात आहे, स्वार्थात नव्हे."

शीला आरशात पाहून कुंकू लावून घेत होती!!

# धीरे गाडी हाक रे ऽऽ

वसंतने आळस "झाडून" टाकला व काही तरी करमणूक म्हणून फोनोग्राफ पुढे ओढला. बऱ्याच रेकॉर्डस उलथ्यापालथ्या करून त्याने अखेरीस एक पसंत केली. थोड्याच वेळात गाणे चालू झाले.

"धीरे गाडी हाक रे ऽऽ ..."

तोच रस्त्यावर कोणी तरी ओरडत असल्यासारखे त्याला वाटले म्हणून त्याने खिडकीतून खाली वाकून पाहिले.

एक सारवट गाडी चालली होती. गाडीवाला आपल्या मागून येणाऱ्या एका सहा-सात वर्षांच्या मुलाबरोबर खेळत होता.

"बाबा, मी येणार स्टेशनकडे..." तो मुलगा मध्येच ओरडे.

"चल, जातोस की नाही परत? नाही तर बघ." म्हणत गाडीवानाने आपल्या हातातील चाबूक हवेत हालविला. पण तो मुलगा अशाने थोडाच ऐकणार? म्हणून गाडीवानाने खाली "पेटी"वरून उतरण्याचा अभिनय केला. या उपायाने मात्र तो मुलगा थबकला. मागे गेलाच नाही, पण बाबाची धमकी खोटीच आहे असे दिसताच तो पुनः मागे लागला. अखेरीस गाडीवानच हरला. त्याने आपल्या मळक्या, कोपरे शिवलेल्या खिशातून एक तांबडा जॉर्ज त्या मुलाकडे फेकला.

"जा आता वापस. सांजचं येऊ नको हं..." तो म्हणाला. पण त्याच्या आवाजातला पूर्वीचा कठोरपणा आता दिसत नव्हता. त्याची जागा वात्सल्याने घेतली होती.

त्या मुलाने, जणू आपल्या हक्काचाच आहे, अशा आविर्भावाने तो पैसा उचलला व घराकडे धूम ठोकली. त्याच्या डोळ्यांत अजून अश्रू दिसत होते; पण तोंडावर विजयानंदाचे हास्य होते. जणू ऊनपावसाचा खेळच!

आणि हाच प्रकार साधारणपणे दररोज व्हावयाचा. स्टेशनकडे जाण्याकरिता तातोबा निघाला, की विठू त्याच्या मागे लागे व आपली हक्काची खंडणी वसूल झाल्याखेरीज परतत नसे! अलीकडे तातोबाला पाचसहा वेळा तरी स्टेशनकडे जावे लागे व मिळणार फार तर दीडदोन रुपये – तेही " साहेब " गिऱ्हाईक मिळाले तर! आणि विठूकरिता दररोज दीडदोन आणे खर्च करण्यास तातोबाला कसे परवडणार! सारजा तर याविषयी वरचेवर

बोले! पण जणू काही झालेच नाही अशा बेफिकीरपणाने तातोबा विडीचा धूर सोडीत म्हणे ''जाऊ दे ग; अपनास का पाचपन्नास पोरं हायीत? खातोय बिचारा, खाऊ दे. –''

विठोबाच्या कृपेने झालेला एक मुलगा! सारजाही मग निमूट बसे. पुष्कळ वेळा तातोबा आपल्या विड्यांच्या खर्चात बचत करून आपल्या '' बजेट ''मध्ये मेळ राखी! त्यामुळे जरी पुष्कळ लहानसहान अडथळे आले, तरी विठूचा कार्यक्रम अव्याहत चालला होता!

अगदी रात्री बाराची गाडी असू दे, विठूला नेमक्या त्या वेळी जाग यायची; पण या वेळी त्याला पैसा द्यावा लागेच असे नाही. कारण गिऱ्हाईक असो अगर नसो, याच गाडीहून येताना तातोबा भजी, शेव, शंकरपाळी, – काही ना काही घेऊन यायचा. ती पुडी आपल्या अंथरुणात – अंथरायला एक जाजम व पांघरायला एक कांबळे – आपल्या टोपीत ठेवून खात खात विठूची स्वारी झोपी जायची! या बाराच्या गाडीनंतर मात्र, परसातल्या नाल्याचा आवाज कितीही मोठा होवो, किंवा वारा कितीही जोरात वाहो, विठूची झोपमोड व्हावयाची नाही! कित्येक वेळी या गाडीहून यायला जर तातोबाला उशीर झाला, तर विठू अंधारातच जरा पुढे जाऊन वाट पाहात उभा राही. नेहमीचे बैलांना म्हटलेले ''चल ढवळ्या, गड्या'' शब्द किंवा गाडीचे ते एका बाजूस लाल असलेले दिवे त्याला दिसले, की तो उड्या मारीत परत दारात येऊन उभा राही!

एकदा तातोबा सहाच्या गाडीहून येऊन नुकताच बसला होता. आज रोजच्याप्रमाणे विठू दिसला नाही म्हणून तो त्याला शोधू लागला. विठू मोठमोठे हातवारे करून भाकरी करीत असलेल्या सारजेला काहीतरी सांगत होता. पण तातोबाला पाहताच विठू त्याच्याकडे उड्या मारीत आला.

''बाबा, आज मी ठेशनकडे आलो होतो.'' तो म्हणाला.

तातोबाला त्याची ती थट्टा फारच आवडली. तोही हसून म्हणाला,

''खरंच, सांग बघू काय बघितलंस?''

''खूप खूप लोक आले होते. आगीनगाडी ऊऽऽ अशी शिट्टी वाजवीत आली नव्हं का?''

विठू तोंडाने त्या शिट्टीची नक्कल करून दाखवीत म्हणाला.

''बरं पुढं?'' तातोबा त्याला जवळ ओढून म्हणाला.

''तिथं एक एक डोळ्याचा भजीवाला आहे. त्याच्याजवळ असली मोठी भजी होती.'' विठू हाताने आकार दाखवीत होता!

तातोबाला वाटले, ही सगळी थट्टा नव्हे. पोरगा खरोखरीच स्टेशनकडे गेला असला पाहिजे! कारण या भजीवाल्याविषयी त्याने विठूला कधीच काही सांगितले नव्हते.

"खरंच? कुणाबरोबर रे पोऱ्या?"

"खरं सांगू?" विठू अभिमानाने हसत म्हणाला,

"ते गाडीला आत चढायला असतंय ना? तेच्यावर उभारून –"

तातोबाला विठूच्या धाडसाचे भीतियुक्त कौतुक वाटले! त्याला आता समजले की दुपारी पोरे "गाडीवान गाडीवान छोकरा" म्हणून उगाच ओरडत नव्हती!

"सारजे –" तातोबाने बायकोला हाक मारली. सारजेने ताबडतोब ओळखले की आज काहीतरी विशेष आहे! कारण संस्थानात ज्याप्रमाणे एक पोषाख विशेष प्रसंगाखेरीज काढीत नाहीत, त्याप्रमाणे तातोबा तसल्याच प्रसंगाशिवाय तिला नावाने हाक मारीत नसे –!

"काय? आज आहे वाटतं कसली भानगड!"

"अग सांगतो, ऐक तर!" तातोबा म्हणाला, "आज त्यो पंढरपूरचा म्हाद्या भेटला होता. त्यास मी सांगितलं, पंधरा-वीस दिवसांत पंढरपूरला येतोय म्हणून; आपल्या विठ्याचा नवस फेडायचा आहे ना –"

"राहूनच गेलाय तो – " सारजा मान हलवीत म्हणाली. तिला आणखी काहीतरी विचारायचे होते. पण आत भाकरी करपल्याचा वास आला म्हणून ती आत निघून गेली. पंढरपूरला जाऊन येण्यास काय खर्च येईल या विचारात तातोबा गढून गेला.

अलीकडे तातोबाला एक नवीनच अडचण उत्पन्न झाली होती. तातोबाचे घर ज्या रांगेत होते, त्या घराच्या मागून एक नाला वाहात गावाबाहेर गेला होता. म्युनिसिपालिटीला काय दुर्बुद्धी झाली कोणाला ठाऊक! तिने नाल्याचा गल्लीच्या कोपऱ्यावरील भाग दुरुस्त करण्याचे ठरविले. आधीच तेथे गटारे येऊन मिळत असल्यामुळे तो भाग खोल होता व आता तर प्रवाह वळवून तेथे जास्त खणले होते! तो भाग वाहतुकीला बंद केल्यामुळे तातोबाला आपली सारवट दूरच्या एका रस्त्याने न्यावी लागू लागली व त्यामुळे साहजिकच त्याला त्रास होऊ लागला.

आज त्याची नेहमीची वेळ होऊन गेली तरी तातोबा आला नसल्याने सारजेला फारच काळजी वाटू लागली. विठू व ती दारातच वाट पाहात उभी होती. विठू तर गाडीच्या आवाजाकडे कान लावून उभा होता. पण सारखा एक तास बडबडत असलेल्या पावसाच्या आवाजात व पावसामुळे भरलेल्या नाल्याच्या ओरडण्यात तो आवाज ऐकू येणे शक्यच नव्हते! पण ज्या वेळी गाडीच दृष्टीच्या टप्प्यात आली, त्या वेळी सारजेचा जीव भांड्यात पडला. समाधानाचा एक सुस्कारा सोडून ती म्हणाली,

"आज लईसा उशीर?"

पण तातोबा काही बोलला नाही. अंगावरील पाणी झटकत तो विझत चाललेल्या शेगडीजवळ येऊन बसला, व उबेकरिता त्याने दोन्ही हात विस्तवावर धरले. आजची त्याची वागणूक जराशी विचित्र वाटली सारजेला. तिला एक शंका आली व बायकांच्या स्वभावाप्रमाणे तिने लगेच बोलूनही दाखविली.

"आज निशापानी झाल्यं वाटतं ?"

तातोबाने अपराध्याप्रमाणे सावकाश मान उचलली व तो म्हणाला,

"आज तो म्हाद्या परत जाणार होता. त्यानंच आग्रह केला ग..."

"बरं, निजा आता. थंडीवाऱ्यात नका जाऊ बाराच्या गाडीला..."

तातोबा निमूटपणे उठला व त्याने कांबळ्यावर अंग टाकले. तो निजला हे पाहून सारजेने विठूचे पांघरूण सारखे केले व तीही थोड्याच वेळात झोपी गेली. वारा भिरभिर वाहात होता.

रात्री कोणाच्या तरी हाकेने सारजा जागी झाली. दार उघडून पाहते तो एक मनुष्य – आवाजावरून नंतर तिने ओळखले की ते रावसाहेब होते – पाणकोट घालून अंगणात उभा होता.

"तातोबा नाही का ?" रावसाहेबांनी विचारले.

"हैत, पन गाडी जुंपणार नाहीत ते –" सारजाने उत्तर दिले.

"विचार तरी; माझं अतिशय जरूरीचं काम आहे. त्यालाच जरा बोलाव –"

तोच तातोबाही बाहेर आला व रावसाहेब म्हणताच लगबगीने पुढे झाला.

"खरंच, आज गाडी जुंपणार नव्हतो मी –"

"छे, छे –" रावसाहेब म्हणाले, "असं कसं होईल ? ही गाडी तर मला गाठलीच पाहिजे –"

तातोबा पुढे बोलला नाही ! प्रत्यक्ष रावसाहेब घरी आलेले. शिवाय पंढरपूरला जाताना लागणारे दहापाच कमीजास्त रुपये रावसाहेबच देणार नव्हते का ? अखेरीस सारजा हाताने नको म्हणून सांगत असताही तातोबाने गाडी जुंपली.

बाराच्या गाडीला तातोबा जाणार नाही म्हणून विठू निःशंकपणे झोपला होता; पण गाडीचा आवाज झाल्यावर तो उठून तातोबाकडे आला व म्हणाला, "बाबा, मी येणार स्टेशनाकडे –"

"रावसाहेब हैत; सावकाश ओरड." त्याला दटावीत तातोबाने घरात नेले. आज विठू हट्टालाच पेटला होता स्टेशनकडे जायला. भजी, शंकरपाळी दोन्ही आणण्याची लालूच दाखविली. पण अंऽहं ! अखेर तातोबा दण्डास्त्राचा उपयोग करणार होता, तोच बाहेरून रावसाहेब म्हणाले,

"अरे, लवकर चल. अवघी वीस मिनिटं आहेत –"

तातोबा विठूला तसाच सोडून लगबगीने पेटीवर बसला; पण रावसाहेबांकडे वळून म्हणाला,

"गाडी मिळणं कठीणच साहेब. जायलाच अर्धा तास लागतो –"

रावसाहेबांनी चमकून रेडियमच्या घड्याळाकडे पाहिले – अवघी अठरा मिनिटे!

"छे,छे! असं करून भागायचं नाही. मला ही गाडी गाठलीच पाहिजे. दुसरा रस्ता नाही का?"

तातोबा जरा विचारात पडला.

थोड्या वेळाने तो म्हणाला,

"आहे पूर्वीचाच रस्ता. पण अतिशय अरुंद. शिवाय पोलिस असतील तिथं –"

तातोबा जरा चाचरत म्हणाला.

"तुझ्यासारखा नेईल गाडी. पोलिसाविषयी काळजी करू नकोस. मी आहे."

रावसाहेब त्याला आश्वासन देत म्हणाले.

तातोबाने जरी गाडी हाकारली, तरी त्याच्या छातीत धाडधाड होत होते. असल्या भयंकर रात्री एवढ्या अरुंद जागेतून जायचे –

पण आता उशीर झाला होता. त्याने मार्गच सांगायला नको होता.

जसजसा गल्लीच्या कोपऱ्यावरील लाल दिवा जवळ येऊ लागला, तसतसे तातोबाच्या छातीत जास्त ठोके पडू लागले. एवढा कोपरा पार पडला तर –!

वारा अतिशय जोराने वाहात होता. त्याच्या जोडीला पाऊसही काम करीतच होता. तातोबाला वाटले, आपण कोपरा ओलांडला –

झक्क! एकदम वीज चमकली!

"गण्या ढवळ्या" तर घाबरून गेले या प्रकाराने. गाडी मागे मागे जाऊ लागली. रावसाहेबांना वाटले – आपण नाल्यात पडलो आहो –!! पण सुदैवाने तसे काही झाले नाही. तातोबाने खाली उडी मारून अत्यंत शिकस्तीने गाडी थांबविली व कपाळावरचे पाणी पुसले – गाडी जर एक फूट मागे गेली असती तर –!

पण या 'जर'नेच सर्व परिस्थिती बदलून टाकली होती!

"आज मरत होतो सुका – सुटलो." गाडी रस्त्यावर आल्यावर रावसाहेब म्हणाले. पण तातोबाचे तिकडे लक्षच नव्हते. तो एकदम मध्येच म्हणाला, "साहेब, तो मध्येच काडदिशी आवाज कसला झाला?"

"जाऊ दे रे. आपण सुटलो ना जिवानिशी? असेल एखादा दगड. चाकाला लागून पडला असेल पाण्यात –"

सुदैवाने रावसाहेब स्टेशनवर अगदी वेळेवर पोहोचले. त्यानी तातोबावर खूष होऊन त्याला एक अधेली बक्षीस दिली. आज घडलेला प्रसंग इतका रोमांचकारी होता, की तातोबा परत गिऱ्हाइकासाठी थांबलाच नाही! त्याने रागावून निजलेल्या विठूकरिता शेव, भजी व शंकरपाळी घेतल्या व तो परतला.

काय भलतेसलते होते की काय या भीतीने सारजा दरवाजातच उभी होती. पण तातोबाला पाहून तिला सुटका झाल्यासारखे वाटले. तातोबाने गाडी गाडीखान्यात ठेवली. बैलांच्या अंगावरले पाणी पुसून त्यांच्यापुढे गवत टाकून तातोबा घरात शिरला. घरात सर्व अंधार होता.

''अग, दिवा तरी लाव...'' तातोबा म्हणाला.

''कशास लाव, आता तेलबी संपलंय –'' सारजा!

''बरं जाऊ दे. विठूला उठव. भारी रागावलाय पोरगा.'' तातोबा आपल्या हातातील कड्या जमिनीवर ठेवीत म्हणाला.

''कशापायी उठविता थंडीवाऱ्यात? निजलाय बिचारा; खाईल म्हणे उद्या सकाळी'' लवकरच तेथे शांतता झाली! वारा भिरभिर वाहात होता. पण विठू? गाडीच्या मागे लपून बसून चाललेला विठू नाल्याच्या प्रवाहाबरोबर पुढे चालला होता!

वसंतने आळस ''झाडून'' टाकला व करमणूक म्हणून त्याने ग्रामोफोन पुढे ओढला. बऱ्याच रेकॉर्डस उलथ्यापालथ्या करून त्याने एक पसंत केली. थोड्याच वेळात गाणे चालू झाले.

''धीरे गाडी हाक रेऽऽ''

पण आज खाली रस्त्यावर गलबला नव्हता!

# मृत्युलेख

ठण – ठण –!

समोरच्या घरातून घड्याळाचे पाच ठोके ऐकू आले. जोसेफने हातातील काम थांबविले. बाहेर जाण्याकरिता त्याने अंगात कोट चढविला. बाहेर जाता जाता त्याने मागे फिरून पाहिले. कोपऱ्यात आठ नऊ वर्षांचा एक मुलगा डुलक्या घेत होता.

"ए, मी येईपर्यंत दुकानातून हलू नकोस, काय?" त्या पोरावर तो खेकसला.

तो पोरगा एकदम भानावर येऊन इकडे तिकडे किलकिल्या नजरेने पाहू लागला. पण तोपर्यंत जोसेफ दृष्टिआड झाला होता.

दररोज हाच कार्यक्रम असे जोसेफचा; पाच वाजले की तो बाहेर पडे. फिरत फिरत तो चर्चजवळून स्मशानभूमीकडे जाई. तेथे तो अर्धा तास – फार झाले तर पाऊणतास बसे व अगदी अंधार पडू लागला की तो घरी परते.

त्या स्मशानात त्याचे सर्वस्व होते! तेथे त्याच्या आईचे थडगे होते!!

आई म्हणताच प्रेमळ केविलवाणे डोळे असलेली एक कृश स्त्री त्याच्या डोळ्यांपुढे उभारत असे. हातपाय अगदी बारीक – त्यावरील शिरा अगदी उठून दिसायच्या. तोंडाची गालफडे बसली होती. पण ते पणतीच्या ज्योतीप्रमाणे शांत प्रेमळ डोळे –

जिकडे फिरतील तिकडे प्रेमाचा हात फिरवतील!

जोसेफचा बाप जेवढा दरिद्री होता तेवढाच व्यसनी होता. चांभाराच्या धंद्यात मिळून मिळून पैसा मिळणार किती – आणि तेही एका खेडेगावात? पण तेवढेही तो दारूमध्ये बुडवीत असे. जोसेफच्या आईला कितीतरी वेळा उपाशी राहावे लागे. कैक वेळा आदल्या दिवसाच्या शिळ्यापाक्यावरच झोपी जावे लागे. पण जोसेफला आपल्या दारिद्र्याची आच तिने भासू दिली नाही. जोसेफ तिचे सर्वस्व होता!

जोसेफ त्यावेळी नुकताच शाळेला जाऊ लागला होता. त्याला एका पुस्तकाची जरूर पडली. आपल्या बापाजवळ मागण्याचे तर त्यास धैर्यच नव्हते. त्याचे ते पिंजारलेले केस, तारवटल्यासारखे डोळे –

जोसेफ त्याच्याशी बोलायला घाबरायचा.

अखेर जोसेफच्या आईनेच बोलता बोलता हळूच गोष्ट काढली.

"मी सकाळी तुझ्याकडे पैसे मागितले तेव्हा दिलेस का? आपले पैसे ठेवते राखून आणि माझ्या मागे कटकट करतेस – थांब थांब –"

जोसेफचा बाप डोळे गरागर फिरवीत तिच्यावर धावून आला. येताना त्याने कोपऱ्यातील काठीही उचलली होती –

जोसेफने एकदम ओरडून डोळेच झाकून घेतले –

आणि ज्यावेळी उघडले त्यावेळी सर्व शांत होते. त्याची आई त्याच्या पाठीवरून हात फिरवीत बसली होती. तिचे डोळे रडून रडून सुजले होते. कपाळास एक खोक पडली होती व तीमधून रक्त ठिबकत होते!

"आई, आई..." जोसेफ तिला मिठी मारीत म्हणाला, "माझ्या पुस्तकाकरिता का ग हे? मला पुस्तक नको, मी शाळेला जात नाही..."

त्याच्या आईने त्यास कुरवाळीत म्हटले, "चल, वेडा कुठला! तू शिकून खूपखूप मोठा होणार... मग आम्ही सुखानं राहू हं... तुझ्याखेरीज मला कुणाचा आधार आहे?"

तिने त्याला जवळ घेतले व त्याचा एक मुका घेतला. तिच्या सुजलेल्या डोळ्यांतून दोन अश्रू जोसेफच्या गालावर पडले.

खरंच, किती उष्ण होते ते अश्रू –!

त्या आईचे थडगे होते ते!

जोसेफला दररोज आपल्या दुर्दैवी आईची आठवण येई. खूप, खूप, मनमोकळेपणाने रडावेसे वाटे – आपल्या आईच्या थडग्याजवळ बसून! पण मोठ्या माणसांनी रडता कामा नये!

रोजच्याप्रमाणे आजही जोसेफ फिरायला निघाला होता. बहुधा शांत निर्जन असलेले रस्ते आज पार बदलून गेलेले दिसत होते. तीन तीन चार चार जण मिळून कसली तरी चर्चा करीत होते. त्यांच्या चेहऱ्यावर भीती दिसत होती.

पण जोसेफने तिकडे लक्ष दिले नाही. त्यास कोणीही मित्र नव्हते. नसत्या उठाठेवी करण्याची त्यास सवय नव्हती. नेहमीप्रमाणे तो खाली मान घालून, पाठीमागे हात धरून चालला होता.

पण स्मशानभूमीमध्ये येऊन पाहतो तो काय? नेहमी विकाररहित असलेल्या त्याच्या चेहऱ्यावर दुःखमिश्रित आश्चर्याची एक छटा पसरून गेली.

खूपशा थडग्यांची नासधूस झाली होती. काल उभे असलेले क्रॉस आज जमिनीवर पडले होते. त्याच्या आईच्या थडग्याच्या जागी तर काहीच शिल्लक राहिले नव्हते. मृत्युलेख लिहिलेला दगड जवळच उमळून पडला होता. त्यावर नेहमीचे शब्द Here rests... जोसेफला स्पष्ट दिसले.

पाठीमागे एकदाही न पाहता जोसेफ घराकडे परतला. वाटेत त्याला स्मशानभूमि-रक्षक भेटला.

"काल मी गावात झोपायला गेलो होतो म्हणूनच वाचलो – एका शत्रूच्या विमानाने म्हणे काल जाता जाता एक बॉम्ब टाकला. तरी फारसे नुकसान झाले नाही. स्मशानावरच पडला –"

पण जोसेफ त्याचे बोलणे ऐकण्यास उभा होता कुठे? एव्हाना तो रस्त्याच्या वळणापर्यंत गेलाही होता. आपण एवढी महत्त्वाची बातमी सांगत आहे आणि हा काय असा वेड्यासारखा वागतो हेच त्या रक्षकाला समजेना!

ठण-ठण-ठण!!

समोरच्या घरातून घड्याळाचे पाच ठोके ऐकू आले. पण आज जोसेफने आपले काम थांबविले नाही!!

# भिकारडा

संजीव यायची वेळ टळून खूप उशीर झाला होता, तरी तो अजून कसा येत नाही हे पाहण्यासाठी आनंद वरचेवर बाहेर येत होता, व संजीव येत असलेला दिसला नाही, की तो निराशेने आत जात होता. या खेपेस मात्र त्याने तो येईपर्यंत उभा राहण्याचा निश्चय केला; पण तेरा-चवदा वर्षांच्या मुलाचा निश्चय तो कितीसा टिकाऊ असणार? कंटाळून तो पुन्हा आत जाणार होता; त्याच वेळी गल्लीच्या कोपऱ्यावरून संजीव येत असलेला त्याला दिसला.

शाळेत म्हणे जगाचा पहिलावहिला अनुभव मिळतो; पण कितीजण शाळेतून उल्हसित अंतःकरणाने बाहेर पडत असतील कोणास ठाऊक! शाळेतल्या डांबणुकीने संजीवचा जीव अगदी कातावून जाई; त्यानंतर महिना दीड रुपया देणारी तात्यासाहेबांच्या चिरंजिवांची शिकवणी! विद्यादानाचे काम कदाचित उदात्त असेल; पण सुखकारक मात्र खासच नाही.

संजीवने अंधारातच चाचपडत खुंटीला आपला कोट अडकविला व दिवा लावण्यासाठी तो काड्यांची पेटी शोधू लागला.

"काड्याची पेटी होय? त्या पुस्तकाच्या फळीवर आहे बघ." आनंदने माहिती पुरवली.

संजीवने काही न बोलता काड्याची पेटी घेतली व एक काडी ओढली. एकदम त्याच्या चेहऱ्यावर प्रकाश पडला. त्याच्या वयाच्या तरुणाच्या चेहऱ्यावर जो खेळकरपणा दिसला असता, त्याचा बिलकूल पत्ता नव्हता. झाडाच्या सावलीत वाढलेल्या झुडुपाप्रमाणे फिकट असलेल्या त्याच्या चेहऱ्यावर थोड्या सुरकुत्याही होत्या. आशानिराशा, सुखदुःख यांच्याबरोबर लढताना झालेल्या जखमाच जणू! "दादा, मला हा पोषाख छान दिसतो ना अगदी?" आपल्या पांढऱ्या स्वच्छ पोषाखाकडे पाहत आनंद म्हणाला.

त्यांच्या शाळेत रात्री नाटक होते म्हणून त्याने आपले इस्त्रीचे कपडे बाहेर काढले होते.

"वा, हे काय विचारतोस?" संजीव हसत म्हणाला, "तुला कोणताही पोषाख चांगला दिसणारच!"

कंदील वर अडकविताना त्याची नजर सहज वर आपल्या कोटाकडे गेली. तो अगदी उसवून गेला होता मानेवर. शिवाय धुवायला देऊनही निदान चार महिने होऊन गेले होते.

अंगात प्रत्येक वेळी चढविताना संजीवला वाटे, "त्या परटाचे बारा आणे द्यायचे आहेत, ते देऊन एकदा कोट भट्टीला दिलाच पाहिजे." पण असे तीन-चार महिने चालले होते!

"दादा, मी व गंगाधर उद्या सिनेमाला जाणार आहो. मला चार आणे देशील का?" आनंद लडिवाळपणाने म्हणाला.

संजीव काही बोलला नाही. बोलणार काय? तीन चार दिवसांपासून त्याच्या खिशात एक पैसाही नव्हता. आज सकाळीच एक सिंगल चहा घ्यावा म्हणून तो हॉटेलमध्ये शिरला होता. पण त्याला आपल्या खिशात एक पैसाही नाही याची आठवण झाली.

"आनंद, आणखी तीनचार दिवसांनी मी तुम्हांला हवं तर तिकीटसुद्धा काढून आणून देईन."

"तू मला नेहमीच असं करतोस." आनंद कडवटपणाने म्हणाला, "मास्तरांनी माझी दोन महिन्यांची फी उद्याच्या उद्या आणायला सांगितली आहे. ती तरी देतोस का पाहा."

आनंद खोलीबाहेर पडला. खोलीचे दार धाड्दिशी त्याने लावून घेतले.

आनंद गेल्यावर संजीव उगाच बसल्यासारखा दिसत होता. पण खरे म्हटले तर त्या पाच रुपयांची जोडणी कशी करावी याचा तो विचार करीत होता. शोफरचा एक तृतीयांश पगार यापेक्षा पाच रुपयांची जास्त किंमत नसेल एखाद्या लक्षाधीशाला; पण गरिबाला चढण्यास कठीण असा हिमालयच वाटतात ते!

संजीवचे वडील आधीच गरीब व त्यात प्रत्येक महिन्याला लॉटरीचे तिकीट काढण्याचा नाद लागलेला. आपणाला एकदम अतिशय मोठे बक्षीस लागेल या आशेने त्यांनी आजपर्यंत किती तरी रुपये घातले असतील! तेच रुपये त्यांनी वाचविले असते तर तेच एक मोठे बक्षीस झाले असते. पण – हा "पण" शब्द नसता तर आज किती तरी गोष्टी निराळ्या स्वरूपात दिसल्या असत्या.

आपल्या पत्नीचे सर्व दागिने गहाण पडूनही आपणास पाच रुपयांवर काही मिळाले नाही आणि शेजारच्या हरिपंतांना मात्र पहिल्याच सपाट्याला तीनशे वीस रुपये मिळाले हे पाहून त्यांना निराशेचा जबरदस्त धक्का बसला व त्या भरात त्यांनी आत्महत्या केली.

[वडिलांच्या आत्महत्येनंतर संजीवची आईही आजारी पडली. संजीवला जवळ बोलावून ती त्याला म्हणाली,] "मी आनंदाला तुझ्याजवळ ठेवून जाणार आहे; पण टाकू नकोस हं माझ्या बाळाला. [नुसते 'हो' म्हणू नको.] मला वचनच दे बघू!"

बोटांच्या जागी नुसती हाडे दिसणाऱ्या पिवळसर हातावर हात ठेवून संजीवने वचन दिले.

सात-आठ दिवसांनी रमाबाई या जगात नव्हत्या.

संजीवाच्या शिक्षणाला या अनपेक्षित घडामोडीने पूर्णविराम मिळाला. ज्ञानाच्या भुकेपेक्षाही पोटाची भूक तीव्र असल्यामुळे त्याला नोकरीचा आश्रय घ्यावा लागला. मराठी शाळेत एक वर्षाची तात्पुरती जागा त्याला मिळाली. काल परवा विद्यार्थी असलेला संजीव आज मास्तर झाला.

आपल्या तुटपुंज्या पगारात आनंदाला शक्यतो सुखी ठेवण्याचा तो प्रयत्न करी. आपल्याला जरी मळका कोट असला, तरी स्वच्छ नीटस पोषाखात आनंदास पाहून त्याला मनापासून आनंद होई. 'Happy in some dear person's happiness' की कायसे म्हणतात ना, ते संजीवला पूर्ण लागू पडले असते!

धप्पदिशी कसलासा आवाज झाला. शेजारच्या मंडळींचे मांजर खिडकीतून बाहेर जात असता, फळीवरील आनंदाची काही पुस्तके खाली पडली होती.

संजीव भानावर आला. आपणास पाच रुपयांची व्यवस्था करावयाची आहे, याची त्याला आठवण झाली. त्याने दिवा बारीक केला व खोलीला कुलूप लावून तो विमनस्कपणाने बाहेर पडला.

जाऊन जाऊन जाणार कोठे? त्या तात्यासाहेबांकडे. त्याचे तीन रुपये द्यावयाचे होते. त्याने तात्यासाहेबांच्या घराचा रस्ता धरला.

तात्या त्या वेळी सोप्यावरच उभे होते. त्यांच्या घरची मंडळीही जरा गडबडीत दिसत होती. संजीवला पाहून त्यांच्या कपाळावर एक आठी चढली.

"काय मास्तर?"

"नाही – आपल्याकडेच आलो होतो; जरा पैशाची गरज होती –" संजीव चाचरत म्हणाला.

"अहो, मघाशीच सांगितलं ना पंधरा दिवसांनी देतो म्हणून? माझ्याजवळ का पैशाचं झाड आहे? ही मंडळी आता सिनेमाला जाणार, धस्सदिशी पाच सहा रुपये गेले." तात्या माजघराकडे पाहात कौतुकाने म्हणाले.

"पैशाची भारीच जरुरी होती –" उसने धैर्य आणून संजीव म्हणाला.

"किती उर्मट आहात हो तुम्ही! तीन रुपड्यांसाठी एवढं करता, हजार पाचशे असते, तर काय केलं असतंत कोणाला ठाऊक!" तिरस्काराने म्हणत तात्या आत निघून गेले.

संजीवला असल्या अपमानाची सवयच होऊन गेली होती. दगडावर पडणाऱ्या टाकीच्या घावाप्रमाणे अपमान, अपयश, मनुष्याची सुबक मूर्ती करीत असते म्हणे! पण टाकीचे घाव सोसणारा दगड दगड असतो, व अपमानाने जळणारा मनुष्य मनुष्य असतो, हे विसरतात खूप जण!

संजीवचा दुसरा आधार नवीन आलेला मास्तर – दामले! त्याच्याजवळ पैसे असले तरी तो देईल का? याचा विचार करीतच संजीव त्यांच्या घराकडे चालला. पण जरा पुढे जाताच त्याला शाळेचा गडी गोविंदा भेटला. "काय मास्तर, या येळचं कुठं?" गोविंदा म्हणाला. "तीनचार दिवस तुमास्नी लई काम पडणार बघा."

"काय झालं रे?" संजीवने आश्चर्याने विचारले.

"ते दामले मास्तर, ते मघाच गावाला गेले. मीच त्यांची वळकटी ठेसनवर नेली नव्हं का? त्यांचं काम बी तुमास्नीच बघावं लागणार."

संजीव थोडा वेळ गप्पच उभा राहिला. त्याचा दुसरा आधारही तुटला. तोच त्याच्या मनात एक कल्पना येऊन गेली.

"बरं, गोविंदा, तूच मला पाच रुपये उसने दे बघू. मी तुला उद्या देईन..." गोविंदा तर हसूच लागला. "मला दहाबारा रुपड्या मिळणार त्या काय! काय गरिबाची चेष्टा करत्यासा! आपल्यासारक्यांनी असं म्हटलं, तर आमच्यासारक्या भिकारड्यांनी काय करायचं..."

अखेरीस खूप वादविवाद करून संजीवने त्याच्याजवळचे सर्व पैसे – दोन रुपये होते ते – मागून घेतले. आणखी तीन रुपये मिळावयास पाहिजेत; पण भूक अतिशयच लागल्यामुळे संजीव खोलीकडे परतला.

आनंद दाराकडे पाठ करून दिव्यापाशी कायसे वाचीत बसला होता.

संजीव हळूच आत गेला व कोट त्याने खुंटीला अडकविला.

"आनंद –"

"कोण, दादा! घाबरलो ना मी!" आनंद म्हणाला, "आज नाटक रद्द झालं. नंतर मी व गंगाधर मिळून खानावळीत गेलो. तू येणार नाहीस म्हणून सांगताच जोश्यांनी गंगाधरास वाढावयास सांगितले. तुला भूक आहे का?"

"छे, आज मी जेवायला जाणारच नाही म्हणून सांगणार होतो मी. बरं जाऊ दे ते. आज मला दोनच रुपये मिळाले, तेवढेच मास्तरांना नेऊन दे. बाकीचे दोन-तीन दिवसांत देतो म्हणून सांग. ऐकतील ना तुझं मास्तर?"

आनंदाच्या चेहऱ्यावर तिरस्कार दिसला. हातातील दोन रुपये त्याने संजीवकडे फेकून दिले.

"असे एक-दोन रुपये दिले तर माझे मित्र मला हसतात. मास्तरदेखील भिकारडा म्हणायचे; पाच रुपयेदेखील तुला मिळाले नाहीत –"

संजीवने ते दोन रुपये उचलले. कोट घालून तो जड हृदयाने वाढत्या अंधारात निघून गेला. जाताना टपदिशी दोन अश्रू उंबऱ्यावर पडले – भिकारडा –!

आनंदही गाणे गुणगुणत पुन्हा पुस्तकाची पाने चाळू लागला –

"प्रेम लाभे प्रेमळाला। त्याग त्याची हीऽऽ कसोटी –"

# दोन चांदण्या

"हं, चल, आटप ना आता. पावणेअकरा होऊन गेले ना?" मनोहर स्वयंपाकघरात येऊन नीरेला म्हणाला, "हेडमास्तर चांगले असले म्हणजे उगाच का फाजील फायदा घ्यायचा?"

"कोण म्हणतं फाजील फायदा घ्या म्हणून? माझ्याकडून सर्व स्वयंपाकाची तयारी आहे. तुम्हीच मघापासून त्या पुस्तकात डोकं खुपसून बसला होता..." नीरा हसत म्हणाली.

मनोहर पाटावर जेवायला येऊन बसला.

"आज स्वयंपाक कसा काय झाला आहे?"

वास्तविक लॉजिकच्या प्रोफेसरांच्या कुंडलीच्या ज्ञानापेक्षा किंवा एखाद्या सिनेमा-नटाच्या शार्दूलविक्रीडित वृत्ताच्या ज्ञानापेक्षा मनोहरचे स्वयंपाकाविषयी ज्ञान जास्त नव्हते. अकरा वाजले की तो पानावर येऊन बसे व कसेबसे दोन घास खाल्ले की, संध्याकाळच्या जेवणापर्यंत त्याचे काम संपले.

– तरी पण नीरेने विचारले होते म्हणून तो म्हणाला, "मला वाटतं, या नवीन कोशिंबिरीत तिखट कमी पडलंय. अगदीच कोकणी लागतेय..."

"उद्या भाताची फोडणी कच्ची झाली म्हणूनदेखील सांगाल." नीरा हसत म्हणाली, "अहो, त्यात तिखट घालायचंच नसतं..."

"तरी पण त्या दिवशीसारखं काही जेवण लागत नाही..." मिस्किलपणाने मनोहर म्हणाला.

नीरा त्याच्याकडे पाहून हसली मात्र –

त्या दिवशी मनोहर घरी आला तो जरा संतापूनच. शाळेत त्याचा व हेडमास्तरचा जरा वादविवाद झाला होता. मनोहरला दुसऱ्याकडून बोलून घेणे बिलकूल खपत नव्हते; पण तो नोकर होता. त्याला जीभ असून उत्तर देता येत नव्हते. परक्या मनुष्याच्या घरी जाताना ज्याप्रमाणे वहाणा बाहेर ठेवून आत जावे लागते त्याप्रमाणे मानअपमान बाहेर ठेवून नोकरीत शिरावे लागते. बाहेर पडण्यास वाव न मिळालेला राग त्याच्यात धुमसत होता.

– आणि तो आला त्या वेळी घरास कुलूप होते. त्याचा राग वाढण्यास तेवढेच कारण पुरेसे होते. वाऱ्याने हलणारे कुलूप पाहून ते आपणास खिजवीतच आहेसे त्यास वाटले.

"ए वश्या, कोठे गेली आहे रे ही?" जवळच खेळत असलेल्या एका पोरास त्याने विचारले. पण तो खेळण्यात गुंग असल्यामुळे त्यास नीट ऐकू आले नाही.

"आँ?"

"टाळकं तुझं!" मनोहर म्हणाला.

"हां. नीरामावशी होय? शामच्या आईकडे गेली. थांबा, आत्ता बोलावून आणतो."

शामचे घर जवळच असल्यामुळे नीरा लौकरच आली. तिने तावडतोब ओळखले, आज काही तरी विशेष आहे.

दार उघडल्यावर मनोहर आत आला. त्याने कोट खुंटीला अडकवीत शांतपणे विचारले, "कुठे गेली होतीस?"

"शामच्या आईकडे... लक्ष्मीबाईंनी..." नीरा बिचकत म्हणाली.

"लाज नाही का वाटत सांगायला." मनोहरचा शांतपणा पार पळाला. तो संतापून म्हणाला, "म्हणे शामच्या आईकडे. आम्ही इथं तासन्‌तास तिष्ठत बसतो आणि ही जाते शामच्या घरी."

क्षुल्लक कारणासाठी कोणी उगाच ताडताड बोलू लागले म्हणजे बोलून घेणारी व्यक्तीही बेजबाबदार होते.

"कधी नाही ते गेल्यावर एवढं काय बोलायचं? मी का दररोज जाते?" नीरा म्हणाली. पण तिचा चेहरा सांगत होता की, अश्रूंना थांबविणे फारसे सोपे नाही.

"इंग्रजी शाळेत गेलेली बायको करून घेतली हाच माझा गाढवपणा झाला." नीरेला ऐकू जाईल अशा रीतीने पुटपुटत मनोहर आपल्या माडीवरल्या खोलीत गेला.

– तेथे टेबलावर एक पुस्तक अस्ताव्यस्त पडले होते. त्याची पाने वाऱ्याने फडफडत होती. त्याने ते पुस्तक उचलून पाहिले – "रिकामा देव्हारा." चार दिवसांपूर्वीच विकत घेतलेला 'रिकामा देव्हारा!'

खांडेकर म्हणजे मनोहरचे अत्यंत आवडते लेखक. 'लक्ष्मी बुक डेपो'मध्ये खांडेकरांचे कोणतेही नवीन पुस्तक आले की, बहुधा पहिले गिऱ्हाईक मनोहरचे! त्यांच्या पुस्तकांना आल्यागेल्यांना व प्रसंगी नीरेलाही तो हात लावू देत नसे.

'मोगरीच्या नाजुक फुलांप्रमाणे ती वापरली पाहिजेत.' हे त्याचे आवडते वाक्य! आणि 'रिकामा देव्हारा' वाऱ्यात फडफडत होता!

तो धाडधाड करीत जिना उतरून खाली आला. नीरा सोप्यावरच होती.

"तो "रिकामा देव्हारा" कोणी काढला शेल्फमधून? इसापनीतीतल्या गोष्टीपुढे मजल गेली नाही आणि "रिकामा देव्हारा" वाचतेय." मनोहर औपरोधिकपणे म्हणाला.

"हात लावत जाऊ नकोस माझ्या पुस्तकांना."

"तुमचा एकट्याचाच हक्क नाही त्यावर." नीरा हटवादीपणाने म्हणाली. "माझीही मालकी आहेच त्यावर." तिच्या डोळ्यांत पाणी जमले. पण तिचा स्वाभिमान दुखविला गेला होता.

"अस्सं काय ?" संतापाने मनोहर उद्गारला. त्याने अंगात कोट घातला व नीरेकडे एक तीव्र दृष्टिक्षेप करून तो बाहेर पडला.

"जेवायला झालंय की..."

"जेवत बस तूच एकटी." मनोहरने तिरस्काराने उत्तर दिले.

मनोहरने रीगलचे तिकीट काढले. त्यास कोठे तरी वेळ काढायचा होता. शिवाय बोलपटाची "विनोदी" म्हणून जाहिरात झाल्याने तेवढाच वेळ आनंदात जाईलसे त्यास वाटले. बोलपट पाहून त्यास खरोखरीच एकदा दोनदा हसू आले – पण हास्यास्पदतेमुळे!

आणि बोलपट संपल्यावर त्यास त्या शिक्षेतून सुटका झाल्यामुळे जरा समाधान वाटले. आळस झाडून टाकून तो चालू लागणार होता.

"काय मन्या, सिनेमाला आला होतास होय ?" कोणाचा तरी बेछूट आवाज ऐकू आला. दिनकर होता तो. पण दिनकरपेक्षा त्याच्याबरोबर असलेल्या तरुणीकडेच मनोहरचे लक्ष जास्त वेधले.

"अरे हो, इंट्रोड्यूस करायलाच विसरलो." दिनकर हसून म्हणाला, "मनोहर, ही माझी पत्नी सुजाता. आणि हा माझा मित्र मनोहर केळकर..."

मनोहरने नमस्कार केला –

त्याला वाटले, किती सुखी आहे दिनकर! –

नाही तर नीरा व आपण –

मनोहरास वाटले!

दूर असलेल्या गोष्टीविषयी मनुष्याला नेहमीच आकर्षण वाटते! चंद्राची एवढी स्तुती केली जाते, पण प्रत्यक्ष चंद्रावरच राहण्याचा प्रसंग आला तर! –

"काय रे मनोहर, आम्हाला आमंत्रण द्यायला विसरलास वाटतं ?"

"छे, छे विसरलो नाही" मनोहर गोंधळून म्हणाला, "हो – आमंत्रण दिलं असतं, पण सौभाग्यवतीच गावात नाही."

"अच्छा, आल्यावर विसरू नकोस – Good night." दिनकर निघून गेला.

मनोहरने एक निःश्वास सोडला व तो घरी परतला.

चुलीकडे तोंड करून नीरा बसली होती. पाटाखाली मनोहरचे ताट सरकविले होते. बाकी सर्व व्यवस्थित होते.

"बसली असेल स्वतःपुरती जेवून." मनोहरास वाटले. "स्त्रिया म्हणजे स्वार्थ."

मनोहर पलंगावर पडला खरा. पण त्याची नेहमीची वेळ होऊन गेली तरी झोप येईना. खरंच, किती विचित्र आहे! दुसरे काही करावयाचे नसते त्या वेळी मनुष्य विचार करतो!

हेडमास्तरवरचा राग आपण निष्कारण नीरेवर काढला. तिची काय बरे चूक होती? सहज गेली असेल शामच्या घरी किंवा कंटाळा आला म्हणून चाळण्यासाठी काढला असेल 'रिकामा देव्हारा' – छे, आपण उगाच बोलो तिला!

मनोहर बेचैन झाला. त्याने खोलीची खिडकी उघडली. गार वाऱ्याची झुळूक एकदम आत आली!

अखेरीस त्याचा एक निश्चय कायम झाला. तो दार उघडणार तोच – दार उघडले गेले. हातात कंदील व वाढलेले ताट घेऊन नीरा आत आली.

"मी जात नाही आजपासून. चूक झाली माझी." ती खाली पाहात म्हणाली, "तुम्ही जेवून घ्या आधी."

"अग, मी उगाच बोललो." मनोहर म्हणाला, "त्यात एवढे मनाला काय लावून घ्यायचं? माझा स्वभाव नाही का माहीत तुला? पण तू जेवलीस का?"

नीरा काही बोलली नाही. तिने उघड्या खिडकीतून बाहेर पाहिले. दोन चांदण्यांमधील अंतर कमी कमी होत त्या एका जागी येत आहेतसे तिला वाटले.

– त्या रात्री त्यांनी एकाच ताटात जेवण केले.

लायब्ररीच्या घड्याळालाही काय लहर आली कोणास ठाऊक! मोठ्या गंभीरपणाने त्याने आपले सर्वात जास्त बारा ठोके दिले.

(या कथेच्या शेवटच्या आठ-दहा ओळींचा मजकूर कागद फाटल्याने गेला आहे. तथापि त्याशिवायही कथा पूर्ण वाटते.)

# दया (अ) धर्माची दायी

''बाटल्या, जुनी पुस्तके, काय द्यायची आहेत...''

जोशी मास्तरांच्या दारात कोणीतरी ओरडले.

''काही नाही, काही नाही...''

पण तो मुसलमान काकऱ्या पुढे गेला नाही. पायऱ्या चढून तो सरळ सोप्यावर आला.

उघड्या पाठीवर थंड पाण्याचा थेंब पडताच मनुष्य जसा दचकतो त्याप्रमाणे मास्तर दचकले. पुस्तक मिटून आश्चर्याने त्यांनी वर पाहिले. ''मास्तरसाब, गरिबाची ओळख विसरलात?'' त्या म्हाताऱ्याने विचारले.

मास्तरांनी त्याच्याकडे निरखून पाहिले. मग मात्र त्यांना ओळख पटली. तो अबदुलच होता. आठनऊ वर्षांपूर्वी त्याच्या दाढीत पांढरे केस तुरळक दिसत, पण आता ती पांढरीशुभ्र होऊन गेली होती. याखेरीज त्याच्यात विशेष फरक पडला नव्हता. अव्यवस्थितपणे किंचित सैल बांधलेला रुमाल, सतत पानतंबाखू खाल्ल्याने तांबूस झालेले दात, सर्व अगदी जसेच्या तसे होते.

''अरे, तू अबदुल नाही का, ओळखलेच नाही हं तुला.'' हातातील पुस्तक जवळच्या टेबलावर फेकीत मास्तर म्हणाले, ''ठीक आहे ना तुझं? कसं काय चाललं आहे...''

''कसलं ठीक आणि काय, मास्तरसाब'' विडी पेटवीत खिन्नपणे हसून अबदुल म्हणाला. आत्यंतिक निराशेमुळे उत्पन्न झालेले हास्य होते ते.

''म्हातारपणीदेखील उन्हातान्हात पुस्तके गोळा करीत हिंडलं पाहिजे, नाहीतर पोट मारावे लागेल. महंमद एका लहान दुकानात नोकरीला राहिला आहे. पण सारा पैसा सिनेमात घालतोय. मी जे पैसे मिळवतो त्यावरच त्याचे जेवण. पोरगा साफ बिघडला बघा... एकच पोरगा आहे म्हणून स्वस्थ बसतो झालं... कसलं बरं आणि काय...''

पण मास्तरांचे लक्ष त्याच्या बोलण्यावरून साफ उडाले. त्यांना वाटू लागले, कोणीतरी आपल्या डोक्यावर घण मारून सांगत आहे, 'या साऱ्या परिस्थितीला तू जबाबदार आहेस.'

खरंच, किती विचित्र आहे! हजारांची सभा मनुष्य कौशल्याने जिंकेल, पण सद्विवेकबुद्धी नावाच्या चिमुरड्या पोरीला त्याला गप्प करता येत नाही.

अबदुलाला समोर पाहून त्यांना सात-आठ वर्षांपूर्वीची दृश्ये दिसू लागली.

मागे एकदा अबदुल मास्तरांकडे आला होता. त्यावेळी त्याच्याबरोबर महंमद होता. दहा बारा वर्षांचा असेल तो. डोक्याला मळकी टोपी, अंगात सदऱ्यावर आखूडसे जाकीट, व खाली आखूडशीच विजार. चेहऱ्यावरून मोठा तरतरीत दिसत होता.

"मास्तरसाव, शिकवणीला घालावं म्हणतो. पण फीचीच जरा गोष्ट आहे; गरीब आहे..." तो चाचरत म्हणाला.

महंमदाच्या वर्गातील चारसहा मुले मास्तरांकडे येतच होती, शिवाय महंमद चेहऱ्यावरून चलाख दिसत होता. तेव्हा मास्तरांनी फीविषयी विशेष घासाघीस केली नाही.

"आम्ही तरी कुठं श्रीमंत आहोत –" मास्तर हसून म्हणाले, "काय द्यायचे असेल ते दे,..."

महिना एक रुपया द्यायचे अबदुलने कबूल केले. दुसरे दिवसापासून महंमद नियमितपणे शिकवणीला येऊ लागला.

त्यावेळी अबदुलचे विडीपानपट्टीचे दुकान होते व त्याचा धंदाही त्या मानाने फारच चांगला चालला होता. आधीच महंमद एकुलता मुलगा; त्यात आणि म्हातारपणी झालेला, त्यामुळे महंमदावर अबदुलाचा भारीच जीव असे. आपल्या महंमदाने शिकावे, आपल्यापेक्षा चांगल्या स्थितीत तरी त्यास पुढे राहता यावे याकरिता त्याची सारखी धडपड असे. धर्म, देश बदलले तरी हृदय काही बदलत नाही !

त्या दिवशी रविवारच होता. मास्तरांनी शिकवणी आटपली व नेहमीच्या पद्धतीप्रमाणे वर्तमानपत्रे चाळण्यास ते समोरच्या तात्यासाहेबांच्या घरी गेले. प्रत्येकाला डोक्याप्रमाणे मतही असते व दोन मते एकत्र आली की वादविवाद व्हावयाचाच. पाऊणएक तासाने मास्तर परत आले तरी महंमद गेला नव्हता. तो व मास्तरांचा मुलगा मोहन मिळून एक पतंग करीत होते.

"दादा, मला पतंग करता येत नाही. म्हणून मी महंमदकडून करून घेत आहे." मास्तरांना मोहनने माहिती पुरविली.

सारा प्रकार मास्तरांच्या ताबडतोब लक्षात आला. गेले पाचसहा दिवस मोहन "मला पतंग करून द्या" म्हणून त्यांच्या मागे लागला होता. ही नाही ती सबब पुढे करून मास्तर त्याला वाटेला लावीत. कारण त्यांना तरी कुठे येत होता पतंग करायला ?

जवळच्याच वळकटीवर बसून मास्तर महंमदाचे हस्तकौशल्य पाहू लागले.

"मास्तर, उद्या मी शिकवणीला येत नाही. आमचा "ईद" आहे उद्या." महंमद म्हणाला.

"अस्सं, ईदच्या दिवशी मजा असते तुमची. खायला प्यायला खूप, नाटक – सिनेमा – काय रे, तू सिनेमाला जातोस की नाही ?"

"नाही. बाबा जातो कधी. पण मी अजून गेलो नाही –" महंमद म्हणाला.

"अजूनपर्यंत एकदाही गेला नाहीस?" आश्चर्याने मास्तरांनी विचारले. महंमदाने मान हलविली. त्याचे डोळे विलक्षण करुण दिसत होते.

"बरं, तुला रीगल टॉकीज माहीत आहे का? तू ये तेथे आज संध्याकाळी. तो मालक माझ्या ओळखीचा आहे. त्याला सांगेन तुला आत सोडायला –" थोड्या वेळाने मास्तर म्हणाले.

महंमदाचा चेहरा आनंदाने एकदम फुलला. कसाबसा त्याने पतंग पूर्ण केला व दप्तर घेऊन तो घरी पळाला.

मास्तर त्याच्याकडे सहानुभूतीने पाहात होते.

"बिचारा महंमद!" ते पुटपुटले.

संध्याकाळी मास्तर रीगलकडे आले. महंमद त्यांचीच वाट पाहात उभा होता. एक चुरमडलेली पण स्वच्छशी विजार त्याने घातली होती.

"मास्तर – बाबाला सांगणार नाही ना?" तो चाचरत म्हणाला. "छे छे, नको म्हणतोस तर कशाला सांगू?"हसून मास्तर म्हणाले.

मालक ओळखीचाच असल्यामुळे महंमदाला थर्डमध्ये तावडतोब प्रवेश मिळाला. एका गरीब जिवाला सुखी केल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडत होते.

तीनचार दिवसांनी अबदुल भेटायला आला त्यावेळी मास्तरांचे समाधान पार नाहीसे झाले.

"मास्तरसाब, आमच्या महंमदाला वाईट संगत लागली. त्याचा एक दोस्त आहे. गोपाळ म्हणून, तो सांगत होता महंमद सिनेमाला जातोय."

"मला खरं वाटलं नाही. त्याच्याजवळ पैसे येणार कोठून? पण मास्तरसाब, दुकानाच्या गल्ल्यातून, बिबीच्या पेटीतून तो पैसे चोरायला लागला आहे..."

मास्तर काही बोलले नाहीत!

अबदुल बाहेर पडला असेल नसेल तोच रडक्या चेहऱ्याने मोहन हातात अगदी चोळामोळा झालेला पतंग घेऊन मास्तरांपाशी आला.

"दादा, महंमदाने करून दिलेला पतंग फाटला."

पण मास्तर काही बोलत नाहीत हे पाहून तो बाहेर निघून गेला.

दुसरी विडी पेटविण्यासाठी अबदुलने खट्‌दिशी काडी ओढली व त्या आवाजाने मास्तर भानावर आले. समोर म्हातारा अबदुल बसला होता. त्याचे पाय धुळीने भरले होते.

अबदुल, मला माहीत नव्हतं तुझी परिस्थिती अशी झाली आहे म्हणून." मास्तरांनी कनवटीचे आठ आण्याचे एक नाणे अबदुलपुढे टाकले, "हे घे अबदुल..."

"नको, नको, मास्तरसाब, हे काय?" मान हलवून अबदुल म्हणाला. "तुम्ही आमचे मायबाप. आमचा पोरगा बिघडला ही गोष्ट सोडा, पण तुम्हीच त्याला शिकवलंत... तेच उपकार आहेत मास्तरसाब... बरं, जातो, ओळख ठेवा..." त्याने उंबऱ्यावर दाबून विडी विझविली व तो निघून गेला. थोड्या वेळाने पुन्हा ओरडणे ऐकू आले "काय जुनी पुस्तके, बाटल्या द्यायच्या आहेत..."

निबंध
३४८२
३६५८६
५/३/८२

# हल्लीच्या मुली

"अरे बाळू, येतोस की नाही चहा प्यायला? कप भरून किती तरी वेळ झाला –" स्वयंपाकघरातून चिडलेला आवाज पुन्हा ऐकू आला.

"थांब ग ताई, इतकी घाई का? अवघं एकच प्रकरण वाचायचं उरलं आहे..." एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर होत 'बाळ्या वदला.'

पांघरलेले धोतर अंगाला जास्तच लपेटून घेण्याचा त्याने प्रयत्न केला. पण त्याच्या अंगाचा परीघ धोतराच्या रुंदीच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे त्या प्रयत्नापासून विशेष काही निष्पन्न झाले नाही.

तोच मजकूर पुनः पुन्हा वाचण्यासाठी, वाचून झालेले पान त्याने उलटले. जणू प्रत्येक शब्दाचा अर्थ मनावर पूर्णपणे ठसवीत तो वाचू लागला, –

> "...बराच वेळ तेथे शांतता पसरली होती. शरच्चंद्र उघड्या खिडकीतून, बहरलेल्या मोगरीच्या कळ्यांकडे पाहात होता. सुहासिनी हळूहळू त्याच्या खुर्चीमागे येऊन उभी राहिली.
>
> "शरच्चंद्र..." ती म्हणाली. तिचा आवाज विलक्षण कंपायमान झाला होता.
>
> शरच्चंद्र आपल्या विचारातच गुंग झाला होता. समुद्राने ढगांच्या हातून जलधारांची प्रणयपत्रिका पृथ्वीला पाठविली, त्या हर्षाने पृथ्वीच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकले, व त्या अश्रूंच्या या चिमण्या मोगरीच्या कळ्या झाल्या असाव्यात असे त्याला वाटले. पण सुहासिनीच्या शब्दाने तो भानावर आला.
>
> "काय?" त्याने चमकून विचारले. त्याच्या चेहऱ्यावर अपेक्षेचा आनंद दिसला.
>
> "तुम्हाला एक प्रश्न विचारू का? रागावणार तर नाही ना?..." सुहासिनी चाचरत म्हणाली. तिचा चेहरा गोरामोरा झाला होता. श्वास जोरजोराने होऊ लागल्यामुळे तिचे उन्नत –"

बाळू जरा वेळ विश्रांतीसाठी थांबला. श्रीखंड झाले म्हणून काही अधाशासारखे एकदम खायचे नसते. त्याने ते पुस्तक छातीवर ठेवले व तो विचार करू लागला.

'अहाहा, मानवी स्वभावातील निरनिराळ्या तरल छटांचे काय मार्मिक आणि हळुवार चित्रण!...' डोळे मिटून बाळू स्वत:शीच उद्गारला.

''बाळ्या, ऊठ, झोपायची ही वेळ की काय? मला सांगतो पुस्तक वाचतो म्हणून, आणि इकडे खुशाल ताणून देतो...'' हातातील कप त्याच्या बाजूस ठेवीत त्याची ताई कडाडली.

कोणत्या वेळी मनुष्याला विचारतंद्रीतून जागे करायचे हे देखील हिंदू स्त्रियांना समजत नाही! हिंदू स्त्रियांचे शिक्षण किती 'निग्लेक्ट' केले गेले आहे याची जाणीव होऊन बाळूचा चेहरा एकदम उदास झाला. पण देवानेच त्याला जन्माला घालताना मुळी चूक केली होती. हवा भरलेल्या फुटबॉलसारख्या त्याच्या चेहऱ्यावर दुर्दैवाने दिसण्याजोगी एकही सुरकुती पडली नाही. पण आपले दु:ख दाखविण्यासाठी समजण्याजोगा एक नि:श्वास मात्र त्याने सोडला. आपल्या बहिणीच्या अरसिकतेची मनातल्या मनात (हो, करता काय? नाही तर संध्याकाळी जेवायला मिळाले नसते!) कीव करीत त्याने चहाचे घोट घेतले. इतक्यात त्याला त्या 'ख्यातनामा'च्या लेखनकौशल्याची एकदम आठवण झाली. तो मध्येच उद्गारला, –

'याचं नाव कौशल्य! मानवी स्वभावाचं मार्मिक चित्रण!'

कपबशी घेऊन जाण्याकरिता त्याची बहीण तेथेच उभी होती. समोरच्या भिंतीवर लावलेला बाळूचा लहानपणीचा फोटो पाहण्यात ती गुंग झाली होती. सध्याच्या व त्या वेळच्या बाळूची तुलना करून, बाळशाची जागा 'तरुण'शाने घेतली आहे, याखेरीज विशेष फरक नाही असा तिने निष्कर्ष काढला होता.

पण बाळूचे उद्गार ऐकून ती मागे वळून म्हणाली, ''काय, चहा चांगला झाला नाही? – तुम्ही कॉलेजची पोरं पन्नास ठिकाणी चहा पिता व घरच्या चहाला नावं ठेवता. तुला पाहिजे तर तुझा चहा निराळा करून घेत जा –''

परिस्थितीचा गंभीरपणा व त्याचे दूरवर होणारे परिणाम लक्षात घेऊन, गेल्या भाषणातील चूक दुसरे भाषण करून सुधारणाऱ्या परराष्ट्र मंत्र्याच्या थाटाने बाळू म्हणाला, – ''छे छे ताई, तुझा गैरसमज झाला आहे. मी म्हणत होतो... बरं बरं, मी काहीच म्हणत नव्हतो...''

ताईने विजयोत्साहाने त्याच्याकडे पाहिले व कपबशी घेऊन ती आत गेली. समाधानाचा नि:श्वास सोडून पुन्हा अंगाभोवती धोतर लपेटून घेण्याचा निष्फळ प्रयत्न करीत बाळू त्या कादंबरीचे रसग्रहण करू लागला.

...आणि तो ज्या वेळी जागा झाला त्या वेळी परसातल्या दिलरुबा टॉकीजमधील घंटा गळा दाबलेल्या बकऱ्याप्रमाणे ओरडत होती.

"ऑ ? साडेसहा वाजले –" पलंगावरून उडी मारीत (व त्या श्रमामुळे धापा टाकीत) बाळू उद्गारला. कपाटावरील तांब्यातील पाणी त्याने तोंडावर शिंपडले व तोंड पूर्णपणे ओले होण्याच्या आधीच धोतराच्या सोग्याने त्याने ते पुसून टाकले. इतका उशीर झाला हा जणू कोटाचाच दोष आहे अशा आविर्भावाने हॅंगरवरून त्याने कोट ओढला व वहाणात पाय ढकलीत तो बाहेर पडला.

बजरंगाचे घर वीस-पंचवीस घरे सोडून पलीकडे होते. घराजवळ येताच बाळूने पाय भराभर उचलले. (पण त्यामुळे गती मात्र वाढली नाही.) तो नेहमीच्या पद्धतीने सरळ सोप्यावर गेला व नेहमीप्रमाणेच त्याने हाक मारिली, – "बजरंऽऽग."

पण नेहमीप्रमाणे एक गोष्ट मात्र आज घडली नाही. नेहमीप्रमाणे हात चोळीत येऊन बजरंगाने त्याच्या पाठीवर सणसणीत थाप मारली नाही. शास्त्रशुद्ध म्हणून हट्टाने सांगितल्या जाणाऱ्या गायनाच्या आरडाओरडीनंतर शांता हुबळीकरचे मंजुळ भावगीत ऐकू यावे, त्याप्रमाणे त्याचे ओरडणे हवेत विरते न विरते तोच मंजुळ शब्द ऐकू आले, –

'बसा जरा, दादा आत्ता येईल..."

बाळूने आश्चर्याने पाहिले. एक सतरा अठरा वर्षांची मुलगी दारात उभी होती. वाङ्मयातील अठरा वर्षांच्या नायिकेप्रमाणे तिलाही पाच-सहा वर्षांचा एक धाकटा भाऊ होता व तो तिच्या बाजूलाच उभा होता.

आफ्रिकेमधील हार्टेटाट लोकांप्रमाणे आपण असंस्कृतपणे वागलो-ओरडलो, 'छेः अगदीच अन्मॅनर्ली,' अशी स्वतःची संभावना करीत बाळू बाजूच्या बाकावर बसला!

बजरंग येईपर्यंत बाळू त्या सोप्याचे निरीक्षण करू लागला. जिकडे तिकडे हिंदुस्थानातील सर्व नटींचे, रंगीत, ब्लॅक अँड व्हाईट फोटो लावले होते. बाळूने तेथील कॅलेंडरे मोजून पाहिली. (ती वीस भरली.) वर लोंबत असलेल्या विजेच्या दिव्याप्रमाणे हजारो दिवे एकदम लावले तर काय उजेड पडेल याचीही त्याने कल्पना केली. तरी बजरंग आला नाही. अखेरीस टेबलावर पडलेल्या तीनचार पुस्तकांपैकी एक उचलून बाळू चाळू लागला. त्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. तो जी कादंबरी वाचीत होता तीच बजरंगानेही कुठून तरी पैदा केली होती.

तोच त्याच्या पाठीवर सणसणीत थाप बसली व ती ख्यातनाम कादंबरी खाली पडली. ती उचलण्याचा प्रयत्न न करिता बाळूने विचारले, –

"अरे, पाहुणे आलेत की काय कोणी ? मग आमच्या शोचं कसं ?"

"शो राहिला थिएटरात!" हसून बजरंग म्हणाला, "आज माझी मामी गावाहून आली आहे. आणि संकटं कधी एकएकटी येतात का ? तिच्याबरोबर तिची दोन मुलंही आली आहेत –"

"मुलं? मग 'ती' कोण?" आपल्या पाव इंच केसांवरून हात फिरवीत बाळू विचार करू लागला.

आपल्या हिंदू लोकांना हीच घाणेरडी सवय. कोणत्याही गोष्टीची पूर्ण माहिती कधीच सांगावयाचे नाहीत. इंग्लंड-अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत –

"ही माझी मामेबहीण नलिनी!" बजरंग तेवढ्यात म्हणाला.

"ती" चहाचा ट्रे घेऊन आली होती. बजरंगाने एक कप बाळूला दिला व एक आपण घेतला.

"नले, मी सांगत होतो ना, तोच हा. बाळू नाव याचं –"

– असा राग आला बाळूला! आपल्या बारशा दिवशी आपल्या आईला एखादे गुळगुळीत नाव आठवू नये याचे त्याला आश्चर्य वाटले. सुहास, अभय, प्रकाश, शरच्चंद्र वगैरे नयनरम्य बागा सोडून बाळूसारखी पडजमीन आपल्या आईने निवडावी याला काय म्हणावे हेच त्याला समजेना. त्याने आपल्या ताईला एकदा विचारूनही पाहिले होते. तेव्हा ती म्हणाली होती :

'तुमचं एकेक ऐकावं ते थोडंच! उद्या म्हणाल, मुलींचीच नावं ठेवा आम्हाला. आमच्या आईनं हल्लीच्या लेखकांची पुस्तकं वाचली नव्हती काही.'

"बाळू नाव याचं." बजरंग सांगू लागला. "आता गेल्या खेपेसारखं त्या एक्स वायच्या क्विनाईनच्या गोळ्यांनी मला चिडवू नको. याला विचारत जा. यानं कॉलेजमध्ये मॅथॅमॅटिक्स घेतलं आहे."

बाळूने कॉलर ताठ करण्याचा निश्चय केला. पण त्याच्या लक्षात आले की, झोपताना चढविलेला नेहरू शर्टच घालून आपण बाहेर पडलो आहो!

त्याने समोरच्या आरशात पाहिले. बजरंग त्याला नेहमी म्हणायचा, "सात टेकड्यांवर वसलेल्या रोम शहराप्रमाणं तुझं नाक दोन गालांच्या टेकड्यांवर वसलं आहे –" पण आरशात पाहून 'आपण अगदीच काही हे नाही' अशी त्याने खात्री करून घेतली. नेहमीसारखा भांग असता तर काय बहार झाली असती! आजच 'क्लोज क्रॉप' करून घेण्याची का बुद्धी झाली, याबद्दल त्याने स्वतःस खूप शिव्या मोजल्या. तोंडावरून फिरविण्यासाठी त्याने हातरुमाल बाहेर काढला; पण अगदीच थर्ड क्लास वाटल्यामुळे त्याने तो दडपून टाकला!

तो ज्या वेळी भानावर आला त्या वेळी आपल्यासमोरील कपबशा रिकाम्या झालेल्या त्याला आढळल्या. पोटात काहीतरी गरम वाटत असल्यामुळे आपल्यापुढील चहा आपणच प्यालो याची त्याला खात्री वाटून, अजूनही या जगात थोडे प्रामाणिक लोक आहेत याचे त्याला अतिशय समाधान वाटले! त्या समाधानाच्या भरातच तो बजरंगाच्या घरातून बाहेर पडला.

रात्रभर त्याला इच्छापूर्तीचीच ललितस्वप्ने पडत होती. दुसरे दिवशी तो नेहमीपेक्षा खूप लवकर – साडेसातला उठला. चहा पिऊन झाल्यानंतर त्याने लगेच आंघोळही करून टाकली. पन्नास हाका मारल्या तरी आंघोळीला न उठणाऱ्या बाळ्याचा हा नवा अवतार पाहून त्याची बहीण चकितच झाली; पण 'अजून खूप गोष्टी पाहायच्या आहेत तुला' असा बेफिकीर चेहरा धारण करून बाळू खोलीत आला व ती ख्यातनाम कादंबरी चाळू लागला.

मध्येच त्याने सहज मान वर करून पाहिले आणि तो एकदम दचकला. समोरच्या दामूअण्णा कालवणकरांनी आपला रुमाल बदलला नव्हता, किंवा शेजारचे रामभाऊ बायकापोरांना झिंगोटी रागात शिव्या न देता बाहेर पडले नव्हते, – तर हातात एक वही घेऊन नलिनी त्याच्या घराकडे येत होती!

त्याने टुणदिशी पलंगावरून उडी मारली. (पण आता धापा टाकण्याला बिलकूल वेळ नव्हता.) लगबगीने त्याने ती ख्यातनाम कादंबरी टेबलावर फेकून दिली. (त्यामुळे टेबलावरील दौत लवंडली व टाक बाणासारखा जमिनीत रुतून बसला.) त्याने कपाटातून सोशॅलिझमवरचे एक पुस्तक काढले. मोठ्या गंभीरपणाने तो मध्येच कोठेतरी वाचू लागला.

अलीकडील मराठी कथाकादंबऱ्यांवरून त्याला एक गोष्ट स्पष्ट दिसत होती की, या विसाव्या शतकातील पोरी कामगार-पुढाऱ्यावर किंवा किसान-कामगारावर 'बहोत खूष' असतात. काय बरे काव्यमय वाक्ये ती?... 'प्रकाशनं कामगार-पुढारी होण्याचं ठरविलं. मग ही छाया त्याला सोडून कशी राहील?'... बाळूने या ओळी जेव्हा वाचल्या त्याच क्षणी त्याने निश्चय करून टाकला की आंबेवाडीला जाऊन तेथील शेतकऱ्यांच्या सुखदुःखाशी समरस व्हावयाचे! (हाय! बेळगावला दुधाच्या दोन व पिठाच्या सातआठ गिरण्यांखेरीज एकही गिरणी नाही. नाही तर तो मजूर-पुढारीच व्हावयाचा!)

पावलांच्या आवाजावरून त्याने ओळखले की, नलिनी दारापाशी आली आहे. कपाळाला आणखी एक जास्त आठी चढवून तो ''Distribution of wealth'' हे प्रकरण जास्तच गंभीरपणाने वाचू लागला.

''कामात आहात वाटतं?'' नलिनीने बाहेरूनच विचारले.

''कोण, तुम्ही का?'' आश्चर्याचा पारा थेट शंभर डिग्रीपर्यंत चढवीत बाळू म्हणाला, ''या ना. तसा काही कामात नाही. सोशॅलिझमवरचं हे पुस्तक जनरल लायब्ररीतून आणलं होतं. कारण हल्ली मी मजूरवर्गाच्या –''

''अस्सं का?'' नलिनी म्हणाली. तिने ते पुस्तक उचलले आणि ते ती चाळू लागली.

''जनरल लायब्ररीतून आणलं का हे?'' ती हसून म्हणाली, ''पण याच्यावर तर दादाचं नाव दिसतंय!''

"ते पुस्तक म्हणजे अगदी तेच नव्हे." बाळू पुटपुटला, "त्याच विषयावरची पाचसात पुस्तकं मी लायब्ररीतून आणली आहेत, Collective Study करिता. – म्हणजे मजूर वर्गाच्या..."

"बरं, ते जाऊ द्या." विसाव्या शतकातील पोरींना न शोभणाऱ्या बेफिकीरपणाने नलिनी म्हणाली, "मला एक उदाहरण सोडवून पाहिजे."

एखादी गुलजार प्रेमकथा आपल्याला दाखवून आपल्या मनातील उद्देश कळविण्याचा तिचा बेत असेल, या बाळ्याच्या कल्पनेची 'सिलोन टीम' झाली! नाइलाजाने तो वहीकडे पाहू लागला.

नलिनी कागदावर उदाहरण मांडू लागली. एक्स् वाय् झेड्चे डबेच्या डबे पळू लागले. आणि जसजसे डबे वाढू लागले तसतसा बाळ्याचा श्वास जास्त जोरात होऊ लागला. या गाडीला गार्डाचा डबा आहे की नाही याचाच त्याला संशय येऊ लागला.

"या उदाहरणाचे फॅक्टर्स पाडायचे आहेत." त्याच्याकडे वही सरकवीत नलिनी म्हणाली.

आपल्या 'क्लोज क्रॉप्ड' केसांवरून हात फिरवीत बाळूने त्या भयंकर अक्षरांवरून दोनचारदा शून्यपणे नजर फिरविली. नंतर बालकाच्या सहजतेने हसून तो म्हणाला, –

"हात्तिच्या, यात काय आहे? पण मला आता जरा गडबड आहे. सोशिआलिझमवरची ती सारी पुस्तकं आजच मला परत करायची आहेत –"

"बरं, ठेवून जाते मी हा कागद." वहीतून टर्रदिशी कागद फाडीत नलिनी म्हणाली, "तुम्हाला सवड होईल त्या वेळी ठेवा सोडवून!"

ती दिसेनाशी झाल्यावर आपली सुटका झाली असे त्याला वाटले. त्याने तो ग्रंथ पलंगावर आदळला व गणिताचा कागद हातात घेऊन तो मोठ्या विषारी नजरेने त्याच्याकडे पाहू लागला. या पोरीला गणिताची अवदसा कोठून आठवली याचे त्याला खूप आश्चर्य वाटले. मोहक कळ्यांनी चिखलात जाण्याचा हट्ट धरावा, कमळांनी हत्तीच्या पायाखाली सापडण्याची इच्छा धरावी वगैरे वगैरे... त्याने रागाने त्या कागदाचे शक्य तितके बारीक तुकडे करून खिडकीबाहेर फेकून दिले व फ्रान्सच्या पराभवाची बातमी ऐकलेल्या जनरल वेगांप्रमाणे तो खोलीत येरझारा घालू लागला.

...तोच त्याच्या खोलीचा दरवाजा धाड्दिशी उघडला व 'अंगास हात लावू नका, कायदेशीर इलाज करा!' असे ओरडत धावणाऱ्या बाळकरामाच्या धसमुसळेपणाने बजरंग आत शिरला.

"प्रिय सुहृद बाळ्या, माझं एक काम कर आज." तो सांगू लागला, – "आत्ताच्या आत्ता वडगावला जायचं आहे मला. तेव्हा आमच्या मामींना काही बाजार वगैरे लागला तर तेवढा आणून दे... काय?"

प्रश्नाच्या उत्तराची वाट न पाहता बजरंग बाहेर पडला व वडगाव मार्गाप्रत लागला.

बजरंगाच्या मदतीअभावी त्यांच्यासारख्या मंडळींची बेळगावसारख्या परक्या ठिकाणी काय अवस्था होईल याची बाळूला ताबडतोब कल्पना आली व त्यांची अडचण शक्य तितकी दूर करण्यासाठी त्याने ताबडतोब जाण्याचे ठरविले.

पण ओळखीतून प्रेम उत्पन्न व्हावे त्याप्रमाणे त्याच्या तल्लख डोक्यातून एक तल्लख कल्पना बाहेर पडली. त्याने इस्त्रीचा एक रेशमी शर्ट घातला व ब्लेझरच्या कोटावरून ब्रश फिरवीत त्याने आरशात पाहिले. आपल्या 'क्लोज क्रॉप'बद्दल स्वत:ला त्याने लाखोली वाहिली, व तो तसाच बाहेर पडला.

''बजरंग –'' त्याने नेहमीप्रमाणे – पण परिस्थितीची जाणीव असल्यामुळे जरा सावकाशच हाक मारली.

''कोण ते ?'' आतून 'कुणाचा तरी' आवाज ऐकू आला. नंतर एक व्यक्ती दृष्टिपथात आली व ती व्यक्ती नलिनीच आहे हे बाळूने ओळखले.

''कोण, तुम्ही ? या. पण बजरंग आत्ताच वडगावला गेला आहे.''

''भेटला होता मला तो. काही बाजार असला तर आणून द्यायला सांगितलं आहे...''

''हो का ? बसा. आईला विचारून येते मी. पण चहा घेता ना तुम्ही ?'' नलिनीने विचारले.

''यात काय विचारायचं ?'' असा चेहरा करून बाळूने नलिनीकडे पाहिले; पण नलिनी आत गेली होती.

जवळच्याच एका खुर्चीवर (दुसरी खुर्ची नसल्यामुळे) बाळू पटकन बसला. पण ती त्याला अगदीच लहान होऊ लागल्यामुळे 'स्टंट' बोलपटाला थर्ड क्लासला बसल्यासारखे त्याला वाटू लागले. ही खुर्ची शिंप्याने केली की परटाने केली, किंवा गणितातील आद्याक्षरधारी अ-ब प्रमाणे प्रत्येकाने थोडे थोडे दिवस आपल्या कौशल्याची परमावधी केली हे गूढ उकलण्यात तो गढून गेला.

''का हो, ते उदाहरण संध्याकाळपर्यंत तरी मिळेल का सोडवून ?'' त्याच्यापुढे चहाचा कप ठेवीत नलिनी म्हणाली.

''हो, उदाहरण म्हणताच आठवण झाली !'' एकदम आठवल्यासारखे करून बाळू म्हणाला, ''तो कागद टेबलावर ठेवून सोशॅलिझमवरची पुस्तकं आणावयास माडीवर गेलो होतो. तोपर्यंत आमच्या ताईनं तो कागद उपयोगात आणला स्वयंपाकघरात...''

''तेवढं काही महत्त्वाचं उदाहरण नव्हतं म्हणा.'' नलिनी म्हणाली, ''तो चहा निवतो आहे पहा.''

'सुटलो' असे मनातल्या मनात म्हणत त्याने चहाचा कप उचलला व बशीत ओतण्यासाठी कप वाकडा केला! पण बशीत चहा ओतून पिणे अगदीच ''कंट्री'' आहे हे त्याच्या लक्षात ऐनवेळी आले व त्याने कपच तोंडाला लावला.

'स-स...' असा आवाज करीत कढत घोटाची जबाबदारी त्याने मोठ्या कष्टाने पोटावर ढकलली. जिभेचा शेंडा अगदी बधीर होऊन गेला होता व डोळे किंचित पाणीदार झाले होते! परवचा म्हणणाऱ्या विद्यार्थ्यासारखा चेहरा करीत त्याने ते विसाव्या शतकातील अमृत घशाखाली उतरविले.

''कसा काय झाला होता चहा?''

''सुंदर...'' जिभेने वैयक्तिक सत्याग्रह पुकारल्यामुळे त्याच्या तोंडून एकच शब्द बाहेर पडला.

''तुम्हाला एक प्रश्न विचारू का?'' तोंडावर बोटे ठेवीत नलिनी म्हणाली.

''ऑं? – प्रश्न आणि इतक्या लवकर? युद्धाप्रमाणे प्रेमातही 'ब्लिझनीग' शिरलं की काय?''

बाळूने खिशातून हातरुमाल काढला. (काल त्याची मनिऑर्डर आल्यामुळे त्याने संध्याकाळी जनरल लायब्ररीजवळ रीगल स्टोअर्समधून बारा आण्याचा रेशमी हातरुमाल घेतला. त्याला म्हणून दुकानदाराने चार आणे कमी केले. प्रत्यक्ष दुकानदारच म्हणत होता तसे!) व तोंडावरून फिरविला.

पुन्हा त्याच्या डोक्यावर ठोका बसला. – 'प्रश्न!!'

ज्या प्रश्नाची कादंबरीकारांनी एवढी मिजास माजविली आहे, ज्या प्रश्नाने तरुणींचे चेहरे गोरेमोरे होतात, आवाज कापरा होतो, हृदये धाड्धाड् उडू लागतात –, (छे, अगदीच प्राकृत झाले हे! त्यांची हृदये स्पंदन करू लागतात,.. या ठिकाणी एक मार्मिक उपमा देण्यासाठी बाळू जरा थांबला. सात मिनिटांनंतर त्याला वैशिष्ट्यपूर्ण उपमा सुचली. मोठी संख्या भागावयास येणार हे समजताच ज्याप्रमाणे लहान संख्येचे हृदय स्पंदन करू लागते त्याप्रमाणे!)

– तोच प्रश्न!

त्याने कॉलर ताठ केली. हातरुमाल तोंडावरून फिरविला. शेजारच्या चार वर्षांच्या मन्याची टोपी घातली असती तरीसुद्धा बरे झाले असते असा विचार करीत क्लोज क्रॉपबद्दल पुन्हा स्वत:ला लाखोली वाहिली.

मग त्या शरच्चंद्राप्रमाणे आपल्याही चेहऱ्यावर अपेक्षेचा आनंद दिसतो की काय हे समोरच्या आरशात पाहात तो म्हणाला, –

''विचारा ना!''

''पण रागावणार तर नाही ना...?''

अरेच्या! सगळे अगदी पुस्तकाप्रमाणे. कित्येक टीकाकार वाङ्मयाप्रमाणे जगण्याचे सोडून जीवनासारखे वाङ्मय पाहिजे असा जो हट्ट धरतात त्याचा बाळूला फार राग आला. वाङ्मय हे जीवनाचे प्रतीक नाही. जीवन हे वाङ्मयाचे प्रतीक आहे!!!

"छे छे. रागवायचं काय त्यात!" बाळू म्हणाला. (तोंडावरून हातरुमाल फिरवणे, आरशात पाहणे, क्लोज क्रॉपबद्दल लाखोली वाहणे.)

नलिनी हसू दाबण्याचा प्रयत्न करीत होती. पण खूप फुगविलेल्या फुग्याप्रमाणे ते अखेरीस बाहेर फुटलेच.

"किती भयंकर लठ्ठ आहात हो तुम्ही!" खो खो हसत ती म्हणाली, "लहानपणी कशा हो उड्या मारीत होता तुम्ही?"

# दुसरे बालपण

दिलरुबा टॉकीजजवळील दुकानात विड्या घेताना पंतांनी नेहमीप्रमाणे बाजूच्या छोट्या मैदानाकडे नजर टाकली.

गुडघ्याएवढ्या निळ्या, काळ्या विजारी घातलेली पुष्कळ मुले तेथे खेळत होती. थिएटरच्या एका भिंतीवर खडूच्या तीन पट्ट्या ओढून त्यांचा क्रिकेटचा खेळ चालला होता. चेंडूबरोबरच 'काय मोठा बोलिंग टाकतो आहे, लाडू खाऊन ये जा,' 'नान्या, त्या अंबरनाथासारखी एक बाउंडरी लगाव. त्या गोंद्याची जिरू दे जरा,' 'अरे, काय समजलास, अकरा विकेट्सनी मारतो.' वगैरे वाक्येही फेकली जात होती. बाजूला चारपाच वर्षांची मुले खेळ पाहात बसली होती. त्यांना खेळातील काही समजत नसे. पण टाळ्या वाजवून ती ओरडत 'वसंत, कॅच घे कॅच. नान्या, पळ आणखी एक रन्स (!) काढ.'

म्हातारपणाला दुसऱ्या बालपणाची उपमा देणाऱ्या कवीची पंतांना एकदम आठवण झाली आणि त्यांचे त्यांना हसू आले. बालपण म्हणजे नुकतेच झाडावरून खुडलेले टपोरे गुलाबाचे फूल! म्हातारपण म्हणजे त्याच रंगाचे एक कागदाचे फूल –

आता आपण या वयात या मुलांत जाऊन बाउंडरी सिक्सर करावयाला लागलो तर लोक वेड्यात काढतील आपणाला!

त्यांनी पुन्हा एकदा मैदानाकडे नजर टाकली. पण निळी विजार घातलेला ते शोधीत असलेला एक मुलगा त्यांना दिसला नाही.

'आईने आज घरी सांजा केला असेल. स्वारी बसली असेल झालं त्यावर ताव मारीत.' – पंत मनातल्या मनात म्हणाले.

पण सोप्यावर जाऊन वहाणा काढून ठेवल्या तरी मनोहर त्यांना दिसला नाही. त्यावेळी मात्र त्यांना आश्चर्य वाटले.

'अरे मनोहर, पळ, आज काय गम्मत आणली आहे पहा तरी –' हातातील पुस्तक टेबलावर ठेवून खिशातील चॉकोलेटचे पाकीट बाहेर काढीत अखेर त्यांनी हाक मारली.

पण त्या हाकेने मनोहर न येता इंदिराबाईच बाहेर आल्या.

'आज मनोहर माझ्यावर फार रागावला आहे. काही केल्या बोलेचना. ठळकवाडीला शामच्या बंगल्याकडे जातो म्हणत होता. मी म्हटले, एवढ्या लांब एकटा दुकटा कसा जाणार? तेव्हापासून रुसून बसला आहे. एक अक्षरही बोलेना –'

'अस्सं अस्सं! एकंदरीत मायलेकरांचे भांडण आहे. त्यात तिसऱ्याने पडू नये.' खुंटीवर कोट ठेवीत किंचित् हसून पंत म्हणाले.

पण इंदिराबाईंच्या चेहऱ्याकडे नजर जाताच आपण तसे म्हणावयास नको होते असे त्यांना वाटले. त्यांचा चेहरा किंचित् उदास झाला होता. डोळेही जरा लालसर दिसत होते.

'त्यात मनाला काय लावून घ्यायचं एवढं? मी सांगतो त्याला समजावून.' समजावणीच्या आवाजाने ते म्हणाले.

जिना चढून पंत जेथे मनोहर बसला होता तेथे आले. मनोहर खिडकीतून बाहेर पाहात होता. त्याच्या चित्रांचे पुस्तक बाजूला अस्ताव्यस्त पडले असून त्याची पाने वाऱ्याने फडफडत होती. त्याच्या गुबगुबीत गालांवरून अश्रू ओघळले होते.

'मनू, अरे शहाणा ना तू? आपल्या आईवर कधी कोणी रागावते का?' त्याच्या पाठीवरून हात फिरवीत पंत म्हणाले. 'शिवाय ती का तुला वाईट सांगत होती? तुला माहीत नाही. ठळकवाडीच्या रस्त्याला किती मोटारी, किती टांगे असतात! चल, तुझ्याकरिता मी चॉकोलेट आणले आहे –'

मनोहरने त्यांचा हात पाठीवरून काढून टाकला व त्यांच्याकडे पाठ फिरविली. पंतांनी एक दीर्घ निःश्वास सोडला व ते तेथून उठले. त्यांच्या शिष्टाईचा काही परिणाम होईल म्हणून आलेल्या इंदिराबाईंनी त्यांच्याकडे निराशेने पाहिले. पण पंतांनी दुर्लक्ष केले व ते जिना उतरून खाली आले.

त्यांना चहा कढत आवडे म्हणून नेहमीप्रमाणे इंदिराबाईंनी गरम चहाचा पेला त्यांच्यापुढे आणून ठेवला. पण पंतांचे लक्ष त्याकडे गेले तेव्हा तो पार थंड होऊन गेला होता. दोनचार घोटातच तो संपवून त्यांनी प्रो. फडके यांच्या 'गुजगोष्टी' उघडल्या.

ते पुस्तक आणताना आज तरी एक चांगले पुस्तक वाचावयास मिळणार याचा त्यांना आनंद झाला होता. पण आनंद व पाऊस स्वभावाने सारखेच. पदरात पडेपर्यंत खात्री देता येत नाही!

त्यांनी चारसहा पाने परतविली व त्यांना समजून चुकले की, या पुस्तकात निदान आज तरी आपले मन रमत नाही. झाडावरील कळी तोडून फुलोऱ्यात ठेवावी त्याप्रमाणे त्यांनी ते पुस्तक शेल्फमध्ये ठेवून दिले व खिडकीतून बाहेर नजर टाकली.

तापवून लाल केलेल्या पळीप्रमाणे सूर्य दिसत होता. त्याच्या आजूबाजूच्या ढगांवर साबणाच्या फुग्याप्रमाणे निरनिराळे सुंदर रंग पसरले होते. त्यांना एकदम आपल्या आईची आठवण झाली.

ती म्हणत असे, 'गाई घराला येत असतात, आकाश रंगीबेरंगी ढगांनी भरलेले असते, अशावेळी मला मरण यावे –'

तसल्याच वेळी तिला मरण आलेही. पण –

फाडून टाकलेल्या पत्राच्या तुकड्यांवरून पुन्हा पत्र वाचण्याचा प्रयत्न करावा त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रसंगांवरून पंत आपले गतायुष्य आठवू लागले.

मॅट्रिकच्या रिझल्टनंतरची हकीकत: दत्ता – पंतांना बाकी सारे दत्तू म्हणत. पण आई मात्र दत्ताच म्हणे – एक दिवस आपल्या आईला म्हणाला,

'आई, कॉलेजकरिता मी पुण्याला जाणार आहे. तेथे पुष्कळ मोठी कॉलेजे आहेत. शिवाय माझे सारे मित्रही पुण्यालाच आहेत –'

आईने आश्चर्याने त्याच्याकडे पाहिले.

"इथंच सोन्यासारखं कॉलेज असताना पुण्याला कशाला जातोस? आणि तेथे एकटा राहणार तरी कुठं?" ती म्हणाली.

"मी काही कुक्कुबाळ नाही आता," दत्ता जरा चिडून म्हणाला.

"पण पुण्यालाच कशाला जायला पाहिजे? तुझे वडील इथंच शिकले, राहिले, नाव मिळवलं –" आई त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करू लागली.

"हेच चुकतं आमचं. असल्या भिकार गावात जन्म गेला तर बाहेरचं जग पाहावयाला मिळणार तरी केव्हा? एकटा मुलगा, एकटा मुलगा म्हणून तू मला जरादेखील मोकळेपणा देत नाहीस. आज दीनानाथ असता तर मोकळा तरी झालो असतो –"

सहा वर्षांपूर्वी अचानक ताप येऊन वारलेल्या दीनानाथाची आईला एकदम आठवण झाली. तिने अश्रू झटकून टाकले व ती आत निघून गेली. तिला खात्री होती की, दत्ता पुण्याला जाणार नाही आणि त्याप्रमाणे तो गेलाही नाही. पण त्या दिवसापासून आईविषयी एक प्रकारची अढी त्याच्या मनात बसून राहिली.

त्या कॉलेजमध्ये त्याच्या गुणांस योग्य असा वाव मिळेना. त्याची कॉलेज टीम गावातल्या हायस्कूलकडून मार खात असे. हॉकी टीम बेळगावला गेली होती व सातआठ गोल्सनी मार खाऊन परतली. चिडून दत्ताने कधीच न खेळण्याचा निश्चय केला होता!

त्याला त्याच्या मित्रांची पत्रे येत. पुण्याला होणाऱ्या निरनिराळ्या सामन्यांची रसभरित वर्णने ते त्याला पाठवीत. त्या अरविंद देवधरला एक कप बक्षीस मिळाला व त्याचा

फोटोही एका वर्तमानपत्रात आला. दत्ता अरविंदपेक्षा कितीतरी जास्त चांगला खेळे, पण कॉलेजच्या रद्दड टीमचा कॅप्टन यापलीकडे त्याची कुणाला माहिती नव्हती.

आणि त्याचे ठाम मत होते की, याला कारण आपली आई!

दत्तासाठी आईने त्याच्या आवडीची टोमॅटोची कोशिंबीर त्या दिवशी केली होती. पण तिला हातही न लावता दत्तूने चार घास खाल्ले, आणि हात धुण्यासाठी तो उठला.

'दत्ता, तुझ्यासाठी केली होती ती.' आई काकुळतीने म्हणाली.

'माझ्यासाठी काही करत जाऊ नकोस.' तो म्हणाला.

कॉलेजला जाण्याकरिता तो सायकलवर बसणार इतक्यात शांती आतून आली.

'दत्ता, आई रडत आहे.'

'का?' वरून बेफिकीरपणा दाखवीत दत्ताने विचारले.

''चांगले भरदार टोमॅटो होते. तुला टोमॅटोची कोशिंबीर आवडते म्हणून पोटात दुखत असतानाही तिने केली होती – आज सकाळपासून तिच्या पोटात दुखत आहे – आणि तिला तू हातदेखील लावला नाहीस –'

दत्ताला क्षणभर वाटले, सायकल अशीच टाकावी व आईजवळ जाऊन म्हणावे, 'आई, चूक झाली माझी –'

सायकलीची घंटा वाजवीत दत्ताचा मित्र केळकर तेथे आला व दत्ताच्या पाठीवर थाप मारीत त्याने म्हटले, ''काय रे, आज उशीर? आटप, आटप, अवघी पाच मिनिटे राहिली –'

दत्ता कॉलेजकडे निघून गेला!

संध्याकाळी आपल्या खोलीकडे जाताना त्याने सहज माजघरात नजर टाकली. आई एक चादर पांघरून झोपली होती. शांती तिच्या उशाजवळच बसली होती.

आईला आज सातआठ वर्षे पोटदुखीचा आजार होता. पंधरावीस दिवसांनी तो उचल खाई. अन्नपाण्यावाचून दोन दिवस आईला काढावे लागत व नंतर पुन्हा जरा बरे वाटे.

दत्ताला काही विशेष आहे असे वाटले नाही. तो आपल्या खोलीकडे वळला.

'आई कशाला तरी बोलावते आहे.' शांतीने येऊन त्याला सांगितले. दत्ता आईच्यापुढे जाऊन उभा राहिला.

'दत्ता, तुला पुण्याला जायचं असलं तर खुशाल जा. पण माझ्यावर असा रागावू नको. तुझ्याखेरीज मी कुणाच्या तोंडाकडे पाहावे; सांग –' क्षीण आवाजात आई म्हणाली.

'कशाला? माझ्या वडिलांनी इथेच जन्म काढला आहे ना?' तो एकदम म्हणाला.

पण दुसऱ्याच क्षणी आपण तसे म्हणावयाला नको होते, असा त्याला पश्चात्ताप झाला. त्याची नजर आईच्या दीन मूर्तीकडे नकळत वळली. शब्द उच्चारावयास देवाने

जशी जीभ दिली आहे त्याप्रमाणे ते शब्द परत घेण्यास काहीतरी साधन द्यावयास पाहिजे होते –! दत्ताला वाटले.

फुटबॉल मॅचकडे न जाता तो डॉ. महाजनींकडे गेला. जाताना त्याने शंभरदा निश्चय केला की, आल्याबरोबर आईची क्षमा मागावयाची.

या खेपेस काय झाले कुणास ठाऊक. एक महिना झाला तरी आईला बरे वाटेना. डोळे खूप आत गेले. नुसता हात उचलण्याचे श्रमही तिला सोसवेनात.

'अहो, माझ्या दत्ताला कोणीतरी पत्र घाला की, तुझी आई आजारी आहे –' एक दिवस आई बडबडू लागली.

'आई, मीच नव्हे का दत्ता?' डोळ्यांतील अश्रू पुसत दत्ताने विचारले.

आईने किलकिल्या नजरेने त्याच्याकडे पाहिले. 'मला फसवतोस काय?' अशा नजरेने तिने त्याच्याकडे पाहिले.

त्याने शांतीला आईजवळ बसावयास सांगितले व जिना चढून तो वर गेला व पलंगावर अंग टाकून त्याने अश्रूंना वाट करून दिली.

शेवटपर्यंत आईने त्याला ओळखले नाही!

पंधरा दिवसांतच खानेसुमारी आली. त्यावेळी त्या घरातून एक माणूस कमी नोंदले गेले!...

... पंतांनी खिडकीबाहेर पाहिले. इकडेतिकडे सगळीकडे अंधार पसरू लागला होता. रंगीबेरंगी ढग, पळीसारखा सूर्य – कुठे दिसत नव्हते. दोन-चार चांदण्या मात्र लुकलुकू लागल्या होत्या.

रात्री पंत मध्येच जागे झाले ते कुणाच्या तरी हलक्या कुजबुजण्याने.

'वेड्या, आपल्या आईवर रागावायचे असते का?' इंदिराबाई हलक्या आवाजात म्हणाल्या.

'नाही ग, मला फार राग आला होता तुझा. आता नाही रागावणार.' – हा मनोहरचा आवाज.

'बरं, ते झोपले आहेत. आपणही झोपू या. सरक इकडेच, आणि पापा दे एक मला –'

थोड्या वेळाने शांतता झाली.

पंतांना वाटले, या दुसऱ्या बाळपणात सुगंध, पाकळ्या, रंग वगैरे सर्व जातात, फक्त काटे मात्र वाटणीला उरतात!

# पगाराचा दिवस !

हातातील नऊ रुपये रामाने पुन्हा एकदा मोजून पाहिले व सगळे रुपये चांगले खणखणीत आहेतसे पाहून समाधानाने सदऱ्याच्या खिशात ठेवून दिले.

आज घराकडे जाताना कोपऱ्यावर लागणाऱ्या इब्राहिमच्या गुत्त्यात अगदी मनसोक्त ताडी प्यायची असा त्याने निश्चय केला. त्या गुत्त्यावरून जाताना आत जाऊन चैन करण्याचा मोह तो दररोज मोठ्या कष्टाने आवरीत असे. दारात बसलेल्या भजीवाल्याच्या पाटीतील टपोरी पिवळीजर्द भजी, आत गाणे म्हणणाऱ्याचे रंगेल हावभाव रामास विलक्षण आकर्षक वाटत. कित्येक वेळी खुद्द इब्राहिमच आपल्या नेहमीच्या पद्धतीने मिशांवर हात फिरवीत विचारी, –

"काय रामा, आज नाही वाटतं!"

आपल्या खिशात पैही नाही हे नक्की माहीत असूनही रामा उगाचच खिसे चाचपून पाही व किंचित शरमून खालच्या मानेने उत्तर देई, "आज नाही, येत्या पगाराला."

पण आपला पगार पूर्णपणे हातात यावयास त्याला बरीच वाट पाहावी लागली. दर पगाराच्या दिवशी अहमद पठाण रस्त्यावरच उभा असे. त्याचा हप्ता व व्याज जाता रामाच्या खिशात काही आणेच शिल्लक राहात.

त्याने आपल्या लग्नाकरिता थोडे कर्ज काढले होते. पण ते फेडताफेडता त्याचा जीव अगदी मेटाकुटीस आला; पण लग्नाकरिता आपण कर्ज काढले या गोष्टीचा त्याला कधीच पश्चात्ताप झाला नाही. सीतेसारखी कारभारीण मिळायलाही भाग्य लागते.

सीतेची आठवण होताच त्याचा चेहरा जरा गंभीर झाला. इतके दिवस स्वतःच्या कामावर जे पैसे मिळतील त्यावर तिने आपला संसार चालविला होता. कसा चालविला होता कुणास ठाऊक! कामावरून येताना त्याला तिचा हसरा चेहरा हटकून दिसायचा. कितीही त्रास झालेला असला तरी संध्याकाळचे साधे पण गरम जेवण तयार असावयाचेच. एवढ्या त्रासातून ती कशी काय हसतमुख राहात असे याचे त्याला आश्चर्य वाटत असे.

या महिन्याला तरी तिची ओढाताण होऊ द्यावयाची नाही असा रामाने निश्चय केला. अवघा एक रुपया खिशात ठेवून बाकीचे रुपये त्याने रुमालाच्या एका टोकात बांधून

टाकले. म्हादबाला जर कळले की, आपणाजवळ एवढे रुपये आहेत, तर त्यातील चार-पाच रुपये तरी खलास व्हावयाचे व या महिन्यासही सीतेला —

त्याने रुमालाचे टोक व्यवस्थित खोवून टाकले व म्हादबा येत आहे की काय, हे पाहण्यासाठी गल्लीच्या टोकाकडे नजर टाकली.

इब्राहिमच्या गुत्यात जाणाऱ्या प्रत्येकास म्हादबा मेस्त्रीची माहिती असे. कितीही निशापाणी केले तरी त्याला कैफ चढत नसे असा त्याचा तेथे लौकिक होता. तो मेस्त्री असल्यामुळे पुष्कळदा बेकार मजुरांना त्याच्याजवळ काम मिळे. म्हणून त्याला कोणी इब्राहिमकडे घेऊन जात व त्यास खूष ठेवण्याचा प्रयत्न करीत.

"अरे पोरांनो, वयाच्या तेराव्या वर्षापासून मी पीत आलो आहे." किंचित पांढऱ्या होत आलेल्या मिशांवरून हात फिरवीत म्हादबा अभिमानाने सांगे,

"आणि आत्तापर्यंत शहाणपणाची ती एकच गोष्ट केली —"

अखेरीस आपल्या उजव्या पायाने लंगडत म्हादबा एकदाचा आला.

"काय रे पोरा, रुमाल आज पाटलासारखा बांधलास? पडेल की कुठं तरी! आणि हसतोस आज! आहे काय इब्राहिमकडे बैठक?"

रामाच्या पाठीवर थाप मारीत म्हादबा सलगीने म्हणाला.

रामाने खिशातील रुपया काढून त्याच्या हातात ठेवीत म्हटले,

"दोन वेळा झाली पाहिजे हं यात —"

म्हादबाने तो चकचकीत रुपया उलथापालथा केला व रामाकडे आश्चर्याने पाहिले.

"पोरा, आणखी तीनचार रुपये असले तर उसने दे मला. घरभाडं द्यावयाचं आहे माझं."

घरभाडे द्यावयाचे आहे ही निवळ थाप आहे हे रामाने ओळखले. रुपये दिले तर परत यायची आशा नाही. मागावे म्हटले तरी पंचाईत!

रुमाल सरळ करीत रामाने गंभीरपणाने सांगितले,

"छे बा! तेवढा एकच होता."

म्हादबाचा त्यावर विश्वास बसला नाही. रामाकडे तीक्ष्ण नजरेने पाहात त्याने त्याचे खिसे तपासून पाहिले. त्यात काही नव्हते.

"हात्तिच्या! बरं चल, आज तरी एक दिवस चैन करू —" किंचित निराशेने म्हादबा म्हणाला. स्वतःच्या सावधगिरीबद्दल मनातल्या मनात रामाने स्वतःची पाठ थोपटली.

ते ज्या वेळी गुत्त्यात आले त्या वेळी गुत्ता पार भरून गेला होता. पाचपाच सातसात जणांची टोळकी बाटल्या मध्ये ठेवून आरडत ओरडत मजा करीत होती. त्या लोकांना आपल्या नेहमीच्या दुःखीकष्टी आयुष्याचा क्षणभर विसर पडला होता. असेच रंगेल

आयुष्य चिरकाल टिकणार आहे हा आशावाद त्या प्रत्येकाच्या हसण्याखिदळण्यात प्रतिबिंबित होत होता.

म्हादबा आत येताच तीनचार जणांनी ओरडून त्याचे स्वागत केले. हा आपला हक्कच आहे अशा आविर्भावाने म्हादबाने त्याचा स्वीकार केला व इब्राहिमकडे वळून तीन बाटल्या घेतल्या.

''रामा, आज तुझी पाळी आहे काय? भाई, मजा कर.'' डोळे मिचकावीत इब्राहिम म्हणाला.

त्या बाटल्या रिकाम्या झाल्यावर म्हादबाने पुन्हा भरून आणल्या. भजीही संपत आली होती. दारावरच्या पोऱ्याला हाक मारून त्याने ऊनऊन भजीही मागविली. बाजूच्या लोकांपैकी कोणी तरी भेसूरपणाने ओरडत होते. रामास वाटले, आपणही एक गाणे म्हणावे.

''कशाला उद्याची बात, बघ उडून चालली रात –'' तो घोगऱ्या आवाजात ओरडला व त्याच्याकडे पाहून हसणाऱ्या लोकांकडे विस्फारित डोळ्यांनी तो पाहू लागला.

''पोरा, तू नवीन आहेस. एवढी झाल्यावर बस्स कर!'' म्हादबा त्याच्या कानात पुटपुटला.

म्हादबाने शेवटची बाटली रिकामी केल्यावर ते दोघे उठले. रामा उठून उभा राहताच त्याचे पाय थरथरू लागले. तो कोलमडूनच पडणार होता, पण म्हादबाने त्यास सावरले.

आपल्या पायाखालची जमीन खवळलेल्या समुद्रावरील आगबोटीप्राणे सारखी हलत आहे असे रामाला वाटत होते. आजूबाजूच्या सर्व वस्तूंमध्ये व त्याच्यामध्ये कसला तरी पातळ पडदा सोडला होता. व त्यामुळे सर्व वस्तू पुसट दिसत होत्या. समोर खांबावर असलेला दिवा पाण्यातील प्रतिबिंबाप्रमाणे वेडावाकडा होऊन नाचत होता. झाडाच्या पानामधून वारा निसटला की, इंजिनातून धूर सोडल्याप्रमाणे भयंकर आवाज होई. समोरील झाड, त्या खालची पोलीस चौकी, त्याच्या उजव्या बाजूस असलेल्या हॉटेलमधील ढेरपोट्या कोंकण्या मालक आकाशदिव्यातील चित्राप्रमाणे गरगर फिरत होते. त्या मालिकेत मध्येच सीतेचा चेहरा दिसला.

'ती काय रागावते! तिला रुपये दिले म्हणजे ती खूष होईल –' तो म्हणाला, पण ते शब्द एकमेकांत इतके मिसळून गेले होते की, त्यापासून दुसऱ्या कुणास काहीच अर्थबोध झाला नसता. पण त्याला स्वत:ला या विचाराने खूप हसू आले.

''माझा गुलाब अंगणी फुलला ग...'' हातवारे करीत त्याने गाण्याची एक लकेर सोडून दिली.

''चढली आहे पोरा. चैन कर. तशी चढावयाची माझ्या नशिबी नाही –'' म्हादबा पुटपुटला.

कोपऱ्यावर रामूचे घर दिसू लागले. म्हादबाने रामूच्या खांद्यावरून हात काढला.

"रामा, जा तू आपल्या घरी. मी येत नाही. मला तुझ्याबरोबर पाहिलं तर आकाशपाताळ एक करील तुझी बया." रामूच्या घराकडे हात करून म्हादबा म्हणाला. "या बायकांनी किती मित्रांत भांडणे लावली आहेत देव जाणे. सावकाश जा हं जरा –"

रामाने विस्फारित डोळ्यांनी इकडे तिकडे पाहिले व पुढे पाऊल उचलले. अजूनही आपल्या पायाखालची जमीन हलत आहे असे त्याला वाटत होते. पण अजिबात तोल जात नव्हता. दिव्याच्या खांबाला टेकून त्याने जरा विश्रांती घेतली. रस्त्यावरील सिमेंटच्या कठड्यावरून खाली वाकून त्याने घसा साफ केला व तो पुन्हा चालू लागला. त्याने दाराजवळ जाऊन कडी वाजविली व लगेच सीतेने दार उघडले.

सीता त्याची वाट पाहातच होती. इतका वेळपर्यंत रामा दररोज घरी येत असल्यामुळे आज तिला जरा काळजी वाटू लागली होती. मध्येच आज येणाऱ्या रामाच्या पगाराची वाटणी कशी करावी याचा ती विचार करीत होती. त्या दूधवालीचा एक रुपया द्यावयाचा आहे. आज सकाळीच ती वाटेल तशी बोलून गेली. कल्लापा दुकानदाराचे साडेतीन रुपये द्यावयाचे आहेत. त्याशिवाय घरभाडे...

यावेळी कडी वाजली व तिने दार उघडले.

रामाचा पोषाख पाहाताच तिला सारी हकीकत समजली. खालच्या मानेनेच रामा आत आला. सीतेने काही न बोलता धाडदिशी दार लावून टाकले.

रामाने जड डोळ्यांनी इकडे तिकडे पाहिले. खिडकीतून सूर्यकिरण आत येऊन अंथरुणावर पसरले होते. सीता चुलीवरून चहाचे पातेले उतरवीत होती. रामूला कालचा प्रकार एकदम आठवला व त्याची त्याला लाज वाटली. तो सावकाश सीतेपाशी गेला.

"रागावलीस होय ?"

"रागवायचं कशासाठी ?" त्याच्याकडे न पाहता सीता म्हणाली.

पण तिच्या आवाजावरून ती रागावली आहे हे रामूने ओळखले. तिला खुलविण्यासाठी काय करावे याचा त्याला विचार पडला. त्याला एकदम आपल्या आठ रुपयांची आठवण झाली.

"माझा रुमाल कुठे आहे ?" त्याने एकदम विचारले.

"रुमाल ?" त्याच्याकडे वळून सीता म्हणाली, "कुठं टाकलात कुणास ठाऊक ! येताना डोक्यावर रुमाल होता तरी का ?"

"आँ ?" रामा एकदम उद्गारला.

पण त्या गोष्टीचे सीतेला विशेष महत्त्व वाटले नाही. – रामा सांगेपर्यंत !

# डायरीची कथा

## एक 'अरेरे, बिचारी' न्तिका

### उपोद्घात

ही एक 'अरेरे, बिचारा!'न्तिका आहे. मानवाची अंत:प्रेरणा व निसर्गात भरून राहिलेली सर्वशक्तिमान अमानुष शक्ती यांमध्ये सदासर्वदा चालू असलेल्या दीर्घ युद्धातील ही एक साधी कथा आहे. निष्पाप मानव एखादी कृती सहजपणे, निरपेक्षपणे किंवा एखाद्या उदात्त हेतूने प्रेरित होऊन करतो; पण ही निर्घृण निसर्गशक्ती नेहमी त्याच्या मार्गात उभी असल्याने त्याची आत्यंतिक निराशा होते. त्या निरलसपणाने, साधेपणाने केलेल्या कृतीमधून पुष्कळ वेळा अगदी अनेपक्षित फळ प्राप्त होते, किंवा आपल्या अल्प सामर्थ्याप्रमाणे सर्वसाधारण मानवजातीच्या उद्धारार्थ त्याने केलेले अल्प प्रयत्न सर्वस्वी निष्फळ तरी होतात. बऱ्याच सूक्ष्म अंशापर्यंत नेलेल्या मनोविश्लेषणाच्या मदतीने अगदी हेच तत्त्व विशद करण्याचा यत्न 'आम्ही' पुढील शोकान्तिकेत केला आहे.

हा येथे कोण बसला आहे? याचीच हकीकत आम्ही तुम्हाला तुमच्याच कल्याणासाठी सुनावणार आहोत. चला, आपण याच्या मागोमाग जाऊ व हा काय काय करतो हे लक्षपूर्वक अवलोकू पण प्रिय वाचका, येतो आहेस ना आमच्या मागून?

ललित लघुकथा-कादंबऱ्यांमध्ये ज्याप्रमाणे अगदी आणीबाणीच्या वेळी मोटारी बंद पडतात त्याप्रमाणे अगदी निरगाठीच्या वेळी भाऊराव डोईजड (थांबा, यांचे नाव तुम्हाला माहीत नाही? आश्चर्य आहे. यांचे नाव माहीत नाही असा विद्वान मनुष्यच विरळा. साधी राहणी व उच्च विचारसरणी यांना वाहिलेल्या मुंबईच्या 'महर्षि' मासिकात यांची पंधरा ओळींची एक लघुकथा प्रसिद्ध झाली होती. शिवाय साप्ताहिक 'गिरिधारी'च्या एका कोड्यात त्यांना एक रुपयाचे पहिले बक्षीस मिळाले होते.) यांची प्रतिभा ऐन वेळी रुसून बसली. त्यांनी डोक्याचा प्रत्येक भाग खाजवून पाहिला. कधीही तेल न लावलेल्या आपल्या भुरक्या केसांमधून नांगरल्याप्रमाणे त्यांनी बोटे फिरवून पाहिली. अखेरीस नाइलाज म्हणून स्वत:चा पैसा खर्च करून विकत घेतलेला सिन्नर विड्यांचा कट त्यांनी फोडला व मोठ्या हिरिरीने त्यांनी विड्यांची थोटुके निरनिराळ्या अवस्थेत जमिनीवर फेकूनही दिली.

पण युद्धमान राष्ट्रांचे युद्धहेतू ज्याप्रमाणे डिवचूनही बाहेर पडत नाहीत, त्याप्रमाणे एवढ्या खटपटीनंतरही सुंदर कल्पना काही बाहेर पडेनात.

प्रसंग तर अतिशय आणीबाणीचा होता. पुरुषाच्या पाशवी प्रेरणेला, समाजाच्या सुलतानी सत्तेला, रूढीच्या राक्षसी रोषाला बळी पडलेली एक अनाथ अबला (हाय! हाय! भाऊरावांना स्वत:लाच या ठिकाणी अश्रू 'आवरले' नाहीत.) बंगालमधील एका दूरच्या खेड्यात समाजावर कोरडे ओढीत भांडी घाशीत होती –

येथपर्यंत भाऊरावांनी आपले घोडे दामटले होते, पण पुढे त्यांना सुचेना. त्यांनी आणखी दोन कट खलास केले. रोमां रोलां, बर्नार्ड शॉ, गॅल्सवर्दी, पिरांडोलो, झ्वाइग हे लोक लिहिताना कोणत्या दिशेला तोंड करून बसतात – किंवा बसत होते याची आठवण करून त्यांनी आपली बैठक सुधारली. पण छे, प्रतिभा काही केल्या हसेना की खुलेना. अखेर एखादे वेळी मूर्खाचे हृदयही धरवेल, पण स्त्रियांना खुलविणे शक्य होणार नाही असा भर्तृहरीच्या नाकावर टिच्चून त्यांनी निष्कर्ष काढला; व खिडकीतून थोटूक फेकून देऊन ते आत आले.

माजघरात सौ. डोईजड तांदूळ निवडत होत्या. चार दिवसांपासून त्या 'भरतभेट'ला जाऊ या म्हणून भाऊरावांच्या मागे लागल्या होत्या.

'पण विसावं शतक झालं म्हणून काय झालं! पूर्वीसारखाच दशरथ कैकेयीच्या हातातील बाहुलं राहणारच, रामाला वनवासास जावे लागणारच, व भरत पादुका आणून त्यांची पूजा करणारच, जसे दोनशे वर्षांपूर्वी होते तेच आता असणार. त्यात काय पाहावयाचे?' अशी भाऊरावांनी टोलवाटोलवी केली होती. त्यामुळे चिडून जाऊन सौ. डोईजड यांनी पंधरा मिनिटांपूर्वी भाऊरावांबरोबर बोलणे सोडले होते.

भाऊरावांनी उगाचच इकडून तिकडे दोन फेऱ्या मारल्या. नंतर फुकट वर्तमानपत्र वाचणाऱ्याच्या सलगीने ते म्हणाले,

"अग ए, चहा कर ना कपभर."

"तर तर, नुसता चहा पुरे का? का बरोबर हवी आहेत केक-बिस्किटे? 'मुरलीधर, तू नुसती पुरी कशी खाशील? सगुणा, दुधाची वाटी आण.' मान वेळावीत सौ. डोईजड म्हणाल्या.

बिगर यत्तेत असतानाच हल्लीची शिक्षणपद्धती किती सदोष आहे हे सौ. डोईजड यांना कळून चुकले होते; व त्याचा परिणाम होऊन त्यांनी शाळा सोडली. पण त्या वाङ्मयप्रेमी असल्यामुळे त्यांनी वाचलेल्या पुस्तकांतील सुंदर सुंदर वाक्ये त्यांना मुखोद्गत असत व त्यांचा त्या आपल्या बोलण्यात सर्रास उपयोग करीत.

"छे छे, असे काय करतेस? गोष्ट अशी फर्डा लिहितो आहे! नुसती प्रसिद्ध होऊ दे, फडके-काणेकरांकडून अभिनंदनाची पत्रे येतील! 'हिंदोळ्यावर', 'रणांगण' ही पुस्तके

फिकी पडतील तिच्यापुढे! हं, मग काय! माझ्या लिखाणाच्या पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे, उताऱ्याचे सर्व हक्क सौ. सुहास्यवदना डोईजड यांच्या स्वाधीन! मग काय, करणार ना चहा?'' आपल्या आमिषाचा कितपत परिणाम होतो हे बारकाईने न्याहाळीत भाऊरावांनी विचारले.

पण शब्दापेक्षा कृतीच श्रेष्ठ हे सौ. डोईजड यांना चांगले पटले होते. त्या लगेच आत गेल्या व चहासाखरेचे रिकामे डबे घेऊन बाहेर आल्या. आवाज होईल अशा तऱ्हेने किंचित उंचावरून ते डबे त्यांनी भाऊरावांसमोर ठेवले.

''हे रिकामे डबे. मग काय करू म्हणता?''

एवढे झाल्यावर कोणता मर्त्य प्राणी काय बोलणार? भाऊरावांनी एक सुस्कारा सोडला. त्यांना समाजातील विषम आर्थिक परिस्थितीची एकदम जाणीव झाली व निषेध (Protest) म्हणून कोणी देईपर्यंत चहा न पिण्याचे त्यांनी ठरविले.

त्यांनी जाताजाता पूर्वीच्या भरतखंडातील आर्य स्त्रियांची हल्लीच्या पाश्चात्य संस्कृतिभ्रष्ट स्त्रियांशी तुलना केली, व भरतखंडाला इतकी वाईट स्थिती आलेली पाहण्याचे दुर्भाग्य आपल्या नशिबी आले याबद्दल त्यांना खंत वाटली. या विषयावर एखादे चांगले भारदस्त मासिक चालविण्याइतके त्यांचे विचार पक्के होते. अशा प्रकारचे एक मासिक काढण्याचे त्यांनी एकदा ठरविलेही होते; पण महाराष्ट्रात भारदस्त मासिके चालत नाहीत असे आढळल्यावर त्यांनी तो विचार सोडून दिला. निराशेने त्यांनी खुंटीवरील आपला कोट घेतला व 'रत्नप्रभा' मासिकाच्या कचेरीकडे जावे म्हणून ते बाहेर पडले.

'रत्नप्रभा' मासिकाचा छापखाना तीन सोप्यांचा होता. पहिल्या सोप्यावर छापखाना होता. तेथे एक म्हातारा मनुष्य नेहमी काहीतरी लिहीत बसलेला असे. तिसऱ्या सोप्यावर रद्दीचा मोठा ढीग, खळ असलेले कागद, ब्राऊन पेपरचे तुकडे पसरले होते. दुसऱ्या सोप्यावर जिला संपादक व कंपॉझिटर लोक यांनी ऑफिस म्हणण्याचे आपापसात ठरवले होते ती जागा होती. दुपारची वेळ असल्यामुळे खुर्चीवर बसून डुलक्या घेण्याजोगी शांतता ऑफिसमध्ये होती. योग्य वेळी योग्य काम असा संपादकांचा बाणा असल्यामुळे ते डुलक्याच घेत होते. भाऊरावांनी वहाणा बाहेर काढून ठेवल्या व आपल्या अस्तित्वाची जाणीव देण्यासाठी ते जरा खाकरले.

राजवाड्यात जाग्या झालेल्या अबू हसनप्रमाणे डोळे करीत संपादक उठून बसले व दंतपंक्तिदर्शन करीत त्यांनी भाऊरावांचे स्वागत केले.

''ओ हो, कोण डोईजड का! या या, बसा.''

पण नंतर त्यांच्या लक्षात आले की, ऑफिसमध्ये एकच खुर्ची आहे व ती आपण स्वतःच विराजित केली आहे. आज सकाळच्याच टपालाने, ''पारतंत्र्याच्या तुरुंगात जखडून पडलेल्या झुरणीस लागलेल्या भारतमातेकडे सहृदयतेने पाहून व तिच्या

स्थितीविषयी दीर्घ विचार करून हृदयात उचंबळून आलेल्या भावना'' नावाचे एक गद्यकाव्य संपादकांच्या चुलतभावाने पाठविले होते. त्याकरिता लागणाऱ्या उद्गारचिन्हांचा जादा साठा वरच्या फळीवरून काढण्यासाठी हरबा कंपॉझिटरने दुसरी खुर्ची नेली होती.

भाऊरावांनी कोपऱ्यातील स्टूल पुढे ओढले. त्यावर नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'बॅडमिंग्टनची फुले' या संपादकांच्या पहिल्याच लघुकथासंग्रहाच्या चारसहा प्रती होत्या. शेवटच्या पानावर 'आगामी' या शीर्षकाखाली पाच लघुकथासंग्रह, तीन विनोदी लेखसंग्रह, 'बर्नार्ड शॉ: व्यक्ति आणि वाङ्मय' हा टीकात्मक ग्रंथ व नऊ कादंबऱ्या एवढ्या साहित्याची संपादकांनी जाहिरात देऊन ठेवली होती. पहिल्याच लघुकथा-संग्रहाबरोबर एवढ्या भरीव साहित्यसेवेचे आश्वासन पाहून भाऊरावांना आश्चर्यमिश्रित आदर वाटला; पण त्याचबरोबर ''माझे एवढेच सैन्य नाही. मागाहून दिल्लीकडून खूप मोठे सैन्य येत आहे.'' या अल्लाउद्दीन खिलजीच्या ऐतिहासिक थापेची त्यांना आठवण झाली.

''भाऊराव, तुमची सध्या भारीच गरज होती. आणि पाहतो तो तुम्ही हजर! कसलं शास्त्र हो ते? कसली तरी पथी आहे.''

''हात्तिच्या, 'पथी' ना?'' एच. जी. वेल्सच्या अधिकाराने हसत भाऊराव म्हणाले, (हसत, कारण बरोबर आल्यास असल्या गोष्टी म्हणजे आपल्या हातचा मळ आहे असे समजावे म्हणून व चुकल्यास तसे पाहिल्यास आपणास विनोदाचेही अंग आहे हे कळावे म्हणून) 'होमिओपाथी, ॲलोपाथी, सिंपथी, हिंदुराष्ट्रपती –''

''आम्हाला सध्या एका लेखाची जरुरी आहे –'' त्यांना मध्येच थांबवीत संपादक म्हणाले, ''मात्र संध्याकाळच्या आत हवा. मग तुम्ही कशावरही लिहा. स्त्रीविषयक प्रश्नास चालना देणारी, हृदयास पीळ पाडणारी एखादी हृदयद्रावक प्रणयकथा लिहा किंवा मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे अथर्व वेदातील मूळ यावर विद्वत्ताप्रचुर निबंध द्या –''

''तसा एक लेख तयार आहे. पण 'प्रॉब्लेम'ची उकल कशी करावी हेच तर मला गोंधळात टाकीत आहे. कोणत्या उपायाचा अवलंब करून जास्तीत जास्त कलाविलास साधावा याचा मी सध्या विचार करीत आहे.'' सध्या आपण खरोखरच विचार करीत आहोत असा चेहरा करीत भाऊराव म्हणाले.

''हात्तिच्या, डायरी घाला!'' बेफिकीरपणाने संपादक म्हणाले.

''पण माझी नायिका दुसरीपर्यंत शिकली आहे. शिवाय मोलकरणीचे काम करताना तिला डायरी लिहावयाला वेळ तरी कसा मिळणार?'' भीतभीत भाऊरावांनी विचारले.

बोलण्याकरिता संपादकांनी ओठ हलविले; पण मध्येच त्यांचे लक्ष बाहेर गेले व ते जवळजवळ ओरडले, ''हरबा, त्या मनुष्याला कृपा करून आत येऊ देऊ नकोस.''

भाऊरावांनी खिडकीबाहेर पाहिले. कॉंग्रेसी जाकीट घातलेला एक मनुष्य डाव्या हातात एक पिशवी घेऊन व उजव्या हाताने जाकिटाचे एक बटन काजामध्ये अडकविण्याचा प्रयत्न करीत संपादकांकडे पाहात पाहात चालला होता.

"आहेत आपले असेच." भाऊरावांकडे वळून संपादक म्हणाले. "आपण कशाविषयी बोलत होतो? – डायरीविषयी. आमचं चुकतं ते इथंच. प्रत्यक्ष जीवनामध्ये तसे काही होत नसेल. नसेल! बिघडलं कुठं? वाङ्मयाचा व जीवनाचा संबंध जर काही असलाच तर काय आहे? मी ज्या वेळी इंग्लंडमध्ये होतो –"

संपादक इंग्लंडमध्ये कधी होते हे कुणासच नक्की माहीत नव्हते. पण वरचेवर त्यांनीच लोकांना सांगितल्यामुळे व आपल्या प्रवासाविषयी चार लेख त्यांनी 'रत्नप्रभे'त लिहिल्यामुळे पुष्कळ लोक त्यांच्यावर विश्वास ठेवीत व जे विश्वास ठेवीत नसत ते 'जाऊ द्या हो, काय करायचं उगाच खोलात शिरून?' असा पोक्त विचार करून गप्प बसत.

"मी ज्या वेळी इंग्लंडमध्ये होतो," संपादक म्हणाले, "त्या वेळी मला बर्नार्ड शॉशी बोलावयाचा प्रसंग आला. आम्ही सहज एच. जी. वेल्सच्या घरी बोलत बसलो होतो. बाजूलाच गॅल्सवर्दी 'लंडन टाइम्स' वाचत होते. थोड्या वेळाने डब्ल्यू. सॉमरसेट मॉम अर्नाल्ड बेनेट व जे. बी. प्रीस्टले यांना घेऊन आले. त्या वेळी मी असे दाखवून दिले की, तंत्रदृष्ट्या विचार केला असता मराठी वाङ्मय जगातील सर्व वाङ्मयाच्या आघाडीवर आहे. त्यात मोलकरणी डायऱ्या लिहितात, विधवा डायऱ्या लिहितात, वेश्याही डायऱ्या लिहितात. बाकी सर्व तयारी झालेली असते. एखादा भोळसट लेखक येण्याचीच त्या वाट पाहात असतात. एखादा लेखकासारखा दिसणारा प्राणी समोर दिसला की, लगट करून टर्रकन् फाडलेली चार पाने त्याच्या खिशात कोंबतात! बर्नार्ड शॉनेदेखील माझ्या बोलण्याला मान डोलविली. माझ्या मनात तर एक अभिनव कल्पना घोळत आहे. अलीबाबा आणि चाळीस चोर ही गोष्ट सदतिसाव्या चोराने बुधल्यात बसून डायरी लिहिली अशी कल्पना करून मी लिहिणार आहे. मी सांगतो, डायरी घाला – डायरी घाला – डायरी घाला! डायरी घातली की, खासगी लफडी ऐकायला मिळणार म्हणून वाचक जवळजवळ चीतच होतो. –"

साहित्यशास्त्रातील एवढ्या मार्मिक खाचाखोचा माहीत असलेल्या व्यक्तीशी आपली ओळख आहे हे पाहून भाऊरावांना अगदी धन्य वाटले; व आदरातिशयाने त्यांनी दोन वेळा मान हलविली. संपादकांनी भाऊरावांची स्थिती ओळखली व "दरबार कॅफे"मधून दोन चहा व दोन भजी आणावयास सांगितले.

नुसत्या बर्फापेक्षा बर्फ व मीठ यांचे मिश्रण ज्याप्रमाणे जास्त थंड असते, त्याप्रमाणे नुसत्या भाषणापेक्षा चहा व भाषण जास्त परिणामकारक ठरले. तोंडावरील आदराचा भाव तसाच कायम ठेवून भाऊराव उठले व संपादकांनी सुचवलेल्या डायरीच्या अल्पमोली

बहुगुणी उपायाचा अवलंब करण्यासाठी १९०९ रामनाथ रोड या आपल्या निवासस्थानाकडे धावत सुटले.

आपला नेहमीचा रस्ता सोडून आज कामगार वस्तीतून एक फेरफटका करावा म्हणजे निदान एक वर्ष तरी कथानके पुरतील असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला. फोरास रोडवरून गणपतीच्या देवळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जाण्याचे त्यांच्या मनात पुष्कळदा येई. कारण त्या बाजूस वेश्या वस्तीच जास्त असल्यामुळे त्या दलित वर्गामधून पुष्कळ हृदयभेदक कथानके मिळतील अशी त्यांना खात्री वाटे. पण तसे करण्याचे त्यांना धैर्य होत नसे. समाजच आपल्या मार्गात येतो, समाजाला कळकळीचे कार्यकर्तेच नकोत, असा 'हा रोग असाध्य आहे' असा चेहरा करीत भाऊराव निष्कर्ष काढीत.

इतक्यात त्यांना एक चांगलाच शारीरिक धक्का बसला; व त्यांनी वळून पाहिले. मघाचा तो काँग्रेसी जाकीटधारी गृहस्थ होता. त्याच्या हातातील पिशवी खाली पडली होती व तिच्यामधून तीन-चार बाटल्या रस्त्यावर येऊन पडल्या होत्या. जाकिटाच्या मोठ्या काजामध्ये एक बटन अडकवून त्याला अद्यावत् स्थितीत जगविण्याचा प्रयत्न करीत तो उभा राहिला. आपल्या जाकिटाच्या खिशातून डायरी काढून तिची दोनचार पाने टर्रकन फाडून तो आपणाला देईल म्हणून भाऊरावांनी बरीच वाट पाहिली; पण अजून जाकीट नीट करण्यातच त्यास यश आले नव्हते.

"धक्के द्यायला डोळे आहेत की नाहीत?" निराशेने भाऊराव गुरगुरले.

"मला डोळे आहेत की नाहीत हे पाहायला तुम्हालाच डोळे आहेत की नाहीत?" नम्रपणे त्याने विचारपूस केली. "बरे, जाऊ द्या. तुमच्या डोळ्यांना कमी दिसते असं मी विचाराच्या सोयीसाठी गृहीत धरतो. डोळा हे इंद्रिय किती महत्त्वाचे आहे हे तुम्हांस माहीत आहेच. माझ्याजवळ एक अद्‌भुत नेत्रांजन आहे. दोन तासांत हटकून गुण! आमच्या कंपनीला हिमालयातील एका महात्म्याने दृष्टांत देऊन ही कृती दाखविली आहे. माल पूर्ण स्वदेशी आहे. देशी धंद्याला उत्तेजन द्या."

त्याने पिशवीतून एक डबी काढली व भाऊरावांपुढे धरली. भाऊरावांनी ती डबी लांबूनच 'देखली', पण तिच्यावर असलेल्या व्यक्तीचे चित्र पाहून त्यांना मुंजीत काढून घेतलेल्या आपल्या फोटोची आठवण झाली.

"काय पण मुखडा सुरेख आहे!" गंभीरपणाने भाऊराव म्हणाले, "डोक्याला आणखी थोडे केस चिकटविले असते तर काय बिघडले असते?"

"आम्ही मुद्दामच तशी व्यवस्था केली आहे. चेहऱ्याच्या सौंदर्यात केसांचे महत्त्व किती आहे हे कळलं ना? सुंदर केस वाढण्यास माझ्याजवळ एक रामबाण सुगंधी हेअर क्रीम आहे. केसांची जोपासना होते; मेंदू शीतल राहतो; डॉक्टर, वकील, विद्यार्थी यांना फार उपयोगी; संपूर्ण स्वदेशी –" विजयानंदाने जाकीटवाला म्हणाला.

भाऊरावांनी त्याच्याकडे जळजळीत कटाक्ष फेकला व ते पुढे सटकले. पण संकटे आली तर कधी एकएकटी येत नाहीत याचा त्यांना अनुभव आला. राममंदिराजवळून उजवीकडे वळत असता एक टांगा आला म्हणून भाऊराव रस्त्याच्या एका कडेला झाले. – आणि थोडक्यात चुकले.

माडीवर एका मोलकरणीने केरसुणीवर केर घालून आणला होता व पाच मिनिटे झाली तरी समोरच्या बिऱ्हाडातील मोलकरणीचे अजून कसे घर लोटून झाले नाही याबद्दल आश्चर्य करीत खाली न पाहता तिने तो केर खाली फेकून दिला.

तेच थोडक्यात चुकले. भाऊराव एकदम पुढे सटकले म्हणून बरे. नाहीतर त्या केराचा भार त्यांना आपल्या शिरावर धारण करावा लागला असता.

जणू काही झालेच नाही असा बेडर चेहरा करून भाऊरावांनी मागे वळून पाहिले व जाण्यास वळणार तोच त्यांना त्या कचऱ्यात एक वस्तू दिसली; व ते एकदम दचकले, आश्चर्यले, आनंदले, थबकले व कुतूहलले. त्या कचऱ्याच्या ढिगात रिकाम्या काड्याच्या पेट्या, सिगारेटची पाकिटे यांबरोबर एक डायरीही पडली होती.

भाऊरावांना डायरीसारख्या साध्याही विषयात एकदम मोठा आशय आढळला. त्या लहानशा डायरीमध्ये कितीतरी अज्ञात गोष्टी दडल्या असतील, सामाजिक रूढीमुळे पायदळी तुडविलेल्या एका मोलकरणीने – एका अबलेने त्यात आपले हृदय ओतले असेल, भावना उघड केल्या असतील, सामाजिक अन्यायामुळे आलेल्या हृदयाच्या कढांना वाट करून दिली असेल –

या विचारानेच भाऊरावांना हर्षातिशयाने श्वासोच्छ्वास करणेही कठीण जाऊ लागले! भाऊरावांनी आपला कोट सावरला व हळूच इकडेतिकडे पाहिले.

रस्त्याच्या टोकाला जाकीटवाला संशयास्पद तऱ्हेने इकडेतिकडे हिंडत होता. पानपट्टीच्या दुकानातील गृहस्थ दोन बोटांच्या फटीमधून रंगपंचमी साजरी करीत हिटलरचे पुढील बेत काय आहेत याची अधिकृत गोटातून दुजोरा न मिळालेली माहिती विड्या वळत असलेल्या दुकानदाराला सुनावीत होता.

समाजाकरिता भाऊरावांनी हृदय घट्ट केले व ती डायरी उचलण्यासाठी ते खाली वाकले. इतक्यात त्या घरातून दोन मांजरे भांडत आली व त्यांच्याजवळून पळत जाऊन समोरच्या घरात दिसेनाशी झाली.

भाऊरावांनी टुणदिशी एका बाजूला उडी मारली व मानेवरील घाम पुसला. पण समाजाकरिता थोड्या त्रासाचे धनी होणे अगदी जरूर आहे हे ध्यानात घेऊन त्यांनी पुन्हा प्रयत्न केला.

"बरोबर. कचऱ्यातून संपत्ती निघते!" कोणीतरी म्हणाले.

भाऊरावांनी झट्‌दिशी डायरी खिशात टाकली व चमकून मागे पाहिले. तो जाकीटवाला आपल्या पिशवीतून एक लहानसे पुस्तक बाहेर काढीत होता. "बरोबर आहे. कचऱ्यातून संपत्ती निघते." तो पुन्हा म्हणाला, "पण त्या गोष्टीला शास्त्रीय दिग्दर्शन हवं. (जाकिटाचे बटन अडकविण्यासाठी तो जरा वेळ थांबला.) "'कचऱ्यातून संपत्तीकडे' म्हणून मी एक पुस्तक लिहिले आहे. शुद्ध स्वदेशी मुंढवा पेपरवर पुस्तक छापले आहे. किंमत पाच आणे. स्वदेशी कला-उद्योगांना उत्तेजन द्या –"

आता मात्र त्या जाकीटवाल्याची भाऊरावांना भीती वाटू लागली. खिशात डायरी आहे की नाही हे त्यांनी चाचपून पाहिले; व पुढे बोलण्यास तो जाकीटवाला तोंड उघडणार तोच ते निसटले.

भाऊराव घरी आले ते सरळ माडीवर गेले; व लगेच त्यांनी आपल्यामागे दारही लावून घेतले. सौ. डोईजडांना हा प्रकार नवीन वाटला व आज काहीतरी विशेष आहे हे त्यांनी ओळखले. पाय न वाजविता त्या जिना चढून आल्या व दाराच्या फटीतून पाहू लागल्या. पण ऐन दरवाजापाशीच काकणांनी आवाज करून विश्वासघात केला. (लगेच सौ. डोईजड यांनी एखाद्या अनुकूल वेळी – "स्त्रियांच्या मार्गात काकणांची धोंड" यावर भाऊरावांकडून लेख लिहून घेऊन "संपादक, स्त्रीविभाग, 'महर्षि', दलाल स्ट्रीट, फोर्ट बॉम्बे" या पत्त्यावर पाठविण्याचे ठरविले.)

"कोण आहे?" भाऊरावांनी विचारले, (जणू दुसरे कोणीतरी येणारच होते!)

"मी." सौ. डोईजड म्हणाल्या, "चहा साखर आणणार ना?"

"जा. मला चहा नको!" समाजासाठी त्याग करण्याच्या आवेशात भाऊराव बोलून गेले.

"इश्श, तुम्हाला कोण म्हणते? मला नको का चहा?"

भाऊराव एकदम खेकसले. जिन्यावर पावले वाजली व थोड्या वेळाने ऐकू येईनाशी झाली. खुराड्यामधून हलक्या हाताने अंडे काढावे त्याप्रमाणे भाऊरावांनी खिशातून डायरी काढली व ते पाने चाळू लागले.

डायरीमध्ये एका दुःखी जिवाची कहाणी असेल. त्यात कितीतरी अमानुष प्रकारांवर विदारक शोधप्रकाश टाकला असेल, निर्घृण समाजावर कोरडे उडविले असतील. – नुसत्या विचारांनीच भाऊरावांना दमल्यासारखे होऊ लागले. एखादी भावना उचंबळून आल्यास तिला लगेच शब्दरूप देण्यासाठी एक दस्ता कागद त्यांनी जवळ तयार ठेवले; व ब्यूटी बॉक्समध्ये मिळालेल्या साडेदहा आण्यांच्या फाउंटन पेनमध्ये शाई भरून अगदी हाताला येईल अशा जागी ठेवले.

त्यांनी थोडी पाने चाळली. ते रागारागाने उठले. त्यामुळे धक्का बसून फाउंटन पेनच्या शाईची दौत उलटली व कागदावरून वाहात टेबलाच्या काठावरून ठिबकू लागली.

त्या डायरीत हृदयाचे कढ नव्हते किंवा 'ऐकायची आहे तुम्हाला माझी कहाणी' अशी लाडिक सुरुवात केलेले एखादे आत्मचरित्रही नव्हते. डायरीमध्ये, वरचेवर तोंडात घातलेल्या जांभळ्या पेन्सिलीने लिहिलेले, 'नवरात्र संपले, दसरा उजाडला, मोरूचा बाप त्याला म्हणाला,' हे शुद्धलेखन (!), तीसपर्यंत पाढे, "तुझ्या हाताची मिठी राया सोड ना" या गाण्याच्या पहिल्या दीड ओळी, विनायक, मीनाक्षी व नादिया ही नावे एवढेच तुटपुंजे साहित्य होते. भाऊरावांनी पहिल्या पानावर लिहिलेले नाव वाचले,

**चनबसप्पा शिवबसप्पा पाटील**

**इयत्ता पहिली**

विषारी वायूच्या हल्ल्यात सापडल्याप्रमाणे भाऊरावांना गुदमरल्यासारखे होऊ लागले. (म्हणजे ते कधी विषारी वायुहल्ल्यात सापडले होते असे नाही. पण बॉंबहल्ला किंवा विषारी वायूचा हल्ला याविषयी आपल्या काही कल्पना असतातच ना?) म्हणून त्यांनी खिडकी उघडली. इतक्यात त्यांची नजर त्या डायरीवर पडली. त्यांनी आत्यंतिक द्वेषाने, रागाने तिच्याकडे पाहिले. दुसऱ्याच क्षणी त्यांनी ती जोराने खिडकीतून फेकून दिली.

थोड्या वेळाने जिन्यावर पुन्हा पावले वाजली. घुरघुरतच भाऊरावांनी दरवाजा उघडला. पुढे पाहताच ते एकदम दचकले व मोठ्या कष्टाने त्यांनी आपला तोल सावरला. दारात जाकीटवाला उभा होता!

"तुम्ही खिडकीतून जी डायरी फेकलीत ती खाली माझ्या डोक्यात बसली." काजामध्ये बटन अडकविण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, "ती ज्या जोराने माझ्या डोक्यावर उतरली त्यावरून तुमच्या मन:स्थितीची मला चांगली कल्पना आली. भावनेच्या उद्रेकाचे असे जबरदस्त धक्के मज्जातंतूंवर वरचेवर बसू लागले तर मेंदूवर भयंकर परिणाम होणे अगदी शक्य आहे. म्हणून मी म्हणतो, आपण भविष्याची एखादी तरतूद का करीत नाही? थोडक्यात म्हणजे आमच्या स्वदेशी इन्शुअरन्स कंपनीमध्ये विमा का उतरवीत नाही? क्लेम्स निर्विवाद दिले जातात. हप्ते फारसे मोठे नाहीत. आमच्या कंपनीचे अधिकृत भांडवल, जमा झालेले भांडवल—"

आजूबाजूचे जग एकदम गरगर फिरू लागले आहे असे भाऊरावांस वाटू लागले. दोन्ही हातांनी कान झाकीत त्यांनी पायाने धाडदिशी दरवाजा लावला व आत येऊन त्यांनी धाडदिशी पलंगावर अंग टाकले!

## उपसंहार

उपसंहार सर्व वाचकांसाठीच असतो असे नाही. लहानथोर पात्रांचे पुढे "का? व कसे" झाले हे जाणण्याची कित्येकांना अपरिमित उत्सुकता लागून राहिलेली असते.

उपसंहार जोडून त्यात लेखकाने सर्व पात्रांची कशी काय विल्हेवाट लावली आहे हे कळले की, या महाभागांचा आत्मा तृप्त होतो, व लेखकास निर्दोषी म्हणून सोडण्यास ते मोठ्या मिनतवारीने तयार होतात. अशा लोकांसाठीच खास हा उपसंहार किंवा पात्रसंहार असतो.

१) दिनूअण्णा साठे यांच्या दुकानात उधारी जास्त झाल्यामुळे त्यांच्याकडे चहासाखर आणावयास जाण्याचे धैर्य भाऊरावांना झाले नाही. पण त्यामुळे समाजातील अन्याय्य आर्थिक विभागणीची त्यांना पुन्हा एकदा तीव्रतेने जाणीव झाली. अशा वेळी काही ना काही निश्चय करावयाची सवय असल्यामुळे त्या भरात इमान्युएल कान्टचे [की आपला तो हा नीत्शे त्याचे?] सुप्रसिद्ध पुस्तक Das Kapital वाचून काढण्याचा त्यांनी संकल्प सोडला.

२) चहासाखर आणण्याचा सौ. डोईजड यांनीही फारसा आग्रह धरला नाही. कारण भाऊराव बाहेर गेल्यावर उजव्या शेजारी राहणाऱ्या कमलाबाईकडून एक, डाव्या शेजारी राहणाऱ्या रमाबाईकडून एक, व परसात राहाणाऱ्या काकूबाईकडून एक असा एकंदर तीन कप चहा त्यांनी उकळला होता.

३) वरील शोकान्तिकेतील एकुलता एक समरप्रसंग जेथे घडला त्या घराच्या समोरील बिऱ्हाडातील मोलकरणीने 'पंधरा दिवसांपूर्वीच केर काढला आहे' असा विचार करून त्या दिवशी केर काढला नव्हता. पण दुसरे दिवशी मात्र 'कालच केर काढला आहे. आता पंधरा दिवस तरी पाहावयाला नको.' असा समाधानाचा सुस्कारा सोडून पहिल्या मोलकरणीची ती वाट पाहात उभी राहिली.

४) पहिल्या मोलकरणीने टाकलेला वाङ्मयीन महत्त्वाचा केर दुसरे दिवशी सकाळी सव्वानऊ वाजता म्युनिसिपालिटीच्या महाराने फाटक्या पाटीमध्ये भरून नेण्याचा प्रयत्न केला. मानवाच्या मार्गात नेहमी आड येणारी ती अमानुष शक्ती या वेळी फाटक्या पाटीच्या रूपाने उभी राहिली. त्यामुळे जरी त्या महाराच्या मनात सर्व केर भरून नेण्याचा उदात्त हेतू होता तरी प्रत्यक्ष थोडाच भाग नेला गेला.

५) मोठ्या काजामध्ये लहान बटन अडकविण्याचा सतत प्रयत्न करीत असता ते बटनच तुटून गेले. 'सुटलो एकदाचा. होते तोपर्यंत अडकवावे लागत असे.' (अकिंचनो पितृष्णश्च सुखं स्वपिति रात्रौ') अशा आशयाचा समाधानाचा सुस्कारा सोडून तो जाकीटवाला दुप्पट जोमाने स्वदेशी धंद्याला उत्तेजन देण्यासाठी लोकांचे मन वळवू लागला.

६) भाऊरावांनी ओढून टाकलेल्या विड्यांची थोटके दुसरे दिवशी त्यांनीच गोळा करून रस्त्यावर फेकून दिली. ती रेडिओ टॉकीजमधील 'सर्कस नी सुंदरी'ला जाऊन येत असलेल्या मुसलमान पोरांनी 'शिवा, या वर्षी एवढा हंगाम येईल असे वाटले नव्हते'. म्हणणाऱ्या जुन्या पहिलीच्या पुस्तकातील शेतकऱ्याप्रमाणे चेहरा करीत उचलली व खिशात घातली.

७) जर्मनीमध्ये आपण असताना गटेबरोबर हेलोनिझम व रोमँटिझम यावर कशी चर्चा केली हे संपादक सांगत असता एका नसत्या उपद्व्यापी श्रोत्याने संपादक जाण्यापूर्वीच गटे ख्रिस्तवासी झाला होता हे दाखवून दिले. त्याच्या उद्दामपणाचा संपादकांना इतका सात्त्विक राग आला की, त्यांनी सबंध दिवसभर आपल्या प्रवासातील एकही आठवण सांगितली नाही.

८) आपल्या कथेतील नायिकेला स्वोद्धाराचा मार्ग सुचवून ऐन वेळी पुरेशी मदत न पोहोचल्यामुळे ती बिचारी भांडी घासता घासता एक दिवस या विषम जगास सोडून निघून गेली.

९) सौ. डोईजड यांनी खरोखर 'स्त्रियांच्या मार्गातील काकणांची धोंड' नावाचा लेख भाऊरावांकडून लिहून घेऊन 'स्त्री विभाग, 'महर्षि' मासिकाकडे पाठविला. महाराष्ट्रीय सुशिक्षित महिलांनी त्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे बरेच लक्ष दिले. दोन्ही बाजूंकडून उलटसुलट साडेतीनशे लेख छापल्यावर आता हा वाद थांबविण्यात आला आहे अशी एक टीप 'सं.'नी छापून टाकली.

# संध्या-छाया

शाळेहून येताच मालूने आपले दप्तर कपाटावर फेकले व छोट्या सुधेला घेऊन ती अंगणात आली. सुधेला गंमतीने डोलवीत ती आपली नेहमीची आवडती कविता म्हणू लागली,

"ढळला रे, ढळला दिन सखया,
संध्या-छाया भिवविती हृदया
अतां मधूचें नांव कासया
लागले रे नेत्र पैलतीरी..."

त्या कवितेच्या अस्पष्ट पण मधुर लहरी हवेवर तरंगत तरंगत पंतांच्या कानांवर आल्या व ते स्वत:शीच किंचित् हसले. मालूचे ते गाणे आजूबाजूला इतके परिचित झाले होते की, त्याचे सूर ऐकू येऊ लागले की, "चला, संध्याकाळ झाली." म्हणत बसावयास आलेल्या लक्ष्मीबाई संध्याकाळच्या स्वयंपाकाची तयारी करण्यासाठी उठत; "पुराण एव्हाना चालूही झाले असेल." असे म्हणत वाडगाभर तांदूळ घेऊन आजीबाई लगबगीने विठोबाच्या देवळाकडे चालू लागत व 'पंतांना चहा देण्याची वेळ केव्हाच होऊन गेली.' असे म्हणत आनंद-उषा चहाचा पेला घेऊन येत...

पंत विड्यांचा जुडगा घेऊन खिडकीपाशी विडी ओढीत बसले होते. सायंकाळची सोनेरी किरणे खिडकीमधून आत येऊन जमिनीवर पट्ट्यापट्ट्याप्रमाणे पसरली होती. विड्यांचा धूर किरणांच्या पट्टयांतून जाताना एकदम जिवंत झाल्यासारखा उठावदार दिसे.

त्यांच्यामागे जिन्यावर दुडदूड पावले वाजली व खुळखुळ्याच्या आवाजाप्रमाणे उषेचे स्वैर हसणे ऐकू आले. धावत धावतच उषा आत आली. पण आनंदाच्या हातात चहाचा पेला असल्यामुळे तो सावकाश जिना चढून आला. लगबग करून उषेने पंतांची उजवी बाजू पटकाविली व विजयोन्मादाने ती पुन्हा हसली. किंचित् हिरमुसून आनंदाने चहाचा पेला पंतांपुढे ठेवला व तो डाव्या बाजूला बसला. पंतांचा हात आपल्या हातात घेत तो म्हणाला –

"आजोबा, मी तुम्हाला चहा आणून दिला ना! मग मला एक नवीन गोष्ट सांगा –"

"नाही हो आजोबा, तुम्हाला चहा द्यावयाला मीच आईला सांगितलं. मलाच गोष्ट सांगा. त्या दादाटल्याला नको. आणि माझ्याकडे असे तोंड करा. त्याच्याकडे नको." पंतांचे तोंड आपल्या चिमण्या हातांनी आपल्याकडे वळवीत उषा म्हणाली.

बशीत ओतलेल्या चहावर फुंकर घालीत या मुलांना कसली गोष्ट सांगावी याचा ते विचार करू लागले. पंतांना किती तरी गोष्टी येत. अलीबाबा व चाळीस चोर, बाबा अबदल्ला, चीन देशच्या राजकन्येची गोष्ट वगैरे किती तरी गोष्टी त्यांनी आनंद-उषाला सांगितल्या होत्या. खेळायला जायचे विसरून आनंद-उषांनीही तळहातावर हनुवटी ठेवून मोठ्या एकाग्रतेने त्या गोष्टी ऐकल्या होत्या. अंधार वाढत जाई. खिडकीतून दिसणारे बागेतील आंब्याचे झाड काळसर दिसू लागे. खालून हाक ऐकू येई, "आनंद-उषा, चला शुभं करोति म्हणावयाला." आनंद-उषा जागे झाल्याप्रमाणे उठत. 'किती गोड मुलं आहात तुम्ही.' म्हणत पंत त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत, व उद्या गोष्ट सांगावयाचे त्यांच्याकडून वचन घेऊन आनंद-उषा हळू हळू जिना उतरून जात.....

पण ती गोष्ट किती तरी दिवसांपूर्वीची होती. एखाद्या झाडाच्या फुलांचा बहर ओसरून जाऊन ते उदास दिसावे त्याप्रमाणे पंतांची स्थिती झाली होती. त्यांना माहीत असलेल्या सर्व गोष्टी सांगून झाल्या होत्या. आणि त्यामुळे आनंद-उषा पूर्वीसारखे दररोज येत नसत. नेहमीची वेळ टळून गेल्यानंतर बऱ्याच वेळाने त्यांच्यासमोर चहाचा पेला येई, पण चहा निवलेला तरी असे किंवा त्यात चहाची पाने तरी तरंगत असत. आनंद-उषा आताशा त्यांच्याजवळ येऊन न बसता मारुतीच्या पटांगणात खेळावयाला जात. त्यांचा मुलगा तर बहुधा कधीच माडीवर येत नसे. त्यामुळे संध्याकाळी त्यांना अगदी एकटे एकटे वाटे. एखाद्या अरुंद निर्जन रस्त्यावरून आपण कुठे तरी चाललो आहो असे त्यांना वाटे. वेळ घालविण्यासाठी ते त्या खिडकीपाशी आपला विड्यांचा जुडगा घेऊन विडी ओढत बसत....

किती तरी दिवसांनी आनंद-उषा त्यांच्याकडे आली होती. पण त्यांना सांगण्यासाठी नवीन अशी गोष्टच त्यांना आठवेना.

"त्या मंतरलेल्या घोड्याची गोष्ट सांगू?" उषेच्या रेशमासारख्या मऊ मऊ केसांवरून हात फिरवीत त्यांनी विचारले.

"अंऽहं –" गाल फुगवून मान हलवीत उषा लाडिकपणाने म्हणाली – "त्या गोष्टी नकोत आता. तुमची एक गोष्ट सांगा आम्हाला."

"खरंच आजोबा, तुमची एक गोष्ट सांगा." इतका वेळ गप्प बसलेला आनंद मोठ्या उत्साहानं पुढे सरकत म्हणाला, "तुमच्या लहानपणाची एक गोष्ट सांगा आम्हाला."

रिकाम्या बशीत पेला ठेवता ठेवता पंतांनी आपल्या हातांकडे पाहिले. हवा काढलेल्या फुग्याप्रमाणे ते पार सुरकतून गेले होते. त्यांचे केस भट्टीहून आलेल्या कापडाप्रमाणे शुभ्र

झाले होते. डोळ्यांनाही मंद मंद दिसे. पाय संधिवाताने धरल्यामुळे खोलीच्या दरवाजापासून त्या खिडकीपर्यंत सरकत जाण्यास त्यांना पाच सात मिनिटे लागत. त्यांचे त्यांनाच खरे वाटेना की, आपण कधी तरी या आनंद-उषाइतके लहान होतो, त्यांच्यासारखे आनंदाने हसत होतो, त्यांच्यासारखे स्वैरपणाने खेळत होतो...

बाळपणाचे रम्य खेडे त्यांच्या जीवनप्रवासात फार फार मागे राहिले होते!

आपल्या लहानपणीच्या गोष्टी आठवण्याचा ते प्रयत्न करीत. पण धुक्यातून पाहिल्याप्रमाणे त्यांना सारे अंधुक अंधुक दिसे. आठवण्याचा प्रयत्न करीत असता एक जुनाट घर त्यांच्या डोळ्यांसमोर येई. ते घर कुणाचे, कुठे, केव्हा होते हे त्यांना बिल्कूल आठवत नसे. अंधारात प्रकाशाचा झोत टाकावा व त्यात एखादी वस्तू एकदम दिसावी त्याप्रमाणे ते घर दिसू लागे, अंधारातून सरकत सरकत पुढे येई व मग स्थिर होई. त्या घरात नेहमी ओल असे. स्वयंपाकघरात खूप उंचावर एक खिडकी होती. पण तिला गज नव्हते. तीमधून रात्रभर सारखा भिरभिर वारा वाहात असे. त्या घराच्या मागे एक पेरूची बाग होती. पंत लहानपणी तेथे पेरू काढावयास जात. त्यांच्याबरोबर आणखी चारपाच सवंगडी येत. पण त्यांपैकी बहुतेकांचे चेहरे ओले चित्र हाताने सारवल्याप्रमाणे पुसट दिसत. पण त्यांपैकी एक मात्र त्यांना नेहमी आठवे. त्याचे नाक चोचीसारखे होते. तो नेहमी एक मळके धोतर गुडघ्यापर्यंत नेसे. शिवाय हसताना रिकाम्या भांड्यात चारसहा पैसे घालून खुळखुळावेत त्याप्रमाणे आवाज करी. दादा, ताई, मामा म्हणून ते कुणाला तरी हाक मारीत असत. पण त्या लोकांना आपण एकदा तरी निरखून पाहिले आहे असे त्यांना वाटत नसे. आईचा चेहरा मात्र त्यांना आठवे. पण तीही कधी तरी त्यांना सोडून गेली. त्यांना पुष्कळदा वाटावयाचे की, अशा असहाय म्हातारपणीदेखील बालपणाप्रमाणे आपली आई असावयास हवी होती. म्हणजे संध्याकाळी वेळेवर ऊन ऊन चहा मिळाला असता. तांबड्या पिवळ्या फुलांनी डवरलेल्या बागेत आपली खुर्ची कुणी न रागावता सरकविली असती, आपणास अंधारात बसावयास लागू नये म्हणून अंधार पडताच कुणी तरी दिवा लावला असता, व थंडीने कुडकुडत असता कुणी तरी पाय न वाजवता एखादा रग हळूच आपल्या अंगावर आणून टाकला असता... आई आपणास कशी हाक मारी, आपणावर कशी रागावत असे हे त्यांना आठवत नसे. खरे म्हटले तर त्या एका प्रसंगाखेरीज त्यांना लहानपणाचे काहीच स्पष्टपणे, सुसंगतपणे आठवत नसे. त्यापुढे आठवण्याचा प्रयत्न केला की, पुढे काही दिसेनासे होई, सगळीकडे अंधार वाटू लागे. एखादी पाऊलवाट दाट झाडीमध्ये जाऊन दिसेनाशी व्हावी त्याप्रमाणे तो प्रसंग अंधारात नाहीसा होई.....

"मी लहानपणी एकदा बाजारात गेलो होतो तांदूळ आणायला, ती हकीकत सांगू का?" मोठ्या आशेने त्यांनी विचारले.

ती हकीकत त्यांच्या घरी सर्वांना माहीत होती. तातोबा माळी व विठा मोलकरीण यांनाही ती हकीकत पंतांनी एकदा सांगितली होती. ती सांगून होईपर्यंत ते दोघे गप्प उभे होते व नंतर जणू काही झालेच नाही असे चेहरे करून आपले अर्धे राहिलेले कुंपण कातरण्यासाठी तातोबा निघून गेला व भांडी घासण्यासाठी विठा तेथून निसटली. आनंद व उषा यांनी तर ती हकीकत चारसहा वेळा ऐकली होती.

''अंऽहं – तीच तीच हकीकत काय ऐकावयाची? दुसरी सांगा ना. आठवण तरी करून पहा.'' किंचित् वरमून पंत जास्त आठवण्याचा प्रयत्न करू लागले. अंधारातून ते घर सरकत सरकत त्यांच्या डोळ्यांपुढे आले. स्वयंपाकघरातील उंच खिडकीमधून वारा जोराने वाहू लागला. त्यानंतर पेरूची बाग आली. त्यामागोमाग तो गुडघ्यापर्यंत धोतर नेसलेला मुलगा, नंतर तो प्रसंग, मग सारी शून्यता, सारा अंधार, अंधाऱ्या खोलीत काडी ओढताच क्षणभर प्रकाश पडून नंतर पुन्हा अंधार होतो त्याप्रमाणे.

''छे, मला काहीच आठवत नाही. – अगदी खरंच काही आठवत नाही रे बाळांनो'' ते असहायपणाने म्हणाले.

उषा हिरमुसली व तिच्या ओठांची टोके खाली वळली. मान वळवीत आनंदाने खिडकीमधून बाहेर पाहिले. मारुतीच्या पटांगणात मुले छप्पापाणी खेळत होती. त्यांत उषेच्या ओळखीची सुनंदा-शामला होती. आनंदाच्या वर्गातील वसंत व अंतू होते. उषेने आनंदाकडे पाहिले त्याच वेळी आनंदानेही तिच्याकडे पाहिले. दोघांच्याही मनातील भाव एकमेकांनाला समजले.

''खरंच, त्याखेरीज काही आठवत नाही मला.'' अर्धवट स्वतःशी, अर्धवट त्यांना उद्देशून पंत म्हणाले. विझलेली विडी पेटविण्यासाठी त्यांनी काड्यांची पेटी चाचपडली. पण ती त्यांना मिळाली नाही. त्यांनी विडी टाकून दिली. गुडघ्याभोवती हाताचा विळखा घालून ते शून्यपणे पाहू लागले. जणू कालच घडल्याप्रमाणे तो प्रसंग त्यांच्या डोळ्यांपुढे नाचत होता.

अंधारातून ते घर सरकत सरकत त्यांच्या डोळ्यांसमोर आले. स्वयंपाकघरातील उंच खिडकी दिसू लागली. तेथे चुलीपुढे त्यांची आई बसली होती. धुराने काळवंडलेल्या भिंतीवर तिची खूप मोठी सावली पडली होती. कोनाड्यांतील चिमणीची ज्योत जशी हले तशी तिची सावलीही हले.

''आई, आज फार गंमत झाली. शाळेजवळ आम्ही खेळत होतो आणि त्या वैद्याच्या चिंतामणीला मी शेवटपर्यंत सापडलो नाही. मग मास्तरांनी मला शाबासकी दिली –'' हरी मोठ्या उत्साहाने म्हणाला.

''खरंच का?'' कौतुकाने आई म्हणाली. अभिमानाची छटा तिच्या तोंडावर स्पष्ट दिसत होती.

पुढे काय बोलावे हे न समजून थोडा वेळ हरी चुळबुळत राहिला. जेवण करून मी बसवाण्णाच्या देवळासमोर होणारा खेळ पाहावयास जाणार, हे त्यास सांगावयाचे होते. बसवाण्णाची जत्रा कालच संपली होती व आज शेवटचा कार्यक्रम म्हणून खेळ होणार होता. देवळापुढे चार खांब उभे करून त्यावर फळ्या टाकून खेळासाठी तात्पुरती जागा तयार केली होती. दोन्ही बाजूला पडदे म्हणून दोन जमखाने सोडले होते. खेळ करणारे कानडी लोक तर केव्हाच येऊन बसले होते. देवळामागे असलेल्या चिंचोळ्या जागेत त्यांनी गाठोड्यातून मण्याचे दागदागिने, लाकडाच्या गदातलवारी व रंगीत कपडे काढण्यास सुरुवात केली होती. कोपऱ्यात एक दाढीवाला निरनिराळ्या रंगांच्या वाट्या घेऊन बसला होता व 'लवकर या, चला' म्हणत तो बाकीच्या माणसांवर खेकसत होता. हा सारा प्रकार हरीने त्या गुडघ्यापर्यंत धोतर नेसणाऱ्या मुलाच्या पाठीवर उभे राहून खिडकीतून हळूच पाहिला होता...

"आई, मी – मला भूक लागली आहे. जेवून टाकू का मी?" अखेर त्याने विचारले.

आई थोडा वेळ गप्प होती. चुलीतील लाकूड सारखे केल्यासारखे करीत ती म्हणाली, "माझाही सकाळचा उपास सोडावयाचा आहे. पूजा केल्यानंतर वाढते हं. शिवाय तोपर्यंत तेही येतीलच पुराणाहून...."

हरी जरा हिरमुसला. आणखी एक तासात खेळ चालूही होईल. तो ज्या वेळी घरी आला त्याच वेळी खेळातील राजा पिवडी लावून तयार झाला होता. लहान लहान मुले बसण्याकरिता गोणपाटाचे तुकडे घेऊन केव्हाच हजर झाली होती व अगदी पुढच्याच रांगेत बसण्यासाठी तंटामारामारी करून एकच आरडाओरड करीत होती. थोड्याच वेळात लोकही येऊ लागतील; फळ्यांवर एक ग्यासबत्ती ठेवली जाईल, सनई व डफ वाजू लागेल व त्याबरोबर पुठ्ठ्यावर काढलेले गणपतीचे चित्र तोंडावर घेऊन बसलेल्या गणपतीपुढे नमनही चालू होईल!

हरी आई-अण्णांवर फारच रागावला. आज जर खेळ पाहावयाला मिळाला नाही, तर दुसरे दिवशी तो पाहण्यासाठी चार मैल रखडत शहापूरला जावे लागेल. बाकी आजचा खेळ पाहूनही दुसरे दिवशी शहापूरला जाण्याचे हरीने ठरविले होते म्हणा. पण प्रत्यक्ष गावात दोनचार गल्ल्यांपलीकडे खेळ असून पाहायला मिळत नाही म्हणून तो चिडला. शिवाय खेळ संपेपर्यंत कोण जागतो याची शर्यत त्यांनी आपापसांत ठरविली होती व शेवटपर्यंत जागणाऱ्यास तो गुडघ्यापर्यंत धोतर नेसणारा आपली लाललाल शिसपेन बक्षीस देणार होता....

पावले आपटीत तो सोप्यावर आला व तेथे ठेवलेल्या तक्क्याला टेकून तो जरा आडवा झाला. अण्णांच्या जोड्यांचा आवाज ऐकू येतो की काय याच्याकडे त्याचे सारे लक्ष लागून राहिले होते....

"ए ऊठ, थंडीत असा उघड्यावर काय झोपलास?" कोणीतरी त्यास उठवले.

डोळे चोळीत बावरलेल्या चेहऱ्याने हरी उठला व इकडे तिकडे पाहू लागला. स्वयंपाकघरातील ती चिमणी हातात घेऊन त्याची आई त्याला उठवीत होती. चिमणीचा मंद प्रकाश तिच्या उदास चेहऱ्यावर पडला होता.

"अण्णा आले का? आज फारच उशीर झाला त्यांना." तिचा हात धरून हरी म्हणाला, "चल, आता मला लवकर वाढून टाक. फारच उशीर झाला. मला खेळ पाहायला जायचे होते –"

"जेवायला नव्हे रे, काम आहे जरा." बाजूला तोंड फिरवीत आई म्हणाली. "ते घरी येऊन गेले. आज पुराणात त्यांना तांदळाचा दाणाही मिळाला नाही. सारे लोक तो खेळ पाहायला गेले म्हणे. आणखी एका ठिकाणी कीर्तन आहे तिकडे गेले आहेत. तेथे तरी काही मिळते का नाही देव जाणे. घरात तर मूठभरही तांदूळ नाहीत. त्या लक्ष्मीबाईकडे जाऊन आणतोस थोडे मागून?"

आईच्या चेहऱ्याकडे पाहताच हरीला खेळाचा विसर पडला. मघा आपण उगाचच आईवर रागावलो असे त्यास वाटले. उशास घेतल्यामुळे किंचित् दुमडलेली टोपी त्याने डोक्यावर ठेवली व तो दरवाजापर्यंत गेला.

"पण वडगावला जाणार आहे असं म्हणत होत्या ना त्या तुझ्यापाशी?" त्याने मागे वळून विचारले.

"खरंच." आई एकदम म्हणाली. थोडा वेळ ती गप्प उभी होती. "बरं ये, माझ्या फणेरी पेटीमध्ये काही आहे का पाहू." एक दीर्घ निःश्वास सोडून ती म्हणाली.

हरी मुकाट्याने तिच्या मागोमाग गेला. आईने कोनाड्यातून आपली फणेरी पेटी खाली घेतली. आईचे सर्व जिन्नस त्या पेटीत असत. हळूहळू एक एक जिन्नस ती बाहेर काढू लागली. प्रथम दोन फण्या, मेणाची डबी व कुंकवाचा करंडा काढून तिने बाजूस ठेवला. त्या खाली चारपाच गाठी मारलेले एक पिवळसर फडके होते व त्यातच गुंडाळलेली एक लहानशी पितळी डबी होती. किंचित् हलवून आईने ती उघडली. त्यात असलेला जरा तेलकट झालेला एक आणा चिमणीच्या मंद प्रकाशात झळकला.

"परवा तू आजारी पडला होतास ना, त्या वेळी लक्ष्मीपुढे ठेवण्यासाठी काढून ठेवला होता. बरं, जाऊ दे ते. मागील गोष्टी काय करायच्या आहेत? तू तांदूळ आणतोस का बाजारातून? रात्र बरीच झाली आहे म्हणून –" हरीकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहात तिने ते वाक्य तसेच सोडले.

"हो, हो. जाऊन आणतो ना, मला तांदूळ बाजार माहीत आहे –" बाहेर जात जात हरी म्हणाला.

"मी वाट पाहात राहते हं तुझ्या येण्याची." आई म्हणाली. गल्लीचा कोपरा वळताना हरीने मागे वळून पाहिले. आई दारात उभी होती.

हरीच्या मनात खेळ पाहायला जायचे होते. पण आता खेळ सुरू होऊन किती तरी वेळ झाला असेल! शिवाय आतापर्यंत साऱ्या जागाही भरून गेल्या असतील. हरीच्या डोळ्यांपुढे चित्रे नाचू लागली. ते लोक रंगीबेरंगी कपडे घालून कसे ऐटीत फळ्यांवर इकडून तिकडे हिंडत असतील; शिसाचा कागद चिकटविल्यामुळे हुबेहूब चांदीप्रमाणे दिसणारी लाकडी गदा खांद्यावर टाकून गर्जना करीत भीम येरझाऱ्या घालीत असेल; शंखचक्र घेतलेले पुठ्ठ्याचे दोन हात पाठीला बांधून कृष्ण गाणे म्हणत असेल – त्या खेळातील कृष्ण गाणे फार चांगले म्हणतो असे गुडघ्यापर्यंत धोतर नेसणारा मुलगा म्हणत होता – हो, त्याच्याजवळची ती लालभडक शिसपेन दुसऱ्या कुणाला तरी मिळूनही जाईल...

इतक्यात त्याला आठवले की, खेळ पाहावयाला लोक गेल्यामुळे अण्णांना तांदळाचा एक दाणाही मिळाला नाही, त्यामुळे त्याला स्वतःला व सकाळचा उपवास असलेल्या आईला अजून जेवायला मिळाले नव्हते. त्याची कल्पनाही नव्हती की, खेळ इतका वाईट असू शकतो. त्याने खेळाचा विचारच डोक्यामधून काढून टाकण्याचा प्रयत्न चालविला.

इतक्या रात्री बाजाराकडे येण्याची हरीची पहिलीच खेप होती. पिठासारखे शुभ्र चांदणे जिकडे तिकडे ओतले गेले होते. रस्त्यावर दुसरे कुणी नव्हते. आजूबाजूला इतकी विलक्षण शांतता होती की, त्याच्याच पावलांचा आवाज त्याला स्पष्ट ऐकू येई; व पाठीमागून कुणी तरी येत आहे असे त्यास वाटे. मधून मधून किंचित् तीव्र वाऱ्याची झुळूक येई व त्याचे अंग शहारे. पांढऱ्या शुभ्र चादरीवर वेड्यावाकड्या कापलेल्या काळ्या कापडाचे तुकडे ठेवावेत त्याप्रमाणे लहानमोठ्या घरांच्या सावल्या चांदण्यात दिसत होत्या. अभ्रकाची भुकटी आकाशात फेकून द्यावी त्याप्रमाणे आकाश चमकदार दिसे.

हरी तांदूळ बाजाराजवळ आला. बहुतेक सर्व दुकाने बंद झाली होती. कोपऱ्यातील दुकानात मात्र एक म्हातारी मेणबत्तीच्या अंधुक प्रकाशात पैसे मोजीत होती. पण तेही दुकान लवकर बंद होणारसे दिसत होते. कारण त्याच्याही चारपाच फळ्या लावल्या होत्या.

पळत पळतच हरी त्या दुकानाजवळ आला.

"मला एक आण्याचे तांदूळ दे, म्हातारीबाई. मी पिशवीबिशवी आणली नाही. बरं, सदऱ्याच्या ओट्यात घाल." धापा टाकीत तो म्हणाला.

"इतक्या रातचं का रे?" म्हातारी म्हणाली.

"बरं, कोणते देऊं? पैसे आण."

हरीने तो आणा पेटीवर ठेवला. म्हातारीने तो आणा घेतला व अंगठ्याने स्वच्छ करीत ती मेणबत्तीच्या उजेडात निरखून पाहू लागली.

"अरे चोरा, त्याकरिताच इतक्या रातचं आलास होय?" त्याच्यावर एकदम खेकसत म्हातारी म्हणाली, "अंधारात म्हातारीला फसवतोस काय? चल –" तिने तो आणा रस्त्यावर फेकला व ती पुन्हा आपले पैसे मेणबत्तीच्या प्रकाशात मोजू लागली. तो आणा खोटा होता!

...रेशमाचा धागा तट्कन तुटला. ती तांदूळवाली म्हातारी, तिची अर्धी जळलेली मेणबत्ती, पिठासारखे चांदणे, त्याची वाट पाहात उभी असलेली आई, ते घर वगैरे सर्व पुसट पुसट होत जाऊन शेवटी अगदी दिसेनाशी झाली, व सर्व शून्य झाले. डोळे किंचित् बारीक करून पंतांनी इकडे तिकडे पाहिले. कपबशी घेऊन आनंद-उषा केव्हाच निघून गेली होती. सूर्य मावळल्यामुळे मघाची सोनेरी किरणे नाहीशी झाली होती व पंतांच्या खोलीत उदास अंधार पसरला होता. घाटावरून नदीत टाकलेले निर्माल्य ज्याप्रमाणे पाण्याच्या लहरीवरून तरंगत तरंगत पुढे जाऊ लागते त्याप्रमाणे हवेवर तरंगत मालूच्या गाण्याचे सूर अस्पष्ट ऐकू येत होते,

"ढळला रे, ढळला दिन सखया
संध्या-छाया भिवविती हृदया
अतां मधूचें नांव कासया
लागले रे नेत्र पैलतीरीं..."

# गुलाबाची फुले

माझ्या प्रशस्त बागेत सध्या पुष्कळ तऱ्हेची फुलझाडे आहेत. पण त्या कोपऱ्यातल्या गुलाबाच्या लहान झाडाइतके दुसरे कोणतेच फुलझाड आवडत नाही मला. "किती छान आहे नाही या गुलाबाचा वास!" ज्या ज्या वेळी मन्या बागेत येई त्या त्या वेळी मी त्याला म्हणे. आपल्या मताशी दुसऱ्या कोणाचे मत जुळले की, जास्त आनंद होतो ना? पण मन्या अगदीच जगावेगळा. तो म्हणे,

"बाबू, तू डॉक्टर होण्याच्याऐवजी कवी व्हावयास पाहिजे होतास! अरे, सर्वच गुलाबाची फुले सुवासिक असतात."

पण मला मात्र साहजिकच ती जास्त सुवासिक वाटत. गुलाबाच्या नैसर्गिक सुवासात खाली पुरलेल्या जिमीच्या अंत:करणातून येणारा सुवास मिसळलेला असे. मात्र मी त्यास काही उत्तर देत नसे. उलट एक फूल घेऊन त्याचा मन तृप्त होईपर्यंत वास घेत असे!

पौर्णिमेचा चंद्र उगवताना पाहून किंवा मित्रांना पत्रे लिहून कंटाळा आला आहे कधी? त्या दिवशी तर इंग्लंडला जाऊन आलेल्या माझ्या एका जुन्या सहाध्यायास पत्र लिहीत होतो मी! प्रत्येक वेळी काहीतरी कमी पडल्यासारखे वाटे व पुन्हा लिहावयास कागद घ्यावा लागे. तोच माझ्यापुढे कोणीतरी येऊन उभा राहिला. गोविंदाच होता तो.

"हं, हा घे तुझा पगार." माझ्या पाकिटातून मी दोन नोटा काढून त्याच्या हातावर ठेवल्या आणि अर्धवट लिहिलेल्या पत्राकडे वळलो.

त्याने आपल्या हातातील नोटांकडे पाहिले व नंतर त्या खिशात ठेवून दिल्या. बोलावे की नाही याच्या विचारात पडल्यासारखा दिसत होता तो. "साहेबऽऽ" त्याने चाचरत हाक मारली. मी मान वर करून पाहिले. "रागावलात माझ्यावर?"

मला तर हसूच आवरेना. "छे, छे, रागवायचं काय आहे त्यात? मात्र बेळगावला कधी आलास तर भेटून जा झालं." मी त्यास सांगितले. 'वा साहेब, आलो तर भेटल्याखेरीज राहीन काय?' अशा आशयाचा चेहरा करीत गोविंदा निघून गेला.

नाहीतरी गोविंदा फारच हळव्या स्वभावाचा. माझा जीव दवाखान्यातल्या डांबणुकीने कातावून जाई. नंतर मी बागेत स्वस्थपणे सिगरेट ओढीत बसे. आणि जर मी अर्धा पाऊण तास काही बोललो नाही तर चालू झालीच याची चुळबूळ.

'साहेब, सिगरेट आणून देऊ?' तो विचारी. मी मानेनेच नको म्हणून सांगे.

'वर्तमानपत्र? चहा?' मी पुन्हा मान हलवी.

आणि बिचारा निराशून परत जाई. पण पुन्हा दहा पंधरा मिनिटे गेली की, तो मूळ पदावर येई. आणि मला जरी जरुरी नसली तरी मला काहीतरी मागून घ्यावे लागे. एकदा मी त्याला थट्टेने सांगितले, 'पुढल्या महिन्यापासून तू हो मालक आणि मी होतो नोकर.' मी कशाविषयी बोलत होतो हे त्याच्या तावडतोब लक्षात आले. 'साहेब, तुम्ही न बोलता स्वस्थ बसला की, मला कसंसंच वाटतं बघा.' आणि उत्तर देताना त्याचा गंभीरपणा पाहून तर मला हसे आवरणे कठीणच गेले.

गोविंदासारखा नोकर हातातून जाऊ देताना मला जरा वाईटच वाटले. जपानी माल टिकाऊ व नोकर लोक प्रामाणिक निघणे अपवादादाखलच. आणि गोविंदा खरोखरच अपवाद होता. आपले काम अत्यंत कसोशीने करायचा व मी त्यास म्हटले, "वा! पुस्तकं छान ठेवलीस." किंवा "जाजम छान अंथरलंस." की त्याचा चेहरा अभिमानाने फुलायचा.

अत्यंत श्रम घेऊन अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यास 'पास' म्हणून सांगताच त्याचा चेहरा कसा आनंदाने फुलतो नाही?

तो मला भेटला तेही योगायोगानेच!

त्या वेळी मी नुकताच दवाखाना घातला होता व झाडलोट करण्यास एखादा नोकर पाहून द्या म्हणून माझ्या एका मित्रास सांगत उभा होतो मी. त्या मित्राने एकादा पोऱ्या पाहण्याचे आश्वासनही दिले. मी बागेचे दार उघडून घराकडे वळणार तोच रस्त्यावरल्या एक विडीवाल्याने मला विचारले,

"रावसाहेब, सिगरेट देऊ? गोल्डफ्लेक, हनिड्यू, व्हर्जिनिया —"

मी नको म्हणून सांगताच त्याचा निराशलेला चेहरा पाहून मला किंचित् वाईट वाटले. पण इलाज नव्हता. कारण त्या वेळी मी सिगरेट ओढीत नसे.

आणि दुसरे दिवशी सकाळी तो पोऱ्या मला भेटायला आला.

"तुम्हाला एक नोकर पाहिजे, नाही?" मला नमस्कार करून त्याने मला विचारले.

"पण तुला कोणी सांगितलं?" मी आश्चर्याने विचारले.

"मी-मी तुमचं बोलणं ऐकलं काल!" त्याने चाचरत उत्तर दिले.

खरेच, ती गोष्टच माझ्या लक्षात आली नाही. चलाख चुणचुणीत दिसला म्हणून ठेवून घेतले! तोच हा गोविंदा.

आपल्या म्हाताऱ्या बापास घेऊन तो आपल्या गावाकडे — ते कोठे पंढरपुराजवळ आहे म्हणे — जाणार होता!

मी नेहमीप्रमाणे बागेत सिगरेट ओढत बसलो होतो. त्या दिवशी निर्मलाही बागेतच कायसे करीत होती.

बागेचे कवाड उघडून गोविंदा आत आला. पण तो एकटाच नव्हता. त्याच्या काखेत एक गोजिरवाणे कुत्र्याचे पिल्लू होते.

"साहेब, हे बाईसाहेबांसाठी! –" त्याने त्या पिलास माझ्यापुढे ठेवीत म्हटले.

"ए निर्मले, हे पहा –" मी निर्मलेला हाक मारली व कशासाठी याची काहीच कल्पना नसल्यामुळे चिखलाच्या हातानेच आली ती.

"हे पहा गोविंदाने आपल्या बाईसाहेबांसाठी नजराणा आणला आहे."

"खरंच?" तिने माझ्याकडे आनंदून पाहिले. पण माझ्यावर विश्वास बसला नाही तिचा. "खरंच का रे गोविंदा?" तिने गोविंदाला विचारले.

आणि गोविंदाने 'होय' म्हणताच तिचा आनंद गगनात मावेना! कारण निर्मलेला कुत्र्यांची फारच आवड होती. ती वरचेवर गोविंदाला म्हणायची, "गोविंदा, तुमच्या गावाकडे पुष्कळ कुत्री आहेत म्हणे. तुझे कुणी नातलग आले तर आमच्याकरिता एक आणायला सांग हं." आणि म्हणूनच गोविंदाने मुद्दाम ते आणविले होते!

'साहेब, जातो मी. ओळख असावी गरिबाची.' गोविंदा गहिवरून म्हणाला. त्याने मला व निर्मलेला नमस्कार केला व भरल्या डोळ्यांनी तो निघून गेला.

बिचारा गोविंदा! अगदी दृष्टीच्या टप्प्याबाहेर जाईपर्यंत मी पाहात होतो!

निर्मला जिमीवर – ते नाव ठेवले आम्ही – बेहद्द खूष होती. तिचा बहुतेक रिकामा वेळ त्याच्याकरिताच खर्च होऊ लागला. ती जिमीकरिता नेहमी काहीना काही तरी करीत असायचीच. त्याला झोपण्याकरिता गोणपाट किंवा थंडीत त्याच्यावर घालायला रॅपर, काही ना काही ती करताना आढळायचीच.

जिमी खरोखरच फार शहाणा होता. त्याच्या बसण्याच्या आजूबाजूस कसल्याही प्रकारची घाण दिसायची नाही! तो मधूनमधून लांब कोठेतरी जाऊन येई; पण तो बहुधा घरी किंवा बागेतल्या त्या कोपऱ्यातल्या मातीच्या ढिगावर उन्हात बसलेला असे.

"आमचा जिमी फार शहाणा आहे, नाही?" निर्मला जिमीकडे पाहात अभिमानाने म्हणे.

"मला त्या जिमीच्या भाग्याचा हेवा वाटू लागला आहे. थांब, उद्याच त्याला रजिस्टर पोस्टाने परत पाठवून देतो." मी कंटाळल्यासारखा चेहरा करून मुद्दामच म्हणे. पण ज्या ज्या वेळी जिमी माझ्याजवळ येई, त्या वेळी मलाही म्हणावेसे वाटे, "खरंच, आमचा जिमी फारच शहाणा आहे."

दवाखान्यात काही लहान मुलेही येत. त्यांना जर नेहमीप्रमाणे लहानशा स्टुलावर बसलेला जिमी आढळला नाही की, झालीच सुरू त्यांची प्रश्नमालिका.

"डॉक्टर, अहो डॉक्टर, तुमचा जिमी कुठाय्?"

आणि घरातून जिमीला आणून त्यांच्यापुढे बसवावे त्या वेळी कोठे त्यांचा गोड किलबिलाट थांबे!

एकदा संध्याकाळी जिमी कोठे दिसेना म्हणून मी पाहू लागलो, तोच शेजारच्या बंगल्यातून आवाज आला,

''जिमी, जिमी, चेंडू आण,'' मधूचाच आवाज तो.

मी जिमीला पाहाण्याकरिता त्या बंगल्यात गेलो. तोच सुमतीबाई – मधूची आई – भराभरा व्हरांड्यातून खाली उतरल्या. त्यांनी जवळचा एक दगड उचलला... आणि त्यांनी मला पाहिले!

लगेच त्यांनी पवित्रा बदलला. ''डॉक्टर, तुमचा जिमी फारच शहाणा आहे बघा. मधूने चेंडू टाकून आणावयास सांगितले की, आणतो. मी दगड टाकून पाहणार होते...'' त्यांनी हसत हसत मला खुलासा पुरविला.

''हो होय, भारीच शहाणा आहे.'' मी जिमीला घेऊन येत असताना म्हटले!

मी त्या दिवशी क्लबहून येतो न येतो तोच निर्मलेने माझ्या हातात तार दिली.

''आई आजारी आहे म्हणे.'' निर्मला घाबरलेल्या चेहऱ्याने म्हणाली. मी तार वाचून पाहिली. तावडतोब निघून येण्याबद्दल लिहिले होते.

आम्ही अगदी जरुरीचे सामान एका ट्रंकेत भरले व स्टेशनकडे जाण्याकरिता टांग्यात पाऊल टाकले. अचानक आलेल्या तारेने दोघेही आम्ही घाबरलो होतो. टांग्यात बसल्यावर निर्मला प्रश्नार्थक मुद्रेने म्हणाली, ''जिमी – ?''

खरंच, मी विसरून गेलो अगदी. त्याची काय व्यवस्था करायची? पण निर्मलेनेच मला या अडचणीतून सोडविले. ''थांबा, मी सुमतीबाईंना सांगून येते.''

निर्मलेच्या आईला विषम झाला होता. पण ''डेंजर झोन'' पार पडला होता. तिच्या प्रकृतीला हळूहळू आराम पडत होता. नंतर दोन दिवस राहून आम्ही परतलो.

आम्ही टांग्यातून उतरतो तोच सुमतीबाईंनी आम्हास एक वाईट बातमी सांगितली. ''तुमच्या जिमीनं तीनचार दिवस काही खाल्लंच नाही. पहिल्या पहिल्यांदा बरा वागत होता हो...''

आपण आल्यावर जिमी आपली शेपटी हलवीत स्वागत करण्यास येईल अशी अपेक्षा असलेल्या निर्मलेला तर अतिशय वाईट वाटले.

''कुठं आहे तो?'' तिने अधीरतेने विचारले.

''तीन चार दिवस झाले. तुमच्या बागेतच पडून आहे तो.''

पण निर्मला सबंध वाक्य ऐकावयास राहिलीच नाही. आम्ही लगबगीने बागेत आलो. त्या कोपऱ्यातल्या मातीच्या ढिगावर जिमी पडला होता! त्याच्याकडे पाहून माझ्या अंगावर तर शहारेच आले! पंधरा दिवसांत इतका भयंकर फरक पडू शकतो? पूर्वीच्या

गुटगुटीत जिमीचे भूत होते ते! हाडन् हाड स्पष्ट दिसत होते! त्याच्या खोल गेलेल्या डोळ्यांत मात्र पूर्वीचीच चमक कायम होती!

आम्हाला पाहताच जिमी लगबगीने उठला; पण त्याच्या पायांत शक्ती नसल्यामुळे तो खाली आला. बिचारा जिमी! मला तर पाहवेचना त्याच्याकडे. तो पुन्हा उठला. त्याचे पाय थरथरत होते. पण पुन्हा कोलमडला तो. त्याने आमच्याकडे केविलवाण्या नजरेने पाहिले.

"माझा तरी काय दोष आहे?" जणू तो म्हणत होता. मी ती नजर या जन्मी तरी विसरणार नाही.

कोलमडलेला जिमी पुन्हा उठलाच नाही!

आम्ही त्याला त्याच मातीच्या ढिगाखाली पुरले व त्यावर ते गुलाबाचे झाड लावून टाकले!

आपण नाही का प्रिय व्यक्तीच्या समाधीवर फुले वाहात!नेहमी ताजी फुले मिळावी म्हणून मी फुलांचे झाडच लावून टाकले आहे!

अज्ञानात आनंद असतो!

पण ज्ञानानंतर होणारा ताप किती भयंकर असतो!

एक दिवस मधूचा स्वयंपाकी – त्याने भांडण करून नोकरी सोडली म्हणे – माझ्याकडे औषधाकरिता आला.

आणि तो आला नसता तर बरे झाले असते असे मला वरचेवर वाटते. कारण त्याने बोलण्याच्या भरात एक भयंकर गोष्ट सांगितली.

सुमतीबाईंनी त्या आमच्या जिमीस विष घालविले होते. कारण त्यांना म्हणे कुत्र्यांचा तिटकारा वाटे.

मला दवाखान्यात ती लहान मुले पुष्कळ वेळा विचारतात, "डॉक्टर, डॉक्टर, तुमचा जिमी कुठाय् हो?"

मी शांतपणे त्या गुलाबाच्या झाडाकडे बोट दाखवतो व ती तिकडे आश्चर्याने पाहू लागली की, मी माझ्या उद्योगात दंग झाल्याचे सोंग करतो!

# घडीचे प्रवासी

पहिल्या खेळाचे तिकीट मिळताच आवेशाने गर्दीमधून बाहेर पडणाऱ्या वीराप्रमाणे सदानंद गर्दीमधून पुढे सरकला. प्रत्येक डब्यात डोकावीत त्याने अखेरीस एक डबा पसंत केला व दाराच्या हँडलला धरून तो पटकन् आत चढला. त्याने आपली बॅग खाली ठेवली व ''सुटलो बुवा'' अशा आशयाचा सुस्कारा सोडीत त्याने तोंडावरून हातरुमाल फिरविला.

फलाटावरील पोर्टर, उतारू मागे सरकल्यासारखे ज्या वेळी दिसू लागले त्या वेळी सदानंदाने ओळखले की, गाडी चालू झाली आहे. त्याने हातरुमाल खिशात टाकून डब्यात इकडे तिकडे नजर फिरविली. आपला प्रवास जास्तीत जास्त सुखी करण्याच्या साहजिक उद्देशाने सात जणांनी ताणून दिल्यामुळे बहुतेक बाके अडली होती. या डब्यात अठ्ठावीस माणसांनी बसावे किंवा सात माणसांनी खुशाल झोपावे अशा अर्थाचा मजकूर पाटीवर आहे की काय हे आपला चष्मा जरा नीट पुसून सदानंदाने निरखून पाहिले. पण त्या पाटीचा रंग पावसाळ्यातील नदीप्रमाणे झाल्यामुळे ज्ञानेच्छु सदानंदाच्या माहितीत म्हणण्याजोगी भर पडली नाही. पण नेमक्या त्याच क्षणी ''तुमची परिस्थिति आहे त्याहून वाईट नाही याचे समाधान माना.'' या कोणा तरी किरकोळ महात्म्याने केलेल्या उपदेशाची त्याला आठवण झाली. सध्या आहे त्याहून वाईट परिस्थितीची कल्पना येताच त्याच्या अंगावर शहारे उभारले व त्यामुळे सध्याच्याच परिस्थितीत समाधान मानण्यास तो बिचारा निमूटपणे कबूल झाला.

या लहानशा जगात 'यथा काष्ठं च काष्ठं च' निरनिराळ्या नमुन्याचे लोक एकत्र आले होते. कोपऱ्यातील रुमालवाला म्हातारा कोणी ऐकत नसताही धैर्य न सोडता मोठ्या चिकाटीने आपल्या कुठल्या तरी साहेबाच्या आठवणी सुनावत होता. आपल्याकडे कुणाची तरी नजर वळली आहे हे लक्षात येताच तो चट्कन तिकडे वळे व आपली अर्धी राहिलेली हकीकत मोठ्या उत्साहाने चालू करून त्या बिचाऱ्यास कृतकर्माचा पश्चात्ताप करावयास लावीत असे. त्याच्या डाव्या बाजूला एक मिशाळ गृहस्थ डोक्याखाली ''सकाळ'' चा ताजा अंक घेऊन निजला होता व त्याचा शेजारी त्याला धक्के देत व दर खेपेला धक्क्याच्या डोसाची तीव्रता वाढवीत तो अंक काबीज करण्याचा धीमेपणाने प्रयत्न करीत होता. त्याच्यासमोर बसलेला सोवळ्याच्या काठीसारखा दिसणारा गृहस्थ बाजूच्या गुजराथ्याच्या फराळाच्या डब्यातून काय काय बाहेर पडते हे बगळ्यासारखी मान करून

उघड औत्सुक्याने पाहात होता. सदानंद ज्या बाकावर बसण्याचा प्रयत्न करीत होता त्याच्याच दुसऱ्या टोकाला मध्ये एक निजलेला मनुष्य सोडून एक महाराष्ट्रीय "उघडं गुपित" चा ताजा अंक चाळीत होता.

अशा विविध दृश्यांचे निरीक्षण फुकट जाऊ देण्यास सदानंदाचे मन तयार होईना. त्यातून एखादे तरी तत्त्व काढण्याचा त्याने निश्चय केला. पण काय तत्त्व काढावे याचा त्याला विचार पडला. पण एखाद्या भारदस्त मासिकाचा अंक सहा महिन्यांच्या अवधीनंतर अचानक स्टेशन स्टॉलवर दिसावा त्याप्रमाणे थोड्या वेळाने त्याला अचानक एक कल्पना सुचली. बस्स! मनुष्ये म्हणजे हॉटेलमधील भजी आहेत. प्रत्येकाचा आकार व चव निरनिराळी! किंवा दुसरेही एक तत्त्व काढता येईल –

पण आणखी एक तत्त्व काढण्याच्या मोहाला तो बळी पडला नाही. त्याच वेळी त्या महाराष्ट्रीयाने तो अंक खाली आपटला व आळस झाडून तो खिडकीबाहेर पाहू लागला.

तो अंक लाटण्यास हीच वेळ योग्य आहे हे सदानंदाने ओळखले. तो उठला व त्या प्रवाशासमोरील बाकावर बसण्याची शिकस्त करू लागला. त्याने खिशातून कॅप्स्टन सिगरेटचे पाकीट काढले व त्यातून एक धूम्रिका काढून त्या प्रवाशासमोर धरली. "अहो, सिगरेट घ्या ना" किंचित् हसून तो म्हणाला. "पण ओढता ना तुम्ही? या जगात सिगरेट न ओढणारे काही लोक आहेत याचंच मला आश्चर्य वाटतं. त्या बिचाऱ्यांना कल्पनाही नसते की, संस्कृतसारख्या देवभाषेतसुद्धा धूम्रपानाची थोरवी वर्णन केली आहे. 'धूम्रपानं शतगोदानं एकेक झुरका गंगास्नानम् –"

कित्येक लोकांना वाटत असते की, आपण जे काही बोलतो त्यात शब्दाशब्दामधून काव्यशास्त्रविनोदाचे झरे पाझरत असतात. सदानंदही त्यांपैकीच होता. आपल्या बोलण्यावर बेहद्द खूष होऊन "का? आहे की नाही?" असा चेहरा करीत तो खूप मोठ्याने हसला. त्या भरात त्या झोपलेल्या प्रवाशाने त्याच्याकडे पाहून वेडावाकडा चेहरा केला हे त्याच्या लक्षातही आले नाही. पण हसण्याचा भर ओसरल्यावर आपले ईप्सित अजून साध्य झाले नाही याची त्याला आठवण झाली व सहजपणा दाखवीत तो म्हणाला,

"बरं, तो 'उघडं गुपित'चा अंक टाका ना जरा इकडं."

झुरके घेत सदानंद अंक चाळू लागला.

"हल्ली मराठी मासिकांतील गोष्टी तर अशा असतात! मासिकांत चांगल्या गोष्टी मिळणं म्हणजे कोपऱ्या कोपऱ्यावर झालेल्या एकेक फुटी हॉटेलमध्ये चांगला चहा मिळण्याइतकंच कठीण झालं आहे. अहो, आहात कुठं? कित्येक गोष्टीपेक्षा मीदेखील चांगलं लिहीन –"

"मग का लिहीत नाही तुम्ही?" त्या प्रवाशाने सौम्य उत्सुकतेने विचारले.

धुराच्या भपकाऱ्याने स्वच्छ भिंत धुरकटून जावी त्याप्रमाणे त्या प्रश्नाने सदानंदाचा चेहरा गंभीर झाला. त्याने उद्वेगदर्शक लांबलचक सुस्कारा सोडला. चष्मा काढून हातरुमालाने पुसला व पुन्हा नाकावर चढविला. किंचित् वाढलेल्या दाढीवरून हात फिरवीत त्याने त्या प्रवाशाच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. सदानंद का लिहीत नाही हे जाणण्याची त्याच्या चेहऱ्यावरील उत्सुकता अजून निवाली नव्हती. त्याचा साधाभोळा चेहरा पाहून हा आपली करुण कथा सहानुभूतीने ऐकून घेईल अशी सदानंदाला खात्री वाटली.

''अहो, त्याला कारण नशीब.'' कपाळावर बोट टेकवीत समयोचित गंभीर आवाजाने सदानंद सांगू लागला. ''सदान् कदा पोटाचा प्रश्न मागे लागलेला आहे. तोच सोडविण्यात आमचा सारा वेळ निघून जातो. कर्मभोग म्हणायचा झालं! माझ्या ओळखीचे सारे लोक आज मराठीमध्ये मोठमोठे लेखक म्हणून गाजत आहेत. खांडेकर बेळगावला आले की, आमच्या घरी कॅरम खेळल्याखेरीज जातच नाहीत. परवाच ते आपल्या कुठल्याशा मित्राच्या घरी लग्नासाठी आले होते. पण तेवढ्यातल्या तेवढ्यात वेळ काढून माझ्याकडे आले होते. प्रो. फडके तर बनमस्का एकाच प्लेटमधून खाण्याइतके माझे जिगर दोस्त आहेत. न. चिं. केळकर यांचं नाव तुम्हाला कदाचित् माहीत असेल. तसे ते प्रसिद्ध आहेत. त्यांची माझी चांगलीच ओळख आहे. अत्रेविषयी तर विचारायलाच नको. दोनचार दिवसांपूर्वीच मी त्यांच्याकडून आलो. आदरातिथ्यात माणूस फारच सढळ. जवळजवळ त्यांचं मन दुखवूनच मी निघालो. त्याशिवाय दोनतीन होतकरू लेखकही मी प्रकाशात आणले आहेत.

उदाहरणार्थ, हा अनंत साठेच घ्या —''

''ऑं! अनंत साठे का? परवाच त्याच्या कादंबरीला कुठलसं बक्षीस मिळालं आणि त्या कादंबरीचा चित्रपटही घ्यावयाचा ठरला. तोच की काय?'' त्या प्रवाशाने एकदम उत्सुकतेने विचारले.

अनंत साठेसारख्या लेखकाचा परम मित्र — नव्हे, त्याला जवळजवळ गुरुस्थानी असलेल्या व्यक्तीशी आज आपली योगायोगाने ओळख झाली याचा त्या प्रवाशाला फार अभिमान वाटला. त्याने खिशातून स्वत:चे सिगरेट पाकीट काढून नम्रपणाने सदानंदपुढे केले. ''त्या अनंत साठेशी ओळख आहे? — मग तुम्ही दिसता तसे नाही. पुढील स्टेशनवर चहा घ्यावयाला आठवण करा हं. शिवाय केळीही घेऊ चांगली असल्यास —''

सदानंद विनयाने हसला. तसे पाहिले तर आपण किती मोठे आहो, याची त्याला पूर्ण कल्पना यावी म्हणून तो थोडा वेळ थांबला.

''हा अन्त्या साठे आहे ना, हा आमच्या मिशन स्कूलला आमच्या मागे दोन तीन वर्षे. त्या वेळी जे मराठी मास्तर होते ते फारच सज्जन. तपकिरीच्या डबीवरून आम्ही त्यांची फारच चेष्टा करीत असू. त्या मास्तरांच्या मदतीनं आम्ही एक हस्तलिखित मासिक

चालवीत होतो. त्यात मी त्या अनंत साठेला प्रकाशात आणला. त्याला साधा निबंधदेखील लिहिता येत नसे. मीच त्याला सारे लिहून देत असे. लघुकथेचा शेवट कुठं कसा करावा, भावकथा म्हणजे काय याचे धडे मीच त्याला दिले. कधी तरी भेटला तर विचारा हं त्याला. कृतज्ञता उरली असेल तर मान्य करील बिचारा माझं ऋण –''

आणि त्यानें आपले ऋण मान्य केले नाही तरी आपणास त्याची विशेष पर्वा नाही असा चेहरा करून सदानंदाने सिगरेटचा झुरका घेतला. त्याने हळूच त्या प्रवाशाच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. तेथे आश्चर्य, आनंद दिसत आहे हे पाहून त्याला समाधान वाटले.

थोडा वेळ तसाच गेला. त्या प्रवाशाने सिगरेटचे थोटूक फेकून दिले. त्याने आपले फाउंटन चाचपून पाहिले. पण तेथेच जास्त वेळ हात ठेवल्यास आपण फक्त टोपणच खिशात अडकविले आहे हे बाहेर पडेल म्हणून त्याने चटकन कपाळावरून हात फिरविला. किंचित् खाकरीत तो म्हणाला, ''अगदी माझ्यासारखीच हकीकत आहे तुमची!''

सदानंदाने आश्चर्याने मान वर करून पाहिले. त्या प्रवाशाने एक आवंढा गिळला व तो पुन्हा म्हणाला, ''अगदी माझ्यासारखीच हकीकत आहे तुमची. मला पहिल्यापासून गायनवादनाची अतिशय आवड. पण एका मोठ्या कुटुंबाची सांसारिक जबाबदारी अल्प वयातच माझ्यावर पडल्यामुळं माझ्या साऱ्या आशाआकांक्षा जळून खाक झाल्या. दुःखात सुख एवढंच की, ज्यांना कलेचं ज्ञान आहे अशा पुष्कळांनी माझी योग्यता ओळखली होती. व्ही. शांताराम म्हणून एक सिनेमा सृष्टीतील गृहस्थ आहेत. मोठे हुशार हं. तुम्ही कदाचित ऐकलं असेलही ते नाव. त्यांना माझ्या योग्यतेची चुणूक लवकरच समजली. त्यांनी मला प्रभातमध्ये मा. कृष्णरावांचे सहाय्यक म्हणून बोलावलं होतं. हिमांशु रायनी आपल्या स्टुडियोमध्ये कसली तरी जागा स्वीकारावी म्हणून फार आग्रह केला होता मला. न्यू थिएटर्सचे नीतिन बोस कदाचित् ठाऊक असतील तुम्हाला. सायगल, काननच्या एका चित्रपटात सहाय्यक संगीत दिग्दर्शक म्हणून मला योग्य वाटल्यास मी काम करावे अशी नीतिन बोसनी शांतारामकडून मला सूचना केली होती. मी कळविलं, ''कलेचा निर्व्याज आनंद हेच माझं बक्षीस. त्याशिवाय मला काही नको. खेरीज पंकज मलिक आहेतच. ते आणि मी काही दोन आहोत का?'' पण ते गेले दिवस. परिस्थितीच्या वावटळीमध्ये सापडून कुठच्या कुठं मी उडून गेलो. स्वतःची स्तुती सांगत नाही. अगदी अंतःकरणपूर्वक सांगतो की, काही 'पडलेले' चित्रपट मी स्वतःच्या कर्तृत्वावर यशस्वी केले असते.''

त्याने कोपऱ्यातील म्हाताऱ्यालाही ऐकावयास जातील असे दोन दीर्घ सुस्कारे सोडले. त्यावरून त्याच्या विषण्णतेची-निराशेची सदानंदाला कल्पना आली.

''फार कशाला, या 'उघडं गुपित' वर जिचं चित्र आलं आहे ना, त्या सुनेत्रादेवीचीच गोष्ट घ्या.''

त्या नटीविषयी हा काय नवीन माहिती सांगणार आहे हे उत्सुकतेने सदानंद ऐकू लागला.

"ती आमच्याच गावची. त्या वेळी तेथे ती 'तुळशी' होती. तिच्या नैसर्गिक देणगीची जोपासना करून मीच वळण लावलं. आज ती गाण्याच्या लकेरीवर शेकडो रुपये मिळवते आणि मी मात्र तीस रुपड्यांसाठी हाडांच्या काड्या करतो! मात्र तिने माझे उपकार लक्षात ठेवले आहेत. केव्हाही गेलो तर चार दिवसांच्या पाहुणचाराखेरीज सोडतच नाही."

त्याने पुन्हा एक निःश्वास सोडला. व डोळ्यांत जमलेले अश्रूच जणू थांबविण्यासाठी तो खिडकीबाहेर पाहू लागला.

गाडी स्टेशनमध्ये शिरताच "आलं आमचं वनगाव!" अशी देशाच्या एका भावी आधारस्तंभाने गर्जना केली. इतका वेळ झोपलेले लोक एकदम उठून बसले व आपापले नग एकंदर किती होते याची आठवण करून मोठ्या लगबगीने तितक्या नगांची गोळाबेरीज करू लागले. "अहो, ते गाठोडं आमचं आहे." "अरेच्या! ही पिशवी कुणाची आणि ती आमच्या सामानात कशी?" "ए बाळ, तू कुणाचा आणि मग आमचा दिन्या कुठं गेला?" वगैरे वाक्ये हवेत तरंगू लागली. त्या गडबडीत सदानंदाने "उघडं गुपित"चा अंक सुरळी करून खिशात घातला. आपली बॅग घेऊन तो प्लॅटफॉर्मवर उतरला व आपला मित्र कुठे दिसतो की काय हे पाहू लागला. बन्या बुकस्टॉलजवळच उभा होता.

"ओहो, बन्या, आलास का तू? मला वाटलं, पत्रच मिळालं नाही म्हणून तू थापणार – इति थाप मारणार." सदानंद म्हणाला.

"थापेबाजाला सगळं जग थापेबाजच दिसतं!" इतके अमोलिक सुभाषित तुझ्यावर फेकण्याइतकी वास्तविक तुझी योग्यता नाही, पण नाइलाज आहे, अशा आशयाच्या दुःखीकष्टी मुद्रेने बन्या म्हणाला.

"हो. थाप म्हणताच आठवण झाली." मोठ्या उत्साहाने सदानंद सांगू लागला :

"आज एका बिचाऱ्याला अशी सुंदर थाप मारली! फडके-खांडेकर माझे मित्र आहेत, अनंत साठेला मीच तयार केले, वगैरे वगैरे. तू असतास तर हसून हसून मुरकुंडीच वळली असती! त्याने मात्र भोळेपणाने आपली हकीकत सांगितली. बिचाऱ्याला म्युझिकची आवड होती. त्या सुनेत्रादेवीचा तो अज्ञात गुरू. व्ही. शांतारामनी त्याला एकदा बोलावलं होतं म्हणे! पण आज काय त्याची स्थिती! दुर्दैवी बिचारा! तो बघ, त्या पोस्टाच्या खांबाजवळ उभा आहे तोच."

"कोण तो? केसांवरून हात फिरवीत उभा आहे तो?" बन्याने आश्चर्याने विचारले.

"त्याला संगीताचं ज्ञान आहे? आणि व्ही. शांतारामनी त्याला प्रभातमध्ये बोलावलं होतं? अरे, माझं हृदय तरी चालू आहे का बघ जरा! तो जर "यमुनाजळी खेळू खेळ" म्हणू लागला तर त्या शोकगीतानं भावनाप्रधान लोक ढसाढसा रडू लागतात व यशवंतांची

"आई" म्हणू लागला तर मोठ्या आवेशाने एकमेकांत लढू लागतात! हा त्याचा व संगीताचा परिचय. तुझी थाप त्यानं सव्याज परत केली. अरे, तो कोण आहे माहीत आहे? टिळकवाडीच्या 'कर्नाटक भुवन'मधील वाढप्या. बारा रुपये पगार. जेवणखाण फुकट!"

निदान एक मिनिटभर तरी सदानंदाचा चेहरा पाहण्याजोगा नव्हता असे म्हणण्याचे धैर्य कोणत्या मर्त्य प्राण्याला झाले असते?

निबंध
३६६२
२६५५६
१५७।९२

# हृदयातील अश्रू

गाडी यावयास अजून बराच अवकाश होता. राजा विमनस्कपणाने थर्ड क्लास वेटिंगरूममध्ये एका बाकावर बसला होता. त्याचे लक्ष सहज समोरच्या जाहिरातीकडे गेले. त्या जाहिरातीवर पाच सहा वर्षांच्या एका युरोपियन मुलीचे रंगीत चित्र होते. तिचे चंचल डोळे व मोहक पारदर्शक हास्य पाहून राजाला वाटले,

''सोनेरी केसांच्याऐवजी जर काळेभोर केस असते तर ही पोरगी अगदी आपल्या उषेसारखी दिसली असती –''

वेटिंगरूममधील हॉटेलमध्ये तुरळक चार दोन गिऱ्हाईके दिसत होती. राजालाही चहा घेण्याची तल्लफ आली. तो उठला व त्याने एक कप मागविला. गुडघाभर कपातील वशीभर चहा संपवून तो परत फिरणार तोच शेजारच्या रुमालवाल्या इसमाने त्यास थांबविले.

''अहो, काड्याची पेटी आहे का जरा?''

राजाला वाटले, या मनुष्याला आपण कुठे तरी पाहिले आहे. जरा विचार करताच हॉटेलमध्ये 'लोकशक्ति' वाचणारा इसम तो हाच असे त्याच्या ध्यानात आले. पण त्याने आपणास काहीतरी विचारले आहे हे आठवून राजा म्हणाला,

''छे हो, नाही.''

''काय करायचं, आमच्या त्या पारूनं कुठं हरवली कोणास ठाऊक.'' मान हलवीत रुमालवाला म्हणाला.

पारू म्हणताच राजाला एकदम काल रात्रीची आठवण झाली.

एकदा झोपल्यावर तो बहुधा जागा होत नसे. पण काल तो अचानक जागा झाला. परसातल्या रीझ टॉकीजमधील गाणी ऐकू येत नव्हती. वीणापाणीच्या देवळातील भजनही बंद झाले होते.

''निदान साडेबारा तरी वाजून गेले असतील.'' त्यास वाटले.

इतक्यात देवळाच्या अंधाऱ्या गाभाऱ्यातून घंटेचा आवाज यावा त्याप्रमाणे मध्यरात्रीच्या शांततेतून कोणाच्या तरी रडण्याचा आवाज ऐकू आला.

''पारू ग माझी... कशी गेलीस ग सोडून मला...''

परसात एक सखू नावाची मोलकरीण राहात होती. तिची चवदा पंधरा वर्षांची उफाड्याची मुलगी देवीने सकाळीच वारली होती. तेव्हापासून बिचारीच्या डोळ्याला क्षणभरही खळ नव्हता. ती सारखी रडत होती...

"पारू ग माझी..."

"काय लोक खुळे आहेत! उगाच एखाद्यासाठी अश्रू ढाळून काय फायदा? अश्रू ढाळण्याने गेलेले माणून परत थोडेच मिळते?"

चादर अंगाभोवती गुंडाळून घेत राजा किंचित उपहासाने स्वत:शीच म्हणाला.

...स्टेशनावरील पारूकडे त्याने जरा निरखून पाहिले. तिच्याही तोंडावर देवीचे वण होते. त्याच्या मनात विचार चमकून गेला –

साऱ्याच पारू नावाच्या मुली देवीच्या तडाख्यात सापडतात व त्यांपैकी काही –

पण त्यावर जास्त विचार करण्यास वेळच मिळाला नाही. धापा टाकत गाडी स्टेशनमध्ये शिरल्याने मुंग्यांच्या जमावावर फुंकर मारावी त्याप्रमाणे साऱ्या उतारूंमध्ये एकच गडबड उडाली. एक धोतर व एक शर्ट असलेली आपली पिशवी राजाने घेतली व तो डब्यात जाऊन बसला.

आज सकाळी जरी प्रत्यक्ष चेरोने सांगितले असते की, आज तुम्हांस प्रवासयोग आहे तर राजाने हसून उत्तर दिले असते,

"काय राव थापा मारता! रजनीचं नुकतंच पत्र आलं आहे की, आपण व उषा ठीक आहोत. तात्या तर परवाच इथं राहून गेले. मग बोला, कसला प्रवासयोग संभवतो?"

पण जीवन म्हणजे तर्कशास्त्राने जुळवलेल्या दुव्यांची एक साखळी नव्हे हे त्यास समजून चुकले.

त्याचे असे झाले.

तो कधीच सात वाजल्याखेरीज उठत नसे. सात वाजता तरी तो उठत असे कारण त्यावेळी रजनी त्याला उठवीत असे. आता रजनी गेली होती आपल्या आईकडे. आणि राजा मनसोक्त लोळण्याची आपली हौस पुरेपूर भागवून घेत असे.

आज तो आठ वाजता उठला. त्याने तोंड धुवून सरळ कॅफे रीझचा रस्ता धरला. स्टोव्ह पेटवून, आधण ठेवून चहा करण्याच्या उपद्व्यापात चहा पिण्याची जी तलफ असते ती पार नाहीशी होते असा त्याचा अनुभव होता.

वेटरने आणलेला चहा मोठ्या ऐटीने घेत राजाने विचारले, "काय रे, 'लोकशक्ति' कुठं आहे?"

वेटरने हॉटेलच्या एका कोपऱ्यात बोट दाखविले. एक रुमालवाला इसम वाचण्यात गढून गेला होता.

"तुम्हाला नाही मिळायचं लवकर." जाता जाता वेटर कानडीमध्ये म्हणाला.

चहाचे घोट घेत घेत राजाने बराच वेळ मार्गप्रतीक्षा केली. पण अर्धा तास झाला तरी त्या व्यक्तीचे एक पानही पूर्ण झाले नव्हते.

"चहा प्यायला येतात की, वर्तमानपत्रं वाचायला कुणास ठाऊक?" काउंटरवर पैसा टाकून जाता जाता राजा पुटपुटला. पण जेव्हा त्याच्या लक्षात आले की, आपणही त्याच कामाकरिता चांगला अर्धा तास थांबलो होतो, तेव्हा त्याचे त्यासच हसू आले.

लोकांचे चेहरे दिसतात आपणाला, पण आपला चेहरा दिसावयास आरसाच हवा एखादा.

घरी येऊन पाहातो तो एक निळे पाकीट सोप्यावर पडले होते.

"ऑं! पोस्टमन येऊन गेला इतक्यात!" पाकीट उचलीत आश्चर्याने तो उद्गारला.

अक्षर रजनीचेच होते. हजार नमुन्यांत त्याने ते शोधून काढले असते. तोंडाने "राधिका चतुर बोले" गुणगुणत, आतील कळ्यांना धक्का पोहोचू नये म्हणून हलक्या हाताने संत्र्याची फोड सोलावी त्याप्रमाणे हलक्या हाताने त्याने पाकीट फोडले. पत्र अगदी घाईने लिहिल्यासारखे दिसत होते. शेवटच्या "रजनी" मधील नी ऱ्हस्व झाली होती!

पत्र वाचून होताच गाणे तोंडातल्या तोंडातच राहिले. बाजूच्या खुर्चीवर मटकन् बसून त्याने पुन्हा एकदा पत्र वाचून पाहिले.

उषा आजारी असल्यामुळे तावडतोब निघून येण्याविषयी रजनीने लिहिले होते!

अगदी जवळची गाडी दोन दहाला होती. त्याने दहाची नोट खिशात घातली. एक शर्ट व एक धोतर पिशवीत कोंबून दोन दहाची गाडी गाठण्यासाठी तो दीडला पाच मिनिटे असताना स्टेशनवर आला

रजनीच्या घरी राजा पोहोचला त्यावेळी बरीच रात्र झाली होती. सोप्यावरील एका खुर्चीवर त्याने पिशवी टाकली व तो आत उषेच्या अंथरुणाजवळ गेला. अंथरुणाच्या बाजूला रजनीची आई मुसंब्याच्या फोडी सोलीत होती.

उषेच्या अंगात ताप होता. पण नुकताच तिचा जरा डोळा लागला होता. पाय न वाजविता रजनी खोलीबाहेर आली.

"तुम्ही जेवून जरा झोप घ्या. उषेचा जरा डोळा लागला आहे. नंतर जरूर लागल्यास बोलावीन." ती हलक्या आवाजात म्हणाली.

"मला भूक नाही. लागला तर थोडा चहाच घेईन." राजा म्हणाला.

सोप्यावर येऊन त्याने कोट काढून ठेवला. भिंतीवर जिकडे तिकडे कॅलेंडरे लावली होती व तुळ्यांवर निरनिराळी अवतरणे लिहिली होती. पण त्याकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितीत राजा नव्हता. एम. एस. एम.च्या प्रवासाने तो अगदी गळून गेला होता. त्याने तक्या जरा सरळ केला व तो जरा आडवा झाला.

...ज्या गोष्टीची त्याला कल्पनादेखील असह्य झाली असती ती गोष्ट घडली होती. शेजारच्या दोनचार स्त्रिया रजनीला सांत्वनपर गोष्टी सांगत होत्या. राजाकडे कोणाचेच लक्ष नव्हते. सोप्यावरील कोपऱ्यात बसून तो सारा प्रकार पाहात होता. इतक्यात त्याच्या लक्षात आले की, यापुढे आपण बाहेरून आल्यावर उषा कधीच सामोरी येणार नाही. या जगात ती कधीच पुन्हा दिसणार नाही.

या जाणिवेने न कळत त्याच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकू लागले. त्याला माहीत होते की, अश्रू ढाळण्याने गेलेले माणूस परत मिळत नाही. तरी अश्रू ठिबकत होते!

...तो बावरून एकदम जागा झाला व किलकिल्या नजरेने इकडे तिकडे पाहू लागला.

"असे अवघडत काय झोपला? उषेला घाम येऊन गेला. घाम आल्यानंतर भीती नाही असं दुपारी डॉक्टर म्हणत होते–" रजनी अधीरपणे सांगत होती.

राजाने आळस झाडून टाकला व तो रजनीच्या मागोमाग निघाला. त्याची नजर तुळईवरील एका वाक्याकडे गेली. "अश्रू जरी डोळ्यांवाटे बाहेर पडत असले तरी त्यांचे उगमस्थान हृदयच आहे–"

"पारू ग माझी..." सखू मोलकरणीचे रडणे ऐकू आल्याचा राजास एकदम भास झाला.

"साडेबारा तरी वाजून गेले असावेत, नाही?" बेफिकीरपणा दाखवीत तो रजनीला म्हणाला.

# प्रामाणिक जग !

"आज उठल्याबरोबर आपण कुणाचे तोंड पाहिले होते कुणास ठाऊक!" राजा जरासा चिडून म्हणाला. आणि त्याला कारणेही तशीच होती.

आज साडेतीनच्या गाडीने त्याचा मामा यावयाचा होता म्हणून भर उन्हातान्हात टिळकवाडीहून तो स्टेशनवर आला होता. इतका उष्मा होत होता की, जाताना हिमालय ड्रिंक हाऊसमध्ये मामाच्या पैशाने आइस्क्रीम खावयाचे त्याने ठरविलेच. पण काय झाले कुणास ठाऊक, त्या गाडीने त्याचा मामा आलाच नाही. स्वत:वरच चरफडत राजा टांगा स्टँडजवळ उभा होता. आणि ज्यावेळी टांगेही जाऊ लागले तेव्हा तर सारखा गळत असलेला घाम पुसावा की, स्वत:वरच खूप संतापावे हेच त्याला समजेना!

दुसरी गाडी सातला होती. तोपर्यंत वेळ काढण्यासाठी "माणूस" च्या मॅटिनीला तरी जावे म्हणून तो प्लाझा सिनेमापाशी आला. पण तिकिटे सुरू होण्यापूर्वीचीच ती गर्दी पाहून तो हताश झाला. त्याला वाटले, जर इंटरमध्ये बसून आपणाला चित्रपट पाहावयाचा आहे तर निदान आणखी पंधरा दिवस तरी थांबावयाला पाहिजे. या लोकांना अगदीच शिस्त नाही. त्या तिकिटाच्या कचेरीपुढे असा घोळका करून दंगा चालविला तर माणसांनी तिकिटे विकत घ्यावयाची तरी कशी? असे जळफळत टिळकवाडीला परत येण्यासाठी तो निघाला. आणि तो मामाच्या हॉटेलमधील प्रसंग –

त्याने आत जाऊन सिंगल चहाची ऑर्डर दिली. पोराने नाक नसलेल्या कपातून का होईना, लगेच चहा आणून दिला. काउंटरवर एक पैसा टाकून तोंडावरून हातरुमाल फिरवीत बाहेर पडताना त्याला वाटले, "निदान हे काम तरी मनाप्रमाणे झाले. नाहीतर चहा म्हणताच काळी कुळकुळीत मद्रासी कॉफी आणून ठेवायचा."

थोडे अंतर गेल्यावर त्यास कोणीतरी थांबविले.

"साहेब, तुमची छत्री राहिलीच की. दुसऱ्या कोणीतरी नेली असती तर मग?" एक कोकणे पोर धापा टाकीत म्हणाले.

"च् च्, काय विसरभोळा रे मी –" म्हणत राजाने त्या पोराला एक आणा दिला व मनातल्या मनात त्याचे खूप आभार मानले. कारण परवाचे दिवशी तीन रुपये नऊ आण्याला त्याने ती विकत घेतली होती.

"वास्तविक तो पोरगा किती गरीब असेल! माझी छत्री परत करण्याची त्याला काय जरूरी होती! छे, या जगात थोडे का होईनात, पण प्रामाणिक लोक आहेत व ते आहेत म्हणून जगाचे व्यवहार सुरळीतपणाने चालले आहेत." झाल्या प्रसंगावर विचार करता करता त्याने निष्कर्ष काढला होता.

घरी आल्यावर त्याने अंगातील कोट पलंगावर फेकला. ईझिचेअर खिडकीजवळ ओढून घेतली व तीत अंग टाकले.टेबलावरील एका पातळ वहीने वारा घेत घेत तो चिडून म्हणाला, "आज उठल्याबरोबर आपण कुणाचे तोंड पाहिले होते कुणास ठाऊक!"

त्याने टेबलावरील 'दूत' या स्थानिक वर्तमानपत्राचा अंक उघडला. वास्तविक तो अंक चार दिवसांपूर्वीच आला होता. पण शेजारच्या शंकररावांनी आल्याबरोबर लगट करून तो अंक नेला होता. तो त्यांनी आज आणून दिला. वरच्या पानाचे दोन तुकडे झाले होते. शिवाय मधल्या पानाचा पत्ताच नव्हता! ते काही नाही, या फुकट्या लोकांचा उपद्रव बंद केलाच पाहिजे. पुढल्या आठवड्याला अंक न्यावयाला शंकरराव येऊ देत तरी, त्यांना स्पष्ट सांगावयाचे की –

पण पुढील आठवड्याला शंकररावांना काय स्पष्ट सांगावयाचे हे ठरविण्याची त्याने तसदी घेतली नाही. त्याचे लक्ष एका जाहिरातीवर खिळून राहिले होते.

"गणपतीच्या देवळाजवळ काल संध्याकाळी एक लेदर पाकीट हरवले आहे. आत थोडे रुपये व बाकीची सुटी नाणी आहेत. परत आणून देणाऱ्यास योग्य बक्षीस मिळेल." आणखी खालची सही वाचल्यावर तो जास्तच चिडला. त्याचा मित्र दत्ताराम केळकरची होती ती!

त्यावेळी जर दत्ताराम समोर असता तर राजाने त्याची टोपी काढून रागाने खिडकीतून दूर फेकून दिली असती. काल संध्याकाळीच त्याने कॅफे डिलाइटमध्ये राजाला चांगलीच 'टोपी घातली' होती. शिवाय आजच सकाळी त्याने इडली क्लबमध्ये राजाला गाठले होते आणि दोन्ही वेळी त्याने आपल्या हरवलेल्या पाकिटाविषयी एक शब्दही उच्चारला नव्हता. राजाने त्या वर्तमानपत्राची घडी घालून कोटाच्या खिशात घातली व दत्तारामकडे जाण्यासाठी तो निघाला.

दत्ताराम त्यावेळी चहा घेत होता. राजाला पाहताच त्याने कप खाली ठेवला व आश्चर्याने विचारले, "काय रे, इकडे कुणीकडे?"

"आलो होतो तुझ्याकडेच." खिशातून अंक काढून शांत राहण्याचा प्रयत्न करीत राजा म्हणाला. पण त्याची कृत्रिम शांतता एकदम ढासळली व तो उसळून म्हणाला, "दत्त्या, गाढवा, ही काय भानगड आहे? काल व आज भेटूनही ह्याबद्दल मला एका शब्दानेही कळविले नाहीस –"

"वत्सा, शांत हो –" हसून दत्ताराम म्हणाला, "चहा वगैरे काही घेणार का?"

राजाने मान हलवूनच "नको" म्हणून सांगितले.

"बरं, नको तर नको. नाहीतरी चहा घेणे प्रकृतीला फारच वाईट. त्यात जे निकोटिन की टॅनिन कसलेसे विष असते त्याचा शरीरावर फार भयंकर परिणाम होतो." आपला चहाचा कप उचलून एक घोट घेऊन गंभीरपणाने दत्ताराम म्हणाला. "त्याशिवाय जठर, आतडी, पित्ताशय, फुफ्फुसे, श्वासनलिका – बरं ते जाऊ दे. या पाकिटाविषयी म्हणशील तरी भानगड अशी मुळी नाहीच ती. दुसरी गोष्ट म्हणजे मी तुला सारी हकीकत सांगणारच होतो –" आपल्या वक्तव्याचा राजावर बराच परिणाम झालेला पाहून दत्ताराम मोठ्या ऐटीत थांबला.

इतक्यात दत्तारामाचा गडी अन्याबा आत आला.

"बाहेर कुनी आल्याती. तुमास्नी भेटणार आहे म्हणे तो म्हातारा –" तो म्हणाला.

"म्हातारा ? मला भेटायला कोण आला आहे बुवा हा म्हातारा ?" भुवया वर चढवीत दत्ताराम म्हणाला. पण लगेच त्याने बेफिकीरपणाने अन्याबाला सांगितले, "बरं, कुणी का असेना; लावून दे त्याला."

थोड्याच वेळात एक म्हातारा आत आला. दत्तारामाने त्यास बसावयास सांगितले व राजाकडे "कोण असावी बुवा ही स्वारी" अशा आशयाचा दृष्टिक्षेप केला.

त्या म्हाताऱ्याने एक पिवळसर रुमाल सैलसा बांधला होता व गुडघ्यापर्यंत पोहोचणारा पेन्शनरी कोट घातला होता. पायात त्याने निळे लोकरीचे मोजे घालून त्यावर तपकिरी कॅनव्हासचे बूट घातले होते. त्याने पांढऱ्या कापडाची छत्री खुर्चीला टेकवून ठेवली व भीत भीत तो खुर्चीच्या कडेला बसला. "चार दिवसांपूर्वी मला हे पाकीट सापडले." खिशातून एक पाकीट काढून टेबलावर ठेवून कोणाला उद्देशून बोलावे हे न समजल्यामुळे दोघांनाही उद्देशून तो म्हातारा म्हणाला, "तुमची जाहिरात मी आज सकाळी पाहिली. मी जाहिरात बहुधा वाचीत नाही. पण आज सकाळीच कर्मधर्मसंयोगाने तिकडे नजर गेली."

दत्तारामाने ते पाकीट हातात घेतले व मोठ्या बारकाईने खाली वर करून पाहिले. थोड्या वेळाने त्याने समाधानाचा सुस्कारा सोडला व वर पाहिले.

"निदान हे पाकीट तरी माझेच आहे. आता आपण आतील पैसे पाहू." तो म्हणाला. त्याने आतील पैसे बाहेर काढले. पाच पाच रुपयांच्या दोन नोटा, एकेक रुपयाच्या चार व सव्वादोन रुपयांची मोड होती.

"या जगात अजूनही प्रामाणिक लोक आहेत म्हणावयाचे." त्या म्हाताऱ्याकडे कौतुकाने पाहात दत्ताराम म्हणाला, "बरं, तुम्हाला काय देऊ म्हणता ?"

म्हाताऱ्याने चाळशी काढून धोतराने पुसली. रुमाल उगाचच सारखा केल्यासारखा केला. "काय द्यायचं !" हसण्याचा प्रयत्न करीत तो म्हातारा म्हणाला, "दिवाळी आली आहे. घरी कच्चीबच्ची आहेत. दोनतीन रुपये द्या."

"बरं ही पाचाची नोटच घ्या तुम्ही." दत्ताराम म्हणाला. "या जगात प्रामाणिक फारच थोडे आहेत. लोकांच्या खिशातून पडलेली सिगारेट पट्कन उचलून शिलगावणारे साहेब आहेत. अशा दिवसांत रुपयांचे पाकीट कोण परत आणून देतो ? घ्या ही तुम्ही पाचाची नोट –"

त्या म्हाताऱ्याने त्याचे आभार मानून ती नोट घेतली. "गरिबावर फारच उपकार आहेत." जाता जाता अस्पष्टपणे तो म्हणाला. त्याने एकदा दत्तारामकडे कृतज्ञतेने पाहिले, व पुन्हा नमस्कार करून तो निघून गेला.

राजाला आधीच पटले होते की, थोडे का होईना, पण या जगात प्रामाणिक लोक आहेत. त्याला दुसरा एक नमुना पाहावयास मिळाला इतकेच. पण दत्तारामची वागणूक मात्र त्याला सर्वस्वी नवीन होती. त्याला कल्पनाही नव्हती, दत्ताराम इतक्या मोठ्या अंत:करणाचा असेल! त्याने त्याच्याकडे जवळजवळ आदराने पाहिले.

"असा काय पाहतोस माझ्याकडे ?" दत्ताराम त्याच्या पाठीवर थाप मारीत म्हणाला. "प्रामाणिक असल्याखेरीज चालावयाचं नाही महाराजा! आता तुला सांगावयाचं; म्हणजे पहिली गोष्ट, माझे पाकीट हरवले नाही. तुला माहीतच आहे की, त्या 'दूत'चा 'व्यवस्थापक-जाहिरातखाते' माझा अगदी दोस्त आहे. त्याच्याकडे सध्या एकही छोटी जाहिरात नाही. पण आपले खाते मोठ्या जोरात चालले आहे हे दाखविण्यासाठी कसल्या तरी तीन चार जाहिराती द्यावयास त्याने दोघाचौघांना सांगितले. वास्तविक या मराठेला मोटर विकत घ्यावयाची नाही, नाना जोशीला 'अव्यंग, सुस्वरूप, वयाची अट नाही' अशी एखादी वधू नको आहे किंवा माझेही एखादे पाकीटही हरवले नाही. म्हणूनच पाकिटात किती रुपये आणे होते याचा नक्की आकडा दिला नाही. त्या व्यवस्थापकाने जाहिराती द्यावयास सांगितल्या व आम्ही दिल्या. नंतर पंधरा पंधरा दिवसांच्या अंतराने "या सद्गृहस्थांना आमच्या जाहिरात खात्यापासून फायदा झाला." म्हणून आमची काल्पनिक पत्रे प्रसिद्ध होणार होती. पण या अजब म्हाताऱ्याने खरोखरच एक पाकीट आणले. कुणाचे आहे कुणास ठाऊक ? आहेत, अजून या जगात थोडे का होईनात, पण प्रामाणिक लोक आहेत..." नोटा पाकिटात ठेवून पाकीट कोटात व्यवस्थित रीतीने ठेवीत दत्ताराम हसत म्हणाला.

पण राजाचे तिकडे लक्ष नव्हते. Queen Christiana चा दुसरा शो आज दत्तारामच्या गळ्यात घातलाच पाहिजे असा पवित्र निश्चय तो करीत होता!

# दुबळे जीव

अखेरीस संतापाने विठाने राजाला एक चांगलाच धपाटा दिला. राजाने तिच्या पायाला घातलेला आपल्या हाताचा विळखा सोडला. त्याच्या वरील ओठांची दोन्ही टोके खाली वळली व खालचा ओठ क्षणभर थरारला आणि दुसऱ्याच क्षणी त्याचे डोळे पाण्याने भरून आले. रडत रडत तो कोपऱ्यात घातलेल्या अंथरुणावर जाऊन पडला. त्याने भिंतीकडे तोंड केले व दोन्ही हातांनी आपले डोळे झाकून ठेवले. त्याचे मुसमुसणे बराच वेळ ऐकू येत होते.

राजा मघापासून तिच्या पाठी लागून काहीं तरी मागत होता. पण त्याला काय हवे हे काही केल्या तिला समजेना. बाकीच्या वेळी तिने त्याचे शब्द समजावून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला असता, त्याच्या विशिष्ट शब्दकोशाची वरचेवर उजळणी केली असती किंवा अगदी शेवटचा प्रयत्न म्हणून हसून 'घे तुला काय पाहिजे ते.' म्हणत त्याला कडेवर घेऊन घरभर फिरवले असते. पण आज ती त्या मन:स्थितीत नव्हती. तिने रागाने फळीवरील लाकडी बैल त्याच्यापुढे आदळला व एक बत्तासा त्याच्या अंगावर फेकला. पण राजा काही केल्या गप्प बसेना म्हणून चिडून जाऊन विठाने त्याला एक धपाटा दिला.

'तुझी कटकट काय कमी होती!' अशा आशयाचा दृष्टिक्षेप करून ती शेगडीकडे वळली. भाताचे तपेले खाली उतरताना तिने शेगडीत पाहिले. थोड्या वेळापूर्वी लालभडक रसरसलेले निखारे आता राखेखाली दडून गेले होते. थोड्या वेळाने त्यांचीही राख झाली असती. तपेलेही हाताला किंचित् थंड लागले. तिने फुंकर घालून राख झाडली. पुन्हा दहाबारा कोळसे घालून भाताचे तपेले पुन्हा ठेवून दिले.

दत्ताराम अजून आला नव्हता. तो नेहमीच उशिरा येत असे. पण त्याची ती नेहमीची वेळही आज टळून गेली होती. तिच्या पोटात तर भुकेने कासावीस होऊ लागले होते. जांभई देत शिवत असता मघा अर्धेच टाकलेले लुगडे तिने पुढे घेतले व ती शिवू लागली.

ती स्वत: ज्यावेळी लहान होती त्यावेळी आई कामावरून आल्याबरोबर तिला गरम गरम चहा तीच करून देत असे. ऊन चहा बशीत ओतून त्यावर फुंकर मारताना तिची आई आपला सुरकुतलेला हात तिच्या पाठीवरून फिरवीत म्हणायची, 'पोरी, तुला शंभर वर्षे औक्ष लाभो.' एरव्ही काचेच्या गोळ्याप्रमाणे दिसणारे तिचे डोळे त्यावेळी आत एक

लहानशी मेणबत्ती लावल्याप्रमाणे चमकत. ती आई गेली. तिची थोरली बहीण गेली. सगळे गेले. फक्त विठा एकटी राहिली. तिची वाट पहात राहून तिच्यासाठी काही तरी करावयास तयार असणारे कुणी उरले नव्हते...

घरातील तांदळाचा साठा कालच संपल्यामुळे आज सकाळी कामाला जाताना तिला उपाशीच जावे लागले. कामाचे पैसे हातात येताच तिने कोपऱ्यावरील दुकानात तांदूळ घेतले, पण कामावरून आल्याबरोबर तिला अगदी गळून गेल्यासारखे वाटत होते. तांदूळ तसेच टाकून अंथरलेल्या जाजमावर अंग पसरावे असा मोह तिला क्षणभर झालाही. 'हं! माझा जन्म दुसऱ्यांसाठी राबण्याकरिताच झाला आहे!' असे उद्वेगाने म्हणत तिने मोठ्या नाखुषीने व कष्टाने तांदूळ धुतले व शेगडीवर ठेवले. कारण जरा काही चुकले, की वस्सकन् अंगावर येणाऱ्या दत्तारामाची तिला विलक्षण भीती वाटत असे.

त्याचे ते ओरडणे ऐकताच आपल्या हातापायातील शक्तीच गळून गेल्यासारखी तिला वाटे व तिला अगदी दुबळे वाटू लागे. तिचे हातपाय कापू लागत व मान वर करून बघण्याचेदेखील तिला धैर्य होत नसे. दत्ताराम सांगेल त्याप्रमाणे ती वागत असे. पण तो गेल्यानंतर मात्र तिला आपल्या दुबळेपणाची शरम वाटू लागे. अशा परिस्थितीत जगण्यापेक्षा जिवाचं काही तरी बरं वाईट करणे जास्त बरे असे तिला वाटू लागे व दोन्ही हातांनी तोंड झाकून ती असहायपणाने रडू लागे...

लग्न झाल्यानंतर सहाच महिन्यांत ती त्याला भिऊ लागली. पहिले सहा महिने कसे, शेतातून भुर्रदिशी उडून जाणाऱ्या पाखराप्रमाणे उडून गेले! तिच्या साऱ्या मैत्रिणी तिला म्हणत,

'विठा, तू फार नशीबवान आहेस बाई; तुझ्या घरधन्याला कसलंही व्यसन नाही, तुला रोजचा मार नाही. अगदी राजाराणीचा संसार आहे तुमचा –'

ते ऐकून विठाला आनंदाच्या गुदगुल्या होत व तीही मनात म्हणे, 'खरंच, किती सुखाचा संसार आहे माझा. जणू हिरव्याचार जाळीमध्ये उठून दिसणारे काळेभोर टपोरे करवंदच!'

पण नंतर तिला खऱ्या परिस्थितीची जाणीव झाली. दत्ताराम श्रीपती मेस्त्रीच्या संगतीला लागला होता. त्याच्या घरी येण्याच्या वेळा बदलू लागल्या व पगाराच्या दिवशी तिला पूर्वीइतके पैसे मिळेनात. एक दिवस दत्ताराम बारा वाजता घरी आला. दरवाजा काढताना तिला त्याच्या तोंडाचा भपकन् वास आला व तिने ओळखले की, जे फळ आपण रसरसलेले समजत होतो ते पार डागळून गेले आहे.

दोन दिवसांपूर्वीचाच प्रसंग तिला आठवला. तो अकरा साडेअकराला घरी आला व त्याने डोक्यावरील टोपी नेहमीप्रमाणे पेटीवर फेकली व बुभुक्षित नजरेने इकडे तिकडे पाहात तो जेवायला बसला.

'भाताच्या नुसत्या गारगोट्या झाल्या आहेत. घरी बसून भातदेखील सरळ करता येत नाही?' तो खेकसला, 'उगाच नाही मी तुझ्या पोटाला घालत! सगळं काम चोख झालं पाहिजे.'

'खरंच, पोटाला घालतो!' विठा कडवटपणाने स्वत:शी म्हणाली. घर कोणत्या स्थितीत चालले आहे याची सारी हकीकत त्याला एकदा सांगावी असे तिच्या मनात क्षणभर येऊन गेले. गेल्या महिन्यात तिला त्याच्याकडून एक पैही मिळाली नाही. आपल्या कामावर मिळालेल्या पैशांतून तिने घरभाडे दिले. दूधवाली व दुकानदार यांना गप्प बसविता बसविता तिच्या नाकी नऊ आले होते. मध्यंतरी राजाला ताप आला होता. त्यावेळी त्याच्याशी दोन शब्द बोलायलाही दत्तारामला सवड मिळाली नाही. मग वैद्यबुवाकडून आणलेल्या गोळ्यांचे पैसे द्यावयाचे तर दूरच! खरंच, पोटाला घालतो...

'आता अकरा वाजून गेले. भात कसा ऊन राहील?' तिने भीत भीत विचारले. दत्तारामने चारसहा मोठेमोठे घास गिळले व घोटभर पाणी पिऊन तो उठला.

'मी अकरा वाजता येईन, नाही तर बारा वाजता येईन, त्यावेळी भात ऊन पाहिजे –' जाता जाता तो म्हणाला. त्याच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून तिला थोडी भीती वाटली, पण कमालीचा तिरस्कार वाटला. इतक्यात दत्ताराम परत आला.

'आज माझा विड्यांचा जुडगा कुठे आहे?'

'आज नाही आणला मी.' खाली मान घालून विठा म्हणाली.

'का?'

'पैसे नव्हते म्हणून. या खेपेला पगार सगळा घातला बाहेर आणि मला विड्या कुठं आहेत म्हणता?' मोठ्या धैर्याने तिने ते शब्द उच्चारले, पण तिच्या हृदयाचे ठोके अतिशय जोरात पडत होते व ती त्याच्याकडे पाहण्याचे टाळत होती.

त्याने आपले लालभडक डोळे तिच्यावर रोखले. संतापातिशयाने त्याच्या तोंडून शब्दच बाहेर पडेनात.

'मला उलट बोलतेस...' तो कसाबसा म्हणाला. त्याने हातातील वाडगा उचलला व तिच्याकडे जोराने फेकला.

थोडक्यात चुकले, नाही तर वाडगा तिच्या डोळ्यावर बसला असता. तो कपाळावर बसला व तेथून रक्त ठिपकू लागले. दत्तारामास त्याचे विशेष काही वाटले नाही. रागारागाने शिव्या देत तो बाहेर निघून गेला...

तिने दातात धरून तट्कन दोरा तोडला व लुगडे दोरीवर टाकून ती खिडकीपाशी आली. बाहेर रात्र अंधारी होती, पण आकाश चांदण्यांनी फुलून गेले होते. आकाशाचा निळ्या रेशमी वस्त्राप्रमाणे दिसणारा गडद रंग विलक्षण सुंदर दिसत होता व वाऱ्याने जणू हेलकावत असल्याप्रमाणे दिसणाऱ्या चांदण्या त्या वस्त्रावरील फुलाप्रमाणे दिसत होत्या.

घराशेजारील आंब्याचे झाड अगदी स्तब्ध असल्यामुळे किंचित् भयानक वाटे. अगदी दूर मधूनमधून गावातील दिवे दिसत, पण कुठेही थोडासुद्धा आवाज ऐकू येत नव्हता. लहानशी हालचालही दिसत नव्हती. तिला वाटले, जगातील साऱ्या गोष्टींना विश्रांती आहे. पण आपण मात्र त्या बाबतीत पूर्ण उपाशी आहोत.

ती पुन्हा शेगडीजवळ आली व तिने उगाचच निखारे सारखे केल्यासारखे केले. असे प्रसंग तिने किती तरी सहन केले होते. पण बराच वेळ निखाऱ्यावर ठेवलेले दूध तापून उतू जावे त्याप्रमाणे तिचे मन सात्त्विक संतापाने भरून चालले.

मनुष्याने सहन तरी किती करावयाचे! मनुष्याचे आयुष्य नशिबापेक्षा आजुबाजूच्या इतर मनुष्यांनीच जास्त दुःखी केले आहे. ते काही नाही. आतापर्यंत सहन केले तेच खूप झाले, यापुढे दत्तारामाची अरेरावी बंद झालीच पाहिजे, असा तिने निश्चय केला. लग्न होऊन इतके दिवस झाले, पण दररोज तेच ते जीवन. मला दागिने नकोत, उंची कपडे नकोत, फक्त सुखाचे शब्द पाहिजेत, मला सावली पाहिजे –

आज रात्री दत्ताराम आल्याबरोबर त्याला आपला निश्चय सांगण्याचे तिने ठरविले. 'उद्यापासून नवाच्या आत जेवायला आलात तर जेवण मिळेल. आतापर्यंत सहन केलं तेच पुष्कळ झालं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबायचं आणि संध्याकाळी तुमची बोलणी, मार खावयाचा! मीही माणूसच आहे –'

बराच वेळ नेत असलेले ओझे क्षणभर उतरून विश्रांती घेतल्यानंतर ज्याप्रमाणे बरे वाटते, त्याप्रमाणे तिचे तिलाच त्या निश्चयाचे विलक्षण समाधान वाटले. जर दत्ताराम मारावयास आला तर त्यावेळी मोठ्या धैर्याने त्याचा प्रतिकार करण्याचे तिने ठरविले. 'दारूने तर्र झालेल्या माणसात धैर्य ते कितीसे असणार? चुलीच्या कोपऱ्यातील काठी उचलली की पुरे –'

दरवाजा जरासा वाजला व विठा चटकन् उठून बसली. इकडे तिकडे पाहात दत्ताराम आत आला व टोपी भिरकावून खेकसला, 'हं आटप, घाल काय असेल ते.'

तिला आपला निश्चय आठवला व दत्तारामकडे तिने नजर टाकली. तो खाली मान घालून मोठमोठे घास गिळीत होता. आज तो नेहमीपेक्षा जास्त भुकेला दिसला. त्याच्याकडे पाहताच त्याच्यामध्ये एकदम किती फरक पडला आहे याची तिला तीव्र जाणीव झाली. तिला त्याची लग्नावेळची आकृती आठवली. त्यावेळी तो मोठ्या व्यवस्थितपणे केस वळवीत असे. त्याच्या हातात नेहमी एक चौकोनी घड्याळ असे. त्याच्या तिरप्या सोनेरी काड्या असलेल्या पट्ट्यावर, दत्ताराम आंघोळीला गेला आहेसे पाहून, हात फिरवण्यास तिला गम्मत वाटे. पण आता त्या घड्याळाचा पत्ता नव्हता, निळ्या कोटाची जागा आता एका मळक्या कोपरावर फाटलेल्या कोटाने घेतली होती व तलम शुभ्र धोतराऐवजी जाड्याभरड्या धोतराची पाने दिसू लागली होती. त्या आकृतीनंतर

समोरील किंचित् उग्र पण अतिशय उदास व केविलवाणी आकृती पाहून त्याच्याविषयी तिला अतिशय कीव वाटली व तिचे हृदय भरून आले. आपला कठोर निश्चय त्याला आता न सांगता आणखी थोड्या वेळाने सांगण्याचे तिने ठरविले.

हात धुऊन दत्ताराम आत आला व त्याने तांब्या खाली ठेवला.

'आजपासून माझी नोकरी सुटली. म्हणे मी दारू पितो! त्याला मालकाचे किंवा त्याच्या बापाचे तीन चव्वल थोडेच खर्च होतात!' धोतराच्या सोग्याने तोंड पुशीत ती म्हणाला, 'पण मी घाबरलो की काय! पैशाचे चार पैसे करायची हिंमत आहे या हातात.'

त्याने आपला हात पुढे केला. त्यावरील शिरा टचटचीत दिसत होत्या व तो अगदी निर्बल दिसत होता. त्यामुळे तर त्याचे शब्द जास्तच केविलवाणे वाटले. 'तुझं ते गुलाबाचं फूल दे मला. मी आज पीरवाडीच्या उरुसाला जाणार आहे. आज रुपयाला पाच रुपये मिळतील. मग काय! तुला एकाच्या ऐवजी चार गुलाबाची फुले –' त्याचा आवाज किंचित् मऊ झाला व त्याने विठाकडे पाहिले.

विठाजवळ तिच्या पुष्कळ मैत्रिणीपेक्षा जास्त दागिने होते. पण तीक्ष्ण खुरप्याच्या स्पर्शाने धान्याची कणसे गळून पडावीत त्याप्रमाणे एक-एक ते नाहीसे झाले होते. आता तिच्याजवळ ते गुलाबाचे फूल फक्त होते. आणि गरम चहा करून दिल्यावर तिच्या पाठीवर मोठ्या प्रेमाने व डोळ्यात न मावणाऱ्या कृतज्ञतेने हात फिरवणाऱ्या आईची ती एकच आठवण तिच्याजवळ होती.

तिला वाटले, आपला निश्चय त्याला ऐकविण्याची हीच वेळ आहे. तिच्या अंगातून चैतन्याची, सजीवतेची एक चमक चमकून गेली. तिने आजुबाजूला पाहिले. कोपऱ्यात काठी तयार होतीच. तिने मन घट्ट केले व मोठ्या धैर्याने त्याच्याकडे पाहिले, पण त्याच्याकडे पाहताच तिची मान खाली गेली. मोठ्या प्रयत्नाने तिने धैर्य गोळा केले व बोलण्याकरिता ओठ हलविले.

'का? कान फुटले की काय? ऐकायला येत नाही?' जमिनीवर पाय आपटीत दत्ताराम ओरडला , 'माझे दोस्त वाट पहात असतील.' विठा एकदम दचकली. त्याच्या त्या ओरडण्याने तिने इतका वेळ साठवलेले धैर्य पार ओसरून गेले. आपण कोलमडून पडत आहो असे वाटून तिने भिंतीचा आधार घेतला. त्यावेळी तिचा धक्का लागून कोपऱ्यातील काठी जमिनीवर पडली. तिचा चेहरा एकदम पांढरा फटफटीत झाला व जीभ एकदम निर्जीव झाल्याप्रमाणे बिलकूल हलेनाशी झाली.

दत्तारामाने दागिन्यांचा डबा काढला व त्यातील गुलाबाचे फूल खिशात टाकले. रिकामा डबा तिच्याकडे फेकीत तो म्हणाला, 'मी सकाळी येईन.' जाता जाता त्याने धाड्दिशी दरवाजा लावून टाकला.

विठाने दरवाजाला कडी घातली व ती राजाजवळ आली. राजा आता झोपला होता. पण त्याच्या गालावर ओघळलेले अश्रू दिव्याच्या मंद प्रकाशातही स्पष्ट दिसत होते. त्याच्याकडे पाहताच आपले हृदय कुणीतरी निर्दयपणाने कुसकरत आहे असे तिला वाटले. ती हळूच त्याच्या बाजूला बसली व तिने हलकेच त्याचे अश्रू पुसले. मघाशी आपण त्याला उगाचच मारले याची तिला आठवण झाली व तिचे डोळे चटकन् भरून आले. तिने त्याच्या केसांवरून हळुवारपणे एकदा हात फिरविला व तीही त्याच्या बाजूस आडवी झाली. तिला वाटले, 'राजा, मघा मी तुला उगाचच मारलं. मलाही उगाच मार खावा लागतो, अपमान करावा लागतो. राजा, तू एक दुबळा जीव आहेस – आणि – आणि मी पण एक –'

खिडकीतून वाऱ्याची एक मंद झुळूक आत आली. दिव्याची ज्योत किंचित् हलली, त्यामुळे विठाची भिंतीवर पडलेली सावलीही जरा हलली. वाऱ्याची झुळूक तिच्या ओघळलेल्या अश्रूंवरून गेल्यामुळे जरा गारवा वाटला व त्यातल्या त्यात तिला जरा बरे वाटले.

# निळा झगा

'Public vehicles' stand NO. 7' अशी रंग उडून गेलेली पाटी ती जागा पाच टांग्यांसाठी आहे असे जरी अस्पष्टपणे सांगत होती तरी त्या स्टँडवर त्यावेळी अबदुल टांगेवाला एकटाच उभा होता.

त्याचा घोडा 'अकबर' पाठीमागील पाय किंचित वाकडा करून 'जगात आपल्या मनाविरुद्ध पुष्कळ गोष्टी घडतात, पण त्यापैकी प्रत्येक जर आपण मनाला लावून घेऊ लागलो तर जगणे अशक्य होईल. जाऊ द्या हो.' अशा निर्विकारपणाने गवताच्या काड्या चघळत होता. हातात लगाम सैलसा सोडून मध्येच विमनस्कपणे विडीचा झुरका घेत अबदुल कसल्या तरी विचारात गढून गेलेला दिसत होता. त्यामुळे समोरील हॉटेलचा लठ्ठ कोकणी मालक आपल्याकडे बोट दाखवून चौकीजवळ उभ्या असलेल्या पोलिसाजवळ थट्टा करीत आहे ही गोष्ट त्याच्या ध्यानात आली नाही. कधी तरी सितारेसाठी एखाददुसरा पेरू देणारी राधा माळीण मध्यंतरी पंधरा दिवस कुठे दिसत नव्हती. ती आज नेहमीप्रमाणे आंब्याच्या झाडाखाली एका देवदारी खोक्यावर पेरू, गरे मांडून बसली होती व कमरेची चंची काढून एका रुंद पिवळ्या पानाला चुना लावण्याच्या तयारीत होती हीही गोष्ट त्याच्या नजरेतून सुटली असावी. नाही तर त्याने लगेच खाली उतरून इतर वेळेप्रमाणे दोन मोठी पिवळीजर्द पाने स्वत:साठी निवडली असती.

गेल्या पंधरा दिवसांत अबदुलमध्ये अतिशय फरक पडला होता. हातात चाबूक आल्यापासून त्याने कधी तीन चाळीसची गाडी चुकविली नव्हती. मघाशी जाताना महादू टांगेवाल्याने त्याला हाकही मारली होती, पण त्याने 'जा रे तू, मी आज येणार नाही.' असे तुटकपणे उत्तर दिले होते. दाढी खाजवीत महादूने त्याच्याकडे एक क्षण आश्चर्याने पाहिले. पण 'नाही आलास तर नाही आलास' असे पुटपुटत 'बरं झालं, एक टांगेवाला कमी झाला. गिऱ्हाईक मिळण्याची तेवढीच जास्त आशा' या आनंदात तो लगेच निघून गेला.

सीतारा वारल्यापासून त्याला कोणत्याच गोष्टीत स्वारस्य वाटेनासे झाले होते. दिवस उजाडला की, हा दिवस कसा ढकलावा याचा त्याच्यापुढे प्रश्नच पडे. आजारी माणसाची ज्याप्रमाणे कोणत्याच खाद्यपदार्थावर इच्छा जात नाही, त्याप्रमाणे कोणत्याच गोष्टीत त्याचे मन रमेना.

दिलरुबा टॉकीजमध्ये त्याचा एक मित्र डोअरकीपर होता. त्याने एका चित्रपटाला फुकट सोडतो म्हणून अबदुलला सांगितले होते. म्हणून ''सर्कसनी सुंदरी''च्या मोठ्या रंगीत जाहिराती लागल्यापासून अबदुल त्या चित्रपटाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहात बसला होता. त्या दिवशी संध्याकाळी तो आपल्या बायकोला मोठ्या उत्साहाने म्हणालादेखील,

''तो सिनेमा आल्यावर आम्ही सगळेजण जाऊ. तू, मी, आणि सीतारा.'' त्याने जरा डोळे मिचकावले आणि किंचित् हसून तो म्हणाला, ''तू बस बायकांच्या बाकावर आणि सीतारा बसेल माझ्याजवळ थर्डमध्ये.''

त्याच्या बायकोने त्याच्याकडे किंचित् रागाने पाहिले. 'म्हटलं नाही आपण असं होणार म्हणून ?' – अशा आशयाने अबदुल मोठ्याने हसला.

''बराय, तू घे सितारेला.'' तो म्हणाला, ''आम्ही कोणी नव्हेच सितारेचे ! आम्हाला कोण बसलंय विचारायला गरिबाला ! मलाही सीतारा आवडते म्हणतेस की काय ? ऊं हूं –''

''मला सारं माहीत आहे. तुमचा सगळा कारभार बेगडाचा !'' त्याची बायको किंचित चिडून म्हणाली, ''सगळं लोकांना दाखविण्यापुरतं. त्या पोरीला येथूनतेथून आणलीत तरी कशाला ? त्या दिवशी मारुतीच्या देवळात खेळत असता पोरगी पडली आणि तिचा गुडघा रक्तबंबाळ झाला, पण तुमचा विड्यांचा बंडल मात्र चुकला नाही. तसंच परवा ती आजारी पडली, परंतु तुम्हाला पीरवाडीचा उरूस आठवला. चार दिवसांनी घराची आठवण झाली आणि मला खोटंच सांगितलं टांग्याचे चाक मोडले म्हणून –''

''अग, पण तिला त्या दिवशी नुसतं पडसं झालं होतं –'' अबदुल अजीजीने म्हणाला.

''मला सारं माहीत आहे. लोकांच्या डोळ्यांत माती टाकायला तुम्हाला चांगलंच फावलंय ! तुम्हाला मनच नाही –'' आत जाता जाता ती म्हणाली.

अबदुलचा चेहरा एकदम उतरला व खाली मान घालून तो बाहेर आला. बाहेर कट्ट्यावर सीतारा पुस्तक उघडून बसली होती. तो हळूच तिच्या बाजूला बसला. ''सीतारा, तो सिनेमा आल्यानंतर आम्ही सिनेमाला जायचं.'' तो म्हणाला.

सिनेमाला जायचे म्हणताच सितारेने हातातील पुस्तक एकदम खाली टाकले व तिने त्याच्या गळ्याला मिठी मारली. त्याने हलकेच तिच्या केसांवरून हात फिरविला. पण त्याच्या डोळ्यांच्या कडा ओलसर झाल्या होत्या.

आता तो चित्रपट लागून चार दिवस झाले होते. त्या डोअरकीपरनेही त्याला दोनतीनदा बोलाविले होते. पण तो दिलरुबा टॉकीजकडे फिरकलाही नाही...

सीतारा त्याच्या बायकोची सर्वात लहान बहीण होती आणि सितारेचा तिच्यावर फारच जीव होता. त्यामुळे त्याची बायको ज्या वेळी इकडे येण्यास निघाली, त्यावेळी तोंड खुपसून सीतारा सारखी रडू लागली. तिच्या आईने तिला खडीसाखरेची पुडी दिली.

नवीन मोठी बाहुली घेऊन देण्याचे आश्वासनही दिले. पण ती काही केल्या पाठ सोडीना. अबदुल्लाही काय करावे हे समजेना. बाहेर बंडू मोटारवाला तर सारखा मोटारचे शिंग वाजवीत होता. अबदुलने आपल्या बायकोला एकीकडे बोलाविले आणि जरा भीतभीत विचारले, "आमच्याबरोबर घेऊन जाऊ तिला आपण. राहील बिचारी आपणाजवळ. आं ?"

त्याच्या बायकोने त्याच्याकडे किंचित् आश्चर्याने पाहिले. पण काही न बोलता तिने संमतिदर्शक मान हलविली.

आपले डोळे पुसावयाचे विसरून सीतारा एकदम हसली व तिने एकदम अबदुलचा हात धरला. आजपासून आपण मित्र झालो असेच जणू तिला म्हणावयाचे होते. अबदुलचे हृदय कसल्या तरी अननुभूत आनंदाने थरारले व त्याने आपल्या धोतराच्या सोग्याने तिचे डोळे पुसले.

वास्तविक सीतारा काही त्याची स्वत:ची मुलगी नव्हे. पण ती गेल्यापासून खिडकीच्या फटीतून येणारा कवडसा बंद करताच त्याचा थोडाबहुतही येणारा प्रकाश जाऊन खोलीत पूर्ण अंधार व्हावा त्याप्रमाणे त्याचे जीवन कोंदट व अंधारे झाले होते.

सीतारा थोडे दिवस अबदुलच्या बायकोबरोबर आपल्या घरी गेली होती. चारसहा दिवसांनी अबदुल्ला एका ओळखीच्या गावकऱ्याकडून निरोप कळला, 'तिकडे सर्व ठीक आहे. फक्त सितारेला जरा ताप येत आहे... छे, साधा हिवताप असेल तो, होईल दोनचार दिवसांत बरी. घाबरायचे काही कारण नाही. –'

घाबरायचे कारण नाही असे जरी सांगितले होते तरी सितारेला ताप येतो म्हणताच अबदुल मटकन् खालीच बसला. काय करावे हे त्याला क्षणभर सुचेचना. प्रथम त्याला वाटले, आपण स्वत:च जाऊन सितारेला पाहून यावे. सितारेला फ्रॉक घेण्यासाठी जमलेले चार रुपये त्याने खिशात घातले व जाण्याकरिता तो सामान बांधू लागला.

सामान बांधता बांधता मध्येच तो थांबला. त्याला वाटले, आपण आणखी चार दिवसांनी जावे, हे पैसे तोपर्यंत सितारेसाठी पाठवून द्यावे. तिला औषध द्यावे लागेल, शिवाय दुधाची जरूरी लागेल. आणखी कुणास ठाऊक, मोसंबेही आणावी लागतील. –"

त्याने बांधलेले सामान कोपऱ्यात टाकले व टांगा घेऊनच तो पोस्ट ऑफिसात आला. मनीऑर्डर करण्यासाठी पोस्टात येण्याची ही त्याची पहिलीच वेळ होती. समोर पितळी सळ्यांच्या मागे खाली मान घालून बसलेले कितीतरी कारकून दिसत होते. तो सरळ अगदी समोरच्याच कारकुनाकडे गेला.

"मास्तरसाब, मला एक मनीआर्डर करायची आहे –" तो जरा भीतभीत म्हणाला.

"बाजूला!" मान वर न करता डाव्या बाजूला अंगठा दाखवीत तो कारकून म्हणाला. अबदुल बाजूच्या कारकुनाकडे सरकला.

"मास्तरसाब, मी – मला मनीआर्डर पाठवायची आहे –"

त्या कारकुनाने त्याच्याकडे चाळशीवरून पाहिले व बोट ओठाला लावून फार्मच्या ढिगातील एक फॉर्म त्याने अबदुल्कडे टाकला.

"तो भरून आण. कमिशनचे पैसे सुटे घेऊन ये. माझ्याकडे मोड नाही." वर न पाहता तो म्हणाला.

तो फार्म घेऊन अबदुल्ने उलटासुलटा करून पाहिले, पण त्याला मुळी लिहायला वाचायलाच येत नव्हते तो फॉर्म काय भरणार?

"मास्तरसाब –" किंचित हसण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत अबदुल म्हणाला, "आम्हाला काय समजणार यातलं? तुम्हीच लिहा जरा. फार मेहरबानगी होईल –"

"तर! तुझा फॉर्म लिहून द्यावयाचा एवढंच काम नाही मला –" तो कारकून एकदम खेकसून म्हणाला.

अबदुल एकदम मागे सरकला व हताशपणे इकडेतिकडे पाहात त्या आवारातून येरझारे घालू लागला.

"तरी मेहरबानगी केली महाराजांनी!" अबदुल गेल्यावर मनीऑर्डर क्लार्क बाजूच्या बुकिंग क्लार्कला म्हणाला, 'नुसता फॉर्मच लिहून दे म्हणाला. नाही तर माझी दाढी वाढली आहे, तेवढी करून टाक म्हणावयाचा –" बुकिंग क्लार्क जरा मोठ्याने हसला व कोपऱ्यातील डेप्युटी पोस्टमास्तरांच्या निर्विकार असणाऱ्या चेहऱ्यावर किंचित हास्य दिसले.

बाजूला रॉयल इंडियन नेव्हीची जाहिरात पाहात उभ्या असलेल्या, पंचा नेसलेल्या एका म्हाताऱ्याकडून अबदुल्ने फॉर्म लिहून घेतला; कूपनमध्ये मजकूर काय लिहावयाचा याचा तो विचार करू लागला. आपल्या बायकोला त्याला इतके सांगावयाचे होते, की त्यातील थोडासा भागही त्या दोन बोट रुंदीच्या कूपनमध्ये मावला नसता. 'सितारेला सांभाळ. मी चार-सहा दिवसांनी येतो.' एवढे लिहून टाका झालं." तो म्हणाला, "मी नंतर जाणार आहेच." पण तो मध्येच थांबला. जरा आठवल्यासारखे करून तो पुन: म्हणाला, "नाही तर हेही लिहून टाका. 'तिला औषध दे –' बस्स."

त्याने मनीऑर्डर केली व तो पोस्टाच्या दाराजवळ आला.

"अरेच्या, आणखी एक गोष्ट लिहायची राहिलीच की –" पुटपुटत तो त्या कारकुनापाशी आला. "मास्तरसाब, एक गोष्ट लिहायची राहिली. तेवढी टाका झालं लिहून. 'सितारेला थंडीवाऱ्यात बसवू नको म्हणून.' –आमची पोरगी आजारी आहे. तिला जरा पैसे पाठवतो." अबदुल किंचित हसला आणि त्या कारकुनाकडे त्याने किंचित केविलवाण्या रीतीने पाहिले.

त्या कारकुनाने त्याच्याकडे पाहून तीनचार आठ्या घातल्या आणि त्रासलेल्या आवाजाने तो म्हणाला, "काय शिंची कटकट आहे! काय रे बाबा, तू कोण आम्हाला रामा गडी समजतोस?" तो बुकिंग क्लार्ककडे वळला आणि म्हणाला, "म्हणे पोरगी आजारी आहे. आणि तेवढं लिहिलं नाही तर मरणारच जणू ती –"

अबदुलला अतिशय संताप आला आणि त्याचे डोळे रागाने लालभडक झाले, पण त्या कारकुनाने उच्चारलेले शब्द त्याच्या जिव्हारी लागले. त्याला ती कल्पनाही सहन होण्याजोगी नव्हती, – सितारेच्या मृत्यूची. तो जड हृदयाने बाहेर आला आणि क्षणभर तेथील खांबाला टेकून उभा राहिला.

"का? झाली का मनीऑर्डर?" फॉर्म लिहून दिलेल्या म्हाताऱ्याने विचारले.

"होय साहेब, तुमचे फार उपकार झाले." अबदुल म्हणाला. त्याने खिशातून एक आणा काढला व त्या मनुष्यापुढे धरला. "हा घ्या तुमच्या तसदीबद्दल –"

त्या म्हाताऱ्याने त्या आण्याकडे क्षणभर पाहिले व तो खो खो हसू लागला. हे पाहून अबदुल गोंधळून गेला आणि खिशात आणखी एक आणा आहे की काय हे पाहू लागला.

त्याला थांबवून तो म्हातारा म्हणाला, "त्या गेटपाशी उभी असलेली ती सुंदर निळी मोटर पाहिलीस?"

हे ते कशासाठी विचारतो हे न समजताही अबदुलने मान हलविली.

"ती मोटर माझी स्वतःची आहे. माझ्या पोषाखावर जाऊ नको तू." तो म्हणाला. "तुझी मुलगी लवकर बरी होऊ दे." आणि पुन्हा तो किंचित् हसला.

अबदुलच्या उदास झालेल्या हृदयाला ते शब्द फुंकरीप्रमाणे विलक्षण आल्हाददायक वाटले. कारकुनाच्या त्या भयंकर शब्दांचा त्याला क्षणभर विसर पडला.

आणखी तीन दिवसांनीच ते पत्र आले!

आपल्या बायकोला आणावयाला तो स्टेशनवर गेला. रडून रडून तिचे डोळे लाल झाले होते, व त्यांचा खालचा भाग सुजल्यासारखा झाला होता. अबदुलला पाहताच तिने आपले तोंड दोन्ही हातांनी झाकून घेतले आणि ती हुंदके देऊ लागली.

घरी आल्यावर थोडा वेळ कुणीच बोलले नाही. अबदुलचे हृदय आतून सारखे जळल्यासारखे होत होते. पण वर चेहऱ्यावर काहीही न दाखवण्याचा तो सारखा प्रयत्न करत होता.

आपल्या बाजूला ठेवलेल्या विड्यांच्या कटातील तो एक विडी काढी व पेटवी. पण एकदोन झुरके घेतो न घेतो तोच त्याला हातातील विडीचा विसर पडे. त्याच्या डोळ्यांपुढे एकदम सितारेचा चेहरा दिसू लागे. आणि त्याच्या पाठीमागे त्याला परिचित अशा दृश्यांची रांगच्या रांग दिसू लागे. नजरेसमोरील सीतारा लाडिकपणाने हसली किंवा खोट्या

रागाने त्याच्याकडे पाहू लागली, की कुणीतरी निर्दयपणाने आपल्या डोक्यावर हातोड्याचे घण घालीत आहे असे त्याला वाटू लागे. थरथरत्या हाताने विडीच्या कटातील तो आणखी एक विडी घेई व पेटवून लागोपाठ चार झुरके घेई, पण पुन्हा त्याला विडीचा विसर पडे, व हातातील विडी विझून जाई...

त्याची बायको वळकटीत तोंड खुपसून सारखी रडत होती. तिला धीर देण्यासाठी तो समजावणीच्या आवाजाने म्हणाला,

"पुरे आता. झाली ती गोष्ट काय आपल्या हातातील होती? परमेश्वराच्या इच्छेपुढे कुणाचे काय चालणार?"

त्याची बायको एकदम उठून बसली व तिने डोळे पुसले. त्याच्याकडे रोखून पहात संतापाने ती म्हणाली,

"सीतारा माझी बहीण होती! तुमच्यासारखं मला ढोंग करायचं नाही! बघा तर बघा, डोळ्यांत पाण्याचा थेंबही नाही. काही झालं नसल्याप्रमाणे विड्या फुंकत बसलात? जरा काही तरी मन असतं तर निरोप कळताच धावत आला असता! म्हणे आणखी चार दिवसांनी येतो! आठवला असेल ना तुम्हाला तमाशा –"

ती इतक्या जोराने बोलत होती की, तिला थोडा वेळ श्वासोच्छ्वास करणेच कठीण वाटू लागले. ती थोडा वेळ थांबली व त्याच्याकडे जळजळीत डोळ्यांनी पाहू लागली.

डोक्यावर अचानक एखादे ओझे येऊन आदळावे त्याप्रमाणे अबदुल एकदम खचून गेला. काय बोलावे हे त्याला सुचेना. त्याने दोनतीनदा बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या तोंडून शब्दच बाहेर पडेना.

"अग पण,मी, मला –" अडखळत तो सांगू लागला.

"पुरे पुरे!" त्याची बायको एकदम ओरडून म्हणाली, "चालते व्हा, थोडा वेळ –"

आपले डोके एकदम सुन्न झाल्यासारखे त्याला वाटले. तो उठून उभा राहिला, पण त्याचा जरासा तोल गेला आणि त्याचा पाय विडीच्या कटावर पडून बाकीच्या विड्या पार मोडून गेल्या. इकडेतिकडे न पाहता तो बाहेर आला व डोके गच्च दाबून धरून तो कट्ट्यावर बसला. त्यावेळी त्याच्या बाजूला सीतारा नव्हती. ती जागा रिकामी होती...

घरी जेवताना तो अजिबात बोलत नसे. पूर्वी सितारेला निरनिराळ्या गिऱ्हाइकांविषयी माहिती सांगत जेवत असता त्याला एक तास पुरत नसे. आता दोनचार घास तो कसेबसे पोटात ढकलीत असे. मध्येच किंचित मान वर करून आपल्या बायकोकडे पाही आणि तीही आपणाकडेच पाहात असलेली त्याला दिसे. तिच्या नजरेत एक प्रकारचा तिरस्कार आणि कीव यांचे मिश्रण झालेले त्याला दिसे. आपण लगेच न येता चार दिवसांनी येतो

असे का कळविले याची सारी हकीकत तिला सांगण्याचा त्याने दोनचारदा प्रयत्न केला,पण तो विषय काढला की, त्याची बायको त्याच्याकडे रागाने व तिरस्काराने पाहात निघून जात असे आणि नंतर थोडा वेळ सितारेची आठवण काढून रडत बसे.

जेवण झाल्यानंतर तो बहुधा घरात नसे. घरातील प्रत्येक ठिकाणी सितारेची आठवण चिकटलेली आहे असे त्याला वाटे. त्या आठवणींची भुते त्याच्या डोळ्यांपुढे नाचू लागत.

त्या कोपऱ्यातील कोनाड्यात देवदारी लाकडाचा एक टांगा होता. आपल्या घोड्याचेही नाव सितारेने अकबरच ठेवले होते. चिंध्या गुंडाळून केलेली एक लहानशी बाहुली तिने टांगेवाल्याच्या जागी ठेवली होती. अबदुलकडे पाहात हसून ती म्हणे,

"चलो अकबर, चक चक, ए बाई, बाजो, ए सायकलवाला, चक चक –"

कोनाड्याच्या खाली मारलेल्या खिळ्याला तिचे दप्तर अडकविलेले होते. त्यात काचेचे मणी, बांगड्यांचे तुकडे, रिकाम्या काड्याच्या पेट्या, शिंप्याच्या दुकानातून टाकलेले कापडाचे तुकडे भरलेले असत, आणि तसले कपड्याचे तुकडे गोळा करत असतानाच एका कापड-दुकानात तो निळा झगा तिने प्रथम पाहिला होता.

"किती छान आहे तो झगा –" एक दीर्घ श्वास घेत डोळे विस्फारीत सीतारा म्हणाली. पण अबदुलने ते ओळखावे अशी तिची इच्छा होती. अबदुलच्या बायकोकडे बोट दाखवून ती म्हणाली, "विचारा, हिनंसुद्धा बघितला काल."

"खरंच, काल येताना मी पाहिला. फार छान आहे. कसा सारखा झळझळत होता! आणि त्यावर एक गुलाबाचे फूल आहे. मला वाटलं खरंच आहे ते!" त्याची बायको म्हणाली.

"बरं बरं, पाहू कधी तरी." वरून बेफिकिरी दाखवीत अबदुल म्हणाला. पण त्या दिवशी संध्याकाळीच जाऊन त्याने त्या झग्याची चौकशी केली. झगा अतिशय सुंदर होता. तो सुंदर निळ्या चकचकीत रेशमी कापडाचा असून गळा व हात यांच्याभोवती जाळीची नाजूक झालर लावली होती. समोर बरोबर गळ्याखाली रेशमी कापडाचेच पण अगदी हुबेहूब दिसणारे गुलाबाचे फूल लावले होते. त्याने त्याची किंमत विचारली.

"काय करतोस त्याची किंमत घेऊन!" त्याच्याकडे किंचित तिरस्काराने पाहात नोकराने म्हटले, "घेतोस सहा रुपये देऊन ?

"सहा रुपये!" एक दीर्घ निःश्वास सोडीत अबदुल पुटपुटला. एकदम सहा रुपये देणे त्याला शक्यच नव्हते, पण आपल्या लाडक्या सितारेला तो झगा घेऊन देण्यासाठी त्याने त्या दिवसापासून शिलूक टाकण्यास सुरुवात केली. त्यापैकी चार रुपये जमाही झाले होते, पण ते त्याला सितारेसाठी औषधाकरिता पाठवून द्यावे लागले. आणि तीनचार दिवसात सीताराही...

तो स्टेशनवरून घरी आला की, सीतारा आपल्या येण्याचीच वाट पाहात आहे असे त्याला पुष्कळदा आढळे. तो येताच कोनाड्यातील चिमणी पुढे घेऊन ती गडू-मकाचे पुस्तक उघडी.

"वाचून दाखवते हां!" आपले काळेभोर केस मागे सारीत ती म्हणे व लगेच वाचण्यास सुरुवातही करी.

तो स्वत: कधी शाळेला गेला नव्हता. त्यामुळे त्याला मास्तर, गोष्टी ऐकणे, परवचा म्हणणे या साऱ्या गोष्टी अपरिचित वाटायच्या. पण सितारेला खूष करण्यासाठी तो तिच्या बाजूला बसे आणि मोठी उत्सुकता दाखवून म्हणे,

"तर! त्याचकरिता आलो नव्हे का लौकर! हं सांग बघू तुझ्या जमतीगमती –"

तो निमूटपणे ऐकू लागे. दररोज तीच ती गडू-मकाची चित्रे आणि दररोज त्याच त्या गमतीजमती असत. पण सीतारा सांगू लागली की, त्याच गोष्टी त्याला विलक्षण आकर्षक वाटू लागत. कारंजातून थुईथुई पाणी उडू लागून तुषारांवर इंद्रधनुष्ये दिसावीत त्याप्रमाणे त्याच्या डोळ्यांपुढे सुंदर चित्रे दिसू लागत. ती काय सांगते हे ऐकावयाचे सोडून तो तिच्या चिमण्या तोंडाकडे पाहू लागे. वाऱ्यावर भुरभुरणारे तिचे केस त्याला अतिशय सुंदर वाटू लागत आणि त्या भरात तो तिला जवळ घेऊन तिच्या केसांवरून हात फिरवू लागे.

"मी काय सांगते ऐकतच नाहीस तू –" चिडून सीतारा म्हणे, "मी तुला उद्यापासून काही सांगणारच नाही!" रागारागाने पुस्तक मिटून ती पिशवीत ठेवून देई. अबदुल ओशाळल्यासारखा होई, व तिला समजावण्याचा प्रयत्न करी. पण तिची कळी काही केल्या खुलत नसे. पण दुसरे दिवशी अबदुलने टोपी काढली की, ती म्हणे, "आज शाळेत एक गम्मत झाली –" मग शाळेत काय काय झाले त्याची उजळणी होत असे. अबदुलच्या हातून पुन्हा काहीतरी चूक झाली की, ती पुन्हा फुरंगटून बसे...

एखादे सुंदर काचपात्र हलकेच हातात धरून जात असावे, व कशाचा तरी धक्का लागून त्याचे एकदोन तुकडे मात्र हाती राहावे त्याप्रमाणे नाहीशा झालेल्या दिवसांचे थोडेफार तुकडे त्याच्याजवळ राहिले होते. त्या तुकड्यांकडे पाहून त्याला पूर्वीच्या जीवनाची सारखी आठवण होत असे, आणि ते जीवन सांधता येणार नाही या जाणिवेने तर त्याच्या हृदयात काहीतरी खुपल्यासारखे होई...

जळत आलेल्या विडीचा अबदुलला एकदम चटका बसला. तो चटकन् उठला आणि त्याने विडी फेकून दिली. खांद्यावर एक मळका पंचा टाकून समोरील हॉटेलचा मालक काउंटरच्या खुर्चीवर बसल्याबसल्याच डुलक्या घेत होता. राधा माळीण हातातील लहान

काठी इकडे तिकडे हलवीत माशा हाकलत होती. तिने अबदुलकडे पाहिले व त्याला हाक मारली.

"ए साब, आज पानबिन घेतला नाहीस. आजारीबिजारी नायस ना? आतापर्यंत दोन हाका मारल्या नव्हं का? –" त्याच्याकडून उत्तराची अपेक्षा न करता तिने समोरील हॉटेलवाल्यास एक कप चहा पाठविण्यास मोठ्याने ओरडून सांगितले. मालक एकदम दचकल्याप्रमाणे जागा झाला, व आत तोंड फिरवून तो ओरडला, 'अरे भिक्या, एक कप चहा –माळीण.' आणि लगेच तो पुन्हा डुलक्या घेऊ लागला.

"ए टांगावाला –" कुणीतरी अबदुलला हाक मारली.

"हां साब –" म्हणत अबदुलने मागे वळून पाहिले. सेंट जॉर्ज स्कूलकडून लष्करकडे जाणाऱ्या रस्त्याने एक अँग्लो इंडियन बाई त्याच्याकडे येत होती. तिच्या तपकिरी केसांमागे फुलाफुलांची नाजूक लहानशी छत्री फारच सुंदर दिसत होती.

"चलो पोस्ट ऑफिस –" टांग्यात चढता चढता ती म्हणाली.

"हां मेमसाब." म्हणत अबदुलने लगाम हलविली. "ए बाबा, सरक बाजूला, चलो अकबर, चक् चक् –"

टांगा चालू झाला.

मेमसाब बसली होती त्या बाजूने अत्तराचा मंदमधुर सुवास येत होता. आपल्या हातातील काळी कुळकुळीत कातडी बॅग जेव्हा तिने मघाशी उघडली त्या वेळी नोटांचे एक लहानसे पुडकेच त्याला दिसले. तिच्या मनगटावरील अगदी लहान नाजूक घड्याळही त्याच्या नजरेतून सुटले नाही. पण एक बडे गिऱ्हाईक मिळाल्याचा त्याला आज नेहमीइतका आनंद झाला नाही. त्याला वाटले, जर पंधरावीस दिवसांपूर्वी आपणास अशी चारपाच बडी गिऱ्हाइके मिळाली असती तर सितारेला तो झगा आपण खास घेऊ शकलो असतो.

टांगा पोस्ट ऑफिसच्या आवारात आला.

"जरा ठेर." म्हणत मेमसाब खाली उतरली आणि हातातील बॅग हेलकावत चटचट पायऱ्या चढून गेली. अबदुलने टांगा जरा बाजूला उभा केला आणि हातात चाबूक घेऊन तो खिडकीपाशी उभा राहिला.

त्या दिवशीही तोच कारकून होता. मेमसाब येताच चाळिशी सावरीत तो मोठ्या लगबगीने उठला व तोंडावर एक लाचार हास्य आणीत त्याने मेमसाबचे फॉर्म घेतले. मराठा पलटणीतील दोन काळे आदमी मघापासून अर्धा तास उभे होते. त्यांचे काम बाजूला सारून त्याने मोठ्या तत्परतेने पावती केली. त्याला जरा मदत लागली तर द्यावी म्हणून बुकिंग क्लार्कही त्याच्या बाजूला येऊन उभा राहिला. डेप्युटी पोस्टमास्तरांनी चिमूटभर तपकीर नाकात भरली व पोस्टातील नोकरवर्ग जनतेशी सभ्यतेने वागतो की

नाही हे पाहण्यासाठी त्यांनी इकडून तिकडे एक फेरी मारली. कारकुनाने त्याच लाचारपणाने पावती तिच्यापुढे केली. त्याच्याकडे न पाहता मेमसाबने ती पावती घेतली व मोठ्या ऐटीने ती टांग्यात चढली.

"करतोस काय बाबा, जीवन आहे ना!" मनीऑर्डर क्लार्क बुकिंग क्लार्कला म्हणाला, "जगण्याची कला म्हणजे काय? कुठे मान ताठ ठेवायची, कुठे खाली घालायची हे समजलं की बस्स!" तो किंचित् हसला व त्याने दौतीत टाक बुडवला.

"बझार चलो, कुछ कपडा खरीदना है –" पर्सने वारा घेण्याचा प्रयत्न करीत मेमसाब म्हणाली.

"हां मेमसाब." लगाम हलवीत अबदुल म्हणाला.

बाजाराच्या रस्त्याला खूप गर्दी होती. पण त्याने नेहमीच्याच वेगाने टांगा हाकला. आज काही नाही तरी बारा तेरा वर्षे तो टांग्यावर बसत होता.

"ए बाबूजी, सरको. ए तात्यासाहेब –" मध्येच ओरडून तो चाकावर चाबकाची काठी आपटी. मनुष्ये पटापट बाजूला सरकत. जेथे गर्दी असे तेथे टांगा जाण्यापुरता रस्ता दिसू लागे. अशा वेळी त्याला स्वतःचा किंचित् अभिमान वाटू लागून तो अकबरच्या टापांच्या तालावर एखादे गाणे गुणगुणू लागे. आजही तो तसेच गाणे गुणगुणू लागला. पण आपले आयुष्य नेहमीसारखेच चालले आहे, आपला चहा आहे, विड्या आहेत, आपले भटकणे आहे, आणि बिचाऱ्या सितारेला जाऊन पंधरा दिवससुद्धा झाले नसतील! आपल्या कृत्याची त्याला अतिशय शरम वाटली व तो गप्प झाला. त्याने लगाम खेचला व टांगा लालचंद वेणीचंदाच्या भव्य कापड दुकानासमोर उभा केला.

दुकानाच्या मध्यभागी विजेचा एक मोठा पंखा फिरत होता. नवीन कापडाच्या एक प्रकारच्या विचित्र वासाने दुकान सतत कोंदल्यासारखे वाटे. कपडे ठेवलेल्या कपाटात दिवसाही दिवे लावलेले असत. आता तर नुसता झगमगाट झाला होता. कपाटांच्या काचेमध्ये आल्यागेल्यांची प्रतिबिंबे दिसत आणि त्यामुळे दुकान लोकांनी फुलून गेले आहे असा भास होई. कपाटामधून कापडाच्या घड्या भराभर उकलत. मध्येच टर्रकन कापड फाडल्याचा आवाज होई. काढलेले कापड खाली बसलेल्या मुलांपैकी कुणीतरी कागदात गुंडाळून देई व ते बंडल गिऱ्हाइकाकडे फेकले जाई. लगेच कुणीतरी ओरडे, "चार वार – दीड रुपया वार –" तक्क्याला टेकून बसलेला मालक एकदम जागा झाल्याप्रमाणे उठून बसे आणि सहासात रुपये गादीखालील रुपया नोटांच्या ढिगात जमा होऊन जात.

एकदम अबदुलचे लक्ष छताकडे गेले. हँगरवर अडकवून ठेवलेल्या पिशव्या-झबल्यांत त्याने सितारेकरिता पाहिलेला निळा झगाही अद्याप तेथेच होता. त्यावर विजेच्या दिव्याचा झगझगीत प्रकाश पडला होता. त्यामुळे घोड्याचे अंग साफ केल्यावर त्यावर ऊन पडावे त्याप्रमाणे तो सारखा चमकत होता.

त्या झग्याकडे पाहिल्यावर तर साऱ्या गोष्टी पुन्हा जास्त जोराने उसळून आल्या. त्याच्या हृदयात कालवल्यासारखे होऊ लागले. तो तेथून चारसहा पावले दूर गेला व डोळ्यांत जमू लागलेले अश्रू लपविण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याने दुकानाकडे पाठ वळविली, व खिशातून विडी काढली. त्याला वाटले, जर आपणाला काही गोष्टी पूर्णपणे विसरता आल्या असत्या तर आपण जास्त सुखी झालो असतो.

थोड्या वेळाने हातात चारसहा बंडले घेऊन मेमसाब टांग्यात येऊन बसली.

"चलो चलो, जलदी करो, बंगला नंबर २७, चर्चके पास, जल्दी करो." ती म्हणाली.

"हां मेमसाब!" अबदुल म्हणाला.

घरी परतताना त्याला टांग्याचे दिवे लावावे लागले. आधीच बराच उशीर झाला होता. त्यात आणखी कुणी ओळखीचे भेटले की, मेमसाब पंधरा मिनिटे तरी बोलत रहात असे. पण तिने त्याला दोन रुपये दिल्यामुळे त्याला काही विशेष वाटले नाही. तरी त्याला एक गोष्ट बोचून गेली. 'सीतारा असता आठबारा आण्यांखेरीज कधी गिऱ्हाईक मिळाले नाही. आज दोन रुपये मिळाले काय नि न मिळाले काय! सितारेला तो झगा शेवटपर्यंत मिळाला नाही ना?'

त्याने टांगा तबेल्यात ठेवला व घोड्यापुढे गवत टाकले. तो दिवे विझविणार इतक्यात तो थबकला. पाठीमागे बसावयाच्या जागी कागदात गुंडाळलेले काही तरी होते.

"त्या मेमसाबचे राहिले वाटते." तो पुटपुटला.

त्याची बायको चुलीजवळ बसली होती. तिला पाहताच तो दाराशीच थांबला. कारण तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. पण त्याला पाहाताच तिने आपले डोळे पुसले व ती त्याच्याकडे पाठ फिरवून बसली.

ते पाहून कुणीतरी चर्रदिशी काळजावरून सुरी फिरवीत आहे, तसे त्याला वाटले. आपल्याविषयी तिच्या मनात केवढा तिरस्कार भरून राहिला आहे, याची त्याला कल्पना आली. त्याने मनाशी निश्चय केला व सारी हकीगत तिला सांगून टाकण्याचा पुनः एक प्रयत्न करण्याचे त्याने ठरविले. त्याचे दुःख सारखे त्याला छळत होते. ते उघडे करून दाखवायला त्याला कुणीतरी सहानुभूतीचे माणूस हवे होते.

"जरा काम आहे. बाहेर ये जरा." त्याने तिला हाक मारली.

निर्विकार चेहेऱ्याने ती बाहेर आली व भिंतीला टेकून उभी राहिली.

"माझ्यावर का रागावतेस उगाच? शप्पथ देऊन सांगतो की, माझा काही दोष नाही." अबदुल म्हणाला, "सितारा गेल्यापासून माझ्याही पोटात कालवल्यासारखे होत

आहे. तिची आठवण झाली की, मला अगदी भडभडून येतं –'' तो मध्येच थांबला. ती काही बोलली नाही, पण तिचा चेहरा निर्विकार होता.

त्याचा गळा अगदी दाटून आला होता, त्यामुळे त्याच्या तोंडून शब्दच बाहेर पडेना. तो खाली मान घालून थोडा वेळ थांबला. त्याने ते पुडके हातात घेतले व त्याला बांधलेली सुतळी तो काळजीपूर्वक सोडू लागला, पण अखेरीस ती त्याला तोडावी लागली. त्याने दोन्ही बाजूंनी आत दडपलेला कागद बाहेर काढला. इतक्यात त्याच्या हातातून ते निसटले. ते सावरण्याचा प्रयत्न करीत असता त्याच्या हातात नुसता कागद राहिला व त्यातील कापड सळसळत त्या दोघांमध्ये पडले. त्याने सितारेकरिता पाहिलेला निळा झगा होता तो!

''निळा झगा!'' त्याची बायको एकदम म्हणाली, ''आता आणून दुःखावर डागण्या का देता?'' थोडा वेळ ती गप्प राहिली. नंतर अबदुलकडे एकदम वळून संतापाने ती म्हणाली, ''अशानं माझी समजूत काढता! तुम्हाला काही हृदय आहे की नाही? म्हणे मला पोटात भडभडून येतं! जिवंत असताना पोरीची एक हौस भागविली नाहीत आणि आत्ता मला दाखविण्यासाठी तो झगा विकत आणता! चिंध्या करून टाका त्या झग्याच्या –''

हुंदके देत ती एकदम आत निघून गेली.

खाली मान घालून अबदुल बाहेर आला. त्याच्या डोळ्यांपुढे सितारेचा किंचित् हसरा चेहरा उभा राहिला व त्याचे डोळे एकदम पाण्याने भरले. आपले नुसते सहानुभूतीने ऐकून घेणारेदेखील कुणी नाही याची त्याला जाणीव झाली व त्याच्या डोळ्यांतून दोन अश्रू ओघळले.

पण तो अंधारात उभा असल्याने ते कुणास दिसले नाहीत!

# घड्याळ वाजे टिक् टिक् टिक्...

दुःखी डोळ्यांतून टपटप अश्रू ठिपकावेत त्याप्रमाणे कपाटावर ठेवलेल्या पारदर्शक हिरव्या काचेच्या घड्याळामधून तोच तो आवाज सारखा ऐकू येत होता : टिक् टिक् टिक्...

''शूः, बोलू नको, ती झोपली आहे.'' अंथरुणाकडे मानेने खूण करून पंत हलक्या आवाजात म्हणाले, ''हो, सांगायला विसरलोच. आपण ते घर विकलं ना, त्याचे पैसे उद्या येतील. उद्या घेऊन जाऊ मंदाला मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये. औषधपाण्याची व्यवस्था अगदी ठीक होईल तेथे.'' इतक्या दिवसांच्या धडपडीनंतर का होईना, मंदाला घेऊन जाणे आपणाला शक्य होत आहे याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

मंदा बिछान्यावर कुशीवर वळली. पलंगाच्या फळ्या करकर वाजल्या. तिचा श्वासोच्छ्वास किंचित जोराने होऊ लागला. त्यावेळी तिच्या नाकपुड्या किंचित् विस्तृत झाल्या. पंत क्षणभर थांबले व किंचित खाली वाकून ती डोळे उघडते की काय हे पाहू लागले.

'बरं का मंदा, आपण उद्या मिरजेला जाऊ. तेथे केवढे मोठमोठे डॉक्टर आहेत! मग तू पाच-सहा दिवसांत अगदी बरी होशील. आता काय सांगावे? अगदी खरं हं. आता हास पाहू एकदा.' हे शब्द बोलण्यास व त्यावर तिचे साधे हसणे पाहण्यास पंत कितीतरी उत्सुक झाले होते. मघापर्यंत ते तीनदा बिछान्याजवळ येऊनही गेले होते. पण मंदा जागी झाली नाही. तिला उठवण्याचे त्यांच्या जिवावर आले. अखेर हातात पैसे आल्यावरच ती आनंदाची बातमी तिला सांगण्याचे त्यांनी ठरविले.

ती जागी झाल्यावर तिला द्याव्यात म्हणून त्यांनी मोसंब्याच्या फोडी सोलण्यास सुरुवात केली. अगदी हलक्या हाताने जरी त्यांनी एक फोड सोलली तरीदेखील काही कळ्या कुसकरल्याच. त्यांना वाटले, या जगात अशा किती तरी कळ्या कुस्करल्या जातात. पण त्यांना कुस्करणारी शक्ती कोण आहे कुणास ठाऊक? फोडी सोलून झाल्यावर लाकडी लहान स्टूल किंचित पुढे ओढून त्यावर पाण्याचा तांब्या त्यांनी ठेवून दिला.

''पंत, दिव्यात थोडे तेल घालू का?'' मंदाची धाकटी बहीण शांताने विचारले.

पंतांनी डोळे किंचित बारीक करून पाहिले. दिव्याच्या जाड निळ्या काचेतून थोडे तेल असलेले दिसत होते.

"छे, कशाला? दिवा राहील सकाळपर्यंत." तिच्याकडे पाहात पंत म्हणाले. तिचा चेहरा अत्यंत मलूल आणि त्रासलेला दिसत होता. गेले दोन दिवस ती सारखी मंदाजवळ बसून होती व तेवढ्यात तिला अगदीच थोडी झोप मिळाली होती. "आणि हे पहा," हलक्या आवाजात पंत पुढे म्हणाले, "तू आज झोप. वसंतालाही झोपायला सांग. आज रात्री मी बसेन मंदाजवळ. आज शेवटचीच रात्र आहे. उद्यापासून स्पेशल नर्स वगैरे सारे व्यवस्थित होईल. तू जा, झोप आता. रात्र बरीच झाली. मी आहेच मंदाजवळ –"

माजघरात अंथरूण उघडल्याचा आवाज ऐकू आला. माडीवर वसंताच्या खोलीचाही दरवाजा बंद झाला व थोड्याच वेळात शांतता झाली. मंदा अजून झोपलीच होती. तिच्या बाजूला दिवा फुरफुरत होता. त्याचा प्रकाश आजारी असल्याप्रमाणे फिक्कट पिवळा भिंतीवर पसरला होता. बिछान्यामागे दिव्याच्या थरथरत्या ज्योतीबरोबर हलणारी मंदाची सावली चमत्कारिक वेडीवाकडी व उदास दिसत होती. कपाटावरील हिरव्या घड्याळामधून आवाज येत होता : टिक् टिक् टिक्...

पंतांना सकाळपर्यंत जागायचे होते. तेवढा वेळ काढण्यासाठी त्यांनी रद्दीतून आलेले जुन्या साप्ताहिकाचे एक पान उचलले व किंचित खाली वाकून ते वाचू लागले. पण थोड्याच वेळात त्यांनी ते पान खाली टाकले, व धोतराच्या सोग्याने डोळे पुसले. पेन्शन घेतल्यापासून वाचण्याचे त्यांनी अजिबात सोडून दिले होते. दररोज रात्री मंदाच त्यांना काही ना काही वाचून दाखवीत असे. अर्थात् ही दोन महिन्यांपूर्वीची गोष्ट म्हणा. आपल्या जीवनप्रवासाच्या शेवटच्या भागात मंदाची किती मदत होत असे याची जाणीव गेल्या दोन महिन्यांत त्यांना अनेकदा झाली होती.

त्यांना झोप येऊ लागल्यासारखे वाटू लागले. अंगातील सुस्ती घालविण्यासाठी ते खिडकीपाशी आले व त्यांनी खिडकी उघडली. बाहेरील थंडगार वाऱ्याची झुळूक लागताच त्यांचे अंग शहारले. पण त्यांना तितकीच हुषारी वाटली. चांदण्यांनी भरून गेलेले आकाश चमक्या बसवलेल्या मखमलीच्या तुकड्यासारखे दिसत होते. काळसर आकाशाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारा सरस्वती विद्यामंदिराचा प्रचंड मनोरा जणू तितक्या उंचीवरून पहारा करीत होता. स्वातंत्र्य चौकातील दिव्यांचा प्रकाश खाली फरशीवर वर्तुळाकार पडला होता. पण तेवढा भाग सोडला तर वळसे घेतघेत गेलेला बाकीचा रस्ता अंधारात अस्पष्ट दिसत असून पूर्णपणे निर्जन होता. रस्त्यालगतची आंब्याची झाडे रात्रीच्या थंडीने काकडल्यासारखी अगदी स्तब्ध दिसत होती. जिच्या सान्निध्यात कोणत्याही मनुष्याला अगदी एकटं एकटं वाटू लागले असते अशी विलक्षण स्तब्धता सगळीकडे पसरली होती. डोळे उघडताच स्वप्नातील हसणाऱ्या नाचणाऱ्या आकृती एकदम नाहीशा होऊन कसे शांत वाटते, त्याप्रमाणे थोड्या वेळापूर्वी सारखी धडपडणारी माणसे अदृश्य झाल्यामुळे जग असे विलक्षण शांत झाले आहे असे त्यांना क्षणभर वाटले. मात्र क्वचित प्रसंगी

वाऱ्याची एक लहानशी झुळूक मध्येच जागी झाल्याप्रमाणे इकडून तिकडे जाई, काही फांद्या हलत, पानांची सळसळ होई व पुन्हा पूर्वीसारखे सारे शांत होई...

मंदा अजून झोपलीच होती. तिचा उजवा हात पलंगाच्या काठावरून खाली घसरून लोंबत होता व तिच्या अंगावरील चादरही जरा सरकल्यासारखी दिसत होती. पंतांनी चादर सारखी केली, व तिचा हात अलगद पलंगावर ठेवला. त्यांना तो हात देवदारी फळीसारखा वाटला व मंदाविषयीच्या अनुकंपेने त्यांचे हृदय अगदी भरून आले. मंदा कशी सशक्त होती! आपल्या शाळेत तिने एकदा पळण्यात पहिला नंबर मिळवला होता. त्यावेळी पदक दाखवताना उत्साहाने व आनंदाने ओसंडत असलेला तिचा चेहरा पंतांच्या नजरेपुढे अजून स्पष्ट होता. तीच मंदा अगदी असहाय होऊन दोन महिने अंथरुणाला खिळून होती. खरंच, किती भयंकर फरक पडतो पुष्कळ वेळा माणसाच्या परिस्थितीत!

ते इझिचेअरवर येऊन बसले. त्यांना कसली तरी विलक्षण तीव्र हुरहूर लागली होती. उद्या मनीऑर्डरीने रुपये येतील. मग मंदाला मिरजेला नेता येईल. तेथे स्पेशल वॉर्ड, स्पेशल नर्स वगैरे चांगली व्यवस्था होईल. मग मंदा एक दिवस बरी होईल व आपले घर पुन्हा पूर्वीसारखे, नंदादीप लावलेल्या देवघरासारखे दिसू लागेल या आशेचीच ती हुरहूर होती. नंतर थोड्याच दिवसांत मंदाचे लग्न होऊन....

आपल्या आवडत्या पण मृत व्यक्तीसारखीच व्यक्ती अचानकपणे दृष्टीस पडावी त्याप्रमाणे लग्न म्हणताच पंत दचकले. पाठीमागील आठवणींनी त्यांच्या चेहऱ्यावर खिन्नतेची छाया पसरली. सहा महिन्यांपूर्वी त्यांनी मंदाचे लग्न ठरविले होते. मुलगा बी. ए. होता. त्या दिवशी पंतांना एकीकडे आपले पवित्र कर्तव्य पार पाडल्याचा आनंद झाला होता. तर दुसरीकडे मंदा सोडून जाणार याचे त्यांना दुःख झाले होते.

बहुतेक साऱ्या वाटाघाटी पूर्ण करून संध्याकाळी ते घरी आले. मंदाकडे तिच्या दोन मैत्रिणी आल्या होत्या. त्यांनी मंदाची खूप चेष्टा चालविली होती. मंदा जरा रागावल्यासारखे करी. मध्येच डोळे मोठे करून त्यांच्याकडे पाहात असे. पण पुन्हा त्यांच्या हसण्यात आपणही मिसळत असे. आपल्या जाण्याने त्यांचा विरस होऊ नये म्हणून आत न जाता पंत तसेच आपल्या खोलीकडे वळले.

थोड्या वेळाने मंदाने पंतांचा चहा आणला. तिची नजर सहज पंतांच्या चेहऱ्याकडे गेली. चेहरा अतिशय उदास दिसत होता. शिवाय त्यांनी एकदा डोळे पुसल्यासारखेही दिसत होते.

"पंत, कसला विचार करता?" स्टुलावर कप ठेवता ठेवता मंदाने विचारले.

पंतांनी चमकून तिच्याकडे पाहिले. पण लगेच त्यांनी आपला चेहरा खिडकीकडे वळविला.

''छे ग पोरी, विचार कसला करतोय्? सहज बसलो होतो झालं.'' कप उचलीत ते म्हणाले. आपला गोंधळ लपविण्यासाठी मध्येच त्यांनी हसण्याचाही प्रयत्न केला.

''आता इतका सुंदर चहा आम्हाला कधी मिळणार देव जाणे! कालची चिमुरडी पोर तू, पण उद्या स्वतःचा संसार थाटणार. कुणास ठाऊक, तुला आपल्या म्हाताऱ्या बापाची आठवणही होणार नाही.''

''तर तर! माझंच तुम्हाला ओझं झालं होतं अगदी, म्हणून तुम्ही माझं लग्न ठरवण्याची घाई केलीत. आता तर झालात ना मोकळे?'' खोट्या रागाने मंदा म्हणाली. पण तिचे डोळे लपविलेल्या आनंदाने हसत होते ही गोष्ट पंतांच्या नजरेतून सुटली नाही. मधुर पण उदास गाण्याचे सूर पुन्हा पुन्हा हवेवर तरंगत यावेत त्याप्रमाणे तीच तीच चित्रे त्यांच्या डोळ्यांपुढे नाचत होती. वसंतला शाळेत पाठवताना तो गल्लीच्या कोपऱ्यावरून वळेपर्यंत पाहात रहाणारी मंदा, अंगणातील मोगरीची फुले खुडून शांताच्या अंबाड्यावर त्यांची नाजुकशी माळ बांधणारी मंदा, रमाबाईंच्या मृत्यूनंतर अंधाऱ्या झालेल्या घराला आपल्या आनंदाने व उत्साहाने न्हाऊन सोडणारी मंदा आणि उद्याची मंगळागौरीपुढे शालू नेसून बसलेली मंदा आणि परवा...

इतक्यात एक रुमाल बांधलेला व उजव्या पायाने किंचित लंगडणारा गृहस्थ आत आला व पंतांना नमस्कार न करता समोरील खुर्चीवर बसला.

''मी रामरावांकडून आलो आहे.'' त्याने सुरुवात केली. ''त्यांच्या चिरंजिवांच्या विवाहाविषयी आपले व त्यांचे बोलणे झाले आहेच.'' तो जरासा थांबला व त्याने अंगठ्याने आपली चाळशी पुसली.

''जर आपण पाचशेची रक्कम हजारापर्यंत नेत असाल तर पुढील बोलणी पक्की करून टाकायला बरे पडेल. हां, आपणाला अन्याय होतो म्हणून समजू नका. मुलगा चांगला शिकलेला आहे. इंग्रजीसारखा राजमान्य विषय घेऊन पास झाला आहे. त्याशिवाय एक इनामदार आज दोन हजार रुपये द्यायला अगदी तयार आहे –''

शांत सागराची शोभा पाहात खडकावर उभे असावे व मागून कोणीतरी ढकलून दिल्यामुळे पाण्यात पडून गुदमरू लागावे त्याप्रमाणे पंतांची स्थिती झाली. या धक्क्याने मंदाच्या भावी संसाराच्या कल्पनाचित्रांचा चक्काचूर झाला. पाचशेची जोडणी करताकरताच त्यांच्या नाकी नऊ आले होते व तेवढ्यासाठी त्यांना रमाबाईंचे सारे दागिने विकावे लागून वसंताची बाळलेणी गहाण ठेवावी लागली होती. त्यांनी डाव्या हाताने कपाळ दाबून धरले व अगदी असहाय ओढलेल्या आवाजात ते म्हणाले, ''मला ते अजिबात शक्य होणार नाही. माझ्या आवाक्याबाहेर आहे ती गोष्ट –''

तेवढे शब्द उच्चारण्यास त्यांना मोठे वजन उचलण्याइतके श्रम पडले. बराच वेळ ते तसेच बसून होते. मंदाने सारे आतून ऐकले होते. ती पंतांजवळ आली आणि म्हणाली,

"त्यात एवढं मनाला लावून घ्यायला काय झालं? मलाही बरंच झालं. तुमच्याजवळ आणखी थोडे दिवस राहायला मिळालं –" ती हसली. पण तिचे ते हसणे भव्य पण पडक्या वाड्यावर पडलेल्या फिक्कट चांदण्यासारखे उदास होते.

दोन-तीन दिवसांनंतर शांतेसाठी माळा करण्यासाठी फुले नेण्यास मंदा अंगणात आली. तिला पाहताच हातातील काम तसेच टाकून समोरील बिऱ्हाडातील लक्ष्मीबाई मोठ्या लगबगीने बाहेर आल्या.

"हो का ग मंदा, तुझं म्हणे लग्न आणखी लांबणीवर पडलं? आधीच पोरींची लग्नं जमायची मारामार! बापाच्या छातीवर धोंडाच, नाही तर काय! बरं, काय म्हणत होते ते! तुमच्या घराण्याचा इतिहास तितकासा चांगला नाही. शिवाय प्रत्यक्ष मुलीविषयीही म्हणे त्यांनी भलतंच ऐकलं... इश्य, मला तरी काय माहीत! तुमचे ते रामरावच इकडच्या एका मित्राजवळ म्हणत होते –" आपला बाण अचूक लागला या समाधानाने लक्ष्मीबाई निघून गेल्या. फुले खुडण्याचे तसेच सोडून मंदा आत गेली व तिने धाडदिशी दरवाजा लावला.

"शांता, तू शहाणी ना?" तिच्या केसांवरून हात फिरवीत पण तिच्याकडे न पाहता मंदा म्हणाली, "मग माझं एक काम करशील?"

"काय?" शांताने विचारले.

"आता जे तू ऐकलंस त्यातील एक अक्षरही पंतांना सांगायचं नाही –" आत जाताजाता ती म्हणाली. रात्री बोलताबोलता शांताने शब्द न् शब्द पंतांना सांगितला व आपण सांगितले हे मंदाला न सांगण्याविषयी तिने पंतांना बजावले.

त्यानंतर मंदा जेव्हा बाहेर येई त्यावेळी शेजारच्या बायका तिच्याकडे बोट दाखवून कुजबुजत. ज्यांनी तिची थट्टा केली होती त्याच मैत्रिणी तिला खोट्या उत्सुकतेने कुत्सित प्रश्न विचारू लागल्या. मंदाच्या चेहऱ्यावर पूर्वीचा उत्साह राहिला नाही. वसंत शाळेला जाताना ती क्वचितच दारात दिसू लागली. शांताला आता पूर्वीसारख्या माळा मिळत नसल्यामुळे एखाददुसरे फूलच ती वेणीत खोचीत असे व अंगणात फुललेल्या मोगरीचा सारा बहर खाली पडून अगदी मातीमोल होऊ लागला.

पंतांना त्या दिवशी आश्चर्य वाटले. शांता चुलीपुढे बसून फुंकत होती व वसंत तिला मधूनमधून मदत करीत होता.

"म्हणजे? मंदा कुठं आहे?"

"ती झोपली आहे. तिला ताप आला आहे." मध्येच वसंत म्हणाला. पंत तसेच आत गेले. ते आलेले पाहताच मंदा चटकन् उठून बसली व आळस झाडून टाकीत म्हणाली, "छे छे, मला काही झालं नाही. वसंत काहीतरी सांगतो झालं. जरा कंटाळा आला होता इतकंच."

पंतांनी तिच्या हाताला हात लावला. अंग रसरसले होते. ते मुकाट्याने बाहेर आले व आपल्या खोलीत गेले. लग्न मोडल्यापासून त्यांनी बाहेर जाण्याचे जवळजवळ सोडून दिले होते. सारा वेळ ते खिडकीपाशीच बसून असत. तेथून त्यांना अंथरुणावर निजलेली मंदा दिसे – तिची हाक ऐकू येई. तर दुसरीकडे नेहमीप्रमाणे चालू असलेली रहदारी, आपापल्या कामात गढून गेलेली बेफिकीर चेहऱ्याची माणसे दिसत. आज दोन महिने झाले होते. मंदाला तेथून हलविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. त्याकरिता पंतांनी जेथे आपले सारे बालपण काढले होते ते खेड्यातील घर लालचंद मारवाड्याला अगदीच थोड्या किंमतीला विकून टाकले होते. त्या घराकडे पाहताना त्यांना भल्या पहाटेला उठून भूपाळ्या म्हणणाऱ्या वडिलांची, शाळेला जाताजाता खिशात दोन बत्तासे टाकणाऱ्या आईची व ओढ्याकाठच्या भल्या मोठ्या झाडावर चढून लाल चिंचा काढून देणाऱ्या मारुती गुराख्याची आठवण होत असे. पण आता त्या अंधुक पण रम्य जगाशी त्यांचा काही संबंध उरला नव्हता. आपण होऊन त्यांनी रेशमाचा धागा तोडून टाकला होता...

पंतांनी डोळ्यांवरून हात फिरविला व आळस झाडून ते उभे राहिले. सर्व काही पूर्वीसारखेच होते. त्यांनी वाडग्यात थोडे पाणी घेतले व चूळ भरली. वाडगा तसाच तांब्यावर ठेवून ते इझिचेअरवर येऊन बसले. किंचित् थंडी लागली म्हणून एक रग त्यांनी अंगाभोवती गुंडाळला. कपाटावरील हिरवे घड्याळ वाजत होते : टिक्-टिक्-टिक्.

ते जागे झाले त्यावेळी लखलखीत प्रकाश पडला होता. आपणाला झोप लागली याची त्यांना अतिशय शरम वाटली, व ते लगबगीने उठून इकडे तिकडे पाहू लागले. मंदा अजून झोपल्यासारखीच दिसत होती. तिचा उजवा हात पलंगावरून घसरून खाली लोंबत होता, व अंगावरील चादरही खूपच सरकली होती. स्टुलावरील तांब्या कुणीतरी ओढल्याप्रमाणे जमिनीवर पडला होता, व त्यातील पाण्याचा पट्टा जमिनीवर पसरला होता. दिवा केव्हाच गेला होता. त्यातील तेल संपले होते व वातीवर पाव इंच राखेचा थर जमला होता. मंदा झोपल्यासारखी दिसत होती. पण तिचा चेहरा स्वच्छ आरशावर फुंकर मारल्याप्रमाणे मलीन दिसत होता. पंतांनी तिचा हात उचलून पलंगावर ठेवला. तो त्यांना अगदी थंड लागला. त्यांना भयंकर शंका आली. आपल्या हृदयाचे ठोके क्षणभर बंद पडले असा त्यांना भास झाला. त्यांनी खाली वाकून पाहिले व त्यांचा चेहरा पांढरा फटफटीत झाला. वसंत, शांताला हाक मारण्यासाठी त्यांनी तोंड उघडले. पण त्यांच्या तोंडून शब्दच बाहेर पडेना.

काल रात्री काळी दिसणारी झाडे रेशमाची पाने असल्यासारखी चमकत होती. निर्जन दिसणारा रस्ता माणसांनी फुलून चालला होता. अनंत आकाशात सूर्यप्रकाश भरून राहिला होता. पण पंतांच्या मुठीएवढ्या हृदयात मात्र पूर्ण अंधार होता.

थोड्या वेळाने पायरीवर कुणाची तरी पावले वाजली व मागून दार ठोठावणे ऐकू आले. ते ऐकू येत असताही पंत उठले नाहीत. दार ठोठावणे जास्तच जोरात ऐकू आले व पाठीमागून किंचित चिडलेला आवाज ऐकू आला,

"अहो, पोस्टमन आहे पोस्टमन. मनीऑर्डर आहे –"

पंत वाट पाहात असलेली मनीऑर्डर आली होती.

दुःखी डोळ्यांतून टपटप अश्रू ठिपकावेत त्याप्रमाणे कपाटावर ठेवलेल्या पारदर्शक हिरव्या काचेच्या घड्याळामधून आवाज येत होता : "टिक् टिक् टिक्..."

# भागीदार

नेहमीप्रमाणे तो कुणाशी न बोलता बाहेर पडला. मध्येच त्याला कसलीशी आठवण झाली व त्याचा चेहरा किंचित उजळला. पण तो क्षणभरच. पुन्हा त्याचा चेहरा गंभीर झाला. खाली मान घालून सावकाश पावले टाकीत तो खोलीकडे वळला.

ऑफिसला जाताना तो खोलीला नुसती कडीच लावत असे. चोरीला जाण्याजोगे त्या खोलीत होते तरी काय? कोपऱ्यात एक मळकट वळकटी असून तिच्याखाली कडेकडेने उसवत आलेली एक चटई होती. कोपऱ्यातील मोडक्या पेटीवर पाच-सात जुनी पुस्तके दिसत. त्या पेटीच्यावर धुळीने पुसट झालेला त्याच्या आईचा फोटो होता. त्या फोटोला कसर लागल्यामुळे त्याला ठिकठिकाणी भोके पडली होती व त्यामधून खालचा पुठ्ठा दिसे.

त्याने दार उघडले. कोट काढून निष्काळजीपणाने कोपऱ्यात टाकला, व तो वळकटीस टेकून बसला. नेहमीच्या सवयीप्रमाणे त्याने एक पुस्तक उचलले व तो त्याची पाने चाळू लागला. पण आज त्याचे मन त्यात रमेना. त्याने ते पुस्तक परत पेटीवर भिरकावले. आज त्याला कसलीशी हुरहूर – अस्वस्थता लागून राहिली होती.

त्याने लग्न केले नव्हते. दहा-बारा वर्षांपूर्वी एका मुलीने – त्या साऱ्यांच्या शांतीने – त्याला लग्नाचे वचन दिले होते. पण नंतर एक महिन्यातच त्याला तिची लग्नपत्रिका मिळाली. तिचे लग्न त्याच्या हेडक्लार्कच्या भावाशी ठरले होते. ऑफिसहून येताना कधी तरी ठाकुरद्वारला त्याला ती दिसे. तिच्या गालांची हाडे वर आली होती, व तिच्या चेहऱ्यावर सुरकुत्या दिसू लागल्या होत्या. तिच्यामागे बावळट दिसणारी दोन-तीन मुले असत. तिला पाहताच त्याच्या हृदयात काही तरी खुपू लागे. पण तो तिच्याशी कधीच बोलला नाही. ती समोर दिसताच अगदी अंग चोरून तो कडेकडेने निघून जाई...

तो उगाचच खोलीबाहेर आला. समोरच्या बिऱ्हाडात आनंदीबाई पंतांना बाजार सांगत होत्या. वसंत आणि सुशीला व्हरांड्यात हसतखेळत होती. तो आत आला, जरा बरे वाटण्यासाठी तो बाहेर गेला, पण बाहेर त्याला जास्तच उदास वाटू लागले. तो आत

आला, व खोलीतल्या खोलीतच विमनस्कपणे येरझारा घालू लागला. तोच त्याच्या पायाला मऊमऊ काही तरी लागले. शेजारच्या घरातील मांजराचे पिलू त्याच्या पायाला आपले अंग घाशीत होते. त्याचे डोळे आनंदाने चमकले. त्याने चटकन् त्या पिलाला उचलले, व त्याचे मऊमऊ अंग आपल्या गालाला घाशीत तो म्हणाला, "पिल्या, आज काय गम्मत झाली ठाऊक आहे? आज मला दोन रुपये प्रमोशन मिळाले – प्रमोशन –"

आपल्या मनावरचे दडपण उतरल्यामुळे त्याला विलक्षण समाधान वाटले!

# रझिया

रझिया ज्या खेड्यात राहात होती, तेथून पाहिले की वर अस्पष्ट होत गेलेली नंदादेवीची हिमाच्छादित शिखरे दिसत. यामुळे तिच्या चालण्यातही, उतरणीवर चरणाऱ्या पाऱ्यासारख्या तेजस्वी व चंचल डोळ्यांच्या हरिणीची मिजास होती. तिच्या स्निग्ध गोलसर चेहऱ्यावर पर्वतावरील हवेचा तजेला होता. तिला जवळचे असे कुणी नातलग नव्हते. तिचे वय जरी बावीस- तेवीस वर्षांचे होते तरी अद्यापि तिचे लग्न झाले नव्हते. प्रत्येकाला या गोष्टीचे आश्चर्य वाटत असे. पुढे ती ज्यावेळी अहमदबरोबर त्या भिकार, कुणीतरी पायाखाली चिरडल्याप्रमाणे दिसणाऱ्या खेड्यात राहायला आली, तेव्हा तर प्रत्येकजण तिच्याकडे निरखून पाहात असे.

अहमद हा मॅजिस्ट्रेटकडे चपराशी होता. वास्तविक तो अगदीच आळशी व बावळट होता. विडीच्या एका थोटकासाठीही तो खोटे बोलत असे. पण मॅजिस्ट्रेटसाहेब जरा दयाळू असल्याने त्याची नोकरी कशीबशी टिकून राहिली होती. इतकेच नव्हे, तर त्याच्या छातीत काहीतरी होऊन तो खोकूनखोकून हैराण होऊ लागला, त्यावेळी त्यांनी स्वतःच्या खर्चाने त्याला हवा बदलण्यासाठी पाठविले.

एक दिवस भल्या पहाटेला कमावलेल्या कातड्यासारख्या चेहऱ्याचा, कवड्या डोळ्यांचा अहमद आगगाडीत चढला. हळूहळू रुक्ष मैदाने लांबलचक पसरलेली खिडकीतून दिसू लागली; नंतर मधूनमधून मुठीएवढ्या हिरव्या टेकड्या दिसू लागल्या; थोड्याच वेळात त्या जवळ जवळ येऊ लागल्या व भुताप्रमाणे विशाल भयानक दिसू लागल्या.

पाणी घेण्यासाठी आगगाडी एका लहानशा स्टेशनवर थांबली आणि त्या स्टेशनवरच अहमदची गाडी चुकली; पण त्याला रझिया मिळाली.

अवघडलेले पाय मोकळे करण्यासाठी तो खाली उतरला. प्लॅटफॉर्मच्या एका टोकाला असलेल्या नळावर पाणीबिणी पिऊन तो परत फिरतो तोच आगगाडीने एक चिरचिरी शिटी दिली व ती मोठ्या बेफिकीरपणाने झुकझुक करीत निघून गेली. अहमद खालीच बसला व लहानलहान होत चाललेल्या आगगाडीकडे बावळटपणाने पाहू लागला. अखेर कंटाळा आला म्हणून उठून तो प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या टोकाला गेला, तो तेथे गव्हाच्या रंगाची शेळीची दोन पिले लहान मुलांप्रमाणे जवळ घेऊन एक स्त्री उभी होती, तिच्याकडे त्याची नजर गेली. त्याने तिच्याकडेच पाहिले, कारण तेथे दुसरे काही नव्हतेच.

तिच्या उभे राहण्यात पोलादी सळईचा लवचिकपणा होता व तिचा भरदार गळा एखाद्या देवतेच्या गळ्यासारखा दिसत होता. गळ्यात पांढऱ्या टपोऱ्या मण्यांची एक माळ होती. तिचे हात गोलाकार असून तळव्याकडे मोठ्या आकर्षक रीतीने निमुळते होत गेले होते. त्याच्या पाहण्यात आलेल्या साऱ्या स्त्रियांपेक्षा तिच्यात विशेष काहीतरी होते. अहमदने पुन्हा एकदा तिच्याकडे भीतभीत पाहिले व तो एकदम हुंदके देऊ लागला. त्याचे रडणे अगदी शेळीच्या ओरडण्यासारखे होते. ते ऐकून ती पिलेही मान हलवीत बें बें करू लागली. ते पाहून हनुवटी किंचित् वर करून ती एकदम हसली. त्या साऱ्या गोंधळात तिचे हसणे देवळातील घंटेप्रमाणे अगर कड्यावरून खाली पडणाऱ्या झऱ्याप्रमाणे एकदम निराळे व अतिशय आल्हादकारक वाटले.

अहमद थांबला व त्याने नाक शिंकरले. पितळेचा बिल्ला असलेला आपला मळकट रुमाल त्याने सारखा केला; पायांतील चढाव काढून त्यांतील पाचसात खडे काढून टाकले व रझियाकडे पुन्हा एकदा नजर टाकली.

''गाडी निघून गेली, आणि मी बसलो इथंच.'' तो म्हणाला.

''ते सारं पाहिलं मी.'' ती म्हणाली आणि पुन्हा हसली. त्या हसण्यात संध्याकाळी उतरणीवरून मेंढ्या परतू लागल्या की, होणाऱ्या त्यांच्या गळ्यांतील बारीक घंटांच्या आवाजासारखे काहीतरी गोड धुंद होते. क्षणभर एक गोड शिरशिरी अहमदच्या अंगात चमकली. पण ती फार वेळ टिकली नाही. त्याच्या डोळ्यांपुढे एकाएकी गरगरल्यासारखे झाले व एकदम अंधार झाला. रझियाचे लक्ष एकदम त्याच्याकडे गेले. तिने ती पिले अलगज जमिनीवर ठेवली. ती त्याच्याकडे धावली व तिने त्याला आपल्या हातात सावरले. तो डोळे मिटून एखाद्या लहान मुलासारखा पडला होता. तिने त्याला उचलून घेतले व ती प्लॅटफॉर्मवरून धुळकट रस्त्यावर आली आणि मैल दीड मैलावर असलेल्या आपल्या खेड्याकडे चालू लागली. ती पिलेही तिच्यामागून कापसाच्या पुंजक्याप्रमाणे वाऱ्यावर उड्या मारत चालू लागली. तिला जड ओझी उचलण्याची सवय होतीच व मोकळीच चालल्याप्रमाणे तिची पावले सहज पडत होती. खेड्यात आल्यावर तिच्याभोवती लोकांचा एकच घोळका जमला.

''आणि हा कोण आणलास बरोबर ?'' दोघातिघांनी विचारले.

''हा ? हा माझा नवरा.'' रझिया म्हणाली.

''हा तुझा नवरा ?'' एक उद्गारला. तो कधीतरी रझिया आपल्याशी लग्न करील म्हणून पाचसात वर्षे आशा धरून होता. त्याने अहमदकडे पाहिले. ''हे झुरळ तुझा नवरा ?'' तो पुटपुटला व तिरस्काराने बाजूला थुंकला.

रझियाने अहमदला हलकेच खाली ठेवले. त्याने डोळे उघडले त्यावेळी आजूबाजूचे सुंदर खेडे त्याच्यापुढे एखाद्या चित्राप्रमाणे पसरले. सारवलेली लहानलहान घरे आरशात

मांडल्यासारखी दिसत होती. गावात झुळझुळ वाहणारा एक ओढाही होता व त्याचे पाणी नळासारख्या बांबूतून शेतात व बागेत नेले होते. त्याने आजूबाजूच्या लोकांकडे पाहिले आणि त्याची दृष्टी त्याच्यामागील हिरवीचार शेते, रंगीबेरंगी फुलांचा अगदी क्षितिजावरील टेकड्यांपर्यंत पोहोचलेला गालिच्यासारखा विस्तार यांच्याकडे गेली. वाऱ्याची झुळूक आली की, फुलांवर लाटा दिसू लागत, व त्या लाटा टेकड्यांपर्यंत पसरत जाऊन तेथे एकदम थुईदिशी फुटणार असा क्षणभर भास होत असे. एखाद्या स्वप्नाप्रमाणे ते सारे सुंदर होते आणि त्यातून आपण जागे होऊ अशी भीती वाटून की काय, त्याने पुन्हा डोळे मिटले. रझियाच्या उष्ण हाताचा पुन्हा स्पर्श झाला व लगेच तिचा आवाज ऐकू आला,"अरे पळ, आणि जरा पाणी घेऊन ये –"

अहमदला झुरळ म्हटलेला मनुष्य विहिरीकडे गेला. ती आपल्याशी कधीतरी लग्न करील या आशेने तो पूर्वी तिची सारी कामे ऐकत असे. पण आता काही आशा नसताही, निवळ तिची कामे ऐकण्याची सवय असल्यामुळे त्याने घागरभर पाणी आणले...

सहा आठवडे अहमद रझियाच्या घरी राहिला व गोष्टींच्या पुस्तकात असते ना, त्याप्रमाणे रझियाने रात्रीचा दिवस करून त्याची शुश्रूषा केली. तिच्या साऱ्या दोन खोल्या होत्या, पण तिने त्या इतक्या स्वच्छ ठेवल्या होत्या की, जमिनीवर जेवायला कुणाला संकोच वाटला नसता. एका कोपऱ्यात चूल होती; तिच्या बाजूला पितळेची भांडी ठेवली होती. वरच्या फळीवर लाकडे व्यवस्थित रचली होती. दुसऱ्या खोलीत ती झोपत असे. पण आता आपली खाट व रंगीबेरंगी कापडाचे तुकडे लावलेली सुंदर चादर तिने अहमदला दिली, आणि स्वत: एक कापडाचा तुकडा पांघरून खाली झोपू लागली.

ती दररोज त्याला दूधभात देत असे. एकदा तिने त्याच्याकरिता सागुती तयार केली. तिने आपली विस्तवाप्रमाणे धगधगीत धारेची रेषा असलेली सुरी हातावर तीनचारदा जलद फिरविली व त्या दोन पिलांपैकी एक पिलू कापले. इवलाले पाय झाडीत निर्जीव होत चाललेल्या त्या मूठभर शरीराकडे तिने क्षणभर पाहिले व ती कामाला लागली. अहमदचे जेवण होइपर्यंत ती त्याच्याजवळ बसत असे. त्याच्या अंघोळीची सारी तयारी तिलाच करावी लागे. ती त्याच्या जटांसारख्या केसांना तेल लावी व पुष्कळदा त्याचे काटक्यांसारखे पायही चेपीत असे. तो झोपी जाईपर्यंत ती त्याच्या शेजारी बसे व तो जागा झाला की, त्याच्या दृष्टीस प्रथम तिचा वाट पाहात असल्यासारखा दिसणारा चेहरा दिसे. त्याला त्या आयुष्याचा कंटाळा येऊ नये म्हणून ती त्याच्यासाठी उतरणीवरील मेंढपाळांची गाणी म्हणे अगर बांबूच्या बेटातून वारा सळसळावा त्याप्रमाणे बारीक आवाजात शीळ वाजवीत असे.

या साऱ्याबद्दल तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना काय वाटत असे देव जाणे! पण त्यांना अहमदविषयी काय वाटत होते हे मात्र सहज समजण्यासारखे होते. परंतु त्यांना रझियाविषयी अतिशय आपुलकी – अथवा भीतीही असेल कदाचित् – वाटत असल्याने तिच्यासमोर कुणी काही म्हणत नसत. तिच्यावर आशा ठेवून असलेला तो तरुण तर गावच सोडून गेला. कारण ज्यावेळी त्याची नजर अहमदकडे जात असे त्यावेळी त्याचा धुरकटल्यासारखा दिसणारा गळा चिरून टाकावा असे त्याला वाटे.

अहमदचे बस्तान एकंदरीत ठीक बसले. त्याला स्वत:ला एकंदरीत काय वाटत होते हे फारसे महत्त्वाचे नाही. कारण तेवढा विचार करण्याइतकी त्याला अक्कलही नव्हती. खरे सांगायचे म्हणजे तो एक अगदी क्षुद्र, स्वार्थी मनुष्य होता. रझियाच्या घरी आल्यापासून तर त्याचे मन वारा प्याल्यासारखे झाले होते. तिच्या ऊबदार चादरीखाली पडून तो ज्या ज्या वेळी स्वयंपाक करीत असलेल्या रझियाकडे पाहात असे त्या त्या वेळी त्याला वाटे, "ही पोरगी नुसती मस्तच नाही, तर पैसेवालीही आहे. दोन शेते, एक बाग, थोडेसे दागिने... हा!"

त्याच्या साऱ्या प्रश्नांना ती अगदी मनमोकळेपणाने उत्तर देत असे. "मी माझ्या आईबापांना अगदी एकुलती एक होते," एकदा ती म्हणाली, "मी म्हणायची खोटी, जादू असल्याप्रमाणे साऱ्या वस्तू माझ्यापुढे येऊन पडत. मी म्हणजे आपलं सारं आयुष्य ओतून भरून ठेवलेलं काचपात्र आहे असे ते म्हणत. ते वारल्यावर ही शेतं, हे घर, बागबगीचा, सारं माझंच झालं. आतापर्यंत मी लग्न केलं असतं, पण माझं मनं फुलविणारा अद्याप कुणी भेटलाच नाही मला –"

ती त्याच्या शेजारी खाटेजवळ बसली होती व त्याच्याकडे मृदू नजरेने पाहात होती. "माझ्यावर त्यांचं जसं प्रेम होतं, तितक्या जिव्हाळ्याने मी दुसऱ्यावर प्रेम केलं पाहिजे असं मला फार वाटतं; त्यांनी आपलं आयुष्य माझ्यात ओतलं, मीही माझं आयुष्य दुसऱ्या कुणामध्ये तरी ओतलं पाहिजे, नाही? अशा कुणाची तरी मी वाट पाहात होते, आणि मग त्या दिवशी तू दिसलास –" ती एकदम थांबली.

"पण तू स्टेशनवर काय करीत होतीस?" अहमदने विचारले.

रझिया किंचित् हसली. कोंबड्याच्या पिसाऱ्यातील एखादे लाल पीस वाऱ्यात थरथरावे त्याप्रमाणे तिचे लाल ओठ हसण्याने किंचित् हलले.

"मी तुझी वाट पाहात होते." ती म्हणाली.

हे भाग्य अहमदच्या वाट्याला आले होते! त्याच्या स्वत:विषयी काही फारशा मोठ्या कल्पना नव्हत्या. आणि तसे पाहिले तर त्या असण्याचे फारसे काही कारणही नव्हते.

त्याच्या गावात तर त्याचे शेजारी त्याला लूत भरलेल्या कुत्र्याप्रमाणे वागवीत. मॅजिस्ट्रेटसाहेब जरी दयाळू होते तरीदेखील त्यांनी टेबलावर धूळ राहिली होती, पोस्टात पत्रे टाकायची राहून गेली होती, यासाठी त्याला दोनचारदा फोडून काढले होते. गावातील काही उनाड पोरे त्याच्या कुबड काढून चालण्याची नक्कल करीत व त्याला वेडावून दाखवीत.

आणि आता पहा, या अहमदकडे सोन्याचे भाग्य कबुतराच्या पंखांनी येत होते!

रझियाने त्याच्याकडे पाहिले. काचेच्या मण्यासारख्या तेलकट डोळ्यांनी तो तिच्याकडे रोखून पाहात होता. तिचे हृदय रेशमी धाग्यासारख्या नाजूक भावनांनी एकदम भारून गेले व तिने मान वळविली. ती उठली व त्याच्याकरिता संध्याकाळी दुसरेही पिलू कापण्याचे तिने ठरविले.

अहमद बरा झाला.

"आता आपणाला आपल्या लोकांत गेलं पाहिजे." तो रझियाला म्हणाला, "आपलं घरदार, आपले लोक यांना विसरून चालणार नाही." त्याने ऐटीने रझियाकडे पाहिले व तो थांबला.

वास्तविक त्याला घरदारही नव्हते आणि लोकही नव्हते. तो गावाच्या टोकाला एका भिकार झोपड्यात राहात असे.

"पण आपण इथंच राहिलो तर काय होईल?" रझिया म्हणाली, "आपले दिवस इथं किती सुखात चालले आहेत!" तिने सहज खिडकीबाहेर पाहिले. अगदी दूरवर भरदार कलिंगडाचे वेल पसरले होते, मधूनमधून बांधावर पिवळी धमक नागफुले होती आणि अगदी दूर कुणीतरी खाली वाकून पाहात असल्याप्रमाणे दिसणाऱ्या ठेंगण्या टेकड्या दिसत होत्या.

"हं:! काय होईल म्हणे!" अहमद उपहासाने उद्गारला, "म्हणजे काही कामधंदा आहे की नाही मला!"

"पण आपणाला येथे पोटापाण्याला काही कमी नाही," रझिया म्हणाली, "आणि या घरात तू प्रथम आलास, येथेच बरा झालास. आता हे घर सोडून कशाला जायचं दूर?"

आता अहमदला तिचा स्वभाव समजला होता. आतापर्यंतच्या साऱ्या आयुष्यात त्याला कुणी दृष्टीभरही सहानुभूती दाखविली नव्हती, त्याच्या सुखासाठी कुणीही जीव टाकला नव्हता. पण त्याच्या जीवनात रझिया आली आणि तिने आपले जीवन त्याच्या पायाशी ठेवले. – आपण बोट उचलण्याचा अवकाश, की तिने आधी आपल्याकडे यावे अशी त्याची अपेक्षा होती. – ती धावत येईल याची त्याला खात्री होती. तिच्या

प्रत्युत्तराचा आपणाला फार राग आला असे दाखविण्यासाठी तो उठला, त्याने दात आवळून हात उचलला व फाडकन् तिच्या गालावर प्रहार केला!

रझियाने नुसत्या हाताने त्याची कुजलेल्या दोरीसारखी दिसणारी मान मोडून टाकली असती, पण त्या प्रहाराने तिचे डोळे अहमदसाठी मारलेल्या त्या पिलांच्या डोळ्यांप्रमाणे किंचित् मोठे, आर्द्र व हताश झाले. ती एकदम त्याच्या पायाशी कोलमडली व अस्पष्टपणे पुटपुटली, "बरं, मी येते तुझ्याबरोबर तुझ्या गावाला –"

आणि ज्यावेळी अहमद व त्याच्या मागोमाग खाली मान घालून येणारी रझिया गावात आली त्यावेळी शेजारीपाजारी तर जागच्या जागीच थिजले. त्याने इकडेतिकडे मोठ्या आढ्यतेने पाहिले व आपले घाणेरडे झोपडे लोटून काढण्यास रझियाला फर्माविले. ते भिकार कोल्ह्याचे बीळ पाहून तिला काय वाटले कुणास ठाऊक! पण तो गेल्यावर तिने भिंती सारवल्या, चुलीच्या विटा सरळ केल्या आणि अंगण सारे झाडून काढले. अहमद परत आला, त्यावेळी आपली झोपडी प्रथम त्याला ओळखलीच नाही.

"साहेब आज मोठ्या खुषीत होते," अहमद म्हणाला, "मी लग्न केलं म्हणताच अर्ध्या महिन्याचा पगार बक्षीस दिला मला."

तिचा चेहरा उजळला. अहमदला बरे वाटल्याने तिलाही सुख वाटले. अहमदने आत नजर टाकली. आतील जमीन सारवली होती. दरवाज्यातून आत आलेल्या प्रकाशाचा मोठा चौकोन भांड्यांवर पडला होता व ती जिवंत झाल्याप्रमाणे झगझगू लागली होती. खाटेवरील अंथरूण गुंडाळून व्यवस्थित भिंतीला लावून ठेवले होते.

अहमदच्या बाबतीत आपला अंदाज चुकला की काय असे शेजाऱ्यापाजाऱ्यांना वाटू लागले. डोक्यावर घागर ठेवून फुलासारखी पावले टाकीत रझिया समोरून गेली की, ते पुटपुटत, "या पोरीला त्या अहमदमध्ये काय दिसले देव जाणे!"

आणि संध्याकाळी अंगणात बसून ती बारीक आवाजात मेंढपाळाची गाणी म्हणू लागली किंवा गुराख्याचा पावा वाजावा त्याप्रमाणे गोड शीळ घालू लागली की, आजूबाजूच्या बायका हातातील कामे बाजूला ठेवून बाहेर येऊन ऐकत बसत.

रझियाला मात्र आपली शेते, आकाश दुभंगणारी पर्वताची शिखरे यांची सारखी आठवण होत असे. घराभोवती काहीतरी डोळे निववणारे असावे असे तिला वाटू लागले. तिने अंगणातील उन्हाने तडकलेली जमीन खणून काढली व बियांच्या आठदहा रांगा केल्या. पाणी शिंपून तिने त्या जिवंत केल्या. जमिनीवर हिरवे ठिपके दिसू लागताच धगधगीत उन्हात ते करपू नयेत म्हणून त्यांच्यावर गवताच्या टोप्या केल्या. नंतर सावलीकरिता निंबाच्या झाडांमध्ये झपाट्याने वाढणारी एरंडाची झुडुपे तिने लावली. थोड्या अवधीत अंगण हिरवेगार दिसू लागले. एरंडाची पाने वाऱ्याने पंख्यासारखी हलू लागली, व सुईऽ असा आवाज करीत डौलदारपणाने खाली उतरणारी आकाश-निळी कबुतरे

उन्हाच्या वेळी तेथे बसल्याबसल्या घुमू लागली... पण त्या झाडांमुळे एक चमत्कारिक प्रसंग घडून आला.

अहमद एक दिवस नेहमीप्रमाणे संध्याकाळी घरी आला. त्यावेळी आजूबाजूला काहीतरी विशेष घडल्यासारखे दिसत होते. शेजारीपाजारी घोळके करून उभे होते. रझिया मात्र शांतपणाने आपली कामे उरकीत होती. इतक्यात बाजूच्या निंबाच्या झाडात कसला तरी आवाज झाला. अहमदने आश्चर्याने वर पाहिले. झाडावर एक मनुष्य भेदरलेल्या चेहऱ्याने माकडासारखा अंग चोरून बसला होता.

"तू गेल्यावर हसनमियां माझ्याकडे आला," रझिया शांतपणे म्हणाली, "तो काहीतरी पाचकळ बोलू लागला. मी सुरी काढताच तो झाडावर जाऊन बसला आहे."

"पण आता येऊ का मी खाली?" केविलवाण्या आवाजात हसन ओरडला, "चार तास बसलोय मी इथे. पाय मोडायला आले अगदी!"

रझियाने अहमदकडे पाहिले, "आता पहा तुझे तूच," ती म्हणाली, "मला वाटतं, पुरे झाली या भेकडाला शिक्षा —"

"बराय, उतर खाली!" अहमद किंचित् तुच्छतेने म्हणाला, "पण याद राख, पुन्हा सापडलास तर! ती बाईमाणूस होती म्हणून तिने तुझी गय केली. पण मी मोठा भयंकर माणूस आहे. गळा चिरून टाकीन... काय?"

हसन झाडावरून उतरला व जमलेल्या घोळक्यात नाहीसा झाला. दोनचार जणांनी त्याची टोपी उडवण्याचा प्रयत्न केला.

सिंहाच्या पिंजऱ्यात मोठ्या निर्भयपणे फिरणाऱ्या मनुष्याप्रमाणे अहमदने इकडेतिकडे ऐटीने पाहिले व तो आत गेला.

"ए, माझे पाय आज फार दुखत आहेत." बाहेरच्या सगळ्यांना ऐकू जाईल अशा आवाजात तो म्हणाला, "जरा पाणी आण आणि धू पाहू ते."

रझियाने निमूटपणे घागर उचलली व ती विहिरीकडे गेली.

रझियाचे बरेच महिने सुखाच्या ऊबदार उन्हात गेले. अहमदकरिता काम करण्यात — नव्हे, गुलामगिरी करण्यात — तिला फुलांच्या सुवासासारखा नाजूक आनंद मिळे. रात्रंदिवस ती कशात ना कशात गुंतलेली असे. तिने त्या भिकार झोपड्यातून एक सुंदर चित्र निर्माण केले होते. झोपडीवर नवीन छप्पर झाले असून भिंती स्वच्छ सारवलेल्या होत्या. समोर अंगणात शेणी चौकोनाकार रचून ठेवल्या होत्या. त्या प्रत्येकीवर रझियाचा हात उमटलेला स्पष्ट दिसत होता... साऱ्या आळीत तिच्या घरावर क्षणभर नजर ठरत असे व अहमदच्या भाग्याचा प्रत्येकाला हेवा वाटे.

शेजारच्या घरातील शेळ्यांना पिले झाली की, उमललेल्या डोळ्यांनी रझिया त्यांच्याकडे पाहात उभी राही. रेशमी कापडाच्या लहानलहान तुकड्यांप्रमाणे दिसणारी ती पिले सतत शेपटी हलवीत आपल्या आयांना सारखी ढुशा देत असत. जराशी मोठी पिले बाहेर वाऱ्यावर बागडत व हातातील उंच काठीला खुरपे बांधून गुराख्यांनी काढलेला निंबाचा कोवळा पाला चघळीत. या साऱ्याकडे पाहिले म्हणजे रझियाला अहमदकरिता कापलेल्या त्या पिलांची आठवण होत असे. पण विशेषत: दुसऱ्या एका गोष्टीची तिला जास्त जाणीव होई व तिचे हृदय दुखल्यासारखे होत असे. लग्न होऊन आता इतके दिवस झाले तरी, कधीतरी कुणी रांगत येऊन दहीदुधाची भांडी पालथी करील अथवा गळ्यातील माळेला हिसके देईल असे चिन्ह दिसत नव्हते. या बाबतीत सारा दोष सर्वस्वी आपलाच आहे असे तिला वाटे. असल्या बाईशी अहमद किती दिवस संसार करील? कधी ना कधी घरी सवत येऊन बसणार हे नक्की... आणि हा विचार मनात आला की, तिला एकदम अस्वस्थ वाटू लागे व रात्रभर तिच्या डोळ्याला डोळा लागत नसे.

अहमदला खूष ठेवण्यासाठी ती जास्तच धडपडू लागली. अगदी बारीक, नाजूक टाके घालून तिने त्याच्याकरिता एक सदरा शिवला. वाळू व राख घेऊन तिने त्याचा पितळी बिल्ला इतका झगझगीत केला की, उन्हाची तिरीप त्यावर क्षणभरही न ठरता परतू लागली. त्याच्याकरिता तिने एक उशी तयार केली व तिच्यावर रेशमाने दोन लालभडक फुले भरली. त्याच्या जेवणात आता दररोज नवीन नवीन पदार्थ दिसू लागले...

या गोष्टी आपणास वास्तविक मिळायलाच पाहिजे होत्या अशा आविर्भावाने अहमदने त्या साऱ्याकडे दुर्लक्ष केले. या असल्या आयुष्याचा आपणास अगदी वीट आला आहे असे तो दाखवू लागला. वास्तविक त्याला तसे बिलकूल वाटत नव्हते. पण असे वागले की रझियाचा जीव जास्तच टांगल्यासारखा होतो व आपली मिजास दररोजपेक्षाही वाढते हे त्याला माहीत होते.

पण त्याच्या स्वभावात आणखी एक विचित्र फरक पडत चालला होता. आपणाला खूष करण्यासाठी रझियाची रात्रंदिवस चाललेली धडपड पाहून आपण कुणीतरी विशेष आहो असे त्याला वाटू लागले. रझियाविषयीचा त्याचा तिरस्कार वाढत गेला व त्याची अधाशी नजर दुसऱ्या स्त्रियांकडे वळू लागली. काहीजणी त्याच्या डोळ्याला डोळा भिडवूही लागल्या. परंतु त्यांतल्या त्यांत त्याची नजर एका तरुण विधवेवर खिळली. ती गावाच्या एका टोकाला वेशीजवळ राहात असे, पण रझिया ज्या विहिरीवर पाण्याला जात असे त्याच विहिरीवर ती पाण्याला येत असे. एक दिवस रझिया पाण्याला चालली असता अहमद मोठ्या लगबगीने उठला. "थांब, आज मी पाणी आणतो." आणि तो किंचित् हसला.

रझिया एकदम चमकल्यासारखी झाली व तिच्या नितळ कपाळावर एक लहानशी आठी क्षणभर दिसून नाहीशी झाली. अहमद गेल्यावर जरा वेळाने ती मागोमाग गेली व एका झाडाआडून तिने विहिरीकडे पाहिले.

पुष्कळजणी पाणी ओढीत होत्या व बाजूला प्रेमकुंवर घागर घेऊन उभी होती. तिच्याकडे नजर जाताच 'हां! समजलं!' अशा आशयाने रझियाने भुवया वर केल्या व ती परतली. प्रेमकुंवर कमळाच्या देठाप्रमाणे सडपातळ होती, व कमळाच्या पाकळीप्रमाणे सुंदर होती. अहमदने प्रथम आपली घागर भरली व नंतर ते पाणी तिच्या घागरीत ओतले. नंतर तो तिच्याशी निर्लज्जपणे बोलत उगाचच रेंगाळू लागला. त्या दिवशी नुकताच गुत्त्यातून आल्याप्रमाणे तो सारा वेळ झिंगल्यासारखा वागत होता...

चाललेला सारा प्रकार रझियाला कळला आहे असे तिच्या स्निग्ध चेहऱ्यावरून अगर पुष्कळदा लहान मुलासारख्या दिसणाऱ्या डोळ्यांवरून कुणालाही वाटले नसते. पण जरासा संशय येताच सावध होण्याची वृत्ती साऱ्या वन्य प्राण्यांप्रमाणे तिच्यातही होती. त्या बयेने आपल्या संसाराला आग लावली आहे हे तीनचार दिवसांतच तिच्या ध्यानात आले व तिच्या हृदयातील एक भाग एकदम कठोर झाला. एक दिवस तर तिने एरंडाच्या झुडपाआड चाललेली त्यांची कुजबूज स्पष्ट ऐकली. रझिया झोपल्यावर तिचे दागिने चोरून दूर कुठेतरी लखनौ-अलाहाबादला जावयाची त्यांची वाटाघाट चालली होती.

रझियाने मनात आणले असते तर तिथल्या तिथे तिच्या झिंज्या धरल्या असत्या किंवा ज्या निर्विकारपणाने तिने त्या पिलांच्या गळ्यावरून सुरी फिरविली होती त्याच निर्विकारपणाने तिचाही गळा चिरला असता; पण तिने तसे काही केलं नाही. ती शांतपणाने घरी आली व रात्रीच्या स्वयंपाकाला लागली.

त्या रात्री शीळ वाजवीत अहमद बराच उशिरा आला. रझियाकडे दृष्टी जाताच आश्चर्याने तो जागच्या जागीच थबकला. आज तिने आपला सर्वांत सुंदर पोषाख काढला होता. काळ्याभोर मखमलीसारख्या चुण्याचुण्याच्या घागऱ्याला सोनेरी कड लावली होती. डोळे दुखविणाऱ्या लालभडक रंगाचा रुंद रेशमी पट्टा तिने कमरेभोवती बांधला होता, व डाव्या बाजूला सुबकशी गाठ मारून त्याचे एक टोक तिने लांबलचक खाली सोडले होते. गळ्यात आज नेहमीच्या पांढऱ्या माळेऐवजी, मध्ये मांजराच्या डोळ्यासारख्या धगधगीत हिरव्या रंगाचा मणी असलेली पोवळ्याची माळ दिसत होती. आपल्या खेड्यात ती बांधत असे तो फुलाफुलांचा निळा हातरुमाल तिने डोक्याला बांधला होता व त्याची दोन्ही टोके कानामागून पुढे आपल्या तारुण्योन्मत्त वक्षस्थलावर सोडून दिली होती. तिच्या कानातील चांदीची फुले विस्तवाच्या सोनेरी प्रकाशात विलक्षण सुंदर दिसत होती. तिच्या मानेची

किंचित् हालचाल झाली की, त्या फुलांच्या मध्यभागी बसवलेला नकली खडा संध्याकाळच्या सूर्यप्रकाशाचा एक कण मागे राहिल्याप्रमाणे चमचमे.

रझिया इतकी सुंदर असेल अशी त्याची बिलकुल कल्पना नव्हती. पण आश्चर्य ओसरल्यावर, हे सारे आपणासच खूष करण्यासाठी आहे असे त्याला वाटले. त्याने खांदे उडवल्यासारखे केले व तो आपल्या खोलीकडे वळला.

कुणीच बोलले नाही. बिस्तवात जळत असलेल्या काटक्या चरचरत होत्या. देवळात घंटा वाजावी त्याप्रमाणे अहमदकरिता गोड हसून अगर उतरणीवरील मेंढपाळाची गाणी त्याच्याकरिता म्हणून रझियाला कितीतरी दिवस झाले होते. त्या घरातील जीवन क्षणाक्षणाला मरत आले होते.

अहमदचे लक्ष एका लाकडी मेजावर पडलेल्या लाल सुरीकडे गेले. मांस कापण्याकरिताच रझिया ती सुरी नेहमी वापरत असे हे त्याला माहीत होते. सुरीच्या बाजूला तपकिरी रंगाचे शेळीचे कातडे होते व शेळीचे कापलेले डोकेही त्यावरच ठेवले होते. त्या डोळ्यांत प्राण असल्याप्रमाणे ते अद्यापि चकचकत होते. ते सारखे आपल्याकडे रोखून पाहात आहेत असे अहमदला वाटले व तो एकदम अस्वस्थ झाला. तो रझियाकडे वळला व म्हणाला –

''कुठून आणलंस तू हे आज ?''

''विकत.'' रझिया म्हणाली, ''रस्सा करण्यासाठी आणलं.''

''रस्सा ! दररोज रस्सा खाऊन काय भीक मागायची आहे ?'' तो खेकसला. खरे म्हणजे गेल्या पाचसहा महिन्यांत तिने एकदाही रस्सा केला नव्हता. ''रस्सा म्हणे ! एखाद्या रखेलीप्रमाणे तू पैसा जाळत आहेस अलीकडे !''

'हाच पैसा आपण प्रेमकुंवरबरोबर लखनौला जाऊ त्यावेळी गाडी-भाड्याला पुरला नसता का ?' मनातून त्याला वाटले.

रझिया काही बोलली नाही. कोणीतरी आपल्यावर जबर प्रहार केल्याप्रमाणे तिला वाटले. तिने एकदम मान खाली घातली. सुरीच्या धारेप्रमाणे दिसणारे तिचे ओठ असह्य वेदना होत असल्याप्रमाणे एकदम आवळले गेले. ती उठली आणि लाकडाचा तुकडा व सुरी घेऊन बाहेर आली. तिने सुरी स्वच्छ धुतली व कापडाच्या तुकड्याने पुसली. पुसताना त्या कापडाला तिची धार लागली व वाळलेल्या पाकळ्यांप्रमाणे त्याचे दोन भाग जमिनीवर पडले. स्वतःप्रमाणेच तिच्या साऱ्या वस्तूही धारदार होत्या. तिच्या या साऱ्या हालचालींमध्ये मन धुंद करणारी उन्मादक सहजता होती. पण तिच्या यौवनपुष्पाचा हा सुगंध अहमदला कधीच कळला नाही.

जेवण करताना मात्र अहमदला तिच्या उधळेपणाचा विसर पडला. ऊनऊन चपात्या अधाशाप्रमाणे तोंडात भरून एखाद्या लांडग्याप्रमाणे तो जेवत होता. तो उठला व हात

धुवून अंथरुणावर जाऊन पडला. रझियाने त्याच्यासाठी केलेली उशी त्याने मानेखाली घेतली व मोठ्या समाधानाने तो कुशीवर वळला.

जे काही उरले होते ते रझियाने संपविले व बोटे चाटीत ती उठली. तिने भांडी धुवून पालथी घातली, चुलीत राख पसरली व माणकासारखा एक लाल निखारा आत दडपून ठेवला. कापडाचा एक चौकोनी तुकडा त्या शेळीच्या कापलेल्या मुंडक्यावर टाकला. ते डोळे आता कुणीतरी फुंकर घातल्याप्रमाणे तेलकट झाले होते.

तिने अंगण स्वच्छ झाडून काढले. तेथे चवरी हलविल्याप्रमाणे नाजूक वाटणारी निंबाच्या पानांची हालचाल, व त्याहून जोरदार नि कर्कश वाटणारी एरंडाच्या पानांची सळसळ ऐकण्याकरिता ती क्षणभर थांवली.

आता सगळ्याच घरात बायका चुली विझवत होत्या. पण त्यांच्या घरात मुलांचे रडणे अगर पाखरे झोपी जाण्यापूर्वी होणाऱ्या किलबिलीप्रमाणे भासणारे त्यांचे हसणेखिदळणे ऐकू येत होते. रझियाचे घर मात्र शांत होते. तिच्या डोळ्यांपुढे अहमद व ती तरुण विधवा प्रेमकुंवर उभी राहिली. ती लखनौमध्ये सुखाने राहतील. त्यांच्या त्या संसारात एक मूलही रांगू लागेल. आणि आपण?... आपले आयुष्य मात्र सारे सांडून गेले. आपण आपले व आपल्या आईबापांचेही जीवन एका घाणेरड्या भांड्यात ओतले. भांडे तडकले आणि जीवन जमिनीत पार झिरपून गेले...

ती घरात आली. छातीवर हात ठेवून अहमद झोपला होता. तिने नुकतीच स्वच्छ केलेली सुरी हातात घेतली व ती त्याच्या अंथरुणाजवळ आली. एखाद्या स्वप्नातील आकृतीप्रमाणे ती हलकेच खाली वाकली व तिने त्या कापडाच्या तुकड्याप्रमाणे अहमदचा गळा कापला. उशीवरील फुले अधिकच लाल झाली.

तिने सुरी हातावर पुसली व ती उठली. या शेवटच्या क्षणी तरी आपणाला कुणाचा आधार असावा म्हणून ती भिंतीला टेकून उभी राहिली. मग तिने ती सुरी उचलली व अगदी स्थिर हाताने आपल्या छातीत खुपसली. आतील हृदयाचा वेध घेतघेत ती सुरी आत चिरत गेली व अखेर तिच्या टोकाला हृदयाचा स्पर्श झाला.

निंब-एरंडांची सळसळ चालू होती. थोड्या वेळाने क्षितिजावरील अंधार वितळला व दुसऱ्या क्षणी जणू उरी फुटल्याप्रमाणे पूर्व दिशा अगदी लाल लाल झाली.

# दीक्षा

डोंगराची चढण चढून तो वर सरकला व तेथे असलेल्या सपाट जागेवरील एका झाडाखाली त्याने हताशपणे अंग टाकले. त्याचे अंग काटयाकुटयांनी ओरबडले होते व उघड्या पावलांनी चावऱ्या खडकावर सतत चालण्यामुळे, त्यांतून फुटलेल्या रेषांमधून रक्त ठिबकत होते. पण त्याला अत्यंत असह्य होत होती ती आतडी जाळत असलेली भुकेची आग. गेल्या काही दिवसांत ती तृप्तपणे भागवणारे काहीच त्याला मिळाले नव्हते. व तो पडल्यापडल्याच वखवखलेल्या डोळ्यांनी इकडेतिकडे आशेने पाहात होता.

त्याने श्रांतपणे डाव्या बाजूला अंग वळवले व विलक्षण धक्का बसल्याप्रमाणे तो त्या दुबळ्या क्षणीही एकदम उठून ताठ बसला. त्याचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. भुकेच्या वर्चस्वामुळेच आपणाला हे दृश्य दिसत आहे, असे त्याला वाटले व तो हताश झाला. समोर एक झरा थंड झुळझुळीने वाहात होता व काही अंतरावर डोह होऊन काठच्या लालभडक वृक्षाचे प्रतिबिंब दाखवत होता. जवळच एका सपाट खडबडीत खडकाच्या वेदीवर मोठ्या पत्रद्रोणात विविध तऱ्हेची रसरशीत फळे होती. भोवताली अनेक अन्नपात्रांशेजारी सुबक आकाराच्या सुरया होत्या. या साऱ्यांना अलंकाराप्रमाणे शोभवणारी एक नवयौवना तेथे मदालस डोळ्यांनी सुखासीन आकृतीत विसावली होती. तिच्या शरीराला तारुण्याचा मादक उभार होता आणि डोळ्यांत घनदाट सावळे इंद्रजाल होते. तिच्या किंचित हालचालीनेही धुंद वीज चमकल्यासारखी वाटे व नादमय दवबिंदूंचा शिडकावा व्हावा त्याप्रमाणे पैंजणांचा कोमल ध्वनी निर्माण होई.

प्रथम त्याचा विश्वास बसला नाही. पण फळांचे रंग इतके मोहक होते, नवयौवनेच्या डोळ्यांतील मखमली आवाहन इतके उत्कट होते, की त्याला आपल्या जागी राहवेना. तो डळमळीत पावलांनी आवेगाने धावत गेला व अधीर बोटे पसरून त्याने द्राक्षांचा एक घोस तोंडात कोंबला. त्याला पाहताच तरुणीच्या डोळ्यांत आकस्मिक भय दिसले व ती पैंजण थरकवत दोन पावले एकदम मागे सरकली. तोच भोवतालच्या गर्द झाडीत कोलाहल झाला व हातात भीषण शस्त्रे घेतलेले अनेक काळे उग्र गिरिजन संतापाने बाहेर धावले. त्यांनी त्याच्यावर अनेक प्रहार केले. दोघांनी त्याचा अर्धमृत देह उचलला व दूर फेकून दिला. त्यांतील एकजण त्वेषाने म्हणाला, "व्याघ्रदेवतेसाठी ठेवलेला हा पवित्र नैवेद्य विटाळणाऱ्याला आम्ही मृत्यूचाच दंड देतो. परंतु तू एक क्षुद्र, परका आहेस. तुझ्या मलीन

रक्ताचा आम्हाला स्पर्शही नको. म्हणूनच तुला ते घोर शासन देत नाही. आता चालता हो व पुन्हा मागे येऊ नको. नाहीतर मात्र तुझ्या शरीराचे सहस्र खंड होतील!''

ते गिरिजन पुन्हा झाडीत नाहीसे झाल्यानंतर तो बराच वेळ निश्चेष्ट पडून होता. तो झरा व त्याचा शीतल डोह बऱ्याच अंतरावर खाली राहिला होता व या स्थानापासून तो शांत, निर्विकार डोळ्यासारखा दिसत होता, आणि त्या शेजारी उभी असलेली प्रमदा जलपुष्पाच्या कलिकेसारखी दिसत होती. ठिकठिकाणी जळते रक्त फुटलेले शरीर ओढत तो खडकाळ चढणीवर सरकू लागला. प्रत्येक हालचालीबरोबर त्याचा प्राण बाणाच्या दोरीप्रमाणे ताणत होता व श्वासासाठी तो थांबला की क्षणभर सैलावत होता. अद्याप किती जायचे आहे, हे पाहण्यासाठी त्याने आपले निर्जीव डोळे वर केले, तेव्हा त्याला ती व्याघ्राची विशाल श्वेतमूर्ती प्रथम दिसली.

जणू विक्राळ जबडा उघडून खाली पाहात असल्याप्रमाणे ती आकृती शिखराच्या एका बाजूला होती व तिच्या अंगावरील पट्टे निद्रिस्त नागाप्रमाणे वाटत होते. पहिल्या विलक्षण भयाचा परिणाम ओसरल्यावर त्याला फार आततायी समाधान वाटले. मृत्यूने हे रुद्र स्वरूप घेतले आहे खरे, पण त्यामुळे निदान हे अग्निफुले जळत असलेले निर्बल शरीर तरी नष्ट होऊन मुक्तता मिळेल, असे त्याला वाटून गेले. आणि या विचाराने आपली वेदना त्याला तात्पुरती सुसह्य झाली. पण तो जसा त्या व्याघ्र-आकृतीकडे सरकू लागला तशी ती जास्तच महान होत गेली. तो अगदी जवळ आला तेव्हा ती हिमालयातच कोरल्याप्रमाणे भव्य, स्थिर झाली व त्याच्याकडे गोठलेल्या डोहासारख्या डोळ्यांनी पाहू लागली.

''ये, मी तुझीच वाट पाहात होतो.'' एकदम सहस्र दैत्यांच्या जिभा बोलत असल्याप्रमाणे त्या आकृतीतून आवाज आला. त्याच्या आघाताने पर्वताचा सारा कडा थरथरला आणि त्याच्या कडेला असलेल्या एका एकाकी झाडामधून एक पाखरू, पिसांच्या निर्जीव गोळ्याप्रमाणे सरळ खाली दरीत कोसळले.

''तू भयभीत होऊ नको. तू व्याघ्रमुखाजवळ आलास, की तुला तेथे पायऱ्या दिसतील. त्या चढून तू निःशंक आत ये.'' तो आवाज पुन्हा म्हणाला.

त्याने धैर्याने निरखून पाहिले. व्याघ्र-आकृतीच्या विशाल जबड्याखाली पाच पायऱ्या होत्या. गुहेसारख्या वाटणाऱ्या डोळ्याकडे भीतीने पाहात तो पायऱ्या चढून वर आला व एका अजस्र शूलदंताचा आधार घेत तो आत उतरला. आतील दृश्य पाहताच तो विस्मयचकित झाला व त्याला आपल्या श्रमांचा विसर पडला.

आतल्या बाजूला एका मखमली आसनावर रेशमी वस्त्रधारी, भव्य देहाचा एक योगी बसला होता व त्याच्याभोवती अनेक धुंद सुगंधांचा कोलाहल होता. त्याच्यामागे खडकावर एक अतिभव्य शंख असून, शेजारीच एक पूर्णाकृती व्याघ्रचर्म टांगले होते.

विनाचिंता सदैव इच्छाभोजन मिळत गेल्याने येणारी सुखासीन पुष्ट कांती त्या योग्याच्या सर्वांगावर स्पष्ट दिसत होती, आणि त्याच्या डोळ्यांवर अतितृप्तीमुळे येणारे जाड्य होते.

"तू निर्भय राहा, कारण आता तू स्वगृही आला आहेस. तू कधी तरी येणार याचा मला पूर्ण विश्वास होता. आता माझाही काळ होत आला आहे, तेव्हा या पदी तुझी स्थापना करून मी मुक्त होईन." योगी म्हणाला.

त्याच्या चेहऱ्यावर अविश्वासाचे किंचित हास्य दिसले, हे योग्याच्या दृष्टीतून सुटले नाही. तो तीव्र आवाजात म्हणाला, "होय, माझा देह पुष्ट आहे. मला कसल्याही व्याधीचा स्पर्श नाही. माझ्यावर कसल्या अरिष्टाची छाया नाही. परंतु एक ध्यानात ठेव. वासना अथवा सुख यांतील अतृप्ती संपली की आयुष्य संपते. मग राहतो तो मात्र श्वासोच्छ्वास – निर्जीव पर्णाचे अर्थहीन वरखाली होत राहणे! मला जीवनात काही सुखे मिळालीच नाहीत हे माझे दु:ख नाही, कारण इच्छित सारी सुखे मला मिळाली. सारी सुखे मिळून जाणे हेदेखील एक दु:ख असते खरे, पण ती सुखे पुन्हा पुन्हा उपभोगत राहावे ही लालसा आता माझ्यात उरली नाही, ही माझी. खरी वेदना आहे. म्हणून माझे जीवन संपले आहे."

"पण या एकाकी स्थानी मी कसा जगणार ? तेवढे दैवी सामर्थ्य माझ्यासारख्या क्षुद्रात कोठून येणार ?" स्वत:च्या मलीन, जर्जर शरीराकडे पाहात त्याने शरमून विचारले.

योगी स्वत:शीच हसत स्थानावरून उठला व त्याने त्याला मागून येण्याची खूण केली. व्याघ्रमुखामागे एक विशाल दालन होते व त्या ठिकाणी खडकात अनेक कोनाडे होते. त्यापलीकडे तीन पायऱ्या उतरल्यानंतर, तलवारीच्या धारेसारखा ताठ असा एक कडा, हातात परशू घेतलेल्या डोंबासारखा उभा होता. दालनातील ऐसपैस कोनाड्यांत अनेक मद्यपात्रे, विविध तऱ्हेची फळे, वस्त्रे, अलंकार, जणू उसळत असल्याप्रमाणे भरले होते. बाजूला, लाल रेशमाने मढवलेल्या मंचकावर एका रम्य गालिचावर एक युवती सुखासीन रेलली होती. योग्याचा प्रवेश होताच तिच्या मुद्दाम सावळ्या केलेल्या पापण्या फुलपाखराच्या मुलायम पंखांप्रमाणे थरथर वरखाली झाल्या, वक्ष:स्थलावरची रत्नमाला किंचित हलली आणि तिच्या हातातील मोरपंखा हलल्याने, मन भारावणारा सुगंध थरारून पुन्हा स्थिर झाला. हे सारे पाहून त्याचे शरीर नव्या क्षुधेने जळू लागले आणि इंद्रिये वासनेने तप्त झाली.

"पाहिलेस ? येथे जगायला दैवी सामर्थ्याची किंचितही गरज नाही." योगी म्हणाला. "सम्राटाचीदेखील इच्छा तृप्त करणारी फळे, झरझर संपत जाणाऱ्या क्षणिक आयुष्याला रत्नांची तोरणे लावणारी ही दुर्मिळ मद्ये – या ठिकाणी तुझ्यासाठीच आहेत. – आणि ही युवती चिरतरुण आहे."

आता त्याच्यावर वासनेचा पूर्ण प्रभाव पडला होता. त्याने तिच्याकडे अनिवार अभिलाषेने पाहात म्हटले, ''ही कोणी अतिमानवी आहे का? साऱ्या मानवी जीवनाला नाशवंत असण्याचा शाप असतो, त्यातून हीच तेवढी मुक्त कशी?''

योगी पुन्हा हसला. ते दोघे परत व्याघ्रमुखात आले व योगी पुन्हा आसनावर बसला. तो म्हणाला, ''ती अतिमानवी नाही की, क्षणिकतेच्या शापातून मुक्तही नाही. परंतु खऱ्या अर्थाने ती चिरतरुणच आहे. नववर्षारंभी एक सुंदर रमणी या ठिकाणी येते. ती आली की आधीच्या तरुणीला समोरील कड्याकडे जाण्याची सूचना आपोआपच मिळते. म्हणजे तुझा जेवढा संबंध येतो, तेवढ्यापुरतेच बोलायचे तर ती चिरयौवनाच नाही का? चिरंतनता या शब्दाला असलाच तर आपल्या संबंधात एवढाच अर्थ आहे. अमरता म्हणजे एका मृत्यूच्या जागी कुठे तरी, कसला तरी एक जन्म; खंडित न होणारे सातत्य! हाच आणि एवढाच मात्र अर्थ!''

''परंतु ते खालचे गिरिजन नवसंवत्सरी हे सारे का अर्पण करतात?'' त्याने विस्मयाने विचारले.

''हे मी तुला सारे कथन करणारच होतो. तुला ते ज्ञात असायलाच हवे.'' योगी म्हणाला. ''हे गिरिजन सारे अर्पण करतात ते व्याघ्रदेवतेला; तुझ्यासाठी किंवा माझ्यासाठी नव्हे. तेव्हा त्या बाबतीत कृतज्ञतेने भारावून जाण्याची, किंवा तेवढ्यामुळे आपल्या सुखात न्यूनता मानण्याची काहीच आवश्यकता नाही. तू आयुष्यभर एका विशेषाचे स्वतःला कदापि विस्मरण होऊ देऊ नकोस. या जगात कोणतेही सुख केवळ आपल्याकरिता निर्माण झालेले नाही. वसंताचे आगमन तुझ्यासाठी होत नाही, की चंद्रिकेची माया पसरते त्या वेळी तिला तुझ्या अस्तित्वाची जाणीव असत नाही. भूमी ज्या वेळी हिरव्या कोंभांनी बहरते, त्या वेळी तुला तुष्ट करण्याचा तिचा उद्देश असतो, असा का तुला भ्रम आहे? आपली सुखे आपणासाठी कोणी निर्माण करत नाही, तर आपण ती अनाहूतपणे, अत्याचाराने हस्तगत करतो. म्हणजे आपण प्रत्येकजण याचक तरी असतो, किंवा तस्कर तरी! यात मग कृतज्ञता कसली? उलट, या चिक्कण भावनेच्या भाराखाली, हिरावून आणलेल्या सुखाची उत्कटताच सदैव मृत होऊन जात असते.

''एके काळी मीसुद्धा त्यांच्यापैकीच एक होतो. तुझ्यासारखाच दुबळा, सदैव पीडित, बुभुक्षित. मग ही विक्राळ व्याघ्र-आकृती झुडपात पूर्ण लपलेली मला आढळली. मी हाडे झिजवून भोवतालचा विस्तार असा मुक्त केला. नंतर मीच गिरिजनांना व्याघ्रदेवतेच्या साक्षात्काराविषयी सांगितले, तिच्या कठोर व्रताची, तिच्या तृप्तीसाठी लागणाऱ्या अर्पणवस्तूंची त्यांना कल्पना दिली. मग तेथून काही काळ नाहीसा होऊन, एका नवसंवत्सरदिनी येथे येऊन स्थिर झालो. त्या झऱ्याच्या पलीकडे पाऊल टाकण्याचे त्यांच्यांत आता धाष्टर्य नाही, आणि ध्यानात ठेव, येथून परतून जर तू त्यांच्यांत

जाण्याचा प्रयत्न केलास, तर त्यांच्या शस्त्रांनी तुझे शरीर शतशः खंडित होईल. ही युवती एवढ्याचसाठी अनिवार्यपणे येथे राहते, नवसंवत्सर दिवशी हताशपणे कड्यावरून मृत्यू स्वीकारते. या संवत्सरदिनी हे सर्व गिरिजन अर्पणवस्तू रक्तवृक्षाजवळ ठेवतात, आणि एक रात्र दूर वनात जातात; कारण वस्तू स्वीकारल्या जात असता पाहणे म्हणजे अंधत्व स्वीकारणे, अशी त्यांची श्रद्धा आहे, आणि ती तशी श्रद्धा मी निर्माण केली आहे. तेव्हा अंगावर व्याघ्रांजन घेऊन तू रक्तवृक्षाजवळ जायचे व सारा नैवेद्य येथे आणायचा, एवढेच तुझे सुखद कर्तव्य उरते. मध्यकाळात जर तुला कशाची आवश्यकता भासलीच, तर त्या वस्तूचा अल्पांश तू खाली नेऊन ठेव, आणि या सागरशंखाने भव्य नाद निर्माण कर. तुझ्या सुखात कसलेच न्यून राहणार नाही.''

हे सारे ऐकत तो काही काळ स्तब्ध होता व योग्याकडे मूढ नजरेने पाहात होता. अखेर न राहवून तो म्हणाला, ''योगीराज, हे सारे विलक्षण आहे. परंतु ही त्या निष्पाप गिरिजनांची वंचना नव्हे का ?''

जणू याच प्रश्नाची प्रतीक्षा करत असल्याप्रमाणे योगी किंचित उत्तेजित झाला व म्हणाला, ''एखाद्या जराग्रस्त सर्पाप्रमाणे शरीर ओढत तू येथे आलास, त्या श्रमाचे फलित म्हणूनच तुला हे वंचनेचे ज्ञान झाले. जो मूलारंभापर्यंत जाण्याचा प्रयत्न करतो, त्याच्या वाट्याला हे वंचनादर्शन अनिवार्य आहे. अखेर सर्वत्र वंचनाच आहे ही जाणीव, हेच आपल्या ज्ञानाचे खरे स्वरूप असते. एखाद्या कंदावरील अस्तर उलगडत जाताना शेवटी गाभाऱ्यात काहीच नसते, केवळ शून्यता असते, हेच फलित आपले अंतिम ज्ञान ठरते. कोणाला ते पर्वतशिखरावर प्राप्त होते, तर कोणाला वृक्षाखाली त्याचा साक्षात्कार होतो. ही वंचना तुला स्पष्ट झाली, एवढ्याच कारणाने तू इतरेजनांपेक्षा ज्ञानी आहेस. आणि ज्ञानप्राप्ती झालेल्यांना इतर मूढजनांपेक्षा भोगाचे, उपभोगाचे विशेष अधिकार असतात. आता माझा समय होत आला आहे. मी जातो.''

तो योग्याकडे विस्फारित डोळ्यांनी पाहात राहिला. तो जाणार म्हणजे कोठे, याची त्याला अस्वस्थ चिंता वाटू लागली. पण क्षणभर ती बाजूस सारून त्याने विचारले, ''आता एकच विचारणा आहे. मी येताच तुम्हाला मुक्तता मिळाली, पण माझे भवितव्य काय ? मी कसा मुक्त होईन, की मला मृत्यूखेरीज आधार नाही ? माझ्याप्रमाणेच असहाय पीडित होऊन कोणी आले नाही, तर भविष्य काय ?''

योग्याने त्याच्या खांद्यावर हात ठेवला व म्हटले, ''त्याची तुला चिंता नको. मूलारंभी जाणाऱ्याच्या वाट्याला वंचनेचे ज्ञानच अनिवार्य असते हे खरे, पण ते प्राप्त करून घेण्याची मानवाची तृष्णा मात्र कधीच नष्ट होत नाही. धीर सोडू नको. कधी ना कधी पुन्हा कोणीतरी असेच रक्तरंजित शरीर ओढत येथपर्यंत येईलच. जर त्या वेळी तुझ्या आयुष्यात माझ्याप्रमाणे अतितृप्तीचा क्षण आला असेल, तर तू त्याचे परममित्राप्रमाणे

स्वागत करशील व माझ्याप्रमाणे मुक्त होशील. पण त्या वेळी जर अद्याप अतृप्त, क्षुधित असण्याचे तुला भाग्य असेल तर तुला त्याची सहज हत्या करता येईल. तू व्याघ्रचर्म उचलशील त्या वेळी त्याखाली एक तेजस्वी खड्ग आहे, हे तुला दिसून येईल. हे सारे झुगारून तुला आता माघारी जाता येणार नाही. तिकडे तू वळलास की, तुझी पावले निर्जीव होतील. एकदा दृष्टिलाभ झाला की, पुन्हा अंधजीवन शक्य होणार नाही. तुला अंतिम ज्ञानाचा दिव्य शाप मिळाला आहे, आणि तो शाप एकदा जडला, की पूर्वी चालून आलेले सारे मार्ग आपोआपच समाप्त होतात.

"जर कोणी येण्याच्या आधीच तुला मृत्यूचा स्पर्श झाला, तरी तुला ते भाग्यच वाटेल. अतृप्त असतानाच आयुष्य संपले तर आनंद आहे; तृप्तीने आयुष्य जड झाल्यास मृत्यू म्हणजे मुक्ती आहे. बरे, तुला मृत्यू आल्यास भोवताली तरी काय घडेल? अर्पणवस्तू न स्वीकारता राहात गेल्याने हताश भय निर्माण होईल, कदाचित काही संवत्सरे व्यर्थ जातील, त्या जनांची समर्पण भावनेतील ईर्ष्या कमी होईल. आणि मग पुन्हा एकदा मला साक्षात्कार झाला, तसाच आणखी कोणाला तरी होईल व पुन्हा सारे अनिवार्यपणे चालू होईल. खरे तर मानवाला नव्या सत्याचा साक्षात्कार क्वचितच होतो. पूर्ण, सर्वांगीण सत्य आकलन होण्याची केवळ अशक्यता आणि सत्यशोधनाची दुर्दम्य ईर्ष्या, या एकाच समयी मानवात वास करत असल्यामुळे, नव्या सत्यदर्शनाऐवजी प्राचीन, विस्मृत सत्याच्या अवशेषावरच ठेचाळत राहण्याचे सदैव त्याच्या वाट्याला येते.

"आता सूर्य पश्चिमेला टेकत आहे व माझे शब्द संपले आहेत. माझा क्षण आला आहे व मी तुझा निरोप घेतो. सदैव अतृप्तीचे सौख्य तुला लाभो."

योगी उठला व त्याने त्यास हातास धरून आसनावर बसवले. त्याने आपली तेजस्वी मौक्तिकमाला त्याच्या गळ्यात घातली व रक्तकमल वाहिल्याप्रमाणे आपले रक्तवर्णी रेशमी उत्तरीय त्याच्या खांद्यावर पसरले.

"पण तुम्ही जाणार म्हणजे कोठे?" व्याकुळ होऊन त्याने विचारले.

येथील सारे धागे तोडून टाकल्याप्रमाणे योग्याने त्याच्याकडे निर्विकारपणे पाहिले. मग तो स्तब्धपणे तीन पायऱ्या उतरून खाली आला. मद्यपात्रे, मधुर फळे, अमृतकलिकेप्रमाणे दिसणारी युवती, यांच्याजवळून प्रतिमुक्त पावले टाकत, त्यांच्याकडे लालसा अथवा विषण्णता यांचा कसलाही दृष्टिक्षेप न करता तो वेगाने समोरील कड्यावर चढला. तेथे तो किंचित स्थिरावला व दुसऱ्याच क्षणी, उल्काखंड खाली कोसळावा, त्याप्रमाणे तो खालच्या अथांग निळ्या दरीत अदृश्य झाला.

# सांगाती

मी त्या टेकडीच्या पायथ्याशी आलो तेव्हाच जुन्या धुवट वस्त्रासारखा वाटत असलेला संधिप्रकाश नाहीसा झाला होता व भोवती अंधारून आले होते. पण टेकडीवर चढत गेलेली पाऊलवाट मात्र सापाच्या कातीप्रमाणे वेडीवाकडी स्तब्ध दिसत होती. अगदी उंच वरच्या भागी, फिकट आभाळाच्या पार्श्वभूमीवर, आमचा वडिलार्जित वाडा काळा उग्र दिसत होता. मला त्या वाड्याविषयी काहीच माहिती नव्हती. जमिनीला अचानक भेग पडून हिरवट कोंभ वर यावा, त्याप्रमाणे एक दिवस ते पत्र आले. त्यावरील नाव विलक्षण तऱ्हेने लिहिलेले असल्यामुळे, मला ते वाचता आले नाही. परंतु मला त्या वाड्याविषयी इतकी उत्सुकता वाटू लागली की, तात्काळ दैनंदिन जीवनावरील माझे लक्ष उडाले व पत्रातील सूचनेप्रमाणे ती वांशिक दौलत स्वीकारण्यासाठी, मी अधीरपणे या अज्ञात टेकडीच्या पायथ्यापर्यंत आलो.

पाऊलवाट तुडवून जाईपर्यंत माझ्या अंगातील त्राण ओसरले होते. त्यात त्या वाड्याच्या उत्तुंग तटासारख्या भिंती पाहताच तर मी खचून गेलो व माझी सारी उत्सुकता चिरडल्यासारखी झाली. वाड्याला कोठेच खिडक्या-दरवाजे दिसत नव्हते, आणि आपल्या ऊबदार मायेने स्वागत करेल, अशा प्रकाशाचा शिडकावादेखील कोठे आढळत नव्हता. मला सारखे वाटू लागले, मी आता येणार हे कोणाला तरी माहीत असेल का? आणि त्यांना माहीत असले तरी या अभेद्य वाड्यात प्रवेश कसा करावा, हे मला कोण सांगणार? जर आत प्रवेश करता आलाच, तर आत कोण कोण असतील? त्यांना माझे येणे आवडेल का?

मी त्या गोंधळात उभा असतानाच समोरील काळाकभिन्न पडदा बाजूला झाला व आत इतका वेळ कोंडून ठेवलेला प्रकाश एकदम ओतल्याप्रमाणे निःशब्दपणे बाहेर पसरला. दरवाज्यात एक प्राचीन, शुभ्र केसांचा वृद्ध पुरुष उभा होता. त्याने मला अभिवादन केले, आणि वाऱ्याने वाळलेली पाने हलावी अशा आवाजात म्हटले, "आत या, मी आपलीच प्रतीक्षा करीत होतो."

मी येणार हे कोणाच्या तरी ध्यानात आहे, हे पाहून मला हायसे वाटले. परंतु मी भिंतीजवळ येताच, त्या जणू पारदर्शक असल्याप्रमाणे त्याने नेमक्या क्षणीच दरवाजा उघडावा, याचे मला फार नवल वाटले. माझे मनदेखील तसेच पारदर्शक असल्याप्रमाणे

त्या वृद्धाला माझा विचार समजला असावा. टेकडीवरील हिम चाळवल्याप्रमाणे तो हसला व म्हणाला, ''यात नवल काहीच नाही. तुम्ही याच वेळी येणार, हे आधीच ठरले होते. येथे येण्याचा काळ निश्चित असतो आणि येथे येणारा कधी पळभरही विलंब करत नाही.''

''पण तुम्ही कोण? आपण या वाड्यात कोणते काम करता?'' आत पाऊल टाकत मी विचारले.

वृद्धाने पुन्हा नम्रपणे अभिवादन केले व म्हटले, ''मी तसा विशेष कोणी नाही, पण या वाड्यातील आयुष्यावर देखरेख करण्याचे कर्तव्य माझ्याकडे आहे. आता आपल्या आगमनानंतर आमचा जास्त दृढ परिचय होईलच.''

वाड्यात प्रवेश केल्यावर त्याच्या विस्ताराची मला प्रथम कल्पना आली व माझे मन विस्मयाने दडपून गेले. एका मागोमाग एक अशी अनेक दालने अस्पष्ट होत अंधारात विरून गेली होती, आणि त्या प्रत्येकात, अनंत पैलूंच्या विशाल डोळ्याप्रमाणे वाटणारी, मंद प्रकाशाने फुललेली झुंबरे होती. वाड्याच्या पहिल्या चौकात डाव्या-उजव्या बाजूला खूप दूरवर पसरलेला सज्जा होता. त्याच्या डाव्या बाजूच्या विभागात, एखाद्या चित्रालयाप्रमाणे, अनेक व्यक्तींच्या चित्रांचे फलक रांगेने लहान होत जाऊन, वळणावर नाहीसे झाले होते. माझ्या अगदी जवळचे चित्र माझ्या वडिलांची प्रतिमा असलेले पाहून मी चमकलो. अगदी मृत्यूच्या क्षणी दिसलेला त्यांचा क्षीण, नितळ चेहरा त्या फलकावर कायमचा उमटून राहिला होता. त्यापलीकडे त्यांचीच पण मला अपरिचित असलेली अनेक चित्रे होती. ऐन तारुण्यात ते कसे दिसत असतील, ही मला सतत वाटत असलेली उत्सुकता, आज अशी अनपेक्षितपणे पूर्ण झाली. तेच सरळ नाक, तीच कणखर जरब असलेले डोळे, पण त्यांच्यात त्या वेळीही, नंतर माझ्या आयुष्यावर सतत शिंपण झालेला मधाच्या रंगाचा प्रेमळपणा दिसत होता. त्या पलीकडील चित्रे धूसर आंधळ्या प्रकाशात अस्पष्ट वाटत होती. तिकडे जाऊन जास्त निरखून पाहावे म्हणून मी निघालो, तो धाड्कन मागे ढकलला गेलो. त्यांच्यात व माझ्यात एक अत्यंत पारदर्शक परंतु अभेद्य अशी स्फटिकाची भिंत होती. वृद्ध लगबगीने पुढे झाला व त्याने मला आपल्या सुरकुतलेल्या हातांनी सावरून धरले. तो सहानुभूतीने म्हणाला, ''तिकडे आपल्या पूर्वजांच्या प्रतिमा आहेत. आपणाला तिकडे जाता येणार नाही. त्याला अद्याप अवकाश आहे. आपण आता आत प्रवेश करावा —''

परंतु माझे लक्ष उजवीकडेच्या विभागात गुंतले होते. त्यात अगदी जवळची चित्रे माझी होती, हे विलक्षणच होते. मी येथे येणार हे पाहून वृद्धाने माझ्या जीवनातील रंगीत खुणा जमवून एकत्र मांडल्या आहेत, याबद्दल मला कृतज्ञता वाटली. त्या कठोर, अलिप्त

वाड्यात आपल्या ओळखीचे, आपलेच पाऊल उमटलेले पाहून मला घरपण जाणवले व मी सुखावलो.

लहानपणी मी पत्र्याच्या डब्यात लावलेले तुळशीचे झाड; परसात बांधलेले मातीचे लहान देऊळ; हातभर जीभ काढून धापत असलेल्या कुत्र्यास मी मडकेभर पाणी दिले, तेव्हापासून वळचणीच्या सावलीप्रमाणे आमच्या घराला शेवटपर्यंत चिकटून राहिलेले हडकुळे, तपकिरी कुत्रे; थाटीभर गंध उगाळून दादांनी उन्हाळ्यात माझ्या अंगावर ते प्रथमच दाट चोपडले, तेव्हाचा चंदनी शीतल वास; मुंजीत शिवलेला नव्या रेशमी वासाचा सदरा; लिंबाएवढी गार अधाशीपणे तोंडात कोंबल्यावर साऱ्या अंगभर थरथरलेला अनावर शहारा; आईच्या नव्या इरकली लुगड्याच्या लालभडक पदरात लपवलेले तोंड; बी घासून मनगटावर उमटवलेला चटचटीत डाग; पायावरून एकदा गेलेला सोन्याच्या साखळीसारखा साप; घरातल्या नव्या, हातभर उंचीच्या वासराने हळूच जीभ लावलेली उघडी पाठ...

स्मृतीत अंधुक झालेल्या अनेक क्षणांचे मणी त्या ठिकाणी विखुरले होते. पण त्यानंतरच्या काही चित्रांनी मात्र माझे मन शरमेने शेवाळले व स्थिर नजरेने पाहात असलेल्या वृद्धाकडे मला सरळ दृष्टीने पाहवेना. मी लग्नाला नकार देताच स्वतःला जाळून घेणाऱ्या मेधाचा आर्त चेहरा एका चित्रात होता, तर तिला मी गुपचूप जी गुलाबी हिऱ्याची अंगठी दिली होती, ती चोरल्याचा आळ येऊन दादांकडून वेताचे वळ अंगावर घेणाऱ्या पोरक्या नारायणाची आकृती दुसऱ्यात होती. एका गुन्ह्याविषयी गुप्तपणे पत्र लिहून मित्राला भोगवलेला तुरुंगवास व त्याबद्दल मिळवलेले इनाम; आंधळ्या सखूबाईच्या घरात टाकलेला जळता बाण; रामभटाच्या परसात फुललेल्या पारिजातकाच्या बुंध्याशी पेटवून दिलेले गवत; दाट, चिकट डांबराच्या पिंपात टाकलेले दत्ताच्या देवळातील मांजर; मिरचीची पूड मिसळलेली तपकीर ओढताच एकदम बेशुद्ध पडलेला, संधिवाताने नेहमी अधू असलेला बाळूकाका; एकाकी, भयाण अशा काळम्माच्या देवळाच्या गाभाऱ्यात, दाराला कडी लावून रात्रभर कोंडून ठेवलेला वेडसर आपण्णा... हे कोडाचे डाग पाहून मला मलीन वाटले. पण तो वृद्ध मात्र शांत, समजूतदार डोळ्यांनी सारे पाहात मूक उभा होता. हा ताण घालवण्यासाठी मी गोंधळून विचारले, "पण या चित्रांच्या पुढील चौकटी अशा रिकाम्या का?"

"आता आपले वास्तव्य येथेच होणार आहे. तेथे कसली चित्रे ठेवायची हे तुम्हीच ठरवायचे आहे," तो नम्रपणे म्हणाला. "आता आपण आत जाऊ. मी वाड्याचा इतर भाग दाखवेन; कारण मला नंतर अन्यत्र जायचे आहे –"

आतील एका दालनात संगीत वाद्ये व चित्रकलेची साधने होती, पण त्यांच्यावर धुळीचा निःशंकपणे जमलेला जाड थर होता. त्यांच्याकडे पाहताच हुरहुरीची एक हळवी सळक माझ्यात चमकून गेली. एके काळी मी आतडी ताणून स्वरांचे गारूड करण्याचा

प्रयत्न केला, रंगांच्या किमयेसाठी हाडे झिजवली होती. पण शेवटी अन्नाची ओढ प्रबळ ठरली. जगण्याची धडपड करता करता आता जगण्याजोगेच काही उरले नव्हते. आता मिळाले आहे ते पोटावर जाड घडी टाकणारे प्राणहीन स्वास्थ्य! निश्चित, मर्यादित, सहजतृप्त भुकेचा चिकट चिरंतन बुरसा! मला क्षणभर वाटले, आता हा भव्य प्रासाद आपल्या मालकीचा आहे, हे दालन सर्वस्वी आपले आहे. आता पुन्हा एकदा स्वरांना, रंगांना तावेदार करण्याचा प्रयत्न करावा! मी एका तंतुवाद्याला स्पर्श करण्यासाठी पुढे सरकलो, तेवढ्यात वृद्धाने मला हल्केच पण निश्चयाने अडवले.

''हे दालन आता आपले उरले नाही. आपली वर्दळ आता उजवीकडच्याच विभागात ठेवावी लागणार आहे!'' तो विषादाने म्हणाला.

त्यानंतरचे दालन तर एखाद्या कड्यातील विवराप्रमाणे असून, त्यात करडा, जाड अंधार दाटून राहिला होता. आत पाऊल टाकताच, प्राचीन गुहेत प्रवेश केल्याप्रमाणे, रानटी श्वापदांच्या अंगांचा कोंदट केसाळ भपकारा आला व मला भोवळल्यासारखे झाले. वृद्धाने माझा हात धरला व मला सर्वत्र फिरवले. भिंतीकडेने असलेल्या अनेक पिंजऱ्यांत विक्राळ श्वापदे बाहेर निसटण्याची संधीच पाहात अस्वस्थपणे बसली होती. एकात काळाकभिन्न वाघ उडी मारण्यासाठी अंग बाणाप्रमाणे ताणून टपून होता व त्याचे जळजळीत डोळे दोन हिरव्या, संतप्त नक्षत्रांप्रमाणे जळजळत होते. त्याच्याशेजारी जबडे उघडून टोकदार सुळे दाखवणारे लांडगे होते. त्याशेजारील दृश्यामुळे मात्र अंग थरथरल्यासारखे झाले व सर्वत्र ओल्सर शिडकावा झाल्याचा मला भास झाला. समोरील करड्या अंधारावर आसुडाचा आघात व्हावा, त्याप्रमाणे एक काळी स्पष्ट रेषा सळसळली व एक अजस्र नाग विजेप्रमाणे पिंजऱ्याच्या जाळीजवळ आला व त्याने राक्षसाच्या पंजाप्रमाणे वाटणारा आपला फणा माझ्या दिशेने त्वेषाने फेकला. भेदरून मी वृद्धाला गच्च धरले व काकुळतीने म्हटले, ''चला, येथून आपण बाहेर जाऊ. हे सारे अत्यंत भीषण आहे.''

वृद्धाने शांतपणे आपला हात सोडवून घेतला व म्हटले, ''हे देखील सारे आपलेच आहे. त्यांची सवय झाल्याने तुमचे वास्तव्य मन:शांतीचे होईल.''

परंतु त्या ठिकाणी आता मला राहवेना. आयुष्यावर वाढत आलेले सर्व पापुद्रे अदृश्यपणे सोलत जात आहेत, असे मला सतत वाटू लागले व आपण अंधारात खोल रुतत चालल्याचा सारखा भास होऊ लागला. आपण एका विक्राळ, ओल्सर अशा खऱ्याच गुहेत अंग चोरून बसलो आहो, व भोवताली हीच मुक्त झालेली श्वापदे आपला शोध घेत संचारत आहेत, ही विलक्षण भावना काही केल्या मनातून जाईना. मी तेथून झटक्याने बाहेर पडलो.

आणि अस्पष्ट भय साकार झाल्याप्रमाणे आता समोर खरोखरच एक गुहा होती. तेथे पाऊल टाकताच एखाद्या अदृश्य प्रपाताच्या तुषारात उभा असल्याप्रमाणे मी ओल्सर

झालो. माझ्यासमोर एका ओबडधोबड दगडावर एक काळाकभिन्न, अति कुरूप चेहऱ्याचा माणूस उभा होता. त्यास चेहऱ्याजागी मांसल गुल्म वाढल्याप्रमाणे होते व त्यावरील विद्रूप गाठीमुळे त्यात रुतवल्याप्रमाणे वाटणारे डोळे त्यांच्यांतील ठिणग्यांमुळे मात्र जिवंत वाटत होते. त्याच्या आखूड पाशवी बोटांची नखे बाकदार होती व त्यावरून झळझळीत लाल द्रव ठिबकत होता. मला पाहताच तो मोठे चौकोनी दात दाखवत पुढे आला व त्याने माझा हात आपल्या उग्र ओंगळ हातात घेतला.

''हा देखील आपलाच आहे. हा तर सदैव तुमच्या छायेप्रमाणे तुमच्या पाठीशी राहील, कारण तो तुमचा पाठभाऊ आहे.'' वृद्ध म्हणाला.

मी त्याचा हात झटकून वृद्धाला बाजूला केले व पायांतील सर्व शिरा जागृत झाल्याप्रमाणे मी धावत वाड्यातून बाहेर पडलो.

पायाखालचा प्रदेश सर्वस्वी अपरिचित होता आणि सर्वत्र पसरलेल्या धूसर अंधारामुळे ठिकठिकाणी लपलेल्या खडकाखळग्यांना फसवी सपाटता होती. माझे अंग काटेरी झुडपांनी ओरबडून निघाले व अंगभर ओलसर आगजिभा उमटल्याप्रमाणे वाटू लागले. मी धावत असता एके ठिकाणी खाली बसलेल्या गिधाडांचा कळप वर उडाला व एकएक गिधाड अजस्र पंख शांतपणे हलवत, जडपणे तरंगत बाजूच्या झाडावर उतरले व मान पाठीत आखडून निर्विकारपणे वाट पाहू लागले. आता खालच्या बाजूला त्यांनी स्वच्छ करून ठेवलेला एक जनावराचा सांगाडा, शेवटचेही आवरण काढून टाकल्याप्रमाणे उघडा पडला. त्या ठिकाणी माझे पाय नकळत अडखळले, कारण पाहता पाहता त्या बिनडोळ्यांच्या कवटीवर माझ्या लहानपणीच्या सावळ्या गाईचा चेहरा उमटला व माझ्या आतड्याला तिढा पडला. हीच का आमची गाय? खरी गाय होती तरी कोणती? निर्भयपणे सरळ स्वयंपाकघरात येणारी गुडघ्याएवढी कालवड? की काळ्या सखलातीचे कातडे पांघरलेली, कपाळावर पिंपळपान असलेली महामूर दुधाची गाय? की चार छोट्या पोरांनी आचळाशी खेळ करताच, त्यांच्या वाट्यांत धारधारभर पान्हा सोडणारी सावळी? परंतु खरी गाय समजली ती या गिधाडांनाच. प्रत्येक गाईला ओळखून असणारे एक गिधाड कोठेतरी असतेच.

प्रत्येक गाईला – आणि प्रत्येक माणसालाही! प्रत्येकाच्या खांद्यावर एक अदृश्य गिधाड आयुष्यभर शांतपणे बसलेले असते, आणि योग्य त्या क्षणी त्याचे अवजड पंख पसरतात, बिनउतावीळ डोळ्यांवरची सावध झापड उडून जाते...

माझे हातपाय कापू लागले व नजर कशावरच ठरेना. तेव्हा ठिकठिकाणी गिधाडांची काळी ओझी टांगलेले निष्पर्ण झाड सावकाश पुढे आले व आपल्या फांद्यांत मला सावरत, गुदमरत, सांगू लागले, ''मग बघ, या सहस्र गिधाडांतील तुझे गिधाड कोणते? कोणते? कोणते?''

मला माझ्याभोवती सगळ्या गिधाडांच्या बाकदार अधाशी चोची दिसू लागल्या, ताटल्यांएवढ्या डोळ्यांची काळी वर्तुळे चमकू लागली व त्यांतील प्रकाशाच्या टिंबांतून ध्वनी येऊ लागला – कोणते ? कोणते ? कोणते ?

गिधाडे नाहीशी झाली आणि झाडाच्या सुकलेल्या फांद्यांची हाडे झाली. त्यांच्या विलक्षण पिंजऱ्यात मला किंचितही हालचाल करता येईना. आता भोवतालची उष्णता विलक्षण वाढली व त्यात ती हाडे विविध धगधगीत रंगांनी प्रकाशित झाली. त्यांतून पुढे मार्ग काढण्यासाठी मी एका हाडावर बोटे पसरली व प्राणाच्या आवेशाने ते बाजूला ढकलण्याची धडपड केली. परंतु ते फक्त करकरले व त्यातून आवाज मात्र ऐकू आला – "तू तुझे या ठिकाणी काय ठेवणार आहेस ? काय ठेवणार आहेस ? काय ठेवणार ? काय ?..."

किंचित घोगरा, गोंजारणारा, ध्वनीने दुधावर साय आणणारा, तो आवाज निःसंशय माझ्या आईचा होता – "हा माझा ऊर आहे. याच ठिकाणी मी तुला पोसले. तू तुझे या ठिकाणी काय ठेवणार आहेस ?"

मी दुसऱ्या ठिकाणी आधार धरताच आलेला आवाज दादांचा होता – "ही माझी बोटे आहेत, ती मी तुझ्या केसांतून फिरवली, त्यांनी तुझे डोळे पुसले. तू तुझे या ठिकाणी काय ठेवणार आहेस ?"

एका काळवंडलेल्या हाडातून आलेला आवाज मेधाचा होता – "हा माझा हात. हा तुझ्या हातात दिला होता. तू या ठिकाणी तुझे काय ठेवणार आहेस ?"

लहानशा मूठभर काड्यांना माझा न कळत स्पर्श झाला, तेव्हां चांदीच्या घागऱ्यांपैकी एकच खाली ओघळल्याप्रमाणे त्यांतून गोल, मंजुळ स्वर आला. हा तर माझ्या पिवळ्या सोनपक्ष्याचा आवाज. असह्य वेदनेने तो तडफडत असता त्याला उचलून मी मुठीत धरले होते, आणि मुठीतच तो निष्प्राण झाला होता. त्या वेळचा हा पूर्णविरामाचा स्वर !

आता सगळीकडूनच स्वर उमटू लागले – तू तुझे या ठिकाणी काय ठेवणार आहेस ? काय ठेवणार आहेस ? काय ठेवणार आहेस ?...

झळझळीत तप्त रंगाचे हे शब्द माझ्यावर वाढत्या वेगाने आदळू लागले व माझे सारे अंग बधीर झाले. त्या निर्जीव शरीरातून अगदी खोलातून अती ताणाने मी शब्द वर ओढले व म्हटले, "असे सारे मी येथेच ठेवू लागलो, तर माझे, माझ्याजवळ राहणार तरी काय ?"

भोवतालच्या रंगीत रेषा एकमेकांवर आदळल्या, ठिणग्यांच्या उल्का उडाल्या व विरून गेल्या.

"या साऱ्याशिवाय तू आहेस तरी कोण ? आहेस तरी कोण ? आहेस तरी कोण ?" त्या प्रकाशाच्या कोलाहलातून शब्द आले व लाटालाटांनी कानांवर आदळून नाहीसे झाले. सारी हाडे विझून गेली. अभेद्य यवनिकेप्रमाणे अंधार पुढे सरकला व माझ्यावर पसरला.

मी डोळे उघडले त्या वेळी भोवती पूर्वीचाच करडा निर्विकार अंधार होता व वृद्ध माझ्याकडे स्थिर नजरेने पाहात शेजारी उभा होता. त्या विद्रूप माणसाने माझा हात अद्याप आपल्या हातातच धरला होता व तो आता किंचित खाली वाकून माझ्याकडे खूण पटल्याच्या ओळखनजरेने पाहात होता. ''हाही तुझाच आहे, तो आयुष्यभर तुझी सावली म्हणून राहील.'' निष्पर्ण झाडाच्या आवाजात वृद्ध म्हणाला.

माझ्यात आता हालचाल करण्याचे त्राण नव्हते. तो दैत्यमाणूस खाली वाकला. त्याचे झगझगीत दात जास्तच पसरले व डोळ्यांत समजूत दिसली. त्याने आपली ओंगळ, क्रूर बोटे आपल्या हनुवटीखाली धरली. नंतर एखादा मुखवटा उचलावा त्याप्रमाणे त्याने आपला पाशवी चेहरा वर उचलला आणि आतल्या चेहऱ्याचे धगधगीत ओठ माझ्या ओलसर कपाळावर टेकले. माझेच स्वच्छ प्रतिबिंब मी पाहात असल्याप्रमाणे त्याचा आतला चेहरा पूर्णपणे माझा स्वतःचाच होता.

विभाग तिसरा

# प्रकाशित असंकलित कथा – ब) अनुवादित, आधारित

# कागदाचा तुकडा

उरलेसुरलेलेही सर्व सामान एकदाचे संपले. एक मध्यम वयाचा इसम, – तोच त्या घराचा भाडेकरी होता; पण आता त्याने ते घर सोडले होते. घरात काही शिल्लक राहिले नाही अशी खात्री करून घेण्याकरिता तो त्या रिकाम्या घरात शिरला. काही राहिले नव्हते. छे: सुतळीचा एखादा तोडाही उरला नव्हता! त्याने समाधानाचा एक श्वास सोडला.

त्या घरात काढलेल्या दु:खी आयुष्याची पुन्हा कधीच आठवण काढावयाची नाही असा स्वत:शी निश्चय करून तो पुढील सोप्यात आला. तेथेही काही उरले नाही हे पाहून तो चालू लागणार, तोच त्याचे लक्ष टेलिफोनजवळ पडलेल्या एका कागदाच्या चिटोऱ्याकडे गेले.

काय आहे हे पाहण्यासाठी त्याने तो कागदाचा तुकडा हातात घेतला. निरनिराळ्या तऱ्हेच्या मजकुराने तो भरून गेला होता. काही मजकूर शाईने लिहिला होता, काही पेन्सिलीने खरडला होता, तर काही लिहिताना तांबड्या खडूचा उपयोग केला होता.

त्या घरात काढलेल्या त्याच्या साऱ्या आयुष्याचे सार त्या कागदावर होते. जे अजिबात विसरून जाण्याचा त्याने निश्चय केला होता, ते सर्व त्याच्या नजरेसमोर होते. त्याने तो कागद खिडकीत ठेवला व किंचित् वाकून तो वाचू लागला.

पहिलेच नाव तिचे होते – 'ॲलिस'. या जगातील त्याचे ते सर्वात आवडते नाव होते. कारण ते त्याच्या प्रियेचे होते. त्या नावापुढे टेलिफोन नंबर लिहिला होता ४९४८. एखाद्या पवित्र धर्मपुस्तकातील सूत्रांच्या आकड्याप्रमाणे, तो नंबर त्याला पवित्र वाटला – त्यापुढे बँकेचा नंबर. त्यावर तर त्याचे अस्तित्व, सौख्य अवलंबून होते. पण बँकेचा नंबर खोडून टाकला होता; कारण बँकेचे दिवाळे निघाले होते. थोड्या दिवसांनी त्याची बरीचशी रक्कम दुसऱ्या एका बँकेत जमा झाली म्हणा. पण किती काळजीत गेले ते थोडे दिवस –! नंतर फुलाऱ्याचे दुकान. पण जाऊ द्या ते सारे! ज्यावेळी त्याचा खिसा गरम होता तेव्हाच्या त्या गोष्टी. नंतर नाटकगृह – त्याचे नुकतेच लग्न झाले होते; ॲलिस व तो दर रविवारी नाटकाला जात. त्यानंतर त्याच्या एका मित्राचा टेलिफोन नंबर लिहिला होता. पण त्यावर आडव्या तीनचार रेघा मारल्या होत्या. तो मित्र बराच श्रीमंत व प्रतिष्ठित होता. पण त्याचे भाग्यचक्र फिरले. दुपारचीही त्याला भ्रांत पडू लागली. पोटासाठी दूर देशाला तो भटकत गेला. खरेच, जीवित किती चढउतारांनी भरले आहे!

त्यानंतर घाईघाईने लिहिलेले कोणा तरी स्त्रीचे अक्षर होते. कोण बरे ही ? हां, पायघोळ झगा घालणारी प्रेमळ चेहऱ्याची ती म्हातारी, – अगदी मांजराच्या पावलाने ती घरात शिरायची.

त्यानंतर डॉक्टर – त्याखाली प्रथमच त्याच्या एका नातेवाइकाचा नंबर लिहिला होता. आई –! म्हणजे ॲलिसची आई. नवपरिणित जोडप्यामध्ये आपली अडचण नको, म्हणून दूरदर्शीपणाने ती स्वतंत्रच राहात असे. – पण घरी अडचण आल्यामुळे तिला बोलवावे लागले. ती आलीही.

त्यानंतरची अक्षरे घाईघाईने कशीबशी खरडल्यासारखी दिसत होती. रजिस्ट्री ऑफिस – मोलकरणीने काम सोडले. दुसरी पाहावयास पाहिजे. – दूधवाला – औषधवाला...वगैरे वगैरे.

घरातील सर्व व्यवहार टेलिफोनने चालू लागले होते. घरमालकीण नेहमीप्रमाणे काम करीत नसावी. नव्हतीच. कारण तिने अंथरूण धरले होते.

त्यापुढे लिहिलेली अक्षरे त्याला अंधुक दिसू लागली. बुडू लागलेल्या मनुष्याला पाण्यातून बाहेरचे जग ज्याप्रमाणे पुसट दिसते, त्याप्रमाणे डोळ्यांत जमू लागलेल्या अश्रूंमधून ती अक्षरे त्याला पुसट दिसू लागली.

प्रेताला लागणाऱ्या जिनसांचे दुकान. दोन शवपेटिका (Coffins). एक लहान व एक मोठी ! त्याच्यापुढे कंसात लिहिले होते, – ''राख !''

त्याचे वाचून संपले. शेवटी ''राख'' होती. प्रत्येकाच्याच शेवटी राख असते !

त्याने त्या कागदाची हलक्या हाताने घडी केली व तो कागद खिशात ठेवून दिला. अवघ्या दोन मिनिटांत दोन वर्षांचे आयुष्य त्याच्या डोळ्यांपुढे उभे राहिले.

तो बाहेर पडला. पण घरात शिरताना त्याच्या चेहऱ्यावर असलेली खिन्नता आता दिसत नव्हती. एक प्रकारच्या आत्मप्रत्ययाच्या जाणिवेने तो जगाकडे निर्भयपणे पाहात चालला होता. एक अतिशय मौल्यवान् वस्तू अचानक हाती आल्याच्या समाधानाने त्याचा चेहरा तळपत होता !

[स्ट्रिंडबर्गच्या एका गोष्टीवरून]

ग्रंथ
३४८२
२८५४६
१५।३।८२

# भुर

सगळीकडे मनाला हुरहूर लावणारा संधिप्रकाश पसरला आहे. नुकत्याच लागलेल्या रस्त्याकडेच्या दिव्याच्या प्रकाशात हिमशलाका वळसे घेत घेत पिसाप्रमाणे हलकेच खाली येत आहेत. आजूबाजूच्या घरांची छपरे, जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांच्या टोप्या, कोपऱ्यावर उभा असलेला पोस्टाचा खांब या साऱ्यांवर हिमाचे थर जमल्यामुळे सारे कसे पांढरे शुभ्र दिसत आहे! आयोना गाडीवानाचे सारे अंग शुभ्र झाले आहे. त्यामुळे तो एखाद्या भुतासारखा दिसतो. गाडीच्या पेटीवर तो इतका वाकून बसला आहे की, तो जर आणखी थोडासा वाकेल तर कट्दिशी आवाज होऊन काटकी मोडावी त्याप्रमाणे तो मोडेल की काय अशी पाहणाऱ्यास भीती वाटते. बसल्या जागी अगदी जणू गोठून गेल्याप्रमाणे, अगदी हालचाल न करता तो पेटीवर बसून आहे. आपल्या डोक्यावर जमलेले हिम डोळ्यांत घसरू लागले तरीदेखील तो हात हलविणार आहे की नाही कुणास ठाऊक! त्याच्या घोड्याचे अंगही शुभ्र चादर वर टाकल्याप्रमाणे पांढरे सफेत झाले आहे. तोही आयोनाप्रमाणेच अगदी शांत उभा आहे. त्याची ती वर आलेली हाडे, लाकडाच्या तुकड्याप्रमाणे वाळलेले दिसणारे पाय, व अंगात अगदी जीव नसल्याप्रमाणे उभारण्याची त्याची ढब, हे सारे पाहिले की, दोन-तीन कोपेकला मिळणाऱ्या लाकडी भुसा भरलेल्या खेळण्यातील घोड्याची आठवण होते. तो सध्या आपल्याच विचारात गढून गेल्यासारखा दिसतो. साहजिकच आहे. तुम्हालाही जर खेड्यातील नांगरशेत व ओढा यांच्या शांत, परिचित वातावरणातून उचलून एकदम एखाद्या गजबजलेल्या घाणेरड्या बकाल शहरात आणून गाडीला जुंपले तर तुम्हीही त्याच्याप्रमाणेच विचारात गढून जाल म्हणा...

त्या जागेवर आयोना व त्याचा तो एवढासा घोडा कितीतरी वेळ उभे आहेत. आयोना आज अगदी दुपारीच घरून निघाला होता. परंतु आतापर्यंत एक गिऱ्हाईक मिळाले असेल तर शपथ! संध्याकाळचे निळसर धुके गावावर पसरू लागले; सूर्याचे शेवटचे किरण पार नाहीसे होऊन गावात हळूहळू दिवे दिसू लागले, व जसजसा अंधार वाढू लागला तसतसा घराची आठवण झालेल्या लोकांचा रस्त्यावरील गलकाही हळूहळू वाढू लागला...

"ए गाडीवाला, चल चल, व्हिबोर्ग." कोणीतरी आयोनाच्या मागे एकदम ओरडते.

आपल्या तंद्रीतून आयोना एकदम भानावर येतो, व भुवयांवरही जमलेले हिम झाडण्याचे विसरून चाबूक उचलतो व मागे वळून पाहतो. कुणीतरी जाड ओव्हरकोट घातलेला एक इसम उभा आहे.

"ए, व्हिबोर्ग. आटोप, कान काय फुटलेत की काय?" अधीरपणे आत चढत ओव्हरकोटवाला एकदम खेकसतो.

किंचित् हसण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आयोना लगाम उचलतो. त्यामुळे घोड्याच्या पाठीवरील थोडेसे हिम हलकेच खाली घसरते, व रस्त्यावर पडते. तो ओव्हरकोटवाला कोट आपल्या अंगाभोवती लपेटून घेतो व कोपऱ्यात रेलून ऐसपैस बसतो. आयोना लगाम हलवितो व जणू घोड्याला खुलविण्यासाठी दोनतीनदा चक चक करतो आणि बदकासारखी मान एकदा लांब करून हाताला तशी सवयच पडल्यामुळे चाबूक वर उचलतो. घोडाही आळस झाडल्याप्रमाणे मान लांब करतो व किंचित् नाखुषीनेच चालू लागतो.

"ए म्हातारड्या, काय शुद्धीवर आहेस की झोकली आहेस? घोडा सरळ अंगावरच घालतोस की." गाडी चालू होताच कुणी तरी रस्त्यावरून ओरडते, व त्या मागोमाग दोनचार इरसाल शिव्या ऐकू येतात.

"ए बाबा, तू गाडीवाला आहेस की हजाम आहेस? व्हिबोर्गला जायचं आहे मला म्हणून कोकलतोय सारखा. वळव उजव्या बाजूला –" तो ओव्हरकोटवाला पुढे वाकून म्हणतो.

थोड्या वेळाने समोरून एक मोठी सुंदर गाडी येते. आयोना एकदम लगाम खेचतो, तरी त्याचा घोडा एकदम गाडीवर आपटतो. गाडीतून कुणीतरी त्याच्या आईचा उद्धार करते. खूपशा अणकुचीदार खिळ्यांवर बसल्याप्रमाणे आयोना उगाचच चुळबुळतो, व थिजलेल्या डोळ्यांनी इकडेतिकडे पाहतो. आपला तोल जाऊ नये म्हणूनच जणू तो बाजूची सळी गच्च धरतो. तो अगदी गोंधळून जातो व त्याचा चेहरा गुदमरल्यामुळे भान सुटलेल्या माणसाप्रमाणे भकास होतो.

"काय लेकाचे लोक आहेत!" तो ओव्हरकोटवाला विनोद करतो, "तू एवढा चलाख गाडीवान म्हणून तुझ्याच गाडीखाली सापडून मरायला मरताहेत बेटे नुसते." एकदम फुगा हवेत फुटावा त्याप्रमाणे तो एकदम हसतो व लगेच गप्प होतो.

आपल्यालाही ती गम्मत समजली हे दाखविण्यासाठी मान किंचित् लववून आयोना हसण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचा गळा एकदम आवळल्यासारखा होतो व त्याचे हसणे घशातच अडते. त्याचे ओठ मात्र जरा हलतात व किंचित विव्हळल्यासारखा सुस्कारा मात्र बाहेर पडतो.

"ऑ? काय म्हणालास?" कोपऱ्यातून ओव्हरकोटवाला विचारतो.

आयोना हसतो, पण त्याचे ते हसणे ओठ पसरल्यासारखे वाटते. ओव्हरकोटवाल्याकडे न पाहता तो घोगऱ्या आवाजात म्हणतो,

"माझा पोरगा मेला – गेल्या आठवड्यात."

"अस्सं! काय झालं होतं त्याला?"

आयोना पेटीवरूनच त्याच्याकडे वळतो व किंचित् खोकतो.

"काय झालं होतं देव जाणे! तीन दिवस हॉस्पिटलमध्ये होता. चौथ्या दिवशी खलास! देवाची इच्छा म्हणायची झालं."

"ए, डोळे फुटलेत की काय?" रस्त्यावरून कोणीतरी ओरडते, "घोडा हाकतोस की हजामत करतोस त्या पेटीवर बसून?"

ओव्हरकोटवाला जांभई देतो व जळत आलेल्या सिगारेटचे थोटूक फेकून देतो.

"हं, जरा घाई कर. जरा दोनचार चाबूक ओढ की. नाहीतर जन्म लागायचा तेथे पोहोचायला." आळसलेल्या आवाजात तो म्हणतो.

मोठ्या लगबगीने आयोना उगाचच हालचाल करतो, व चाबूक वर करतो. मध्येच वळून तो त्या ओव्हरकोटवाल्याकडे पाहतो. परंतु तो स्वस्थ डोळे मिटून पडला आहे. त्याच्याशी पुन्हा बोलायचं म्हणजे तो वस्सकन् अंगावर यावयाचा! थोड्या वेळाने व्हिबोर्ग आले. तो ओव्हरकोटवाला खाली उतरतो व एक नाणे आयोनाकडे फेकून त्याच्याकडे न पाहता अंधारात नाहीसा होतो. आयोनासमोरील दारूदुकानासमोर तो उभा राहतो. हातपाय अगदी जवळ घेऊन पेटीवर तो अगदी आखडून बसतो. दिव्याच्या पिवळसर प्रकाशात हिमाची पिसे हलकेच खाली उतरतात. आयोनाची टोपी व त्याच्या घोड्याची पाठ हळूहळू पुन्हा पांढरी शुभ्र होऊ लागते...

त्या रस्त्याने एकदम मोठमोठ्याने बोलत तिघेजण येतात. त्यांपैकी दोघेजण उंच व सडपातळ असून तिसरा किंचित् कुबड आलेला व डोक्यावर एकदम दाबल्याप्रमाणे चपटा आहे.

"ए, त्या पोलीस ब्रिजकडे चल." तडकलेल्या आवाजात तो कुबडा ओरडतो. "आम्ही तिघेजण आहोत. वीस कोपेकवर एक शिवीसुद्धा मिळणार नाही. बोल आहे कबूल?" व आयोना कबूल आहे की नाही हे पाहण्याची तसदी न घेता तो आपल्या मित्रांकडे वळतो व एकाच्या पाठीवर थाप मारतो.

आयोना लगाम उचलतो, व समाधानाने ओठावरून जीभ फिरवितो. वीस कोपेक! वास्तविक ते ठिकाण कितीतरी लांब आहे, व दुसऱ्या वेळी वीस कोपेक म्हणताच त्याने आपले तंबाखूने पिवळे झालेले दात मात्र दाखवले असते. पण आता तो पाच कोपेकवरही गेला असता.

एकमेकांना धक्के मारीत ते तिघेही गाडीजवळ येतात व एकदम आत शिरू लागतात. नंतर आत बसावे कुणी आणि उभे राहावे कुणी यावर ते हमरीतुमरीवर येतात व एकमेकांना शिव्या देऊ लागतात. थोडी आरडाओरड होते व अखेर तो सर्वात लहान असल्याने त्यानेच उभे राहावे असे ठरते.

''ए, तुझं काय अडलं आणखी? हाकल आता एकदा!'' तो चिडक्या आवाजात आयोनाला म्हणतो. तो वर चढतो व आयोनाच्या मागे उभा रहातो. भाता हलविल्याप्रमाणे होणारा त्याचा श्वासोच्छ्वास आयोनाच्या मानेवर पडतो व आयोना सारखा हुळहुळल्यासारखा करतो.

''काय पण आजोबानं टोपी काढली आहे!'' आयोनाची टोपी उचलून कुबडा म्हणतो. अख्ख्या पीटर्सबर्गमध्ये पाहायला मिळायची नाही दुसरी.''

''ही: ही:'' आयोना जरा खुळखुळतो. ''काय पण –''

''ए, तुझं ते 'काय पण' बस्स कर, नि घाल त्या मरतुकड्या घोड्याच्या पाठीत काहीतरी.'' कुबडा म्हणतो, ''नाहीतर खुपस बघ तुझ्याच पाठीत काहीतरी. –''

''माझ्या डोक्यात तर नुसत्या फटाकड्या उडताहेत.'' त्या दुसऱ्या दोघांपैकी एक म्हणतो.

''काल रात्री आम्ही तिघांनी पाच बाटल्या खलास केल्या –पाच –''

''काय बेशरम थापा मारतोस!'' तिसरा जरा चिडून म्हणतो.

''बस्स कर. उद्या तू एकट्यानं एक बैल भाजून खाल्लास म्हणून सांगू लागशील –''

''ही: ही: ही: –'' आयोना हसतो, ''काय पण रंगेल माणसं आहेत!''

''ए म्हातारड्या, घाल की त्या घोड्याच्या कंबरड्यात एक लाथ, की असंच मरत जाणार ते –'' तो तिसरा ओरडतो.

कुबडा आयोनाच्या मागे उभा असतो. तो सारखा वळवळ करतो, त्यावेळी त्याची पाठ सारखी आयोनाच्या अंगाला घासते. तो सतत पुटपुटत असलेल्या शिव्या आयोना निर्विकारपणे ऐकून घेतो, व मधूनमधून गप्पा मारत असलेल्या दुसऱ्या दोघांकडे पाहातो; व हळूहळू आपल्या एकाकीपणाच्या जाणिवेचे त्याच्या मनावरील दडपण कमी कमी होऊ लागते. त्या कुबड्याच्या शिव्या चालूच असतात. शेवटी तो निव्वळ धाप लागल्यामुळे थांबतो. ते दुसरे दोघे कोणत्या तरी पोरीविषयी बोलत असतात. आयोना त्यांच्याकडे पाहतो. त्यांचे बोलणे आपणांसाठी थोडा वेळ तरी थांबावे असे त्याला फार वाटू लागते.

''माझा मुलगा – तो गेल्या आठवड्यात वारला.'' अखेर तो मध्येच म्हणतो.

''आम्हा सगळ्यांनाच गेलं पाहिजे एक दिवस –'' खोकल्याच्या उबळीनंतर तोंड पुसून एक सुस्कारा सोडीत कुबडा म्हणतो. लगेच तो उभा रहातो व एकदम ओरडतो,

"हे घोडं असंच मरत जाणार असलं तर आपण तर या गाडीतून साफ येणार नाही. आग लावा त्या गाडीला –"

"अरे, त्या म्हाताऱ्यालाच जरा किल्ली फिरव." दुसरा डोळे मिचकावीत म्हणतो.

"ए थेरड्या, ऐकलंस काय? घोडं जर जिवंत असल्यासारखं चाललं नाही, तर तुझी मुंडीच पिरगळतो बघ! घोडं म्हणे घोडं. वाळलेली खजूरबी झालंय –"

आपल्या पाठीवर दोनचारदा काठी ओढल्यासारखा आयोनाला भास होतो. आपले शरीर एकदम बधिर झाल्यामुळे दगडासारखे झाले आहे असे त्याला वाटते, व वेदनांची त्यास जाणीव होत नाही.

"हा: हा: हा:" तो मोठमोठ्याने हसतो, "काय शोकीन आहेत हे लोक –"

"अरे, तुझी बायकोबियको कुणी आहे की नाही?" दुसरा त्याला विचारतो.

"माझी बायको? हा: हा: माझी बायको आता एकच – माती." तो पुन्हा हसतो. "माझा मुलगा खलास झाला गेल्या आठवड्यात आणि मी मात्र अद्याप जिवंत आहे. झिंगून आलेल्या माणसासारखं मृत्यू आपलं घर चुकला. माझ्याकडे यायच्याऐवजी माझ्या पोराकडे गेला. हा: हा: –"

आपल्या मुलग्याला काय झाले होते हे सांगण्यासाठी तो मागे वळतो. "आला बुवा ब्रिज एकदाचा." म्हणत दुसरा उठतो. ते एकामागोमाग खाली उतरतात व निघून जातात.

आयोना पुन्हा एकटाच राहतो. – आणि भोवताली विलक्षण असह्य वाटणारी भयाण शांतता. इतका वेळ दबून असलेले दु:ख उफाळ्याने वर उसळते व आपल्या हृदयाच्या चिंध्या चिंध्या होत आहेत असे त्याला वाटू लागते. रस्त्याच्या कडेने जाणाऱ्या त्या पुष्कळशा लोकांपैकी निदान एकजण तरी आपल्याशी बोलायला तयार होईल असे त्याला फार वाटते. पण ते सारेजण आपापल्या मार्गाने जाताना त्याच्याकडे पाहातसुद्धा नाहीत. तसे पाहिले तर केवढे अथांग दु:ख आहे त्याचे! जर त्याचे हृदय आवेगाने एकदम फुटले व ते दु:ख जर वेगाने बाहेर पडले तर साऱ्या पृथ्वीवर पसरून उरेल. परंतु या साऱ्या लोकांपैकी कुणालाही त्याचे काही वाटत नाही. आता ते दिवसा सूर्याच्या व रात्री मेणबत्तीच्या उजेडात न दिसणाऱ्या मुठीएवढ्या जागेत कसेबसे भरून राहिले आहे बिचारे!

जवळून एक पोलीस जाताना त्याला दिसतो. निदान त्याच्याशी तरी दोन शब्द बोलावे म्हणून आयोना त्याच्याकडे वळतो.

"किती वाजले असतील बरं आता?"

"नऊ वाजून गेले. आणि रस्त्यावर कशाला उभी केली गाडी? चल, हाक पुढे." तो पोलीस जाताजाता गुरकावतो.

दोनचार पावले पुढे जाऊन आयोना थांबतो, व अंग आवळून पुन्हा पेटीवर बसतो. सहानुभूतीसाठी मनुष्य दुसऱ्या मनुष्याकडे वळतो खरा, पण त्याच्या पदरी निराशाच येते,

याची त्याला जाणीव होते. हृदयात काही तरी खुपल्यासारखे होते व तो क्षणभर ताठतो. मनात भिरभिरत असलेले विचार त्यास असह्य होतात.

''परतावं झालं आता.'' त्याला वाटते व तो लगाम उचलतो. त्याच्या मनातील तो विचार जणू समजल्याप्रमाणे घोडाही मोठ्या उत्साहाने पाऊल उचलतो.

दीड दोन तासातच तो परततो. एका मोठ्या घाणेरड्या स्टोव्हसमोर तो बसला आहे. त्या स्टोव्हभोवती, जमिनीवर, बाकावर सगळीकडे गवत पसरावे त्याप्रमाणे माणसे घोरत पडली आहेत. आत हवा अगदी कुंद आहे. गुदमरल्यासारखे वाटते आहे. तो त्या झोपलेल्या माणसांकडे पाहतो व दाढी खाजवतो. आपण उगाच इतक्या लवकर आलो असें त्याला वाटू लागते.

''आज गवतापुरतेही पैसे नाही मिळाले. इथंच चुकतं माझं. माणसाला काम असलं, खायला पुरेसं असलं त्याला व त्याच्या घोड्यालाही की, माणूस असा ओंडक्यासारखा झोपतो. –''

कोपऱ्यातील एकजण मध्येच अर्धवट उठतो, जरासा खोकतो व पाण्याच्या बकेटकडे हात दाखवतो.

''काय, पाणी पाहिजे होय रे ?'' आयोना विचारतो.

''पाणी पाहिजे !बकेट सारं रिकामं करीन मी. तहानेनं घसा कोरडा होऊन मरायला लागलो आहे मी –''

''अरे घे की, पी वाटेल तेवढं.'' आयोना उठतो व बकेटकडे जातो. ''हे पहा, माझा मुलगा मेला गेल्या आठवड्यात. काय कळलं ? हॉस्पिटलमध्ये. ती हकीकतच आहे एक. पहिल्यांदा त्याला –''

तो ऐकत आहे की नाही हे आयोना मान वर करून पाहतो, पण तो डोळे मिटतो व लगेच पूर्वीसारखा घोरू लागतो. आयोना मांडी खाजवतो व एक सुस्कारा सोडतो.

त्याला जसे खूप पाणी प्यावयाचे होते त्याप्रमाणे आयोनालाही खूपखूप बोलायचे होते. उद्या त्या गोष्टीला एक आठवडा होऊन जाईल आणि अद्याप एकाजवळही आपले मन उघडे करण्याची त्याला संधी मिळाली नव्हती. आणि सांगावयाचे तरी कसे ? सावकाश सांगितले पाहिजे. पहिल्यांदा त्याला काय झालं, 'मला हॉस्पिटलमध्ये पाठवू नका, मी घरीच मरतो.' असं कसं तो म्हणाला, पोटात अन्नाचा एक कणही जात नसल्याने त्याचे कसे हाल झाले, मरण्यापूर्वी त्याने आपल्या बहिणीची कशी आठवण काढली होती या साऱ्या गोष्टी, संधिप्रकाश आकाशातून उतरून घरांच्या छपरावरून हलकेच रस्त्या-रस्त्यावर पसरतो, तशा अगदी हलकेच सांगितल्या पाहिजेत ! त्याची मुलगी दूर खेड्यात होती. तिच्याविषयीही थोडे सांगायला हवंच. कारण त्याला तिला फार भेटायचं होतं... या साऱ्यांत कुणालाही काही ऐकण्याजोगे वाटणार नाही का ? कुणास ठाऊक !

एखाद्या बाईशी बोलले तर जास्त बरे होईल. बायका खुळचट असतात खऱ्या, पण दोन शब्द बोलले तर चटकन् त्यांच्या डोळ्यांत पाणी दिसू लागते.

"आता एकदा घोड्याकडे फेरी मारून यावे. झोपता येईल नंतर." आयोना पुटपुटतो, "झोप तर लागलीच आहे मागे."

तो कोट घालतो व बाहेर घोड्याकडे जातो. जाताना गवत, हरभरे, यंदाचे पीकपाणी असल्या गोष्टींत मन गुंतविण्याची त्याची धडपड सारखी चालू आहे. एकटा असताना आपल्या मुलाची आठवण काढण्याचे त्याला धैर्यच होत नाही. त्याच्याविषयी दुसऱ्याजवळ बोलणे निराळे. पण त्याच्याविषयी स्वत:शीच विचार करणे, हॉस्पिटलमध्ये पडलेली त्याची आकृती डोळ्यांपुढे आणणे या गोष्टींनी त्याचे मन पिंजून जाई.

"ए बेट्या, झोपलास की काय?" आयोना घोड्याला म्हणतो, "बराय बराय, झोप. आज पोटापुरतंदेखील मिळवलं नाही. आपण दोघेही गवत खाऊन राहू. गाडी हाकायचं काम होतच नाही रे आता माझ्या हातून! माझा मुलगा कसा एक नंबर घोडा हाकीत असे. आज असायला हवा होता रे तो –"

घोड्याच्या काचेसारख्या दिसणाऱ्या डोळ्यांकडे पाहात तो क्षणभर थांबतो.

"हं, काय समजलं? माझा पोरगा मेला. या जगात जगायला आम्हाला टाकलं आणि आपण उडाला भुर्र. आता समज, तुलाच एक शिंगरू असतं; आणि जर ते तुला एक दिवस असंच सोडून गेलं असतं, तर तुलाही फार वाईट वाटलं असतं, नाही?"

घोड्याचे तोंड हलविणे चालूच राहते. तो मध्येच मान वाकडी करतो व आयोनाचा हात हुंगतो.

इतका वेळ त्या मुठीएवढ्या जागी दडपून ठेवलेल्या भावना एकदम उचंबळतात. सारे बांध त्यांच्यापुढे पार वाहून जातात व त्या अमर्याद पसरतात.

घोड्याच्या तोंडावरून हात फिरवीत हलक्या आवाजात आयोना त्याला अगदी पहिल्यापासून सारी हकीकत सांगू लागतो.

[चेकॉव्हच्या कथेवरून]

# देवदूत !

अवघ्या एका आठवड्यातच तिच्याजवळचे सारे पैसे संपून गेले आणि एका अफाट शहरात वणवण हिंडण्याची तिच्यावर पाळी आली.

बागेतील एका बाकावर ती खाली मान घालून बसली होती. या अनोळखी शहरात आपण करणार तरी काय याचा ती सारखा विचार करीत होती. समोर बागेच्या झुडुपामागे उंच उंच इमारती अस्पष्ट दिसत होत्या. तिच्या समोरील काँक्रीटच्या अरुंद रस्त्यावरून हसत- बोलत जाणाऱ्या माणसांचा प्रवाह एखाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे सारखा पुढे सरत होता. एक मनुष्य डोळे उडवीत तिच्याशी बोलण्याच्या उद्देशाने थांबला, पण तिने त्याच्याकडे अशा तिखट नजरेने पाहिले, की तो अगदी शरमून बाजूला झाला.

तिची हॅट अगदी जुनी असून कुसकरल्यासारखी दिसत होती; व तिचा करड्या रंगाचा पोषाख तर पार विटून गेला होता. तिच्या आजूबाजूला पैशाचा प्रवाह अखंड वाहात होता. या फिरायला आलेल्या लोकांची स्वत:ची घरेदारे होती. स्वत:ची सुखदु:खे होती. पण या साऱ्या जीवनक्रमात तिला मात्र क्षणभर बसण्याइतकीही जागा नव्हती.

तिच्याजवळ एकही नाणे नव्हते. त्या अफाट शहरात तिच्या ओळखीचेही कोणी नव्हते; व आता पैसा मिळावयाचीही फारशी आशा नव्हती...

बॅटरीकडून अंग शहारून सोडणारा वारा येऊ लागला व थोड्याच वेळात तवंगल्यासारख्या दिसणाऱ्या पावसाची झड सुरू झाली.

पण तिकडे तिचे लक्ष नव्हते. आत्यंतिक निराशेने तिला अगदी खचून गेल्यासारखे वाटत होते. ती बाकावरून हलली नाही. दोन अश्रू ढाळून जड झालेले मन मोकळे करावे याचाही तिला विसर पडल्यासारखा झाला होता.

बागेच्या पश्चिमेकडील छोट्या दरवाजातून एक मनुष्य आत आला. त्याने आपल्या कोटाची कॉलर उभी करून गळ्याभोवती लपेटून घेतली होती; व तो खिशात हात घालून थंडीमुळे अंग किंचित् आवळून ट्रॅमच्या स्टॅन्डकडे चालला होता. त्याची नजर सहज

तिच्याकडे गेली, व तो थबकला. मोठ्या ओझ्याखाली दडपून गेल्याप्रमाणे खाली मान घालून पावसात बसलेल्या तिच्या आकृतीत कोणाचेही लक्ष जावे अशी केविलवाणी असहायता होती. तो वळला व हळूहळू तिच्यासमोर येऊन उभा राहिला.

''पावसात अशी काय बसतेस? त्या ट्रॅम स्टॅन्डमध्ये जाऊन तरी उभी रहा,'' तो म्हणाला. त्याची नजर तिच्या चेहऱ्याकडे गेली व तो एकदम थांबला. ''पण झाल तरी काय तुला? आपल्या एखाद्या मैत्रिणीच्या मृत्यूची बातमी कळल्यासारखा चेहरा दिसतो तुझा.''

''माझ्या मैत्रिणी अशा कुणी नव्हत्याच मुळी!'' घसा सुकल्यासारख्या आवाजात ती म्हणाली.

पण पावसाच्या कंटाळवाण्या झडीत त्याचा आवाज तिला अतिशय आशादायक वाटला. त्यात सहानुभूतीचा ओलावा होता. तिला जरा हलके वाटले व एखाद्या लहान मुलाने पायाला मिठी मारावी त्याचप्रमाणे जणू ती त्या प्रेमळ आवाजाला क्षणभर चिकटून राहिली.

''छे, असं काय करतेस वेड्यासारखं?'' तो म्हणाला. त्याने तिचा हात हलकेच आपल्या हातात घेतला. त्या स्पर्शानिशी इतका वेळ उभा असलेला बंधारा धुपून गेला व ती एकदम हुंदके देऊ लागली. आणि अडखळत तिने आपली सारी हकीकत सांगितली.

तिची हकीकत प्रत्यही घडणाऱ्या कहाणीपैकीच एक होती!

एका खेडेगावात अगदी चाकोरीतील जीवन ती कंठत होती. पण त्या मृत वातावरणात तिला अगदी गुदमरल्यासारखे होऊ लागले. आपणही कोणी तरी आहो, आपणालाही स्वतंत्रपणे आयुष्यात एक पाऊलवाट पाडता येते, हे घरच्या लोकांना दाखविण्याच्या ईर्ष्येने ती शहरात आली. पण पावसात जाऊन वेचलेल्या गारा एकामागून एक विराव्या त्याप्रमाणे तिच्याजवळचे सारे पैसे संपले. त्या अफाट शहरात लोकांच्या गर्दीत ती अगदी चिरडून गेली आणि फूटपाथवरून उन्हात वणवण हिंडत असता आजूबाजूचे सारे लोक एकमेकांना खुणावून आपणाकडे पाहात निर्दयपणे हसत आहेत असे तिला वाटू लागले...

''आणि आज मी इथं आहे, '' ती म्हणाली. ''त्या रात्रीच्या शाळेत मिळणारं सारं शिक्षण मी पुरं केलं. अंग मोडून टाकणाऱ्या त्या धुरकटलेल्या गिरणीपासून कुठं तरी अगदी दूर जायचं होतं मला. मी तसं म्हणताच त्या साऱ्या कशा कुचेष्टेने हसल्या मला. त्यांना चांगलं दाखवायचं होतं मला – पण आज माझ्याजवळ विष खायलाही एखादं नाणं नाही –''

त्या बागेतून दिसणाऱ्या एका तिमजली इमारतीकडे बोट दाखवून तो म्हणाला, ''ती वर्तमानपत्राची कचेरी आहे. तेथे मी काम करतो. तेव्हा तू असं कर, हा माझा पत्ता घे, व उद्या सकाळी तेथे ये. मी तुला कसलं तरी काम शोधून देईन.''

''पण खरं सांगता ना तुम्ही हे?'' तिने आश्चर्याने विचारले.

''तर मग काय उगाच गप्पा मारतो मी? खरंच, जवळ एकही नाणं नसता असल्या शहरात येणं वेडेपणाचं आहे. अगदी समोर भुकेनं तडफडून कुणी मरत असला तरी ढुंकून पाहावयाचे नाहीत कुणी. मला माहीत आहे. मीही असाच एकदा अनवाणीच आलो या शहरात. जाऊ द्या. हे दिवस जातील तुझे. जग काही सारे काळे कुट्ट नाही. आता इथंच पाहा. आतापर्यंत तू बोलली असशील असा या शहरात प्रथमच भेटलेला मनुष्य तर तुला मदत करतो आहे.'' तो हसला व जरा थांबला .

तिच्या तोंडून शब्दच बाहेर पडेना. साऱ्या गोष्टी इतक्या अनपेक्षितपणे घडत होत्या की, त्या साऱ्या प्रत्यक्ष घडत आहेत की, सारा दिवसभर आपण काही न खाल्ल्यामुळे, – ग्लानीमुळे आपल्या डोळ्यांपुढे ही चित्रे दिसत आहेत हे क्षणभर समजेना.

त्याच्या लहानशा पगारातून पाच डॉलरची एक व एकेक डॉलरच्या दोन अशा नोटा शिल्लक राहिल्या होत्या. त्याची बोटे त्यांवरून हलकेच फिरली. तेवढ्यावर आपणास अद्याप एक आठवडा काढावयाचा आहे हे त्याच्या ध्यानात आले व त्याचे मन व्यवहारी झाले. पण ते क्षणभरच. तिच्या किंचित् भोळ्या चेहऱ्यावरील समाधान पाहताच ते सारे विचार विरघळले. त्याने पाच डॉलरची नोट बाहेर काढली व तिच्या हातावर ठेवली.

''आणि हे पहा, हे पैसे घे. तोपर्यंत कुठल्या तरी हॉटेलमध्ये जाऊन काही तरी खा आणि थोडी झोप घे. सकाळी आपण पुन्हा भेटूच.''

तो निघून गेला. ती क्षणभर निश्चल राहिली. रस्त्यावर उभी असलेली टॅक्सी, रस्त्याच्या दोन्ही बाजूचे दिवे, ही सारी पाण्यात असल्याप्रमाणे सारखी हेलकावत आहेत असे तिला वाटले. पाठीमागील घड्याळात ठोके पडले.

त्या आवाजाने तिचे ताणल्यासारखे झालेले मन जरा सैलावले. भिजलेल्या फरशीवर तिने एकदम गुडघे टेकले व तोंड झाकून ती हुंदके देऊ लागली. भोवताली सारा अंधार जमू लागला होता. त्या वेळी तो देवदूताप्रमाणे तिला भेटला व त्याने मदतीचा हात पुढे केला. बंद होत आलेली दारे पुन्हा एकदा उघडली. आनंदाने तिला वेडावल्यासारखे झाले. ती उठली व झपझप पावले टाकीत जांभई देताना उघडल्याप्रमाणे दिसणाऱ्या एका रस्त्याने चालू लागली.

त्या वर्तमानपत्राच्या कचेरीत दुसरे दिवशी तो पाऊल टाकतो न टाकतो तोच त्याला आतून बोलावणे आले. आदल्या दिवशी सशस्त्र दरवडेखोरांनी एका बँकेवर छापा घातला

होता, व त्या झटापटीत एक दोन ठार झाले असून, त्यांची प्रेते हॉस्पिटलमध्ये ठेवली होती.

"जरा पहा त्याविषयी काही माहिती मिळते का!"

"बराय!" तो म्हणाला.

तो हॉस्पिटलमध्ये आला व अनामिक प्रेते ओळखण्यासाठी जेथे ठेवतात त्या खोलीकडे वळला. त्याला हवे असलेले चेहरे येथेच कुठेतरी होते.

एका टेबलासमोर उभा असता तो एकदम दचकला, व जागच्या जागी रेंगाळल्यासारखा झाला. समोरील टेबलावर काल भेटलेल्या मुलीचे प्रेत होते.

ही पोरगी! काल आपण तिला किती समजावून सांगितलं होतं. आपल्याजवळील पाच डॉलरची नोटही तिला दिली होती; आणि आज तिला कामही मिळवून दिलं असतं एखादं –

त्या खोलीवर देखरेख करणारा मनुष्य त्याच्याजवळ आला व त्याने त्याच्याकडे क्षणभर निरखून पाहिले.

"तुम्ही ओळखता या मुलीला?" त्याने विचारले.

तो एकदम भानावर आल्यासारखा झाला. "छे, ओळखत नाही; पण कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं." त्याच्याकडे न पाहता तो म्हणाला.

"या मुलीची हकीकत मोठी चमत्कारिक आहे."

तो हळूहळू पुढे चालू लागला. मध्येच तो थांबला व किंचित् बेफिकीरपणा दाखवीत त्याने विचारले, "खरंच? काय आहे ती?"

"तर! रात्री अडीच तीन वाजता तिनं समुद्रात उडी टाकली कठड्यावरून."

"मग?"

"खरी गम्मत तर पुढेच आहे," तो मनुष्य मोठ्या उत्साहाने म्हणाला. "तिला इथं आणलं त्या वेळी तिच्या कपड्यातून सारखं पाणी गळत होतं आणि चेहरा मातीसारखा झाला होता. आणि तिच्या हातात काय होतं माहीत आहे?" तो एकदम थांबला व त्या मनुष्याकडे पूर्ण वळून पाहू लागला.

"हातात काय होतं? असेल एखादया झिंगलेल्या खलाशाचा फोटो." किळस आल्यासारखा चेहरा करीत तो म्हणाला. म्हणजे इतक्या भोळ्या चेहऱ्याची ती मुलगी संध्याकाळी समुद्रावर भटकणाऱ्या शेकडो पोरींपैकीच एक होती तर! काय पण बतावणी केली तिने, आणि आपण तिला पाच डॉलर दिले, शिवाय आज कामासाठीही बोलावले होते! आपल्याला तिने चांगलंच बनविलं की! आपण दिलेल्या पाच डॉलरवर तिनं

कुणाबरोबर तरी रात्रभर चैन केली असेल. या जगात दुसऱ्यांना सहानुभूती दाखवणारी माणसे वेडीच ठरतात म्हणायची –

"असेल कुणाचा तरी फोटो." तो म्हणाला.

"खरी गम्मत तर तेथेच आहे –" किंचित् हसून तो मनुष्य म्हणाला. "फोटोबिटो काही नव्हता. फक्त पाच डॉलरची एक बनावट नोट होती तिच्या हातात!"

[इंग्रजीवरून]

# शिकार

हत्तींचा माग काढीत ते दोघे त्या जंगलातून चालले होते. त्यांच्या पुढे कसली तरी मळकट कातडी गुंडाळलेले दोन नीग्रो इकडेतिकडे पाहात, अगदी दबत पुढे सरकत होते. काडतुसे व बंदुका घेऊन त्यांच्यामागून येणारी फाटक्या खाकी कपड्यांतली पोरे चालूनचालून अगदी दमून गेल्यासारखी दिसत होती.

इटुरीच्या त्या अजस्र वृक्षांनी भरून गेलेल्या जंगलात मस्त वाढलेली झुडुपे आणि सर्वत्र माजलेल्या काटेरी वेलींच्या दाट जाळ्या यांखेरीज काहीही दिसत नव्हते. फार तर तेथील लोकांनी फांद्या तोडून केलेला, पुढे हिरव्या रानगर्दीत मिसळून गेलेला, एखादा चिंचोळा रस्ता अगर एखाद्या हत्तीने किंवा रेड्याने मुसंडी मारताना त्या गर्द झुडुपात पडलेले एखादे भगदाड मात्र दिसे.

त्या दोघांपैकी किंचित् सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या पण निळे करारी डोळे असणाऱ्याचे नाव रेन होते. आफ्रिकेच्या उन्हात बरीच वर्षे राहिल्याने त्याचा चेहरा गडद तांबूस झाला होता. आतापर्यंत त्याच्या गोळ्यांनी बरेच हत्ती लोळवले होते. क्लॅन्सी त्याच्याहून जरा लहान होता. मोठ्या शिकारीला येण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसंग होता आणि या नवीन धाडसाचा आनंद एखाद्या लहान मुलाप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर ओसंडून राहिला होता. त्या दोघांचेही तेथे मळे होते व हत्तीची शिकार करण्यासाठी बेल्जियन लायसेन्स घेऊन ते मुद्दाम इटुरीला आले होते.

क्लॅन्सीच्या उत्साहाकडे पाहिले म्हणजे रेनला किंचित् मौज वाटे; पण त्याचे स्वतःचे मन निराळ्याच बिंदूभोवती घोटाळत होते. त्याच्या डोळ्यांपुढे मोनाचे व्हायोलेटच्या फुलाप्रमाणे साधेभोळे डोळे व सकाळचा सूर्यप्रकाश गोठल्याप्रमाणे दिसणारे तिचे मृदू सोनेरी केस सारखे दिसत. आणि मोना आता जवळजवळ त्याची झाली होती.

या शिकारीची मुदत संपली की, तिच्याकडे जाण्याचे त्याने ठरविले होते. त्या वेळी ती त्याला आपला निर्णय कळवणार होती. पण तो निर्णय काय होणार हे ठरल्यासारखेच होते. आणि म्हणून तो त्या दिवसाची उत्कंठेने वाट पाहात होता. मोनाचा लहान भाऊ पायाने अतिशय अधू होता, पण जर ताबडतोब ऑपरेशन केलं तर तो बरा होण्याची बरीच आशा होती. रेनने त्याला आपल्या खर्चाने इंग्लंडला औषधोपचारासाठी पाठविण्याची तयारी दाखविली होती. त्या वेळी मोनाने ज्या कृतज्ञतेने त्याच्याकडे पाहिले ती नजर तर

त्याला राहून राहून आठवे. एकंदरीने क्षितिजावर लालसर सोनेरी प्रकाश दिसत होता व त्यात बरेच दिवस मनाशी बाळगलेली सुंदर स्वप्ने पाखरासारखी स्वैर तरंगू लागली होती.

'आपण तिच्या असहाय परिस्थितीचा फायदा घेत नाही का?' त्याचे मन त्याला विचारी. 'हो, असेल. पण ते सारे तिच्याकरिताच. आपल्या आसऱ्यानेच तिला सुखी आयुष्य काढता येणार आहे, नाही का?' एखाद्या नवख्या तरुणीला पूर्णपणे अज्ञातच असलेले कोमल प्रीतिपुष्प तो तिच्या पायांवर वाहणार होता.

बाजूच्या झुडुपात चाबूक फटकावल्याप्रमाणे सारखा आवाज ऐकून ते जागच्या जागी खिळल्यासारखे झाले, व बंदुकी सावरून समोरील गर्द झुडुपांकडे पाहू लागले. पुन्हा तसाच एक आवाज डाव्या बाजूच्या झुडुपात ऐकू आला. फिरताफिरता ते दोन हत्ती दोन दिशांना गेले असावेत. पुढचे टेहळे पायांखालची काटकीदेखील न मोडेल अशा सावधगिरीने हलकेच पावले टाकीत पुढे सरकले व मागील पोरेही हळूहळू पुढे सरू लागली.

आणि एकदम एखादा प्रचंड वृक्ष कोसळावा त्याप्रमाणे धाड्‌दिशी आवाज झाला. हत्तींना शिकाऱ्यांची चाहूल लागली असावी. एक अजस्र हत्ती डावीकडून धावतच आला व समोरच्या झुडुपात शिरला. रेनला त्याचे विशाल खडकाप्रमाणे दिसणारे तोंड व पेरिस्कोपप्रमाणे वर उचललेली सोंड क्षणभर दिसली असेल नसेल, तोच रेनने बंदूक उचलली व नेम धरून घोडा ओढला.

त्याच वेळी कान फोडणारा दुसरा एक बंदुकीचा आवाज झाला. क्लॅन्सीनेही आपली बंदुक झाडली होती. दुसरा एक हत्ती बेभानपणे उजवीकडून बाहेर उधळला व तोही समोरील झुडुपात दिसेनासा झाला.

पण ते दोन्ही हत्ती आपण मारले अशी त्यांची खात्री होती. त्यांनी बंदुकीत पुन्हा काडतुसे भरली व मोठ्या सावधगिरीने ते पुढे सरकू लागले.

त्यांचा अंदाज बरोबर होता. तीस यार्डांवरच ते दोन्ही हत्ती जवळजवळ पडले होते.

हत्तीच्या त्या भव्य सुळ्यांकडे पाहून क्लॅन्सी चकित झाला व त्याने चमकून रेनकडे पाहिले. "वा:! काय मस्त दात आहेत!" तो एकदम म्हणाला, "रेन, चांगले दोनशे पौंडाचे असतील नाही? हिंदुस्थानात पौंडाला पौंड किंमत येते. दोनशे पौंड!" तो क्षणभर थांबला. जणू स्वत:चाच त्यावर अद्याप विश्वास बसत नसल्याप्रमाणे तो स्वत:शी पुटपुटला, "दोनशे पौंड!"

"पण तो हत्ती माझा आहे." रेन म्हणाला.

क्लॅन्सीचा चेहरा गोंधळल्यासारखा झाला, व हत्तीवर खिळलेली त्याची नजर रेनकडे वळली.

"पण... पण तुझा हत्ती तर उजवीकडे आहे." तो अडखळत म्हणाला.

"पण पुढे येताना ते एकमेकांच्या आडवे नाही का गेले?" रेन म्हणाला. पण क्लॅन्सीचा पडलेला चेहरा पाहून त्याला एकदम चटका बसल्यासारखा झाला व त्याने मान फिरविली.

"अरे, पण असं काय करतोस! तुझा हत्ती तर पहा प्रथम." क्लॅन्सीकडे न पाहता तो म्हणाला.

"छे! पण त्या हत्तीला मुळी सुळाच एक होता. त्याचे वजन फार तर पन्नाससाठ पौंड झाले असते."

क्लॅन्सीने रेनकडे अस्वस्थपणे पाहिले.

"पण रेन, तुझी खात्री आहे का त्यांनी एकमेकांचे मार्ग ओलांडले म्हणून?" त्याने चाचरत विचारले, "मला अजूनही वाटतं –"

रेनचा चेहरा किंचित् कठोर झाला. "उगाच संशय नको," तो तुटकपणे म्हणाला, "आपण त्यांच्या अंगातील गोळ्या काढू. आपल्या बंदुकी वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. तेव्हा कुणी कोणता हत्ती मारला हे ओळखायला फारशी अडचण पडणार नाही."

क्लॅन्सी अगदी मलूल झालेल्या चेहऱ्याने पाहू लागला. रेनने आपला चाकू काढला व हत्तीचे वरील चिवट कातडे कापून गोळीभोवतीची जागा तो मोकळी करू लागला.

"रेन, असल्या साध्या गोष्टीत मी ओढून धरतो म्हणून मी फार क्षुद्र आहे असं वाटेल तुला." क्लॅन्सी म्हणाला, "पण मला सध्या पैशाची फार गरज आहे. अऽ... एका मुलीसाठी माझी ही धडपड आहे."

पण तो चटकन् खाली पाहू लागला व जणू वेड्याप्रमाणे आपण आपले गुपित उगीच उघड केले असे वाटून त्याचा चेहरा लाल-लाल झाला.

"अस्सं! नशीबवान आहेस तू!" वर न पाहता रेन म्हणाला.

"छे रे, फारसा नशीबवान् नाही." क्लॅन्सी किंचित् कडवटपणे म्हणाला, "माझी आणि तिची भेटच मुळी एक महिन्यापूर्वी झाली इथं आणि त्यापूर्वीच तिनं दुसऱ्याची जवळजवळ निवड केली होती. तो कोण आहे कोणास ठाऊक, पण तो फार चांगल्या स्वभावाचा असावा असं वाटतं तिच्या बोलण्यावरनं. तिचा एक भाऊ फार आजारी आहे. तो भाऊ तर तिचा अगदी जीव की प्राण आहे. त्याला औषधोपचारासाठी इंग्लंडला पाठविण्याचे त्याने तिला वचन दिले आहे. म्हणून त्या मनुष्याविषयी तिला फार आपुलकी वाटते, आणि तेवढ्याकरिता ती त्याच्याशी लग्न करणार होती; पण आमची ओळख झाल्यावर सारं बदललं. पण आता तूच पहा, तिच्या भावाला इंग्लंडला पाठविलं पाहिजे, आणि आज तर मी अगदी कफल्लक आहे. तेव्हा त्या मनुष्याला नकार देऊन माझ्याशी लग्न कर असं मी कसं सांगणार तिला? आता हा हत्ती जर माझा ठरला तर मात्र –"

"पण तिचं प्रेम आहे का तुझ्यावर?" रेनने मध्येच विचारले.

त्याच्या चेहऱ्यावर हॅटची सावली पडली होती, व त्याचे डोळे एखाद्या डोहाप्रमाणे खोलखोल दिसत होते. त्याने क्षणभर क्लॅन्सीच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्यावर उत्कंठा व आनंद भरून राहिला होता. पण क्षणातच ती उत्कंठा आरशावरील फुंकरीप्रमाणे नाहीशी झाली व त्याचा चेहरा कोमेजल्यासारखा झाला.

"नुसतं प्रेम असून काय उपयोग? तिच्या भावाचा प्रश्न नसता तर तिनं माझ्याशीच लग्न केलं असतं या क्षणाला. पण जाऊ द्या. तिला करू दे त्याच्याशीच लग्न. तिचा भाऊ बरा होईल, तिलाही सुख मिळेल..." क्लॅन्सी निराशून पुटपुटला.

रेन खाली मान घालून गोळी शोधत होता. ती हातात येताच तो एकदम दचकला. रक्ताने भरलेल्या आपल्या हातातील गोळीकडे त्याने पुन्हा पाहिले व क्लॅन्सीची दृष्टी आपल्याकडे नाही असे पाहून त्याने ती गोळी बाजूच्या झुडुपात फेकून दिली. तो उठून उभा राहिला. त्याचा चेहरा विचारमग्न झाला. क्षणभरच त्याचा स्वतःच्या अंतर्मनाशी मोठा झगडा सुरू असावा. थोड्या वेळाने शांतपणे तो म्हणाला, – "जा, विचार जा तिला लग्नाविषयी."

एखादी माळ तुटून मणी ओघळावे त्याप्रमाणे त्याचे शब्द तुटकपणे येत होते, "क्लॅन्सी, जा, हा हत्ती तुझा आहे –"

# फुलांची भेट

ती फुले कोणीतरी भेट म्हणून पाठविली होती.

सुबक रेशमी रिबन गुंडाळलेल्या त्या पारदर्शक डब्यातील फुलांसारखी सुंदर फुले मेरीने आपल्या साऱ्या आयुष्यात पाहिली नव्हती. त्या मखमालीसारख्या पाकळ्या, व लहान मुलीच्या बोटांसारखी नाजूक लांबसडक देठे यांच्याकडे ती क्षणभर पाहातच राहिली.

तिने मोठ्या उत्सुकतेने वर कुठं कार्ड लावलं आहे की काय हे पाहिले. पण कार्ड नसल्याने ती कोणी पाठविली असावीत हे कळायला मार्ग नव्हता. पण ती फुले दोघांपैकी कोणी तरी एकाने पाठविली असावीत याची तिला खात्री होती. तिला फुले फार आवडतात हे ज्योला माहीत होतं खरं, पण वाढदिवस अगर नाताळ असल्याखेरीज आपल्या बायकोला फुलं द्यायची नाहीत असा काही काही नवऱ्यांचा निश्चय असतो, आणि ज्यो त्यापैकी एक होता. ज्यो ज्या दुकानात फुले घेत असे तेथूनच ही फुले आली होती. पण आज तिचा वाढदिवसही नव्हता किंवा नाताळही नव्हता त्यामुळे ती फुले ज्योने पाठविली नव्हती हे खास. मग ती फुले टॉम ब्रॅडलेने पाठविली की काय?

आणि हा विचार मनात येताच तिला चमकल्यासारखे झाले व ती मटकन् बाजूच्या खुर्चीवर बसली.

त्या टॉमला कसं काहीच समजत नाही कोण जाणे! काल लंचच्या वेळी आपण सहज म्हटलं की, 'त्या फुलवाल्याची खिडकी कशी टपोऱ्या फुलांनी बहरून गेली आहे!' म्हणून का त्यानं सरळ घरी फुलं पाठविण्याचा वेडेपणा करायचा की काय? मागचा-पुढचा विचार न करता मनात येईल ते सरळ करून टाकण्याचा त्याचा स्वभाव कधी बदलणार कुणास ठाऊक!

आता ज्यो घरी येण्यापूर्वी त्या फुलांची कशी तरी विल्हेवाट लावली पाहिजे!

पण ती पुन्हा थांबली. खरोखरच जर ज्योने फुले पाठविली असली तर मोठीच पंचाईत व्हायची! ती फुलं कुठं आहेत म्हणून त्यानं विचारलं तर काय सांगणार?

तिनं टॉमला फोन केला. पण तो नुकताच ऑफिसमधून गेला असं कुणी तरी सांगितलं. नंतर तिनं त्या फुलवाल्याचा नंबर फिरविला व कुणी तरी बोलेल म्हणून दोनतीन मिनिटे वाट पाहिली. नंतर तिच्या ध्यानात आलं व निराशेने तिने रिसीव्हर खाली ठेवला. त्याची दुकान बंद करण्याची वेळ होऊन गेली होती.

आता काय करावं या विचारात ती होती, तोच ज्यो पायऱ्या चढून वर आला.

'काय मालकीणबाई!' हॅट खुर्चीवर फेकत ज्यो म्हणाला.

मेरीने आपले विचार सावरल्यासारखे केले व चेहरा जरा हसरा केला आणि दररोजपेक्षा जरा जास्तच उत्साहाने तिने उत्तर दिले, 'खरंच, किती सुंदर आहेत ती!'

ती काय म्हणत आहे हे ज्योल क्षणभर समजेना. 'काय खरंच सुंदर आहेत?' त्याने गोंधळून विचारले.

झालं! म्हणजे ती फुले त्यानं पाठविली नव्हती हे तर नक्की झालं! म्हणजे टॉमनेच ती पाठविण्याचा वेडेपणा केला होता तर! थोड्या वेळाने ती फुलं ज्योच्या नजरेस पडणारच! मग ही भानगड मिटवायची कशी?

'काय म्हणजे? तू पाठविलेली फुलं फारच सुंदर आहेत!' ती सहजपणे म्हणाली.

'फुलं?' ज्यो एकदम चमकल्यासारखा झाला. 'म्हणजे मी तुला फुलं पाठविली म्हणतेस की काय?'

'कुणीतरी पाठविली आहेत खरी.' मेरी जरा अस्वस्थपणे म्हणाली, 'मला वाटलं, तूच पाठविली असावीस!'

तिला वाटलं, ज्योला सारं समजलं आहे व तो आता आपल्याकडे संशयाने धुरकटलेल्या नजरेने पहात आहे. धैर्य गोळा करून ती पुन्हा म्हणाली, 'हो, नाही तर तुझ्याशिवाय कोण पाठवणार?'

'अग, पण त्यावर कार्ड होतं की नाही एखादं?' जरा चाचरत ज्योने विचारले.

'छे, नाही.' ती म्हणाली, 'म्हणून तर मला वाटलं तूच पाठविली असावीस.'

त्यावर कार्ड नव्हते हे ऐकून ज्योला मोठे समाधान वाटल्यासारखे दिसले. त्याने खिशातून हातरुमाल काढला व तो कपाळावरून फिरवीत म्हटले, 'पण कुठं आहेत पाहू तरी ती फुले!'

ती दोघे आतल्या दालनात गेली. फुले अजून त्या अभ्रकाच्या डब्यातच होती. त्याने डबा उघडला व आत कुठं कार्ड दिसतं का हे तो पाहू लागला. जर मेरीने गुपचूप कार्ड काढून ठेवलं असेल तर अर्धवट तुटलेल्या दोऱ्याचा तुकडा तरी दिसेल असे त्याला वाटले होते. पण दोरा वगैरे काहीच नव्हते. पण तेवढ्याने त्याच्या मनाची अस्वस्थता दूर झाली नाही. त्या फुलांवर कार्ड होते अशी त्याला सारखी धाकधूक वाटत होती.

'मी त्या दुकानात फोन करीन.' बेफिकीरपणा दाखविण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला.

'मी फोन केला होता.'

'मग काय सांगितलं त्यानं?' किंचित् घाबरून त्याने विचारले.

'दुकान बंद झालं होतं.'

'अस्सं. मी सकाळी फोन करीन त्याला.' समाधानाचा सुस्कारा सोडीत तो म्हणाला, 'त्याने चुकून पाठविली असावीत ही फुलं.'

'छे, उगाच तुला त्रास कशाला?' मेरी मोठ्या घाईने म्हणाली, 'मी पहाते काय घोटाळा आहे तो!'

आता टॉमला तावडतोब कसं भेटावं व तो फुलवाला ज्योजवळ काहीही बोलणार नाही अशी व्यवस्था कशी करावी हा महत्त्वाचा प्रश्न तिच्या डोळ्यांसमोर होता. 'ही भानगड एकदा मिटली की सुटले!' ती अस्वस्थपणे मनातल्या मनात पुटपुटली, 'यापुढे कानाला अगदी खडा लावायचा. ज्योला नकळत काहीही करायचं नाही. टॉमबरोबर गुपचूप नाटकसिनेमाला अगर लंचला जाणं, त्याच्याबरोबर भटकणं या साऱ्या गोष्टी साफ बंद उद्यापासून!'

ज्योनेही तो विषय तेवढ्यावरच सोडला. उगाच त्याच्याविषयी चर्चा केली तर मेरीला संशय यायचा ही भीती त्याला होती. जेवण झाल्यावर हळूच त्या फुलवाल्याच्या घरी जायचे व ती फुले आपण चुकून पाठविली अशी बतावणी करायला त्याला सांगायचे आणि सारे प्रकरण चुपचाप मिटवून टाकायचे त्याने ठरविले, आणि पर्सी वेव्हर्ली आपला एवढा दोस्त आहे, तेवढं तो नक्की करील अशी त्याची खात्री होती. पण आपण त्या पोरीला – व्हर्जिनिया वेस्टनला – लिहिलेल्या कार्डाविषयी काय करायचे? ते कार्ड तर फुलांमध्ये अगदी वरच्या बाजूलाच असलं पाहिजे.

आणि मग मात्र तो अतिशय अस्वस्थ झाला. आपण मेरीच्या हातात पुरतेच सापडलो अशी त्याची खात्री झाली. तिने ते कार्ड मुद्दाम आधीच काढून ठेवले असावे, व त्या फुलांविषयी आपण काय काय हकिकती सांगतो हे पाहण्यासाठी ती मुद्दामच वेड पांघरत असावी असे त्याला वाटू लागले. थोड्या वेळाने ते कार्ड आपल्या डोळ्यांपुढे नाचवीत ती कडाडू लागली की, पुन्हा या घरात पाऊल टाकण्याचीही सोय राहणार नाही हे त्याने ओळखले.

तेव्हा, कोर्टाच्या कामाकरिताच फक्त व्हर्जिनिया वेस्टन आपल्याकडे येते व आपण तिला नुकताच घटस्फोट मिळवून दिला, हे सारं मेरीला सांगून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करावा असे त्याला क्षणभर वाटले, पण त्या कार्डावर लिहिलेल्या नाजूक गुलाबी शब्दांविषयी काय सांगणार कपाळ! 'छान! म्हणजे हा चांगलाच धडा मिळाला.' तो स्वत:शी म्हणाला, 'जर ही भानगड शांतपणे मिटली तर यापुढं आपण अगदी फूटपट्टीप्रमाणं सरळ वागायचं. बस्स, यापुढं सुंदर नवख्या तरुणींना लंचला न्यायचं नाही की त्यांना फुलं पाठवायची नाहीत. मेरीला नकळत काहीही करायचं नाही –'

जेवायच्या वेळी ती दोघे अस्वस्थच होती. फुलांचा विषय नेमका गाळून इकडच्या तिकडच्या विषयावर त्यांनी बोलल्यासारखे केले. आता ती ते कार्ड एकदम बाहेर काढील

व तिची सरबत्ती सुरू होईल असं दर क्षणी ज्योला वाटत होतं. त्याने उगाचच कॉलर सैल केल्यासारखी केली, व हातातील वर्तमानपत्राचा कोपरा चुरगाळला.

मेरी त्याच्याकडे वाढत्या अस्वस्थतेने पाहात होती. आपल्याविषयी ज्योला चांगलाच संशय आला आहे असं तिचं मन सारखं कुजबुजत होतं. आता ज्यो वर्तमानपत्राचा नुसता एक कोपरा चुरगाळतो आहे, आणि ती फुलं टॉमकडून आली आहेत असं उद्या फुलवाल्याकडून त्याला समजलं की, चुरगळायला सारं वर्तमानपत्र पुरणार नाही, असं तिला वाटलं...

इतक्यात दरवाज्यावरील घंटा वाजली. मेरी उठली व तिने दरवाजा उघडला. अव्यवस्थित मिशा असलेली एक जाडजूड व्यक्ती दारात उभी होती.

'ओहो, अंकल जिमी का!' मेरी उद्गारली.

अंकल जिमी आत आला व मेरीच्या खांद्यावर हात ठेवून त्याने तिला गदगद हलविलं.

'पण तू इथं आला आहेस हेदेखील माहीत नव्हतं आम्हाला.' ज्यो म्हणाला.

'माहीत नव्हतं?' मिशा फुरफुरवीत अंकल जिमी गुरगुरला, 'आणि मग ती फुलं कुणी सहाव्या जॉर्जनं तुला पाठविली असं वाटलं की काय तुला? म्हणे माहीत नव्हतं!'

आणि मग मात्र त्या तिघांनी ती संध्याकाळ हसून खेळून मोठ्या मजेत घालविली.

# खोल, खोल...

अंधार. दूर असलेल्या विमानाच्या घरघरण्याने कोंदल्यासारखा वाटणारा गडद अंधार. मोठ्या वेगाने भिरभिरत येऊन वर छताला जेथे दिवा लावला आहे त्या बिंदूत येऊन मिळणाऱ्या प्रकाशशलाकांचे पट्टे असलेला अंधार सर्वत्र भरून राहिला होता. त्यातून मध्येच नर्सचा आवाज तरंगत तरंगत वर येतो, – "डॉक्टर, ती शुद्धीवर येत आहे."

सभोवतालच्या अंधारातून खाली वाकून परतत असलेल्या डॉक्टरचा अस्पष्ट चेहराही दिसू लागतो. –

आता सारं तिच्या लक्षात आलं... आपण हॉस्पिटलमधील टेबलावर आहो. तिचा चेहरा भ्रांत झाला होता.

"मी काही म्हणाले का ?" किंचित् ओढलेल्या आवाजात तिने विचारले.

किंचित् थंड वाटणाऱ्या बोटाचा तिच्या हाताला स्पर्श झाला. नर्स तिच्या नाडीचे ठोके मोजीत होती. अर्ध्या-एक मिनिटाने नर्स हसून म्हणाली, "छे, घाबरू नको. सारं ठीक आहे. तुला एक गुटगुटीत मुलगा झाला आहे."

दिव्याच्या झगझगीत प्रकाशात कुणीतरी शुभ्र चादरीची शुभ्र घडी तिच्यापुढे केली. तीतून दोन इवलाले हात सारखे हलत होते. कोपर टेकून ती किंचित् उठली. त्या चादरीच्या घडीमधून दोन मोठे डोळे वरील दिव्याकडे पाहात होते.

तिने पुन्हा उशीवर डोके टेकले. म्हणजे आता घाबरायची काही जरूरी नव्हती. शिवाय तिच्या तोंडून एकही शब्द बाहेर पडला नव्हता! गुंगीचे औषध घेतल्यावर आपण काहीतरी बडबड करू याची तिला केवढा भीती वाटत होती. म्हणून तर ते घेण्यास तिने प्रथम खूप आढेवेढे घेतले. पण अखेर तिचे काही चालले नाही. हॉस्पिटलच्या नियमाप्रमाणे तिच्या नवऱ्याला काही तिथे त्या खोलीत येता आले नसते हे खरं, पण डॉक्टर अगर नर्सने एखादा शब्द त्याच्याजवळ उच्चारला की पुरे. आणि आपलं गुपित जर कुणाला समजलं तर ?...

केवढं समाधान वाटलं तिला! रात्रंदिवस तिच्या डोळ्यांपुढे भीती नाचत होती. पण आता आपण केलेलं पाप धुवून निघालं असं तिला वाटलं. यापुढं सारं आचरण कसं अगदी शुद्ध ठेवायचं; रॉबर्टला त्यातलं काही सांगायचं नाही; आपल्या दोन मुलांनाही नाही,

आणि या चिमण्याला तर नाहीच नाही. अनायासंच आता जिम आपल्या आजारी बायकोला घेऊन युरोपमध्ये गेला होता. क्षणिक सुखाचं स्वप्न आता विरून गेलं होतं.

आणि त्या मुलाविषयी रॉबर्टला केवढा अभिमान, आनंद वाटत होता! नर्स मुलाला दररोज तिच्याजवळ आणीत असे, त्या वेळी तो नेमका हॉस्पिटलमध्ये येत असे व मुलाच्या काळ्याभोर केसांवरून हात फिरवीत तो कौतुकाने म्हणे, ''अगदी माझ्या बापाच्या वळणावर गेला आहे हा.''

...कॅथराइनला घरी घेऊन जाण्यासाठी तो हॉस्पिटलमध्ये आला. पण तिच्या खोलीत एकच गोंधळ होऊन राहिला होता. कॅथराइनने जाण्याची सारी तयारी केली होती. पण तिच्या खोलीत डॉक्टर, नर्स यांचा एकच घोळका जमला होता, व ती सारी एकदम एकमेकांशी बोलत होती. आणि या साऱ्यांच्या घोळक्यात उभी राहून एक फ्रेंच असल्यासारखी दिसणारी बाई हातवारे करीत मोठमोठ्याने ओरडत होती.

त्या साऱ्या गोंधळात ''शांत रहा, शांत रहा'' असा सुपरिटेंडंटचा केविलवाणा आवाज मधून मधून ऐकू येत होता.

मोठ्या प्रयासाने रॉबर्टने सारी हकीकत समजावून घेतली, आणि एक दीर्घ नि:श्वास सोडून कपाळाला हात लावला. ती फ्रेंच बाई – ॲनिटा फ्रीन – त्याच हॉस्पिटलमध्ये बाळंत व्हायला आली होती, आणि तिच्या मुलाचा जन्मही अगदी बरोबर कॅथराइनच्या मुलाच्या वेळीच झाला होता. त्या बाईने दोन दिवसांपूर्वीच आपले मूल घरी नेले होते. पण नंतर जिभा लवलवू लागल्या, व सारी कुजबूज तिच्या कानांवर येऊ लागली. ती ज्या हॉटेलमध्ये राहात होती तेथील स्वयंपाकिणीकडून तिला सारी हकीकत समजली. त्या स्वयंपाकिणीला हॉस्पिटलमधील मोलकरणीकडून ती माहिती मिळाली होती आणि त्या मोलकरणीने तर प्रत्यक्ष त्या दोन नर्सना कुजबुजताना पाहिले होते.

वास्तविक मुलांच्या गळ्यांत नावाच्या चिठ्या बांधताना त्या खोलीत एकाच वेळी दोन मुले न्यावयाची नाहीत असा त्या हॉस्पिटलमध्ये नियम होता. पण त्या दोन नर्सनी त्या दोन मुलांना एकदमच तेथे नेले खरे. आणि यामुळेच सारा घोटाळा झाला होता. बोलताना त्या नावांची अदलाबदल झाली. ही चूक लक्षात येताच ती नावे बदलण्याचा त्यांनी विचार केला. पण दुर्दैवाने हेडनर्स त्याच वेळी तेथे आली. नियम मोडल्याबद्दल खाडकन् अर्ध्या महिन्याचा पगार घालविण्यापेक्षा तोंड मिटलेले काय वाईट असा विचार करून त्या दोघी नर्स गप्प बसल्या. पण जेव्हा ती फ्रेंच बाई आपले म्हणून मोठ्या प्रेमाने दुसरेच मूल घेऊन घरी गेली तेव्हा मात्र त्यांना राहवेना. एका कोपऱ्यात जाऊन एकमेकींना

कोपराने डिवचीत अगदी पोट दुखेपर्यंत त्या हसल्या आणि हा सारा प्रकार त्या मोलकरणीने पाहिला होता...

त्या नर्सना विचारताच अर्थात् त्यांनी 'त्या बाबतीत आपणाला काहीच माहिती नाही.' असे साफ सागितले.

"छे, पण माझं मन मला सारखं सांगतं की, हे मूल माझं नव्हे म्हणून." वेड्याप्रमाणे डोळे फिरवीत ती बाई म्हणाली, "आपलं नाव वर्तमानपत्रात यावं म्हणून या मोलकरणीने सारी बनावट हकीकत रचली आहे असं या नर्स म्हणतात. पण असं कुणी करील का? डॉक्टर, माझं मूल मला हवं. आत्ताच्या आत्ता हवं, या क्षणी."

"या दोन मुलांपैकी एकाच्या अंगावर क्रॉसप्रमाणे निळसर डाग आहे." हनुवटी चोळीत डॉक्टर म्हणाले, "पण नोंदपत्रात याचा उल्लेखच नसल्यामुळे तर जास्तच घोटाळा झाला आहे."

हेडनर्स तर जवळजवळ रडूच लागली होती. "पण तशी चूक होईल तरी कशी? तो निळसर डाग नंतर उमटला असावा. दोन्ही मुलं मी लगेच त्या दोघींनाही दाखविली होती. तसा एखादा डाग असता तर त्यांनी नसता पाहिला?" ती अगदी केविलवाण्या चेहऱ्याने म्हणाली.

मिस्टर फ्रीन व रॉबर्ट या दोघांनीही त्या डागाकडे निरखून पाहिले व माना हलविल्या.

"खरंच, या म्हणतात त्याप्रमाणे हा डाग नंतरच उमटला असावा." मिस्टर फ्रीन इकडे-तिकडे पाहात म्हणाला. या साऱ्या गोंधळात एखाद्या लहान मुलाप्रमाणे तो अगदी बावचळून गेला होता. आजूबाजूच्या लोकांकडे त्याने भीत भीत नजर टाकली, व तो अर्धवट स्वत:शी म्हणाला, "पण काहीही म्हणा, आपलं मूल आपल्याला मिळावं असं वाटतं." आणि जणू हे शब्द उच्चारल्यामुळे तो अगदी शरमल्यासारखा झाला व खिडकीबाहेर पाहू लागला.

"हा सारा काय तमाशा आहे की काय?" रॉबर्ट संतापाने म्हणाला, "असा एखादा डाग असता तर मी नसता का पाहिला? आता आमच्याजवळ आहे हेच मूल आमचं आहे. अगदी माझ्या बापासारखी आहे याच्या चेहऱ्याची ठेवण. मला माझं मूल ओळखत नाही की काय? शिवाय हवं तर कॅथराइनही आपल्या मुलाला ओळखील चटकन्!"

साऱ्या जणांचे डोळे कॅथराइनकडे वळले. किंचित् खाली वाकून ती त्या दोघा चिमण्या मुलांकडे पाहात होती, व तिचे डोळे त्या निळसर डागावर खिळले होते. जिमच्या अंगावर एक तसलाच डाग होता, व तो मुलगा त्या फ्रेंच बाईकडे गेला होता.

नऊ महिने स्वत:च्या रक्ताने वाढवलेला गोळा दुसऱ्याकडे जात असता आपण उघड्या डोळ्यांनी पाहात आहो याच जाणिवेने तिचे हृदय दुखू लागले. त्याच्याशी कितीतरी सोन्याच्या स्मृती निगडित झाल्या होत्या! पण हे सारं सांगायचं तरी कसं? खरं सांगून

रॉबर्टचं आपल्यावरील भाबडे प्रेम चिरडून टाकायचे ? आपल्या दोनं निष्पाप मुलींचं पुढील सारं आयुष्य विस्कटून टाकायचं ?

तसं करू नये तर उघड्या डोळ्यांनी आपल्या प्रीतीची ही गोजिरवाणी स्मृती परक्याच्या हाती देऊन टाकावी लागते आणि आपला सारा जीव तिकडे लागला असता आपला सारा वेळ एका परक्या पोराची जोपासना करण्यात जाळावा लागणार आहे.

तिच्या मनात खोल कुठं तरी या भावना झंझावाताप्रमाणे सारख्या भिरभिरत होत्या. त्यांचा सुसाट आवाज मोठमोठा होत वर येऊ लागला व तिचे कान बधिरल्यासारखे होऊ लागले. तिने भयभीत नजरेने इकडे तिकडे पाहिले. सारी माणसे एकदम गोठल्याप्रमाणे अगदी निश्चलपणे तिच्याकडे रोखून पाहात होती. भिंतीवर घड्याळाचा टक् टक आवाज येत होता... दोन मुलं, रॉबर्ट, निळसर डाग, जिमी...

मनाच्या गाभाऱ्यातील तो आवाज विलक्षण मोठा होऊ लागला. खोलीच्या कोपऱ्यातून, भिंतीतून शब्द सारखे उमटत आहेत असं तिला वाटू लागलं, "कॅथराइन, बोल – बोल –"

पायातील शक्ती एकदम ओसरल्याप्रमाणे तिला अगदी गळल्यासारखं वाटू लागलं. तिने बाजूच्या खुर्चीचा हात एकदम घट्ट धरला व केविलवाण्या असहाय्यतेने ती आजूबाजूच्या लोकांकडे पाहात राहिली !

# आयुष्यातील एक पान

सकाळी आठनऊच्या सुमाराची वेळ आहे. शिशाच्या रंगाच्या ढगांची एक भली मोठी रास सूर्याकडे हळूहळू सरकत आहे. वीज चमकली की, लालभडक रंगाच्या वेड्यावाकड्या रेषा तिच्यावर चकाकतात. दूर कोठून तरी गडगडण्याचा घुमल्यासारखा आवाज ऐकू येतो. वाऱ्याची किंचित् उष्ण वाटणारी झुळूक गवतात भिरभिरते; ती झाडामधून निसटताना झाडाच्या फांद्या लवलवतात व ती रस्त्यावर आली की, हवेत धूळ उडून थोडा वेळ धूसरल्यासारखे होते. आणखी थोड्या वेळात पावसाचा शिडकावा होईल व लगेच जोराचा वारा घोंघावू लागेल.

ती सहा वर्षांची भिकाऱ्याची मुलगी छोटी फायोक्ला टॅरेन्टीचा शोध करीत रस्त्यातून धावत आहे. तिच्या पायांत काही नाही. तिचा इवलासा चेहरा खडूच्या भुकटीसारखा फिक्कट झाला आहे व डोळे मोठे मोठे दिसत आहेत.

"अहो, टॅरेन्टी कुठे आहे?" भेटेल त्याला ती विचारते. पण तिला उत्तर द्यायला कुणीच थांबत नाही. त्या साऱ्यांचं लक्ष काळवंडलेल्या आकाशाकडे आहे व प्रत्येक जण कुठं तरी आसरा शोधण्याच्या धडपडीत आहे. शेवटी गल्लीच्या टोकाला टॅरेन्टीचा जानी दोस्त सिलीच भेटतो. वाऱ्यात मोठ्या कष्टाने तोल सावरीत काठी टेकत टेकत तो फायोक्लाकडे येतो.

"टॅरेन्टी कुठं आहे सिलीच?"

"हा आहे तो मागच्या बागेत." खोकत दाढी खाजवीत सिलीच सांगतो.

फायोक्ला घरामागून धावत जाते व मागच्या बागेत येते. टॅरेन्टी तेथे काम करीत असतो. त्याचा तो देवीचे वण पडलेला चेहरा व उंच काटक्यासारखे पाय ही त्या खेड्यातील लहान पोराच्याही परिचयाची होती. भाजीच्या एका वाफ्यात उभा राहून किंचित झिंगल्यासारख्या चेहऱ्याने तो त्या लांबलचक ढगाकडे पाहतो. त्या काटक्यासारख्या पायांवर उभं असलेलं त्याचं शरीर कबुतराच्या खुराड्याप्रमाणे वाऱ्यात सारखे हेलकावते.

"ए टॅरेन्टी!" ती हाक मारते "टॅरेन्टी –"

टॅरेन्टी किंचित् खाली वाकतो व एखाद्या मुठीएवढ्या मांजराच्या पिलाकडे पाहावे त्याप्रमाणे तिच्याकडे पाहतो आणि त्याच्या कठोर दिसणाऱ्या चेहऱ्यावर एक हास्य पसरते.

"ओहो, आमची फायोक्ला का?" तो मुद्दामच तिच्यासारखा लाडिक आवाज काढतो.

"आलीस तरी एकदम कोठून तू?"

"टॅरेन्टी, चल लवकर." त्याचा कोट ओढीत हुंदके देत ती सांगू लागते, "डानिल्काला काहीतरी झाल्य् –"

"ऑं? काहीतरी म्हणजे काय?" तो उद्गारतो. त्याच वेळी दूर गडगडण्याचा आवाज होतो व तो पसरत पसरत त्यांच्यापर्यंत येतो. "काय आभाळ आलं आहे आज! ऊं! ए पोरी, काहीतरी झाल्य् म्हणजे काय? ऑं!"

"त्यानं राईमधल्या एका झाडात हात घातला, आणि त्याचा हातच अडकून बसला आत. चल लौकर." ती त्याचा कोट जोरजोरात ओढू लागते व मध्येच क्षणभर थांबून डोळे पुसते.

"झाडात हात कशाला घातला त्यानं? वेडाच आहे –"

"अरे, तो मला एका पक्ष्याची निळी निळी अंडी काढून देणार होता." ती जरा चिडून म्हणते.

"अस्सं अस्सं," खोकत टॅरेन्टी पुटपुटतो. "दिवस अजून वीतभरही वर आला नाही तोपर्यंत ही एक भानगड तुम्ही पोरांनी करूनसुद्धा ठेवली." टॅरेन्टी चक् आवाज करतो व तंबाखू बाजूच्या झुडुपात थुंकतो. "चला बाईसाहेब, यायला नको का आता ती निस्तरायला? काय पोरटी आहेत. आज संध्याकाळी मला एक लांबलचक छडी तयार केलीच पाहिजे, अं –"

टॅरेन्टी बागेतून बाहेर येतो व लांब लांब पावले टाकीत चालू लागतो. मागून कुणी तरी सतत ढकलत असल्याप्रमाणे इकडे तिकडे न पाहता तो तडक समोर चालतो. त्याच्याबरोबर राहण्यासाठी छोट्या फायोक्लाला सतत धावावे लागते व तिचा चेहरा तापल्यासारखा होतो.

ते गावाबाहेर येतात व दूर कोपऱ्यावर निळसर दिसणाऱ्या राईकडे चालू लागतात. धुरकटल्यासारख्या दिसणाऱ्या ढगांनी आकाश भरून चाललं आहे, व थोड्या वेळात आकाशात बोट ठेवायलाही निळा रंग उरणार नाही. रात्र पडू लागल्याप्रमाणे सारे अंधारू लागले आहे.

पावसाचे पहिले गोलबंद टपोरे थेंब पडू लागतात व ते जेथे पडतात तेथे रस्त्यावरील धुळीत काळे ठिपके दिसू लागतात. पावसाचा एक मोठा थेंब फायोक्लाच्या गालावर पडतो व अश्रूप्रमाणे खाली ओघळतो.

"च्, पाऊस सुरूच झाला की." आपल्या उघड्या पावलांनी धूळ उडवीत टेरेन्टी पुटपुटतो. त्याचे लक्ष फायोक्काकडे जाते. ती किंचित् मोठ्या डोळ्यांनी आता पार काळवंडलेल्या आभाळाकडे पाहात आहे.

"पाऊस आला, छान झालं पोरी." तो म्हणतो, "आम्हाला खायला कसं पाहिजे? तसं या गवताला, झाडांना काही तरी खायला पाहिजे म्हणून हा पाऊस येतो. त्या गडगडण्याला घाबरतेस की काय तू? ऊं, तुझ्यासारख्या एवढ्याशा चिमणीला काय करणार आहे कोण?"

पाऊस सुरू होताच वारा पडतो. रसरशीत हिरव्या दिसणाऱ्या राय धान्याच्या कणसांवर व शेतांच्या कडेकडेने गेलेल्या, उन्हाने तहानून गेलेल्या रस्त्यावर पावसाचे थेंब टपटप पडू लागतात.

"आपण आता पार भिजून जाणार!" टेरेन्टी उद्गारतो. "बोटभर कोरडं नाही राहणार अंगावर. अरेच्या, माझ्या मानेत शिरलं की पाणी! जाऊ द्या. हे गवत ओलं झालं आहे, ते पुन्हा कोरडं होईल, झाडं कोरडी होतील, मग आमचे कपडे मात्र कोरडे होणार नाहीत की काय? सगळ्यांना एकाच सूर्याचं ऊन मिळतं की –"

अगदी त्यांच्या डोक्यावरच विजेची एक लांबलचक रेषा दिसते, व त्या मागोमाग कान फोडून टाकणारा गडगडण्याचा प्रचंड आवाज ऐकू येतो. फायोक्का जागच्या जागी खिळल्यासारखी होते. आभाळात लोखंडाचा एक मोठा गोळा अति वेगाने फिरत आहे व आभाळ नेमके आपल्या डोक्यावर फाटून तो आपल्या अंगावर पडणार आहे असे तिला वाटते व भेदरलेल्या डोळ्यांनी ती टेरेन्टीकडे पाहू लागते.

"घाबरू नकोस पोरी!" छातीवर हातांचा क्रॉस करीत टेरेन्टी म्हणतो, "हे गडगडणं असं चालायचंच. तुला भिवविण्यासाठी का कुणी मुद्दाम तसं करतं?"

त्यांच्या पायांना मातीचे जाड थर चिकटू लागतात. रस्त्यावर आता थोडासा चिखल झाला आहे. त्यावरून चालताना पाय सारखे निसटतात. टेरेन्टी तर आता झपाझप चालू लागला आहे. त्याच्याबरोबर धावताना फायोक्का अगदी दमून जाते व तिला पाऊलही उचलवत नाही.

अखेर ते राईत येतात. पावसाने भिजून चिंब झालेली झाडे किंचित् हलतात व त्या दोघांवर पाण्याचा सडाच पडतो. टेरेन्टी जमिनीतून वर आलेल्या झाडांच्या मुळांना सारखा ठेचाळू लागतो व थांबतो.

"ए, कुठाय तुझा तो डानिल्का?" धापा टाकीत किंचित् चिडून तो विचारतो.

फायोक्का त्याला एका झुडुपामागे नेते. सात-आठ वर्षांचा, पिंगट केसांचा डानिल्का एका झाडाला टेकून उभा आहे. मान किंचित् वाकडी करून तो आभाळाकडे मोठ्या एकाग्रतेने पाहतो. त्याच्या एका हातात फाटकी टोपी असून दुसरा हात झाडाच्या बुंध्यात

अडकला आहे. पण त्याचे सारे लक्ष काळेभोर आकाश, त्यात लपंडाव खेळणारी लालभडक वीज यांच्याकडे आहे. पावलांचा आवाज होताच तो वळतो, व टेरेन्टीला पाहताच गोड हसतो.

"टेरेन्टी, काय गडगडत आहे आज?" तो म्हणतो, "असलं मी साऱ्या जन्मात पाहिलं नाही माझ्या!"

टेरेन्टी मोठ्या कष्टाने हसू आवरतो व त्याच्याकडे रागाने पाहू लागतो. "तुझा हात कुठाय?" तो दरडावून विचारतो.

"हा काय या बुंध्यात बसला आहे अडकून; जरा काढ ना ओढून." लाडिकपणे डानिल्का म्हणतो व पुन्हा किंचित् हसतो.

"या पोरांवर रागावताच येत नाही!" अशा आशयाने टेरेन्टी हात हलवितो व झाडाच्या बुंध्याजवळ येतो.

त्या बुंध्यात असलेल्या ढोलीचे तोंडाजवळचे लाकूड आत मोडले होते. त्यामुळे डानिल्काला आपला हात बाहेर काढता येत नव्हता. टेरेन्टीने तो तुकडा हळूच काढला व चेंगरल्यामुळे लाल झालेला डानिल्काचा हात मोकळा केला.

"आज अतिशय गडगडतं, नाही?" डानिल्का पुन्हा म्हणतो, "खरंच टेरेन्टी, हे कशानं गडगडतं?"

"एक ढग जोराने दुसऱ्यावर आपटतो आणि हा आवाज होतो." टेरेन्टी सांगतो.

ती सारी जणं राईमधून बाहेर येतात व अंधारलेल्या रस्त्यावरून चालू लागतात. गडगडण्याचा आवाज आता अस्पष्ट होतो. मधूनमधून तो ऐकू येतो, त्या वेळी तो पार खेड्यामागील टेकडीवरून आल्यासारखा वाटतो.

"कालच इथं खूपशी बदकं उडत होती." हात चोळीत डानिल्का म्हणतो, "नदीकाठच्या दलदलीत त्यांनी घरटी केली असावीत. फायोक्ला, तुला नाइटिंगेलचे घरटे दाखवू का एक?"

"त्या बिचाऱ्या नाइटिंगेल पक्ष्याला त्रास देऊ नको." आपली टोपी पिळून पाणी काढून टाकीत टेरेन्टी म्हणतो, "तो पक्षी गाऊ लागला की, चर्चमधील प्रार्थना ऐकल्यासारखं वाटू लागतं. तो एक पवित्र पक्षी आहे. त्यानं माणसांना आनंद द्यावा, देवाची गाणी गावी म्हणून तर त्याला रेशमाच्या धाग्यासारखा आवाज मिळाला आहे."

"मग चिमण्यांचं तरी घरटं दाखवू का तिला?" किंचित् हिरमुसून डानिल्का विचारतो.

"चिमण्यांची गोष्ट निराळी आहे. तो एक क्षुद्र मत्सरी पक्षी आहे. माणसाला जरा सौख्य मिळालं तरी त्याला ते सहन होत नाही. मोठा वाईट पक्षी आहे. ज्या वेळी येशूला खिळे ठोकले त्या वेळी या चिमण्यांनीच चोचीतून खिळे आणून दिले ज्यू लोकांना आणि 'हा अजून जिवंत आहे,' 'हा अजून जिवंत आहे,' असं चिंवचिंवत त्याच्याभोवती सारख्या

घिरट्या घातल्या.'' टेरेन्टीने शिसारी आल्यासारखा चेहरा केला व बाजूला वळून तो थुंकला.

आकाशात आता उजळलेल्या निळ्या रंगाचा तळहाताएवढा एक तुकडा दिसू लागला. चालता चालता मध्येच थांबून टेरेन्टी म्हणतो, ''हे पाहा पोरांनो, एक वारूळ फुटलं आहे. पावसात कशी फजिती झाली बेट्यांची.''

सगळे जण खाली वाकून पाहू लागतात. वारूळ अर्धेअधिक धुपून गेले आहे व मुंग्या मोठ्या लगबगीने इकडे तिकडे पळत आहेत. मध्येच त्या थांबतात व त्यांपैकी सातआठ मुंग्या मिळून एका मेलेल्या मुंगीला घेऊन जातात. ''च्. एवढं धडपडायला काय झालं?'' टेरेन्टी खिदळत म्हणतो, ''आता सूर्याचे दोन-चार किरण अंगावर पडले की होईल सारं ठीक. आता धडा मात्र छान मिळाला तुम्हांला. अशा खोलगट जागी बांधाल का पुन्हा आपलं वारूळ?'' ते पुढे चालू लागतात.

''अरे, आणि इथं मधमाशाही आहेत की!'' एका ओक झाडाच्या फांदीकडे बोट दाखवून डानिल्का ओरडतो.

अगदी एकमेकीला चिकटून बसलेल्या मधमाशांनी ती फांदी अगदी लहडून गेली आहे. त्यामुळे पानांचा हिरवा रंग अगर फांदीचा तपकिरी रंग कुठेच अजिबात दिसत नाही. कित्येक ठिकाणी तर इतकी गर्दी झाली आहे की, कुणी तरी धान्य मापाने मोजून खाली ओतल्यासारख्या त्या एकमेकींच्या अंगावर रेलून पडल्या आहेत. ''हा एक मधमाशांचा थवा आहे.'' टेरेन्टी सांगू लागतो, ''कुठं तरी पोळं बांधावं म्हणून तो चालला होता तोच हा पाऊस मध्येच आला. आता या साऱ्यांना पकडायचं असेल तर फार सोपं आहे. खाली एक पोतं धरावं म्हणजे साऱ्या माशा कशा पटापट पडतील पिकलेल्या फळासारख्या –''

छोटी फायोक्ला चेहरा एकदम वेडावाकडा करते व मान चोळू लागते. डानिल्का तिच्याकडे वळून पाहतो. तिच्या पंढऱ्याशुभ्र मानेवर लाल लाल डाग दिसतो. ''हा, हा'' टेरेन्टी खूप मोठ्याने हसतो. ''काय झालं माहीत आहे तुला, पोरी? इथं पुष्कळशा गांधीलमाशाही आहेत. आता त्या पावसात भिजल्या आहेत. त्यांच्या अंगावरचं पाणी पडलं की, थोडा वेळ अशी आग होते. मोठ्या विषारी असतात त्या –''

लहान लहान टेकड्यांसारख्या दिसणाऱ्या ढगांमागून सूर्य बाहेर येतो व वळणे घेत घेत गेलेला रस्ता, मागे बऱ्याच अंतरावर राहिलेली राई, ही सारी त्याच्या प्रकाशाने न्हाल्यासारखी होतात. मघाचा विशाल काळा ढग दूर क्षितिजाकडे जातो. इतका वेळ वेड्यासारखा घुमणारा वाराही नाहीसा होतो. हवेत हळूहळू उबारा पसरतो, व निरनिराळ्या रानफुलांच्या विलक्षण आल्हादकारक सुगंधाने भारलेली एक नाजूक झुळूक इकडे तिकडे मंद मंद फिरू लागते.

"हे झाड आहे ना?" एका लोकरीच्या ढिगासारख्या दिसणाऱ्या झाडाकडे बोट दाखवून टेरेन्टी म्हणतो, "हे फार उपयोगी आहे. नाकातून रक्त येऊ लागलं की, याचा वास घ्यावा."

त्यांना एकदम शीळ ऐकू येते व मागून गडगडण्याचा आवाज ऐकू येतो. पण हे गडगडणे मघाच्या जमीन कापविणाऱ्या ढगाच्या आवाजापेक्षा निराळे आहे. थोड्याच वेळात समोर मालगाडी दिसू लागते. काळ्या काळ्या धुराचे लोट उडवीत वीस डबे ओढीत इंजिन पुढे पुढे सारखे धावत आहे. ते जिवंत नसता इतक्या जोरात कसे चालते याचे मुलांना फार आश्चर्य वाटते. लगेच त्यांना टेरेन्टी समजावून देऊ लागतो,

"सारं वाफेवर चालतं वाफेवर." तो गंभीरपणे सांगतो. "त्या चाकामागे नळी आहे ना, त्यात वाफ भरली की झालं. शिटी वाजविली की झाली गाडी सुरू. झुक् झुक्...ऊऽऽ –"

ते रुळावरून पलीकडे जातात व नदीकडे चालू लागतात. नदीकडे त्यांचे काही काम आहे असे नाही. वाऱ्यावर पाने भरकटत जावी त्याप्रमाणे ते पाय नेतील तिकडे चालले आहेत. रस्त्याने सारा वेळ ते बडबडत आहेत. डानिल्का सारखे प्रश्न विचारतो व टेरेन्टी मोठ्या गंभीरपणे उत्तरे देतो...

टेरेन्टीला सारं काही माहीत आहे. आजूबाजूला पसरलेल्या साऱ्या रानफुलांची नावे त्याला माहीत आहेत. कोणत्या आजारावर कोणता पाला द्यावा, गाईचं अथवा घोड्याचं वय त्यांच्या दातांवरून कसं ओळखावं हेही त्याला ठाऊक आहे. आणि चंद्राकडे अगर सूर्याकडे पाहून दुसरे दिवशी कसली हवा पडेल हेही तो सांगू शकतो.

आणि तसे पाहिले तर त्याला एकट्यालाच या गोष्टी माहीत आहेत असे नाही. काठी टेकीत जाणारा सिलीच, लांब जाडजूड मिशांचा गुत्तेवाला, उतरणीवर मेंढरे घेऊन जाणारा लंगडा धनगर या साऱ्यांना या गोष्टी माहीत आहेत; परंतु यांपैकी कुणीही कागदाच्या पुस्तकांना हातही लावला नाही. पण त्यांच्यापुढे निसर्गाचं विशाल पुस्तक उघडं होतं व झाडेझुडुपे, नद्या, ढग यांच्याकडून त्यांनी हे जीवनकण मिळविले होते. झाडांमधून येणारी पक्ष्यांची गाणी, मावळताना अगदी क्षितिजाजवळ कुंकवासारखी पट्टी रंगविणारा सूर्य, झाडांमधून स्वैर भटकणारी वाऱ्याची झुळूक, या साऱ्यांनी त्यांना निसर्गाच्या विलक्षण मोहक झुंबराकडे पाहावयाला शिकविलं होतं –

डानिल्का मोठ्या उत्सुकतेने त्याचा शब्दन् शब्द टिपून घेतो व पुन्हा सारखे प्रश्न विचारतो. टेरेन्टीही सारखा बोलत आहे. वसंत ऋतूत सगळीकडे हिरवेचार दिसून हवेत एक प्रकारचा मधुर सुवास भरून राहिलेला असतो, त्या वेळी सोनेरी लव असलेल्या पाकोळ्या, लाल लाल पायांचे बगळे, फेसाळत धावणारे ओढे, किंवा पाहतापाहता मोत्यासारख्या टपोऱ्या दाण्यांनी भरून जाणारी राय धान्याची कणसे यांच्याविषयी खूप खूप बोलताना त्याचे मन अगदी भारावल्यासारखे होते...

डानिल्का व टेरेन्टी सारखे भटकत आहेत. आजूबाजूला उधळलेल्या हिरव्या दौलतीकडे पाहण्यात ते गुंग झाले आहेत, त्यामुळे मागून धापा टाकीत अडखळत अडखळत येणाऱ्या फायोक्लाकडे त्यांचे बिलकूल लक्ष जात नाही. ती अगदी गळून गेली आहे व तिच्या डोळ्यांत अश्रू अगदी काठावर आले आहेत. या दोघांपासून अगदी दूर जावं, आणि एका झाडाखाली स्वस्थ झोपावं असं तिला फार वाटतं. पण त्यांना सोडून ती जाणार तरी कशी? तिला आई बाप कुणीच नव्हते. त्यामुळे त्यांच्यामागून रानोमाळ भटकत जाणं, त्यांची सतत चाललेली बडबड ऐकणं तिला भागच होतं. मध्येच थांबून ती आपली पावले दाबते व पुन्हा मोठ्या कष्टाने चालू लागते.

दुपारच्या सुमारास ते नदीच्या काठी येतात. डानिल्का खिशातून भिजून गोळा झालेला ब्रेडचा एक तुकडा काढतो. टेरेन्टी त्याचे तीन तुकडे करतो व ते तिघे खातात. खाऊन झाल्यावर टेरेन्टी प्रार्थनेचे दोनचार शब्द पुटपुटतो व लगेच आडवा होऊन झोपी जातो. डानिल्का हात झाडतो व नदीच्या पाण्याकडे पाहू लागतो. नुकत्याच पाहिलेल्या गोष्टींनी त्याचं मन धुंदावल्यासारखं झालं आहे. सोसाट्याचा वारा, लालभडक वीज, पाण्यात धडपडणाऱ्या मुंग्या, रास भरून पडलेल्या मधमाशा!आणि आता नदीतील ते मासे! ते सारखे अंग वळवीत वळवीत इकडेतिकडे सटकत आहेत. काही मासे चारपाच इंच असतील, तर काही अंगठ्याच्या नखाएवढेही नसतील...

संध्याकाळ पडू लागल्यावर ते खेड्याकडे परततात. मुले झोपण्यासाठी शेतातील एका रिकाम्या खोपटाकडे वळतात. तेथे असलेले थोडे गवत डानिल्का जरा पसरल्यासारखे करतो. ती दोघे एकमेकांला चिकटून बसतात व पेंगू लागतात. टेरेन्टी त्यांच्याकडे पाहतो व खेड्यातील गुत्त्याकडे जातो.

डानिल्काला एकदम झोप येत नाही. खोपटातील अंधारात उगाचच पाहात असता दुपारी पाहिलेलं सारं त्याला अस्पष्ट दिसू लागतं. ते काळे मोठे ढग, गरम लोकरीच्या कापडासारखा वाटणारा सूर्यप्रकाश, रुप्याच्या अंगाचे मासे, बगळ्याच्या पायाचा टेरेन्टी... वेगाने डोळ्यांसमोर भिरभिरणारी ही चित्रे, हातापायांत भरून राहिलेला थकवा व अजून धुमसत असलेली भूक या साऱ्यांमुळे आपले अंग जळत आहे असं त्याला वाटतं, व तो अस्वस्थपणे चुळबुळतो. डोळ्यांसमोर सतत नाचून मन उकळणाऱ्या या साऱ्या गोष्टींविषयी कुणाजवळ तरी खूप बोलावं, पडल्या पडल्याच अंधारात कुणाशी तरी हलक्या आवाजात बोलावं, रेशमी कापडाच्या लाल भडक फुलांसारखे मस्त नाजूक शब्द हलकेच फेकावे असं त्याला फार वाटतं. पण बोलणार तरी कुणाजवळ? टेरेन्टी गुत्त्यावर गेला आहे. फायोक्ला अजून लहान आहे, व तिला असल्या गोष्टी समजायच्याही नाहीत...

टेरेन्टीलाही त्यांच्याप्रमाणे घरदार नाही. त्याच्याविषयी विचार करीत ती दोघे झोपी जातात. रात्री हलक्या पावलांनी टेरेन्टी त्यांच्याजवळ येतो, त्यांच्यावर क्रॉस करून प्रार्थना करतो व उशाशी एक ब्रेड ठेवतो. हे त्याचे प्रेम कुणाच्याही दृष्टीला पडत नाही. मात्र चंद्र आकाशात तरंगत जात असता त्याचे दोनचार किरण खोपटाच्या भोके भोके पडलेल्या छपरातून आत येतात व त्यांना मात्र हे सारं दिसतं...

[चेकॉव्हवरून]

# आत्महत्या

पुलावर कोणीही नव्हते. कोपऱ्यावरील दिव्याचा चाकाएवढा प्रकाश तेलकट फरशीवर पसरला होता.चुरगळून गेलेल्या आपल्या विजारीत हात घालून शुमिटाव्ह खालच्या मानेने चालला होता. हवेत एक प्रकारची धारदार थंडी असल्याने त्याने कोटाची कॉलर वर केली होती.

"या असल्या हवेत सिगरेटचं थोटूक असतं, तर काय बहार झाली असती!" तो पुटपुटला. सध्या आपल्या खिशात रस्त्यात सापडलेल्या पेन्सिलीच्या तुकड्याखेरीज काही नाही हे त्याला पूर्णपणे माहीत होते; पण पुन्हा एकदा आशाळभूतपणाने त्याने खिसे चाचपून पाहिले. खिसा रिकामाच होता. किंचित चिडून तो बाजूस थुंकला व फरशीवर पडलेला एक दगड त्याने ठोकरीसरशी पाण्यात उडवला.

इतक्यात त्याचे लक्ष पुलाच्या कठड्याकडे गेले.

कठड्यावर एक फाटका कोट होता व एक लहानशी चिठ्ठी त्याला टाचणीने अडकविली होती. कोणीतरी बिचाऱ्याने आत्महत्या केली होती! शुमिटाव्हचे अंग शहारल्यासारखे झाले. त्याने टाचणी काढून चिठ्ठी उचलली.

"जगण्याजोगं माझ्या आयुष्यात काहीच उरलं नाही. जिकडेतिकडे स्वार्थाचा बाजार आहे. या अशा जगात यमयातना भोगीत दिवस तरी कशाला कंठायचे? – **गोराव्ह.**"

बिचारा गोराव्ह! शुमिटाव्हने एक दीर्घ सुस्कारा सोडला व अंधारात तवंगल्याप्रमाणे दिसणाऱ्या पाण्याकडे क्षणभर नजर टाकली.

"खरंच! हा गोराव्ह शहाणा मनुष्य आहे; काय चूक आहे त्याच्या म्हणण्यात?" तो स्वत:शी म्हणाला, "जिकडें पाहावं तिकडें स्वार्थ, अन्याय, हालअपेष्टा यांचीच बजबजपुरी माजली आहे. मी दहादहा तास दररोज मरतो, तर पोटभर ब्रेडही मिळत नाही. आणि तो अहराव्ह मात्र तार्तरीच्या सुलतानाप्रमाणं मिरवतोय..."

त्याने मनाचा निश्चय केला. खिशातील पेन्सिलीचा तुकडा काढून त्याने तो दाताने कुरतडला व जरा टोक काढले. पेन्सिल तोंडात घालून त्याने चिठ्ठीवर आपले नाव लिहिले. आपला कोट काढून कठड्यावर ठेवला व ती चिठ्ठीही टाचणीने त्याने त्या कोटाला अडकवली. नंतर तो काळजीपूर्वक कठड्यावर चढला व त्याने पाण्यात उडी मारली!

पाण्यावरील बुडबुडे नाहीसे होतात न होतात तोच सुकोटान तेथे आला. आज घरी जायला उशीर झाला तेव्हा आता बायकोच्या तोंडाचा पट्टा चालू होणार याच धास्तीने तो अगदी अस्वस्थ झाला होता व त्या अस्वस्थतेमुळेच सतत बरोबर असलेली आपली छत्री तो सारखा या हातातून त्या हातात नाचवीत होता. इतक्यात त्याचे लक्ष त्या चिठ्ठीकडे गेले. तो क्षणभर थांबला व त्याने चिठ्ठी वाचून पाहिली.

''आत्महत्या!'' तो उद्गारला. त्याच्या डोळ्यांपुढे काही तरी चमकल्यासारखे झाले व बावरून त्याने पुन्हा एकदा चिठ्ठीकडे पाहिले.

''पण किती सत्य आहेत यांचे शब्द!'' मनाचा गोंधळ जरा कमी झाल्यावर त्याला वाटले, ''आज बायकोपोरांसाठी मी इतकी वर्षं ऑफिसात मरतो आहे, पण कधी कुणी एखादा तरी चांगला शब्द काढला आहे का माझ्याविषयी? ऑफिसात मॅनेजर मानगुटीवर आहे, तर घरी बायको गर्जत आहे! असलं कंटाळवाणं आयुष्य सोडून टाकायचं धैर्य तरी दाखवलं या दोघांनी. नाही तर आपण काढतो आहो शेळपटासारखं जीवन!''

त्याने खिशातून घड्याळ काढून वेळ पाहिली व चेहरा एकदम घाबरल्यासारखा करून तो भराभर चालू लागला. पण दोन पावले जाताच तो थबकला व मागे वळला. खिशातून पेन काढून त्याने चिठ्ठीवर आपले नाव लिहिले. कोट कठड्यावर टाकून तो वर उभा राहिला आणि किंचित भीतभीत त्याने खाली उडी ठोकली.

थोड्या वेळाने अँटन हा कॉलेजविद्यार्थी त्या रस्त्याने चालला असता त्याची नजर त्या कोटाकडे गेली. तो एकदम थांबला व त्याने ती चिठ्ठी वाचून पाहिली. आता आपण एक व्याख्यान देणार आहो असा चेहरा करून तो एकदम म्हणाला, ''आत्महत्या? उं:! यापैकी कुणीच आत्महत्या केली नाही!''

तो कडवटपणे हसला. ''या साऱ्यांचे खून झाले! भांडवलशाहीचे हे सारे क्रूर बळी आहेत. क्रांतीनंतरच्या जगात यांना खास सुखानं जगता आलं असतं. ज्या जगात दलित वर्गाची अशी पिळवणूक होते, जिथं त्यांना कुत्र्याच्या मोतीनं मरावं लागतं, त्या जगात राहून तरी काय उपयोग...? आणि आजूबाजूला अशी आग लागली असता मी नाटकाला चाललो होतो!''

त्याने ती चिठ्ठी उचलली आणि पुढील शब्द लिहिले : ''या जगाविषयी मला तिरस्कार वाटतो. आणि यात काही बदल करण्याची शक्ती आपल्यात नाही या माझ्या दुबळेपणाबद्दल माझ्याविषयीही मला तिरस्कार वाटतो. माझं घड्याळ माझ्या मोलकरणीला द्यावं. त्या बिचारीला गेले दोन महिने एक कोपेकही मी दिला नाही. क्रांती चिरायू होवो!''

त्याच्या अंगात कोट नव्हता. त्याने शर्ट काढून त्याची व्यवस्थित घडी घालून तो पुलावर ठेवला व एकदम पाण्यात उडी घेतली.

पाचदहा मिनिटांनी पिपासारखा गोल दिसणारा एक पोलिस टकटक बूट वाजवीत तेथे आला.

"आँ?" इतके कपडे एकत्र पाहून तो उद्गारला, "एक ग्लास घ्यायला गेलो तो हा झाला घोटाळा! आधीच नोकरी डळमळीत आणि त्यात ही भर. नशीब माझं!" त्याने हलकेच कान खाजविला व दोनचार गरगरीत शिव्या हासडल्या. "एकानं आत्महत्या केली, ठीक आहे. दोघांनी केली, ठीक आहे. पण इथं कोण काय करणार? पाचपन्नास माणसांचा घोळकाच पडला आहे नदीत! आणि मरायचंच होतं, तर हे लोक माझ्याच भागात कशाला आले मरायला कुणास ठाऊक!"

त्याने टोपी बोटावर ठेवून गरगर फिरविली व खरखरीत हनुवटीवरून हात फिरविला.

"पण आता करायचं काय?" तो विचार करू लागला. "स्टेशनवर गेल्यावर तर आपला फडशाच पडणार तिथं! तो लाल नाकाचा इन्स्पेक्टर तर तोंडाला फेस येईपर्यंत ओरडेल! बस्स झालं असलं जगणं!"

त्याने युनिफॉर्म काढला व कठड्यावर ठेवला. पट्टा काढताना त्याचे लक्ष आपल्या पितळी बकलकडे गेले. ते जरा मळकट झाले होते. त्याने खिशातील हातरुमाल काढून ते स्वच्छ केले व पोपटासारखी किंचित वाकडी मान करून त्याच्याकडे समाधानाने पाहिले. अगदी शेवटची म्हणून त्याने एक सिगरेट पेटविली. दोन झुरके घेऊन तो भिंतीवर चढला व त्याने उडी घेतली.

त्यानंतर मात्र पुलावर दुसरे कोणीही आले नाही. अर्ध्यापाऊण तासाने पूल उतरत उतरत जेथे रस्त्याला मिळाला होता, तेथून वाळलेल्या काटकीसारखा दिसणारा एक मनुष्य आला. थंडीने तो किंचित थरथरत होता. कपड्यांचा ढीग पाहिल्यावर तर त्याने उडीच मारली व स्वत:च्या पाठीवर थाप मारली!

"नशीबवान आहेस! या चिठ्ठीमुळं एवढा लग्गा साधेल असं अजिबात वाटलं नव्हतं मला! या पोलिसाचा कोट लोकरीचा आहे आणि एकदोन खिशांत तर घड्याळंही आहेत... परमेश्वरा, तू गरिबांचा वाली आहेस!"

गोराव्हने आपला फाटका कोट अंगात घातला व बाकीचे कोट हातावर टाकून शीळ वाजवीत तो अंधारात दिसेनासा झाला.

# स्त्री-पुरुष

निरनिराळ्या पदार्थांनी भरलेल्या बशा हातांतून घेऊन जात असता संगमरवरी फरशीवर नोकरांच्या उघड्या पावलांचा आवाज बिलकुल होत नव्हता. पण झाला असता तरी टेबलाभोवती बसलेल्या मंडळीत मोठ्या रंगात आलेले जे मोकळे बोलणे चालू होते त्यात तो ऐकूही आला नसता.

हिंदुस्थानात बडे साहेब ज्या बंगल्यात राहतात तशा एका बंगल्यात ही मेजवानी चालली होती. वरच्या बाजूला जाड तुळया असून दिवाणखान्याच्या दोन्ही बाजूंला फ्रेंच खिडक्या होत्या. चित्राला सुबक चौकट असावी त्याप्रमाणे एक अरुंद गच्ची साऱ्या बंगल्याभोवती फिरली होती.

आजच्या जेवणात बेत तर राजेशाही होता, व जेवण दोनतीन तास चालले होते. एकंदरीत चुरचुरीत पदार्थ आणि लाललाल बर्गंडीचे मद्य यांमुळे नेहमी धुरकटल्यासारखे दिसणारे बड्या साहेबांचे चेहरे जरा रंगेल दिसू लागले होते व भाषणाला मोठा रंग चढला होता.

पाचूसारख्या हिरव्या पोषाखातील एक तरुणी मोकळेपणाने हसली व म्हणाली, ''कर्नल बेंटले, म्हणजे तुम्ही आम्हाला अद्यापि व्हिक्टोरियाच्या काळातील मावशीबाईच समजता की काय ?''

''अगदी तसं नाही,'' कर्नल बेंटले म्हणाला, ''तसा थोडा फरक झाला आहे म्हणा. पण जरा खुट् झालं की, आरडून ओरडून सारं घर डोक्यावर घ्यावयाचा तुमचा मूळ स्वभाव कसा बदलणार ?''

''म्हणजे आम्ही अजून उंदराची पिलं पाहिली की, बेशुद्ध पडतो वाटतं ?'' ती पुन्हा हसून म्हणाली.

''हो, पण खरं सांगावयाचं म्हणजे त्यात काही वाईट नाही.'' कर्नल बेंटले जरा हसून म्हणाला, ''सुंदर स्त्रिया घाबरल्या की, त्यांना उचलून बिछान्यावर ठेवणं, त्यांना वारा घालणं या गोष्टी वाईट आहेत असं कोण म्हणेल ?''

आता नॉर्मन बोलणार हे पाहताच सगळे जण त्याच्याकडे उत्सुकतेने पाहू लागले. कारण तो काहीतरी विनोदी बोलणार हे ठरल्यासारखेच होते. त्याच्या त्या गंमती

स्वभावामुळे एखाद्या समारंभात पुष्कळदा त्याच्याकडे विदूषकाची कामगिरी येत असे आणि त्या कामात त्यानेही कधी कुचराई केली नाही.

"हल्लीचं जीवनच इतकं रुक्ष झालं आहे." तो गंभीरपणे म्हणाला, "हल्ली स्त्रिया लाजत किंवा घाबरतच नाहीत. उलट पिकॅडिलीला तर आम्हालाच धक्के मारीत जातात. एखादी तरुणी घाबरली असता तिला वारे घालण्यासाठी माझे बाहू कसे स्फुरण पावतात! पण छे, या दिवसांत तसलं दृश्य पाहावयालाही मिळावयाचे नाही."

"पण एखाद्या वेळी विशेष काही घडलं तर स्त्रियांपेक्षा पुरुषांचा आपल्या मनावर जास्त ताबा असतो एवढंच म्हणावयाचे आहे कर्नलला." हसून हॅरिस म्हणाला.

"हो तर!"मोठ्या उत्साहाने कर्नल म्हणाला, "संकटाच्या वेळी भिऊन ओरडण्याकडे स्त्रियांची प्रवृत्ती असते. पुरुषालाही तेवढाच धक्का बसतो. पण अगदी शेवटच्या क्षणी तो आपलं मन ताब्यात ठेवू शकतो."

नॉर्मनने सगळ्यांच्या चेहऱ्यांकडे निरखून पाहिले. पण त्याची नजर इव्हेलीनच्या चेहऱ्यावर क्षणभर स्थिरावली. तिचा चेहरा आकसल्यासारखा झाला व त्यावर भीतीची छटा क्षणभर दिसली. तिची नजर समोर खिळल्यासारखी झाली व तिने हात हलवून एका नोकराला बोलविले.

तिने दोनचार शब्द उच्चारले असतील नसतील तोच त्या नोकराचे डोळे मोठे झाल्यासारखे झाले व तो चटकन् बाहेर गेला. पण तिकडे कुणाचेही लक्ष गेले नाही. तो नोकर हातात दुधाची वाटी घेऊन आला व ती वाटी त्याने फ्रेंच खिडकीसमोर गच्चीत ठेवली. हीही गोष्ट कुणाच्या ध्यानात आली नाही.

नॉर्मन एकदम चमकला. त्या नोकराने दुधाची वाटी तेथे आणून ठेवली यावरून एकच गोष्ट उघड होत होती. तेथे कुठे तरी आसपास नाग होता. त्या दुधाच्या वासाने त्याला बाहेर काढावा म्हणूनच ती वाटी तेथे ठेवली होती.

नॉर्मनने वर निरखून पाहिले. एखादा नाग असला तर वर तुळयांवरच असणे शक्य होते. पण वर कुठेच त्याला सापाची वेडीवाकडी रेषा दिसली नाही. तो टेबलाच्या अगदी टोकाला बसला होता. तेथून किंचित् वळून त्याने दिवाणखान्याच्या कोपऱ्यातही पाहिले. पण तेथे काहीच नव्हते. त्याच्यामागे असलेल्या कोपऱ्यात नोकर लोक मोठ्या अदबीने उभे होते. अर्थात् त्या कोपऱ्यात नाग असणे शक्यच नव्हते.

म्हणजे आता फक्त एकच जागा उरली आणि ती कल्पना येताच त्याचे अंग शहारल्यासारखे झाले. आपल्या टेबलाखालीच कुठं तरी तो नाग असला पाहिजे!

आपण एकदम उठावे व सगळ्यांना चट्कन् बाजूला होण्यास सांगावे असे त्यास क्षणभर वाटले. पण सगळे एकदम उठू लागताच होणाऱ्या आवाजाने तो नाग अगदी बुजल्यासारखा होईल आणि त्या भरात नाग एकच भयंकर गोष्ट करतो हे त्यास माहीत

होते. पण नाग जाईपर्यंत सारे जण गप्प तरी बसतील का? जर कुणाचा पाय लागून नाग डिवचला जाईल तर केवढा भयंकर प्रसंग ओढवेल!

क्षणभर विचार करून काय करावयाचे हे त्याने नक्की ठरविले.

''आता आपण सारे जण असं करू,'' तो म्हणाला. त्याचा गंभीर व नेहमीच्या रंगेल आवाजापेक्षा निराळा आवाज ऐकून सारे संभाषण एकदम थांबले व सारे जण त्याच्याकडे पाहू लागले.

''आता आपल्या प्रत्येकाचा स्वत:वर किती ताबा आहे हे पाहू. मी तीनशे अंक मोजतो, आणि तोपर्यंत कुणीही थोडीसुद्धा हालचाल करावयाची नाही. जो हालचाल करील त्याला पन्नास रुपये दंड हं. चला, एकऽ दोन –'' आणि कुणी काही बोलण्याच्या आतच त्याने मोजण्यास सुरुवात केली.

एक दोघे हसले. पण थोड्याच वेळात सारे जण देवळातील मूर्तीप्रमाणे निश्चल दिसू लागले. आकडा भराभर चढू लागला व तीनशेचा टप्पा जवळ येऊ लागला. किंचित् अस्वस्थपणे नॉर्मनने टेबलाखाली पाहिले, पण तेथे काहीच हालचाल दिसेना.

''दोनशे सत्तर-एकाहत्तर-बहात्तर.''

त्याने पुन्हा खाली पाहिले. खालून एक किळसवाणे चपटे डोके बाहेर आले. त्यामागे डांबराचे दोन चिकट थेंब पडावेत तसले डोळे दिसू लागले आणि नंतर अंगावर शहारे आणणारे खवल्या खवल्याचे सारे शरीर बाहेर सरपटले. थोड्या वेळाने तो नाग बाहेर वाटीजवळ जाऊन दूध पिऊ लागला.

चट्कन् नॉर्मन उठला व त्याने ती फ्रेंच खिडकी लावून टाकली. लगेच बऱ्याच खुर्च्या खर्रदिशी मागे सरकविल्याचा आवाज झाला व दोनचार बारीक किंकाळ्याही ऐकू आल्या.

''पहा, स्त्रिया आपल्या मूळ स्वभावावर गेल्या.'' इकडे तिकडे पाहात कर्नल ब्रेंटले म्हणाला. ''मी सांगितलचं होतं मुळी. काय घबराट आणि काय त्या किंकाळ्या! आता कुणाचा जास्त ताबा असतो आपल्या मनावर हे सांगायला नको!''

''जरा थांबा हं.'' नॉर्मन म्हणाला. ''पण इव्हेलीन, तुला कसं समजलं इथं साप आहे म्हणून?''

इव्हेलीन किंचित् हसली व तिने कानाजवळचे केस हात फिरवून सारखे केले.

''मला कसं समजलं? मग कुणाला समजणार?'' ती म्हणाली, ''अगदी माझ्या पायालाच विळखा घातला होता ना त्याने!''

[इंग्रजीवरून]

# आंधळ्यांचे जग

पार्सन्स त्या भव्य हॉटेलमधून बाहेर पडला, त्यावेळी समोरून एक आंधळा हळू हळू काठी टेकीत त्याच्या दिशेने येत असलेला त्याला दिसला.

त्या भिकाऱ्याचा चेहरा खडबडीत दिसत होता आणि त्याच्या हनुवटीवर वाढलेले दाढीचे केस लोखंडी तारेप्रमाणे ताठरल्यासारखे दिसत. त्याने पाठीवर कसली तरी पिशवी टाकली होती. त्यावरून तो काही लहानसहान वस्तूही विकत असावा असे वाटे.

हवेत वसंताचा किंचित उन्मादक सुवास भरून राहिला होता, व सूर्याच्या प्रकाशात एक प्रकारचा प्रेमळ ऊबदारपणा भासत होता. त्या आंधळ्या भिकाऱ्याच्या काठीचा ठोका ऐकू येताच पार्सन्स क्षणभर थांबला, व आंधळ्या जिवांविषयी एकदम वाटणाऱ्या वेड्या अनुकंपेने त्याचे मन किंचित् थरथरले.

आणि आज आपणाला पोटासाठी वणवण हिंडावे लागत नाही याचे त्याला समाधान वाटले. थोड्या वर्षांपूर्वी तो एक साधा कामगार होता. पण आज चारचौघांनी आदराने पाहावे असे यश त्याने मिळविले होते. लोकांना त्याचे केवढे कौतुक वाटे! विमा! काहीतरी केले पाहिजे म्हणून तो या धंद्याकडे वळला आणि मग निरनिराळ्या अडचणींशी झगडून कोणाच्याही मदतीशिवाय त्याने हे यश मिळविले होते. पण या साऱ्या धडपडीत त्याचे मन करपून गेले नव्हते. ते अद्यापि ताजे आणि जीवनाभिमुख होते. तलावाच्या थरथरणाऱ्या पृष्ठभागावरून वसंत-वायूची झुळूक आली किंवा तहानलेल्या जमिनीवर पहिल्या पावसाचे थेंब पडताच हवेत मातीचा आल्हादकारक वास पसरू लागला की, आनंदाने अजूनही त्याचे शरीर पुलकित होई.

तो भिकारी त्याच्याजवळून पुढे गेल्यावर पार्सन्स चालू लागला. तोच तो भिकारी मागे वळला व त्याने पार्सन्सला थांबविले.

"जरा ऐका तर साहेब, एकच मिनिट –"

"मी फार घाईत आहे. काय हवं आहे तुला?" पार्सन्सने विचारले.

"छे, मी भिकारी नाही. भीक मागायला मला लाज वाटेल. ही पहा माझ्याजवळ एक सुंदर छोटी वस्तू आहे." त्याने पिशवीत हात घालून एक वस्तू बाहेर काढली व ती पार्सन्सच्या हातावर ठेवली. "या मी विकतो. किंमत अवघी एक डॉलर आहे. एवढ्या किंमतीत असा सुंदर सिगरेट-लाइटर मिळायचा नाही तुम्हाला!"

पार्सन्स किंचित् अस्वस्थ झाला, व त्याने कोट उगाचच सारखा केल्यासारखा केला. त्याचा करड्या रंगाचा लोकरीचा सूट त्याला फार शोभून दिसत होता व त्याच्या हातातील चांदीच्या मुठीची काठी तर कुणाचेही लक्ष क्षणभर वेधून घेण्याइतकी सुंदर होती. अर्थात् त्या भिकाऱ्याला यांतील काही दिसले नसणार म्हणा...

''पण मी सिगरेट ओढत नाही.'' पार्सन्स म्हणाला.

''पण तुमचे पुष्कळसे मित्र असतील की!'' तो भिकारी अजीजीने म्हणाला, ''आणि त्यांना भेट द्यायला हा लाइटर किती सुबक आहे. शिवाय हा विकत घेतलात तर एका गरीब माणसाला मदतही केल्यासारखं होईल.''

पार्सन्सने खिशातून एक डॉलर काढून त्या भिकाऱ्याच्या हातावर ठेवला. ''बरं, तुला जरा मदत होईल. आण तो लाइटर. देईन मी कुणाला तरी लिफ्टवरील पोराला वगैरे.'' तो म्हणाला. मग तो क्षणभर घोटाळला. 'उगाच नसत्या चौकशा कशाला?' – त्याच्या मनात आले. पण त्याला अगदीच राहवले नाही म्हणून त्याने विचारले, ''तुझे डोळे कशाने गेले रे?''

''दहा वर्षं झाली त्याला.'' तो भिकारी किंचित् अभिमानाने म्हणाला, ''वेस्टबेरी माहीत असेल तुम्हाला. वर्तमानपत्रांत त्यावेळी वाचलंच असेल तुम्ही. त्यात सापडलो मी –''

''हं, वेस्टबेरी होय?'' पार्सन्स किंचित् चमकून पुटपुटला, ''त्या रसायनाच्या कारखान्यातील स्फोट ना? आता लोक ते विसरलेही असतील. पण त्या वेळी सारा देश हादरून गेला होता त्याने.''

''सारे जण विसरून गेले असतील ती हकीकत.'' तो भिकारी काठी आपटीत म्हणाला. ''पण त्यात पोळून निघालेल्यांना त्याचा कसा विसर पडणार? ती तीन नंबरची शेड धाड्दिशी आकाशात उडाल्यावर सगळीकडे जी आग उसळली तिची आठवण झाली की, अद्याप झोप येत नाही मला.''

पार्सन्सने घसा किंचित् साफ केल्यासारखे केले. पण भिकाऱ्याला गेल्या सबंध आठवड्यात आपली ती आठवण कुणाला सांगण्याची संधी मिळाली नव्हती. शिवाय त्याला वाटले, आपली केविलवाणी हकीकत ऐकून पार्सन्सचे मन कदाचित् अधिकच द्रवेल, व कुणास ठाऊक, आपल्याला आणखीही एक डॉलर मिळून जाईल.

''विचार करा,'' तो मोठ्या उत्साहाने सांगू लागला, ''एकशे आठ लोक दोनचार मिनिटांत ठार झाले! दोनशे जण जखमी झाले. त्यांपैकी पन्नास जणांचे डोळे गेले! ते आंधळे झाले!'' त्या भिकाऱ्याने आपला केसाळ हात पुढे केला व पार्सन्सच्या कोटाला किंचित् स्पर्श केला. ''किती जणांच्या आयुष्याची माती झाली! गेल्या युद्धातही असं काही झालं नसेल. युद्धात माझे डोळे गेले असते तर बरं झालं असतं. सरकारने माझी

काही तरी व्यवस्था केली असती. पण इथे एका साध्या कामगाराला कोण विचारते! मालकांनी मात्र खूप पैसा केला. सगळ्या मालाचा विमा उतरवला होता ना?''

''विमा?'' पार्सन्स चमकून म्हणाला, ''सध्या मी विम्याचंच काम करतो.''

''माझे डोळे कशाने गेले म्हणून तुम्ही विचारता?'' तो भिकारी मोठ्याने म्हणाला आणि दुसरे नाणे मिळवण्याच्या आशेने अनेक वेळा घोळवून सांगितलेली हकीकत तो पुन्हा नव्या उमेदीने सांगू लागला.

''त्या तीन नंबरच्या शेडमध्ये मीच सर्वांत मागं राहिलो. आजूबाजूच्या भिंती आता कोसळू लागल्या होत्या. जर मी तिथून निसटून पुढील चौकात आलो असतो तर मला काही तरी आशा होती. पुष्कळजण तसे बचावलेही. मी सरपटत त्या दरवाजाजवळ आलो, तोच मागून कुणीतरी माझे पाय ओढले. 'चल हट मागे. मला जाऊ दे आधी,' – तो मागचा माणूस ओरडला. त्यानं मला मागं ओढलं आणि माझ्या पाठीवर पाय देऊन तो सरळ पुढं सटकला. आणि मी मात्र त्या विषारी धुरात असहायपणे पडून राहिलो. मी त्याला क्षमा करायचा प्रयत्न करतो बिचाऱ्याला. आजूबाजूला भडकलेली आग पाहून तो घाबरून भ्रमिष्ट झाला असेल. पण जगात असे लोक असतात बघा!''

त्याने मुद्दाम आणलेला हुंदका अर्ध्यावरच थांबला व तो क्षणभर थांबला. त्याला वाटले, आता हा गृहस्थ म्हणेल, 'च्च्, काय दुष्ट असतात एकेक माणसं! बरं, हा घे आणखी एक डॉलर!'

पण पार्सन्स तसे काही म्हणाला नाही. थंड वाऱ्याची झुळूक त्याच्यावरून शिरशिरून गेली. थोड्या वेळाने पार्सन्स म्हणाला, ''पण तुझी हकीकत अजून पूर्ण झाली नाही.''

''म्हणजे मी काय खोटं बोलतो की काय?'' तो भिकारी कर्कशपणे म्हणाला.

''नाही, गोष्ट अगदी खरी आहे.'' पार्सन्स शांतपणे म्हणाला, ''पण त्यात माणसांची अदलाबदल केली पाहिजे.''

''अदलाबदल केली पाहिजे? म्हणजे?'' रागाने भिकारी म्हणाला.

''ऐक, त्या तीन नंबरच्या शेडमध्ये मी होतो.'' पार्सन्स म्हणाला, ''मी मागं राहिलो होतो आणि माझ्या पाठीवर पाय देऊन तू पुढं निसटलास मार्कवार्ट, माझ्या दुप्पट होतास तू अंगानं –''

तो भिकारी जागच्या जागी खिळल्यासारखा झाला, व त्याचा घसा एकदम कोरडा पडला.

''कोण? पार्सन्स!'' तो घोगऱ्या आवाजात म्हणाला, ''मला वाटलं होतं की –'' पण नंतर तो फुस्कारल्यासारखे करीत ओरडला, ''त्यावेळी तसं झालं असेल पार्सन्स. पण

शेवटी तरी तू तेथून निसटलास, आणि माझे मात्र डोळे जळून गेले. आज इथं माझ्यापुढं उभा राहून तू मला कुचेष्टेने हसत आहेस. आणि मी – माझ्या डोळ्यांपुढे मात्र सारा अंधार आहे –''

''हं –'' जाण्यासाठी वळत पार्सन्स विचारी मुद्रेने म्हणाला, ''उगीच त्याबद्दल आक्रोश करू नकोस. तू आंधळा आहेस खरा, पण मार्कवार्ट, तुझ्याप्रमाणं मीही आंधळाच आहे.''

# वादळ

क्षितिजावर तीन निरनिराळ्या ठिकाणी काळेकभिन्न अजस्र ढग जमले आहेत. तो मुलगा व म्हातारा आसऱ्यासाठी ज्या खोपटात शिरले आहेत ते तर अंधारामुळे साचलेल्या पाण्याप्रमाणे हिरवट काळसर दिसू लागते. आतील हवा उकडल्याप्रमाणे अगदी कुंद होते, आणि बाहेर अंग आखडून उभी असल्याप्रमाणे दिसणारी झाडे आपापसात एकदम कुजबुजू लागतात. मागे दूर अंतरावर असलेल्या आंबराईत वाऱ्याचा घुमल्यासारखा आवाज होऊ लागला की, तो मुलगा डोळे किंचित् मोठे करतो आणि दबलेल्या आवाजात म्हाताऱ्याला विचारतो : "हे असं काय ऐकू येतंय् गुरगुरल्यासारखं ? आणि हे आभाळ काळं कशानं झाल्यं ?"

म्हातारा प्रथम काही उत्तर देत नाही, पण थोड्या वेळाने दाढी खाजवीत मुलग्याकडे पाहात व तोंडातील तंबाखू एका गालफडातून दुसऱ्या गालफडात ढकलीत डोक्यावरून हात फिरवतो.

"पोरा, घाबरलास की काय ?" तो म्हणतो, "एवढा मोठा झालास आणि नुसतं आभाळ आलं तर घाबरतोस. ऊं !"

पण तो मुलगा आपले सुजल्यासारखे दिसणारे डोळे सारखे फिरवीत अस्वस्थपणे इकडेतिकडे पाहतो. एखादा रागीट मनुष्य आपल्याकडे नजर रोखून पाहात असावा, त्याप्रमाणे सर्वत्र भरून राहिलेला अंधार आपल्याकडे अगदी टवकारून पाहात आहे असे त्याला राहून राहून वाटते. गडगडण्याचा आवाज झाला की, तो म्हाताऱ्याला किंचित् बिलगतो आणि हलक्या आवाजात विचारतो, –

"हे असं कशानं होतंय ? हा आवाज कोण करतंय ?"

त्या खोपट्यात क्षणभर डोळे ठरावे असे काहीच नाही. बाहेरही सर्वत्र अंधाराचे वस्त्र पसरल्यासारखे दिसते. क्षितिजावरील ते तीन ढग मात्र वेगाने चालून येत असल्याप्रमाणे क्षणाक्षणाला जास्त विशाल व भयानक होऊ लागतात, व मग खोपट्याभोवती असलेली झाडेही लवकरच येणाऱ्या पावसाच्या थेंबाला झेलण्यासाठी फांद्या वरवर उचलू लागतात...

परंतु बराच वेळ पाऊस येत नाही. म्हातारा ओठावरून जीभ फिरवतो व गाणे म्हणावयास सुरुवात करतो. पण दोनचार शब्दांतच त्याचा आवाज तडकल्यासारखा होतो, व तो एक दीर्घ निःश्वास सोडून गप्प होतो.

"ऊं:! घाबरायला काय झालंय तुला? मुठीएवढे तीनचार ढग असतील-नसतील!" मान हलवीत अस्वस्थपणे तो पुटपुटतो.

"पण हे सारं काळं कशानं झालं?" मुलगा एकदम विचारतो.

"अरे, आता पाऊस येणार आहे."

पण त्या मुलाला म्हाताऱ्याचे शब्द समजल्यासारखे दिसत नाहीत. त्याच्या कपाळावर एक आठी दिसते. म्हाताऱ्याचा सुरकुत्या पडून खडबडीत झालेला हात तो हळूच आपल्या हातात घेतो व पुन्हा विचारतो, –

"पण काल पाऊस पडत असतानाही चांगलं ऊन होतं. मग आज का ऊन नाही?"

"अरे वेड्या, पण आता सूर्य कुठं आहे आभाळात?"

"सूर्य आभाळात नाही?" मुलगा एकदम उद्गारतो. आता तर आश्चर्य त्याच्या त्या मोठ्या डोळ्यातही मावेनासे होते. "मग गेला तरी कुठं तो?"

आता मात्र म्हातारा किंचित् चिडतो. "पुरे रे! उगीच कशाला पाहिजेत तुला ह्या नसत्या उठाठेवी!" तो रागाने खेकसतो.

पुन्हा गडगडण्याचा आवाज ऐकू येतो. आता तर अंधार एवढा दाटला आहे की, मुलग्याला म्हाताऱ्याचा चेहराही दिसत नाही. गडगडण्याचा आवाज विरून गेल्यावर तो हळूच बाहेर पाहतो.

"आज आकाश हिरवं कशानं झालंय?" तो विचारतो. पण आता पुन्हा एकदा म्हातारा खेकसणार म्हणून घाबरून तो एकदम अंग चोरतो.

म्हातारा थोडा वेळ तंबाखू चघळतो. "आकाश म्हणे हिरवं झालंय!" घसा साफ करीत तो अर्धवट पुटपुटतो, "काय वेडा पोरगा तरी! आकाश कधी हिरवं होतं होय?"

मुलग्याला आता थोडा धीर येतो. "तर! कसं पोपटासारखं हिरवंगार झालंय!" तो मोठ्या उत्साहाने सांगू लागतो, "आणि –"

"गप्प बस रे त्या कोपऱ्यात!" म्हातारा पुन्हा कंटाळून म्हणतो, "आता बघ कसा आकाश फाटल्याप्रमाणे पाऊस येईल!"

त्या मुलग्याचे डोळे पाण्याने भरतात व त्याला समोरील साऱ्या वस्तू एकदम वितळू लागल्याप्रमाणे पुसट दिसू लागतात. एखाद्या वेड्याप्रमाणे भटकणारा वारा रागारागाने झाडांना ढकलीत आहे; थोड्या वेळाने ती उमळून खोपट्यावर पडतील आणि त्याखाली आपण बेडकासारखे चिरडून जाऊ असे त्याला सारखे वाटू लागते व तो अतिशय घाबरतो. "चला, आपण आता घरी जाऊ." म्हाताऱ्याला बिलगत तो पुटपुटतो.

पण म्हातारा काही बोलत नाही. थोडा वेळ खोपट्यात सारे शांत आहे. आतील कुंद हवेत त्याला कोंडल्याप्रमाणे वाटू लागते. इतक्यात पाऊस सुरू होतो. पावसाचे थेंब प्रथम सावकाश एकामागून एक येतात व त्या प्रत्येकाचा टपटप आवाज अगदी स्पष्ट ऐकू येतो.

पण नंतर मात्र चाबकाप्रमाणे सडकून काढणारी एक जोरदार सर येते, व तिच्या आवाजाने खोपट्याचे छप्पर थरथरू लागते.

"आजोबा!" अखेर हाक मारीत तो मुलगा म्हाताऱ्याजवळ सरकतो. "आजोबा, मला घरी जायचं आहे!" पण म्हातारा डुलक्या घेत आहे. मुलगा त्याला हलवून जागे करतो व हुंदके देत पुटपुटतो, "चला, आपण घरी जाऊ आता."

म्हातारा सावकाश डोळे उघडतो, व हुंदके देत उभ्या असलेल्या मुलग्याकडे जड डोळ्यांनी पाहतो. बाहेर गडगडण्याचा कान फोडणारा आवाज होतो आणि त्यामुळे जणू चिडून गेल्याप्रमाणे पावसाचा जोरही विलक्षण वाढतो.

"मी घरी जातो. आई वाट पाहात असेल माझी!" मुलगा पुटपुटतो.

"खुळा की काय तू? असल्या पावसात जाणार? घाबरू नको. मी आहे ना तुझ्याजवळ." त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हातारा त्याला समजावतो. "शिवाय अजून रात्र झाली नाही."

"मग वाजले तरी किती?"

म्हातारा कोटाच्या खिशातून एका मोठ्या डोळ्याप्रमाणे दिसणारे घड्याळ काढतो व नंतर सरदिशी काडी ओढतो. मुलगा एकदम खुदकन् हसतो, व मोठ्या एकाग्रतेने ते बटबटीत घड्याळ, लहानशा पानाप्रमाणे दिसणारी ती काडीची निळसर ज्योत व म्हाताऱ्याच्या तोंडावर पडलेला तिचा पिवळसर प्रकाश यांच्याकडे पाहतो. बाहेर ओतत असलेल्या पावसाचा त्याला क्षणभर विसर पडतो.

"आता कुठं आठ वाजले आहेत!" घड्याळ हलकेच खिशात ठेवीत म्हातारा म्हणतो.

पण लगेच काडीची निळसर ज्योत अंधारात गडप होते; दुसऱ्याच क्षणी एखादी जखम व्हावी त्याप्रमाणे आकाश फाटल्यासारखे होते व ती ज्योत एकदम वर आल्याप्रमाणे त्या फटीत निळसर प्रकाश दिसतो. लालसर पिवळसर रक्त उधळावे त्याप्रमाणे झाडांवर, खोपट्यावर सर्वत्र लालट-पिवळट प्रकाश पसरतो, त्या मागोमाग, खोपट्यावरच बसून कुणीतरी कान फोडण्याइतक्या मोठ्याने ओरडावे त्याप्रमाणे काडकन् गडगडण्याचा आवाज फुटतो. या साऱ्यामुळे त्या मुलाचे डोके एकदम जड होते व तो डोळे मिटतो. म्हाताऱ्याच्या कुशीच्या ऊबदार घरट्यात तो आपले डोके खुपसतो व अंधारातच मुसमुसू लागतो.

आणि खोपटावर वीज व गडगडणे यांची ही खडाजंगी चालू असतानाच मुलाच्या डोळ्यांपुढे चित्रे नाचू लागतात... आपले घर... फुललेल्या शेगडीपाशी बसून वाट पाहात असलेली आई... सुरीने जणू हलकेच कापल्याप्रमाणे तलम वाटणारे फुलाफुलांचे पडदे... या साऱ्या गोष्टी एखाद्या झिरझिरीत वस्त्रातून पाहिल्याप्रमाणे त्याला दिसू लागतात, व या साऱ्यांच्या आठवणीमुळे त्याचा जीव चिमणीएवढा होतो. परंतु एखाद्या काळ्या

मांजराप्रमाणे दिसणारे वादळ समोर सारखे येरझाऱ्या घालीत आहे, व त्यामुळे आपल्याला घरी जायला काही मिळणार नाही असे त्याला वाटू लागते व तो अगदी रडकुंडीस येतो. पण 'खोपट्यातील गडद अंधारात जर आपण अगदी अंग चोरून उभे राहिलो तर आपण एखाद्या कोळशाच्या पोत्याप्रमाणे अथवा मळक्या कपड्यांच्या गाठोड्याप्रमाणे दिसू लागू व मग काही वादळ आपणाकडे पाहणार नाही. त्याची नजर जरा दुसरीकडे वळली की मग काय! आपल्याला हळूच घरी आईकडे सटकता येईल.' असा विचार मनात येताच त्याला थोडा धीर येतो. एकदम आकसल्याप्रमाणे तो अंग चोरून बसतो व सतत कानांवर येणाऱ्या वाऱ्याच्या घुमण्याकडे आपले फारसे लक्ष नाही असे दाखवू लागतो. पण बाहेर वादळ सारखे घोंगावत आहे, झाडांच्या फांद्या एकमेकींवर कर्कशपणे आदळत आहेत, हे त्याला अगदी पुरेपूर माहीत आहे...

एक तास होतो. एकदम मोठमोठ्याने हुंदके द्यावे असे त्या लहानग्या मुलाला एकदोनदा वाटते, पण अंधार व भीती यांमुळे त्याचा घसा अगदी चोंदल्यासारखा झाला आहे. गुडघे अगदी गारठून गेले आहेत व एक पाय मुंग्या आल्यामुळे अगदी निर्जीव झाला आहे. आपले डोके तापल्यासारखे झाले आहे व त्यातून एखाद्या जुन्या घड्याळाप्रमाणे करकर आवाज येत आहे असे त्याला वाटू लागते.

सारे पोपट, चिमण्या, कावळे या वादळात कुठे गेले असतील याचा तो विचार करू लागतो. ते सारे आपल्याप्रमाणेच गारठले असतील काय अशी एक कल्पना क्षणभर त्याच्या मनात डोकावते. तो एकदम अस्वस्थ होतो, व कावऱ्याबावऱ्या नजरेने म्हाताऱ्याकडे पाहू लागतो. त्याच्या हाताला घड्याळाचा स्पर्श होतो व त्याची टकटक ऐकून तो किंचित् शांत होतो.

थोड्या वेळाने सारे शांत होते. पाऊस थांबतो व त्यामुळे सर्वत्र दिसणारा पुसटपणा जाऊन अंधार धुवून निघाल्याप्रमाणे गडद काळा होतो. आकाशाचे गुरगुरणेही आता जरा कमी झाले आहे. तो डोळे उघडतो व इकडेतिकडे पाहतो. खोपट्याच्या दाराला कोळ्याची दोनचार जाळी लोंबकळत आहेत. जमिनीवर अंधाराने झाकोळलेली गाईच्या पावलाएवढी पुष्कळशी डबकी दिसू लागली आहेत. ते अजस्र काळे ढग दूर गेले आहेत, व निळसर उमलू लागलेल्या आकाशात एखाददुसरी चांदणीही बाहेर येऊ लागली आहे.

"तो ऐक कोकीळ!" म्हातारा एकदम उद्गारतो. खरंच! तो आवाज ऐकताच बाकी साऱ्या गोष्टींचा मुलाला विसर पडतो व तो उठून उभा राहतो. पण त्याचे पाय अवघडले आहेत. आपल्या पावलांमध्ये एकदम वारूळ फुटून मुंग्या सैरावैरा पळत आहेत असे काहीतरी त्याला वाटू लागते, व तो एकदम मोठ्याने हसतो. ते दोघे बाहेर येतात.

चालताना त्याला कंटाळा येऊ नये म्हणून म्हातारा एक गोष्ट सांगू लागतो, पण मुलाचे तिकडे लक्ष नाही. तो आता आकाशात एकदम दिसू लागलेल्या चांदण्या मोजीत आहे.

मधूनमधून वीज चमकते खरी, पण गडगडणे मात्र आता ऐकू येत नव्हते. शिवाय चांदण्यांची गर्दी जसजशी वाढू लागली तसतशी त्या काळ्या वादळाविषयीची त्याची भीतीही कमी होऊ लागली आहे.

''आजोबा, मला आता कुठं भीती वाटतेय बघा!'' छाती पुढे काढून तो दोनचारदा म्हणतो.

टेकडीवरून खाली उतरताना दूर अंतरावर घरे दिसू लागतात. जवळपास कुठे तरी नवाचे ठोके पडतात, व त्यांचा थरथरणारा आवाज टेकडीवर पसरून विरून जातो. इतक्यात मुलाचे लक्ष चांदण्यांनी खचलेल्या आभाळाकडे जाते. रुपयाएवढी एक चांदणी वेगाने खाली येते.

''अरे बाप रे! एक चांदणी पडली खाली!'' तो ओरडतो.

त्याला एकदम कशाचा तरी आनंद होतो व त्याचे मन उतू आल्याप्रमाणे होते. तो म्हाताऱ्याचा हात धरतो, व चालत असताना एका डबक्यात उडी मारतो. पाणी पचकन् बाहेर पसरते व तो मोठ्याने हसतो. ''आणि त्या चांदणीमागे जाळाचा पदर तरी केवढा होता!'' तो पुन्हा म्हणतो.

परंतु म्हातारा काही बोलत नाही.

चांदणी पडलेली पाहिली की, मृत्यू जवळ येतो या गोष्टीवर त्या म्हाताऱ्याचा फारसा विश्वास नव्हता, तरी तो भयानक विचार त्याच्या मनात एकदम येतोच आणि तो विचार येताच त्याच्या डोळ्यांपुढे आपले एकाकी आयुष्य, अति जीर्ण वस्त्राप्रमाणे विरून गेलेले आपले शरीर, वाळलेल्या काटक्यांप्रमाणे दिसणारे आपले हातपाय या साऱ्या गोष्टी चटकन् उभ्या राहतात. खोकल्यामुळे दररोज रात्री आपला जीव कसा घाबरा होतो व साऱ्या रात्रीत आपणाला कशी पापणीभरही झोप मिळत नाही याही गोष्टी त्याला आठवतात आणि त्याला क्षणभर वाटते, 'खरंच, आज आपण घरी सुखरूप जाणारही नाही कदाचित्!' आणि हा विचार येताच हृदयात काहीतरी खुपत असल्याप्रमाणे त्याचा चेहरा आकसल्यासारखा होतो. अगदी समोरच्याच कोपऱ्यावर एखाद्या हिंस्र श्वापदाप्रमाणे आपणावर उडी टाकण्यासाठी मृत्यू लपून बसला आहे हा एकच विचार त्याच्या मनात भिरभिरू लागतो व त्या भीतीने त्याचा चेहरा अगदी विकल होतो.

आता पक्ष्यांची किलबिल वाढू लागली आहे. तो आवाज मुलग्याच्या कानावरही येतो, पण आता त्याचे सारे सारे लक्ष त्या चांदणीभोवती घोटाळत आहे. ती चांदणी जमिनीवर येऊन पुढे कुठे गेली असावी, ती खाली येत असता जाळ का झाला या साऱ्या गोष्टी म्हाताऱ्याला विचाराव्या असे त्याला राहून राहून वाटते. पण म्हाताऱ्याचा चेहरा ओढल्यासारखा दिसतो, व त्याचे ओठ सारखे थरथरत आहेत.

''आजोबा, तुम्ही पाहिलीत ती चांदणी?'' भीतभीत मुलगा विचारतो.

पण म्हातारा काही बोलत नाही. घर जसजसे जवळ येऊ लागते, तसतशी मृत्यूच्या भीषण विचाराची छाया घनदाट होते, व त्याच्या जिवाचा थरकाप होऊ लागतो.

परंतु त्या मुलग्याच्या डोळ्यांत मात्र हसू मावत नाही. आणखी एखादी चांदणी पुन्हा खाली येते की काय हे पाहण्यासाठी तो सारखा आकाशाकडे नजर लावतो. पण म्हातारा एकदम गप्प का आहे, व आता पुन्हा एखादे काळे वादळ येणार असल्याप्रमाणे घरी जाण्याची इतकी घाई का करीत आहे हे मात्र त्याला काही केल्या समजत नाही...

# नारिंगी हातरुमाल

तसे पाहिले तर लॉरेल ज्या डॉक्टर फेबरचे व्यक्तिचित्र रंगवत होता ते त्याच्याइतकेच प्रसिद्ध होते. आपल्या समोरील व्यक्ती स्वत:च्या विशिष्ट क्षेत्रात आपल्याइतकीच विख्यात आहे याची जाणीव त्या दोघांनाही होतीच, आणि अशा जाणिवेमुळे निर्माण होणारी अस्वस्थता त्यांच्या संभाषणात मधून मधून स्पष्ट दिसत होती. वास्तविक त्या दोघांची फारशी ओळख नव्हती. फार तर एखाददुसऱ्या समारंभाच्या वेळी औपचारिक रीत्या भेट झाली असेल तेवढीच. पण स्टुडिओसारख्या जागीसुद्धा आपण शिष्टाचार हा पाळलाच पाहिजे एवढ्याचकरिता मधून मधून उगाचच हसत संभाषण चालू ठेवण्याचा ते प्रयत्न करत होते.

तसे संभाषण चालू ठेवण्यात लॉरेलचा आणखीही एक हेतू असे. अशा संभाषणाने नवख्या माणसाचा संकोच बराच कमी होत असे. प्रतिमेसाठी आपल्यापुढे बसलेल्या व्यक्तीने बुजल्यासारखे होऊन सतत चुळबुळत राहावे याचा एखाद्या चित्रकाराला जेवढा राग येतो तेवढा दुसऱ्या कशानेही येत नसेल. निदान लॉरेलच्या बाबतीत तरी तसे होते. सुदैवाने तो बोलेही अशा कौशल्याने की, थोड्याच वेळात अगदी नवखा माणूसही फार दिवसांची ओळख असल्याप्रमाणे त्याच्याशी हितगूज करू लागे.

बोलण्यात डॉक्टरही काही कमी कुशल नव्हते. खरे म्हणजे औषधे देण्याबरोबरच बोलणेही हा प्रत्येक डॉक्टराचा धंदा असतोच. पण डॉक्टरांच्या बाबतीत बोलणे ही एक अत्यंत आकर्षक कला होती. आपण ज्या विषयावर बोलत आहो, त्या विषयांचे सखोल ज्ञान असले की, माणसाच्या बोलण्यात जो सहज आत्मविश्वास येतो तो त्यांच्या दर वाक्यात दिसून येई. गेल्या पाचसात दिवसात या उमद्या व कुशल चित्रकाराविषयी त्यांचे फारच चांगले मत झाले होते, व त्यामुळे आपल्या दवाखान्यात त्या अपंग आणि विकल रोग्यांच्या सान्निध्याने आंबून गेलेले त्यांचे मन स्टुडिओमध्ये येताच एकदम प्रफुल्लित झाल्यासारखे होई. पण येथेही त्यांच्या दृष्टीत थोडीशी धंदेवाईक चमक होतीच. कलावंत एखादी कलाकृती निर्माण करतो त्यावेळी त्याच्या मनात भावनांच्या कोणत्या गूढ घडामोडी चालतात याविषयी त्यांना नेहमीच कुतूहल वाटे. त्यामुळे लॉरेलच्या बारीकसारीक हालचालीकडेही त्यांचे लक्ष असे, त्याचे साधे शब्दही ते मोठ्या

काळजीपूर्वक लक्षात ठेवत, एवढेच नव्हे, तर पुष्कळदा त्याची मानसशास्त्रीय चिकित्साही करण्याचा ते स्वतःशी प्रयत्न करत.

थोडक्यात म्हणजे लॉरेल आणि डॉक्टर या दोघांचाही वेळ मोठ्या आनंदात चालला होता. जवळजवळ पूर्ण होत आलेल्या आपल्या चित्राकडे पाहात एक दिवस डॉक्टर म्हणाले, "हे चित्र पूर्ण झालं म्हणजे माझं मलाच ओळखेल की नाही कुणास ठाऊक!"

लॉरेलने क्षणभर त्यांच्याकडे पाहिले व तो किंचित् हसला. "म्हणजे?" भुवया किंचित् उंचावीत त्याने विचारले.

"छे छे, म्हणजे मला तुमच्याविषयी काही म्हणावयाचं नाही." डॉक्टर घाईघाईने म्हणाले, "मला एवढंच म्हणावयाचं आहे की, प्रत्येकाच्या स्वतःविषयी काही कल्पना असतात. पण बाकीच्या जगाला मात्र आपण अगदी निराळे दिसत असतो."

लॉरेल काही बोलला नाही. त्याने चित्रावर अगदी हलक्या हाताने एक ब्रश फिरवला व किंचित् मागे सरकून त्याने त्या चित्राकडे पाहिले. दर ब्रशाबरोबर चित्रावर त्याला हवी असलेली झाक येत चालली होती. त्याने डॉक्टरांकडे एक नजर टाकली व तो किंचित् त्यांच्याकडे सरकला.

"चित्रात जे तुम्हाला दिसतं ते काही आरशात दिसतं त्याप्रमाणं निर्जीव प्रतिबिंब नव्हे." तो म्हणाला, "किंवा लोकांना तुम्ही कसे दिसता याचंही ते प्रतिबिंब नव्हे. तसं पाहिलं तर लोकांना खऱ्या अर्थानं काही दिसतच नाही मुळी. ते नुसते पाहतात, त्यांना दिसत नाही. उलट एखादी वस्तू सत्यार्थानं संपूर्णपणं पाहणं हे तर कलावंताचं वैशिष्ट्य आहे."

"तसं असेल बुवा," डॉक्टर मिस्किलपणे म्हणाले, "पण हल्ली ती नवीन कला, आधुनिक कला म्हणून ज्या काही रंगीत भानगडी मांडण्यात येतात त्यावरून चित्रकाराचे डोळे शाबूत आहेत असं काही म्हणवत नाही आपल्याला."

"खरं म्हणजे जसं दिसतं तसं कागदावर उतरवायला चित्रकार म्हणजे दोन पायांचा कोडॅक कॅमेरा नव्हे." लॉरेल म्हणाला. "त्याला एखाद्या वस्तूचं आकर्षण वाटतं ते एका विशिष्ट कारणामुळं, एका विशिष्ट तऱ्हेनं. आणि ही विशिष्ट तऱ्हा दाखवण्यासाठी तो कलानिर्मिती करण्यास उद्युक्त होतो. अर्थात् तसं करावयास समोर आहे तरी काय याची त्यास दखल तरी घेतली पाहिजे, नाही का? मग त्यातील निरर्थक गोष्टी तो सोडून देतो. काहींवर विशेष भर देतो. थोडक्यात म्हणजे वरील काथ्या काढत काढत खोबऱ्याकडे जावं, त्याप्रमाणे अनेक आवरणांखाली दडून बसलेलं प्रत्येक वस्तूचं जे एक चिरंतन सत्य स्वरूप असतं, ते स्पष्ट करण्याची त्याची सारखी धडपड चालू असते."

"अस्सं का? छान," डॉक्टर म्हणाले, "पण काय हो, हा सारा व्यापार करतं तरी कोण? ती कोणती तरी बुद्धिप्रधान शक्ती आहे, की जिची मारे तुम्ही चौपदरी स्तुती करता ती प्रतिभा आहे या साऱ्यामागं?"

"ते मात्र मला माहीत नाही," मान हलवीत लॊरेल म्हणाला, "आणि खरं सांगू, या असल्या गोष्टी मला अगदी शास्त्रीय काटेकोर शब्दांत मांडणं जमणारही नाही. पण मी तुम्हाला मानसशास्त्रातील एक दृष्टांत देतो. नुसता दृष्टांतच बरं का, कारण मला त्या शास्त्राची फारशी माहिती नाही. समजा, आपल्याला एक विचार स्पष्ट करावयाचा आहे. पण आपल्या मनात तो जसा प्रकट होतो, तसाच काही तो आपणाला उच्चारणं शक्य नाही. कारण आपल्या मनाच्या उंबरठ्यावर एक रखवालदार जेठा मारून बसला आहे. तो काही थोड्या कल्पनांना प्रवेश देतो, आणि बाकीच्यांना साफ धक्के मारून हाकलून लावतो. मला वाटतं, कलानिर्मितीच्या वेळी कलावंतांच्या मनातही असंच काहीतरी घडत असावं."

"असेल कदाचित्." डॉक्टर गंभीरपणे म्हणाले, "हे थोडंसं स्वप्नासारखं आहे. एका व्यक्तीचं स्वप्न दुसऱ्याला चमत्कारिक, अर्थहीन वाटण्याचा संभव आहे. पण थोडा विचार केला तर त्यातही सुसंबद्धता आढळणं अशक्य नाही. खरं म्हणजे सृष्टीच्या उत्पत्तीपासून स्वप्नांनी माणसाचं लक्ष वेधून घेतलं आहे. पण गेल्या चाळीस पन्नास वर्षांतच त्यांचा शास्त्रोक्त अभ्यास सुरू झाला आहे."

"अरे बापरे!" घाबरल्याप्रमाणे हात वर करून लॊरेल उद्गारला, "म्हणजे स्वप्नासारख्या नाजूक सुंदर गोष्टीवरही तुम्हां बुद्धिवाद्यांची धाड आली म्हणा ना! उद्या तुम्ही काव्य आणि कला यांनाही ऑपरेशन टेबलावर घ्यायला कमी करावयाचे नाही. आग लावा त्या मनोविश्लेषण शास्त्राला! मनाची चिरफाड करायला व्हिएन्ना, झुरीच या ठिकाणांहून जी नवीन नवीन साधनं येतात ती पाहून तर माझी छातीच धडधडते. त्या उलट ग्रीक लोकांकडे पहा. त्यांनी स्वप्नांची एक देवता निर्माण केली. ही कल्पनाच किती आकर्षक आहे, नाही? आपली सुंदर ध्येयं, काव्यं, स्वप्नं यांची शास्त्रीय तपासणी करण्याऐवजी त्यांनी त्या स्वप्नदेवतेची पूजा करावी असं नाही का तुम्हाला वाटत? आजच्या जगातील सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ होण्यापेक्षा, या देवतेच्या मंदिराकडे जाणाऱ्या घोळक्यापैकी एकजण होणं मी जास्त पसंत करीन. म्हणे मनोविश्लेषण शास्त्र!"

लॊरेलच्या या शब्दांनी डॉक्टर अगदी मनमोकळेपणाने हसले. "बरं बाबा, राहू देत तुझी स्वप्नं तुझ्या स्मृतीच्या मखमली पेटीत. झालं?"

पण लॊरेलचे तिकडे लक्ष नव्हते. तो पुढे म्हणाला, "डॉक्टर, माझ्या आयुष्यातील अत्यंत सुखाचे आणि दु:खाचेही पण काही क्षण मला स्वप्नांतच मिळाले याची तुम्हाला कल्पना नसेल. आता कालच पहा, मला एक अत्यंत विलक्षण स्वप्न पडलं. त्यामुळं माझं मन पार दडपून गेलं होतं. पण सकाळी मी ज्यावेळी जागा झालो, व ज्यावेळी आपण

जे अनुभवलं ते एक सारं क्षुल्लक स्वप्न होतं हे माझ्या ध्यानात आलं, त्यावेळी मला अगदी पिंजलेल्या कापसासारखं हल्कं हल्कं वाटू लागलं. तुम्हालाही हा अनुभव आलाच असेल पुष्कळदा. पण काय हो डॉक्टर, आपल्याला अशी भयानक स्वप्न पडतात ती आपल्या मनातच काहीतरी विकृती असते म्हणून तर नाही ना?''

''छे छे, मुळीच नाही,'' डॉक्टर म्हणाले, ''तुमचा जर मनोविश्लेषण शास्त्रावर एवढा लालभडक राग नसता तर मी त्याची थोडी चर्चाही केली असती. अगदी प्रत्येक मनुष्याला आपण एक रक्तपिपासू खुनी आहोत असं स्वप्न केव्हा तरी पडतंच, आणि उठल्यावर आपण तसं कोणतंही अघोरी कृत्य केलं नाही हे समजून हायसंही वाटतं –''

''तुम्ही तेच उदाहरण का घेतलंत कुणास ठाऊक?'' लॉरेल चमकून म्हणाला, ''कारण मला जे स्वप्न पडलं तेही अगदी असंच होतं.'' त्याने रंगफळी बाजूला ठेवली, आणि तो डॉक्टरांच्या बाजूला खुर्चीवर बसला. ''मी काल एका अगदी अनोळखी निष्पाप व्यक्तीचा खून केला – स्वप्नात. तुम्हाला माझ्या स्वप्नात काही भयंकर वाटणार नाही कदाचित्. पण माझं मन मात्र त्यामुळं ठिकरल्याप्रमाणं झालं आहे. असल्या प्रकाराविषयी मला स्वभावतःच मोठी भीती वाटते. आतापर्यंत नुसत्या कल्पनेतही अमक्याची हत्या करावी असं मला कधीच वाटलं नाही. आतापर्यंतच्या आयुष्यात मी आपल्या मनावर पूर्ण ताबा ठेवला आहे खरा. पण असं काहीतरी भयंकर माझ्या हातून घडलं की, माझी मलाच भीती वाटू लागते की, आपल्यात खोल कुठं तरी गुन्हेगाराची वृत्ती आहे आणि तिच्यामुळं एक दिवस आपल्या साऱ्या आयुष्याची धूळधाण उडून जाणार आहे –''

''तुमचं लग्न झालं आहे?'' डॉक्टरांनी त्यास मध्येच विचारले.

''नाही. शिवाय स्त्री आणि मद्य यांच्याशी माझा फारसा निकट संबंधही कधी आला नाही. एवढंच नव्हे, तर ही सुखं आपल्याला फारशी मानवणारी नाहीत अशीही माझी समजूत झाली आहे. त्यामुळं माझ्या आयुष्यात एक प्रकारचा एकाकीपणा आला आहे हे मला मान्य आहे.''

''आणि त्या साऱ्या भावना तुमच्या चित्रकलेत प्रगट होतातच! खरं म्हणजे सारी उच्च कला म्हणजे आपल्या काही मूल भावनांचं रूपांतर तरी असतं किंवा उदात्तीकरण तरी असतं. बरं, पुढं काय झालं?''

''या स्वप्नामुळं माझं मन इतकं अस्वस्थ झालं याचं आणखीही एक कारण असू शकेल.'' लॉरेल पुढे सांगू लागला. ''या स्वप्नात माझ्या दैनंदिन आयुष्याचं पूर्ण प्रतिबिंब पडलं होतं. नाहीतर पुष्कळदा स्वप्नात लोकविलक्षण गोष्टी घडतात, आणि आपण त्या पुन्हा लवकरच विसरून जातो. आता पहा, हा नुसता माझा स्टुडिओ आहे. पण मी राहतो दुसऱ्या ठिकाणी. मी ज्यावेळी काम करत असतो त्याच वेळी इथं येतो. मी एकटाच असल्यामुळं अगदी स्वतंत्र आहे. केव्हाही यावं, केव्हाही जावं. पुष्कळदा क्लबात जेवण

घेऊन मी उगाचच स्टुडिओमध्ये येतो. काही कामाकरिता नव्हे, तर निव्वळ वेळ घालवण्यासाठी, ही खुर्ची इकडून तिकडे ठेव, हा पडदा सारखा कर असं करण्यासाठी. यातही एक प्रकारची गंमत असते. शिवाय माझी आणखी एक चमत्कारिक खोड आहे. एखादी अडचण मन अस्वस्थ करू लागली, की मी अशा कामात विरंगुळा शोधण्याचा प्रयत्न करतो, आणि न कळत मला पुष्कळदा त्या अडचणीतून मार्ग सापडतो, या साऱ्या गोष्टी स्वप्नात होत्याच. पण आणखीही काहीतरी विशेष होतं. स्वप्नात मला हिरवा गडद पोशाख घातलेली एक अत्यंत सुंदर स्त्री दिसली –"

"अस्सं? तुम्ही माझा जो पोर्ट्रेट रंगवत आहात त्यामागील पडदाही गडद हिरव्या रंगाचाच आहे, नाही?" डॉक्टर हेतुपूर्णपणे म्हणाले.

"अरे, खरंच की! माझ्या ध्यानात ते पूर्वीच कसं आलं नाही कुणास ठाऊक!" लॉरेल उद्गारला, "म्हणजे माझ्या या स्वप्नांचा तुम्ही असा शास्त्रीय बोजवारा उडवणार की काय?"

"होय तर", डॉक्टर समाधानाने म्हणाले, "मला नेमकं तेच करावयाचं आहे. बरं, रंगाच्या बाबतीत तुला आणखी काही विशेष आढळलं?"

"तर! माझ्या स्वप्नांचं तेच तर विशेष आहे. त्या तरुणीच्या हातात विलक्षण आकर्षक रंगाचा एक नारिंगी हातरुमाल होता. तिच्या गडद हिरव्या पोषाखावर तो नारिंगी रंग पाहिला की, डोळे किंचित् भाजल्यासारखे होत. माझी नजर तर सारा वेळ त्या हातरुमालावरच खिळून राहिली होती – त्या सुंदर हातरुमालावर आणि तो ज्या हातात होता त्या गोऱ्यापान हातावर."

"आता असं पहा", डॉक्टर त्यास थांबवत म्हणाले, "मी जरा जुन्या तऱ्हेचा माणूस आहे. अद्यापही मी लांबलचक सोन्याची साखळी असलेले घड्याळ वापरतो. गेले तीनचार दिवस ती तुझ्या मनाप्रमाणे रंगवण्याचा तू सतत प्रयत्न करत आहेस. पण ती तुला काही केल्या जमेना. त्यामुळं चिडून ती सर्वात शेवटी रंगवण्याचं तू ठरवलंस, नाही का? सोनं पिवळं असतं, आणि हिरव्या पार्श्वभूमीवरील पिवळ्या रंगानं तुझं मन त्रस्त केलं होतं, त्याचेच सारे पडसाद तुझ्या स्वप्नात उमटले, झालं."

"पण डॉक्टर", लॉरेल किंचित् उतावीळपणे म्हणाला, "तो रंग पिवळा नव्हता. अत्यंत लखलखीत नारिंगी होता. मी चित्रकार ना, पण तसला रंग मी अद्याप पाहिला देखील नाही. आणि त्या हिरव्या रंगातही असं काही तेज होतं म्हणता!"

"अरे, स्वप्नातील रंग, घटना प्रत्यक्षापेक्षा नेहमीच जास्त उत्कट असतात!"

लॉरेल उठून उभा राहिला, व नुकतीच पेटवलेली सिगरेट अस्वस्थपणं त्यानं रक्षापात्रात चुरगळली. मनात होणाऱ्या आठवणींच्या गर्दीमुळं त्याचा चेहरा त्रस्त झाल्यासारखा स्पष्ट दिसत होता.

''त्या रात्री मी स्टुडिओकडे गेल्यासारखं झालं.'' तो सांगू लागला. ''दार उघडण्यासाठी मी किल्ली बाहेर काढली तोच माझ्या ध्यानात आलं की, आधीच कुणीतरी कुलूप काढलं आहे, इतकंच नव्हे, तर दारही किंचित् उघडंच आहे. जाताना मोलकरणीने दरवाजा उघडा ठेवला की, आपणच कुलूप घालण्यास विसरलो हेच मला समजेना. स्टुडिओमध्ये किंचित् अंधार होता. पण आत पाऊल ठेवताच इथं कोणीतरी आहे असा मला एकदम भास झाला. आवाजबिवाज काही नाही. पण मला तसं वाटलं खरं. मी सावकाश बटनापाशी जाऊन दिवा लावला. आणि मखमली पेटी उघडताच पाचूची अंगठी दिसावी त्याप्रमाणं त्या प्रकाशात ती मला दिसली.

''सध्या मी ज्या खुर्चीवर बसलो आहे त्याच खुर्चीवर ती बसली होती. ती सरळ माझ्याकडेच पाहात होती, पण तिच्या चेहऱ्यावर संकोच बिलकुल नव्हता. चिमण्यांच्या घरट्याएवढ्या पुष्कळशा हॅट्स् अलीकडे दिसतात ना, तसली एक तिनं घातली होती. तिचा चेहरा अत्यंत रेखीव असून डोळे किंचित मोठे असून काळेभोर होते. 'काय हवं तुम्हाला ?' मी तिला विचारलं.

''ती किंचित् हसली व म्हणाली, 'खरंच, मला प्रथम तुमची माफी मागितली पाहिजे. खरं म्हणजे तुमच्या आधी एक मिनिट मी इथं आले. तुम्हाला निव्वळ भेटण्यासाठी मी ऑस्ट्रेलियासारखा दूर देशाहून इथं आले हे पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल. मेलबर्नमध्ये मी तुमची काही चित्रे पाहिली आणि तेव्हापासून एकच विचारानं माझं मन भारून गेलं. मी ठरवलं, बस्स, आयुष्यात एकदा तरी या चित्रकारास भेटलंच पाहिजे –' ती पुन्हा किंचित् हसली 'आणि आज मी इथं हजर आहे. या स्टुडिओत कुणी नाही म्हणून मी परत जाणार होते, तोच माझ्या ध्यानात आलं की, दरवाजा उघडाच आहे. मी तो हळूच उघडला व आत आले. –'

''लगेच तिला पाहिल्यावर बावरून गेलेलं माझं मन ताळ्यावर आलं. काही झालं तरी मला भेटण्यासाठी ती ऑस्ट्रेलियाहून आली होती, त्यामुळं थोडं अगत्य दाखविणं मला भागच होतं. मी तिचं नाव विचारलं, पण तिनं त्या प्रश्नाचं उत्तर देण्याची टाळाटाळ केली. मी पुन्हा विचारताच ती मिस्किलपणं हसली, व आपल्या अत्यंत रेखीव भुवया उंचावीत म्हणाली, 'माझ्या नावाविषयी आपण लहान मुलासारखं भांडत बसावं इतकं का ते महत्त्वाचं आहे ?'

''डॉक्टर, तुम्ही आताच म्हणालात ना की, सत्यजीवनापेक्षा स्वप्नजीवन नेहमीच जास्त उत्कट असतं म्हणून ? ते खरं असावं, कारण त्या तरुणीच्या मस्त सौंदर्यानं माझ्या मनावर इतकी मोहिनी टाकली की, अद्यापही तिची आकृती माझ्या डोळ्यांपुढं स्पष्ट दिसते. मी तुम्हाला सांगितलं की, एखाद्या स्त्रीकरिता मी अद्याप कधी वेडावून गेलो नाही. पण ही स्त्री आणि तिचं सौंदर्य यांची जादू वेगळीच होती, आणि तिला पाहता क्षणीच

माझं मन अगदी भारून गेलं. आयुष्यात ज्या नैतिक बंधनामुळं एक प्रकारचा संयम राहतो, त्या बंधनाचाही मला हळूहळू विसर पडू लागला.''

''मी तिला माझा स्टुडिओ दाखवला व माझ्या काही चित्रांची तिनं अगदी मुक्त कंठानं स्तुती केली. पण या साऱ्या स्तुतीमागं आणखी कसली तरी उत्कट लालसा आहे, तिला आपल्याविषयी वासना निर्माण झाली आहे असं मला वाटू लागलं. त्यानंतर आम्ही या कोचावर बसलो.''

''या तिच्या उन्मादक सान्निध्यामुळं तर अनिवार लालसेमुळं माझं सारं शरीर तप्त झाल्यासारखं झालं. तरीसुद्धा या भावनेच्या कल्लोळातदेखील माझी मला शरम वाटत होती. ती किती निष्पाप व एखाद्या जाईच्या फुलासारखी निरागस दिसत होती. पण लगेच माझं मन उत्तर देई, 'अरे वेड्या, त्या नुसत्या बाह्य स्वरूपानं फसू नको. तिच्या मनातही असा हेतू नसता तर ती अशा ठिकाणी अशा वेळी भेटायला आली तरी असती का? तिच्या काळ्याभोर डोळ्यांत ती मदीर छटा तरी आढळली असती का?'

''माझ्या मनात चाललेली ही खळबळ तिच्या ध्यानात आली असावी. ती चटकन् उठली व या तुमच्या चित्रासमोर येऊन उभी राहिली व उगाचच तिनं काही शब्द उच्चारले.

''स्वत:चा धिक्कार करत मीही उठलो व तिच्या बाजूस जाऊन उभा राहिलो. तो ती लगेच बाजूला सरकली. तिनं हा हिरवा पडदा किंचित् बाजूला केला. 'या पडद्यामागं काय आहे पाहू का मी जरा?' किंचित् हसून तिनं विचारलं.

''हो तर अवश्य!'' मी म्हटलं. 'तिथं फार तर चारसहा जुनी चित्रं असतील. त्यांत काय आवडणार तुम्हाला?'

'पण मला भेट द्यावयाला एखादं चित्र तिथे मिळणार नाही म्हणून कशावरून?' ती म्हणाली, 'मी इथून जाताना एकादी भेट घेतल्याशिवाय जाईन म्हणता की काय? ऊंहूं!'

''ती पडद्याआड गेल्यावर मला क्षणभर बरं वाटलं. माझ्या मनावरील नेहमीचा ताबा मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करत मी बाहेर उभा होतो. एकदा ही स्टुडिओमधून बाहेर जाईल तर आतापर्यंत आपण उभारलेलं आयुष्य तरी स्थिर राहील असं मला वाटू लागलं. केवढ्या विचित्र भावनांचा कल्लोळ उडाला होता माझ्या मनात! ज्या दुष्ट पण प्रबळ भावनांवर आपण विजय मिळवला अशी आतापर्यंत मला घमेंड होती, त्या साऱ्या एकदम उन्मत्तपणं नाचू लागल्या होत्या...

आणि त्याच वेळी एक मजेदार गोष्ट घडली. त्यामुळं माझ्या मनातील या तुमुल द्वंद्वाचा मला क्षणभर विसर पडला. या तुमच्या चित्राकडं पाहता पाहता त्या साखळीला कसला रंग द्यावा हा प्रश्न चुटकीसारखा सुटला...''

डॉक्टरांनी त्यास या ठिकाणी मध्येच थांबवले. "या ठिकाणी आता पुढं काय झालं सांगू का मी ?" ते म्हणाले, "ती तरुणी जेव्हा पडद्याबाहेर आली त्या वेळी तिच्या हातात तो नारिंगी हातरुमाल नव्हता. होय की नाही ?"

"होय." लौरेल उद्गारला. "तेव्हापासून तो हातरुमाल तिच्या हातात दिसला नाही हे मात्र खरं. पण तुम्हाला कसं समजलं हे ??"

"मनोविश्लेषणाविषयी ज्याला थोडीशी माहिती आहे, त्याला याचं काहीच वाटणार नाही," डॉक्टर हसून म्हणाले, "थोडक्यात म्हणजे त्या साखळीच्या प्रश्नानं तुझं मन त्रस्त झालं होतं म्हणून तुला तो हातरुमाल दिसला. परंतु तो प्रश्न सुटताच तुझ्या मनावरील ताण कमी झाला, त्यामुळं त्या हातरुमालाचीही काही मानसिक जरुरी उरली नाही; म्हणून तो स्वप्नातून नाहीसा झाला. –"

"पण पुढं ऐका तर सारं." लौरेल म्हणाला, "आता उशीर झाला आहे. हे सारं स्वप्न कुणाला तरी सांगितलं म्हणजे मला बरं वाटेल.

"त्यानंतर मात्र मला एक प्रकारचा उत्साह वाटू लागला. तिच्या येण्यामुळं ज्या अर्थी हा प्रश्न सुटला त्या अर्थी तिच्या येण्यात काहीतरी योगायोग आहे असं माझं मत झालं. तेव्हा ही भेट निव्वळ औपचारिकच ठरू नये असं मला फार वाटू लागलं. ती पडद्यामागून बाहेर आली त्या वेळी तर तिचं सौंदर्य मला एवढं उन्मादकारक वाटलं की, तीव्र लालसेखेरीज साऱ्या भावना माझ्या मनातून पार नष्ट झाल्या, व सारं शरीर विजेनं भारल्याप्रमाणं कंपित झालं. मी माझे हात एकदम तिच्याभोवती टाकले. तिनं प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण मी तिला जवळ घेतलं, आणि जणू तिचे नाजूक ओठ चिरडून जातील अशा आवेगानं मी तिची चुंबनं घेऊ लागलो. आता मला या साऱ्या प्रकाराची शरम वाटते. आपल्या हातून असा पाशवीपणा स्वप्नातदेखील कधी होईल असं मला वाटलं नव्हतं," लौरेलने एकदम आपला चेहरा हातांनी झाकला, पण त्याच्या कानशिलाजवळच्या शिरा फुगलेल्या स्पष्ट दिसत होत्या.

"अखेर बऱ्याच धडपडीनंतर तिनं आपला एक हात कसाबसा सोडवून घेतला. आणि त्यानं माझ्या चेहऱ्यावर काडकन् प्रहार केला. मला वेदना फारशा झाल्या नाहीत. पण थोडंसं बावरल्यासारखं मात्र मला वाटलं. तेवढ्यात तिनं झटकन आपली सुटका करून घेतली. परंतु मागं सरकताना तिचा पाय कशात तरी अडकला आणि तिचा तोल गेला.

"या समोरच्या कपाटाला ब्राँझचा अणकुचीदार कोपरा आहे त्यावर तिचं डोकं आदळलं. तिची ती इवलाली हॅट काय संरक्षण देणार कपाळ! तिनं कपाटाचा आधार घेण्याचा प्रयत्न केला, पण दुसऱ्या क्षणी ती खाली कोसळली व निश्चल झाली."

"होय, स्वप्नात माणसं अगदी चुटकीसरशी मरतात." डॉक्टर मध्येच म्हणाले.

"पुढील काही क्षण मला काळरात्रीसारखे भीषण वाटले. पण नंतर मात्र माझ्या मनावर आत्यंतिक भीतीचा पगडा बसला, व सारं शरीर बधिरल्यासारखं झालं. या आपल्या कृत्याचा जाब आपण कसा देणार? त्या तरुणीचं मला नावही माहीत नाही. ऑस्ट्रेलियासारख्या दूर देशाहून ती मला भेटण्यासाठी आली, कोणी नसता तिनं आपली एकांतात भेट घेतली, व तोल जाऊन ती कपाटावर आदळली, या खऱ्या गोष्टी जरी आपण सांगितल्या तरी त्यावर कुणाचा तरी विश्वास बसेल का? आपल्याला पोलीस पकडतील, आणि आपल्या कपाळाची फाशीची शिक्षा काही चुकायची नाही. या सुंदर तरुणीला मीच भुलवून माझ्या स्टुडिओमध्ये आणलं, आणि तिचा अमानुष खून केला असंच सारं जग ओरडून म्हणेल, आणि आतापर्यंत कलेवरील निःस्वार्थ प्रेमानं जे आपण थोडंबहुत यश मिळवलं त्याचा धागा न् धागा अगदी मलीन होऊन जाईल.

"हे देखील मी एखादे वेळी सहन केलं असतं. पण माझ्या स्वतःच्या मनाची बोचणी मी कशी सहन करणार? किती निष्पापपणं, केवढ्या विश्वासानं ती आपल्याला भेटायला आली होती! आणि तिच्या बोलण्यात जो सहज उत्साह होता तो तरी किती मोहक! आणि या साऱ्याचं आपण असं पाशवी स्वागत केलं!

"मी त्या ठिकाणी किती वेळ बसून होतो कुणास ठाऊक! पण या वाढत जाणाऱ्या भयामुळं मी एकदम जागा झाल्यासारखा झालो. माझं शरीर एखाद्या यंत्राप्रमाणं एकदम काम करू लागलं. आता माझ्या डोळ्यांपुढं एकच हेतू होता – त्या प्रेताची विल्हेवाट लावणं. मी दरवाजाजवळ गेलो व हळूच इकडेतिकडे पाहिलं. बाहेर झिमझिम पाऊस पडत होता व रस्त्यावर अगदी दूरवरही चिटपाखरूही दिसत नव्हतं. मी आत जाऊन तिच्या नाजूक देहाभोवती चादर गुंडाळली व तिला पाठीवर टाकून बाहेर सटकलो.

"नंतर थोडा वेळ गेला. मी नदीजवळ आलो होतो. धुकं अधिकच दाट झालं. रस्ताही अद्याप निर्जनच होता. मी एकदम पुलाच्या कठड्याकडे धावत गेलो व ते प्रेत उचलून हळूच खालच्या फेसाळणाऱ्या पाण्यात सोडून दिलं. आता भरतीची वेळ असल्याकारणानं नदीत समुद्राचंही पाणी भरलं होतं. पाण्यात तिचा गौरवर्ण चेहरा क्षणभर दिसला न दिसला, पाण्याचा पृष्ठभाग फाटल्यासारखा झाला व पुन्हा नदीचा प्रवाह फेसाळू लागला.

"स्टुडिओमध्ये कुणी येऊन गेल्यासारखं दिसलं नाही. मी दरवाजा बंद केला. तिथून मी वेड्यासारखा धावतच घरी आलेला मला आठवते. मी सकाळी जागा झालो त्यावेळी मी पूर्णपणं खचून गेलो होतो, इतकं हे भयंकर स्वप्न माझ्या मनावर कोरलं गेलं होतं. आपण एक कामपिपासू खुनी आहोत, आपले हात रक्तानं बरबटले आहेत ही जाणीव काही केल्या जाईना.

"आणि नंतर ज्यावेळी मी उघड्या खिडकीमधून आत ओतल्याप्रमाणं येणारा सूर्यप्रकाश, त्यात स्पष्ट दिसणाऱ्या परिचित वस्तू पाहिल्या, त्यावेळी माझ्या ध्यानात

आलं की, हे सारं एक स्वप्न आहे. त्यावेळी मला इतकं हायसं वाटलं, की तुम्हाला त्याची कल्पनाही येणार नाही, डॉक्टर. आजुबाजूच्या माझ्या मर्यादित जगाविषयी मला एक निराळीच आपुलकी वाटू लागली. लोकांनी आपणाकडे बोट दाखवून थुंकावं असं आपण काही केलं नाही, या निव्वळ कल्पनेनंच मला मोठा आनंद झाला व मी ऐन तारुण्यात ऐकलेलं एक प्रेमगीत गुणगुणू लागलो. ज्यावेळी मी चहा घेण्यासाठी खाली आलो त्यावेळी माझी मोलकरीण हसून म्हणालीदेखील, 'आज काहीतरी विशेष झालेलं दिसतंय.' मी तिला सांगितलं, 'होय, विशेष झालं आहेच तर!'

"मी एका टॅक्सीमधून स्टुडिओकडे आलो. येथील साऱ्या वस्तू जिथल्या तिथं आहेत हे पाहून माझ्या मनात तिळभरही शंका उरली नाही. हे मी सारं तुम्हाला विस्तारानं सांगितलं याचं कारण ते जरी स्वप्न होतं तरी त्याचं माझ्या मनावर एक प्रकारचं अप्रत्यक्ष दडपण पडल्यासारखं होत होतं."

"तू हे सारं सांगितलंस हेच चांगलं केलंस," डॉक्टर म्हणाले, "तू जर हे मनातच दडपून ठेवण्याचा प्रयत्न केला असतास तर त्या स्वप्नानं तुला सारखं त्रस्त केलं असतं. हाच मनमोकळेपणाचा मानसशास्त्रीय फायदा आहे. बरं, आता एकच प्रश्न विचारतो, त्या रात्री तू काही विशेष केलं होतंस का?"

"काही विशेष नाही. मी क्लबमध्ये नेहमीप्रमाणं जेवण केलं व स्टुडिओमध्ये आलो, आणि थोड्या वेळानं घरी गेलो." लॉरेल म्हणाला. पण त्यास एकदम आठवण झाली. "हो, आणखी एक म्हणजे त्या रात्री माझ्या स्टुडिओचा दरवाजा खरोखरच उघडा होता. आणि पहारेकरी आपल्या एका मित्राबरोबर चहा घेण्यासाठी कोपऱ्यावर गेला होता, असं मला दुसऱ्या दिवशी समजलं."

"पाहिलंस, सारं कसं अगदी स्पष्ट आहे!" त्याच्या पाठीवर थाप मारून डॉक्टर म्हणाले, "दरवाजा उघडा आहे तेव्हा कुणीतरी आत येईल असा विचार तुझ्या मनात सहज येऊन गेला, आणि त्यामधूनच हे स्वप्न निर्माण झालं. अरे, किती वेळ झाला मला! दवाखान्यात जाण्याची वेळ होऊन गेली." डॉक्टरांनी ओव्हरकोट व हॅट उचलली, व जाण्यासाठी ते दरवाजाकडे वळले. "मी उद्या येईन तासभर. त्यावेळी त्या साऱ्या स्वप्नाचा अर्थ सांगेन. आताच दोन महत्त्वाच्या गोष्टी मी स्पष्ट केल्या, हिरवा पोषाख आणि नारिंगी हातरुमाल. बाकीदेखील सारं उघड आहे – बराय."

त्याने हस्तांदोलन केले व डॉक्टर बाहेर पडले. लॉरेलने किंचित् हसून त्यांच्याकडे पाहिले, व तो आत आला. त्याने ब्रश गोळा केले व एका चिनी मातीच्या उभ्या पात्रात ठेवून दिले. डॉक्टरविषयी त्याला नवीन आपुलकी वाटू लागली होती. त्यांच्याबरोबरच्या संभाषणाने त्याचे मन प्रफुल्लित झाल्यासारखे झाले होते. नाहीतर स्वप्नासारख्या वेड्या गोष्टींनी त्याला किती त्रस्त केले असते कुणास ठाऊक?

त्यानेही जाण्याची तयारी केली. जाता जाता हातात हॅट घेऊन तो सहज डॉक्टरांच्या चित्रापुढं उभा राहिला. आपल्या आजच्या कामावर तो अगदी खूष होता. पण त्या हिरव्या पडद्याची घडी मात्र जरा विसकटल्यासारखी दिसत होती. पण आजचं काम सुरू होण्यापूर्वी ती व्यवस्थित होती.

नंतर त्याच्या ध्यानात आले. उठताना डॉक्टर किंचित् मागे रेलले होते. त्यामुळे त्यांच्या धक्क्याने पडद्याची रचना बदलली होती. पण ती पूर्वीसारखी करणे काही फारसे त्रासाचे नव्हते. त्याने पडद्याचे टोक किंचित वर उचलले. तोच त्याचा चेहरा भीतीने गोठल्यासारखा झाला, व साऱ्या अंगातून शक्ती ओसरून जात आहे असे त्यास वाटले. त्या पडद्याचे टोक हातात धरून तो अगदी पापण्याही न हलवता निश्चल उभा होता. चार मिनिटे झाली, पाच झाली, तो तसाच उभा होता.

त्याची दृष्टी पडद्यामागील एका वस्तूवर खिळून राहिली होती. तेथे एक विलक्षण आकर्षक रंगाचा नारिंगी हातरुमाल पडला होता.

[इंग्रजीवरून]

# उकाडा

आज ऑगस्टची वीस तारीख आहे. आजच्या घटनांनी माझे मन अगदी भांबावून गेले आहे. त्या ताज्या आहेत तोपर्यंत कागदावर उतराव्या म्हणून लगेच लिहीत आहे. बाहेर तापलेली रात्र नागिणीने उग्र फूत्कार टाकावे त्याप्रमाणे उकाड्याची झळ टाकीत आहे. वाऱ्याची एकही झुळूक नाही. अंगाची अगदी ओलसर गुदमरलेली तगमग होत आहे, तो आणि मी एकमेकांकडे पाहात स्तब्ध बसलो आहोत.

अकरा वाजले आहेत... आजची तारीख संपायला अद्याप एक तास अवकाश आहे. माझे नाव जेम्स क्लेरेन्स विथेनक्रॉफ्ट. मी चित्रकार आहे. फारसा काही प्रसिद्ध नाही; पण माझ्या पोटापुरते मिळवतो. मला एक बहीण होती; पण ती यापूर्वी वारली. तेव्हा तसे काही नातलग उरलेले नाहीत.

आज सकाळी चहा घेताघेता मी वर्तमानपत्रावरून नजर फिरवली, आणि पाइप पेटवून आजच्या कामासाठी – चित्र काढण्यासाठी एखादा विषय मिळतो की काय याचा विचार करू लागलो. खोलीच्या खिडक्या आणि दरवाजा उघडा असूनही फारच उकडत होते. उन्हाचे तप्त असे एखादे अदृश्य वस्त्र माझ्याभोवती लपेटले आहे की काय असा मला सारखा भास होत होता. तेव्हा बाहेर जाऊन स्विमिंग पूलच्या बाजूला एखाद्या झाडाखाली आज चित्र काढण्यासाठी बैठक मारावी, असे मला सारखे वाटू लागले. तोच कुणीतरी चुटकी वाजवावी, शिंपला हलकेच उघडावा, त्याप्रमाणे मला एक कल्पना सुचली.

हातातील पेन्सिल कागदावर वेड्यासारखी भरकटू लागली आणि मी त्यात इतका रमून गेलो की, मला दुपारच्या जेवणाचीसुद्धा आठवण झाली नाही. शेवटी एकदाचे ते चित्र पुरे झाले. त्या चित्रावर मी बेहद्द खूष होतो. चित्रासाठी मी तो विशिष्ट विषयच का निवडला, कुणास ठाऊक! – फाशीची शिक्षा फर्मावलेल्या एका गुन्हेगाराचे चित्र मी रेखाटले होते. त्या चित्रातला तो गुन्हेगार अंगाने फारच स्थूल होता नि त्याच्या साऱ्या अंगावर ठिकठिकाणी मांसाच्या वळ्या पडलेल्या दिसत होत्या. त्याची दाढी थोडी वाढलेली होती; पण डोके मात्र जवळजवळ टक्कल पडल्यासारखे दिसत होते. आपल्या आखूड, जळवांसारख्या जाड बोटांनी समोरील कठड्याला घट्ट धरून तो खुळ्या कुत्र्याप्रमाणे समोर पाहात उभा होता. जणू त्याच्यातील जीवच कुणीतरी फुंकून टाकला होता अणि त्यामुळे

आता हा मांसाचा ढीग एकदम कोसळणार, अशी असहाय, बावळट भावना त्याच्या ओबडधोबड चेहऱ्यावर होती...

मी त्या चित्राची गुंडाळी केली आणि का कुणास ठाऊक, ती गुंडाळी खिशात ठेवून दिली. एखादे काम अगदी मनासारखे झाले की जो विलक्षण आनंद होतो, त्याने माझे मन फुलल्यासारखे झाले होते. त्या आनंदातच मी भटकण्यासाठी बाहेर पडलो.

मी कुठे भटकत होतो, कुणास ठाऊक!पण मला त्या घुसमटून सोडणाऱ्या उकाड्यापासून कुठेतरी दूर दूर जायचे होते. जाड, खरबरीत पांढरे कांबळे वाऱ्याने हलावे त्याप्रमाणे उष्ण झळीच्या लाटा अंगावर येऊन आदळत, पायांखाली सापडून चुरगळल्या जात. दूर, अगदी क्षितिजाजवळ काळवंडलेल्या तांब्याचे केल्याप्रमाणे दिसणारे दोन अजस्र ढग सुस्त उभे होते; पण पावसाचा थेंबभरही शिडकावा काही केल्या खाली उतरेना.

मी किती वेळ तसाच भटकत राहिलो असतो, कुणास ठाऊक! पण मध्येच मला एका तिरव्या डोळ्यांच्या पोराने 'किती वाजले' म्हणून विचारले. त्या शब्दांनी माझी तंद्री भंगली, आणि मी चमकून आजूबाजूला पाहिले.

साताला अद्याप वीस मिनिटे कमी होती. मी एका घराच्या आवाराच्या फाटकासमोर उभा होतो. त्या फाटकातून एक पायवाट आत गेलेली होती, आणि वळसा घेऊन उजवीकडे दिसेनाशी झालेली होती. तिच्या दोन्ही बाजूंना फुलझाडे होती. त्यांना पिवळी-लाल फुले आलेली होती. फाटकापाशीच एक पाटी उभी होती. त्या पाटीवर कोरलेले होते :

**'चार्ल्स ॲटकिन्सन,**

शिलालेख कोरणार. इंग्लिश आणि इटालियन संगमरवरी काम विशेष चांगले केले जाईल.'

मागे दिसणाऱ्या शेडमधून शीळ घातल्याचा आवाज येत होता, आणि त्याच्या जोडीला दगडावर छिन्नी-हातोडा मारल्याचा खणखणीत आवाज.

हातमागाचा धोटा 'सट्‌सट्' इकडून तिकडे जाऊन कापडाचा तुकडा विणला जावा, तशी काहीतरी हालचाल माझ्या मनात झाली. माझ्या मनावरील माझा ताबा सुटल्यासारखा झाला आणि कुणीतरी मागून ढकलल्याप्रमाणे मी त्या फाटकातून आत शिरलो.

त्या पायवाटेने आत गेल्यावर, फाटकाकडे पाठ करून एक माणूस बसला असल्याचे मला दिसले. आपल्यासमोरील संगमरवरी दगडावर तो छिन्नीने ठोके मारीत होता. माझी चाहूल लागताच त्याने मागे वळून पाहिले आणि तो हसला. त्याने मागे वळून पाहिले तेव्हा त्याचा चेहरा मला स्पष्ट दिसला. आणि माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही! – त्या माणसाचा चेहरा अगदी थेट मी आज दुपारी काढलेल्या त्या गुन्हेगाराच्या चित्रातील चेहऱ्यासारखाच होता! त्याच्या अजस्र शरीरावरून घामाच्या धारा ओघळत

होत्या, आणि तो त्या एका लाल रेशमी हातरुमालाने टिपीत होता. त्याचा चेहरा अगदी माझ्या चित्रातल्या चेहऱ्यासारखाच होता; पण त्यावरील भाव मात्र पूर्णपणे निराळे होते. जणू आमची फार जुनी ओळख असल्याप्रमाणे त्याने मला खूण करून बसायला सांगितले.

"काय भयंकर उकाडा आहे बाहेर!" मी म्हणालो, "ही फुलं, घर पाहून थोडा वेळ इथं बसावंस वाटलं; म्हणून परवानगीशिवायच आत शिरलो. माफ करा हं!"

मी त्याच्या समोर एका चौकोनी दगडावर बसलो. त्याने आपले काम पुन्हा चालू केले. त्याच्या हातातील संगमरवरी दगडाच्या आतील फोडलेल्या भागावर लाल-निळसर रंगाच्या नाजूक रेषा होत्या, आणि त्यामुळे तो फार आकर्षक दिसत होता.

"काय सुंदर दिसतो हा दगड!" मी उद्गारलो.

"होय, आहे खरा." मान डोलवीत तो म्हणाला, "पण मागच्या बाजूला त्याला फार मोठी भेग पडलेली आहे. त्यामुळं माझ्या मनासारखा काहीच उपयोग होणार नाही त्याचा. आता या उन्हाळ्यात त्याच्यावर तसा काही विशेष परिणाम होणार नाही म्हणा. पण जरा थंडी पडू दे, मग बघा. वाळलेल्या शेंगेसारखा फट्‌दिशी फुटून पडेल तो!" असे म्हणून तिरस्काराने तो पचकन् बाजूला थुंकला.

"पण त्याच दगडावर तर काही काम करता आहात तुम्ही!" मी म्हटले.

तो एकदम मोठ्याने हसला आणि त्याच्या साऱ्या अंगावरील मांसाच्या वळ्या थरथरल्या. तो हसतच म्हणाला, "तुम्हाला गंमत वाटेल, हा दगड प्रदर्शनासाठी आहे. चित्रकार प्रदर्शनं भरवतात, तसेच मूर्तिकारसुद्धा. अहो, भाजीपाल्याचीसुद्धा प्रदर्शनं भरतात हल्ली! मग आम्हीच काय पाप केलं आहे? थडग्यावर लावण्याच्या शिलालेखात कला असतेच की!"

आता मला एकदम अस्वस्थ वाटू लागले. एखाद्या उतरणीवरून घसरत जात विहिरीकडे ओढले जावे त्याप्रमाणे त्याच्या हसण्याच्या उतरणीवरून आपण आत आत घसरत आहो, असे मला वाटले. आपण येथे का आलो, या रेड्यासारख्या दिसणाऱ्या माणसाशी आपण का बोलत आहोत हेच मला समजेना. याला आपण पूर्वी कुठे पाहिले आहे की काय, याचा मी विचार करू लागलो. पण मला काहीच आठवेना. बाहेरील उकाडा उंबरा ओलांडून मनात आल्याप्रमाणे आता माझ्या मनाची असह्य तगमग होऊ लागली होती. काही केल्या ती थांबेना.

थोड्या वेळाने त्याने आपले काम थांबवले आणि मान किंचित् वाकडी करून त्याने त्या शिलालेखाकडे पाहिले. "पहा, तुम्हाला कसं वाटतंय् हे काम?" तो कौतुकाने म्हणाला आणि त्याने तो दगड मला वाचता यावा असा फिरवला. त्यावर पुढील मजकूर होता :

"जेम्स क्लॅरेन्स विथेनक्रॉफ्ट,

जन्म : १८ जानेवारी १८९०

मृत्यूने अचानक त्याला आपल्याकडे नेले : २० ऑगस्ट १९४०"

थोडा वेळ मी गोठल्याप्रमाणे स्तब्ध झालो. माळेतला एकेक मणी तुटून ओघळून जावा त्याप्रमाणे मिनिटे निसटत होती. मी कोरड्या ओठांवरून जीभ फिरवली आणि त्याच्याकडे न पाहता विचारले, "हे नाव – हे कुठं मिळालं तुम्हाला ?"

"मिळालं वगैरे नाही. कुठलं तरी काल्पनिक नाव असावं म्हणून मी ते कोरलं इतकंच. पण का ?"

"नाही, सहज विचारलं." मी म्हणालो. "माझं पूर्ण नावही अगदी हेच आहे म्हणून विचारलं."

त्याने लांबलचक शीळ घातली व माझ्याकडे पाहात विचारले, –

"आणि त्या तारखा ?"

"त्यातली एक तर अगदी बरोबर आहे." मी हसून म्हटले, "आता दुसरीविषयी काय सांगणार, नाही का ?"

"ऑं !" तो आ वासून म्हणाला, "आता मात्र कमाल झाली बरं का."

तशीच एक विलक्षण आश्चर्यकारक गोष्ट मला माहीत होती, तिचा त्याला पत्ता नव्हता. मी माझ्या खिशातले नुकतेच काढून पूर्ण केलेले ते चित्र काढले व निमूटपणे त्याच्यासमोर धरले. कुणी तरी डाग दिल्याप्रमाणे तो दचकला ! त्याच्या चेहऱ्यावरील आश्चर्य पुसून गेले, आणि तो इतका आक्रसला की, आता मात्र तो माझ्या चित्रातील चेहऱ्यासारखा दिसू लागला !

आम्ही दोघेही थोडा वेळ गप्प होतो. काय बोलावे हे कुणालाच समजेना.

"बरं, आत तरी या. आपण काहीतरी खाऊ." शेवटी अस्वस्थपणे उठत तो म्हणाला.

त्याची बायको हसऱ्या चेहऱ्याची, पण बडबडी होती. तिचे चऱ्हाट सुरू होताच तो उठून बाहेर गेला; पण मला मात्र बसावे लागले. अर्ध्या तासाने कंटाळून मीही बाहेर आलो त्यावेळी तो एका दगडावर बसून सिगरेट ओढीत होता आणि त्याचा चेहरा विमनस्क दिसत होता. मी त्याच्या बाजूला बसलो.

"काय हो, तुम्हाला कुणी कोर्टात खेचावं, असं काही घडलेलं नाही ना तुमच्या हातून ?" मी विचारले.

"माझ्याकडून ? छट् !" तो एकदम म्हणाला, "मला कुणाचं पैचं कर्ज नाही, की मी कुणाला दुखवलेलं नाही. नाही, पण एकदा माझं चुकलं होतं. एकदा मी दारू प्यायल्यामुळं पोलिसाच्या तावडीत सापडलो होतो, पण त्याला एक कोंबडी देऊ करून त्याच्या हातून निसटलो. तेव्हापासून त्यापेक्षा जास्त प्यायलो नाही मी आणि त्या पोलिसाला दिलेली ती

कोंबडी तरी कसली! आजारीच होती ती दोन दिवस.'' तो मध्येच उठला, आणि पायवाटेच्या बाजूच्या त्या झाडांना पाणी घालू लागला.'' उन्हाळ्यात दोनदा पाणी घालावं लागतं झाडांना. तरी ती पांढरी नाजूक असतात ना, ती कोमेजतातच... हो, पण तुम्ही राहता कुठं?'' फुलझाडांना पाणी घालता घालता मध्येच थांबून त्याने मला विचारले.

मी माझा पत्ता सांगितला. त्याच्या घरापासून माझ्या घरी जायला कमीत कमी तास-दीड तास तरी लागला असता, हेही मी त्याला सांगितलं.

''हे पहा, तास-दीड तास चालायचं म्हणजे धोका आहे. रस्त्यात अपघात वगैरे होण्याचा संभव आहे. मोटारीखाली सापडाल, केळ्याच्या सालीवरून घसराल, – काही तरी होईल. तेव्हा आजची रात्र संपेपर्यंत तुम्ही माझ्याच घरी का राहात नाही?''

आता माझे मलाच आश्चर्य वाटते; पण मी 'हूं' म्हणालो...

तो आपल्या हत्याराला धार लावीत आहे, आणि मधूनमधून मी दिलेली सिगारेट ओढीत आहे. त्या हत्याराला धार लावून झाली, की तो हे लंगडे टेबल दुरुस्त करणार आहे. मी त्या टेबलावरच हे सारे लिहीत आहे.

आज ऑगस्टची वीस तारीख आहे. आजच्या घटनांनी माझे मन अगदी भांबावून गेले आहे. बाहेर तापलेली रात्र एखाद्या सर्पिणीने फूत्कार टाकावेत त्याप्रमाणे उकाड्याची झळ टाकीत आहे. वाऱ्याची एकही झुळूक नाही. अंगाची सारखी गुदमरल्यासारखी तगमग होते आहे. तो आणि मी एकमेकांकडे पाहात स्तब्ध बसलो आहोत...

आता अकरा वाजल्यामुळे आजची तारीख संपायला अद्याप एक तास अवकाश आहे...

[आधारित]

# घड्याळ

सोमण वकिलांना चालणे फार आवडत असे. त्यामुळे ऑफिसातून घरी जाताना बसने जाण्याऐवजी ते पुष्कळदा पायीच जात असत. पण आज त्यांना बाहेर पडायला थोडा उशीरच झाला होता. ते डॉक्टर बेहेरे बरोबर पाच वाजता आले, नि त्यांनी सोमणांचे तब्बल दोन तास घेतले. त्यांचे कागदपत्र बरेच गुंतागुंतीचे होते हे खरे; पण त्यातही भर म्हणूनच की काय, बेहेऱ्यांना साधी माहितीदेखील सरळ, मोजक्या शब्दांत देता येत नसे.

"अं –" अखेर सोमण घड्याळाकडे पाहात म्हणाले, "तुम्ही कॅम्पकडेच जाणार ना ? मग आपण मिळूनच जाऊ. जाता जाता उरलेलं कामही आपल्याला संपवता येईल. शिवाय, खरं सांगायचं म्हणजे माझं एक काम आहे तुमच्याशी."

"वा: ! छान ! चला तर !" डॉ. बेहेरे उठत म्हणाले.

पण मनात सतत घोळत असलेल्या त्या विषयाची सुरुवात कशी करावी हे सोमण वकिलांना समजेना. अर्धा रस्ता संपला तरी त्याबाबत सोमणांनी एक शब्दसुद्धा काढला नाही, आणि नंतर त्याला तोंड फुटले तेसुद्धा अगदी योगायोगानेच. चालताचालता ते दोघे बस-स्टँडजवळ आले. एक बस येऊन नुकतीच थांबली होती. तिच्यातून बेहेऱ्यांच्या वयाचा एक मनुष्य खाली उतरला, नि लगबगीने त्यांच्या समोरून निघून गेला. चौकातील दिव्याचा निळा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर क्षणभर पडला असेल नसेल. तो थोडा पुढे गेला. पण लगेच काहीतरी महत्त्वाचे विसरल्याप्रमाणे तो धावत आला, नि पुनः सुरू झालेल्या बसमध्ये उडी मारून शिरला. बस निघून गेली.

"या महाशयांच्या डोक्यातील दोनचार स्क्रू पडलेले दिसतात !" अंगठ्याने बसमधून गेलेल्या त्या गृहस्थाचा निर्देश करीत डॉ. बेहेरे म्हणाले.

"झालं ! माझं कामच संपलं ! आता काय बोलणार तुमच्यापुढं !" सोमण म्हणाले, "कारण खरं म्हणजे मला त्याच गृहस्थाविषयी बोलायचं होतं तुमच्यापाशी थोडं. त्याचं नाव बापू, – बापू देशपांडे. काही दिवस तो सैन्यात लेफ्टनंट होता. नंतर काय झालं, कुणास ठाऊक ! त्याला नोकरीतून काढून टाकलं, की त्यानं आपण होऊन नोकरी सोडली, देव जाणे ! आता अगदी गावाच्या कडेला शेतात एक जुनाट, अवाढव्य घर विकत घेतलंय त्यानं, तिथं असतो एकटाच वेड्यासारखा. – एकटाच म्हणजे, एक बावळट गडी, नि आपली बंदूक यांच्याबरोबर. त्याचे बरेच व्यवहार मला पाहावे लागतात. त्याचे वडील नि

मी अगदी भावाभावासारखे वाढलो. खरं सांगायचं म्हणजे, त्याला आता माझ्याखेरीज कुणीच नाही. तुमची ओळख आहे ना त्याच्याशी?''

''खरं म्हणजे आमची पूर्वी ओळख होती.'' काही क्षण घुटमळून विचार करीत डॉ. बेहेरे म्हणाले, ''आम्ही एकाच शाळेत होतो. थोडे दिवस कॉलेजातही एकत्र होतो. पण नंतर आमचं भांडण झालं. कारण –'' पण इथे बेहेरे एकदम थांबले. कुमुद सानेने त्याच्याशी लग्न न करता आपल्याशी केले, हे भांडणाचे कारण सोमणांना सांगावे असे त्यांना वाटेना. त्यांनी तो विषय एकदम बदलला. ते पुढे म्हणाले, ''पण हल्ली म्हणे तो फार एकलकोंडा झाला आहे. अगदी वेड्यासारखा वागतो अनेकदा. दोनतीन महिन्यांपूर्वी तो मला फक्त एकदा आमच्या क्लबमध्ये दिसला होता. त्याचं कशातच लक्ष नसतं. आपल्यातच गुंगल्याप्रमाणं तो चालतो, वागतो. काहीतरी खास गुपित माहीत असल्याप्रमाणे मध्येच स्वतःशी हसतोदेखील. पण चांगला हुषार माणूस बरं का! त्या तुरुंगासारख्या घरात तो स्वतःला का कोंडून घेतो, देव जाणे!'' डॉक्टरांनी एक सिगरेट काढली नि पेटवली. नाकातोंडातून धूर सोडीत, जणू एखादे महान् तत्त्व सांगत असल्याच्या आविर्भावात ते म्हणाले, ''बरं का वकीलसाहेब, 'निसर्गाची शांतता,' 'शांतता' म्हणून आपण ओरडतो खरं; पण ती सारं आयुष्य खाऊन टाकते आपलं. आत्ताचंच पहा ना, बापू देशपांडे थोडा वेळ या गर्दीत आल्यावर तिला भिऊन कसा उंदरासारखा वागत होता तो!''

बोलताबोलता ते दोघे, ज्या ठिकाणी रस्त्याला दुसरा फाटा फुटत होता तिथे येऊन पोचले. सोमण वकिलांचा निरोप घेऊन डॉ. बेहेरे उजवीकडे वळले. सोमणांच्या डोळ्यांसमोर बापूच्या अवाढव्य घराचे चित्र होते. ते जुनाट घर शेतात एखाद्या हिंस्र श्वापदाप्रमाणे दबा धरून बसल्यासारखे दिसे. बापूला ते घर का आवडले होते, कुणास ठाऊक! स्वतःच्या पैशांत थोड्या कर्जाची भर घालून त्याने ते विकत घेतले होते. सोमणांकरवीच तो व्यवहार झाला होता, पण त्यांना ते बिलकूल आवडले नव्हते. उलट त्यांना त्या घराची थोडी भीतीच वाटली होती. त्यांना स्वतःला खूपसा सूर्यप्रकाश, प्रशस्त रस्ते, आणि मोटर-माणसांची वर्दळ असलेली जागाच आवडे. पण त्या घराच्या बाबतीत बापूचा अगदी हट्टच होता... जणू नुकताच तो व्यवहार संपवल्याप्रमाणे सोमण वकिलांनी आपले खांदे उडवले व ते पुढे चालू लागले.

नंतर एक आठवड्याने डॉ. बेहेरे सोमण वकिलांना पुन्हा भेटले.

''तुम्हाला आश्चर्य वाटेल,'' डॉ. बेहेरे सोमणांना म्हणाले, ''पण काय योगायोगाची गोष्ट आहे पहा! गेल्याच आठवड्यात आपण बापू देशपांडेविषयी बोलत होतो ना! त्यानं दोन

दिवस मला आपल्या घरात राहायला बोलावलं आहे. 'झालं गेलं विसरून जाऊ, त्या गोष्टीला आता कितीतरी दिवस झाले, नाही का?' असं तो म्हणाला. खरं म्हणजे बापू काही वाईट नाही तसा. थोडा तऱ्हेवाईक आहे, एवढंच." स्वतःच्या डोक्यावर बोट आपटीत बेहेऱ्यांनी सांगितले.

"वा:! छान झालं हं." सोमण उत्साहाने म्हणाले, "असा जर तो चारचौघांत मिसळू लागला, तर अजूनही सुखी होईल पोरगा. त्याची फार चिंता वाटते मला. – आणि हे पहा, तुम्ही दोन दिवस त्याच्याकडे राहून आल्यावर मला सारं सांगा बरं का, तिथं काय-काय झालं ते!"

पण ते सांगायची पाळी डॉ. बेहेऱ्यांवर आलीच नाही. कारण त्या घरातून ते जिवंत बाहेरच पडले नाहीत. बेहेरे सोमणांना भेटल्यानंतर तीनचार दिवसांतच ती घटना घडली. अगदी पहाटे बापूचा गडी सोमा धावतच सोमणांकडे आला, नि, 'साहेबांनी तुम्हाला आत्ताच्या आत्ता बोलावलंय्,' असे घाबऱ्याघाबऱ्या सांगू लागला. तेवढ्या पहाटे बस मिळणे शक्यच नव्हते. सोमणांना चालणे आवडत असे खरे; पण बापूकडे त्यांना इतक्या जलदीने आणि लांबवर जावे लागले की, ते सारे त्यांना अगदी नकोसे वाटले. बापूच्या त्या गावाबाहेरील घराजवळ जाईपर्यंत त्यांच्या पायांत पेटके आले. घराच्या साऱ्या खिडक्या बंद होत्या, नि पुढचा दरवाजा नुसताच पुढे ढकललेला होता. सोमण आत शिरताच बापू चटकन् खुर्चीवरून उठला.

"तो अंतू बेहेरे... पण चला आतच. मी सारं सांगतो सविस्तर!" तो सोमणांना म्हणाला.

सोमण एका खुर्चीवर बसले. सोमाने कपभर चहा त्यांच्यापुढे आणून ठेवला. सोमण चहा घेत असता बापू सारख्या येरझारा घालीत होता. येरझारा घालता घालता तो सांगू लागला. बऱ्याच प्रयत्नानंतर सोमण वकिलांना साऱ्या हकीकतीचे धागे एकत्र जुळवता आले. डॉ. बेहेऱ्यांच्याबरोबर तिथे राहायला आलेले डॉक्टर देसाई आणि नाना सराफ यांनीही अगदी तीच हकीकत सांगितली.

खरे म्हणजे डॉ. देसाई काय, किंवा नाना सराफ काय, कोणाशीच बापूची तशी दाट मैत्री नव्हती. निमंत्रण देताना ते दोघेही बेहेऱ्यांच्याबरोबर होते म्हणूनच त्याने औपचारिकपणे त्यांनाही बोलावले होते, इतकेच. डॉ. देसायांना तर फारच आश्चर्य वाटले. एकदा भर क्लबात त्यांचे बापूशी कशावरून तरी कडाक्याचे भांडण झालेले होते. त्यामुळे बापूच्या निमंत्रणाप्रमाणे, त्याच्या घरी जायला आधी ते तयारच नव्हते. पण खुद्द बेहेऱ्यांनीच फार आग्रह केल्यामुळे ते शेवटी तयार झाले होते. बापूच्या त्या एकांतातल्या घरी आल्या दिवशी सगळ्यांनी सारा वेळ शेतातील मोठ्या विहिरीत पोहण्यात घालवला होता. संध्याकाळच्या जेवणासाठी बापूने बाहेर अंगणातच टेबल मांडले होते. बेहेरे काय

किंवा इतर काय, सगळ्यांचाच वेळ अपेक्षेबाहेर चांगला गेला. आणि आपण आलो हे बरेच झाले, असे सगळ्यांना वाटले. रात्री बराच वेळ रमीचे डाव टाकल्यानंतर बेहेऱ्यांनी कंटाळून पाने टेबलावर आदळली नि जांभई देत ते उठले.

"काय कार्ड्स् आहेत की पळसाची पानं आहेत! दोन तासांत पाचशे मायनस! छट्! उद्या शर्ट देऊन जायची पाळी येईल मला!" ते म्हणाले, "आपण आता झोपणार बुवा!"

बाकीचे थोडे हसले. बेहेरे माडीवर आपल्या खोलीकडे गेले. नंतर इतरांबरोबर बापूही थोडा वेळ बोलत बसला होता. त्या अवधीत तो एकदाही आपली खुर्ची सोडून उठला नाही, याबद्दल सगळ्यांची खात्री होती. ती सारी हकीकत सांगत असता देसाई सोमणांना स्पष्टच म्हणाले, "हे पहा, त्या बापूविषयी माझं मत काही फारसं चांगलं नाही. थोडंसं जरी काही काळंबेरं जाणवलं असतं, तरी ताबडतोब मी त्याचाच संशय घेतला असता. पण सारा वेळ तो आमच्यासमोर होता, आमच्याशी बोलत होता, याबद्दल मी अगदी शपथ घ्यायला तयार आहे. आम्ही मोठ्या तावातावाने बोलत होतो. तो विषय कसा निघाला, कुणास ठाऊक! नाना काय म्हणाला, की 'प्रत्येकजण आपलं खरं मन, खरं आयुष्य आपल्या अगदी जिवलग मित्रापासूनदेखील चोरून ठेवतो.' आपल्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्याने आपल्या माहितीतली बरीच उदाहरणेही दिली. पण मला नानाचं म्हणणं पटेना; म्हणून मीही ते कसं अशक्य आहे हे दाखवण्यासाठी पुष्कळ दाखले दिले. अहो, लहानसान हालचालीत, चेहऱ्यावरील हावभावांत नकळत मनुष्याचा स्वभाव कसा झक्कदिशी चमकून जातो! बापू आम्हा दोघांकडे आळीपाळीने बघत होता. मधूनमधून स्वत:शीच हसत होता. नानानं मध्येच थांबून त्याला विचारलं, 'बापूसाहेब, तुमचं मत काय आहे?'

"तो एकदम गोंधळला, नि त्याच्या हातातील सिगरेट एकदम खाली पडली. पण त्यानं उत्तर देण्याच्या आतच माजघराचा दरवाजा खाड्दिशी उघडला गेला नि सोमा धावतच आत आला. 'साहेब! –' हातवारे करीत सोमा जवळजवळ ओरडलाच, 'बेहेरेसाहेब –'"

"बापू चटकन् उठला नि दाराजवळ गेला. बरं का सोमण, त्या वेळीही तो आमच्या नजरेसमोरून गेला नाही. दारातच उभे राहून त्याने सोमाला हलकेच काही विचारले. थोड्या वेळानं तो आला नि मटकन् खुर्चीत बसला. त्याचा चेहरा पांढरा फटफटीत पडलेला होता. 'काय भयंकर घडलं हे!' तो अर्धवट स्वत:शी नि अर्धवट आम्हाला उद्देशून म्हणाला, 'त्याला मी सहज बोलावलं आणि इथं येऊन त्यानं हे कृत्य केलं. – बेहेऱ्यानं माझ्या बंदुकीनं स्वत:वर गोळी झाडून घेतलीय्!'

आम्ही चटकन् उठलो नि माडीवर गेलो. बेहेरे जमिनीवर पडलेले होते नि त्यांच्या अंगाखालचं जाजम रक्तानं चिंब झालेलं होतं. त्यांच्या हातात बापूची बंदूक होती. गोळी

सरळ छातीतून गेलेली होती. बंदूक अगदी जवळून झाडल्यामुळं बेहेऱ्यांच्या अंगावरचे कपडे थोडे जळून काळवंडले होते.

''बेहेऱ्यांनी सोमाला रात्री बारा-साडेबाराला हाक मारली होती, नि तो सकाळी गावात जाणार आहे की काय याची चौकशी केली होती. त्यांची दोन पत्रं दुसऱ्या दिवशी मेलनं जायची होती. सोमा सातला गावात जाणार होता. तेव्हा गावात जाण्यापूर्वी ती पत्रं घेऊन जाण्याविषयी त्यांनी त्याला बजावलं होतं. नंतर बराच वेळ त्यांच्या खोलीत दिवा दिसत होता, म्हणून सोमा पाहायला गेला, तो त्याला बेहेरे असे गतप्राण झालेले दिसले...''

पोलिस-चौकशीच्या वेळी सगळ्यांनी हीच हकीकत स्वतंत्रपणे सांगितली. बापूची बंदूक नेहमी तिथेच दोन खुंट्यांवर ठेवलेली असे. घरात दुसरी बंदूक नव्हती. पण बेहेऱ्यांनी अशा ठिकाणी आत्महत्या का करावी, याचे कारण मात्र कुणालाच समजले नाही. मनावर दुःखाचे दडपण होते म्हणावे, तर ते सारखे हसतबोलत होते. घरी सुखाला, पैशाला तोटा नव्हता...

नंतर बरेच दिवस पोलिस-तपास चालू होता. पण ते कोडे काही सुटले नाही आणि स्थानिक वर्तमानपत्राने चिडून म्हटल्याप्रमाणे, अशा घटनेनंतर 'पोलिस-तपास चालू आहे' असे म्हटले, की सारे प्रकरण कायमचे निकालात निघाले असे म्हणायला हरकत नाही! –

''म्हणजे आम्ही ज्या विषयावर वादविवाद करीत होतो, त्याचं ढळढळीत उदाहरणच पाहायला मिळालं म्हणायचं!'' देसाई नंतर म्हणाले, ''माझी नि बेहेऱ्यांची गेली पंधरा वर्षं ओळख. पण काही ठाव लागला नाही त्यांच्या मनाचा.''

शेजारच्या शेतवाडीत राहणारे रिटायर्ड पोस्टमास्तर जोशी बापूला भेटून गेले. त्यांना तर बापूचा फारच राग येत असे; पण त्यांनादेखील फार हळहळ वाटली.

''बरं तर बरं,'' ते सोमणांना म्हणाले, ''नाही तर बापू फासावरच लटकायचा. त्या डॉक्टर देसायांनी, सराफांनी सारा वेळ बापू आपल्यासमोर होता असं शपथेवर सांगितलं म्हणून निभावलं. अहो, ग्लासभर पाणी प्यायला म्हणून जरी बापू खोलीबाहेर पडला असता तरी –'' त्यांनी आपल्या गळ्यावरून बोट आडवे फिरवले नि जिभेने 'टर्रर' असा आवाज करून ते पुढे म्हणाले, '' – खलासच! अगदी फाशीच!''

त्यांचे म्हणणे अगदी बरोबर होते. बापूच्या विरुद्ध अनुमान-पुरावा जबरदस्त होता. बेहेऱ्यांचे नि त्याचे भांडण होते हे अनेकांना माहीत होते. बापूची वागणूकही हल्ली अतिशय चमत्कारिक नि संशयास्पद होती. कितीतरी वर्षांनी त्याने बेहेऱ्यांना मुद्दाम आपल्या घरी बोलावले होते. 'वेगळ्या परिस्थितीत खुद्द मलादेखील त्याचा फार संशय आला असता.' सोमण स्वतःशी म्हणाले.

या प्रकारानंतर त्या घरात राहणे अशक्य होते. बापूलासुद्धा तसेच वाटले, आणि दोन दिवसांतच मुंबईला जाऊन स्थायिक होण्याचे त्याने ठरवले. सोमण त्या दिवशी त्याच्याकडेच राहिले. पण त्यांचा तो एक दिवस फारच कंटाळवाणा गेला. संध्याकाळी तर वेळ कसा काढावा हाच मोठा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यांनी टेबलावरून एक जुने मासिक उचलले आणि ते खिडकीपाशी येऊन बसले. खिडकीपाशी एक कपाट होते आणि त्याच्याआड एक जुन्या थाटाची, पण प्रशस्त अशी कातडी आवरणाची खुर्ची होती. ती त्यांनी अगदी खिडकीजवळ घेतली आणि तिच्यावर बसून ते मासिकाची पाने चाळू लागले. थोड्या वेळाने दरवाजा अगदी हळूच उघडला गेला आणि अगदी हलक्या पावलांनी बापू आत आला. सोमण त्या कपाटाआड असल्यामुळे बापूला ते दिसणे शक्य नव्हते. ते कपाटाआडून समोर येण्याच्या बेतात होते, पण बापूच्या एकंदर हालचालीत असा विलक्षण चोरटेपणा होता, की त्याच्याकडे, त्याला नकळत असे निरखून पाहात राहणे योग्य नाही असे वाटत असताही ते खुर्चीवरून उठले नाहीत. बापू टेबलाजवळ आला. टेबलावर लंबक असलेले एक बरेच मोठे घड्याळ भिंतीला टेकून ठेवलेले होते. ते त्याने वर उचलले आणि संतापाने खालच्या फरशीवर आदळले. त्याच्या काचा आणि चक्रे इतस्तत: उधळली गेली. नंतर जणू त्याच्या अंगातील सारी शक्तीच ओसरल्यासारखी झाली. एखाद्या ओल्या चिंधीसारखा तो मटकन् खुर्चीवर बसला आणि दोन्ही हातांनी आपला चेहरा झाकून घेऊन एखाद्या लहान मुलाप्रमाणे हुंदके देऊ लागला. सोमणांची स्थिती फारच चमत्कारिक झाली. आता त्यांच्याने उठवेना आणि बापूचे असहाय्य रडणेही पाहवेना. शेवटी, पहिला आवेग ओसरल्यानंतर काही न झाल्याप्रमाणे बापू उठला. त्याने सोमाला हाक मारली. "अरे सोमा," तो म्हणाला, "जाता जाता धक्का लागून घड्याळ पडलं बघ जमिनीवर. त्याच्या काचा तेवढ्या भरून टाक, नाहीतर लागतील कुणाच्या तर पायाला."

नंतर तो तिथून निघून गेला. सोमा झाडू आणण्यासाठी आत गेला. तेवढ्यात सोमण घाईघाईने उठले आणि आडोसा सोडून समोर आले. एखादा माणूस तिन्हीसांजेच्या वेळी परसात मांजराच्या गळ्याला फास आवळीत असताना पाहिल्याप्रमाणे त्यांचे मन विषण्ण झाले होते. दुसऱ्या दिवशी बापू मुंबईला जायला निघाला. सोमणही त्याच्याबरोबर स्टेशनपर्यंत गेले होते.

"आता त्या भयाण घराचा सहवास नको साऱ्या आयुष्यात." बापू एकदम म्हणाला.

"मला तर वाटतं, आपण ते विकूनच टाकावं आता." सोमण म्हणाले.

बापूने विचार करीत असल्याप्रमाणे कपाळावर एक आठी चढवली आणि थोडा वेळ तो थांबला. पण नंतर त्याने मान हलवली. "छट्! ते घर विकायचं-बिकायचं काही नाही! उंदीर-घुबडं राहू देत त्यात. त्याच्यात फड उगवला तरी चालेल मला!" एकदम झटका आल्याप्रमाणे तो रागाने म्हणाला.

बापू मुंबईला जाऊन राहिला. सारे ठीक आहे अशा अर्थाची त्याची दोन पत्रेसुद्धा सोमणांना आली. सोमण आपल्या धंद्यात गढून गेले आणि साऱ्या प्रकरणावर पडदा पडला.

पडदा पडला खरा; पण तो तात्पुरताच होता. थोड्याच दिवसांनी कोणत्या तरी क्रूर, अदृश्य हाताने तो बाजूला केला आणि साऱ्या घटना भुताप्रमाणे पुन्हा जिवंत, भीषण झाल्या. एक शेतकरी आडरस्ता जवळचा म्हणून बापूच्या त्या घराजवळील पायवाटेने चालला होता, तो अगदी त्या घराच्या दाराजवळच कुणीतरी जमिनीवर पालथे पडले आहे असे त्याला दिसले. त्याचे अंग गाठ मारल्याप्रमाणे दुमडलेले होते आणि सारे शरीर इतके ताठरलेले होते की, मरून त्याला बराच वेळ झाला असला पाहिजे. त्या शेतकऱ्याने धावत जाऊन पोलिस-चौकीवर वर्दी दिली. थोड्याच वेळात त्या निर्जन, भयाण घराभोवती बरीच माणसे जमली, आणि आवारात रानोमाळ वाढलेले गवत तुडवू लागली. – त्या घरापाशी पडलेले ते प्रेत बापूचे होते, आणि त्याच्या छातीतून बंदुकीची गोळी आरपार गेलेली होती. बंदूक तिथेच अर्धवट बापूच्या अंगाखाली पडलेली होती.

प्रथम सगळ्यांना वाटले, इजा-बिजा...! आणखी एक खून! त्याच जागी, त्याच बंदुकीने. आवारात फक्त दोघांचीच पावले उमटलेली दिसत होती. – त्या शेतकऱ्याची जातायेता, आणि बापू जिथे पडला होता, तिथपर्यंत बापूची. घरातील धुळीत फक्त बापूचीच पावले दिसत होती. घरातील सामानाला कोणत्याही तऱ्हेने धक्का पोहोचलेला दिसत नव्हता. बापूचा खून कुणी केला असावा याविषयी तर्ककुतर्क सुरू झाले; पण ते फार वेळ टिकले नाहीत. कारण खुद्द बापूच्या खिशातच एक चिठ्ठी मिळाली : ''ज्या बंदुकीने मी वेहेऱ्यांचा खून केला, त्याच बंदुकीने मी आत्महत्या करीत आहे.''

ही चिठ्ठी वाचून तर पोलिसांनी कपाळाला हातच लावला! आधीच हकीकत घोटाळ्याची; त्यात खून की आत्महत्या हाच आता संशय निर्माण होऊ लागला. इन्स्पेक्टर वागळे बेहेऱ्यांच्या खुनाच्या चौकशीच्या वेळी हजर असल्यामुळे त्यांना तर या चिठ्ठीचा अर्थच समजेना.

''त्या बाबतीत आता बिलकूल संशय नाही. बापूचे दोन साक्षीदार होते. त्यांना त्याच्याविषयी फारशी आपुलकी नसतानासुद्धा, त्यांनी तो आपल्या नजरेसमोरून हलला नाही असं सांगितलं. म्हणजे बेहेऱ्यांचा खून बापूच्या हातून घडलेला असणं पूर्णपणं अशक्य आहे.'' इन्स्पेक्टर वागळ्यांनी अगदी ठासून सांगितले. कदाचित् आपल्या घरी बेहेऱ्यांनी आत्महत्या केली, आपल्या बंदुकीने त्यांनी स्वत:चा जीव घेतला, या जाणिवेने आपणच त्यांच्या मृत्यूला जबाबदार ठरतो असे बापूला वाटले असावे, असा काहींनी तर्क केला. त्यामुळे थोड्याच दिवसांत 'वेडाच्या भरात आत्महत्या' असा निकाल बापूच्या मृत्युसंदर्भात दिला गेला.

सोमणांनी हा निकाल वरवर मान्य केला. पण खोल कुठेतरी त्यांना अस्वस्थ, अपराधी वाटत होते. या साऱ्या भानगडीत अनेक धागेदोरे गुंतलेले असावेत असे त्यांना वाटू लागले. बापू मुंबईहून परत का आला? केव्हा? आपल्याला त्याने हे का कळवले नाही? सोमा मागे का राहिला? त्या घड्याळावर बापूचा इतका राग का?... सापळ्यात सापडलेल्या प्राण्यासारखे त्याचे ते जखमी ओरडणे तर त्यांच्या कानात अद्याप घुमत होते. का? का?... पोलिसांच्या दृष्टीने विषय संपला असला तरी सोमणांच्या मनावरचे ओझे मात्र सारखे वाढतच गेले. आपल्या पाठीमागे अनेक गोष्टी घडल्या, याची त्यांना सारखी रुखरुख लागून राहिली, आणि या साऱ्या प्रकरणाचा छडा लावल्याखेरीज आपल्याला स्वस्थता लाभायची नाही हे त्यांना कळून चुकले.

पण तो लावायचा कसा? कुणाकडून?... जाऊ दे झाले! बापूकडून काही भयंकर घडले असेल तर त्याचे प्रायश्चित्त त्याला मिळालेच आहे; आपण का उगीच आपले डोके शिणवायचे?... पण या विचाराने त्यांचे समाधान होईना. त्याने काय केले, केव्हा, कसे केले, हे सारे त्यांना खुडलेल्या फळाप्रमाणे अगदी नजरेसमोर, स्पष्ट, तळहातावर हवे होते...

– आणि दोनतीन दिवसांनीच सोमा सोमण वकिलांच्यासमोर येऊन उभा राहिला. तो आता आपल्या गावी चालला होता. त्याने एक लांब लखोटा सोमणांपुढे ठेवला. "साहेबांनी हा तुम्हाला द्यायला सांगितलं होतं." तो म्हणाला.

"गाढवा! हा आधीच आणायला काय झालं होतं?" एकदम उसळून सोमण म्हणाले, "आधी आणतास तर कदाचित् आज बापू जिवंत राहिला असता."

"मला शप्पथ माहिती नाही." सोमा फाड्फाड् आपल्या तोंडात मारून घेत रडकुंडीला येऊन म्हणाला, "'मी गेल्यावर तीन-चार दिवसांनी हा सोमणांना नेऊन दे.' म्हणून त्यांनी मला सांगितलं. त्याप्रमाणं मी आज सकाळी आलो. शपथ, देवाची शपथ!"

सोमणांनी सोमाला जवळजवळ हाकलूनच दिले. मग पत्र उघडण्यापूर्वी ते क्षणभर थांबले. काय असेल बरे आत? वाचून संपल्यावर आपल्या भावना कोणत्या असतील? कोणता जबरदस्त धक्का या पत्रात आपल्यासाठी टपून बसला आहे?... पत्र न वाचताच फाडून टाकावे असा विचारही एकदा त्यांच्या मनात येऊन गेला; पण मग 'बापूने काय केले' हा प्रश्न आपले मन सारखे पोखरीत राहणार! तेव्हा अखेर त्यांनी निश्चय केला, आणि ते पत्र उघडून ते आतील मजकूर वाचू लागले.

"प्रिय सोमणकाका, –

"ज्या गोष्टी घडल्या त्या जशाच्या तशा मी तुमच्यापुढे मांडीत आहे. त्या तशा का घडल्या हे सांगणं माझ्या शक्तीच्या पलीकडचं आहे. कदाचित त्यांवर तुमचा विश्वासही बसणार नाही. पण माझा आयुष्याचा रस्ता संपला. आता सारं ओझं मला असह्य होत आहे. अशा वेळी मी काही खोटं सांगेन का? कृपा करून माझ्यावर विश्वास ठेवा.

"ते शेतातलं घर... तुम्हाला माहीत आहे की, मी ते तुमच्या अगदी मनाविरुद्ध घेतलं. त्यावेळी त्या घराबरोबर थोडं जुनाट सामानही मला फुकटात मिळालं. तो पूर्वीचा मालक जुने फोटो, मोडक्या खुर्च्या, एकच दरवाजा शाबूत असलेलं कपाट या साऱ्या वस्तू नेणार कुठं? त्याच सामानात एक अतिशय जुनं घड्याळदेखील होतं. त्याच्याकडे तुमचं कधी लक्षदेखील गेलं नसेल. एका उभ्या काचेच्या पेटीत मी ते टेबलावर ठेवीत असे. तशी लंबक असलेली, टेबलावर ठेवता येण्याजोगी घड्याळं हल्ली दिसतसुद्धा नाहीत.

"त्या घड्याळाचा एक चमत्कारिक विशेष होता. तासन्तास मी त्या घड्याळाजवळ वाचीत बसत असे, म्हणूनच तो विशेष माझ्या ध्यानात आला. त्याचा 'टिक् टिक्' असा आवाज सतत चालू असे; पण मध्येच काही वेळा तो आवाज घड्याळानं एकदम गळा फुगवल्याप्रमाणं असा विलक्षण भुसभुशीत, घुमणारा होत असे की, त्या वेळी मला वाटे, कुणीतरी आपल्या बाजूला आसूड घेऊन उभं आहे नि तो आवाज संपतासंपता, त्याचा फटकारा काडकन् आपल्या पाठीवर बसणार आहे! त्या आवाजाबद्दलची माझी भीती नंतर नंतर तर इतकी वाढू लागली की, तो सुरू होताच माझे हात थरथरू लागत. मी अगदी श्वास आवरून धरी. हा झटका नाहीसा झाला की, त्या घड्याळाची नेहमीची अविरत टिक्टिक् सुरू होत असे. – जणू थोडा वेळ मला घाबरवण्यासाठी ते घड्याळ थोडा वात्रटपणा करीत असे. जर पुढचे प्रसंग घडले नसते तर कदाचित् मी ते जुने घड्याळ माळ्यावरच फेकून दिले असते.

एकदा काय झालं, पोस्टमास्तर जोशी – तुम्हाला ते भेटलेच होते एकदा – आणि त्यांची बायको, दोघं जणं माझ्याकडे गुलाबाची काही रोपटी मागायला आली होती. मी त्यांना कपभर चहा दिला. चहा संपतो न संपतो, तोच त्यांचा वादविवाद सुरू झाला, – गुलाबाची रोपटी कशी लावायची याबाबत. त्याविषयी खरं म्हणजे आम्हा कुणालाच काही माहिती नव्हती. पण जोश्यांची बायको अशा जोराने भांडू लागली, की दर हातवाऱ्याबरोबर तिचं अजस्र स्थूल शरीर थरथरू लागलं. पोस्टमास्तर जोशी म्हणजे बायकोपुढं अगदी गोगलगाय. मध्येच एकदा ते 'अग, पण मी म्हणतो –' असं काहीतरी सांगू लागले. पण आपण काय म्हणतो हे सांगायला त्यांना वेळच मिळाला नाही. 'पण मी तुम्हाला सांगितलं ना एकदा की –' आपलं जाडजूड तुळईसारखं बोट उगारून त्यांची बायको म्हणाली. पण तिचं बोलणं अर्ध्यावरच थांबलं नि ते बोट तसंच अधांतरी राहिलं! इतकंच नाही, तर

तिचं शरीर जणू एकदम गोठल्याप्रमाणं तिचं तोंडदेखील तसंच अर्धवट उघडं राहिलं! मी पोस्टमास्तरांकडे पाहिलं. आतापर्यंत ज्या शांत चेहऱ्यानं ते तिचं बोलणं ऐकून घेत होते, त्याच चेहऱ्यानं ते आताही तिच्याकडं पाहात होते. ती बोलायची थांबली आहे, तिच्या शब्दांचा ओघ गोठला आहे हे त्यांच्या ध्यानातच आलं नाही. मेणाच्या दोन आकृती असल्याप्रमाणं ती दोघं माझ्यापुढं वेड्यासारखी बसली होती. असला हास्यास्पद प्रकार मी साऱ्या आयुष्यात पाहिला नव्हता. म्हणून मी खो: खो: हसू लागलो... तोच भोवती जमलेला गूढ पडदा सरकला, धागा तुटला, आणि पोस्टमास्तरांच्या बायकोचं बोट एकदम खाली आलं आणि ती पुन्हा बडबडू लागली, – 'सांगितलं ना एकदा की – पण तुम्हाला खिदळायला काय झालं इतकं?' ती चिडून मला म्हणाली. पोस्टमास्तरांनादेखील माझ्या आचरटपणाचा फार राग आला. शेवटी रोपटी न घेताच ती दोघं निघून गेली.

''या पहिल्या प्रसंगानंतर तशा वेळी मला हसू येईना. मी फक्त गोंधळत असे. हे असं चमत्कारिक का घडतं, हे मला समजेना. बरं, तुम्ही असे एकदम आखडलेले, निर्जीव का होता, असंही त्या-त्या लोकांना विचारण्याचं धैर्य मला होईना. त्यानंतरचा एक प्रसंग मी एकटाच त्या घड्याळासमोर असताना घडला. पाच वाजले होते. माळ्याला एक महत्त्वाचं काम सांगायचं राहिलं होतं, ते तो जाण्यापूर्वी सांगावं म्हणून मी उठलो.तोच घड्याळाचा तो गंभीर, भेंडाळलेला आवाज सुरू झाला. मी बाहेर आलो, तो सोमा चहाचा 'ट्रे' घेऊन माझ्याकडेच येत होता. येत होता कसला? – तो जागच्या जागी खिळून उभा होता! दोन्ही हातांत 'ट्रे' किंचित् उंचावलेला; तोंड किंचित् उघडं; इतकंच नव्हे, तर पुढं टाकण्यासाठी उचललेला त्याचा पायही तसा अधांतरी होता! पण माळी जाण्याच्या आधी त्याला मला गाठायचं असल्यामुळं मी तसाच पुढे गेलो. पुढच्या दारी जाऊन मी माळ्याला खूप हाका मारल्या, तो विहिरीवर पाय धूत आहे की काय हे पाहिलं. तो आधीच गेला होता की काय, कुणास ठाऊक! अखेर थोड्या वेळानं कंटाळून मी परत आलो, तो सोमा अद्याप तसाच उभा होता! मी अगदी जवळून गेलो तरी त्याची त्याला जाणीव नव्हती. मी टेबलावरील घड्याळाकडे पाहिलं. मला बाहेर जाऊन यायला बरोबर चौदा मिनिटं लागली होती. आणि हा सारा वेळ सोमा तसाच दगडी पुतळ्याप्रमाणं उभा होता. हा काय प्रकार आहे? हे स्वप्न तर नाही ना, असं मला सारखं वाटू लागलं, आणि गारठल्याप्रमाणं मी बधीर होऊन बसलो. तोच सोमा आत आला.

''काय रे, नुसता एक कपभर चहा करायला तुला वीस मिनिटं लागतात की काय?' मी घड्याळाकडे पाहात सोमाला म्हटलं.

''नाही साहेब, तुम्ही सांगितल्याबरोबर लगेच केला मी चहा.' तो म्हणाला. मग तो उंबऱ्यापर्यंत गेला आणि माजघरातील घड्याळाकडे पाहात म्हणाला, 'या घड्याळात पाच

वाजून सहा मिनिटं झाली आहेत. तुमच्या टेबलावर ते कुठलं जुनं घड्याळ आहे, कुणास ठाऊक! दुरुस्त करून घ्यायला पाहिजे साहेब, ते एकदा.''

''मी झटकन् माझ्या हातातील घड्याळाकडे पाहिलं. सोमाचं म्हणणं अगदी बरोबर होतं. ते जुनं घड्याळ चौदा मिनिटं पुढं गेलं होतं! आणि ती चौदा मिनिटं साऱ्या जगात फक्त माझ्याच वाट्याला आलेली होती! – जणू काळाच्या हातून मी त्याचा एक घासच हिसकावून घेतला होता. मी बाहेर गेलो, हिंडलो, त्या माळ्याचा शोध केला. – हे सारं करायला मला चौदा मिनिटं लागली होती. आणि त्या गेलेल्या वेळाची इतरांना मात्र जाणीव नव्हती.

'' 'बरं सोमा, तू चहा आणीत असताना तुझ्या समोरून कुणी गेलं का? कुणीतरी हाका मारीत असलेलं तू ऐकलंस का?' मी आवाज शक्य तेवढा स्थिर ठेवीत सोमाला विचारलं. पण त्या प्रश्नानं सोमा अगदी पार गोंधळला. 'माझ्या समोरून? नाही बा! कुणी नाही गेलं!' तो म्हणाला.

'' 'बरं, जा.' मी त्याला म्हटलं.

''काका, तुम्ही माझ्या मन:स्थितीची कल्पना करा. कालगती म्हणजे काही चिरंतन अबाधित सत्य नव्हे, ती एक वैयक्तिक जाणीव आहे हे सगळ्यांनाच थोडंफार माहीत असतं. पण काळाची गती इतरांपेक्षा माझ्या बाबतीत अगदी निराळी होती हे प्रत्यक्ष अनुभवाला येताच मी हादरून गेलो. त्या घड्याळाचा तो विशिष्ट आवाज सुरू झाला की, इतरांना न मिळणारी चौदा मिनिटं मला मिळत. म्हणजे इतर जगाचा दिवस चोवीस तासांचा, तर माझा चोवीस तास चौदा मिनिटांचा. त्या चौदा मिनिटांत इतर सारेजण एकदम गोठल्याप्रमाणं थबकत. साऱ्याच घटना जिथल्या तिथं अर्ध्यावरच स्थिर होत. सिनेमात फिल्म सतत चालू असताना गतीचा, एकामागून एक होणाऱ्या हालचालींचा, घटनांचा आभास निर्माण होतो. समजा, फिल्म मध्येच थांबवून चित्र पडद्यावर तसंच ठेवलं, तर काय दिसेल? खून करणाऱ्या माणसाचा हात तसाच वरच्या वर राहील. ओरडणाऱ्या माणसाचं तोंड बंद होणार नाही. पोहायला उडी मारणारी तरुणी पाण्यापर्यंत न येता हवेतच राहील. पण फिल्म चालू होताच पुन्हा सारं त्या क्षणाच्या पुढं सुसूत्र चालू होईल. त्याप्रमाणं त्या चौदा मिनिटांच्या अवधीत सारं जग स्तब्ध होत असे; फक्त मीच तेवढा चालू-बोलू शकत असे. त्या अवधीत मी काय करतो, काय बोलतो, याची जाणीवसुद्धा इतरांना होत नसे. म्हणजे, त्या कालगतीचा चौदा मिनिटांचा तुकडा पूर्णपणे माझा होता, त्यावर फक्त माझी हुकुमत होती.

''या आपल्या सामर्थ्याची कल्पना येताच मला प्रथम काही वाटलं असेल, तर भय! साऱ्या अंगावर कापूस फुलल्याप्रमाणं मी घाबरलो. या विपरीत प्रकाराच्या कचाट्यातून सुटण्याकरिता ते घड्याळ ताबडतोब फोडून तोडून टाकावं असं मला राहून राहून वाटू

लागलं. आता वाटतं, खरंच, त्याच वेळी मी तसं केलं असतं, तर फार बरं झाल असतं! पण नंतर मात्र त्या प्रकाराची मला फार गंमत वाटू लागली. त्या चौदा मिनिटांत काय-काय गंमती करता येतील, याचा मी सारखा विचार करू लागलो. खरंच, कितीतरी गोष्टी मला करता आल्या असत्या! रमी खेळत असताना माणिक देशमुखनं पानं घेताच जर ही चौदा मिनिटं सुरू झाली, तर त्याच्या हातातली पानं घ्यावी, नि दुसरी एका रंगाची सारी तेरा पानं व्यवस्थित लावून त्याच्या हातात ठेवावीत आणि चौदा मिनिटांनंतर त्याच्या चेहऱ्याचा टेक्निकलर फोटो घ्यावा! नानू साठेनं आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावर 'शुद्ध खोबरेल' ('मी ना? मी नेहमी शुद्ध खोबरेल वापरतो!' हे त्याचं घोषवाक्य आहे.) चोळताच चांगल्या टिकाऊ हिरव्यागार रंगानं त्याचं डोकं रंगवून ठेवावं! आणखी कुणाला तरी चहाला बोलवावं, नि त्याच्यापुढं उकडलेलं अंडं ठेवावं. त्यानं खायला सुरुवात करताच थोड्या वेळानं पंख फडफडवणारं कोंबडीचं एक जिवंत पिल्लू त्याच प्लेटवर ठेवावं! एखादा कंटाळवाणा वक्ता लांबण लावू लागला की, त्याला उचलून ख्रिश्चन लोकांच्या स्मशानभूमीत एका थडग्यावर नेऊन उभं करावं! एकदा तर काय वाटलं मला, माहीत आहे? लोकांना बुडवून, काळा बाजार करून गब्बर झालेला तवनाप्पा शेट्टी जाहीर सभेत निर्लज्जपणं स्वार्थत्यागाचा उपदेश करू लागला, की सरळ व्यासपीठावर जावं नि त्याच्या धोतराची गाठ सोडून परत यावं! पण यातली कोणतीच गंमत कृतीत उतरली नाही. मी उत्सुकतेनं त्या घड्याळाच्या घोगऱ्या आवाजाची वाट पाहावी, तो चौदा मिनिटांचा तुकडा सुरू होऊन संपावा नि माझ्या हातून मात्र काही होऊ नये, असंच वरचेवर होऊ लागलं. शेवटी तर, या आपल्या सामर्थ्याचा आपण एकदा तरी उपयोग केलाच पाहिजे, या विचाराचं जडसं ओझंच माझ्या मनावर पडल्यासारखं वाटू लागलं. त्यामुळं मन पोखरल्यासारखं होऊ लागलं.

"या अशा मन:स्थितीत असता, मी तुम्हाला बस स्टॅंडजवळ डॉ. बेहेऱ्याबरोबर पाहिलं. दुसऱ्याच दिवशी मी त्याला माझ्याकडे दोन दिवस येऊन राहण्याचं आमंत्रण दिलं. अगदी परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो, त्या वेळी माझ्या मनात कसलाही दुष्ट हेतू नव्हता. आपलं जुनं भांडण मिटवावं, सारं काही एकदा कायमचं विसरून जावं, अशीच माझी खरी इच्छा होती. यात माझा मोठेपणा नव्हता, तर सगळा स्वार्थ होता. कारण त्या भांडणाचा काटा माझ्या मनात सारखा सलत होता. त्याचं विष भिनत असल्यामुळं माझ्या मनाचा, आयुष्याचा तोलच बिघडला होता. घड्याळामुळं मिळालेलं सामर्थ्य गेलं खड्ड्यात! ते विसरून जावं, नि दैनंदिन सामान्य जीवनात आपण पुन्हा मिसळून जावं, असं मला वाटत होतं. पण बेहेऱ्यानं माझ्या घरी यायचं कबूल करताच मात्र माझा उत्साह मावळला. इतकंच नाही, तर त्याला बोलावल्याबद्दल थोडा पश्चात्तापही वाटू लागला मला.

"माझं बेहेऱ्याशी भांडण का झालं, याविषयी मी सविस्तर लिहीत नाही. खरं म्हणजे मला त्याचा फार पूर्वीपासून अतिशय मत्सर वाटे. तेच आमच्या भांडणाचं खरं कारण. आम्ही शाळेत एकत्र शिकत होतो. पण दर खेपेला त्याला माझ्यापेक्षा थोडं जास्तच यश मिळायचं. मी साऱ्या वर्गात दुसरा आलो, की पहिला नंबर हमखास बेहेऱ्यालाच मिळालेला असे. मला ज्या वेळी हॉकी-टीममध्ये घेण्यात आलं, त्याच वर्षी त्यालाही घेण्यात आलं. पण तो लगेच कॅप्टन झाला. साऱ्या आयुष्यात मी एकदाच पहिला आलो. पण त्या आनंदालाही फारसा अर्थ नव्हता. कारण आजारी असल्यामुळं बेहेरे त्या वर्षी परीक्षेला बसलाच नव्हता. म्हणजे तो नव्हता, म्हणूनच मी पहिला आलो असंच साऱ्यांना वाटलं. नि माझं मन अधिकच जळफळू लागलं. कारण माझ्या मनात खोल कुठंतरी, लोकांचं ते म्हणणं बरोबरच आहे, असं वाटत होतं. मी पाचवा, आठवा, शंभरावा आलो असतो, तर बेहेऱ्याच्या यशाचं मला कधीच वैषम्य वाटलं नसतं. कारण मग तो आपल्या फारच पुढं आहे, अशा समजुतीनं मी गप्प राहिलो असतो. पण आमच्यांत नेहमी एका वितीचंच अंतर असे, एका पावलाचंच. अगदी हातातोंडाशी आलेलं यश त्यानं अनेकदा हिरावून घेतलं माझ्या हातून!

"आणि नंतर कुमुदनं त्याच्याशी लग्न केलं. तो नसता तर तिनं खात्रीनं माझाच स्वीकार केला असता. तिनं त्याच्याशी लग्न केल्यावर तर, आपल्यावर कुणीतरी अजस्र टाच ठेवून आपल्याला चिरडलं आहे असं मला वाटू लागलं. तिनं माझ्याशी लग्न केलं असतं, तर तिच्या सुखाच्या सावलीत माझं आयुष्य विसावलं असतं, माझ्या आधीच्या अपयशांचा मला विसर पडला असता. पण तिथंसुद्धा त्याची छाया पडली नि माझं सारं आयुष्य वठून गेलं.

"नंतर आमचा फारसा संबंध आला नाही. मला वाटलं होतं, इतक्या दिवसांनंतर हा मत्सराचा निखारा विझला असेल; पण नाही. माझ्या मनाच्या काळोखात कोणकोणती श्वापदं दबा धरून बसलेली होती याची मला कल्पना नव्हती.

"बेहेरे माझ्या त्या घरात येऊन तास दोन तास झाले असतील-नसतील, तोच सारं ज्वलंत धगीनं वर उफाळून आलं. आता त्याची प्रॅक्टिस फार जोरात चालू होती. त्याला शाळांच्या समारंभांची आमंत्रणं येऊ लागली होती. काही वेळा आजारी माणसाला जेवणाचं नाव काढताच मळमळायला लागतं, त्याप्रमाणं त्याच्या हसण्याच्या आवाजानं माझ्या पोटात उमळल्यासारखं होऊ लागलं. त्याचा हसरा, आत्मविश्वासी चेहरा पाहताच 'ॲश-पॉट' फाड्दिशी त्याच्या तोंडावर मारावं असं मला वाटू लागलं. हे यश, हे सुख कुमुदच्या शांत प्रेमाच्या काठावर वाढलं आहे, जोपासलं आहे, आणि हे सारं सुख आपलं होतं, ते त्यानं हिरावून घेतलं आहे, ही विषारी जाणीव सारखी माझ्या मनात जळू लागली.

"त्याच वेळी योगायोगानं, घड्याळाचा तो लाकडावर आदळत असल्याप्रमाणं होणारा विलक्षण आवाज सुरू झाला. माझं हृदय त्याहीपेक्षा मोठ्यानं धडधडू लागलं. पण अचानक धारेवरून प्रकाश खेळवणारा लखलखीत सुरा हातात यावा त्याप्रमाणं पाशवी समाधानानं माझं मन ताठरलं. पत्ते खाली टाकून बेहेरे झोपायला गेलेला होता. त्या चौदा मिनिटांची सुरुवात होताच, देसाई-सराफांचं बोलणं तटकन् तुटलं. देसायांची जांभई त्यांच्या जाडजूड चेहऱ्यावर तशीच राहिली. मी उठलो नि बेहेऱ्याच्या खोलीत गेलो. तो अद्याप कपडे काढीत होता. शर्टाची बटणं काढता काढताच त्याचा हात कॉलरशी चिकटला होता. मी माझी बंदूक घेतली, नि तिचं टोक काळजीपूर्वक बेहेऱ्याच्या अगदी छातीजवळ धरलं. इतकी वर्षं साकळलेल्या रक्ताप्रमाणं काळानिळा झालेला संताप एकदम विषारी वायूप्रमाणं पेटला. मी शांतपणे गोळी झाडताच तो उलथून बाजूला पडला. मी बंदूक पुसली नि त्याच्या हातात दिली. मग खाली येऊन पुन्हा खुर्चीवर बसलो. चौदा मिनिटं संपताच सराफ-देसाई पुनः पूर्ववत खेळू-बोलू लागले. त्यांची जाणीव परत आली होती. मधल्या चौदा मिनिटांत मी काय केलं त्याची त्यांना काहीच कल्पना नव्हती... माझे हातपाय थरथरत नव्हते. अनेक वर्षं ठसठसत असलेलं गळू एकदम बरं झाल्याप्रमाणं मला एकदम प्रसन्न वाटलं, – निदान त्या क्षणी तरी. बेहेऱ्यानं अंधारातून अदृश्य हातांनी आपल्या खुनाचा बदला घेतला. पण ते सारं नंतर घडलं. काका, बेहेऱ्याचा खून मी अशा तऱ्हेने केला होता.

तुमचा
बापू."
(आधारित)

निबंध
३४६२
३४३१८२
२६५४८

# सौदा

चर्नीरोडवरील एका हिरवट रंगाच्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावर कामत राहात होते. एका खिडकीवर आता मळक्या झालेल्या, मेलेल्या फुलांचा पडदा लावलेला होता आणि भिंतीवर लठ्ठ, आकारहीन स्त्रियांची चित्रे काढणाऱ्या एका चित्रकाराच्या चित्राचे निर्लज्ज कॅलेंडर होते. खाली रस्त्यावर अजस्र लाल झुरळांप्रमाणे ट्रॅम-बसेस धावत; मध्येच एखाददुसरे कबुतर फडफडत खिडकीच्या कठड्यावर येऊन बसे; नळाचे पाणी सोडल्याचा आवाज येई... या ठिकाणी कधी काही विशेष घडेल असे वाटण्याजोगे तिथे काहीच नव्हते. पण आता तिथेच नेमके काहीतरी घडणार होते... याच गोष्टीची कामतांना गंमत वाटली. त्यांनी सिगरेटचे थोटूक पायाखाली चिरडले आणि हसत ते स्वतःशी पुटपुटले, 'छट्! मंत्रतंत्रासाठी ही असली जागा विलक्षणच म्हणायची!'...

थोड्या वेळाने सामंत तिथे आला. त्याने न विचारताच पाकिटातून एक सिगरेट उचलली नि कामतांचे जे काही आहे ते सारे आपलेच आहे अशा ऐटीने ती पेटवली. मग त्याने बरोबर आणलेले पुस्तक कामतांपुढे टाकले आणि तो म्हणाला, "हं, हे ते पुस्तक."

कामतांनी पुस्तक हातात घेतले; पण ते त्यांनी उघडले नाही. त्याऐवजी ते त्यांनी टेबलावर असलेल्या थर्मासशेजारी काळजीपूर्वक ठेवून दिले. कामतांचे पुस्तकांचे दुकान होते, आणि ते फारसे बरे चालत नव्हते. पण त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिले की, हा मनुष्य कधी दीनपणाने कुणाकडे याचना करील असे वाटत नसे. कामत म्हणताच बर्फात ठेवलेल्या सुरीची आठवण व्हावी, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे सारे आयुष्यच असे संथ, धारदार होते की, त्यांना अस्वस्थ करणारा, गोंधळात टाकणारा प्रसंगच असणे कठीण. याच्या उलट, सामंताकडे पाहिले की, मूठभर सूर्यप्रकाश हातात घेऊन सर्वत्र उधळावा तसे वाटे. आणि मनमोकळेपणा तर त्याच्या चेहऱ्यावर एखाद्या जाहिरातीप्रमाणे छापलेला होता!

"अरे, तुझं पुस्तक आणायचं म्हणजे मोठा उपद्व्यापच झाला!" सामंत सांगू लागला, "तू चिठ्ठी दिलीस तरी सारखी घासाघीस घालीत होता तो दुकानदार!"

"होय का?" कामत म्हणाले, "पण त्या दुकानात वाटेल ते पुस्तक मिळू शकतं."

"पण एवढ्या घाईनं कशाला रे पुस्तक?" सामंताने विचारले.

''अं – सहज गंमत म्हणून!'' उत्तर देण्याची टाळाटाळ करीत कामत म्हणाले, ''थांब हं, सुमतीचं झालं का पाहतो. तिचा शृंगार व्हायला पुष्कळदा तासन् तास लागतात!''

– कामतांचा हा नेहमीचा विनोद. सामंत औपचारिकपणे हसला. ''अरे, सगळ्याच बायकांना लागतो इतका वेळ!'' तो म्हणाला, ''पण खरं सांग हं, मी तिच्याबरोबर जायला तुझी काही हरकत नाही ना?''

''छट्! हरकत कसली? उलट मला तुझे आभारच मानले पाहिजेत.'' कामत म्हणाले, ''नाही तर मोठी पंचाईत झाली असती. आम्ही बाहेर जायचं ठरवलं होतं आणि माझं तर ऐन वेळी काम निघालं. तू ठरल्याप्रमाणं आला नसतास तर सुमतीची फारच निराशा झाली असती.''

कामत आत गेले तेवढ्यात सामंताने ते पुस्तक उघडले. तोच कामत पुन्हा बाहेर आले.

''ती गोष्ट त्या 'माकड आणि पाचर' सारखी आहे!'' असे कामतांनी किंचित् हसून औपरोधिकपणे म्हणताच सामंत शरमला आणि त्याने ते पुस्तक झटकन् बाजूला ठेवले. ''सहज पाहिलं आपलं. काहीतरी जादूटोण्याच्या गारुडाचं पुस्तक दिसतंय्.'' तो हसून म्हणाला.

''पण तुला ती भाषा येतेय् कुठं? सुमती आत्ता येईल पाच मिनिटांत.'' सिगरेट पेटवून कामत म्हणाले, ''पुस्तकाच्या पहिल्याच पानावर काय लिहिलं आहे माहीत आहे? जो पवित्र माणूस आहे, त्यानंच इथं पाऊल टाकावं. यातलं काही करून पाहशील तर 'बाल'च्या तडाख्यात सापडशील.'' सामंताने न कळून विचारले, ''म्हणजे?'' ''होय. तो सिरियन लोकांचा भीषण शब्द आहे.'' कामत सांगू लागले, ''अंधाराचा शब्द! अरे, नुकतीच जन्मलेली ताजी मुलं ते बळी देत असत. आहेस कुठं तू?''

''पण तू यांतलं काही करून पाहणार आहेस की काय?'' सामंत म्हणाला, ''असल्या गोष्टींत मनुष्य एकदा पडला की, अगदी 'मॅड' होतो बघ! माझा एक मित्र होता, त्यानं सारा पैसा यातच घातला नि शेवटी पैला महाग होऊन बसला! कुठं सावली दिसली की तिच्या काठ्या मोजू लागायचा!''

''खरंच?'' किंचित् पुढे होऊन उत्सुकतेने कामतांनी विचारले, ''कसा होता तो? बुद्धिमान् होता? मानसशास्त्राचं काही ज्ञान होतं त्याला?''

''मानसशास्त्र गेलं खड्ड्यात!'' सामंत हसून म्हणाला, ''अरे, तो पेट्रोल-पंपावर कामाला होता. पण मोठमोठे प्रोफेसरदेखील असल्या भानगडीत खलास होतात! म्हणून म्हटलं, संभाळ हं...''

सामंताने पुन्हा एकदा पुस्तकाची पाने चाळली. त्यात गाठीगाठीच्या, दहा हातापायांच्या प्राण्याचे एक चमत्कारिक चित्र होते. सामंताने घाबरल्यासारखे करून शीळ वाजवली.

"अरे, असला एखादा प्राणी जगात असलाच, तरी त्याला घाबरायचं बिलकूल कारण नाही." कामत हसून म्हणाले, "पण आपलं मन मात्र शांत, स्थिर ठेवलं पाहिजे. थोडंसं मानसशास्त्राचं ज्ञान असलं, तर असला प्राणीदेखील काहीही करू शकणार नाही...

"हे बघ, असल्या प्राण्यांचं सामर्थ्य असतं कशात?" कामत पुढे सांगू लागले, "जर तू बराच काळपर्यंत आपला एक हात वापरला नाहीस तर काय होईल? थोड्या दिवसांत तो लाकडासारखा निर्जीव होऊन जाईल. तसंच आहे यांचंही. असल्या प्राण्यांचं बळ दांडगं असतं हे खरं; पण ते फार बुद्धिमान्, चतुर असतात असं कुठं तरी वाचण्यात आलं आहे का तुझ्या? – त्यांना आपली बुद्धी वापरण्याची गरजच पडली नसेल हजारो वर्षं. तेव्हा त्यांना जर एखादा तल्लख, स्थिर मनाचा माणूस भेटला, तर तो खास त्यांच्याशी टक्कर देऊ शकेल."

"असेल बुवा!" कंटाळल्यासारखा चेहरा करून सामंत म्हणाला, "पण असल्या प्राण्याची पक्कड माझ्या गळ्यावर बसताच माझी सारी बुद्धीच खलास होईल!"

इतक्यात सुमती बाहेर आली. किंचित् अधिक तलम पातळातली तिची बांधेसूद आकृती अगदी रेखीव, उन्मादक वाटत होती. तिला पाहताच कामतांच्या डोळ्यांत द्वेषाची एक विखारी छटा तरळून गेली, – पण ती अगदी क्षणभरच. ते लगेच पुन्हा हसले.

"सॉरी, जरा उशीर झाला हं." सुमती सामंताला म्हणाली, "आज अनपेक्षितरीत्या तुम्हाला माझी संगत सहन करावी लागणार हो!"

सामंत आणि सुमती निघून गेल्यावर कामत घाईघाईने खाली आले, आणि कोपऱ्यावरच्या इराण्याच्या दुकानातून त्यांनी हॉस्पिटलला फोन केला : "हॅलो! कोण, रजनी का?.. खरंच, आज मला तुला भेटता येणार नाही. ...शपथ, अचानक काम निघालं! पण उद्या मात्र नक्की, नेहमीच्या ठिकाणी भेटतो. पण तोपर्यंत तू युनिफॉर्म काढून बस बरं का! नाही तर युनिफॉर्ममधल्या नर्सबरोबर हिंडताना पाहून लोक मला रोगीच समजायचे!" कामत हसले आणि शीळ वाजवीत आपल्या ब्लॉकवर परत आले आणि त्यांनी दरवाजा आतून बंद करून घेतला.

नंतर त्यांनी थर्मास उघडला आणि त्यातून एका भांड्यात अद्याप किंचित् उष्ण असलेले रक्त ओतले. आपल्याला 'मटण नको, नुसतं रक्त पाहिजे' असे म्हणताच खाटकाचा भोपळ्यासारखा चेहरा कसा वळशावळशांनी मोठा झाला हे आठवताच आताही त्यांना एकदम हसू आले. असल्या गोष्टींना नेहमी ताजे रक्तच का लागते, याचा विचार करीत कामतांनी ते पुस्तक उघडले आणि ते वाचू लागले. आपण आता काही विशेष

करीत असलो, तरी आपले मन मात्र शांत ज्योतीप्रमाणे राहिले पाहिजे, असा इषारा ते स्वत:ला सारखा देत होते.

थोड्या वेळाने भांड्यातील रक्त आपोआप नाहीसे झाले. कामतांचे वाचनही संपले. इतक्यात खोलीतील दिवा मंद झाला आणि तो आता विझतो की काय असे क्षणभर भासले; पण कामतांनी लगेच स्वत:ला सावरले. 'छट्! हा सारा मनाचा खेळ आहे ! वीज डायनामोवर अवलंबून असते, आणि जादूटोण्याचा डायनामोवर काय परिणाम होणार, कपाळ!... ' त्यांनी स्वत:च्या मनाची समजूत घातली.

दिवे पुन्हा पूर्वीसारखे झाले खरे; पण नंतर खूप उंचावरून आपण एका हिरव्या खोलीत पाहात आहो असा कामतांना भास झाला. खोली खूप खाली होती. त्यामुळे त्यांना भोवळल्यासारखे झाले. पण त्यांनी पुन्हा स्वत:ला सावरले आणि कठोरपणे बजावले, 'हां! पुन्हा असं जाळ्यात सापडायचं नाही. खाली एक खोली दिसतेय् खरी. पण कुणास ठाऊक, माझ्या खोलीतल्या जमिनीला भोक पडलेले असेल नि खालच्या खोलीतल्या गृहस्थाने आपल्या खोलीला हिरवा रंग दिलेला असेल...'

कामतांची भीती, भोवळ पार नाहीशी झाली. त्यांनी पुन्हा खाली दिसणाऱ्या खोलीकडे पाहिले. आता तिथे त्या चित्रात पाहिलेली, गाठीगाठींच्या हातापायाची आकृती उभी होती. तिने आपले हात खूप उंच केले. त्यामुळे हातांची अणकुचीदार नखे कामतांच्या अगदी डोळ्यांजवळ आली. पण ते मुळीच घाबरले नाहीत.

"पाहिलंस ? मला तुझी बिलकूल भीती वाटत नाही." ते म्हणाले, 'तू आता वर ये' असे ते पुढे म्हणणार होते; पण 'वर' – 'खाली' हे शब्द वापरणे म्हणजे त्या जाळ्यात आपण थोडे तरी सापडलो आहो, याची कबुली देण्यासारखेच आहे असे त्यांना वाटले. तेव्हा शब्द फिरवून ते म्हणाले, "ये की इकडेच. म्हणजे आपल्याला स्वस्थपणे बोलता येईल."

दुसऱ्याच क्षणी ती हिरवी खोली, तो प्राणी – सारे काही पुसल्याप्रमाणे नाहीसे झाले. कामतांच्या समोर खरखरीत हनुवटीचा, बसक्या नाकाचा एक दांडगट माणूस मात्र दिसू लागला. त्याचे ओठ फार जाड होते आणि पाठीमागून ओढल्याप्रमाणे ते दातांवर ताणले गेल्यासारखे दिसत होते.

"बस की! उभा का ? आणि बोल काहीतरी, घुम्यासारखं उभं राहण्यापेक्षा!" किंचित् चिडून कामत म्हणाले. पण आपण तसे म्हटले नसते तर बरे झाले असते असे त्यांना नंतर वाटले. कारण त्या माणसाने बोलण्यासाठी तोंड उघडताच त्याचे सुळ्यासारखे क्रूर दात उघडे झाले.

"माझी भीती वाटत नाही तुला ?" त्या माणसाने घोगऱ्या आवाजात विचारले.

''ते जाऊ दे रे. मी तुला घाबरून अगदी थरथर कापतो आहे असं दिसतंय का तुला?'' आता खरेच रागावून कामत म्हणाले, ''बोल, काय नाव तुझं?''

''माझं खरं नांव काय करायचं आहे तुला? मी 'बाल' आहे. 'बाल' म्हणजे त्या भाषेत परमेश्वर. पण माझ्या नावाशी तुझा काही संबंध नाही. तू मला 'क्ष' म्हटलंस तरी चालेल.'' तो माणूस म्हणाला.

''तुला न घाबरणारा माणूस तुला पूर्वी कधी भेटला आहे?'' उत्सुकतेने कामतांनी विचारले. पण 'क्ष' काहीच बोलला नाही. '' सांगू नकोस हवं तर,'' कामत पुढे म्हणाले, ''पण माझं ऐक. यावेळी तुझी गाठ एखाद्या भेदरट, गोंधळलेल्या माणसाशी नसून एका बुद्धिमान् व्यक्तीशी आहे. मला तुझ्याकडून काहीतरी हवं आहे, मी त्याची किंमत द्यायला तयार आहे. हा एक सरळ व्यवहार आहे.''

''वा! छान व्यवहार आहे!मी तुझं काम करायला तयार आहे अगदी!'' – 'क्ष' उत्साहाने म्हणाला.

''पण त्याबद्दल तुला काय किंमत हवी? माझा आत्मा?'' कामतांनी जरा बिचकतच विचारले. त्यांनी आत्मा विकून भोग मिळवलेल्यांच्या अनेक कथा वाचल्या होत्या. पण तो प्रश्न ऐकून 'क्ष' खो खो हसू लागला.

''आत्मा? आत्म्याला कवडीचीही किंमत नाही. इतरांना तुम्ही मानवांनी बनवलं, म्हणून मी त्या शब्दानं फसेन की काय? कुणीही मला 'आत्मा देतो' म्हटलं की, मी म्हणतो, 'ठीक आहे, दाखव तुझा आत्मा. पसंत पडल्यास ठरवू सौदा.' अरे, तुम्ही लोक इतक्या गप्पा मारता त्या आत्म्याविषयी, पण कुणा एकाला तरी दाखवता आला आहे का तो कधी? आणि मी असला बुडीत सौदा जाणूनबुजून करीन की काय? – छट्! तुझा आत्मा गेला खड्ड्यात! मला तुझं शरीर पाहिजे. माणसाचं मांस. – त्याची चव काही निराळीच असते!'' 'क्ष' पुन्हा हसला आणि आपल्या जाडजूड रानवट ओठांनी त्याने एक मिटकी मारली.

''ठीक आहे. पण मी याला कबूल झालो तर मला काय मिळेल?'' कामतांनी विचारले.

''तुला हवं तर चांगलं घर मिळेल. खूपसा पैसा मिळेल. पण हां! – माझ्याही सामर्थ्याला मर्यादा आहे बरं का!'' 'क्ष' म्हणाला.

''हो, मला खूप पैसा हवाय् खरा.'' किंचित् विचार करीत कामत म्हणाले, ''पण असं पहा, तू मला काहीतरी मोठी देणगी देशील; पण त्यामुळं साऱ्या जगाला माझा संशय येईल, आणि मला तिचा उपभोगच घेता येणार नाही.''

"असं कसं होईल?" 'क्ष' समजावणीच्या स्वरात म्हणाला, "माझ्या देणग्या अगदी सहज येतील. कुणाला त्याचा संशयदेखील येणार नाही. मात्र फक्त दोनच देणग्या मिळतील बरं का!"

"बरंय, दोन खूप झाल्या!" कामत म्हणाले, "त्यापैकी एक म्हणजे मला एक लाख रुपये हवे आहेत."

"ठीक आहे. आणि दुसरी मागणी कोणती?"

"माझी बायको आहे ना सुमती तिचा काटा निघाला पाहिजे, विशेष भानगड न होता. इतकंच नाही, तर उरलेलं तिचं सारं आयुष्य अपमानानं, शरमेनं पोळत राहिलं पाहिजे." कामतांनी आपली दुसरी मागणी सांगितली.

"हीही मला मान्य आहे." समाधानाने गुडघ्यावर हात आपटीत 'क्ष' म्हणाला.

"मग पुढं काय?" कामतांनी विचारले.

"पुढं काय? या दोन मागण्या पूर्ण झाल्यावर मी तुला खाऊन टाकणार." 'क्ष'ने हसत उत्तर दिले.

"छट्! हे आपल्याला बिलकूल पसंत नाही. सौदा एकदम रद्द!" खुर्चीवरून उठून कामत म्हणाले.

"खाऊन टाकणार म्हणजे एकदम नाही. या देणग्यांचा आनंद मिळेल तुला काही काळपर्यंत. एकदम सौदा रद्द करून कसं चालेल?" घाईघाईने 'क्ष' सांगू लागला.

कामत मनातून बेहद्द खूष झाले. मानसशास्त्र बरोबर काम करीत होते. या 'क्ष'चेही कुठेतरी मर्म असावे असे त्यांना सारखे वाटतच होते.

"पण काय रे, तुला जर मला खायचंच होतं, तर इथं आल्याबरोबरच का खाल्लं नाहीस?" धूर्तपणाने कामतांनी विचारताच 'क्ष'चा चेहरा साफ पडला, आणि तो किंचित् हताश दिसू लागला.

"हां, त्याला काहीतरी कारण खासच असावं." कामत पुढे म्हणाले, "तू प्रथम हिरवी खोली निर्माण केलीस, मला घाबरवण्याचा प्रयत्न केलास. जर मी आपण होऊन तुझ्या खोलीत आलो असतो, तर खलासच झालो असतो. या पुस्तकात स्पष्ट लिहिलेलं आहे की, आपण होऊन कुणी तुझ्या गुहेत आल्याखेरीज तुला कुणाला खाताच येत नाही, आणि मी तर तुझ्या हिरव्या खोलीत कधीच येणार नाही."

"पण एकदा सौदा ठरल्यावर तू फसवणार की काय मला?" एकदम चिडून 'क्ष'म्हणाला, "आणि शेवटी माझ्या तडाख्यातून तू सुटणार तरी कसा?"

कामत एकदम मोठ्याने हसले. "हे पहा, माझं वजन एकशेऐंशी पौंड आहे. इतका मोठा घास तुला सहजासहजी कधी मिळेल का? तेव्हा तू मला थोडी सवलत द्यायला हवीस. अचानक मागून येऊन तू माझ्या मानगुटीला बसता कामा नये."

"बरंय्. मग आपण असं करू," विचार करीत 'क्ष' म्हणाला, "मी तुझ्या मार्गात तीन दरवाजे ठेवतो, निरनिराळ्या रंगांचे. एका दरवाज्याचा रंग निळा असेल. तो दरवाजा उघडताच तुझी एक इच्छा पूर्ण होईल. दुसऱ्याचा रंग पिवळा असेल. तिथं तुझी दुसरी इच्छा पूर्ण होईल. त्यानंतर तिसरा दरवाजा असेल. –"

"आं ? काय ?" कामतांनी उत्सुकतेने विचारले.

"त्या तिसऱ्या दरवाज्यामागं मी तुझी वाट पाहात उभा असेन." 'क्ष' उत्तरला.

"परंतु त्या दरवाज्याचा रंग कोणता असेल ?" कामतांनी अधीरपणे विचारले.

"वा ! तो रंग सांगितला की संपलंच की !" 'क्ष' म्हणाला, "पण तो रंग पिवळा किंवा निळा असणार नाही एवढं मात्र सांगतो मी."

– उरलेले रंग असून असणार किती ? ते आपल्याला सहज टाळता येतील, असा विचार करून कामतांनी आपला विचार पक्का केला आणि ते मोठ्या उत्साहाने 'क्ष'ला म्हणाले, "ठरलं ! सौदा मान्य आहे मला !"

"पण अजून थोडं सांगायचं आहे मला." 'क्ष' म्हणाला, "तुझ्या दोन मागण्या पूर्ण झाल्या की, मी तुझ्यात थोडा फरक करणार आहे. – म्हणजे तुला चार डोळे किंवा दोन शिंगं देणार आहे असं नाही. – अगदी साधा किरकोळ फरक बरं का ! आपली मालमत्ता दाखवण्यासाठी छोटीशी खूण करतात ना, तसा एक छोटासा फरक. तुझ्या हातावर कदाचित् एक तीळ उमटेल, किंवा कानशिलावरचे चार केस पांढरे होतील. हा फरक एवढा किरकोळ असेल, की तुला तो जाणवणारही नाही. पहा बुवा ! ही अट असेल तुला मान्य, तर सौदा ठरला. या अटीशिवाय मला काहीच करता येणार नाही."

कामतांनी बेफिकीरपणे खांदे उडवले आणि ही अट स्वीकारली. 'क्ष' समाधानाने उठला आणि जायला निघाला.

"पुन्हा ये कधीतरी." कामत हसून म्हणाले, "तुझ्यासारखे पाहुणे यायला भाग्य लागतं...हो ! ते आहे माझ्या ध्यानात. दर खेपेला मी तुझ्यासाठी ताजं रक्त आणून ठेवीत जाईन. बरंय्..."

तो गेल्यानंतर कामतांनी आपला हात किंचित् पुढे धरून पाहिला. – तो अगदी स्थिर, निष्कंप दिसत होता. आपण अशा वेळीदेखील मन कसे समतोल ठेवले याचा त्यांना फार अभिमान वाटला. त्यांनी भांडे उचलले आणि नळावर जाऊन स्वच्छ धुतले. नंतर आत येऊन विजयी मुद्रेने त्यांनी एक सिगरेट पेटवली.

तीन दरवाजे – पहिला निळा, दुसरा पिवळा... पण तिसऱ्या दरवाज्याचा रंग कसा असेल बरं ? तिसरा मूळ रंग म्हणजे तांबडा. पण इतक्या सहजपणे समजणारा रंग ठेवील

का 'क्ष'? मग हिरवा? छे:! तो रंग तर त्याने प्रथमच आपल्या खोलीत दाखवला होता! अखेर त्यांनी 'इतक्यात का त्याचा विचार? त्याला अवकाश आहे,' – असा विचार करून खोलीच्या साऱ्या खिडक्या उघडल्या. हवा कशी झळाळल्यासारखी झाली होती. तेव्हा जवळच कुठेतरी फिरून यावे म्हणून कामत बाहेर पडले. बाहेर पडून अर्धा तास झाला असेल-नसेल, तोच त्यांचा एकदम तोल गेला, आणि त्यांचे डोके जमिनीवर आदळताच डोळ्यांपुढे अंधारी आली.

कामत ज्या वेळी शुद्धीवर आले त्या वेळी आपण हॉस्पिटलमध्ये असल्याचे त्यांना आढळून आले. "काय झालंय् मला?" डोळे उघडून त्यांनी एकदम विचारले. त्याबरोबर तिथे बसलेली नर्स एकदम दचकली आणि धावत जाऊन डॉक्टरला घेऊन आली. डॉक्टरने कामतांचे टेंपरेचर घेतले, नाडी तपासली आणि ओठ पैशासारखे गोल केले. जणू हे सारे झाल्याखेरीज हसण्याला परवानगी नसल्याप्रमाणे मग तो एकदम हसला आणि त्याने सारी हकीकत कामतांना सांगितली. एका मोटरचा धक्का लागून कामत ऑपेरा हाऊसजवळ रस्त्यात पडले होते. त्या गोष्टीला होऊन गेले असतील आता पंधराएक दिवस... "आणि हो," ते पुढे म्हणाले, "तुमच्या मिसेस् तुम्हाला भेटायला आल्या आहेत."

सुमती आत येताच डॉक्टराने तिला खुणावले आणि काहीतरी न सांगण्याबद्दल बजावले. ही गोष्ट कामतांच्या दृष्टीतून सुटली नाही. त्याबद्दल त्यांनी सरळच सुमतीला विचारले. तिने प्रथम सांगायची टाळाटाळ केली. कामतांनी फारच आग्रह केल्यावर अखेर तिने सारी हकीकत सांगितली. त्यांच्या पुस्तकांच्या दुकानाला आग लागून सारे सामान जळून गेले होते.

"जाईना का!" कामत म्हणाले, "मी विमा उतरवलेला होता त्याचा!"

"पण त्याचे हप्ते कुठं भरलेय्त तुम्ही? सामंतांनी सारी चौकशी केली." चिडून सुमतीने म्हटले, "म्हणजे एकंदरीत काय, तुम्ही अगदी खलास झालात. – कफल्लक!"

"तुम्ही कफल्लक झालात!" औपरोधिकपणे हसून कामत म्हणाले, "आम्ही नव्हे! छान! चांगली झाली तुझी सप्तपदी माझ्या आयुष्यात. बरं, तू जा आता!"

नंतर बराच वादविवाद करून कामतांनी कंटाळलेल्या डॉक्टरकडून हॉस्पिटलातून घरी जायला परवानगी मिळवली.

'मी त्या क्षकडे एक लाख रुपये मागितले होते, तर मिळालं काय हातात? तर भिक्षेची झोळी! तो 'क्ष' माणूस आहे की राक्षस आहे?...' ते रागाने स्वत:शी उद्गारले.

फिरत फिरत कामत आपल्या दुकानाकडे आले. ठिकठिकाणी जळके डाग दिसत होते आणि आता त्या ठिकाणी मालकाने अगदी व्यवहारी दृष्टीने लावलेली 'जागा भाड्याने देणे आहे.' अशी पाटीही दिसत होती. तोच कामतांच्या मनात एक कल्पना आली. ते कित्येक वेळा काळबादेवीवरील नथुमल 'ठग' (अर्थात 'ठग' हे त्यांनी दिलेले खाजगी नाव

होते.) याच्याकडे सट्टा खेळायला जात असत. नथुमल हा शेअर-दलालही होता. अर्थात् या साऱ्या गोष्टी कामत 'देशपांडे' या नावाखाली करीत. हो, करता काय! एखाद वेळी सारे प्रकरण गळ्यात आले तर निदान अब्रू तरी जायला नको! शिवाय, सुमतीला त्यांच्या खाजगी गोष्टीत जादा लक्ष घालायची फार सवय होती. आणि त्या रजनीलाही समजले, तर मग पाहायलाच नको! मग हाताला एक पैही लागायची आशा नको!...

कामत इराण्याच्या दुकानात शिरले आणि आपल्याजवळचे शेवटचे दोन आण्यांचे नाणे त्याच्यापुढे टाकून त्यांनी नथुमलला फोन केला.

"अरे, तुमी लोक काय बाटलीबिटली मारता काय?" अशी चिडखोर पण प्रेमळ सुरुवात करून नथुमल नंतर पाच मिनिटे वात झाल्याप्रमाणे फेसाळ बोलत होता. शेवटी प्रत्यक्ष जाऊनच पाहावे म्हणून कामत स्वत: नथुमलकडे जायला निघाले.

नथुमलने आता आपले ऑफिस मोठे झोकदार केलेले होते. कामत येताच एक नोकर पुढे आला आणि त्याने त्यांना ऑफिसकडे नेले. त्या ऑफिसचा दरवाजा निळा होता आणि त्याच्या पलीकडे नथुमल होता.

नथुमलने जी हकीकत सांगितली तिच्यामुळे कामत क्षणभर सुन्नच झाले. कामतांच्या वडिलांनी कधी काळी 'शिवराम ऑइल कंपनी'चे एक हजार शेअर घेऊन ठेवलेले होते, ते आपण 'देशपांडे' या नावावर बदलले आहेत ही गोष्टदेखील कामतांच्या ध्यानात नव्हती. साहजिकच होतें. कारण त्यांची किंमत चांगल्या रद्दीइतकीदेखील नव्हती. पण आता अचानक त्या कंपनीला तेल सापडले होते!

"आणि साहेब, आता त्यांची किंमत किती झालीय्, माहीत आहे? एक लाख! आहात कुठं तुम्ही? मी तुमच्या पत्त्यावर दोनदा फोन केला; पण तिथं 'देशपांडे' नावाचा कुणी माणूसच नाही म्हणून सांगितलं. काय लोक गाढव आहेत!"

– कामत कसेबसे तीनचार मिनिटेंपर्यंत नथुमलशी बोलत होते; पण त्यांचे तिकडे लक्षच नव्हते. त्यांच्या मनात विचार येत होते, – निळा दरवाजा संपला... आता दोन दरवाजे राहिले...

या नव्याने मिळालेल्या संपत्तीचा कामतांनी कुणाला सुगावा लागू दिला नाही. सुमतीसह ते आता दुसऱ्या एका छोट्या ब्लॉकमध्ये राहू लागले होते. मधूनमधून ते रजनीकडेही जात; परंतु आपण तिच्यावर काय म्हणून भाळलो आहो हे हल्ली त्यांना समजेनासे झाले होते. तिचा चेहरा गोबरेला होता, आणि अंगावर वस्त्र पाहिजे याच मर्यादित इच्छेने ती कपडे घालीत असे... परंतु सुमतीविषयीचा गुप्त द्वेष मात्र कामतांच्या मनात अखंड जळत होता. त्या दोघांचाही स्वभाव अगदी अहंमन्य होता. आणि अशा दोन व्यक्तींचे एकत्र जीवन कधीही सुखी होत नाही...

मध्यंतरीच्या काळात त्या 'क्ष'ची कामतांनी दोनतीनदा भेट घेतली होती. त्याला खुलवून त्याच्याकडून तिसऱ्या दरवाज्याचा रंग त्यांना काढून घ्यायचा होता. तेवढ्यासाठी त्यांनी शब्दांचा एक खेळ शोधून काढला होता. त्या बाबतीत त्यांनी मोठ्या अभिमानाने आपले मानसशास्त्राचे ज्ञान उपयोगात आणले होते. एकदम आपण एक शब्द उच्चारायचा आणि ताबडतोब विचारात वेळ न दवडता दुसऱ्याने उत्तर म्हणून त्याच्याशी संबंधित असा शब्द उच्चारायचा, असा तो खेळ होता. 'क्ष'ला प्रथम या खेळाची फार गंमत वाटली. पण नंतर कंटाळून तो घुम्यासारखा बसून राहू लागला.

एक दिवशी संध्याकाळी कामत फिरायला बाहेर पडले होते. त्यांच्या ब्लॉकच्या गॅलरीत शिड्या-बादल्यांचा ढिगारा पडलेला होता. कारण ब्लॉकला नवा रंग लावायचे काम चालू होते. कामत बाहेर पडले, तो मरीन ड्राइव्हवर त्यांना तीनचार जुने मित्र भेटले. त्यांच्याशी गप्पा मारीत भटकता भटकता रात्र किती झाली याची त्यांना काहीच कल्पना नव्हती, आणि नेमकी त्याच वेळी सगळ्यांना चहा घेण्याची तल्लफ आली.

"हे पहा, आता सारी हॉटेलं बंद झाली असतील ." कामत म्हणाले, "तेव्हा आपण असं करू, आपण सारेजण आमच्या घरी जाऊ. तिथं मी झकास चहा करून देतो तुम्हाला !"

सगळ्यांना ही कल्पना फार आवडली, आणि ते सगळेजण कामतांच्या घरी आले. आता रंग लावून संपलेला होता; पण नव्या रंगाच्या वासाने हवा कुंद झालेली होती. कामत आपल्या दारापुढे उभे राहिले – आणि एकदम दचकले. कारण त्या दरवाज्याचा रंग पिवळा होता!

दरवाज्याला आतून बोल्ट होता; पण दरवाजा किंचित् पुढे ओढून आत ढकलला तर त्याचा बोल्ट निसटून खाली पडतो हे कामतांना माहीत होते. त्यांनी हलकेच दरवाजा उघडला आणि भिंतीवरचे दिव्याचे बटन दाबले. तोच कुणीतरी घाबरून ओरडले. – समोर नुसतीच काचोळी घातलेली, पातळ अस्ताव्यस्त झालेली सुमती उभी होती आणि तिचा हात सामंताच्या हातात होता!

"पाहिलंत ?" कामत आपल्या मित्रांना उद्देशून शांतपणे म्हणाले, "व्यभिचार हा घटस्फोटाचं कायदेशीर कारण होऊ शकतो. याला तुम्ही साक्षीदार आहातच!"

अगदी कामतांना पाहिजे होते तसे घडले होते. खुद्द त्यांचा कुठेच संबंध न येता सुमतीवर त्यांनी सूड उगवला होता. चारसहा वर्षांच्या फुलपाखरी निर्लज्ज आयुष्याचे फळ तिला पुरेपूर मिळाले होते. उद्या वर्तमानपत्रात नाव येऊन सर्वत्र छी: थू होऊ लागली की, तिचे उथळ, गर्विष्ठ मन शरमेने सारखे तडफडू लागेल!

– अगदी हेच कामतांना हवे होते!

आता हवी असेल तर रजनी त्यांना सहजासहजी मिळू शकेल. आता त्या तिसऱ्या दरवाज्याचीच अडचण होती. अर्थात् ती त्यांनी रजनीला सांगितली नव्हती. पण कामतांना घटस्फोट मिळणार, या बातमीनेच रजनी अगदी खुलून गेली होती. दोनचार दिवसांत तिने आपली राहायची जागा बदलून अधिक प्रशस्त जागाही घेण्याचे ठरवले, आणि त्या जागेत एक छोटीशी मेजवानी – फक्त दोघांकरिताच – करण्याचाही बेत केला.

पण त्या आधी कामतांच्या मनावर दडपण होते ते निराळेच. – उद्याच्या आत त्या 'क्ष'कडून त्या तिसऱ्या दरवाज्याचा रंग समजतो की काय हे त्यांना पाहायचे होते. त्यांनी भांड्यात थोडे रक्त ओतले आणि 'क्ष'ला बोलावले.

''तू म्हणाला होतास, की दोन दरवाज्यांनंतर तिसरा दरवाजा येईल.'' कामतांनी सुरुवात केली. पण 'क्ष'ने तिकडे बिलकूल लक्ष दिले नाही. खुर्चीवर बसून तो शांतपणे टेबलावर बोटांनी वाजवीत होता. कशाची तरी तो शांतपणे वाट पाहात होता. अखेर मानसशास्त्राचा उपयोग करूनच त्याच्या मनात खोल लपलेले गुपित शोधण्याचे कामतांनी ठरवले. ते एकदम म्हणाले, ''गाणे.''

''सिलोन रेडिओ!'' – कामतांनी शोधून काढलेल्या त्या शब्दांच्या खेळाच्या नियमांना अनुसरून 'क्ष' उत्तरला.

''धूर.'' कामतांनी पुढचा शब्द उच्चारला.

''सिगरेट.'' – 'क्ष' उत्तरला.

''चित्र.'' – कामत.

''झाड.'' – 'क्ष'.

कामतांनी धूर्तपणे वळशावळशांनी अनेक शब्द उच्चारले. 'क्ष'ने त्यांना पटापट उत्तरे दिली. अखेर मोठ्या काळजीपूर्वक कामतांनी एकदम शब्द उच्चारला, ''मांस''

''माणूस!'' 'क्ष' पटकन् उत्तरला.

कामतांची थोडी निराशा झाली. 'मांस' म्हटल्यावर वास्तविक 'रक्त' हा शब्द यायला हवा, तो आला नाही. इतकेच नाही, तर त्याऐवजी दुसरा – 'माणूस' हा शब्द उच्चारताना 'क्ष' थोडा वेळ गोंधळला तर नाही ना, असाही कामतांना संशय आला. काय बरे असावे त्याचे कारण? रक्तावरून लाल रंग सूचित होईल असा त्याला संशय आला का?.. त्यांनी पुन्हा प्रयत्न केला. त्या दिवशी त्यांनी तांबडा 'टाय्' बाधलेला होता. ते म्हणाले, ''नेकटाय्.''

''गळा!'' – 'क्ष' म्हणाला. अशा तऱ्हेने आणखी दोन शब्द विचारल्यावर कामतांची खात्रीच झाली की, तिसऱ्या दरवाज्याचा रंग लालच असला पाहिजे. कारण दर खेपेला तो रंग सूचित करणारा शब्द 'क्ष' नेमका टाळीत होता, किंवा मानसशास्त्राच्या भाषेत

सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, त्याच्या मनाला ते गुपित झाकून ठेवायचे असल्याने, दर खेपेला न कळत त्याच्या सुप्त मनाचा त्या शब्दाला विरोध होत होता.

थोड्या वेळाने 'क्ष' निघून गेला. कामतांच्या छातीवरील एक मोठे दडपण उतरले. या समंधाला आपण कसे बनवले, या कल्पनेने ते स्वत:वर बेहद्द खूष झाले. नंतर बाहेर पडून, वाटेत त्यांनी रजनीसाठी एक अंजिरी पातळ खरेदी केले आणि टॅक्सी करून ते तिच्या नव्या ब्लॉकवर जायला निघाले. आयुष्यात त्यांना जे जे हवे होते ते ते सारे मिळाले होते. – एक लाख रुपये, स्वातंत्र्य, आणि विशेषत: सुमतीला शिक्षा. अभिमानाने आपल्या डोक्यावर टिचकी मारीत ते स्वत:शी पुटपुटले, 'हे असलं की, या जगात अशक्य काहीच नाही!'

रजनीचा नवा ब्लॉक प्रशस्त होता. त्याच्या भिंती, खिडक्या, दारे मळकट करड्या रंगाने रंगवलेली होती. हल्ली कामतांचे लक्ष पहिल्या प्रथम दरवाज्याच्या रंगाकडे जात असे. जर कुठे लालभडक रंग असेल तर तो टाळण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे.

रजनी अद्याप हॉस्पिटलमधून परत आलेली नव्हती. तिने देऊन ठेवलेल्या किल्लीने कामतांनी ब्लॉकचा दरवाजा उघडला आणि आत शिरून तो बंद करून घेतला. पण दुसऱ्याच क्षणी ते चमकले. – त्या ब्लॉकमध्ये, मध्यभागी हावऱ्या चेहऱ्याने 'क्ष' उभा होता!

"आता पाळी माझी आहे!" आनंदाने हात चोळीत तो म्हणाला.

"छट्. तू मला फसवलंस!" भेदरलेल्या स्वरात कामत म्हणाले, "तुझ्या तिसऱ्या दरवाज्याचा रंग तांबडा असायचा होता. आणि तू इथं भलत्याच ठिकाणी येऊन मला दम देतोय्स!"

"खरंच, तिसऱ्या दरवाज्याचा रंग तांबडा असायचा होता; पण तुला कसं समजलं ते?" आश्चर्याने तोंड वाशीत 'क्ष' म्हणाला, "मी तरी ते कधी तुला सांगितलेलं नाही."

"अरे बाबा, मानसशास्त्र आहे ते!" कामत म्हणाले. त्यांच्या शब्दांत त्या क्षणीही अभिमानाची छटा होती. "अगदी तूच सांगितलस मला ते." असे म्हणत कामत सावकाश दरवाज्याजवळ गेले आणि त्यांनी दरवाज्यावरून हलकेच बोट फिरवले. त्याचा रंग करडाच होता.

"हा रंग लाल नाही." कामतांनी नव्या धैर्याने म्हटले.

'क्ष' शांतपणे दरवाज्याजवळ आला आणि त्याने त्याला कुलूप लावले. नंतर कामतांच्या खांद्यावर हात ठेवीत तो हसून म्हणाला, "मी काय सांगितलं होतं माहीत आहे ना? – पहिल्या दोन मागण्या पूर्ण झाल्यावर मी तुझ्यात थोडा फरक करणार आहे फक्त खूण म्हणून, असं मी म्हटलं होतं! – आठवतंय्? तो फरक मी तुझ्यात केला. हा

दरवाजा खरोखरच लाल आहे; पण तुला तो करडा दिसला. याचं कारण म्हणजे, तुला आता रंग खरोखर जसे असतात तसे दिसत नाहीत हेच होय. – हाच तो छोटासा बदल. तू आता रंगांध झाला आहेस.''

– आणि मग सौदा पूर्ण झाला!

[आधारित.]

# चित्रांचा माणूस

"हं, आता पहा, चित्रांचा माणूस!" घोगऱ्या आवाजात छत्रेमास्तर ओरडले. समोरील बावळट चेहऱ्यांच्या घोळक्याकडे पाहात मनातल्या मनात त्यांनी एक इरसाल शिवी हासडली. त्यांचे ओरडणे संपण्याच्या आतच त्यांच्या उजव्या हाताकडील मळकट लाल आलवानाचा पडदा बाजूला झाला, आणि मांसाच्या अनेक वळकट्या अंगावर थिलथिलत असलेला दाऊद लोकांच्या पुढे येऊन उभा राहिला.

त्याच्या अंगावर साऱ्या प्राण्यांचे एक प्रदर्शनच होते. त्याच्या छातीवर अक्राळविक्राळ साप गाठीगाठी घालून जणू बाहेर पडण्यासाठी डोळे भिरभिरवीत होते. त्याच्या पोटावर अंगभर डोळे असलेला एक चमत्कारिक प्राणी दबा धरून बसला होता, आणि खुरप्यासारखी नखे असलेला एक लालभडक अजगर त्याच्या अजस्र देहाभोवती अनेक वळसे घेऊन खांद्यावरून विजयी मुद्रेने घोळक्याकडे पाहात होता.

समोर उभ्या असलेल्या घोळक्याकडे पाहात दाऊदने दंड थोपटले. पण लगेच त्या लोकांची उघडी बावळट तोंडे पाहून त्याला एकदम चीड आली नि मान वळवून तो बाजूला पाहू लागला. बाजूच्या दालनातच तीन खुजी माणसे ठेवलेली होती. तेथे घाणेरड्या वासाच्या पोरांची एकच गर्दी झाली होती. त्यांच्यामध्ये बसून दाऊदची बायको अमीना तिकिटे विकत होती, आणि मध्येच मिनिटेच्या मिनिटे जाणाऱ्या येणाऱ्या पुरुषांच्या हालचालींकडे भुकेल्या निर्लज्ज नजरेने पाहात होती.

दाऊदच्या हातांवर गुलाब गोंदलेले होते. पण बायकोकडे पाहातच त्याने मुठी आवळल्या आणि ते गुलाब उन्हात एकदम करपल्याप्रमाणे आकसून बसले.

दोनतीन वर्षांपूर्वी त्यांचे लग्न झाले त्या वेळी त्याचे अंग नितळ, अगदी केळीच्या गाभ्यासारखे होते. आणि आता?... आपल्या अंगाकडे पाहताच त्याची त्यालाच शिसारी आली. निरनिराळी खेळणी उकिरड्याच्या ढिगावर टाकावी त्याप्रमाणे त्याचे फोपसे अंग दिसत होते. हे असे झाले तरी कसे? केव्हा?

लग्नानंतर वर्षभरातच त्याच्या आयुष्याचा बोजवारा उडाला होता. सतत ढोल वाजत असावा, त्याप्रमाणे अमीना घरात सारखी ओरडत असे; आणि घरी पाय न ठेवता दाऊद बाहेर सारखा चरत हिंडत असायचा. तो खायला बसला म्हणजे ताट-ताटभर जिलब्या फस्त करायचा. त्यामुळे एक वर्षातच त्याचे अंग असे मोकाट, तरटात भरलेल्या

कापसाप्रमाणे अस्ताव्यस्त होऊन बसले. आणि मग एक दिवस छत्रेमास्तरांनी त्याला बोलावले व मुकाट्याने त्याच्या हातावर एक महिन्याचा पगार ठेवला नि त्याला नमस्कार ठोकला. दाऊद बावळटाप्रमाणे त्यांच्या तोंडाकडे पाहू लागला.

"हे बघ दाऊद, अरे, ही सारी सर्कस या गावड्यांना दाखवण्यासाठी मी तुला पगार देऊन ठेवला. आणि तूच एवढा लडदू होऊन बसलास की, सारे लोक तुझ्याकडेच खुळ्या कुत्र्यासारखे डोळे करून पाहात राहतात. अरे, तू समोर असताना त्या चिपट्यामापट्याएवढ्या बुटक्यांकडे कोण कुत्रं ढुंकून पाहणार? आँ? तूच सांग की!"

"पण मास्तर, तुमच्या सर्कशीत मी लठ्ठ माणूस म्हणून राहीन की!" दाऊद खजील होऊन म्हणाला.

"थू: तुझ्या! लठ्ठ माणूस म्हणे!" छत्रेमास्तर फिस्कारून म्हणाले, "लठ्ठ माणसं पायलीला शंभर मिळतात! तो वैजनाथाचा पुजारी आहे ना, त्याच्यापुढं तू उंदरासारखा आहेस! लठ्ठ माणूस म्हणे! हां, आता एक मात्र आहे. भटाचा शिवऱ्या मेल्यापासून गोंदलेला माणूस मात्र नाही सर्कशीत. तेव्हा तसलं काही करतोस तर बघ. नाही तर तू जाणे, आणि तुझा लठ्ठ माणूस जाणे!"

ही फक्त एक महिन्यापूर्वीची गोष्ट. नंतर दाऊदला कुणीतरी वैजनाथाच्या डोंगरावर राहणाऱ्या गंगाईची माहिती सांगितली :

"छट्! गोंदणं पाहावं तर गंगाईचंच. अंगावर चिमूटभर मांस नाही, तोंडात एक दात नाही, पण गोंदणं पाहिलं की पाहणाऱ्याच्या कातडीवर ओरखडा उठतोय्. या खेड्याच्या बाजूनं वर डोंगराकडे जी पायवाट जाते ना..."

दाऊद त्या पायवाटेने डोंगरावर गेला. लाल रंगाची कसली तरी फुले विस्तव पेटवल्याप्रमाणे धगधगत होती, त्याच्यामागे गंगाईची बोंदरी झोपडी होती. आत सारे शांत होते, आणि एका तरटावर गंगाई मुटक्यासारखी गप्प पडून होती. तिचे डोळे लालसर दोऱ्याचे टाके घालून शिवलेले होते, व कानदेखील आत कुंभारकिड्यांनी घर केल्याप्रमाणे बंद झालेले होते. सर्वत्र बारीक धूळ पडली होती, आणि कुठेही उमटलेल्या पावलांची खूण नव्हती. तिच्या बाजूला रंगांच्या वाट्या व एक झगझगीत सुई होती.

"ये, आत ये. मी तुझीच वाट पाहते आहे." दाऊद आत येण्याच्या आधीच ती म्हणाली, "तू अंगावर चित्रं काढून घेण्यासाठी आलास ना? पण त्या आधी मी तुला एक चित्र दाखवणार आहे." तिने आपला पंजा दाऊदपुढे उघडा केला. त्याने किंचित् खाली वाकून पाहिले, आणि भीतीने त्याचे गुडघे वितळल्यासारखे झाले. त्या पंज्यावर त्याचाच चेहरा गोंदलेला होता.

"मी? माझा चेहरा? तो – तो कसा?" भेदरत तो म्हणाला.

"हे चित्र माझ्या हातावर गेली पन्नास वर्षं आहे." त्या चित्रावरून बोटे फिरवीत गंगाई म्हणाली.

"म्हणजे ते चित्र फार जुनं आहे." दाऊद म्हणाला, "शिवाय ते चित्र माझंच आहे हे तरी तुला कसं समजलं? तुला तर डोळेदेखील नाहीत."

घशातल्या घशात गंगाई खसखस हसली. "तसलं जे समजायचं असतं ते डोळ्यांना नाही, तर इथं, इथं –" तिने एकदम आपल्या खड्ड्यासारख्या पोटावर चापट मारली. "हं, काढ तुझा सदरा. तुझं काम झालं की, मग आणखी कुणाची तरी वाट पाहीन. नंतर पाचपन्नास वर्षांनी ऐन डोंगरात जाईन आणि एखाद्या रिठ्याहिरड्याच्या झाडाखाली झोपेन. मग एखाद्या निळ्यापिवळ्या फुलाखेरीज माझं काहीही राहणार नाही." दाऊदने निमूटपणे सदरा काढला व तो तिच्यासमोर बसला.

"अंधारात नाहीसा झालेला भूतकाळ मला माहीत आहे, आताचा स्वच्छ वर्तमानकाळ मला दिसतो, आणि अद्याप येणार असलेला भविष्यकाळही मला ठाऊक आहे. हा येणारा भविष्यकाळ माझ्या अंगावर उमटला आहे. त्यातली दोन चित्रं मी आज तुझ्या अंगावर काढणार आहे. म्हणजे साऱ्या जगात खऱ्या चित्रांचा माणूस तूच एकटा होशील. तुला कधीही विसर पडणार नाही असली चित्रं आहेत ती. आजकालची नव्हेत, तर उद्याची – उद्याची."

तिने न चाचपडता सराईतपणे सुई उचलली, व टच्‌दिशी दाऊदच्या दंडावर टोचली.

दाऊद परत आला त्या वेळी नव्या उत्साहाने, नव्या भीतीने तो गांगरून गेला होता. अगदी पाहतापाहता गंगाईने त्याचा विशाल देह चित्रे आणि रंग यांनी भरून काढला होता. त्याचे सारे अंग छापखान्याच्या यंत्रात चुकून सापडल्याप्रमाणे दिसत होते.

"आता बघ कसा दिसतो मी!" सदरा काढून अमीनापुढे उभा राहात तो ऐटीने म्हणाला.

अमीना आपले केस विंचरीत होती. तिने मान वर करून पाहिले नि ती एकदम भूत पाहिल्याप्रमाणे किंचाळली. अर्धा बोकड अर्धा माणूस असलेली आकृती दाऊदच्या दंडावरून तिच्याकडे पाहून हसली. चेहऱ्याच्या वळकटीवर वसकन् दात दाखवणाऱ्या कंजारणींचे चेहरे होते, ते थरथरले.

"अय्यो!" अमीना किंचाळली, "तू माणूस आहेस की, भूत आहेस?"

ती तेथून वेड्यासारखी धावत सुटली, आणि दाऊद एकटाच आरशासमोर राहिला. ...खरंच, आपण आपलं शरीर असं वेडंविद्र का बरं करून घेतलं? आपल्या अंगावर चढत असलेल्या मेदाची आपल्याला फार लाज वाटते. तो इतरांपासून, अमीनापासून, विशेषतः

स्वत:पासून लपवून ठेवण्यासाठी? ...नंतर त्याला गंगाईचे शेवटचे शब्द आठवले. तिने त्याच्या पाठीवर व छातीवर दोन मोठी चित्रे काढली होती. पण ती चित्रे गंगाई त्याला पाहू देईना. तिने दोन्ही चित्रांवर चिकट कापडाचे दोन तुकडे लावले होते. "या चित्रांकडे तू इतक्यात पाहायचं नाही. त्यात तुझ्या भविष्यकाळाचं रूप आहे. आणखी दोन आठवड्यांनी तू हवं तर पहा त्यातल्या एकाकडे. त्यानंतर थोड्या दिवसांनी पाठीवरल्या चित्राकडे बघ. आत्ता तिथं तुला काही दिसणारही नाही म्हणा. मी नुसती शाई टाकली आहे. तुझा घाम, तुझं रक्त, तुझ्या मनातले विचार – या साऱ्यांमुळं चित्र आपोआप तयार होईल. म्हणजे तुमच्या तंबूवर तुला मोठ्ठी जाहिरात लावता येईल : 'विलक्षण चित्रांचा माणूस! एकदोन चित्रं तर अद्याप त्यानं स्वत:सुद्धा पाहिलेली नाहीत.'..." खि: खि: करीत गंगाई खिंकाळली होती. दाऊद एकदम अस्वस्थ झाला, पण त्यालादेखील जाहिरातीची ती कल्पना खरोखर आवडली होती. जाण्यासाठी उठताउठता त्याने विचारले होते, "बरं, तुझे पैसे किती झाले?"

"पैसेबिसे काही नाही. ही चित्रं तुझ्या अंगावर आहेत, तोपर्यंत तुला माझी आठवण राहील. तेवढं पुरे मला. हं, जा आता, आणि पुन्हा कधी माझ्या झोपडीत पाऊल टाकू नकोस."

नंतर छत्रेमास्तरांनी खरोखरच लाल अक्षरांत मोठी जाहिरात लावली, – 'भयंकर गोंदलेला माणूस. पहा, पण घाबरू नका! तिकीट एक आणा.'

रात्री तंबूपुढे बराचसा घोळका जमला. लगेच मोठ्या उत्साहाने हातवारे करीत छत्रेमास्तर ओरडू लागले, "आज छातीवरील चित्र दाखवलं जाईल. पुढल्या शनिवारी याच वेळी याच ठिकाणी दुसरं चित्र पाहायला विसरू नका!" दणादणा डफ वाजला, आणि मास्तरांनी पडदा बाजूला सारला.

दाऊद छाती फुगवीतच बाकावर चढला. अमीना कुठे दिसते की काय हे पाहण्यासाठी त्याने चौफेर नजर टाकली. आपण असल्या माणसाची बायको असल्याची तिला फार शरम वाटत असल्याप्रमाणे ती घोळक्याच्या अगदी मागे अंग चोरून उभी होती. पण दाऊद मात्र खूष होता. आज तरी ही सारी माणसे आपल्यासाठी आली आहेत, आपल्याकडे पाहात आहेत, याचा त्याला अभिमान वाटला. आज तरी निदान त्या मुठीमुठीएवढ्या घाणेरड्या खुज्या माणसांकडे कुत्रेदेखील तंगडी वर करून धावणार नाही याचा त्याला मत्सरी आनंद वाटत होता.

त्याने दंड थोपटले. लोक मोठ्या उत्सुकतेने पाहू लागले. असले विचित्र, भयंकर प्राणी अंगावर गोंदलेला माणूस त्यांनी अद्याप पाहिला नव्हता. दाऊदचे शरीर किंचित् थरथरले

की साप, मगरी क्रुद्ध होऊन बाहेर पडतात की काय असे वाटे. छत्रेमास्तर पुढे आले. त्यांनी एक टोक चिमटीत धरून सर्रदिशी दाऊदच्या छातीवरचा कपडा ओरबाडून काढला.

एक मिनिटभर काहीसुद्धा झाले नाही. सारे अगदी गप्पगार उभे. दाऊदला वाटले, झाले, मास्तरांनी एवढा जाहिरात-बेंडबाजा केला, आणि शेवटी तर सारंच फुसकलं! ...तोच एखादे वस्त्र फाटल्याप्रमाणे सारी शांतता टरकली. घोळक्याच्या कडेला अमीना मोठमोठ्याने हुंदके देत रडू लागली.

दाऊदने डोळे खाली वळवून आपल्या छातीकडे पाहिले, आणि ते चित्र पाहताच त्याच्या हातावरील गुलाब कोळपले, आणि अंगावरील साप, मगरी, विक्राळ पक्षी गोठून गेल्याप्रमाणे आकसून गेले.

त्याच्या छातीवर तो आणि अमीना या दोघांचे चित्र होते, आणि त्या चित्रात तो तिचा गळा इतक्या करकचून आवळीत होता की, तिचे डोळे सैल झालेल्या बटणांप्रमाणे बाहेर लोंबकळत होते.

दाऊदला एकदम भोवळल्यासारखे झाले. तो त्या घोळक्यातच पडणार होता, पण त्याने बाजूच्या खांबाचा आधार घेतला. छत्रेमास्तरांनी कपाळावर हात मारून घेतला व पडदा सरकवून ते आत आले.

रात्री दाऊद अंथरुणावर पडला त्या वेळी त्याचे अंग घामाघूम झाले होते. त्याने हळूच पुन्हा छातीला चिकटवलेल्या कापडाला स्पर्श केला नि शेजारी बसलेल्या मास्तरांकडे असहायपणे पाहिले.

"काय रे बेट्या, तुला आधीच सांगायला काय झालं होतं रे?" गुरगुरत मास्तर म्हणाले, "शंभर लोकांसमोर टांग मारलीस की मला! चित्र म्हणे चित्र! नुसतं भूत झालंय्!"

"शपथ मास्तर, मला काहीसुद्धा माहीत नव्हतं हो!" जवळजवळ रडतच दाऊद म्हणाला.

"म्हणे मला माहीत नव्हतं!" वेडावीत मास्तर म्हणाले, "तू काय गांजाबिंजा पिऊन बसला होतास की काय? कुठल्या मसण्या म्हातारीशी तुझी गाठ पडली कुणास ठाऊक!"

कोरड्या जळजळीत डोळ्यांनी अमीना तेथे आली व बाजूला फतकल घालून बसली.

"माहीत नाही असं कसं होईल मास्तर?" ती उसळून म्हणाली, "माझ्यावर पचदिशी थुंकण्यासाठीच त्यानं असलं चित्र काढून घेतलं. ते काही नाही मास्तर, त्यानं ते चित्र पुसून तरी घेतलं पाहिजे, नाही तर सकाळी बिस्तरा घेऊन चालले मी गाडीतनं."

"होय बुवा!" मान हलवीत मास्तर म्हणाले, "यापुढं तुमचं तुम्ही पहा!"

"पण मास्तर, त्यामुळं तुमचं काही नुकसान झालं नाही ना?" थोडा चिडून दाऊद म्हणाला, "एका तरी गणप्यानं 'टाक माझे पैसे' म्हटलं का तुम्हाला?"

"अरे, पैशाचा प्रश्न नाही हा. पण मुद्दाम असला गाढवपणा करायला कुणी सांगितलं होतं तुला?"

मुद्दाम? खरे म्हणजे दाऊदसुद्धा इतरांइतकाच भेदरून गेला होता. म्हणजे त्या म्हातारीचे म्हणणे खरे होते की काय? तिने फक्त रंग टाकला होता. बाकीचे चित्र त्याने स्वतःच पूर्ण केले होते. त्याच्या मनात चाललेले विचार, चिडचिडत असलेले रक्त यांनी त्या चित्रावर शेवटचा हात फिरवला होता? त्याने हळूच त्या चित्राला स्पर्श केला. त्यातील क्रौर्याने जणू भाजल्याप्रमाणे तो दचकला. 'अमीनेला ठार मारावं असं आपल्या मनात बिलकूल नाही... अगदी नाही,' तो स्वतःशीच पुटपुटला. पण मध्येच नागाच्या फण्याप्रमाणे एक विषारी प्रश्न उभा राहिला, 'तुझ्या मनात तसलं नाही? खरं का? अगदी खरं?'

दुसऱ्या दिवशी मास्तरांनी फकिरा सुताराला बोलावून आणलं. त्याला चित्रे गोंदवता येत नसत; पण गोंदवलेली चित्रे तो स्वच्छ धुवून मात्र टाकू शकत असे. पण तासाभरातच त्याने आपल्या साऱ्या सुया, बाटल्या पेटीमध्ये भरल्या. रुमाल काखोटीस मारून तो जाण्यासाठी उठला.

"अरे फकिऱ्या, तुझं काम कुठं झालंय्?" मास्तरांनी आश्चर्याने विचारले.

"हे काम माझ्या बाच्यानंही व्हायचं नाही. हो, आपण आपले सरळ शब्दाचे." फकिरा म्हणाला, "हे चित्र नांगरून काढलंय् की काय कुणाला ठावं शहाण्यानं! दोनदोन इंच घुसलंय ते खोल. काय डोस्कं आपटणार मी?"

"अरे, पण हे असंच राहणार की काय मग?" कपाळावर हात मारीत दाऊद म्हणाला.

"हाय! त्यावरबी एक उपाय हाय!" मान हलवीत फकिरा म्हणाला, "एक कुऱ्हाड आण, आणि छाती फोडून काढ. तू मरशील ,पण गड्या, चित्र मात्र खलास व्हईल बघ! थू:त्तिच्या चित्र!"

त्यानंतर आणखी सल्ला देण्यासाठीसुद्धा तो तेथे राहिला नाही.

पुढला शनिवार आला. गेल्या खेपेपेक्षाही मोठा घोळका दारात उभा होता. कपाळाला आठ्या घालीत मास्तर आत आले. दाऊद धडधडत्या हृदयाने उभा होता.

"पण मास्तर, पाठीवरचं चित्र आज नाही होणार." तो म्हणाला, "आणखी एखाददुसरा दिवस पाहिजे त्याला."

मास्तरांनी पाठीवरील कापड बाजूला करून पाहिले.

"थू:त्तिच्या! त्या थेरडीनं चांगलंच बनवलं की! अरे, चित्र गेलं खड्ड्यात! एक रेघोटीदेखील नाही पाठीवर."

"पण एकदोन दिवसांत ते तिथं येणार मास्तर." आत्मविश्वासाने दाऊद म्हणाला.

"तोपर्यंत मग तुझ्या डेरक्यावरचा वाघोबाच दाखवावा झालं!" हसत मास्तर म्हणाले.

रात्री दाऊद आरशासमोर बसला, त्याने बाटलीतील घाणेरड्या उग्र वासाचे औषध छातीवर चोळले, नि सँडपेपरने तो छाती घासू लागला. तासभर छाती चोळली तरी तिच्यावरील चित्रातील एक रेघही पुसट झाली नाही, की गळा दाबणाऱ्या दाऊदच्या चेहऱ्यावरील द्वेष विझला नाही. तोच आपल्या मागे कुणीतरी उभे आहे असे त्याला वाटले. त्याने मागे वळून पाहिले. अमीना त्याच्याकडे शांतपणे पाहात उभी होती.

"आता कशाला ढोंग करतोस चित्र पुसण्याचं?" ती म्हणाली.

"पण मी ते मुद्दाम काढायला सांगितलं नाही. कितीदा सांगू तुला?" अजीजीने दाऊद म्हणाला.

"तर! मी काय शेळी आहे की काय फसायला?" अमीना कर्कशपणे ओरडत म्हणाली, "तुला माहीत होतं! आणि माझी फजिती करण्यासाठीच तू त्या लोकांसमोर त्याचा बाजार मांडलास. तुला माझा फार द्वेष वाटतो. वाटू दे. मला तरी कुठं अगदी उतू जाण्याइतकं प्रेम वाटतंय् तुझ्याविषयी? असल्या चरबीच्या बरणीवर कुणाचं प्रेम बसणार? —"

दाऊदचे हात वळवळू लागले... आपल्याला आधी कल्पना नव्हती असं आपण म्हटलं खरं, पण ते सत्य आहे का? अखेर चित्र बनवलं कुणी? त्या म्हातारीनं की आपण? की आपल्या मनाच्या तळाशी वळवळ करणाऱ्या अनेक पायांच्या चमत्कारिक विचारांनी?... त्याने मान वर करून पाहिले. अमीना त्याच्यापुढे उभी राहून हात नाचवीत, तडातडा बोलत होती. तिच्या गळ्याच्या शिरा दोऱ्याप्रमाणे ताणत होत्या.

"तू तसलं चित्र का काढून घेतलंस हे मला माहीत आहे!" ती ओरडत होती, "पण मी असल्या चित्रांनी घाबरणार नाही. माजलेला रेडा मेला! लहानपणी मी चिखलात पडलेला एक रेडा पाहिला होता. अस्ताव्यस्त. चिखलाने माखलेला. तसलं धूड आहेस तू. चित्रानं घाबरवतोय् मला!"

दाऊद उठला. त्याबरोबर त्याच्या शरीरावरील सारे प्राणी एकदम जिवंत झाल्याप्रमाणे जागे झाले. त्यांचा एक कळप चाल करून गेल्याप्रमाणे अमीनाजवळ गेला. त्याच्या हातांवरील फुले भीषण रानातील फुलांप्रमाणे उग्र, भुकेली झाली आणि भक्ष्य शोधण्यासाठी थरथरू लागली.

"अमीना, मला एकट्याला टाकून जाऊ नकोस," आपल्या अजस्र पंज्यांनी तिला धरीत तो म्हणाला, "मला मग अगदी आधार नाही. मला सोडून जाऊ नकोस."

"सोड मला! धूड! रेडा!" किंचाळत अमीना म्हणाली.

दाऊदच्या हातांवरील फुले हळूहळू वर चढली, व तिच्या गळ्याजवळ थांबली. त्याने हळूहळू बोटे दाबली. अमीनेची किंकाळी मध्येच धाग्याप्रमाणे तुटली, आणि ती धाडकन् मागल्या भिंतीवर आदळली.

बाहेर गवतात कुणाची तरी पावले वाजली. कुणीतरी पळत गेल्यासारखे वाटले. दाऊद बाहेर आला, त्या वेळी ती खुजी माणसे दारात त्याची वाट पाहात होती. त्यांच्यापैकी कुणाचीच उंची अडीच फुटांपेक्षा जास्त नव्हती. पण त्यांचे चेहरे मात्र निबर, जून होते; डोळे बटबटीत होते.

दाऊद सरळ त्यांच्याकडे आला व त्यांच्या मधून पलीकडे गेला. 'या खुज्यांना काय कळणार कपाळ! त्या दुबळ्या, विद्रूप शरीरात विचार करण्याची शक्ती तरी आहे का? लांडगे, कोल्हे आणि ही माणसं सारखीच! शिवाय यांच्यापैकी कुणी जरा हालचाल केली तर मी त्याला टाचेखाली चिरडून टाकीन एखाद्या बेडकासारखं!' तुच्छतेने दाऊद स्वत:शी म्हणाला. पण खुज्यांपैकी कुणी हलले नाही. मात्र त्यांचे डोळे जणू दाऊदच्या पाठीशी चिकटले होते.

दाऊद धापा टाकीत शेतांच्या बांधांवरून पलीकडे चालू लागला. मधूनमधून रातकिडे वेगाने येऊन टप्‌दिशी त्याच्या तोंडावर आपटत. मध्येच खाचखळग्यात पाऊल पडून त्याचे अजस्र अंग डळमळत होते.

तो दृष्टीआड होईपर्यंत खुजी माणसे गप्प उभी होती. नंतर ती वळली व पडदा बाजूला करून निपचित पडलेल्या अमीनेकडे पाहू लागली.

"तो त्या बाजूने गेला आंब्याच्या झाडांकडनं!" कुणीतरी ओरडले. टेकडीच्या कडेवर कंदील, बॅटरी यांचे प्रकाश लडबडू लागले. दाऊदच्या पायांतील शक्ती आता ओसरू लागली होती. तो कोलमडून खाली कोसळला. त्याचे डोळे काचेचे असल्याप्रमाणे निर्जीव होऊ लागले होते. ती माणसे येऊन आपल्याला लवकर घेऊन जातील तर बरे होईल असेही त्याला वाटू लागले. तोच पुन्हा आवाज आला, –

"तो बघा, बेरड त्या झुडुपाजवळ पडला आहे!"

दाऊद दचकला. जीव वाचवण्याची इच्छा पुन्हा प्रबळ झाली. तो कसाबसा उभा राहिला नि मोठ्या कष्टाने पाय ओढू लागला. दूर कोपऱ्यावर एक दिवा दिसत होता, तिकडे तो धावू लागला. काजव्यांच्या टिकल्या घुईंदिशी तोंडाभोवती फिरत व लगेच विझत. तो दिव्याकडे जात असता त्याला वाटू लागले, 'झाडे, काजवे, – आपण सारेच जण त्या दिव्याकडे धावत जात आहो, तिकडे ओढले जात आहो. चित्रांचा माणूस पुढे व त्याच्या मागोमाग बाकी सारे. पाटावरून ओघळणाऱ्या मोहरीच्या दाण्यांप्रमाणे सारेजण तिकडे धावत आहेत... धावत आहेत. तो शेवटचा दिवा म्हणजे सगळ्यांचा मध्यबिंदू... सगळ्यांचा पूर्णविराम !'

दाऊद एकदम थांबला. समोरच्या उंचवट्याच्या कडेला ती तीन खुजी माणसे उभी होती, व त्यांच्या हातांत तंबू ठोकताना वापरतात तसल्या अणकुचीदार खुंट्या होत्या. दाऊद ठेचाळून एकदम उताणा पडला. त्या खुंट्या आपल्यावर उगारलेल्या त्याने पाहिल्या, आणि त्याने एकदम दोन्ही हात डोळ्यांवर धरले. पण त्या खुंट्यांची टोके त्याच्या छातीवर आदळली, व तेथून बोटभर जाड रक्ताची धार लागली.

काही क्षण तसेच गेले. बाजूच्या शेतांमधून रातकिड्यांचा कर्कश आवाज सतत ऐकू येत होता. ती खुजी माणसे हातात काठ्या घेऊन खाली पडलेल्या दाऊदच्या देहाकडे पाहात उभी होती.

नंतर साऱ्यांनी मिळून त्याला पालथे कले. त्याच्या पाठीवरील चौकोनी पांढरे कापड टर्रदिशी फाडून काढले. तेथे आता चित्र स्पष्ट उमटले होते. पण ते पाहताच त्यांचे कुरूप, बेडकांसारखे चेहरे जास्तच विद्रूप, भयाण झाले, व त्यांच्या हातांतील काठ्या गळून पडल्या! त्यांनी एकदम माना वळवल्या आणि त्या भयाण एकाकी रस्त्यावर दाऊदला रक्ताच्या थारोळ्यात सोडून ते निघून गेले.

पहाटेच्या अस्पष्ट प्रकाशातही दाऊदच्या पाठीवरील चित्र आता स्पष्ट दिसत होते. एक लठ्ठ माणूस निर्जन रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पालथा पडला आहे व तीन खुजी माणसे त्याच्या पाठीवरील चित्राकडे भयभीत नजरेने पाहात आहेत असे ते चित्र होते. निर्जन रस्त्यावर पडलेल्या लठ्ठ माणसाच्या पाठीवरील चित्राकडे पाहात उभ्या असलेल्या तीन खुज्या माणसांकडे पाहात असणारी तीन खुजी माणसे...

# तिसरा डोळा

'कॅफे वसंत'च्या पहिल्या स्पेशल रूममध्ये बापट आणि तो चष्मेवाला चहा घेत बसले होते. रूमवरील पडदा तसाच बाजूला सारलेला होता आणि तिथून हॉटेलात शिरणारे आणि बाहेरच्या टेबलाभोवती 'मच्मच्' आवाज करीत खात असलेले लोक दिसत होते. चष्मेवाला सारखा समोरील आरशात पाहात होता. आरशातील आपल्या प्रतिबिंबाच्या रूपावर तो इतका बेहद्द खूष होता की, तिकडे पाहण्यात समोरील चहा थंड होत चालला आहे याची त्याला कल्पना नव्हती. मधूनमधून बापटाच्या बोलण्याला तो नुसते 'हूं-हूं' म्हणे, इतकेच.

"तो बघ आत्ताच आला. पण तिकडे वळून पाहू नकोस." मान वर न करता बापट एकदम म्हणाला. चष्मेवाल्याने हळूच इकडे तिकडे पाहिले आणि चहाचा एक घोट घेतला. नंतर सावकाश खिशातून एक सिगरेट काढली.

"कोण आला ?"त्याने विचारले.

"तो आत्ता आला होता ना! काउंटरजवळ उभा होता ना, तो! आत्ताच पुन्हा बाहेर गेला." बापट म्हणाला, "म्हणजे शेवटी तू त्याला पाहिलं नाहीसच ?"

"अरे, पण कोण ? कुणाला पाहायचं ?" चष्मेवाल्याने गोंधळून विचारले.

"मग इतका वेळ मी काय ओरडत होतो ? कुठं होतं तुझं लक्ष ?" किंचित् चिडून बापट म्हणाला, "मी मंगळावरील माणसांविषयी सांगत होतो. त्यांच्याविरुद्ध आपण आता काहीतरी पुरावा गोळा केला पाहिजे. थोडा जरी पुरावा हाती लागला ना, तर त्यांचा धुव्वा उडवता येईल आपल्याला. खरं म्हणजे ही सारी हकीकत कुणीतरी लिहून घेतली पाहिजे. वर्तमानपत्रात छापली पाहिजे. नाहीतर मात्र आपली धडगत नाही. तू कुठल्या तरी वर्तमानपत्रातच काम करतोस ना ?"

"आपली धडगत नाही म्हणतोस ते का ?" जांभई देत चष्मेवाल्याने विचारले.

"अरे, मंगळावरची माणसं आहेत म्हणून!" हात आपटीत बापट म्हणाला, "सारं जगच त्यांच्या ताब्यात आहे सध्या!"

"मग झालं तर! मग माझ्या वर्तमानपत्रात मी काय लिहिणार ? कारण सारं जगच त्यांच्या ताब्यात आहे, तर वर्तमानपत्रही त्यांचंच आहे.!"

"होय बुवा, तेसुद्धा खरंच!" विचार करीत बापट म्हणाला, "पण मला मात्र असं वाटतं खरं, की काही तरी करून त्यांना नाहीसं केलं पाहिजे. ते म्हणजे काही परमेश्वर नव्हेत. त्यांच्यांतही काही ना काही कच्चा दुवा असणारच. नाहीतर ते असे चोरांसारखे अगदी लपूनछपून कशाला राहिले असते? आपल्याला कुणीतरी पाहील, आपल्या येण्याचा कुणाला सुगावा लागेल, याची त्यांना इतकी भीती का वाटावी? तूच सांग! म्हणून मी म्हणतो की, त्यांच्याबाबत आपल्याला थोडादेखील पुरावा मिळाला ना, तर हां हां म्हणता आपण त्यांना हाकून लावू."

"हे बघ बापट," चष्मेवाला किंचित् पुढे सरकत म्हणाला, "हे काय चालवलं आहेस तू मघापासून मंगळावरच्या माणसांविषयी? मला सांग बघू सारं पहिल्यापासून. तुझ्या ध्यानात आहे ना सारं?"

"ध्यानात आहे म्हणजे? सारं फोटो घेतल्याप्रमाणे आहे अगदी! खरं म्हणजे आपल्याला काही गोष्टींचा विसर पडतो तोसुद्धा मंगळावरच्या माणसांमुळं. विसरावं असं आपल्या मनात नसतं, पण त्यांच्यापुढं काय चालणार आपलं? आपल्याला वाटतं, मी हे करतो, ते करीत नाही; पण हे सारं आपल्याकडून करवून घेणारे कोण, तर ही मंगळावरची माणसं! सारं जग त्यांच्या ताब्यात आहे असं मी म्हणतो ते एवढ्यासाठीच. मात्र ही गोष्ट माझ्याखेरीज दुसऱ्या कुणाला माहीत नाही."

"पण तुला तरी हे कसं समजलं?" उत्सुकतेने चष्मेवाल्याने विचारले.

"तुला सारंच सांगायचं म्हणजे ते असं आहे, –" बोटांची टोके टेबलावर आपटीत बापट सांगू लागला, "मला यंत्राशी टाकटूक करायची थोडी आवड आहे. वर्षा-दीड-वर्षापूर्वी काय झालं, पैसा मिळवण्याजोगं काही सापडतं का हे पाहण्यासाठी मी काही 'सुपरसोनिक' म्हणजे नि:शब्द ध्वनी निर्माण करणाऱ्या यंत्राशी खेळत होतो. पण काय झालं, कुणास ठाऊक! 'हाय फ्रिक्केन्सी वेव्हज्' विषयी तुला काही माहिती आहे? वाटलंच मला! तुला काहीच माहिती नसणार! आता असं पहा, काही गोष्टी आपल्याला विशिष्ट प्रकाशात स्पष्ट दिसतात. पण त्यापेक्षा जर उजेड कमी असला तर आपल्याला स्पष्ट दिसत नाही. या उलट जर त्या मर्यादेबाहेर प्रकाश झगझगीत असेल तरीसुद्धा आपल्याला काही दिसणार नाही. पण ही प्रकाशाची पट्टी काही प्राण्यांच्या बाबतीत जास्त रुंद असते; त्यामुळं आपल्याला जो गडद अंधार वाटतो त्यात मांजर सहज हिंडू फिरू शकतं. आणि झगझगीत सूर्याकडे घार टक लावून पाहू शकते. आवाजाच्या बाबतीतही असंच आहे. उदाहरणार्थ, आपल्याला जे आवाज अजिबात ऐकू येणार नाहीत ते वाघळाला स्पष्ट ऐकू येतात. म्हणजे आपली सध्याची जगाविषयीची जी कल्पना आहे ती तशी आहे याचं कारण आपल्याला पाच ज्ञानेंद्रियं आहेत नि त्यांना मर्यादा आहे हेच होय. उद्या तुझ्या कानात कुणी काही बदल केला तर तुला रेडिओ घ्यायची जरुरी नाही.

सारं रेडिओशिवायच ऐकू येऊ लागेल! पण मग बापजन्मी कधी शांतपणं झोप यायची नाही! त्याशिवाय – पण जाऊ दे. हे सारं ऐकून तू कंटाळशील. थोडक्यात म्हणजे त्या 'सुपरसोनिक' यंत्रामुळं माझ्यावर काहीतरी चमत्कारिक परिणाम झाला; मी पार बदलून गेलो. म्हणजे एखाद्या माणसाला भिंतीतून आरपार पाहण्याची शक्ती यावी त्याप्रमाणं मला मंगळावरच्या माणसांची बोलणी अगदी स्पष्ट ऐकू येऊ लागली. सर्वसाधारण माणसाच्या मनावर ताबा ठेवता येईल इतकं त्याचं सामर्थ्य आहे. पण आता माझं मन सर्वसाधारण राहिलं आहे कुठं? बाकीच्यांप्रमाणं मलाही ते हुकूम सोडतात. पण मी ते पाळलेच पाहिजेत असं नाही. पण माझ्या या स्वातंत्र्याचा त्यांना संशय आला असावा असं मला वाटू लागलंय.''

''होय? पण का?'' चष्मेवाल्याने विचारले.

''ती माणसं माझ्याकडे ज्या तऱ्हेनं पाहतात त्यावरून मला तसं वाटतं.''

''कसं पाहतात ती माणसं तुझ्याकडे?'' चष्मेवाल्याने विचारले. तो स्वतःशीच कसला तरी विचार करीत होता. त्याने दुसरी सिगरेट पेटवली आणि धूर सोडीत विचारले, ''काय रे, तू त्यांना पाहिलंस म्हणतोस. कशी असतात रे ही माणसं दिसायला?''

''ती खरी कशी आहेत, कुणाला ठाऊक? पण कपडे घातल्यानंतर ती हुबेहूब तुझ्यामाझ्यासारखीच दिसतात. कपड्यांशिवाय कुणास ठाऊक, ती अदृश्यच राहात असतील किंवा कुत्री, मांजरं यांचं रूप घेऊन राहात असतील. आता त्या आलेल्या माणसाकडे पाहिलंस?''

''पण तो माणूस अदृश्य होता ना?''चष्मेवाल्याने विचारले.

''हो, सर्वसाधारणपणं ही माणसं अदृश्य तरी असतात, किंवा ओळखू तरी येत नाहीत!''

''अरे, तू काय बडबड चालवली आहेस. नॉन्सेन्स!'' चष्मेवाला म्हणाला, ''कपडे घातले म्हणजे ती हुबेहूब आपल्यासारखी दिसतात, नाहीतर अदृश्य असतात म्हणतोस; मग तुला तरी कशी हुडकता येतात ती?''

''अरे थांब. ऐकून तरी घे माझं.'' बापट त्याला समजावीत म्हणाला, ''त्यांचे कान-नाक-डोळे सारे अगदी आपल्यासारखेच असतात; पण काही वेळा त्यांनी भुवयांमधला तिसरा डोळा उघडला की, मात्र ताबडतोब फरक समजतो! त्यांना ज्या वेळी तिसरा डोळा उघडायचा असतो त्या वेळी ते चुटकीसरसे अदृश्य होतात. त्यामुळं तिसरा डोळा उघडलेला माणूस मी पाहिला की, तो मंगळावरचाच आहे अशी माझी खात्री होते. तो माणूस अदृश्य असल्यामुळं मी त्याच्याकडे पाहिलंच नाही असं मी दाखवतो.''

''अरे, पण तसं असेल तर मीदेखील एखादा मंगळावरचा माणूस असू शकेन की!'' अस्वस्थपणे हसत चष्मेवाला म्हणाला.

"छट्! तसं नाही रे!" किंचित् खजील होऊन बापट म्हणाला, "पण खरं सांगू? मला कुणाचीच खात्री वाटत नाही; पण कुणाशी तरी बोललंच पाहिजे ना?" तो क्षणभर थांबला आणि त्याने चष्मेवाल्याकडे निरखून पाहिले. आणि तो म्हणाला, "पण तू तसा नाहीस ना खरंच? तुझा तिसरा डोळा उघड बघू क्षणभर!"

"हूं! असली हकीकत माझ्या वर्तमानपत्रात मी छापावी असा तुझा आग्रह आहे! छान! अरे, तो संपादक मला मग वेड्यांच्या इस्पितळात पाठवील की!" चष्मेवाला हसत म्हणाला.

"पण मग ही सारी हकीकत सगळ्यांना समजणार कशी?" उसळून बापट म्हणाला, "पण हे शक्य आहे का हा प्रश्न निराळा! तुझ्याशी असं बोलत असताना मला ठार करणं त्यांना अशक्य नाही. म्हणून तर मी त्यांच्यापैकी कुणी असताना काही बोलत नाही. ती माणसं अत्यंत काळजीपूर्वक राहतात; डोळ्यांत तेल घालून पाळतीवर असतात. हा प्रकार हजारो वर्षं चालत आला आहे. त्यामुळं काही बाबतीत त्यांनी ढिलाई सुरू केली असेल; पण एका बाबतीत मात्र ते सतत जागरूक असतात. ती बाब म्हणजे आपल्या अस्तित्वाचा पुरावा कुणाच्या हाती लागू नये ही. नाहीतर आपलं मरण ओढवलंच हे माहीत आहे त्यांना. आपला तो शशी माहीत आहे तुला? त्याच्या बाबतीत त्यांनी बरंच दुर्लक्ष केलं; पण त्याच्या हाती पुरावा आहे म्हणताच मात्र त्यांनी तावडतोब त्याची व्यवस्था केली. तो बिचारा अद्याप वेड्यांच्या इस्पितळात आहे."

"बरं, आपल्यासारखेच पोषाख घालून ठिकठिकाणी हिंडण्याखेरीज आणखी काय काय करतात हे तुझे मंगळावरचे लोक?" चष्मेवाल्याने विचारले.

"अरे, ते काय गप्प असतात होय?" बापट मोठ्या उत्साहाने सांगू लागला, "आमचा सारा कारभारच ते चालवतात. आपण करतो त्यापैकी पुष्कळ गोष्टी अत्यंत मूर्खपणाच्या असतात. तरी पण आपण त्या करतोच की नाही? कारण त्या माणसांचा हुकूमच तसा असतो आपल्याला. एखादा खुनी माणूस आपण होऊन गुन्हा कबूल करतो, याविषयी मानसशास्त्रज्ञ काहीही म्हणोत; पण तसं करणं वेडगळपणाचं आहे की नाही तूच सांग. पण त्याला हुकूमच तसा असतो. उदाहरणार्थ, आपली घरंच पहा! कोंदट, खुजी. वारं नाही, प्रकाश नाही, आकार नाही. पण आपण तसलीच घरं बांधत सुटतो, याचं कारण आपल्या मानगुटीवर ती मंगळावरची माणसं आहेत म्हणून! एखादा खरोखरच बुद्धिमान् आर्किटेक्ट निघून नवीन काहीतरी बांधू लागला की, त्याच्यावर टीकेचा भडिमार होतो! जड शब्दांचा बद्धकोष्ठ झालेल्या, किंवा सैल कासोट्याच्या भोंगळ अतिमानवतावादी वाङ्मयाच्या जागी दुसरं काही आलं, की सर्वत्र धुरळा उडालाच! खाण्यापिण्यात, गायनात, पोषाखात नवीन काही आलं की लोक ओरड करू लागतात, याचं कारण ही मंगळावरची माणसंच!"

"अरे, पण आपण काय लिहितो, पाहतो, ऐकतो, याच्याशी त्या माणसांचा काय संबंध ?"

"संबंध नाही कसा ?" बापट जवळजवळ भांडूच लागला, "आम्ही बांधलेल्या घरातच राहतात ही माणसं. आपण जितक्या जास्त मूर्खपणानं, जास्त क्रूरपणानं वागतो, तितका त्यांचा जास्त फायदा होतो. आता ही युद्धं पहा. या युद्धांपासून कधी कुणाला काडीचा फायदा झाला आहे का? पण तीस चाळीस वर्षांनी एक युद्ध होतंच. कारण त्या मंगळावरच्या माणसांच्या दृष्टीनं हे सारं फायद्याचंच आहे. युद्धामुळं लोकसंख्या मर्यादित राहते. शिवाय यांत्रिक सुधारणा होतात. समज, इतर वेळी एखाद्यानं वेगवान् विमान शोधून काढलं, तर त्याला संशोधनासाठी सरकारकडून एक पै मिळवण्यासाठी दातांच्या कण्या कराव्या लागतात. पण युद्धकाळात इकडे रेशनिंग करून असल्या कामासाठी पैसा ओतला जातो. कोणतंही युद्ध होवो, त्यात जय मिळतो तो फक्त मंगळावरच्या माणसांनाच!"

"म्हणजे मंगळावर जन्माला येणं फार भाग्याचं आहे बुवा!" चष्मेवाला मध्येच म्हणाला.

"नाही तर काय! आपल्या इतिहासाकडे पहा, कोणत्याही एका देशाला दुसरा एखादा देश कायमचा आपला गुलाम करता आलेला नाही. आपण गुलाम आहो याची जाणीव झाली की, लगेच धडपड सुरू होते; बंडं होतात आणि ते गुलाम देश स्वतंत्र होतात. पण आपण बरीच वर्षं या मंगळावरच्या माणसांच्या गुलामगिरीत आहो. कारण आम्हाला या गुलामगिरीची अद्याप जाणीवच झालेली नाही. कधी होईल की नाही, कुणाला ठाऊक! आता रेडिओचं पहा!" कशाला काही संबंध नसताना तो विषय घेऊन बापट म्हणाला, "कुठला शहाणा माणूस रेडिओसमोर त्या 'हिज मास्टर्स व्हॉइस'मधल्या कुत्र्याप्रमाणं बसेल? परंतु आपण तसे बसतोच की नाही? कितीही बावळटपणाचं – मूर्खपणाचं काम असो, आपल्याला तसं माहीतही असो; पण आपण ते सारखं करीत राहतोच. – पण तुझा माणूस काय म्हणतो?"

"माझा माणूस? कोण माझा माणूस?" टाचणीने एकदम टोचल्याप्रमाणे दचकून चष्मेवाल्याने विचारले.

"हे बघ, आता ढोंग करू नकोस." सलगीने त्याच्या बरगडीत एका बोटाने डिवचीत बापट म्हणाला, "आपल्या प्रत्येकाबरोबर एकेक मंगळावरचा माणूस असतो, हे तुलाही माहीत आहे. तुझा माणूस आहे, माझा आहे, त्या हॉटेलवाल्याचा आहे –"

"छे:! माझा कुणीही माणूस नाही बुवा!" चहाचा कप थरथरत्या हाताने खाली ठेवीत चष्मेवाला म्हणाला.

"बघ, तूदेखील घाबरला आहेस! हात बघ कसा थरथरतोय् तुझा! अरे, प्रत्येकाचा माणूस असतोच. नाही तर तसा कुणी येईपर्यंत कोंडवाड्यात जनावरं घालतात ना, तसं अडकवतील की!"

"हे बघ बापट, ही सारी मंगळावरची माणसं उद्याच्या विमानानं परत मंगळावर जाणार आहेत." चष्मेवाला म्हणाला, "मग तूदेखील एखाद्या चांगल्या डॉक्टरला आपली प्रकृती दाखव. मग –"

"तो पहा, आणखी एक आला! –" त्याच्या पावलांना पायाने डिवचून, बापट एकदम विषय बदलीत पुढे म्हणाला, "आणि मग घरावरून उड्या मारीत ते माझ्या खिडकीपाशी आलं, आणि कर्कशपणं ओरडू लागलं!"

"कोण? काय ओरडू लागलं?" गोंधळून चष्मेवाल्याने विचारले.

"अरे, माझं मांजर!" पुन्हा त्याला डिवचून खूण करीत बापट म्हणाला. पण तो डोळ्याच्या कोपऱ्यातून समोरील रुमालवाल्या माणसाकडे पाहात होता. "हा कशाला आला बरं आत?" तो अगदी हलक्या आवाजात म्हणाला, "हा तुझा माणूस तर नव्हे ना? नाही तर मघा बाहेर गेलेला माणूस तुझा असेल नि त्यानं आपल्याविषयी रिपोर्ट करण्यासाठी याला पाठवलं असेल. तिकडे बघू नकोस. नाही तर आपण त्याला पाहिलंय् हे त्याला समजेल."

"हे बघ, मला त्यात ओढू नकोस." चष्मेवाला घाईघाईने म्हणाला, "तू जाणे नि तुझी ती मंगळावरची माणसं जाणोत! शिवाय मला आता उशीर होतोय्. मी निघतो." पण तो उठला नाही. उलट त्याने समोरील रुमालवाल्या माणसाकडे हळूच पाहिले.

"तिकडे पाहू नकोस मांजरासारखा." बापट म्हणाला.

"पण मांजरासारखं कां?" उगाच काहीतरी विचारायचे म्हणून चष्मेवाल्याने विचारले.

"कपडे घातले नसतानाही ही माणसं मांजरांना दिसतात असं मला वाटतं. जाऊ दे रे, आज माझ्या माणसाची रजा आहे. शिवाय तुझा माणूस बाहेर गेलेला असेल तर –" बापट बोलता बोलता मध्येच थांबला. त्याचा चेहरा पांढरा फटफटीत पडला. त्याने झटकन् समोरील पाण्याचा ग्लास उचलला आणि एका घोटातच अर्धा रिकामा केला. "अरे, त्या माणसानं सरळ तिसरा डोळा उघडून माझ्याकडे पाहिलं!" तो नंतर म्हणाला.

"हे बघ बापट, जरा शहाण्यासारखं बोलशील का?" शांतपणे चष्मेवाल्याने विचारले, "जर त्यानं तिसरा डोळा उघडला असेल तर तो अदृश्य आहे. मग तुला तरी तो कसा दिसला?"

"इतरांनी आपल्याला पाहावं असं त्याला वाटत नाही; पण मला तो दिसला." बापट म्हणाला. त्याची भीती आता गेली होती. तो चष्मेवाल्याकडे पाहात थोडा हसला.

''शिवाय आणखी एक म्हणजे – मलाच दिसला असं नाही, तुलाही तो दिसला हे मी ओळखलंय्.''

चष्मेवाला पूर्ण एक मिनिटभर स्तब्ध होता. ''मलाही तो दिसला असं का वाटलं तुला?'' नंतर त्याने शांतपणे विचारले.

''छे: रे! मी काहीतरी उगाच बडबडलो असेन.'' बापट म्हणाला, ''चल ऊठ. आपल्या दोघांनाही उशीर होतोय्.''

''थांब, आता इतक्यात जायचं नाही.'' त्याला खाली बसवीत चष्मेवाला म्हणाला.

''म्हणजे तुलाही तो दिसला तर.'' बापट म्हणाला, ''आपण समजतो त्यापेक्षा कितीतरी जास्त माणसं हिंडत असतात. ती येतील, तुमच्याशी बोलतील, तुमच्या मनातलं गुपित काढून घेतील. एखाद्याविषयी थोडा संशय आला तर माहिती मिळवण्यासाठी वाटेल ते करतील.''

चष्मेवाल्याने खिसे चाचपून एक चुरगळलेली वाकडी सिगरेट काढली. ती पेटवीत बापटकडे न पाहता तो म्हणाला, ''बराच वेळ होत आलाय्. सारी माणसं निघून जातील. आपण थोडा वेळ थांबू.''

''थांबू? आणि ते रे कशासाठी?'' बापटने विचारले.

''मी तुला काहीतरी दाखवणार आहे.'' चष्मेवाला म्हणाला, ''कुणी नसताना दाखवलं तर बरं, नाही का?''

थोड्या वेळाने हॉटेलमध्ये ते दोघेच राहिले. ''आता कुणी आणखी नाही ना?'' चष्मेवाल्याने विचारले.

''फक्त तो कोपऱ्यातला –'' पण ते वाक्य बापटने अर्धेच सोडले आणि विचारले, ''काय दाखवणार होतास तू मला?''

''प्रथम मला काही विचारायचं आहे.'' चष्मेवाला म्हणाला, ''ही सारी हकीकत तू मलाच का सांगितलीस? बराच वेळ तू माझ्या मागोमाग हिंडत होतास. तू स्वत: माझी ओळख करून घेतलीस. या गोष्टी माझ्या चांगल्या ध्यानात आहेत. हा काय प्रकार आहे?''

''इकडेतिकडे पाहण्याची तुझी जी पद्धत आहे, तिच्यावरून मला तुझी खात्री वाटली.'' बापट सांगू लागला, ''इतके दिवस मी तुला बघतोय्. तू इकडेतिकडे सारखं डोळ्यांच्या कोपऱ्यातून पाहायचास. नसलेल्या वस्तूकडे, नसलेल्या माणसाकडे, त्यावरून तुलाही मंगळावरची माणसं दिसत असली पाहिजेत, असा मी अंदाज केला. म्हणून मी तुझ्या मागोमाग हिंडलो. नंतर यालाही आपल्यासारखंच वाटत असेल तर फार बरं होईल असं मला वाटू लागलं. गेली दीड दोन वर्षं ही माणसं मला दिसताहेत; पण त्यांच्याविषयी

कुणाजवळ बोलण्याची मला छाती झाली नव्हती. एखाद्या गुप्त गोष्टीचं ओझं प्रचंड दगडापेक्षाही जास्त असतं.''

चष्मेवाल्याने मनगटावरील घड्याळ सोडले आणि त्याचे मागील झाकण काढले. आतून त्याने दोन छोटे फोटो काढले आणि ते बोटाने वेगवगळे करीत, त्यातला एक फोटो काही न बोलता बापटपुढे सरकवला.

''चांदण्यातला फोटो ?'' बापटने विचारले. फोटोत पांढरे ढग असलेले गडद आकाश दिसत होते. त्या गडद आकाशाच्या पुढे झाडे पांढरट लेसप्रमाणे दिसत होती. गवतदेखील पांढरे असून साऱ्या सावल्या पुसल्यासारख्या दिसत होत्या.

''चांदण्यातला नव्हे, 'इन्फ्रा रेड' प्रकारचा फोटो आहे तो!'' चष्मेवाला म्हणाला, ''खरं म्हणजे मी एक अगदी किरकोळ फोटोग्राफर आहे. पण हल्ली 'इन्फ्रा रेड' फिल्मवर प्रयोग करतोय्. तसं करताना मला काही अत्यंत चमत्कारिक फोटो मिळाले. मी साधारण या ठिकाणी राहतो.'' फोटोच्या एका कोपऱ्यावर बोट ठेवीत चष्मेवाला पुढे सांगू लागला, ''आणि तिथून कॅमेरा या ठिकाणी फोकस केला, की दर वेळी 'इन्फ्रा रेड' फिल्मवर कसली तरी चमत्कारिक आकृती उमटते. पानांवरून 'इन्फ्रा रेड' इतका परावर्तित होतो की, सारी हिरवी झाडं-पानं 'प्रिंट'मध्ये पांढरी उमटतात. अगदी स्वच्छ प्रकाशात झाडं नि पानं यांचा फोटो घेतला तर ती एकमेकात मिसळून जातील! पण जर का धुक्यात 'इन्फ्रा रेड'चा उपयोग करून फोटो घेतला, तर आमच्या दृष्टीला ज्या गोष्टी दिसणारही नाहीत त्यांचादेखील स्पष्ट फोटो येतो! अशा वेळी माझ्या फोटोत एक अत्यंत चमत्कारिक आकृती उमटते. – तीन डोळे असलेल्या माणसाची.''

बापटने दोन्ही फोटो काळजीपूर्वक पाहिले आणि खाली ठेवले. ''आमचे अय्यर म्हणून फिजिक्सचे प्रोफेसर होते. ते म्हणायचे, मंगळावरची माणसं जरी खरोखर पृथ्वीवर आली तरी त्यावर कुणाचा विश्वासही बसणार नाही. कारण ज्या थोड्यांना ती दिसतील त्यांच्यावर इतरांचा विश्वासच बसणार नाही मुळी. त्यासाठी फोटोंचाच पुरावा हवा.''

''मलाही तसंच वाटायचं. पण मला अद्याप खात्री नव्हती.'' चष्मेवाला सांगू लागला, ''कारण तुझ्याप्रमाणं मी काही मंगळावरचा माणूस समोरासमोर पाहिलेला नाही. डोळ्यांच्या कोपऱ्यातून ती मला अनेकदा दिसतात; पण मी सरळ पाहू लागलो, की ती नाहीशी होतात. आपली सवय सर्वसाधारणपणे काय असते, की आपल्याला हव्या असलेल्या वस्तूकडे आपण सरळ पाहू शकतो. खरं म्हणजे या मंगळावरच्या माणसांनीच ही असली सवय आपल्याला लावलेली असली पाहिजे. आपल्या दृष्टीच्या मर्यादेत कुठं तरी हालचाल दिसली, की आपण तिकडे डोळ्याच्या कोपऱ्यातूनच पाहून थांबत नाही, तर तिकडे समोरूनही पाहण्याचा प्रयत्न करतो. पण तसं करताच ती हालचाल अदृश्य होते. हे सारं

पुष्कळ तुकडेतुकडे असलेल्या आकृतीसारखं आहे. कसं पाहायचं हे माहीत असलं तरच चित्र दिसतं; नाही तर जन्मभर पाहात राहूनही काही दिसायचं नाही.''

''होय. कॅमेऱ्याला तशी दृष्टी असते.'' बापट म्हणाला.

''म्हणून तर मी हे फोटो तुला दाखवले. या फोटोतील आकृतीत कपाळावरचा तिसरा डोळा स्पष्ट दिसतोय्.''

'''इन्फ्रा रेड' फोटोग्राफी सर्वसाधारणपणं अद्याप नवीनच आहे, नाही?'' बापटने सहज विचारले, ''त्या दृष्टीनं तुझे फोटो फार महत्त्वाचे आहेत. कुणाला ठाऊक! मागं अशी झाडं, असा प्रकाश असं सगळं एकत्र पुन्हा मिळणारही नाही. तो बघ, – आणखी एकजण आत आला, आणि आपल्या दोघांकडेही त्यानं तिसऱ्या डोळ्यानं पाहिलं. –''

चष्मेवाल्याचा हात पुन्हा थरथरू लागला आणि त्याला सरळपणे सिगरेट पेटवता येईना. ''अद्याप त्यांना माझा संशय आलेला दिसत नाही. आमच्या हाती पुरावा आहे हे त्यांना माहीत नसावं; नाहीतर –'' चष्मेवाल्याने अर्थपूर्ण तऱ्हेने गळ्यावरून बोट फिरवले आणि तोंडाने 'चर्र' असा आवाज काढला.

''या साऱ्यामुळं आपण दोघे एकत्र आलो.'' बापट उत्साहाने म्हणाला, – ''आपण आता दोघांनी एकत्रच काम केलं पाहिजे. हं, आणखी एकजण आत आला बघ.'' त्याचा आवाज एकदम हलका झाला.

हॉटेलवाल्याने रेडिओ बंद केला आणि तो पुढील दरवाज्याच्या फळ्या लावू लागला. लागलीच चष्मेवाला उठला आणि त्याने दोन्ही फोटो उचलले. ''हे बघ, आता आपण दोघांनी एकत्र हिंडणंफिरणंदेखील धोक्याचं ठरेल. त्या बाबतीत आपण फार काळजीनं वागलं पाहिजे. कुणाला ठाऊक, त्यांची माणसं सारखी आपल्या पाळतीवर असायची! उद्यादेखील आपण इथंच भेटणं बरं होणार नाही.'' तो म्हणाला.

''अं – मग त्या दोन फोटोंपैकी एक फोटो माझ्याजवळ असू दे का?'' बिचकतच बापटने विचारले.

''तुझ्याजवळ कशाला?''

''समज, दोघांपैकी कुणाला काही अपघात झाला – हो! वेळ काही सांगून येत नाही – तर दुसऱ्याजवळ असावा पुरावा! हा इतक्या महत्त्वाचा पुरावा मिळत नाही. मग मिळाल्यावर घालवून कसा चालेल?''

चष्मेवाल्याने थोडा विचार केला. फोटो देण्याबद्दल तो फारसा उत्सुक दिसला नाही. अखेर त्याने 'ठीक आहे' म्हटले, आणि एक फोटो बापटला दिला.

''व्यवस्थित ठेव रे तो फोटो.'' चष्मेवाला बाहेर पडताना बापटला म्हणाला, ''उद्यापरवा भेटू केव्हा तरी सहज.'' आणि तो बाहेर पडला. हॉटेलबाहेर येताच त्याने सिगरेट रस्त्यावर टाकून पायाने विझवली आणि झपझप पावले टाकीत तो चालू लागला.

नंतर पाचदहा मिनिटे बापट तसाच टेबलाजवळ बसून राहिला. त्याच्या दोन भुवयांमध्ये एक आठी पडली. नंतर भुवयांची हालचाल झाली. त्या आठीमधून त्याने आपला तिसरा डोळा उघडला आणि पाठमोऱ्या चष्मेवाल्याकडे तो शांतपणे पाहू लागला!

[अनुवादित]

# कोजागिरी

तसे पाहिले तर, आपल्या हातात चारसहा पैसे जास्त खुळखुळत आहेत, एक दिवस ऐषआरामी चैन करावी, कुठे तरी महिनाभर जाऊन राहावे, अशी स्थिती माझ्या आयुष्यात आजवर कधीच निर्माण झालेली नव्हती.

पण आता या शहराचाही फार कंटाळा आला होता. ट्रामगाड्यांचा तोच तो निर्दय खडखडाट, तेच फूटपाथवरून सदा भटकणे, मळकट गाड्यांत निवरपणे कोंबले जाणे, तितक्याच निवरपणे बाहेर फेकले जाणे. – बस्स! एखादी बरी न होणारी जखम सतत वाहात राहावी तसले जीवन मी आणि सुनीता आजवर जगत होतो. लग्नाआधी मी जरा भटकलो तरी असेन; पण ती कोनाड्यासारख्या खेड्यातून माझ्या आयुष्यात आली. तेव्हापासून तिच्या पावलांना हिरव्या गवताचा स्पर्श झालेला नाही, नदीओढ्याचे थंडगार पाणी तिच्या पायांवरून खळखळलेले नाही.

त्यामुळे तिचा ताप थोडासा उतरताच मी ठरवले, एक महिना का होईना, कुठे तरी जायचे, कुठे तरी राहून यायचे!

पण महाबळेश्वर-माथेरान काही आमच्याकरिता नाहीत. मी ज्या खेड्यात जन्मलो, वाढलो, तेही आता खेडे राहिलेले नाही. तेथे आता डांबरी रस्ते झाले आहेत, रस्त्यांवरून ऑटो रिक्शा डळमळत, किंचाळत हिंडत आहेत. आमच्या घरासमोरील पारिजातकाचे झाड तोडून आता काकांनी तेथे एक किराणा मालाचे दुकान केले आहे. गाव वाढत होते; पण आता ते गाव माझे राहिले नव्हते.

यावर सुनीतेनेच एक तोड काढली. – तिच्या दूरच्या मामांचे एक घर अबोली गावी होते. मामा कधी तरी दोनचार वर्षांनी तेथे जात. नाही तर रखमाबाई नावाची बाई झाडलोट करून तेथे राहात असे. मामांना एक पत्र पाठवले की, सारे चुटकीसरशी व्यवस्थित होईल असे सुनीतेने सुचवले.

खुद्द तिलाच ती कल्पना फार आवडली होती, आणि कितीतरी महिन्यांत ती एकदम लहान मुलाप्रमाणे हसरी दिसू लागली होती. अबोली गाव एका छोट्या बेटावर आहे. तेथून बारा मैलांवरील बंदर रात्री प्रकाशाच्या टिकल्याटिकल्यांनी लखलखते. वरच्या बाजूला असलेल्या टेकडीवर उभे राहून पाहिले की, साऱ्या बेटाभोवती चुण्याचुण्या पडलेल्या वस्त्रासारखा दिसणारा निळा समुद्र आणि हिरव्या झाडांची किनार दिसते. वरच्या बाजूला

एका खडकात कोरलेली प्राचीन मंदिरे आहेत. बस्स! पाहिजे तर होडीमधून बाहेरच्या जगाशी संबंध ठेवावा; नाही तर त्या निळसर, हिरव्या घरट्यात ऊबदारपणे राहावे.

अखेर एकदाची आम्ही अबोली गावातल्या सुनीतेच्या मामांच्या त्या घरात जाऊन पोचलो. घर कसले, जुन्या थाटाला, जीवनाला शोभणारा तो एक ऐसपैस वाडाच होता. पण सध्या त्याचा अर्धा भागच वापरात होता. दारात जाईचा वेल माहेरवासिनीप्रमाणे सुखासीन वाढला होता आणि साऱ्या वाड्याभोवती कर्दळीची गर्दी झालेली होती.

आम्ही तेथे गेल्यानंतर रखमाबाईंनी प्रेमळपणाने आमच्या आयुष्याचा ताबाच घेतला. त्यांच्या चहात नेहमी साखर जास्त पडे; भाकरी कुठेतरी नक्कीच करपे. पण एकंदरीने त्यांच्या वागण्यात जुन्या परिचित शालीचा प्रेमळपणा होता.

एक दिवस भटकण्यासाठी मी बाहेर पडलो. त्या वेळी सुनीता घरीच बसून एक शब्दकोडे सोडवायचा प्रयत्न करीत होती, आणि शेवटचे अक्षर 'पू' असलेल्या एका पालेभाजीचे नाव रखमाबाईंना विचारीत होती. पण मी परत आलो त्या वेळी साराच देखावा पालटलेला होता. – ती एकटीच, उदास, चिमणीएवढे तोंड करून बसलेली होती!

"काय झालं ग? अशी गप्प का?" मी घाबरून विचारले.

"त्या रखमाबाई आहेत ना, त्या –" ती म्हणाली.

"त्यांचं काय? काय केलं त्यांनी?" मी गोंधळून विचारले. मला या प्रकाराचा अर्थच समजेना.

"त्या म्हणतात, आपली भाची फार आजारी आहे, आणि त्यासाठी त्या दोनचार दिवसांत गावी जाणार आहेत."

"हात्तिच्या! मग त्यात एवढं घाबरायचं काय कारण?"

"घाबरायचं?" ती एकदम हात नाचवीत म्हणाली. ते पाहून तर मला हसूच आवरेना. "म्हणजे काय डोंबल तुमचं! आता सारा स्वैंपाक, धुणंभांडी आम्हालाच करावं लागणार! झाडलोट पाहावी लागणार!..."

या बाबतीत मी रखमाबाईंशीच बोलायचे ठरवले. कदाचित् त्यांना आपला पगार वाढवून पाहिजे असेल. चारपाच रुपयांचाच जर प्रश्न असेल तर महिनाभर ते आपल्याला जड वाटणार नाही, असा विचार करून मी सुनीतेला म्हटले, "बरंय्, ते आपण नंतर बघू. आज तू कुठंच बाहेर पडली नाहीस. तेव्हा वर टेकडीपर्यंत जरा फिरून येऊ. चल."

टेकडीवर उभे राहून पाहिले की, भोवतालचा समुद्र अगदी क्षितिजापर्यंत निळ्या विशाल निशाणाप्रमाणे थरथरत असलेला दिसे. तेथेच खडकात दोनतीन प्राचीन मंदिरे कोरून काढलेली होती. जणू असमाधानकारक होऊन नासल्याप्रमाणे दोन देवळे तशीच अर्धवट सोडून देण्यात आलेली होती. दोन चमत्कारिक पण विशाल आकृती शिलाखंडातून अर्धवट बाहेर आल्या असतानाच मृत झाल्या होत्या. पण एका मंदिराचे शिल्पस्वप्न पूर्ण

झालेले होते. तेथे आत पाऊल टाकताच घनदाट, ओलसर भूतकाळाचा प्रत्यक्ष स्पर्श झाल्याप्रमाणे मन बावरत असे. पायऱ्या चढून वर जाताच अष्टकोनी खांबांची एक रांग लागे. त्यांवर तळाशी जन्म घेऊन धडपडत वर प्रकाशाकडे येत असल्याप्रमाणे वाटणाऱ्या हत्ती, घोडे, सैनिक यांच्या हजारो आकृती कोरलेल्या होत्या. दाराशीच दोन प्रचंड द्वारपाल कधीही न मिटलेल्या डोळ्यांनी जागता पहारा करीत होते. पण या साऱ्या स्तब्ध जगावर ठिकठिकाणी भग्नतेची पावले उमटलेली होती. उजव्या बाजूच्या कोनाड्यातील शिवपार्वतीच्या मूर्तीचे चार तुकडे झाले होते. एका द्वारपालाला एका गुडघ्याखाली पायच नव्हता. विहिरीच्या काठी असलेल्या जलकन्येचा फक्त एक खांदा आणि हात ठिकाणावर दिसत होता. खालच्या ढिगाऱ्यात इतर अवशेष दिसत होते.

पण या साऱ्याच्या मध्यभागी एका दैत्याच्या छातीवर पाऊल रुतवून उभी असलेली वीस फूट उंचीची वीरभद्राची मूर्ती मात्र अद्याप अभंग उभी होती. शेकडो वर्षांपूर्वी कोणा अज्ञात कलावंताच्या छिन्नी-हातोड्याने त्या डोळ्यांत जो अंगार उभा केला होता, त्यांतील धग अद्याप कमी झालेली नव्हती; पायांखाली चिरडल्या जाणाऱ्या दैत्याची सुटका झालेली नव्हती; विजयानंदाने एका हाताने वाजवल्या जाणाऱ्या डमरूचा मूक नाद विरलेला नव्हता.

वारुळे कोरणाऱ्या मुंग्यांप्रमाणे, वर्षानुवर्षे खपून माणसांनी खडकांत ही देवळे निर्माण केली. वीरभद्राच्या गळ्यातील सर्पात खऱ्या जातिवंत नागाचा फूत्कार आणण्यासाठी रात्रंदिवस शिल्परेषांची त्यांनी मनधरणी केली. त्या कलावंतांच्या पिढ्यान् पिढ्या टिकल्या पुसल्याप्रमाणे नाहीशा झाल्या. नाशाच्या लाटा मंदिराच्या पायरीखांबापर्यंत आल्या आणि तेथेच थबकल्या. परंतु अद्यापही कोणत्या तरी रक्तक्षणाची वाट पाहात वीरभद्राची मूर्ती तेथे उभी आहे; फक्त तिच्याच डोळ्यांना दिसणाऱ्या कशाकडे तरी बोट दाखवीत ती सामर्थ्यशाली, गूढ, भीतिदायक मूर्ती अजूनही उभी आहे.

त्या प्राचीन भग्न अवशेषांचे गडद, मृदू सौंदर्य चांदण्या रात्री विशेष खुलून दिसत असे. कोनाकोपऱ्यातून शिरलेल्या चांदण्यामुळे त्या मूर्ती तरल होत, तर सावल्या जास्त सांद्र वाटत. आम्ही थोडा वेळ पायऱ्यांवरच बसून होतो. थोड्या वेळाने आपणही त्या साऱ्या स्तब्ध गोठलेल्या दृश्याचाच प्राचीन भाग आहो की काय, असा मला भास होऊ लागला. त्या तृप्त, उदास सौंदर्याने मी इतका भारावून गेलो की, क्षणभर आम्हाला आमच्या क्षुद्र, अनंत समुद्रकाठी वेचलेल्या एका शिंपल्याप्रमाणे वाटणाऱ्या आयुष्याचा विसर पडला.

परत आल्यावर रखमाबाईंना मी सारा प्रकार विचारला.

"काकू, तुम्ही म्हणे चारपाच दिवसांत जाणार आहात?" मी म्हटले, "पण तुमची तक्रार तरी काय आहे? म्हणजे तीनचार रुपये जास्त द्यायला माझी ना नाही."

रखमाबाईंनी हातवारे करूनच तो विचार बाजूला झटकला. "मला एकटीला करायचंय् काय घेऊन यापेक्षा, तुम्हीच सांगा!" त्या म्हणाल्या, "राहायला जागा फुकट आहे. सुनीताबाई तर माझ्यासाठी इतक्या धडपडतात, की त्या पाहुण्या आहेत की मी पाहुणी आहे हे समजणारसुद्धा नाही कुण्णाला!"

"मग का राहात नाही तुम्ही?" मी अधीरपणे विचारले.

"त्याचं असं आहे –" त्या सांगू लागल्या, पण मध्येच एकदम थांबल्या आणि घाईघाईने म्हणाल्या, "पण मी राहणार कशी? माझी भाची आजारी आहे."

"पण तुमची भाची तर गेले सहा महिने आजारीच आहे की! आणखी एक पंधरवडाभर रहा आणि मग जा. आम्हालाही मग इथं कुठं राहायला होणार आहे?"

"छे:! ते मात्र जमणार नाही. आज सोमवार आहे. गुरुवारी मला गेलंच पाहिजे." त्या निक्षून म्हणाल्या, "पण हवं तर मी रविवारी येईन परत."

त्यांच्या बोलण्यावरून त्या माझ्यापासून काहीतरी लपवीत आहेत असा मला संशय आला.

"मग दोनचार दिवसांसाठीच कशाला जाता?" मी म्हटले, "अं – खरं काय ते कारण सांगून टाका ना!"

त्या थोडा वेळ थांबल्या आणि त्यांनी हसण्याचा प्रयत्न केला. "तुम्ही मला हसाल; पण मी आहे आपली खेडवळ म्हातारी. मला काय समजतंय्? पण मी ऐकलंय ते सांगते. शुक्रवारी कोजागिरी आहे ना, त्या दिवशी म्हणे या वाड्यात काहीतरी भयंकर घडतं."

त्या वेळी बाजूला सुनीता नव्हती हे एका दृष्टीने बरेच झाले. एखादे मांजर सहज उडी मारून निघून गेले की, त्याच्या दसपट ती उडी घेत असे आणि नंतर तासभर अंग आवळून बसत असे.

"पण भयंकर म्हणजे काय? घडतं तरी काय असं? आम्ही असल्या गोष्टीची थट्टा करणारी माणसं नव्हेत." मी म्हणालो आणि थोड्याफार प्रमाणात हे खरेही होते.

"तुम्ही टेकडीवरच्या देवळातली ती काळ्या दगडात कोरलेली वीरभद्राची मूर्ती पाहिलीत ना? कोजागिरीला म्हणे, त्या चौथऱ्यावर चांदणं पडलं की, ती मूर्ती साऱ्या दगडाच्या ओझ्यासह देवळातून बाहेर येते, पायऱ्या उतरते आणि गावातून एक फेरी मारून परत जाऊन आपल्या जागी उभी राहते. वाटेत जर कुठं ओलसरपणा असेल तर तिथं पावलं उमटलेली दिसतात तिची. गेल्या वर्षी ते डॉक्टर मेहेंदळे आहेत ना, त्यांचा पाण्याचा हौद फुटून रस्त्यावर चिखल झाला होता, तिथं म्हणे हातभर पाऊल उमटलेलं होतं."

"पण ती मूर्ती गावात येऊन करते तरी काय? की नुसतं येऊन फिरून जाते?" मी विचारले.

रखमाबाई गप्प झाल्या. सांगावे की नाही, अशा तऱ्हेचा संकोच त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

"सांगा सांगा! आम्ही काही घाबरणार नाही." मी हसून म्हणालो.

"ती मूर्ती या घरात येऊन जाते." त्या एकदम म्हणाल्या, "त्या मूर्तीचे यज्ञ होत असत म्हणे या वाड्यात. पूर्वी इथं एक देऊळ होतं त्यावर हा वाडा बांधलेला आहे. आपल्या नैवेद्यासाठी ती मूर्ती इथं येते आणि त्या वेळी जर का कोणी तिच्या वाटेत आलं तर –" पण त्यांनी आपले वाक्य अर्धवटच सोडले.

त्या विषयावर त्यांनी बोलायचेच थांबवले. फक्त जाताजाता त्या म्हणाल्या, "पण त्या दिवशी घराला आतून कडीकुलूप घालायला विसरू नका. माझं म्हातारीचं एवढं ऐका, आणि दारावर, खिडकीवर स्वस्तिक काढा कुंकवानं. मी मुद्दाम द्रोणभर कुंकू स्वैपाकघरातल्या कोनाड्यात ठेवलं आहे."

पण मला त्या विषयाबद्दल आणखी काही माहिती मिळते का हे पाहायचे होते. म्हणून मी मुद्दामच विचारले, "पण काकू, ती मूर्ती चालत असताना पाहिली आहे का कुणी?"

"कोजागिरीला यापूर्वी या वाड्यात राहिलं आहे कोण? राहणारे म्हणजे तुम्हीच पहिले. म्हणून मी सारं सांगते आहे. मी हवं तर शनिवारीच येईन."

अर्थात् मी सुनीतेला यातले काहीच सांगितले नाही. तिने कसले तरी विणकाम हाती घेतले होते, त्यावर चर्चा करताकरता दोन दिवस निघून गेले. रखमाबाईंनी आपले बोचके बांधले आणि त्या गुरुवारी निघून गेल्या. गुरुवारी काही विशेष घडले नाही. पण विशेष, सांगण्याजोगे घडले ते शुक्रवारी.

त्या दिवशी मला सकाळी लौकर उठावे लागले. सकाळचा चहा मीच केला. सुनीताही लहान मुलीप्रमाणे हसतखिदळत होती. सारा दिवसभर आम्ही कुठे भांडी रचून ठेव, जाईच्या वेलाची वाळलेली पाने काढ, अशा नव्या कामात मोठ्या उत्साहाने वेळ काढला.

पण संध्याकाळी मात्र हा सारा उत्साह ओसरला आणि सुनीता एकदम उदास दिसू लागली.

"काय झालं ग तुला एकदम?" मी घाबरून विचारले, "ही समुद्रकाठची हवा मोठी चमत्कारिक असते."

"छे:! मला तसं काही झालेलं नाही." विचार करीत सुनीता म्हणाली, "पण तुम्हालाही असं कधी वाटतं का हो? काही वेळा मन उगाचच जड होतं, हुरहूर लागते,

काहीतरी भीतिदायक घडणार असं उगीचंच वाटू लागतं. तसं मला वाटायला लागलंय् आत्ता.''

''हे बघ सुनीता,'' मी तिला धीर देत म्हटले, ''आजच्या कामानं तू दमली आहेस. शिवाय रखमाबाई गेल्यानं तुला एकटं वाटायला लागलं आहे. तेव्हा तू आता थोडा वेळ स्वस्थ पडून रहा. मी तोपर्यंत थोडा वेळ भटकून येईन. हवं तर उद्या सकाळी डॉक्टर मेहेंदळ्यांना सहज येऊन जा म्हणून सांगतो.''

''डॉक्टरबिक्टर कशाला ?'' सुनीता म्हणाली, ''पण मी आत्ता येणार तुमच्याबरोबर.''

''छे: ! मग उगाच दमून जाशील तू. मी आत्ता तासाभरात येईन. रात्रीच्या वाऱ्यानं एखादवेळी सर्दी होईल तुला.''

मी बाहेर पडलो. रात्र ताणून पसरलेल्या वस्त्रासारखी भासत होती. कुठे हालचाल नाही, असमाधानाची चुरगळी नाही. आभाळात खूपसे ढग छाती पुढे काढून वेड्यासारखे सरकत होते. ते इतके खाली वाटत होते की, पाहणाऱ्याला वाटावे, आता झाडांच्या टोकात त्यांचे पुंजके अडकणार ! मी घड्याळाकडे पाहिले. आता अकरा वाजायचा सुमार झाला होता. रात्रीच्या त्या धुंद सौंदर्याने मी वेडावल्यासारखा झालो होतो. मला वाटले, आता या चांदण्यात ते प्राचीन मंदिर कसे दिसते ते पाहावे आणि मग परतावे. पुन्हा आपण या ठिकाणी कधी येणार, कुणास ठाऊक ! शिवाय मुद्दाम कोजागिरीलाच इथे येणे कठीणच आहे !...

आमच्या घरावरून जात असता मी हळूच खिडकीतून आत पाहिले. सुनीता शांत झोपलेली होती. – स्तब्ध, हालचाल न करता, कोजागिरीच्या रात्रीसारखी. मी हळूहळू रस्त्याने चालू लागलो. पण थोडे अंतर गेल्यावर आपल्यामागून कुणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकू येत आहे असा मला भास झाला. मी थबकताच तो आवाज थांबला; पण मी चालू लागताच तो आवाज पुन्हा सुरू झाला. या वेळी कोण भटकत असणार ? आणि तेही आपला पाठलाग करीत ?... त्या डॉक्टरला म्हातारपणामुळे झोप येत नाही, त्याला भटकण्याचे वेड आहे... पण त्याने आपला पाठलाग का करावा ?... बरे, चोर आहे म्हणावे, तर त्याला जास्त हलकी पावले टाकता येत नसतील तर त्याने चोरीचा धंदा सोडावा हेच चांगले !... मी मागे वळून पाहिले नाही; तसे धाडसच झाले नाही मला.

मी त्या मंदिराजवळ पोचलो. आदल्या दिवशी मी आणि सुनीता पायऱ्यांवर जेथे बसलो होतो, तेथे काही क्षण उभा राहिलो. नंतर मी आत गेलो. त्याच वेळी काहीतरी तीक्ष्ण टोचल्याप्रमाणे मला एकदम आठवले की, याच वेळेला ती अजस्र दगडी मूर्ती चालत बाहेर पडते असा समज आहे. मला त्या वेळी रखमाबाईंच्या भाबडेपणाचे थोडे हसू आले. मी आत काळजीपूर्वक पाहू लागलो. वरच्या भागातून ठिकठिकाणी फेकल्याप्रमाणे सूपसूपभर चांदणे पडले होते, आणि मधल्या चौथऱ्यावर तर चांदण्याच्या

प्रवाहाचा एक धबधबाच आत उतरला होता. आणि – आणि एकदम मी तिथल्या एखाद्या मूर्तीप्रमाणे गोठून गेलो! चौथऱ्यावर पायांखाली चिरडलेला दैत्य होता; पण त्याच्या छातीवर दिमाखाने पाय ठेवणारी वीरभद्राची मूर्ती नाहीशी झालेली होती!

माझ्या मनाच्या चिंधड्याच झाल्या. काहीतरी भयानक, अशुभ घडून गेले आहे, अशी चमत्कारिक जाणीव मला झाली; आणि मी तसाच रस्ता न पाहता, झाडाझुडपांतून धावत सुटलो. आपल्या तोंडून किंकाळी बाहेर फुटू नये म्हणून मी ओठ अगदी गच्च दाबून धरले होते. मी पळत असता वाटेत कुणीतरी उभे असल्यासारखे वाटले. मी त्याला एक जोराचा धक्का दिला आणि "हट् बाजूला!" म्हणून ओरडलो. पण त्याने माझा हात घट्ट धरून मलाच थांबवले.

मी हिसकाहिसकी करीत म्हणालो, – "सोड! सोड मला! त्या देवळातली मूर्ती चालत निघून गेली आहे!"

तो माणूस मोठ्याने हसला. "इथं आल्यापासून तुमच्या सिगरेटी जास्त झाल्या आहेत; म्हणून तुमचं डोकं हलकं झालं आहे!" तो माणूस म्हणजे डॉक्टर मेहेंदळे होते. ते म्हणत होते, "आणि एकदा डोकं हलकं झालं, की मग गुलाबी हत्ती, हिरव्या गाई, आणि खुणा करून बोलावणाऱ्या सिनेमा-नट्या दिसू लागतात!"

"डॉक्टर, शप्पथ! ही थट्टेची गोष्ट नाही." मी म्हणालो, "मी स्वत: डोळ्यांनी तो रिकामा चौथरा पाहून आलोय्."

"असं का? छान!" ते उत्साहाने म्हणाले, "चला, आपण दोघे मिळून पुन्हा एकदा पाहून येऊ."

"नको. मी जातो. घरी सुनीता एकटीच आहे." मी जाण्याकरिता वळत म्हणालो.

"छट्! असं कसं होईल?" मला अडवीत डॉक्टर म्हणाले, "आणि काय सांगणार तुम्ही तिला? वीस फुटी अजस्र मूर्ती मांजराच्या पिलाप्रमाणे टुणटुण् उड्या मारीत पळून गेली आणि मी घाबरून तुझ्याकडे पळत आलो म्हणून?"

मी निमूटपणे त्यांच्याबरोबर चालू लागलो. त्यांनी माझा हात अद्याप तसाच धरून ठेवला होता. आम्ही त्या मंदिराजवळ आलो. त्या चौथऱ्याकडे पाहायचे धाडस मला झाले नाही. डोळे मिटून मी गप्प उभा राहिलो. कारण मूर्ती चौथऱ्यावर नसणार अशीच माझी खात्री होती. पण डॉक्टरांनी माझ्या पाठीवर थाप मारली आणि ते चांदणे थरथरवीत हसले.

"झालं का समाधान?" ते म्हणाले. मी पाहिले, तों चौथऱ्यावर त्याच क्रूर गोठलेल्या डोळ्यांनी पाहात ती मूर्ती स्तब्ध उभी होती! मी एक नि:श्वास सोडला.

"बरं झालं बुवा तुम्ही भेटलात ते!" मी उद्गारलो, "नाही तर ती मूर्ती खरोखरच नाहीशी झालीय् असं मी लोकांना सांगत सुटलो असतो."

पण डॉक्टर मूर्तीकडे निरखून पाहात होते. त्यांनी एकदम टाळी वाजवली.

"पण इथं कुणीतरी येऊन गेलंय् बरं का!" ते उद्गारले, "हा पहा, हिचा कोपरापासूनचा उजवा हात मोडलेला आहे."

कालपरवा आम्ही पाहिले त्या वेळी हात, हाताची बोटे, – विशेषत: क्षितिजापलीकडे काहीतरी दाखवीत असल्याप्रमाणे वाटणारे बोट सारे काही व्यवस्थित होते. आता ते बोट नाहीसे झाले, हात मोडला आहे. म्हणजे मला काही सगळा भासच झाला नव्हता तर! कुणीतरी ती मूर्ती निदान हलवायचा तरी प्रयत्न केलेला होता. "बरंय्, चला आता; नाही तर सुनीता किंचाळत उठेल." मी डॉक्टरांना म्हटले. डॉक्टरांना घरी जायचे म्हणजे आमच्या वाड्यावरूनच जावे लागे; म्हणून तेही माझ्याबरोबरच चालू लागले.

आम्ही आमच्या घरापाशी पोचलो त्या वेळी घराचा दरवाजा उघडाच होता, आणि आत दिव्याचा मोठा प्रकाश भरून राहिला होता. – माझ्या मनात आले, बहुधा सुनीता उठली असावी, आणि एकटेपणी भीती वाटायला नको म्हणून तिने भराभर सारे दिवे लावून ठेवले असावेत!... वेडीच आहे सुनी!... माझ्याबरोबर डॉक्टर मेहेंदळेही घरात शिरले.

घरात जाऊन पाहतो, तो सुनीता कुठेच दिसेना. खिडकी सताड उघडी होती. रिकाम्या खुर्चीशेजारी तिचे विणकाम खाली पडलेले होते. आणि – आणि खिडकीजवळच्या कोपऱ्यात, अर्धवट खिडकीत, अर्धवट टेबलावर, अशा अवस्थेत सुनीता गोठल्यासारखी पडलेली होती!

माझी वाट पाहण्यासाठी ती खिडकीपाशी गेली असावी. पण – पण त्या वेळी तिचा चेहरा भीतीने विद्रूप करण्यासारखे मागून काय आले असावे?... तिचे केस मोकळे होऊन टेबलावर पंखाप्रमाणे पसरलेले होते. तिचे डोळे बशीएवढे मोठे होऊन त्यांतील संवेदना विझली होती. त्या डोळ्यांनी पाहिलेले शेवटचे दृश्य कोणते असेल?...

मी तिला मुलाप्रमाणे अलगद उचलले. तिच्या मुठी घट्ट आवळलेल्या होत्या. एका मुठीत तिने काहीतरी पकडून ठेवलेले होते. आता कशाला काही अर्थच नाही हे समजल्यावर मी मेहेंदळ्यांना ती मूठ उघडायला सांगितले.

– त्या मुठीत काळ्या दगडाचे एक मोठे जाडजूड बोट होते!

[रूपांतरीत]

# चांदणे

पार्वतीबाई शिरगावकर यांच्याकडे कामाला सुरुवात करून सुमती त्यांच्या बंगल्यात राहायला गेली, त्या गोष्टीला पाच सहा दिवस झाले असतील नसतील, तेव्हाच त्यांच्या स्वभावाचे एक वैशिष्ट्य तिच्या ध्यानात आले. त्या अनेक भिकाऱ्यांना अगदी सढळ हाताने मदत करत असत. बंगल्याच्या पुढील गेटपैकी एक थोडे वाकडे होऊन जमिनीवर टेकले होते व त्यामुळे ते उघडताना जमिनीत ओरबडल्यामुळे कर्रर असा आवाज होत असे, आणि हा आवाज सारा दिवसभर सतत चालूच असे. सकाळ झाली की, भिकाऱ्यांची रांग लागे. मग दाढी वाढवलेले आंधळे, हजार तुकड्यांनी अंग झाकणाऱ्या भिकारणी, काळी कफनी घालून करोटी पुढे करणारे फकीर यांची सारखी रहदारी चालू होई ती अंधार पडेपर्यंत. पांढरेशुभ्र वस्त्र नेसून पार्वतीबाई बाहेर व्हरांड्यात इझिचेअरवर बसत, पसापसाभर तांदूळ, अन्न, किंवा एखाद-दुसरे नाणे उचलून देत.

या गोष्टीचे कुणालाही आश्चर्य वाटले असते. कारण कुणालाही सढळ हाताने मदत करावी, ऐसपैस खर्च करावा, असा त्यांचा स्वभावच नव्हता. त्यांच्याकडे कुणी शाळेकरिता मदत मागायला गेला, तर सगळ्या शाळा सरकारने चालवाव्या असे सांगून त्या त्याला परत पाठवत असत. कोणत्याही सणा-उत्सवासाठी तर त्यांच्या हातून पैही सुटत नसे. अनेकदा स्वयंपाकीण सांगेल त्या वस्तू पार्वतीबाई निमूटपणे आणून देत. तर इतर वेळी अगदी क्षुल्लक गोष्टीत काटकसर झाली पाहिजे असा त्रागा करत. बरे, ती बिचारी जर दुसरे दिवशी तसे वागू लागली तर त्या ताट तांब्याची आदळआपट करायला मागे पुढे पाहात नसत. म्हातारपणी स्वभावाला ज्या चमत्कारिक गाठी पडत जातात, त्या साऱ्या त्यांच्यात स्पष्ट दिसत. आणि त्यामुळेच सुमती तेथे आली, ते फक्त एकच महिना राहण्याच्या इराद्याने. या स्वभावाशी आपले कसे जमणार याची तिला शंकाच होती. वास्तविक अर्ज, भेटी-मुलाखती वगैरे करून तिने हे काम घेतले नव्हते. तिच्या ओळखीच्या कुणीतरी तिला माहिती दिली होती. सुमतिही दोन महिने मोकळीच होती. तिने ते काम निव्वळ गंमत म्हणून स्वीकारले होते. जर पटले, तर आणखी एक महिना राहता येईल, नाहीतर एक महिन्यातच जाता येईल.

पण येथे आल्यावर पार्वतीबाईंचा बंगला मात्र तिला फार आवडला होता. गावापासून तीनचार फर्लांगावर अगदी गर्द झाडांत तो मुद्दाम लाल रुतवून ठेवल्याप्रमाणे वाटे.

भोवताली अतिशय विस्तृत आवार होते व सर्वत्र हिरवट सावळ्या छाया टाकणारी झाडे होती. पार्वतीबाईंनी फक्त घरासमोरच बाग ठेवली होती, आणि त्यांचा माळी सदोदित झाडाझुडुपांत काम करत असताना दिसे. ॲस्टरवर एक फूल वाळलेले दिसले, किंवा एखादा गुलाब जादा उमललेला दिसला की, पार्वतीबाई व्हरांड्यातूनच कर्कशपणे ओरडत. गेटपासून डौलदार वळण घेऊन दारातील कमानीपर्यंत येणारा रस्ता तर त्यांना नेहमी धुतल्या वस्त्राप्रमाणे लागे. एकदा त्यावर बाजूच्या झाडावरून एक घरटे पडले, व त्यातील अंडी फुटून पत्रावळीएवढी जागा खराब झाली, तर पार्वतीबाईंनी रात्री नऊ वाजेपर्यत माळ्याला कामाला लावून ती जागा आरशासारखी करून घेतली.

सुमतीचा बहुतेक सारा वेळ समोरील मोठ्या सोप्यावर जात असे. तेथे पार्वतीबाई एका प्रशस्त तक्याला टेकून बसत. समोरील भिंतीवर सोनेरी चौकटीचा अजस्र आरसा होता, त्यात आवारातील सारे दिसे. नर्स म्हणून सुमतीने ते काम पत्करले होते, पण ती जवळ जवळ त्यांची मैत्रीणच झाली होती. पार्वतीबाईंना वर्तमानपत्र वाचून दाखवणे, जुने रेशमी, भरजरी कपडे काढून त्यांचा इतिहास ऐकणे या गोष्टी तिला कराव्या लागत. पुष्कळदा पार्वतीबाईंचा डोळा लागला की, ती तिथेच मन अगदी चोरून बसत असे. हातातील पुस्तकाचे पानदेखील परतवताना फार आवाज होईल अशी तिला भीती वाटे. मध्येच झुंबराचे लोलक वाऱ्याच्या झुळुकीत किणकिणत, दरवाजावरील पडदा थरथरे, बाहेर वाळलेली पाने संथपणे खाली पडत, सावकाश जमिनीवर सरपटत जाऊन स्तब्ध होत. पार्वतीबाईंचे वय नक्की साठाच्या पुढे असेल, तिला वाटे. कारण त्या अगदी मुटकुलीएवढ्या, अगदी विरलेल्या दिसत. वार्धक्याने त्यांचा चेहरा किंचित् मलीन, सुरकुतलेला झाला होता, पण त्यांचे हात मात्र एखाद्या मुलीप्रमाणे अद्याप नाजूक, कोवळे दिसत. हिवाळा, पावसाळा त्यांच्या शुभ्र रेशमी वस्त्रात कधी फरक झाला नाही, झोपताना लावण्याची जाईच्या वासाची उदबत्ती त्यांनी कधी बदलली नाही.

पण आपण एक महिना तरी राहावे की नाही हे सुमतीला समजेना. बरे, पार्वतीबाईंचे आपल्याविषयी काय मत झाले आहे हेही तिला कळेना. कित्येकदा तिला वाटे, पार्वतीबाईंनी आपल्यापेक्षा जास्त वयस्क, अनुभवी बाईची निवड करायलां हवी होती. आता कुठे आपला कोर्स पूर्ण झाला आहे, आणि अनुभव म्हटला, तर हाच पहिला! शिवाय जेवणखाण, पगार घेण्याइतके आपण काम तरी करतो का?

पण खरी गोष्ट अशी होती की, ती वयाने इतकी लहान होती म्हणूनच मुद्दाम पार्वतीबाईंनी तिची निवड केली होती. त्या भव्य पण एकाकी बंगल्यात कुणीतरी तरुण वयाचे, मनाचे हिंडत राहावे असे त्यांना हल्ली फार वाटू लागले होते. बंगल्यात माणसे नव्हती असे नाही. गेली वीस वर्षे रखमाबाई स्वयंपाकीण होत्या, जीवा गडी होता. अंतू माळी तर तेथेच म्हातारा झाला. का राहिली ही सारी माणसे आपल्याजवळ?

आपल्याविषयी त्यांना सहानुभूती वाटते म्हणून? छट्, आपले आयुष्य संपले की, भाकड गुरांप्रमाणे निघून जातील सारी. आपल्याकडून एखाददुसरा तुकडा मिळेल या आशेने प्रत्येकजण वाट पाहात उभा आहे! आपल्यानंतर आपला बंगला, बाग, रेशमी वस्त्रे यांचे काय होणार देव जाणे? पण एकंदरीने नव्या जीवनाचा उत्साह असणारे कुणीतरी बाजूला असावे, असे मात्र त्यांना फार वाटू लागले होते हे खरे, आणि त्यामुळे त्यांनी सुमतीला पाहताच जास्त विचारपूस न करता निवडले होते.

सुमतीला गायनाची थोडी आवड होती. खुद्द पार्वतीबाई तारुण्यात असता गात. पण नंतर वार्धक्याने आवाज सैलावला, मग जुन्या आठवणीसाठी त्या कधीतरी सुमतीला काही गायला सांगत. एखादी भूपाळी, हुरहुरीच्या चिमण्या उडवणाऱ्या आर्त ओव्या. सुमती काही हजारात देखणी नव्हती. पण तारुण्य व सुदृढता यांमुळे ती आकर्षक वाटे. विशेषत: गोठलेल्या काचेच्या दिव्यातून येणारा प्रकाश ती गात असता चेहऱ्यावर पडला की, हलक्या हाताने काढलेल्या खडू-चित्राप्रमाणे ती मोहक वाटे.

आठ दिवस झाल्यानंतर पार्वतीबाईंनी तिला प्रथमच सुमती या नावाने हाक मारली. "सुमती, हे बघ," त्या म्हणाल्या, "तू इथंच राहावंस असं मला वाटतं. म्हणजे सारखं कामच असतं असं नाही. तुला रिकामा वेळ खूप मिळेल. गावात तुझी एखादी मैत्रीण असेल तर जात जा तिच्याकडे. पहा विचार करून"

आणि सुमती राहिली. कोणाशीही लवकर मैत्री जुळावी असा तिचा स्वभाव होता. वास्तविक त्या दोघींत वयाचे केवढे अंतर, पण योगायोगाने त्यांच्या आयुष्याच्या कक्षांनी एकमेकीला स्पर्श केला. पार्वतीबाईंविषयी तिला कारुण्य वाटू लागले. कारण संपत्ती, ऐश्वर्य, सारे असूनही त्या साऱ्यांत पार्वतीबाई अगदी एकाकी असहाय वाटत. एखाद्या वयस्क नटीने खोटे दागिने घालून राणीचे सोंग तासभर नाचवावे त्याप्रमाणे त्यांचे आयुष्य वाटे. स्टेजवर ती भराभर हुकूम सोडते, इतर पात्रे यंत्राप्रमाणे ते मानतात. पण पडदा पडताच मात्र खऱ्या कठोर आयुष्याची छाया पडते. दोन खोल्यांचे घर, बेचव अन्न, आणि उद्याची काळजी करत काढलेली शिळीपाकी रात्र...

आपल्याच शेजारी आयुष्याला एका बारीक धाग्याने बांधलेली व्यक्ती आहे, व तो धागा आता विरत चालला आहे, हा विचार अनेकदा सुमतीला त्रस्त करत असे. आपणदेखील चाळीस वर्षांनी त्यांच्याच वयाच्या होऊ. त्यावेळी आपलेदेखील रूप असेच होणार का? एक आठवडादेखील आपण खात्रीने जगू शकू असं ज्यावेळी सांगता येत नाही, त्या अवस्थेत मनात कोणत्या भावनांची खळबळ उडत असेल? एक दिवस संपला की, मनातील छाया एक इंच लांब होत असेल...

त्या दिवशी सुमतीने घरी एक लांबलचक पत्र लिहिलं त्यात तिने म्हटलं, "जुन्या कादंबऱ्यांतील वाड्याप्रमाणे हा बंगला आहे. अर्थात इथं भुयार, तळघर काही नाही.

दणदण पावले टाकत, रात्री जिन्यावरून हिंडणारे भूतही नाही. निदान अद्याप मला तरी ते दिसले नाही. बाईंना अर्थात् मी त्याबद्दल काही विचारले नाही. जर त्यांचा तसल्या गोष्टीवर विश्वास असेल तर त्या घाबरतील, नसला तर मी मात्र बावळट ठरेन.'' त्याच पत्रात सुमतीने सतत येणाऱ्या भिकाऱ्यांविषयी लिहिले होते. कित्येकदा त्यातील अनेक भिकारी दणकट असत, पण तेदेखील दीनवाणा आवाज काढून तोंड वेंगाडत. हजार जणांच्या शिव्या खाऊन, आडोशाला वळचणीला लाचार आयुष्य काढण्यापेक्षा ते लोक काम का करत नाहीत? त्यांपैकी काहींना जर एखाद्या वेळी अन्नाऐवजी एखादे नाणे मिळाले, तर लगेच त्याच्या विड्या घेऊन ते फुंकत बसत, व मग पुन्हा सकाळी दात दाखवत, दरवाजा खडखडत आत येत! बरे, हातावर काही पडले तर चेहऱ्यावर कृतज्ञता तरी आहे? तीही नाही! जणू हक्काचा माल मिळाल्याप्रमाणे ते भीक स्वीकारत, गेट तसेच उघडे टाकून निघून जात. सुमतीकडे तर ते उघड उर्मटपणे पाहात. त्यांना कळून चुकले होते की, ही काही मालकीण नव्हे. आपल्यापेक्षा तिची स्थिती बरी इतकेच. कुणास ठाऊक, उद्या तिची हकालपट्टी होईल, पण आपण मात्र कायम आहो. इथं येणं हा आपला हक्क आहे. अनेकदा या त्यांच्या वागणुकीने सुमती मनातल्या मनात जळफळे, पार्वतीबाईंवर संतापे. हे माणसांचे गटार आवारात कशाला, असे तिला वाटे. म्हणजे खुद्द तिला दारिद्र्याचा अनुभव नव्हता असे नव्हे, तिचे आयुष्य कष्टातच गेले होते. पण तिच्या मनात साऱ्या आयुष्याविषयी कृतज्ञतेचा ओलावा होता, अनेकांच्या उपकाराची जाणीव होती.

पार्वतीबाईंचा माळी परसातच राहात असे. त्याला महिन्यातून कधीतरी एकदा तांदळाचा भात करणे परवडत असे. पण त्याला पार्वतीबाईंनी कधी मूठभर तांदूळ दिले असे झाले नाही. उलट येथे चांगले अन्न मिळाल्यामुळे भिकाऱ्यांनी टाकून दिलेल्या भातावर कावळ्यांची गर्दी जमे. सुमतीला अर्थात् पार्वतीबाईंशी त्याबाबत बोलणे शक्यच नव्हते. पण तिने तो विषय रखमाकाकूंशी काढला.

''आमचं काय गाठोडं जातंय?'' हात उडवत काकू म्हणाल्या, ''आम्ही दिल्या पैशाचे, सांगितल्या कामाचे. पण बाई असं करतात ना, त्याला कारण आहे मोठ्ठं —'' पण त्याच वेळी पार्वतीबाईंनी हाक मारल्यामुळे सुमतीला जावे लागले, व तो विषय तसाच राहून गेला.

आता हिवाळा सुरू झाला. हवेत एक प्रकारची चाकूच्या पात्याप्रमाणे थंड धार आली. वाऱ्याची झुळूक आली की, अंग शहारे. पिवळसर पडलेली पाने ढिगाढिगाने खाली गळत. संध्याकाळ झाली की, धूर पसरल्याप्रमाणे धुके दिसे व ते झाडाफांद्यांना चिकटून राही.

खिडकीपाशी उभे राहिले की, सुमतीला हिवाळ्याची वाटचाल दिसे. आवारातील हिरवा रंग शोषून घेतल्याप्रमाणे कमी कमी होत गेला. झुपक्यांनी झाकून गेलेल्या फांद्या उघड्या केविलवाण्या दिसू लागल्या, हिवाळ्याने अंग झाडल्याप्रमाणे पिसासारखी पाने गळत.

त्यावेळी प्रथम पार्वतीबाईंनी रेशमी अस्तर असलेली निळी शाल काढली. त्यांचे बोलणे एकदम कमी झाले. एकदा व्हरांड्यात त्या खुर्चीवर बसल्या होत्या. बाहेर विमनस्कपणे पाहात असता त्या एकदम दचकून थांबल्या, व विकलपणे त्यांनी आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून घेतला.

"तुम्हाला बरं वाटत नाही का?" चट्दिशी उठून त्यांच्या बाजूला येत सुमतीने विचारले. पार्वतीबाईंनी हात बाजूला केले. त्यांचा चेहरा जास्तच आकसलेला दिसत होता, व डोळ्यांत कसली तरी भीती होती.

"नाही ग, मला काही झालं नाही," त्या म्हणाल्या. "म्हातारपण झालंय माझं. मला सांभाळून घे तू कशीबशी. हा हिवाळा आला की, मला कापरंच भरतंय. तो संपेपर्यंत मी जगले, की मग एक वर्षभर भीती नाही. नाहीतर मात्र – काय होणार कुणास ठाऊक!"

"छट्, तुम्हाला काहीसुद्धा होणार नाही. एक का, दहा वर्षे जगणार तुम्ही." त्यांना धीर देत सुमती म्हणाली.

"हा हिवाळा नाही, तर पुढला, किंवा त्याच्या पुढचा. माझ्या नशिबात काय वाढून ठेवलंय, हे माहीत आहे मला."

"म्हणजे काय?" सुमतीने आश्चर्याने विचारले.

"काय उपयोग सारं सांगून?"कपाळाला बोट लावून हताशपणे पार्वतीबाई म्हणाल्या. "पण काय ग, आतापर्यंत खूप पाने गळून गेली असतील, नाही?"

"नाही, फारशी नाहीत. तसं काही जोराचं वारं सुरू झालं नाही अद्याप."

"पण पडणार खूपशी पाने, खूपखूप; रस्ता भरून जाणार सगळा."

जणू स्वतःशीच बोलत असल्याप्रमाणे पार्वतीबाई हलक्या आवाजात म्हणाल्या.

नंतर दोनचार दिवसांतच जोराच्या वाऱ्याची पहिली लाट आली. पिवळी पाने खुडून फेकल्याप्रमाणे सळसळत खाली येऊ लागली. पार्वतीबाई त्यांच्याकडे थिजलेल्या दुःखी डोळ्यांनी पाहात होत्या. मग बाहेर अगदीच अंधार झाला म्हणून सुमतीने त्यांना हाताला धरून आत नेले.

रात्रीची जेवणे झाली तरी पानगळ चालूच होती. फांद्या करकरल्या की, खाली पाने गळल्याचा आवाज होत असे. पार्वतीबाई लवकरच अंथरुणावर पडल्या. त्यांना झोप लागेपर्यंत सुमतीही तेथेच बसली, व तिने एक पुस्तक उघडले. पण थोड्याच वेळात पुस्तकावरून तिचे लक्ष उडाले.

तिने तो आवाज प्रथम केव्हा ऐकला हे काही तिला सांगता आले नसते. बागेकडे जाणारा दरवाजा हळूहळू उघडला जावा त्याप्रमाणे तो आवाज हळूहळू स्पष्ट होत तिला ऐकू आला. शेवटी तर तो इतका स्पष्ट झाला की, तो आपणाला या आधीच कसा ऐकायला आला नाही याचे तिला आश्चर्य वाटले.

मध्ये बोट धरून तिने पुस्तक मिटले व ती काळजीपूर्वक ऐकू लागली. तो आवाज अगदी लयबद्ध, स्पष्ट ऐकू येत होता. एक फटकारा, क्षणभर शांतता. पुन्हा आवाज. एखादी स्त्री आपल्या केसांतून ब्रश फिरवत असल्याप्रमाणे तो आवाज होता. नंतर तिच्या ध्यानात आले, कुणीतरी गेटापासून दरवाजापर्यंत झाडणीने पाने गोळा करत होते. पण या वेळी ? रात्री साडेअकराला ?

ती तशीच ऐकू लागली. आता तर तोच एक आवाज अत्यंत स्पष्ट ऐकू येत होता. अशा वेळी माळी मोठ्या तत्परतेने रात्रीच्या रात्री सारी गळलेली पाने गोळा करून टाकत आहे, ही कल्पनाच तिला पटेना. ती काहीतरी बोलणार होती, पण तोच तिचे लक्ष पार्वतीबाईंच्या चेहऱ्याकडे गेले व ती एकदम गप्प झाली.

पार्वतीबाई कुशीवर वळून मान उचलून तो आवाज ऐकत होत्या, व त्यांचे सारे शरीर ताणल्याप्रमाणे झाले होते. सुमती एकदम चरकल्यासारखी झाली. तो आवाज ऐकता ऐकताच ती पार्वतीबाईंकडे लक्ष देऊन पाहू लागली.

पार्वतीबाई पुन्हा अंथरुणावर पडल्या. भांडे पालथे घातल्याप्रमाणे त्यांचा चेहरा निथळल्यासारखा झाला होता. आपले लक्ष त्या आवाजाकडे लागले होते, ही गोष्ट त्यांच्या ध्यानात आली होती, व का कुणास ठाऊक, त्या त्यामुळे त्रस्त झाल्या होत्या हे सुमतीने ओळखले. पण का ? कशासाठी ? आणि त्या इतक्या घाबरल्या ते कशासाठी ?

"सुमती, गाणं म्हण ना एखादं," डोळे मिटत पार्वतीबाई म्हणाल्या. पण त्या शब्दांत त्यांचा नेहमीचा मृदूपणा नव्हता. तो एक मालकी ताठरपणाचा हुकूम होता. किंचित् शरमून, आठवले ते गाणे तिने सुरू केले, व त्यांच्या चेहऱ्याकडे न पाहता ती अर्धा तास गात राहिली. पण अखेर कंटाळून ती थांबली व तिने हळूच पार्वतीबाईंकडे पाहिले. त्या केव्हाच झोपी गेल्या होत्या.

सुमती लगेच तेथून गेली नाही. उलट विमनस्कपणे तीस्वत:शीच एक ओळ गुणगुणू लागली. कुणी तरी झाडणीने पाने गोळा करत आहे, हा आवाज आपणही ऐकला, यात काय चुकले आपले ? आता तो आवाज थांबला होता, नाहीतर तिने खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले असते. रात्री अपरात्रीसुद्धा काम लावून आपण आपल्या माळ्याला एखाद्या गुलामाप्रमाणे वागवतो, ही गोष्ट इतरांच्या ध्यानात येऊ नये म्हणून का त्यांची इतकी धडपड होती ? पण पार्वतीबाई काही इतरांना आपल्याविषयी काय वाटेल याचा विचार करत बसणाऱ्यांपैकी नव्हत्या. शिवाय, आता सारा चेहरा वितळून जातो की काय

अशी भीती वाटण्याजोगे त्यात काय होते? अखेर सुमतीने तो विचार मनातून काढून टाकला. बाईंच्या म्हाताऱ्या लहरी स्वभावाचा आणखी एक कोपरा, अशी तिने स्वतःची समजूत करून घेतली व ती झोपायला गेली. आता वाऱ्याचा जोरही कमी झाला होता, व झुळुकीत थरथरणाऱ्या वस्त्राप्रमाणे रात्र वाटत होती. "आता मात्र गळणाऱ्या पानांचा पाऊस थांबणार," तिला वाटले.

सकाळी ती उठली, त्यावेळी पार्वतीबाई अद्याप जाग्या झाल्या नव्हत्या. तेव्हा तोपर्यंत बागेत हिंडावे म्हणून ती बाहेर आली. सर्वत्र पिवळसर पानांचा खच पडला होता, आणि त्या रस्त्यावर तर पाऊल ठेवायला जागा नव्हती.

"काय पानं गळली काल रात्री!" आश्चर्याने ती म्हणाली. बाजूला माळी काटक्यांची झाडणी घेऊन पाने एका मोठ्या बुट्टीत भरत होता. तो मध्येच थांबला व पाठ दाबत उभा राहिला.

"नाही बाई, ही काही काल रात्री पडलेली पाने नव्हत," तो म्हणाला, "दुपारची, संध्याकाळची, मिळून आहे हा ढीग!"

"अरे, पण तू तर रात्री सारी गोळा करून टाकली होतीस ना? तुझ्या झाडणीचा सारखा सपसप आवाज येत होता की!" सुमती म्हणाली.

माळी नुसता हसला. "छे, आम्ही कशाला काम करतोय बाई सहा तासांनंतर? सात वाजले की, झाडणी टाकली मी शेडमध्ये आणि हे काम काय या दिवसांत संपणारं? हॅट्, शंभर माणसं लावा तुम्ही, अगदी मोजून शंभर, आणि गाडीभर पानं कचरा आहे तो आहेच."

सुमती काही न बोलता आत आली.

माळी दिवसभर काम करत होता. संध्याकाळी त्याने सारा ढिगारा कोपऱ्यात जमवला, व जाळून टाकला. त्या जळणाऱ्या पानांच्या तुरट वासाने सारा बंगला भरून गेला.

रात्री पार्वतीबाईंनी शेगडी मुद्दाम आत मधल्या सोप्यावर आणून ठेवली. बराच वेळ बोलत बसण्याचे त्यांच्या मनात होते. पण कोळशात काय गेले कुणास ठाऊक, त्यांचा सारखा धूर होऊ लागला. पार्वतीबाईंनी रखमाकाकूंवर निखारे टाकल्याप्रमाणे चटाचटा शब्द टाकले, व चिडून त्या झोपायला निघून गेल्या.

पण सुमतीची अद्याप झोपायची वेळ झाली नव्हती. कालचे अर्धेच राहिलेले पुस्तक तिला आठवले. ते तिने दुपारी व्हरांड्यातील खुर्चीवर टाकले होते. ती चटकन् उठून तिकडे जायला निघाली तोच तिचे पाय थबकले. तिने पुन्हा काळजीपूर्वक ऐकले. तो आवाज अगदी स्पष्ट होता. सातनंतर कोण काम करायला बसलंय, असे माळी म्हणाला होता खरा, पण येथे कुणीतरी खात्रीने पाने गोळा करत होते. ती हलक्या पावलांनी खिडकीजवळ गेली, व पडदा हळूच बाजूला करून तिने बाहेर पाहिले. खिडकीजवळ उभी

राहिल्याने आवाज नेमका कुठून येतो हे तिला समजले. पण तेथून कमानीचा एक कोपरा आड येत असल्याने तिला जास्त काही दिसले नाही. खरे म्हणजे पुढील दरवाजा उघडला की, सरळ व्हरांड्यात जाऊन तिला रस्त्याकडे पाहता आले असते. पण ती कसल्या तरी अनामिक भीतीने घाबरली. पण त्याबरोबर पाने यावेळी गोळा करणारा आहे तरी कोण हे पाहण्याची इच्छाही कमी झाली नाही. त्यावेळी बंगल्याला वर छोटी गची आहे याची तिला आठवण झाली. अगदी हलक्या पावलांनी ती वर आली, व किंचित् वाकून तिने खालच्या रस्त्यावर पाहिले.

रस्त्यावर अगदी भिंतीशेजारीच एक मनुष्य काटक्यांच्या झाडणीने फटकारे मारत होता. घड्याळातील लंबक संथपणे हलत असावा त्याप्रमाणे अत्यंत लयबद्ध तऱ्हेने त्याच्या हालचाली होत होत्या. वरच्या बाजूने पाहून सुमतीला सगळे काही दिसले नाही. पण मजुराचा पोषाख असतो तसला, पाठीवर वीतभर फाटलेला त्याचा पोषाख होता. पण ती एकदम दचकली ते निराळ्याच कारणासाठी. त्या आकृतीत काहीतरी विलक्षण चमत्कारिक, मन अस्वस्थ करणारे आहे असे तिला वाटले. पण ते काय, हे मात्र काही केल्या तिच्या ध्यानात येईना. या चित्रात काहीतरी चुकले आहे, काहीतरी राहून गेले आहे ही रुखरुख तिच्या मनातून जाईना. काहीतरी नेहमी असणारे राहून गेले आहे. ती एकदम गोठल्यासारखी झाली, व भीतीने एकदम मागे सरकली. तिच्या मनाचा एक कोपरा अज्ञात भीतीने कापू लागला, व 'जा येथून, जा येथून' असे सारखे सांगू लागला. पण दुसरा एक मात्र ताठरपणे तिला हिणवू लागला, 'तू काय लहान मुलगी आहेस की काय? काय करणार तो माणूस तुला? खाऊन टाकेल? जा खाली, आणि पहा कोण आहे तो.'

अखेर सुमती ओढून ताणून आणलेल्या धैर्याने खाली आली. आपल्या धडधडत्या हृदयाचा तिला उगाचच राग आला. पण वेड्या हट्टाने तिने पुढील दरवाजा उघडला व ती कमानीजवळ चांदण्यात आली.

पाने गोळा करणारा माणूस अद्याप त्याच ठिकाणी होता. छातीवर हात ठेवून थरथरत्या पावलांनी सुमती पुढे आली. झाडणीचे फटकारे यंत्राच्या हालचालीप्रमाणे अत्यंत नियमित होत होते. पण पाने मात्र हलत नव्हती. पानांवरून जरी झाडणी फिरली तरी एकही पान हलत नव्हते आणि आता इतक्या जवळ आल्यावर तर या साऱ्या दृश्यात अगदी डोळ्यांत न मावणारी चूक आहे हे तर तिला जास्तच जाणवले.

पडलेल्या पानांवर तिच्या पावलांचा आवाज स्पष्ट होत नव्हता, तरी ती जवळ आल्यावर पाने गोळा करणारा एकदम थांबला, व मान वर करून त्याने सुमतीकडे पाहिले.

तो उंचेला होता, पण त्याचा चेहरा अत्यंत आकसलेला होता. तिच्याकडे त्याने पाहिले त्यावेळी त्याचे डोळे बुडबुड्याप्रमाणे दिसले. पण त्या चेहऱ्यात असे काहीतरी भयंकर होते की, त्याच्याविषयी अनुकंपा वाटण्याऐवजी अंग वितळून टाकणारी भीतीच

वाटावी. त्याच्या अंगावरील कपड्यांच्या तर जवळजवळ चिंध्याच झाल्या होत्या, आणि तो इतका खंगलेला, विरलेला दिसत होता की, आपण त्याच्याकडे पाहात नसून त्याच्यामधून पलीकडे पाहात आहो असे सुमतीला वाटले. तो जवळजवळ पारदर्शक होता.

त्या दोघांची दृष्टिभेट क्षणभरच झाली असेल, पण ती जन्मभर टिकली असे सुमतीला वाटले. आणि दुसऱ्या क्षणी कुणीतरी चेहऱ्यावर काडकन् प्रहार केल्याप्रमाणे ती गोष्ट एकदम तिच्या ध्यानात आली. इतका वेळ त्या आकृतीत असे काय विलक्षण आहे की ज्यामुळे काहीतरी चमत्कारिक चुकल्यासारखे वाटते, याचा तिला एकदम उलगडा झाला. तोंडातून किंकाळी बाहेर पडू नये म्हणून तिने ओठ घट्ट दाबून धरले. पाने गोळा करणारा तो चांदण्यात उभा होता, पण जमिनीवर त्याची सावली पडली नव्हती.

तिने ओठ दाबून धरले होते खरे, पण अखेर ती किंकाळी बाहेर पडलीच. पण त्याबरोबर जणू त्या गोठलेल्या भीषण क्षणाच्या भिंती फोडून ती बाहेर पडली व तिची पावले या जगाला लागली. कारण त्या आवाजाबरोबर पाने गोळा करणारा नाहीसा झाला. तिच्यासमोर उरली ती पिवळी पाने, वळसा घेऊन गेलेला रस्ता, शांत नीरव चांदणे!

आपण आतल्या बाजूला केव्हा कसे आलो, हे तिला समजले नाही. ती स्वयंपाकघरात आली, व तेथे एका टेबलाजवळ बसून हुंदके देऊ लागली. इतक्यात मागे कुणाची तरी पावले वाजली, व चट्दिशी दिवा लागला. कमरेवर हात ठेवून रखमाकाकू तिच्याकडे पाहात होत्या.

"तुम्ही होय? मला वाटलं –" पण तोच त्यांची नजर तिच्या फटफटीत चेहऱ्याकडे गेली. "बाई, तुम्ही आता बाहेर गेला होता काय?"

"होय, आणि तिथं –" सुमती सांगण्याचा प्रयत्न करू लागली. पण रखमाकाकूंनी तिला थांबवले. "होय, मी देखील त्याला पाहिलं. पण माझं नशीब चांगलं. एवढ्यावरच भागलं."

"पण काय आहे हो तो – ते?"

"आता काय करायचं ते?" रखमाकाकू तिला उठवण्याचा प्रयत्न करत म्हणाल्या.

"तुम्ही त्याचा विचार करू नका, स्वस्थ जाऊन झोपा. पण एक सांगा, कुठं दिसला तुम्हाला तो?"

"आपली कमान आहे ना पुढं, तिथंच अगदी दरवाजाजवळ."

"बिचाऱ्या बाईसाहेब! आता परमेश्वराची इच्छा म्हणायची," रखमाकाकू क्षणभर गप्प झाल्या व त्यांच्या डोळ्यांत पाणी दिसले.

"पण काय आहे सारं, ते मला सांगा, सगळं." त्यांचा हात धरून सुमती म्हणाली, "आत्ताच इथं –"

रखमाकाकूंनी विचार केला. नंतर त्या म्हणाल्या, "मी सांगते सारं, पण मी सांगितलं हे बाईसाहेबांपुढं मात्र बोलू नका. विचाऱ्यांना जाता जाता नस्ता त्रास नको –"

"बाईसाहेबांकडे कुणी भिकारी आला तर रिकाम्या हाताने जात नाही. पण हे सारं बारा पंधरा वर्षांतलं आहे. मी त्यांच्याकडे राहून येत्या आषाढाला वीस वर्षे होतील. पण पूर्वी त्यांचा हात कसा होता हे सारं मला माहीत आहे.

त्यावेळी जरी त्या वयस्क होत्या तरी त्यांची प्रकृती दणकट होती. त्यांना बागेत स्वत: काम करायची फार हौस. एकदा गुलाबांच्या झाडांत त्या काही तरी करत होत्या, तेव्हा एक भिकारी गेटजवळ आला. अगदी खप्पड, गाल आत गेलेला. पण त्याला तर तुम्ही पाहिलंच आहे म्हणा. ती कटकट एकदाची जाऊ दे म्हणून मी त्याला काही तरी देणार होते. पण तोच बाईसाहेब तेथे आल्या.

"हा कोण भिकारडा?" त्यांनी विचारले.

"तो खरं म्हणजे भिकारी नाही म्हणे, पण त्याला कुठंच काम मिळेना." मी भीत भीत सांगू लागले.

"ह्य:! सारे भिकारी हेच सांगतात. म्हणे काम नाही. करणाऱ्याला ढीगभर काम असतं." त्या गरजल्या. "ते काही नाही. तुला पोटाला पाहिजे ना, देईन. पण त्या आधी राबावं लागेल. ती झाडणी घे झाडाजवळची, आणि या रस्त्यावरील पाने काढून टाक सारी. त्या कमानीपर्यंत काम झालं, की ये माझ्याकडे –"

तो भिकारी पावले ओढीत आत आला व थरथरत्या हाताने त्याने झाडणी उचलली. पण काम करण्याला त्याच्यात त्राणच नव्हता. गुडघ्यावर हात ठेवून तो कशीबशी झाडणी फिरवू लागला. पण पंधरा वीस मिनिटांतच बाईसाहेबांनी मला एकदम हाक मारली. मी तशीच तेथे धावत गेले. रस्त्याच्या सुरुवातीलाच तो भिकारी खाली पडला होता, व त्याच्या हातापायांना झटके येत होते. आता तो पाचदहा मिनिटांत मरणार हे काय ठाऊक आम्हाला? पण तो खरोखरच तसा मेला खरा, पण त्यापूर्वी त्याने बाईसाहेबांकडे डोळे रोखून पाहिले. इतकी वर्षे झाली पण अजूनही त्याचा भयाण चेहरा आठवला की, डोळ्यांची झोप उडून जाते. तो म्हणाला, "बरं बाई. सारा रस्ता झाडून झाला की, मी येतो भेटायला. पण तुम्ही मात्र तयार रहा झालं. मी भेटेन, अगदी खात्रीनं..."

नंतर पोलिसांनी त्याचे प्रेत नेले, पण त्यामुळे बाईसाहेबांत मात्र फरक पडला. आता अगदी रेड्यासारखा धष्टपुष्ट भिकारी जरी आला तरी तसाच माघारी नाही जायचा. नंतर पुन्हा हिवाळा आला. थंडी तर मी म्हणत होती. सकाळच्या वेळी थंड पाण्यात हात घालायचा म्हणजे हाडे चिंबून जायची बघा. आणि त्या रात्री तो पुन्हा आला. हातात झाडणी घेऊन त्याने पुन्हा लोटण्यास सुरुवात केली. आम्ही सगळ्यांनी त्याचे लोटणे ऐकले आहे. मीं तर त्याला एकदा पाहिलंही आहे. काही नाही, झाडणी फट्क फट्क

वाजते, पण खरे एक पानही हलत नाही. पण दर वर्षी तो पुढे पुढे येतो. थोडा पुढे, थोडा जवळ. आणि आता तर तो कमानीजवळ आला आहे. बिचाऱ्या बाईसाहेब! अशा वेळी काय करायचा, जाळायचा पैसा, बंगला घेऊन?''

त्या साऱ्या हकीकतीत सत्य कितपत होते कुणास ठाऊक. पण ती जर खरी असेल तर त्यानंतर तिसऱ्याच रात्री रस्ता झाडून झाला व तो पाने गोळा करणारा कमानीजवळ आला.

जेवायची वेळ होती, व पार्वतीबाई आत यायला उठल्या होत्या. सुमती स्वयंपाकघरात उदबत्त्या लावत होती. तोच पुढील दरवाजा धाडदिशी उघडला. रखमाकाकूंनी बाहेर येऊन पाहिले तो तेथे कुणी नव्हते. आत येऊन वाऱ्याने दरवाजा उघडला हे सांगण्यासाठी रखमाकाकू पार्वतीबाईंजवळ थांबल्या, तो त्या भीतीने ओरडल्या. सुमती उदबत्त्या हातात घेऊनच बाहेर आली. पार्वतीबाई पलंगावर ताठ बसल्या होत्या. त्यांचे डोळे पूर्ण उघडे होते, पण त्यांतील जाणीव केव्हाच मेली होती. त्या डोळ्यांकडे जास्त वेळ पाहण्याचे धैर्य सुमतीला झाले नाही व तिने बाजूला मान वळवली.

तेव्हा तिचे लक्ष खाली गेले. तेथे काही तरी पडले होते. खाली वाकून तिने ते उचलले. ते एक फाटलेले, चुरगळलेले पिवळे पान होते. काटक्यांच्या झाडणीने लोटताना अनेक पाने खोचली जाऊन बोंदरी होतात.

त्यांतील एखादे पान निसटून खाली पडावे, तसे ते पान दिसत होते.

[अनुवादित]

# वेड

मला अगदी वेड लागले आहे की काय, हे पाहण्यासाठी सगळ्यांनी मिळून आज मला डॉक्टरांपुढे उभे केले. डॉक्टरांनी खूप प्रश्न विचारले, हलक्या आवाजात चर्चा केली, आणि शेवटी मला वेडबीड काही लागले नाही असा निर्णय दिला. परंतु खरे सांगायचे म्हणजे मी त्यावेळी थोड्या धूर्तपणानेच वागलो. मला वेड्यांच्या इस्पितळाची फार भीती वाटते. मला जर तेथे नेऊन डांबण्यात आले तर मग माझे होणार कसे? शिवाय मला माझे वेड्यासारखे वागणे बाहेरच्या जगात अगदी अनिर्बंध चालू ठेवायचे होते. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना मी मनमोकळेपणाने खरेखुरे बोल्लोच नाही, बोलायला धडपडत असलेल्या मनावर ताबा ठेवला. या माझ्या युक्तीने डॉक्टर मात्र पूर्ण फसले. त्यामुळे त्यांनी निर्णय दिला, हा काही वेडा नाही, पण त्याला मधून मधून भ्रमिष्टासारखे वाटते एवढेच!

त्यांचा निर्णय काही का असेना बापडा, मला माहीत आहे की मी पूर्णपणे वेडाच आहे. डॉक्टरांनी जाताना औषधांची नावे लिहिलेला एक कागद मला दिला, आणि सांगितले, ''ही औषधे घेत जा, सारं ठीक होईल वर्षा दोन वर्षांत!''

औषधाने बरा होण्यासारखा माझा आजार असता तर किती बरे झाले असते! माझ्या मनावरचे दडपण माझे मलाच पुष्कळदा असह्य होते. सारे शरीर ताणल्यासारखे होऊन माझा जीव वेदनेने व्याकूळ होतो. जर एखाद्या गोळीने, किंवा चमचाभर औषधाने या सार्‍यांतून मला मुक्त होता आले असते तर का ते मला नको आहे? पण नाही. माझ्या वेडावर असली बाटल्या भरलेली औषधेच नाहीत.

आता मी सारी हकीकतच पहिल्यापासून सांगतो पहा म्हणजे तुम्हालाही पटेल.

वयाच्या पस्तिसाव्या वर्षापर्यंत मी चार-चौघांसारखाच राहिलो, वागलो. माझ्यामध्ये काहीतरी विक्षिप्त आहे, असा कुणालाही संशय आला नाही. हां, मी आठनऊ वर्षांचा असताना मला कित्येकदा सध्याप्रमाणे वाटायचे, पण ते अगदी अधूनमधून, शिवाय लहानपणी अशा झटक्यांचा परिणामही निराळ्या तर्‍हेने दिसत असे. मी पाच वर्षांचा असतानाची एक गोष्ट मला आठवते. मला झोपवण्यासाठी आमची नर्स आमच्या खोलीत आली होती. ती अगदी उंच, नेहमी त्रस्त दिसणारी बाई होती. तिच्या हनुवटीखालचे कातडे हवा गेलेल्या फुग्यासारखे सैल, चुरगाळलेले होते, आणि का कुणास ठाऊक, ती नेहमी मळकट तपकिरी रंगाचे कपडे घालत असे. मला उचलून ती कॉटवर ठेवत असता

मी पट्कन उडी मारली व ओरडलो, "नको, आज माझं मीच वर चढतो." "बरं तर, आटप लवकर." ती म्हणाली. "तो मिटिया बघ कसा शहाणा आहे. तो झोपलादेखील."

मी तिचा हात धरूनच वर चढलो. उगाचच पाय हलवले, व गरम पांघरूण अंगाभोवती गुंडाळून अंथरुणावर पडलो. त्यावेळी एका सुखद जाणिवेने माझे सारे अंग भरून गेले. मला वाटले, नर्स मला आवडते. नर्सला मी आणि मिटिया आवडतो. मिटिया मला आवडतो. त्याला मी आणि नर्स आवडतो. आईला मी, नर्स, मिटिया आवडतो. नर्सला आई आवडते. प्रत्येकजण प्रत्येकाला आवडतो, आणि ऊबदार प्रेमाच्या पांघरुणात प्रत्येकजण अगदी सुखी सुखी आहे.

पण एका हिसक्याने ही साखळी तुटली. आमची स्वयंपाकीण तणतणत पाय आपटत तेथे आली आणि साखरेचा कप कुठे आहे म्हणत कर्कशपणे ओरडू लागली. आपण हातदेखील लावला नाही म्हणून नर्सने चिडून सांगितले. काय झाले कुणास ठाऊक, पण त्यांचे रागीट आवाज ऐकल्यावर माझ्यात भरून राहिलेली समाधानाची भावना ओसरून गेली, आणि चमत्कारिक भीतीने माझे अंग थरथरू लागले. डोक्यावरून पांघरूण घेऊन मी तोंड लपवले. पण ती भीती काही केल्या कमीच होईना.

तसेच फोकाने आमच्या घरातील नोकरांपैकी एका मुलाला गुरासारखे बडवले, तो प्रसंगदेखील मला आठवतो. फोकाचा चेहरा ओळखू न येण्याइतका क्रूर दिसत होता. छडीने मारत असता तो ओरडत होता, "हरामखोर, पुन्हा करशील का? तुझी कातडीच सोलून काढतो." तो मुलगा गयावया करत किंचाळत होता, "नाही, शप्पथ, कधी हात लावणार नाही." पण फोकाचा हात यांत्रिक निर्दयपणाने वेगाने वरखाली होतच होता. हे सारे पाहिल्यावर तेच विलक्षण काटेरी भय पुन्हा माझ्यात शिरले. नंतर कितीतरी वेळ मी हुंदके देत एकटाच रडत बसलो होतो. म्हणजे ती अंधारी, अपार भीती आणि ते हुंदके ही माझ्या वेडाची पहिली लक्षणे होती.

एकदा मी मावशीला म्हटले, "आम्हाला जीझसची गोष्ट सांग."

तिने ती सारी कथा सांगितली, व ती जायला उठली. पण मी तिचा हात घट्ट धरून ठेवला व म्हटले, "आणखी सांग खूप खूप जीझसविषयी."

"पुरे आता. मला खूप काम आहे अजून." ती म्हणाली. पण मिटियानेदेखील हट्ट धरल्यावर ती आणखी थोडा वेळ थांबली. लोकांनी जीझसला क्रूसावर कसे चढवले, शेवटपर्यंत त्याचे कसे हालहाल केले, तरीही त्याने शेवटपर्यंत कसा एकही दुष्ट शब्द उच्चारला नाही हे तिने पुन्हा सांगितले.

"पण असं का मारलं लोकांनी त्याला?" मी विचारले.

"ते लोक किनई फार वाईट होते." ती म्हणाली. "आता झोपा बघू."

"पण का ? तो इतका चांगला होता, त्याचा काही त्यांच्यावर राग नव्हता, मग का ?"

मावशी आता त्रस्त झाली. "पडता की नाही रे आता गप्प ? आठ वाजून गेले. काय पोरं आहात की चिमण्या आहात इतकं बडबडायला ?" ती थोडी चिडून म्हणाली,

"त्यानं त्या लोकांना शिव्यादेखील दिल्या नाहीत. मग का ? आणि हातांत खिळे ठोकताना फार दुखलं असेल, नाही ?"

मावशी आता उठून निघालीच. मी घाईघाईने पुन्हा म्हटले, "की सारं खोटंच आहे ग ? कुणी खिळे ठोकले नाहीत, कुणी क्रूसावर चढला नाही, काही नाही. सारे खोटे आहे की काय ?"

मावशी तर निघून गेली. पण का कुणास ठाऊक, ते जर खोटे असेल तर काय ? जणू कुणीतरी मला खूप उंचावरून खाली फेकून दिल्याप्रमाणे मी घाबरलो, आणि हुमसून रडू लागलो.

चौदाव्या वर्षानंतर मात्र मला वयाची जाणीव झाली, व पुष्कळशा दुष्ट व्यसनांत मी बुडून गेलो. श्रीमंती खाण्याने लालचावलेली, आळशी, नखरेल, हाताने काम करायला शरमणारी, पोषाखी अशी हजारो मुले असतात, त्यांच्यापैकीच एक मी होऊन बसलो. माझ्याच वयाच्या मुलांच्या संगतीत मला अनेक वाईट सवयी लागल्या. त्यानंतर त्या जागी निर्लज्ज लंपटपणा आला. अशा तऱ्हेचे सुखलोलुप, व्यसनी आयुष्य मी पस्तिसाव्या वर्षापर्यंत काढले. मी अगदी आरामात होतो, व या वेडाची छायासुद्धा माझ्या आयुष्यावर नव्हती.

ती वीसपंचवीस वर्षे कशी गेली कुणास ठाऊक, कारण त्यांच्या कसल्याच खुणा मनावर राहिल्या नाहीत. मला त्यातले फारसे काही आठवत नाही; आणि जे काही थोडे आठवते, त्याने मी अगदी शरमून जातो. नंतर मी कॉलेजात गेलो, मला नोकरी लागली, माझे लग्न झाले. चारचौघांच्या सामान्य आयुष्याप्रमाणे माझेही जीवन स्थिरावले, आणि गावात मी प्रतिष्ठित लोकांपैकी एक समजला जाऊ लागलो. लग्न होऊन दहा वर्षे झाली व इतक्या दिवसांनंतर त्या जुन्या वेडाचा झटका पुन्हा एकदा आला.

आम्ही थोडा पैसा शिल्लक टाकला होता, व आपणही थोडा जमीनजुमला खरेदी करावा असे मला वाटू लागले होते. आपले उत्पन्न वाढावे, पैशाने पैसा वाढवावा असे मला वाटले यात आश्चर्य नाही. मी सगळीकडे चौकशी करायला सुरुवात केली. शेतीच्या उत्पन्नातून किंवा तेथील झाडांच्या लाकूडफाट्यातून परस्पर किंमत जावी व सारी शेतवाडी फुकटात पदरात पडावी असा व्यवहार मी धूर्तपणे पाहात होतो. असा व्यवहार करणारा एक भोळाभाबडा माणूस खरोखरच मला भेटलाही.

पेन्झा जिल्ह्यात अशी शेतवाडी विकायची होती. जागा तर पुष्कळ होतीच, शिवाय कडेने झाडांची गर्द राई होती. निव्वळ सागवानाची झाडे विकली तरी किंमत मिळाली असती. अशी संधी माझ्या हातून सुटणार? मी एका नोकराला बरोबर घेतले व ताबडतोब त्या गावी निघालो.

हा लांबलचक प्रवास प्रथम आगगाडी व नंतर घोड्याची गाडी असा करणे जरूर होते. प्रवास फार चांगला झाला. पण गाडीतून जात असता वाटेतच अंधार झाला तरी आम्ही गाडी तशीच पुढे नेली. मला पेंगुळल्यासारखे वाटू लागले व मी मधून मधून डुलक्या घेऊ लागलो. मध्येच मी खाडकन जागा झालो. कसल्या तरी चमत्कारिक भीतीने माझे अंग शहारून डोळ्यांवरची झोप एकदम उडाली होती. आपण कुठे चाललो आहोत? कशासाठी? हा प्रश्न दंश केल्याप्रमाणे मला एकदम जाणवला. खरेच, कुठे, कशासाठी? म्हणजे शेते, घरे घेणे मला आवडत नव्हते असे नाही. पण तेवढ्यासाठी इतक्या दूरवर धडपडत जायचे? आपण इथेच अंग पसरावे, धडपडून दमलेल्या शरीराला याच आडवाटेच्या ठिकाणी कायमची विश्रांती द्यावी अशा तऱ्हेचा चमत्कारिक विचार मनात सारखा घोळू लागला. एवढ्यात माझा नोकरही जागा झाला, हसू बोलू लागला, पण माझी विषण्णता मात्र काही केल्या कमी होईना. मी घरच्या गोष्टी काढल्या, या नवीन शेताविषयी बोलू लागलो. नोकर मोठ्या आवाजात मनमोकळे बोलत होता. त्याला मात्र सगळीकडे आराम, सुख दिसते, पण त्याच गोष्टीमुळे आपल्याला भडभडल्यासारखे का होते हे माझे मलाच समजेना. मला एकदा वाटले, सारखा प्रवास करून आपण थकलो आहोत. तेव्हा मध्येच कुठेतरी रात्रभर मुक्काम करावा.

"काही हरकत नाही." नोकर हसून म्हणाला, "पाचसहा मैलांवरच खेडं आहे एक, तेथे रात्र काढून निघू पहाटेला."

गडद अंधार बाजूला ढकलत गाडी खेड्यात आली. रात्र बरीच झाल्याने सारे शांत होते, व अंधारावर दिव्याच्या पिवळ्या टिकल्या मात्र लिकलिकत होत्या. छोटी, उदास घरे अंधारात अस्पष्ट दिसत होती. त्यांच्या जवळून जाताना निर्जन रस्त्यावर घोड्यांच्या टापा, व त्यांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज घुमल्यासारखा होत होता. या साऱ्या विषण्ण वातावरणाने माझे मन जास्तच उदास झाले. केव्हा एकदा कुठे तरी अंग टाकतो असे मला झाले.

अखेर गाडी एका घराजवळ थांबली. घर पांढरट रंगाचे होते, परंतु मला ते अगदी उजाड वाटले. तेथे जणू भुतेच राहात असल्याप्रमाणे मी दचकलो, आणि गाडीतून उतरायला मन धजेना.

नोकराने चटचट सामान काढले. त्याच्या उत्साही, तत्पर हालचालीदेखील मला त्रस्त करणाऱ्या वाटू लागल्या. गालावर भयानक डाग असलेला एक मनुष्य डोळे चोळत बाहेर

आला, व त्याच्याबरोबर आम्ही एका कोंदट खोलीत गेलो. "मला आता झोपायचं आहे. इथं कुठं झोपायला जागा नाही?" मी विचारले.

"झोपायची खोली आहे तर!" डाग असलेला माणूस म्हणाला, "हीच ती खोली." ती खोली चुना लावलेल्या काड्याच्या पेटीएवढी होती. खोलीला लाल पडदा लावलेली एकच खिडकी होती. आम्ही सामान ठेवले, नोकराने चहा केला. मी एक उशी उचलून तेथेच सोफ्यावर आडवा झालो. चहा घेण्यासाठी नोकराने हाक मारली. पण तेथून उठणे तर राहोच, पण तेथल्या तेथे थोडी हालचाल करण्याचीही मला भीती वाटू लागली. डोळे हळूहळू जड होऊ लागले. नंतर मला वाटते, मला झोप लागली. कारण मी जागा झालो, त्यावेळी खोलीत एकटाच होतो, व सगळीकडे अंधार होता. कशासाठी आलो आपण येथे? आणि इथून कुठे जाणार? कशापासून तरी आपण पळपुट्याप्रमाणे धावत सुटलो आहो, पण त्यापासून सुटका होणे हे शक्य तरी आहे का? अरे, तू स्वतःपासून काही दूर जाऊ शकत नाहीस. या क्रूर यातनेची शिक्षा तू सहन करत आहेस, पण ती शिक्षा देणाराही दुसरा तिसरा कुणी नसून तूच स्वतः आहेस. अरे वेड्या, तुझ्याचपासून तुला कधीतरी पळून जाता येईल काय? नव्या शेतवाड्या विकत घेतल्यास म्हणजे काय असे विशेष होणार आहे? बरे, त्या विकत घेतल्या नाहीस म्हणून तुझ्यात काय कमी होणार आहे? खरे म्हणजे तुला स्वतःचाच तिटकारा आला आहे, स्वतःचेच ओझे तुला असह्य झाले आहे. आणि कितीही प्रयत्न केलास तरी हे ओझे फेकून देऊन तुला पळून जाता येणार नाही!

मी अस्वस्थपणे बाहेर गेलो. तेथे नोकर शांतपणे झोपला होता, आणि त्याच्या बाजूलाच तो डागवाला माणूसही घोरत होता. स्वतःभोवती घोंघावणाऱ्या त्या उदासीनपणापासून निसटावे म्हणून मी बाहेर आलो खरा, पण माझ्या पावलावर अगदी पाऊल टाकूनच तोही बाहेर आला, आणि त्या अनामिक भीतीने माझे मन जास्तच हादरून गेले.

"अरे, तुला कसली भीती वाटते इतकी?" मी स्वतःशी म्हणालो, "कशामुळे तू इतका घाबरा होतोस? कशाची ही एवढी भीती?"

"कशाची? माझी. माझी तुला भीती वाटते." मृत्यू हलक्या आवाजात म्हणाला. "कारण मी आलो आहे. माझी तुला चाहूल लागली आहे."

माझ्या अंगातून वेदनेची सळक चमकून गेली. मृत्यू! तो इथे येऊन उभा राहिला आहे! पण त्याने इथे येता कामा नये! त्यावेळी जर खरोखरच मी मरणाच्या दारात असतो तर या यातना झाल्या नसत्या. अशा वेळी मी पूर्णपणे गर्भगळित होऊनच निश्चेष्ट झालो असतो. पण आता तसे बधीर करणारे भय नव्हते. मृत्यूची तर जाणीव झाली होती, परंतु अशा तऱ्हेची जाणीव होता कामा नये अशी रुखरुख होती.

माझ्या साऱ्या शरीरभर जगण्याची आसक्ती भरून राहिली होती, इतकेच नव्हे, तर तो आपला हक्कच आहे अशा ईर्ष्येचा अभिमान होता. आणि इकडे मात्र पाहावे तो क्षणाक्षणाला मृत्यूची आकृती मात्र आपोआप पूर्ण होत होती! हे माझ्या मनातील द्वंद्व जास्त जास्त कठोर होऊ लागले, व ते मला सहन करवेना. मी एक मोठी मेणबत्ती पेटवली. तिचा पिवळसर प्रकाश भिंतीवर पसरला. पण त्या प्रकाशातूनही तीच भीती वेडावत सांगू लागली, "आयुष्याला, जगण्याला कसला आला आहे अर्थ नि काय! खरा अर्थ फक्त मृत्यूलाच आहे. तेच एक सत्य आहे, भीषण सत्य आहे. – पहा, त्याला हाकलता येते का!"

मी माझे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न केला. त्या शेतावरील झाडे विकून किती पैसे येतील याचा हिशेब करू लागलो, पत्नीची, घराची आठवण करू लागलो. पण नाही. भरकटलेल्या मनाला कुठेच थारा मिळेना, विसावा सापडेना.

क्षणाक्षणाला आपले आयुष्य थेंब थेंब गळून जात आहे, याच जाणिवेची काचली सगळीकडे पसरून राहिली होती. कुणीतरी क्रूरपणे माझे मन हिसकून तोडण्याचा प्रयत्न करत होते, व ते काही केल्या तुटत नव्हते. मी पुन्हा शांतपणे झोपलेल्या त्या सुखी माणसांकडे पाहिले, व झोपण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. भोवती तीच विक्राळ, काळी अस्वस्थता. लाल, पिवळसर, चौकोनी, कोरडी, धारदार व्यथा आतल्या आत सारखी कापत होती. कुठे काही आशा, आपुल्कीचा ओलावा नाही. फक्त स्वत:विषयी, स्वत:ला निर्माण करणाऱ्या जगाविषयी वाटणाऱ्या तिरस्काराचा मूक असव ठसठसणारी वेदना.

कोणी निर्माण केले मला? परमेश्वराने – निदान असे सगळेजण सांगतात. त्याची प्रार्थना करू? परंतु गेल्या वीस वर्षांत मी कधीच प्रार्थना केली नव्हती. तेवढी माझी कशावरच श्रद्धा नव्हती. औपचारिक रीत्या मी कधीतरी उपासतापास करे, चुकून कधीतरी चर्चलाही जात असे. पण आता आतून जणू उमाळा उसळून वर आला. मी परमेश्वराचे नाव घेतले, त्याची करुणा भाकली. त्यामुळे त्या त्रस्त करणाऱ्या भीतीवरून लक्ष उडाले हे खरे. पण ते क्षणभरच. डोळे मिटायचा अवकाश, ती पुन्हा हजर झालीच. आता मात्र मला ते सगळे असह्य झाले. मी माझ्या नोकराला उठवले, व गाडी काढून मी तशाच मरगळल्या शरीराने तेथून निघालो. पहाटेच्या थंड वाऱ्याने कोमेजलेले मन थोडे तरारले हे खरे. पण एक गोष्ट मात्र मला पूर्णपणे कळून चुकली. आपल्या आयुष्यात आता कसली तरी नवी छाया आली आहे. आणि तिच्यामुळे आपले पूर्वीचे स्थिर सुखी आयुष्य कायमचे विरजून गेले आहे.

त्या दिवशी रात्री आम्ही शेतवाडीच्या गावी जाऊन पोहोचलो. सारा दिवसभर मी माझ्या मनस्तापाशी झगडत होतो. नंतर मन थोडे शांत झाले खरे, पण तिचा गाळ मात्र अद्याप खोल कुठेतरी राहिलाच होता, व त्यामुळे ती कळकट चव अजून जिभेवर रिवरिवत

होती. शेतवाडीवरच्या म्हाताऱ्या नोकराने प्रेमळपणे आमचे आदरातिथ्य केले. पण तो स्वत: मात्र इतकी जुनी, वाडवडलांची जमीन आता विकली जाणार म्हणून खचून गेल्यासारखा दिसत होता. तेथल्या घरातील फर्निचर छोटे, सुबक, कातड्याने मढवलेले होते. चहाचे समोव्हार नवे चकचकीत होते. चहाच्या वेळी त्या म्हाताऱ्याने पानांचा ताजा वास असलेला थोडा मधही आणून दिला होता. त्या रात्री मला शांत झोप लागली. पण त्या रात्रीही मी प्रार्थना केली हे त्याचे कारण असू शकेल. त्यानंतर मात्र माझे जीवन सुरळीत चालू झाले. ते पुन्हा दैनंदिन चाकोरीत स्थिरावले. पण अगदी तारेवर तोल संभाळत जगत असल्याप्रमाणे मला दररोज अत्यंत काळजीपूर्वक राहावे लागे. अपरिचित ठिकाणी गेलो, उघड्या डोळ्यांनी कशाविषयी तरी विचार करू लागलो तर तोल बिघडलाच, अशी मला भीती वाटे. म्हणजे एखादा मुलगा विचार न करता आपला धडा घडाघडा म्हणून दाखवतो, तसे जर यांत्रिकपणे आयुष्य काढले नाही, तर तीच भीषण, कोल्ह्यासारखी विषण्णता टपून आपल्यावर उडी घेईल असे मला वाटत होते.

त्या शेताची खरेदी अखेर झालीच नाही. तेवढा पैसा माझ्याजवळ मुळी नव्हताच. मी पूर्वीसारखाच राहू लागलो. फरक एवढाच, आता मी नियमितपणे चर्चला जाऊ लागलो. रात्री झोपण्यापूर्वी प्रार्थना करू लागलो. आतापर्यंतच्या सवयीमुळे आयुष्यात रुतलेल्या रुळावरून आगगाडी पूर्ववत् चालू झाली खरी. पण आता काही नवे करावे, जोडावे अशी ईर्ष्या वाटेना. सगळ्याच वस्तूंचा रंग विटून गेल्याप्रमाणे त्या मलीन, जुन्या वाटू लागल्या. माझ्या पत्नीची तर माझ्याविषयी सारखी कुरबूर चालू असे. पण हे मात्र खरे की, खुद्द घरीच त्या भयाण विषण्णतेची कळ मात्र कधी जागी झाली नाही. परंतु एकदा मला कोर्टाच्या कामासाठी मॉस्कोला जावे लागले. मॉस्कोला येऊन पोहोचलो त्यावेळी माझे मन अगदी प्रसन्न होते. गाडीमध्ये खार्कोव्हचा एक माणूस भेटला. त्याच्याशी मी पाऊसपाणी, शेतीची अवजारे, मॉस्कोमध्ये राहायचे कुठे, तेथले नाटकजलशे यांच्याविषयी खूप गप्पा मारल्या. आणि त्या प्रवासात माझा वेळ फारच चांगला गेला. शेवटी मॉस्कोला आम्ही दोघांनी त्याच हॉटेलमध्ये राहायचे ठरवले व रात्री फाऊस्ट नाटकाला जाण्याचा बेतसुद्धा ठरवला.

हॉटेलमध्ये मला मिळालेली खोली लहान होती. व्हरांड्यातून जात असतानाच त्या दाट, कोंदट हवेने माझे डोके उठले. एका गड्याने माझे सामान आत नेले, व एका मोलकरणीने येऊन मेणबत्ती लावली. प्रथम नेहमीप्रमाणे मेणबत्तीची ज्योत विझल्यासारखी झाली, व लगेच पुन्हा प्रकाशित होऊन जळू लागली. त्या प्रकाशात एक छोटे टेबल, आरसा व लहानशी कॉट दिसली. बाजूच्या खोलीत कुणी तरी खोकू लागले. त्या क्षणी मला मागे त्रस्त करणारी भीती एकदम जागी झाली. ''या असल्या कोपऱ्यात सारी रात्र काढणार तरी कशी ?'' मला वाटले, व माझे मन दडपून गेले.

"अरे, हे सामान सोडा ना." मला एकटे राहण्याची भीती वाटू लागली होती. व त्या गड्याने तेथे आणखी थोडा वेळ थांबावे म्हणून उगाचच मी त्याला ते काम सांगितले. "तू त्या आठ नंबरच्या खोलीत जा, व त्यांना म्हणावं, तुम्ही तयारी करा. हा मी आलोच. आम्ही नाटकाला जाणार आहोत."

गडी तेथून गेला. माझी सावली, आरसा, टेबल यांच्याकडे मुळीच न पाहता मी खालच्या मानेने घाईघाईने कपडे बदलले. "कसला वेडगळपणा चालवला आहेस तू?" मी स्वत:ला म्हणालो, "कसली भीती वाटते तुला? भुतांची?" भुतांना मी भीत नाही. भुते असती तर फार बरे झाले असते. पण हे हजार हातांनी सारे आयुष्य हुळहुळून घुसळून टाकणारे काहीतरी भयंकर समोर नको. कसली आहे ही भीती? माझी. माझी स्वत:ची. हट्, अरे, वेड लागले की काय तुला? म्हणे स्वत:ची भीती.

तरीही मी कडक इस्त्रीचे शर्ट काढून बटने अडकवली, आणि आठ नंबरच्या खोलीकडे गेलो. खार्कोव्हचा गृहस्थ तयारच होता. थिएटरकडे जाताना आम्ही एका सलूनमध्ये थांबलो. त्याने आपल्या केसांना तेलअत्तरांची रंगरंगोटी करून घेतली. मीदेखील माझे केस वळवून ऐटबाज करून घेतले. तेथल्या माणसाशी थट्टाविनोद केला, व किंमती नाजूक हातमोजे विकत घेऊन बाहेर पडलो. माझ्या मनाचे कोपरे आता स्वच्छ होते. मला पकडण्यासाठी सापळ्याप्रमाणे वाट पाहात असलेली ती खोली, पलीकडील म्हाताऱ्याचे खोकणे यांचा मला विसर पडला. नाटकानंतर बाहेरच कुठेतरी जेवण घ्यावे असे माझ्या नव्या मित्राचे मत पडले. सहसा रात्री मी बाहेर काही खात नाही, पण लगेच मला त्या उजाड, हिंस्र खोलीची आठवण झाली व मी तावडतोब 'ठीक आहे' म्हटले. जेवणानंतर मी दोन ग्लास मद्यदेखील घेतले, व अत्यंत प्रसन्न मन:स्थितीत आम्ही परतलो.

पण हॉटेलमध्ये पाऊल टाकून त्या कोंदट हवेचा स्पर्श होताच मलीन, ओल्या वस्त्राप्रमाणे ती विषण्णता माझ्या मनावर पडली. तिच्यात गुरफटून धडपडत मी खोलीत आलो, व तसाच अंथरुणावर पडलो.

ती सारी रात्र मी अगदी तळमळत काढली. पहाटेला तो म्हातारा बरगड्या फिस्कारत सारखा खोकू लागला तेव्हा कुठे डोळ्याला डोळा लागू लागला. ही झोप आली तीही अंथरुणात नव्हे, तर येरझाऱ्या घालत असता मध्येच खुर्चीवर बसलो त्या ठिकाणी. मन व शरीर यांच्यांत पुन्हा वेदना निर्माण झाली होती. मनाचा लचका तोडणाऱ्या हाताची तीक्ष्ण, क्रूर नखे खोलवर रुतत होती.

मी जगलो, जगत आहे आणि जगलेच पाहिजे. पण होते काय, तर अकस्मात मृत्यू येतो आणि मांडलेला सारा डाव लाथेने उधळून देतो. खरेच, मग या आयुष्याचा अर्थ तरी काय? एकेक दिवसाचा पीळ घालत आयुष्याचा धागा तयार करायचा तो मृत्यूने येऊन तट्कन तोडून टाकावा म्हणून? सारा त्याच्या तृप्तीसाठी केलेला खेळ हाच का मग

जीवनाचा अर्थ? मग नैराश्येने स्वतःची हत्या करू? मला त्या विचाराची भीती वाटते? की आपल्या अनिवार्य, हलक्या पावलांनी येऊन मृत्यू मला स्पर्श करेपर्यंत मी असहाय्यपणे त्याची वाट पाहात राहू? ही कल्पना तर स्वतःच्या हत्येच्या कल्पनेपेक्षा जास्त विकल करणारी आहे. जगले तर पाहिजेच, पण ते कशासाठी? अखेर नुसते मरण्यासाठी?

या दुष्ट वर्तुळातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करताना मी व्याकूळ झालो. मी एक पुस्तक उचलले, व विमनस्कपणे त्याची पाने चाळू लागलो. पण दर ओळीत तोच प्रश्न, तीच निर्दय टोचणी! मी पुस्तक फेकून दिले, व डोळे घट्ट मिटून धरले. मग तर उलट हा मनस्ताप अमर्याद वाढला. का? कशासाठी?

ही सारी घडण परमेश्वरानेच केली आहे. असेल, पण कशासाठी? अरे, कशासाठी, का? असल्या प्रश्नांना उत्तरे असतात कधी? परमेश्वराचे मार्ग समजले आहेत कधी कुणाला? का, कसे काही नाही. नसते प्रश्न विचारू नकोस. फक्त त्याची प्रार्थना कर. प्रार्थना? ठीक आहे, प्रार्थना करतो.

मी सतत प्रार्थना केली. पूर्वी मी एखाद्या लहान मुलाने दररोजचा एक कार्यक्रम म्हणून काही शब्द पुटपुटावे तशी प्रार्थना करत होतो. पण आता माझ्या प्रार्थनेला अर्थ होता. माझ्या जीवनमरणाचा प्रश्न असल्याने मी तिच्यात माझा जीव ओतला होता. मी म्हटले, "हे परमेश्वरा, तू खरंच आहेस का कुठंतरी? जर असशील तर माझ्याशी बोल. मी कशासाठी आहे, कोण आहे हे सांग. या तापदायक अंधकारातून मला मुक्त कर." मी अनेक तऱ्हेने आळवणी केली, व समोरच्या अंधाराला दिव्य जीभ फुटण्याची वाट पाहू लागलो. परंतु मला कसलेच उत्तर मिळाले नाही. जणू उत्तर द्यायला या जगात कुणी उरलेच नव्हते. त्या अंधारात टाकून दिल्याप्रमाणे मी एकाकी सापडलो. ठीक आहे, जर परमेश्वर माझ्या प्रश्नांची उत्तरे देणार नसेल, तर मीच माझ्या प्रश्नांची उत्तरे सांगतो.

कशासाठी? कशासाठी म्हणजे भावी, चिरंतन जीवन जगण्यासाठी. बरे. तसे जर आहे, तर या साऱ्या यातना, हा मनस्ताप कशासाठी? या भावी चिरंतन जीवनावर माझा बिलकूल विश्वास नाही. जोपर्यंत सारे आयुष्य पणाला लावून गाऱ्हाणे सांगायची वेळ आली नव्हती, तोपर्यंत असल्या गोष्टीवर मी तोंडदेखला विश्वास ठेवला. पण आता नाही, असल्या गोष्टीवर विश्वास बसत नाही. परमेश्वरा, जर तू खरोखरच असलास तर माझ्याशी, माझ्या बांधवांशी एक तरी शब्द बोल. जर तू अस्तित्वातच नसलास तर मग काय प्रश्नच मिटला. या दारुण, अपार अंधारात कण कण झिजत जाऊन शेवटी मृत्यूच्या पायाखाली चिरडून जायचे, याखेरीज आम्हाला दुसरी गती नाही, याखेरीज आमच्या आयुष्याला अर्थ नाही!

आणि याचीच मला भीती वाटते. नेमके हेच आमच्या वाट्याला येऊ नये, येऊ नये! मी संतापाने परमेश्वरापुढे धरणेच धरले. प्रत्येकजण करतो तेच करून पाहिले. पण माझे सारे उपाय हरले. समोरचा अंधार पोलादी भिंतीप्रमाणे निर्दय राहिला. त्यामधून उत्तर नाही की स्वरांचा कौल नाही.

"मागून पहा, म्हणजे ते तुम्हाला मिळेल." मी मागून पाहिले. जरी मला हवे ते मिळाले नाही, तरी थोडी मन:शांती मात्र मिळाली होती. मला हवे ते मिळणार तरी कसे? मी फक्त शब्दांची पखरण केली होती. खऱ्या अर्थाने मी त्याला शरण गेलोच नाही. एवढेच नाही, तर उलट तो अस्तित्वातच नाही हेच सिद्ध करण्यासाठी शब्दांचा भुसा उधळला होता. तो माझ्याशी बोलेलच, मला मार्गदर्शन करेल, अशी माझी श्रद्धाच नव्हती. आणि तो बोलला नाही. मी फक्त माझा हिशेब त्याच्यापुढे टाकून माझ्या चूकभुलीबद्दल त्याला दोष देण्याचा कांगावा करत होतो. माझ्या मनात श्रद्धेचा पाझर नव्हता हेच खरे.

अशा तऱ्हेची आणखी एक रात्र काढण्याचा प्रसंग पुन्हा नको म्हणून मी माझी सारी कामे संपवण्याची घाई केली. तरी अद्याप खूप राहिलेच. पण मी हट्टाने तेथून निघालो. मॉस्कोमधल्या या रात्रीमुळे माझ्या आयुष्याने आणखी एक वळण घेतले. घरदार, व्यवहार यांच्या गोष्टीवरून तर माझे लक्ष उडालेच, शिवाय माझी प्रकृतीही ढासळल्यासारखी झाली. माझ्या पत्नीला माझ्याविषयी फारच काळजी वाटू लागली. परमेश्वर, श्रद्धा, आयुष्याचा अर्थ असल्या गोष्टी माझ्या डोक्यात घोळू लागल्या याचे एकच कारण म्हणजे माझी प्रकृती असे तिचे ठाम मत होते. माझे उपास, प्रार्थना, चर्चला जाणे चालूच होते. म्हणजे या साऱ्यांचे फळ आपणाला मिळेल अशी काही मला फारशी आशा नव्हती. पण पैसा मिळायची फारशी आशा नसता एखादी हुंडी घेऊन पेढीवर हेलपाटे घालत राहावे तसा माझा क्रम चालू होता. मी माझा सारा वेळ कथा- कादंबऱ्या वाचणे, अगदी थोडे पैसे लावून पत्ते खेळणे यात घालवू लागलो. कधीतरी शिकारीला जायची संधी मिळाली तर मात्र मला नवा जोम वाटे. आयुष्याच्या सुरुवातीपासून मला शिकारीची विलक्षण आवड होती.

एकदा माझे काही मित्र आपली शिकारी कुत्री घेऊन आले. आम्ही शिकारीसाठी गेलो. रानात खूप अंतर गेल्यावर लांडगे कुठे दिसतात की काय याची आम्ही टेहळणी सुरू केली. पण त्या दिवशी शिकार जमलीच नाही. एकदोन लांडग्यांना आम्ही हुसकून बाहेर काढले, पण ते आमच्या कोंडाळ्यातून निसटले. शिकारीवरचे माझे लक्ष उडाले, व मी एका सशाचा माग काढत एकटाच भटकू लागलो.

भटकता भटकता मी एका लहानशा उतरणीवर आलो. सशाने उडी घेतली, व खडूचा डाग पुसून टाकल्याप्रमाणे तो कुठे गडप झाला कुणास ठाऊक! मी परतलो तोपर्यंत खूपच बर्फ पडले होते, व त्यात माझे पाय गुडघ्यापर्यंत रुतत होते. आजूबाजूला झाडेदेखील

एकदम गर्द वाटत होती. मी दचकलो, व जागच्या जागी खिळल्यासारखा झालो. ''मी कुठे आलो आहे बरं?'' मी विचार करू लागलो.

आणि नंतर माझ्या ध्यानात आले की, मी रस्ता चुकलो आहे. घर फार दूर राहिले, व इतर शिकारी मित्रांचा मागमूस नव्हता. सारे वातावरण धुतल्याप्रमाणे स्वच्छ शांत होते. माझे अंग श्रमाने गळून गेले होते. मी जर इथेच थांबलो तर गोठून मरावे लागेल. बरे, तसाच पाय ओढत पुढे गेलो, तर श्रमाने प्राण जाईल. मी मोठमोठ्याने हाका मारल्या, पण कुठूनही उत्तर नाही. सर्वत्र आपल्याकडे स्तब्धपणे पाहात उभी असलेली काळसर झाडे. पूर्व कोणती, पश्चिम कोणती हेदेखील कळायला मार्ग नव्हता. बर्फाच्या शुभ्र स्पर्शाने सारे पार बदलून गेले होते.

आणि नेमक्या याच क्षणी त्या विशाल क्रूर भीतीची छाया माझ्यावर पडली. म्हणजे येणार होता तो हाच का मृत्यू? तो आला का? असेल आला, पण त्याला भेटायला मी मुळीच तयार नाही. माझं आयुष्य मृत्यूनेच का चोचीत धरून दूर घेऊन जावे? मृत्यू म्हणजे काय? म्हणजे पुन्हा तेच प्रश्न. मला ते पूर्वी परमेश्वराला विचारायचे होते, त्याच्या मागे टोचणी लावून त्याला बोलायला भाग पाडायचे होते. पण आता मात्र तो हट्ट नाहीसा झाला. मला वाटले, परमेश्वराला दोष देणे उर्मटपणाचे आहे. माझ्या आयुष्याचा जमाखर्च आततायीपणाने त्याच्यासमोर आदळण्यात अर्थ नाही. त्याला जे काही सांगायचे आहे ते त्याने यापूर्वी केव्हाच सांगून टाकले आहे. त्यापेक्षा जास्त जुलूम त्याच्यावर करणारा असा मी कोण लागून गेलो आहे?

माझे मन स्वत:विषयीच्या घृणेने भरून गेले, व खालच्या मानेने मी फक्त म्हटले, ''परमेश्वरा, मला क्षमा कर.''

ही जीवघेणी यातना फार वेळ टिकली नाही. मी त्या ठिकाणी फार तर पाच दहा क्षण उभा राहिलो असेन नसेन. नंतर एका सरळ रेषेने मी चालू लागलो, व थोड्याच वेळात रानातून बाहेर पडलो. समोर मोठा रस्ता दिसताच मला हायसे वाटले. माझे हातपाय अद्याप कापत होते, छाती धडधडत होती, पण मनात मात्र सुख भरून राहिले होते. तोच माझ्या मित्रांचीदेखील भेट झाली व त्यांच्याशी हसत बोलत मी घरी आलो. पण मला एक मात्र विलक्षण प्रत्यय आला होता. हा माझ्यात भरून राहिलेला जो आनंद आहे, तो काही शिकारीमुळे किंवा त्या मित्रांच्या आनंदी सहवासानेच आला आहे असे नाही. एकटे असतानाही एखादे रत्न हातात घेऊन गोल फिरवत हर्षाने पाहावे अशा तऱ्हेचा एक वैयक्तिक आनंद मला गवसला होता याची मला खात्री होती.

त्यानंतर मात्र मी धार्मिक पुस्तके वाचू लागलो. बायबलचा जुना करार वाचताना त्या चिरेबंदी भाषेची मोहिनी मला वाटली, पण हृदयाला स्पर्श झाला नाही. गॉस्पेल्स वाचताना मी भावनेने रुद्ध होऊन गहिवरून गेलो, पण खरे म्हणजे संतांची चरित्रे वाचताना मात्र

माझ्या जीवनाचा प्रवाहच बदलला. साध्याच माणसांची ही अनुकरण करावीत अशी जीवनचित्रे, ती मला दिव्य प्रकाशचिन्हांसारखी वाटली. हा माझ्यातील बदल इतका मोठा होता की, घरदार, पैसाअडका यांच्या व्यवहारात मन रमेना, इतकेच नव्हे, तर क्षुद्र संसाराच्या जळमटीमुळे मन विटल्यासारखे होऊ लागले. हे सारे चूक आहे, व्यर्थ आहे तर मग बरोबर, अर्थपूर्ण काय आहे असे कुणी जर मला विचारले असते, तर ते मला सांगता आले नसते. पण आपले आतापर्यंतचे आयुष्य मात्र आंधळ्याच्या अश्रूप्रमाणे व्यर्थ ओघळले असा माझा दृढ विश्वास बनला. याची प्रचीती मला विशेषत: मी ज्यावेळी दुसरे एक शेत विकत घेण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आला.

हा सौदा तर फारच फार फायद्याचा होता, व मी ते शेत पाहायला गेलो. हा व्यवहार तर सोन्याची खाण मिळाल्यासारखा होता. विशेषत: तेथे काम करणाऱ्या शेतकऱ्यांना स्वत:च्या मालकीच्या जमिनीच नव्हत्या. म्हणजे निव्वळ गवतचारा मिळण्याच्या सवलतीसाठी त्यांना जन्मभर मालकाच्या शेतावर राबत राहण्याखेरीज गत्यंतर नव्हते. माझ्या मनावरील जुन्या संस्कारामुळे माझ्यातील मालक या सौद्यावर बेहद्द खूष झाला. परंतु उत्साहाने घरी परत येत असता वाटेत एक वयाने वाकून गेलेली म्हातारी भेटली. तिचा रस्ता चुकला होता. बोलता बोलता तिने आपल्या अपार दारिद्र्याविषयी आम्हाला माहिती सांगितली. मी परतलो. माझ्या पत्नीला हा सारा व्यवहार कसा फायद्याचा आहे हे मी उत्साहाने सांगत असता मला एकदम त्या म्हातारीची आठवण झाली, व गुन्हा करत असता सापडल्याप्रमाणे मी शरमून गेलो. झक्कन् डोळ्यांवर प्रकाश पडल्याप्रमाणे आतापर्यंत अज्ञात असलेल्या एका सत्याची मला जाणीव झाली. हे दरिद्री लोक म्हणजे माणसेच ना? त्यांनादेखील अगदी आपल्याप्रमाणेच जगण्याची उत्कट आवड आहे. गॉस्पेल्सच्या शब्दांत तर आपण सारे बंधूच, एकाच पित्याची मुले! या साक्षात्काराने तर माझ्या मनाला हादराच बसला. एकदम नाळ तुटून काहीतरी नवे जन्माला यावे त्याप्रमाणे माझ्यात बदल झाला. माझ्या पत्नीची रागीट वटवट चालू होती. तिने खूप आदळआपट केली व मला खूप दोष दिला.

पण मला मात्र फार मोठा आनंद प्राप्त झाला होता.

माझ्या वेडाची सुरुवात ही अशी झाली. पण माझे पूर्ण नि:संग खूळ मात्र यानंतर एक महिन्याने दिसू लागले.

मी चर्चला गेलो, व तेथे प्रार्थना केली. तेथील प्रवचनाने माझे हृदय भरून आले. शेवटी साऱ्या चर्चभर पवित्र ब्रेड फिरवण्यात आला. आम्ही सगळेजण क्रूसाजवळ गेलो, व धार्मिक समारंभानंतर बाहेर पडण्यासाठी चर्चच्या दारात एकच गर्दी झाली.

दारात खूपसे भिकारी उभे होते. मला एकदम वाटले, आता पुढे कुठेही असे दीनवाणे असहाय उभे असलेले भिकारी असू नयेत. पुढची गोष्ट जाऊ द्या, खरे म्हणजे आतासुद्धा

इथे कुणी भिकारी नाहीच. फक्त सारी, सगळीकडे माणसेच! जर डोळ्यांना दिसणारे रोगी, भिकारीच खऱ्या अर्थाने अस्तित्वात नाहीत, तर मग डोळ्यांनासुद्धा न दिसणारा मृत्यू, भय, मनाचा लचका तोडणारी भीषण विषण्णता, या गोष्टी तरी अस्तित्वात असणे कसे शक्य आहे? आणि जर बाह्य जगातच मुळी असल्या बुजगावण्यांना स्थान नाही तर तसल्या गोष्टी माझ्यात, माझ्या मनात तरी कशा असणार?

या विचाराने आयुष्यात प्रथमच मनाचा कोपरा न् कोपरा स्वच्छ झाला व ते नम्रपणे पूर्ण निर्भय झाले.

यानंतर मात्र माझा रोग असाध्यच झाला, माझे वेड मानवी उपायापलीकडे गेले. मी खिशात हात घातला, व होते नव्हते तेवढे पस्तीस रुबल बाहेर काढले. ते मी सारे त्या भिकाऱ्यांना वाटून टाकले, आणि शेतकऱ्यांशी बोलत पायीच त्यांच्या सांगाती शांतपणे मी घरी परतलो.

[टॉल्स्टॉय यांच्या एका वेधक कथेचा अनुवाद]

विभाग चौथा

# नाटिका

# चांदण्यातील सावल्या

आनंद व उषा संध्याकाळी फिरून येत आहेत. संधिप्रकाश सर्वत्र पसरला आहे, त्यामुळे जिकडे तिकडे हृदयास हुरहूर लावणारी उदासीनता पसरली आहे. पूर्वेकडील आकाशात ढगांचे पुष्कळसे पुंजके इतस्तत: विखुरले आहेत. क्षणापूर्वी जळत असल्याप्रमाणे तेजस्वी दिसणाऱ्या त्यांच्या सोनेरी कडा जाऊन त्यांच्या जागी पिकत आलेल्या फळाचा लालसर रंग दिसतो. थोड्याच वेळात तोही पार काळवंडून जातो, व त्या पुंजक्याच्या जागी शाईच्या डागाप्रमाणे निळसर काळे डाग दिसू लागतात. त्यांपैकी एकामागून चंद्राचे बिंब दिसू लागते. पण चांदण्याला अद्याप अवकाश आहे.

मध्येच वरून विलक्षण आकर्षक लयीत पंख वल्हवणाऱ्या पांढऱ्याशुभ्र बगळ्यांचा थवा जातो, पण त्यांच्या पंखांचा थोडादेखील आवाज जमिनीवर उतरत नाही. एखाद्या वेळी सतत चिवचिवत वरखाली होत उडणाऱ्या पंचवीस-तीस चिमण्या भुर्रदिशी डोक्यावरून जातात. पण त्याखेरीज सर्वत्र सांद्र नीरवता पसरली आहे.

त्यांच्या उजव्या बाजूला थोड्या अंतरावर आंबराई दिसते. आंबराईच्या मागे खूप अंतरावर एखादी जरीची पट्टी ठेवावी त्याप्रमाणे दिसणारी ज्योतिर्गंगा नदी आहे. डाव्या बाजूला शाकंभरीचे उंच शिखर आहे. साऱ्या गावावर संधिप्रकाशाचे तलम वस्त्र पडल्यानंतरही बराच वेळ त्याचे गोपूर सोन्याचे दिसते. पण आता अगदी वरतीही सूर्यप्रकाश दिसत नाही. आंबराईत कोपऱ्यावर एक घर अस्पष्ट दिसते.

**आनंद** : आता काका येईपर्यंत येथेच थांबू जरा. का, पाहिलंस आमचं गाव! तुला फार दिवस पाहावयाचं होतं ना! मलाही इकडे येऊन किती तरी वर्षे झाली. म्हटलं, आपला कामधंदा मुद्दाम सोडून इकडे यावयाचे ते कशासाठी? पूर्वी या ठिकाणी सगळीकडे चिंचेची झाडे होती म्हणून म्हणे या गावाला चिंचबन म्हणतात.

**उषा** : खरंच, इथं कसं सारं जुनं भयाण वाटतं! या गावाकडे पाहिले म्हणजे पुष्कळशा बऱ्यावाईट गोष्टी पाहिलेल्या जख्ख म्हातारीकडे पाहिल्यासारखे वाटते. त्या महादेवाच्या देवळात आपण मघाशी गेलो होतो ना, तेथे तर मला अगदीच राहवेना. मी एकटी तर कधीच गेले नसते तेथे. जिकडे तिकडे नुसता अंधार. शेकडो वर्षांचा अंधार तेथे जमून राहिल्यासारखा वाटतो. फक्त गाभाऱ्यात मात्र कुणी तरी एक मिणमिण पणती लावून ठेवते. आणि आपण एक शब्द बोलायचीच फुरसद! त्या अंधारात कोपऱ्यात

खूपशी माणसे लपून बसली आहेत व ती आपणास वेडावून दाखवीत आहेत, एवढा मोठा आवाज होत असे. तो तुमचा ज्योतिर्गड तर केवढा भयाण दिसतो! गडावर मारुतीच्या देवळासमोर जेथे लढाई झाली त्या मैदानावर तर म्हणे उन्हे रखरखू लागली की, अद्यापिही मोठमोठे रुमाल बांधलेले लोक हातांत भाले घेऊन हिंडताना दिसतात. नदीच्या पुरात कुणी तरी शेतकरी वाहून गेला. तो देखील म्हणे चांदणं पडलं की दिसू लागतो! खरंच, या चिंचवनात आल्यापासून मला सारखी भीती वाटू लागली आहे. खूपसे लोक अदृश्य राहून सतत आपल्याकडे पाहात आहेत असे वाटते मला पुष्कळदा!

**आनंद** : (हसून) त्या शेतकऱ्याची हकीकत मात्र मी पूर्वी कधीच ऐकली नव्हती. बाकी आज चांदणेही आहे, तेव्हा आम्हालाही तो दिसेल कदाचित्! एकंदरीने त्या म्हाताऱ्या पुजाऱ्याने इथल्या साऱ्या सुरस व चमत्कारिक गोष्टी तुला ऐकविल्या आहेत म्हणावयाच्या! मग त्याने गडावरील हणमंत विहिरीविषयी नाही का सांगितले काही? या गावातील कोणताही मनुष्य सांगेल तिच्या कथा. त्या विहिरीला म्हणे साडेतीनशे पायऱ्या आहेत आणि खाली नऊ कमानी आहेत. अमावास्येला जर वरून हळूच खाली पाहिले तर शेकडो मशाली जळत असलेल्या दिसतात म्हणे! ही आंबराई आहे ना, तेथे मी, अनंत, शाम व वत्सला खूप खेळत असू.

**उषा** : (एकदम) वत्सला कोण?

**आनंद** : (हसतो) त्या कोपऱ्यात घर आहे ना, तेथे गोविंदाचार्य म्हणून एक ज्योतिषी राहात असे. मला छानशी बायको मिळेल असे एकदा त्यांनी मला भविष्य सांगितले होते. शामू, अनंत, आणि संध्याकाळच्या लांब लांब सावल्या येथे पसरू लागल्या की त्यांना घाबरून आईला बिलगणारी वच्छी, ही त्यांची मुले. आचार्यांना खेडोपाडी खूप जावे लागे. त्यासाठी त्यांनी लहान गाईएवढा एक घोडा ठेवला होता. त्यावर आम्ही तिघे एकदम बसत असू आणि मग अनंत आम्हाला दरबार वेशीपर्यंत फिरवून आणीत असे. आता ते आचार्य आहेत की नाहीत कुणास ठाऊक! शिवाय मला आता ते ओळखणारही नाहीत. शामू, अनंत मोठे झाले असतील. त्या वच्छीचं इथंचं कुठे तरी खेड्यात लग्न झाले असेल.

**उषा** : (अर्धवट स्वतःशीच) गोविंदाचार्य?

**आनंद** : हिवाळा असो, पावसाळा असो, भल्या पहाटेस चार वाजता ते ज्योतिर्गंगेत आंघोळ आटोपीत. त्यांनी म्हटलेल्या रसाळ भूपाळ्या आम्हाला दहापंधरा घरे ऐकू येत. पंचक्रोशीत कुठेही गेले तरी आचार्य पाण्याचा थेंबही घेत नसत; पण आपल्या घरी मात्र बारा वाजेयंत एखाद्या अतिथीची वाट पाहूनच ते जेवायला बसत. अशाने पोरांबाळांना कधी मीठभाकर कमी पडावयाची नाही असे ते म्हणत. ते नेहमी आपल्याजवळ एका लहान पत्र्याच्या डबीत एक अफूची गोळी ठेवीत. मी त्यांना एक दिवस त्याबद्दल विचारलेदेखील. ते म्हणाले, "तू लहान आहेस, तेव्हा तुला कळणार नाहीत या गोष्टी. पण

प्रसंगाकरिता मनुष्याजवळ दोन गोष्टी असाव्यात : अश्रू आणि अफू.'' पण गंमत ही की, त्यांची ती अफू पुष्कळदा हरबा पाटीलच वापरीत असे. हा हरबा म्हणजे एक नमुनाच होता. हातात मावणार नाहीत एवढ्या जाडजूड मिशांचा त्याचा चेहरा पाहिला की, आम्हाला जरा भीतीच वाटे. परंतु असा दिलदार गडी म्हणतेस! स्वत: एक वेळ उपाशी राहूनही आपल्या बैलांना तो दाणे आणीत असे. पाडव्याला त्याच्या स्वत:च्या अंगावर एखादे कोरे धोतर दिसेल न दिसेल, पण त्या दिवशी त्या बैलांची शिंगे लाल दिसत. त्यांच्या गळ्यात नवीन माळा दिसत आणि रात्री त्यांच्यापुढे ताटताटभर जिलब्या असत; त्या बैलांकडे पाहिले म्हणजे डोळे निवत बघ! घागरीएवढ्या वशिंडाचे ते दोन धिप्पाड बैल ठेक्यात समोरून चालले की, म्हातारे शेतकरी चिलीम ओढता ओढता थांबत, आणि पाडव्याला बाजूच्या खेड्यात बसवण्णाची जत्रा असे त्या वेळी देवाचा आंबिलगाडा ओढताना पंचवीस जोड्यांच्या पुढे, अंगावर लालभडक मखमली झूल घातलेले हरबाचे बैल फुरफुरत, चांदीचे तोडे घातलेल्या पायांनी जमीन उकरीत असल्याखेरीज जत्रा कधीच सजल्यासारखी वाटली नाही आम्हाला, आणि आंबिलगाडे संपल्यावर सर्वांत देखण्या जनावरांना मिळणारे गवताचे तोडे आपल्या रक्तासारख्या लाल डाव्या शिंगात अडकवून ते परत चालले की, मी भीतभीत त्यांच्या अंगाला हात लावीत असे आणि त्यांनी अंग थरथरले, म्हणजे जणू त्यांनी माझा स्पर्श ओळखल्याप्रमाणे मला हर्ष होत असे. (किंचित् वळून तिच्याकडे पाहात) त्यांच्या नुसत्या पावले टाकण्यातही जी मस्त ऐट होती, तिच्यापुढे तुम्हा तरुणींचीही मिजास काहीच नव्हे. (तो किंचित् हसतो, पण लगेच गंभीर होतो.) पण उषा, या साऱ्या गोष्टी स्वप्नाप्रमाणे पार नाहीशा झाल्या असतील, नाही?

**उषा** : (आंबराईतील घराकडे निरखून) त्या घरात दिवा दिसतो. चला, पाहून तरी येऊ तेथपर्यंत!

(हळूहळू चांदणे पसरते व साऱ्या वस्तूंना वेड्यावाकड्या सावल्या चिकटतात. आंब्याच्या झाडांच्या सावल्या खूपसा काळा रंग जमिनीवर ओतल्याप्रमाणे दिसत असून विलक्षण भीतिदायक व उदास दिसतात. सर्वत्र विलक्षण शांत आहे. वाळलेल्या पानांतून एखादा सरडा निसटला की, त्याची सळसळ होई तेवढीच. आंबराईमागून नदीच्या पाण्याचा आवाज ऐकू येतो. खुद्द आंबराईत कुणी चिटपाखरूही नसते. पण पुष्कळशा झाडांमागून आपणाकडे कुणीतरी पहात आहे, असे त्यांना उगाचच वाटते व आनंद एकदा दोनदा चमकून पाहतोही. पण लगेच त्याचे त्याला हसू येते, व उगाचच तो शीळ वाजवू लागतो.

नदीच्या बाजूने वाऱ्याची एक मंद झुळूक येते. इतका वेळ जणू श्वास आवरून धरल्याप्रमाणे स्तब्ध दिसणाऱ्या झाडांच्या फांद्या वरखाली होऊ लागतात, व त्यांच्या पानांची सळसळ आंबराईच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सावकाश पसरते.

ते घराजवळ येतात. घराचे दार उघडेच असते. सोप्यावर डाव्या हाताकडील गजाच्या खिडकीतून बाहेरून कुणीतरी ओतल्याप्रमाणे चांदणे आत येते व पट्ट्यापट्ट्याने जमिनीवर पसरते. त्या प्रकाशात खिडकीकडे पाठ करून आचार्य एका फाटक्या चटईवर बसले आहेत. त्यांच्या बाजूला पंचांग, कवड्या व पितळेच्या चौकड्या पडल्या आहेत. समोर एका लहानशा पोथीवर पाटीचा एक तुकडा आहे, व मान खाली करून डोळे अगदी बारीक करून आचार्य त्याच्याकडे पाहात आहेत. उजव्या बाजूला कोनाड्यात एक मिणमिण चिमणी जळते. तिच्या काजळीने कोनाडा काळा झाला असून तिची ज्योत वाऱ्याने सारखी हलते व तिच्याबरोबर आचार्यांची सावली भिंतीवर हलते. उजव्या कोपऱ्यात एक लाकडी पेटी आहे. पण तिला कुलूपकोयंडा काही नाही.

आचार्य हातात पितळी चौकड्या घोळून जमिनीवर टाकतात व डोळे बारीक करून पाटीच्या तुकड्यावर रेघाशून्यांचे रमल मांडू लागतात.)

**आचार्य** : (मान वर करून) कोण अनंत? (कोणी उत्तर देत नाही. दार जरा करकरते. ते पुन्हा खाली मान घालून रमल मांडू लागतात.)

**आनंद** : (उषेला) म्हातारा अगदी पूर्वीसारखा आहे. (आचार्यांस) अहो आचार्य, मला ओळखलंत का तुम्ही?

(आचार्य मान वर न करता चौकड्या हातात घोळतात, व रेघा मांडू लागतात.)

**आनंद** : म्हातारा पूर्वीप्रमाणे छांदिष्टही आहे. चल, आपण आतच जाऊ.

(दारालाच एक कोळ्याचे जाळे लागलेले असते. आत येताना ते आनंदाच्या तोंडाला चिकटते. 'च् च्' करीत आनंद तोंडावरून हातरुमाल फिरवतो व आत येतो. आत येताच एखाद्या गुहेत उतरल्याप्रमाणे कोंदट ओलसर वाटू लागते. सोप्याच्या मागे एक खोली दिसते. उघड्या दारामधून आतील सर्व अस्पष्ट दिसते. कोपऱ्यात बाजले असून पाळणाही बांधलेला दिसतो. अंथरुणावरून कुणीतरी नुकतेच उठल्यासारखे दिसते. जमिनीवर एक तांब्या उपडा पडला आहे.

ते आत येतात. सर्वत्र वीतवीतभर धूळ पडली आहे. तेथे बसायला काही नाही. वर एका खुंटीवर आचार्यांची बंडी व उपरणे आहे. खुंटीच्या बाजूला फळीवर पाचसात मळकट दिसणारी भांडी व एक ताट दिसते. भिंत अगदी धुरकटून गेली असून वरच्या बाजूस तर ती दुभंगलीही आहे, व त्या फटीतून सूं सूं वारा येतो. आनंद व उषा भिंतीला टेकून उभी राहतात. आचार्य अद्यापही वर पाहात नाहीत.)

**आनंद** : अहो गोविंदाचार्य –

**आचार्य** : (भराभर कोष्टक मांडीत) हां! आजपासून एक आठवड्यात हा लालचंद गुजर मेलाच पाहिजे! अन्नपाण्याखेरीज महिनाभर खितपत पडला आहे. पण आता आली म्हणावं वेळ! हरामखोर! (घोगरेपणाने हसतात.)

(आनंद व उषा जरा अस्वस्थ होतात. उषा आनंदचा हात धरते.)

**आनंद** : कानही सारे निकामी झालेले दिसतात! (मोठ्याने) अहो आचार्य, अजून त्या लालचंदाचा राग कमी झाला नाही वाटतं?

**आचार्य** : (त्यांच्याकडे न पाहता) हरामखोर! माझी जमीन लिलावाला काढतो. माझ्या तोंडाचा घास काढून घेतला त्याने; माझ्या पोरांना उपाशी टाकलं. त्यांची आई तर बाळंतपणातच मेली. आणखी चार महिने थांब म्हणून सांगताना मी दातांच्या कण्या केल्या. पण त्या वेळी त्याने तिला राहत्या घरातून बाहेर काढले. त्या बिचारीचं बाळंतपण आटोपलं या झोपड्यात, थंडीवाऱ्यात. तसे झाले नसते, तर ती आज जिवंतही राहिली असती. दराडेखोर! माझे सांधे जर धडधाकट असते तर मी तुझ्या डोळ्यांतील बुबुळे कोचून काढली असती. तरी माझ्या अनंताने तुला दिले आहे थोडे प्रायश्चित्त! (जरा थांबतात.) इतकंच झालं नाही. उरलेल्या पैशासाठी हरामखोराने रात्रंदिवस माझ्या दारात यमासारखा एक रामोशी बसवला आहे! भोग आता आपल्या कर्माची फळे. (पुन्हा हसतात.)

(दरवाजात कुणीतरी काळीकभिन्न आकृती दिसते. खांद्यावर कांबळे असून हातात कानापर्यंत पोहोचणारी काठी आहे. चंद्राचा प्रकाश त्याच्या कानांतील सोन्याच्या वळशावर पडतो व त्यांचा मळकट-पिवळसर रंग अस्पष्ट दिसतो. ती आकृती इतकी विलक्षण स्तब्ध दिसते की, एखाद्या काळ्या खडकामधून ती कुणीतरी अखंड खोदली असावी असे वाटते.)

**उषा** : (घाबरून) हा केव्हा आला?

**आनंद** : (आचार्यांस) अहो आचार्य, तुम्ही मला ओळखलं नाही? मी कुलकर्ण्यांचा आनंद नव्हे का? मी लहानपणी तुमच्याकडे खेळायला येत असे. मला छानशी बायको मिळेल, असं तुम्ही मला सांगितलं होतं. ही माझी बायको उषा. (हसण्याचा प्रयत्न करतो, परंतु आचार्यांचा संतप्त चेहरा पाहून गप्प होतो.)

(आचार्य मान वर करतात, व पापण्यांची केविलवाणी हालचाल करीत थिजल्यासारख्या डोळ्यांनी दरवाजाकडे पाहतात.)

**उषा** : अहो, त्यांना दिसतही नाही स्पष्ट. चला, आपण येथूनच परत जाऊ. (ती दाराकडे वळते. त्या रामोशाची आकृती किंचित् सरकते व अगदी दारात येऊन उभी राहते.)

**आचार्य** : (दरवाजाकडे पाहात एक दीर्घ निःश्वास सोडतात.) कोण, अनंत का? (कुणी उत्तर देत नाही. एक उंदीर फळीवरून पलीकडे पळतो. एक भांडे खण्दिशी जमिनीवर पडते व त्याचा आवाज लगेच मरतो.) श्! आई ग! (ते जरासा हलण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या चेहऱ्यावरून संताप पार ओसरून गेला आहे, व चेहरा अतिशय

दुःखी, मातीला चिरा पडाव्यात त्याप्रमाणे दिसतो. त्यांची मान खाली वळते व हनुवटी छातीवर टेकते.) मी जिवंत असेपर्यंत अनंत दिसतो की नाही कुणास ठाऊक!

(थोडा वेळ शांतता आहे. बाहेर आंब्याची सळसळ चालू आहे. मध्येच एखाद्या वाघळाचे फडफडणे ऐकू येते. खिडकीतून आत येणाऱ्या चंद्रप्रकाशात बाहेरील आंब्याची एक फांदी हलते; त्यामुळे पानांच्या सावल्या आचार्यांच्या अंगावर वरखाली होत.)

**उषा** : (हळूकेच) अहो, पाहिलंत का हो दारात? (पण आनंदाचे तिकडे लक्ष नाही.)

(इतक्यात दार उघडून शामू आणि वत्सला आत येतात. शामू नऊ दहा वर्षांचा आहे, पण त्या वयाला न शोभण्याजोगा उदासीनपणा त्याच्या तोंडावर आहे. अंगातील सदरा पाठीवर फाटला आहे व त्याला बटने दिसत नाहीत. वत्सला आठ वर्षांची आहे. तिचे केस सारखे भुरभुरतात. ती लुगड्याचा एक तुकडा नेसली आहे, परंतु त्यालाही पुढल्या बाजूला ठिगळ आहेच. त्यांच्यामागे दरवाजा करकर वाजतो. ती एकदम दचकते व दरवाजामागील आकृती हलते की काय पाहते.)

**आचार्य** : कोण अनंत? पण अनंत कुठला येणार म्हणा! शामू, बाळ वत्सला, आलात तुम्ही.

(वत्सला त्यांच्या डाव्या बाजूला बसते. आचार्य तिला जवळ घेतात व तिच्या केसांवरून हात फिरवतात. हातावर फुंकर घालीत शामू त्यांच्यापासून जरा अंतरावर बसतो.)

**आनंद** : (एकदम उत्साहाने) अरे शाम, वत्सला, तुम्ही जसे होता तसे आहात की! वच्छे, तू अजून घाबरतेस की नाही संध्याकाळच्या सावल्यांना? (पण एकदम त्याच्या मनात विचार येतो व त्याचा चेहरा पांढरा फटफटीत होतो. त्याचे शब्द गळ्यातच विरतात व जीभ एकदम टाळ्याला चिकटल्यासारखी होते.)

**आचार्य** : (एकदम अस्वस्थ होतात व हातातील चौकड्या बाजूला टाकतात.) शाम, वत्सला, तुम्ही जेव... तुम्हाला काही खायला दिलं का त्यांनी?

**वत्सला** : काही नाही. (एकदम रडू लागते.)

**शामू** : स्वामींच्या मठात मी सारी उष्टी काढली. वच्छीनं सारी लहान भांडी घासली. मी दोन- चार बिंदग्या पाणीदेखील ओढले. माझ्या हाताची अजून आग होते. पण त्या बाईंनी दिला बचकभर भात आणि एक भाकरी दोघांत मिळून. मी म्हटलं वच्छीला, "तू खा भात." पण भात सारा आंबून गेला होता. आम्ही येताना आंबराईजवळ टिप्यासमोर टाकला तो! त्याने दोनतीनदा तोंड लावल्यासारखे केले, पण एक शीत काही खाल्लं नाही त्यानं.

**आचार्य** : त्या रामभटाची मुले, देशपांड्याचा वासू, सारे माझ्या अन्नावर वाढले. पण या वेळी आमच्याकडे कुणी ढुंकूनदेखील पाहात नाहीत. सारे हरामखोर! भरल्या ताटावरचे

कावळे. तो हरबा पाटील होता, तोपर्यंत त्याच्याकडून दोन भाकऱ्या तरी यावयाच्या दररोज. (जरा थांबतात.) मला जरासुद्धा हलता आलं असतं तर मी तुमच्यासाठी रस्त्यावर खडी फोडली असती. (एकदम बाजूला वळून अश्रू झटकतात.) त्या लालचंद बेरडाच्या घराला आग लागो, त्याचा नष्टांश होवो. (दरवाजाकडे वळतात.) कोण, अनंत का?

**शामू** : नाही दादा, कुणी आलं नाही. कधी येणार कुणास ठाऊक अनंत!

**आचार्य** : (मान खाली घालीत) एक एक दिवस प्राण कंठाशी आणून मी मोजतो आहे. आज तीन वर्षं होऊन गेली. यावयाचा दिवस होऊनही दोन महिने झाले... पोरगा कसा नक्षत्रासारखा. पण ज्या दिवशी तुमची आई वारली त्या दिवशी त्याचे डोके भडकले. भर बाजारात त्याने लालचंदाचं नाक कापलं, आणि गेला तुरुंगात. तो एकदा परत आला म्हणजे मी सुटलो. आता नाही मला जगवत. (थोडा वेळ स्तब्ध राहतात.) पण वाट तरी किती दिवस पाहावयाची? बाळांनो, कशाला आलात माझ्यापोटी? तुम्हाला घासभर अन्न देण्याची देखील स्थिती राहिली नाही माझी...(एकदम आवाज बदलून) अरे, त्या श्रीपादरावाकडे गेला होतास काय?

**शामू** : होय. 'दररोज खायला घालायला काही देणे आहे काय तुमचे?' असे म्हणाले ते.

**आचार्य** : (उद्विग्नतेने हसून) माझ्या घरी भुरकलेल्या आमटीचा वास गेला नसेल त्याच्या हाताचा! बरं, ती विहिरीजवळची राधाबाई?

**शामू** : हो, तिच्याकडे गेलो होतो. (एकदम थांबतो व वत्सलेला खुणावतो.) पण तिचं दार बंद होतं.

**वत्सला** : (एकदम उसळून) नाही हो, तिचे दार उघडे होते. ती म्हणाली, ''गिळायला घालायला होत नाही तर मातीत घाल म्हणावं तुझ्या बापाला. नाहीतर तुझा भाऊ गेला तुरुंगात. तुम्हीही जा ना त्याच्यामागून.''

**आचार्य** : (ते सारे जणू असह्य झाल्याप्रमाणे एकदम मान वर करून भिंतीकडे पाहिल्यासारखे करतात. त्यांच्या निर्जीव डोळ्यांची भकास हालचाल होते.

फळीवरून उंदीर हळूच खाली येतो. वत्सला एकदम आचार्यांना बिलगते. शामू एकदम टाळी वाजवतो. उंदीर टुण्दिशी उडी मारून नाहीसा होतो व शामू स्वत:शीच समाधानाने हसतो.)

**आचार्य** : कोण, अनंत का?

**शामू** : (उंदीर पळालेल्या दिशेने समाधानाने पाहात) नाही दादा. कुणी आलं नाही.

(वाऱ्याचा जोर किंचित् वाढतो. इतका वेळ नुसत्या वरखाली होणाऱ्या फांद्या आता एकमेकींवर घासू लागतात. दुरून कुत्र्यांचे ओरडणे ऐकू येते. त्यामागून गाडीच्या चाकांचा कर्कश आवाज ऐकू येतो, पण तो लगेच अस्पष्ट होतो. वर दुभंगलेल्या भिंतीतून वारा

जोराने आत शिरतो व विव्हळण्यासारखा आवाज करतो. दारामधील काळी आकृती अगदी निश्चल आहे. साऱ्या आंबराईवर झोपेची झापड पडल्याप्रमाणे दिसते. वत्सला रडू लागते.)

**शामू** : (समजावीत) बरं का वच्छे, मी जाऊन कुठून तरी कुडचाभर तांदूळ आणतो. तोपर्यंत तू नीज.

(गोणपाटाचा एक तुकडा तो खाली अंथरतो, डोळे पुशीत वत्सला झोपते. शामू खुंटीवरील उपरणे घेऊन तिच्या अंगावर पसरतो.)

**शामू** : हा अनंत येणार तरी केव्हा ?

**आचार्य** : नुसती वाट पाहण्याखेरीज आपल्या हातात काय आहे सांग, बाळ ? जरा कुठे आवाज झाला की, मला वाटते आला अनंत. वेडेपणाने त्याने काहीतरीच केले . (एक दीर्घ निःश्वास सोडतात.) त्याला काय झालं की काय कुणास ठाऊक! शामू, आम्हाला तो विसरून गेला काय रे ? (त्यांचा गळा दाटून येतो व ते शामूला जवळ घेतात.) बाळ, तू जाणार नाहीस ना मला सोडून ?

**शामू** : (डोके त्यांच्या गुडघ्याला घाशीत) नाही दादा, मी जाणार नाही.

**आचार्य** : (आवाज बदलून) माझ्याकरिता ती अर्धी भाकरी ठेवली होतीस ना सकाळी, ती खाऊन टाका तुम्ही. करायची काय ठेवून!

(भाकरीचे नाव ऐकताच वत्सला उठून बसते. शामू उठतो, व फळीवर चढून ताट खाली घेतो.)

**शामू** : उंदरांनी सारी भाकरी खाऊन टाकली वाटतं! अवघा एक तुकडा आहे!

(वत्सला पुन्हा झोपते. आचार्य खाली मान घालून बसतात, शामू डोक्यावरील मळकी टोपी काढून पेटीवर ठेवतो व वत्सलेच्या बाजूला झोपतो.

बाहेर वाऱ्याचा जोर विलक्षण वाढतो. बुंधे मुठीत धरून कुणीतरी विलक्षण सामर्थ्यवान शक्ती सतत हालवीत असल्याप्रमाणे झाडे सारखी सळसळतात. कोनाड्यातील चिमणी सारखी भुरभुरते, व ती पार विझते की काय असे वाटते. या साऱ्या वेड्या उन्मादात चंद्रप्रकाश मात्र स्थिर दिसतो. वाऱ्याच्या आवाजात मधून मधून कुत्र्यांचे अगदी ओढलेल्या आवाजात ओरडणेही ऐकू येते.)

**आनंद** : पण आचार्य, त्यांना तुम्ही आज आमच्याकडे जेवायला का पाठवीत नाही ?

**आचार्य** : (एकदम दाराकडे पाहतात.) कोण, अनंत का ? अरे, किती दिवस तुझी वाट पाहावयाची ? (दारातून फक्त वारा येतो. दार करकरते. दारातील ती काळी आकृती मात्र अगदी स्तब्ध आहे.

आचार्य पेटी उघडतात व तिच्यातील एकेक जिन्नस बाहेर काढू लागतात. जांभया देत शामू उठून बसतो व त्यांच्याकडे पाहू लागतो. वत्सलाही जमिनीवर कोपर ठेवून

त्यांच्याकडे कुतूहलाने पाहू लागते. वत्सलेने नेसलेल्या तुकड्यासारखा आणखी एक तुकडा आचार्य पेटीतून काढतात व बाहेर ठेवतात.)

**वत्सला** : दादा, आता पुन्हा मला असले लुगडे नको. मला अगदी कंटाळा आला त्याचा.

**आचार्य** : (तिच्याकडे न पाहता) बरं बाळ, नको तर नको. ते तुझ्या आईचे लुगडे होते. तू मोठी झाल्यावर ती तुला रेशमी लुगडे देणार होती.

**वत्सला** : (किंचित् आश्चर्याने) मी मोठी झाल्यावर ? (ती पुन्हा गोणपाटावर आडवी होते. तिच्या डोळ्यांपुढे चित्रे नाचू लागतात, व ती किंचित् हसते. वरील छपरातील भोके रंगीबेरंगी चांदण्यासारखी दिसू लागतात. ती उपरणे अंगाभोवती लपेटून घेते व झोपते.

बाहेर वाऱ्याचा जोर वाढतच आहे. खाली पडलेली पाने एकदम जागी झाल्याप्रमाणे वाऱ्यावर धावत सुटतात. त्यांतील काही पाने खिडकीतून आत येतात, व गिरक्या घेत घेत वत्सलेच्या अंगावर पडतात. ती घाबरून एकदम उठून बसते.)

**शामू** : अग, त्यात घाबरायचं काय ? नुसती वाळलेली पाने आहेत ती. (तो तिच्या अंगावरील पाने काढून टाकतो व ती पुन्हा झोपते.

आचार्य पेटीतून तीनचार पोथ्या काढतात. त्यांची पानं उडून जाऊ नयेत म्हणून शामू त्यांच्यावर हात ठेवतो.

**शामू** : अनंत आल्यावर मी या साऱ्या पोथ्या वाचणार आहे. त्या चौकड्या हातात घोळल्या की, लगेच रमल मांडावयाचे; कवड्या खुळखूळ करून टाकायच्या व लगेच रमल प्रश्नाचे उत्तर पाहावयाचे. पुढे काय होणार हे समजत असलं की, काय गम्मत असते, नाही !

**आचार्य** : (त्याच्याकडे न पाहता) नाही, त्यापासून नेहमीच आनंद असतो असे नाही. आता इतके दिवस झाले मी अनंताची वाट पाहात आहे. मी त्याबद्दल रमलही पाहिलं असतं. पण मला फार भीती वाटते, काहीतरी भलतेच उत्तर येईल म्हणून. (ते कपाळाला हात लावून क्षणभर गप्प राहतात, पण लगेच पुन्हा पेटीकडे वळतात.

पण शामूचे त्यांच्याकडे लक्ष नाही. पोथीच्या पहिल्या पानावर एक चित्र आहे, त्याच्याकडे तो पाहात आहे. आचार्य पेटीतून शालीचा एक तुकडा काढतात. त्याला कसर लागून पुष्कळ भोके पडली आहेत.)

**शामू** : (जांभई देत वर पाहात) ही अनंताची शाल.

**आचार्य** : होय, लहानपणी त्याची आई त्याला पांघरायला घालीत असे ती. त्या वेळी अनंत करंगळीएवढा होता. मला घ्यायलादेखील भीती वाटे.

(मध्येच थांबून ते वर पाहतात. त्यांच्या थिजल्यासारख्या दिसणाऱ्या डोळ्यांची केविलवाणी हालचाल होते. फार दूरची दृश्ये जणू त्यांच्या डोळ्यांसमोर दिसू लागतात.)

**आचार्य** : पण पुढे मात्र तो कसा कापसाच्या बोंडाप्रमाणे भरला. पावसाळ्यात ज्योतिर्गंगेत घराचे दरवाजे, लाकडे, गवताचे भारे, गाठोडी वाहात येत आणि त्या भर पुरात अनंत खुशाल उडी घेत असे. पुराच्या वेळी ज्योतिर्गंगेकडे पाहिले की, डोळे भिरभिरत. अगदी पाटलाच्या शेतापर्यंत संतापलेले पाणी दिसे. हरबा पाटील एवढा पट्टीचा पोहणारा, पण तो एखाद्या लहान पोराप्रमाणे आ करून त्या पाण्याकडे पाहात बसे. नदीत उडी घेण्यासाठी अनंत टेकाडावर उभा राहिला की, त्याचे केळीच्या गाभ्यासारखे कोवळे शरीर, आणि खाली संतापाने फेसाळून बेफाम वाहणारे निष्ठूर पाणी पाहिले की, माझा जीव नुसता कुसकरल्यासारखा होत असे. (शामूचे तिकडे लक्ष नाही. तो उपरण्याचा एक भाग अंगावर घेतो. थोड्या वेळाने त्याचे डोळे झोपेने मिटू लागतात. परंतु आचार्य सारी हकीकत स्वत:लाच सांगत असल्याप्रमाणे बोलत राहतात.) त्याची आई तर भ्रमिष्टासारखी शाकंभरीच्या कट्ट्यावर बसून असे. संध्याकाळी आकाश अंधारू लागले व लोक घरी परतू लागले की, ती सर्वांच्या आधी परत येत असे. सारे जण ज्योतिर्गंगेच्या पाण्याविषयी बोलत. त्या वेळी आपले लक्ष दुसरीकडेच आहे असे ती दाखवी, परंतु जिकडे तिकडे सामसूम झाले की, घरात देवापुढे तुपाचा दिवा लावून ती थोडा वेळ डोळे पुशीत बसे... मी पाहिलं आहे ते सारं! आज अनंत इथं असता तर दिवसच्या दिवस आम्हाला उपाशी काढावे लागले नसते. बिचाऱ्या वत्सलेला आज दुपारीही खायला नव्हतं काही... (शामकडे वळून) बरं शामू, तू झोप आता. (बाहेर वारा घोंघावतो, छपरावर पाने गळतात व दार जोरात आपटते.)

**शामू** : दादा, हा आवाज कसला झाला? कुणी आलं की काय?

**आचार्य** : कुणी नाही. तू नीज आता. (पेटीतून एक पत्र्याची डबी काढतात. ते तिचे टोपण उघडून डबी हातावर पालथी करतात. आतून एक काळी गोळी बाहेर पडते.)

**शामू** : दादा, त्या डबीत काळी गोळी कसली?

**आचार्य** : (एकदम दचकतात व थरथरत्या हाताने डबी व गोळी लपवतात.) छे, कसली नाही. ते माझं एक औषध आहे. आज सांधे जरा जास्तच दुखत आहेत म्हणून ते घेतो आहे. सकाळपर्यंत बरे वाटेल.

(शामू जांभई देतो व कुशीवर वळून झोपी जातो. आचार्य सारे जिन्नस भराभर पेटीत घालतात व पेटीचे दार लावतात. शालीचा तुकडा बाहेर राहतो. आचार्य तो हातात घेतात व क्षणभर त्याच्याकडे पाहतात. थोड्या वेळाने तो शामू व वत्सलेला पांघरतात.

बाहेर वाऱ्याचा जोर बेफाम वाढतो, व दूर आंबराईच्या टोकाला प्रथम असल्यासारखा वाटणारा त्याचा घुमल्यासारखा आवाज वाढत वाढत घरापाशी येतो. वाऱ्यात अदृश्य असलेल्या शेकडो आकृती एकदम आत येण्यासाठी धडपडत असल्याप्रमाणे दार सारखे करकरते. दुभंगलेल्या भिंतीतून तर सापळ्यात सापडलेल्या रानमांजराच्या ओरडण्यासारखा

अत्यंत कर्कश आवाज ऐकू येतो. फांद्या एकमेकींवर आपटून कडकडून खाली येतात की काय असे वाटते.

खिडकीतून येणारा चंद्रप्रकाश जास्तच पसरतो व गजांच्या सावल्यांचे पट्टे जमिनीवरून शामू-वत्सलेच्या अंगावर सरकतात. पुढे काय होणार हे जणू पाहण्यासाठीच वारा मस्त बैलाप्रमाणे घराभोवतीच घिरट्या घालतो.

दारातील आकृती अद्याप स्तब्ध आहे. आकाशात शुभ्र ढग वेगाने सरकतात. एखादा ढग चंद्रावर आला की, साऱ्या सावल्या भुताप्रमाणे अदृश्य होतात. झाडांच्या जागी वेड्यावाकड्या भयानक आकृती दिसू लागतात. पण लगेच जरा जास्तच उजळलेला प्रकाश पुन्हा पसरतो. काळ्या आकृतींच्या जागी पुन्हा झाडे येतात. लपलेल्या जागांमधून सावल्याही बाहेर येतात.

आचार्य हळूहळू शामू-वत्सलेजवळ सरकतात. पाठीमागील उघड्या दरवाजातून एक बाई बाहेर येते. तिने चांगले रुपयाभर कुंकू लावले आहे. तिच्या गालांची हाडे वर आली असून तिचा चेहरा कुणाची तरी विनवणी करीत असल्याप्रमाणे अत्यंत केविलवाणा दिसतो.)

**आचार्य** : (शामू-वत्सलेच्या अंगावरून हात फिरवीत रुद्ध कंठाने) बाळांनो –

(शामू जागा होतो व झोपाळलेल्या नजरेने त्यांच्याकडे पाहतो.)

**शामू** : दादा, ती काळी गोळी कसली? काळी गोळी – (पण लगेच उपरणे अंगावर घेऊन तो झोपतो.

कुणी तरी चेहऱ्यावर वेताचा प्रहार केल्याप्रमाणे आचार्य एकदम मागे सरकतात. थोडा वेळ शामूकडे निरखून पाहतात, व नंतर ते एकदम मान वर करतात. त्यांचे डोळे पाण्याने भरतात, पण चेहरा दगडाचा झाल्याप्रमाणे अत्यंत क्रूर व भयानक होतो. तो चेहरा पाहून आनंद व उषा एकदम चरकतात. उषा बोलण्याचा प्रयत्न करते, परंतु फक्त घरघरल्यासारखा आवाज मात्र होतो. आनंद तिला सावरतो व दाराकडे वळतो, पण दारातील आकृती एकदम आत येते. आनंद एकदम जमिनीला खिळल्यासारखा होतो, व विस्फारित डोळ्यांनी तिच्याकडे पाहतो.

आचार्य हात वर उचलतात. त्यांची बोटे सारखी थरथरतात. मागे असलेली बाई एकदम पुढे येते. कुणी तरी कर्णकटू शीळ घालून सावल्यांमधील भुते बोलवीत असल्याप्रमाणे वाऱ्याचा सूं सूं आवाज येतो. आचार्य शामूच्या गळ्यावर हात ठेवणार, इतक्यात वाऱ्यावर शाकंभरीच्या देवळातील भजन ऐकू येते. आचार्य मागे सरकतात व त्यांची मान एकदम दुर्बल झाल्याप्रमाणे खाली जाते.)

**आचार्य** : देवा, तुझ्या मनात आहे तरी काय? अजून असले कुत्र्याच्या मोलाचे जिणे पुरे झाले नाही का? (एक क्षण स्तब्ध राहतात.) अनंत, तू केव्हा येणार त्या वेळी

**आचार्य** : पण पुढे मात्र तो कसा कापसाच्या बोंडाप्रमाणे भरला. पावसाळ्यात ज्योतिर्गंगेत घराचे दरवाजे, लाकडे, गवताचे भारे, गाठोडी वाहात येत आणि त्या भर पुरात अनंत खुशाल उडी घेत असे. पुराच्या वेळी ज्योतिर्गंगेकडे पाहिले की, डोळे भिरभिरत. अगदी पाटलाच्या शेतापर्यंत संतापलेले पाणी दिसे. हरबा पाटील एवढा पट्टीचा पोहणारा, पण तो एखाद्या लहान पोराप्रमाणे आ करून त्या पाण्याकडे पाहात बसे. नदीत उडी घेण्यासाठी अनंत टेकाडावर उभा राहिला की, त्याचे केळीच्या गाभ्यासारखे कोवळे शरीर, आणि खाली संतापाने फेसाळून बेफाम वाहणारे निष्ठूर पाणी पाहिले की, माझा जीव नुसता कुसकरल्यासारखा होत असे. (शामूचे तिकडे लक्ष नाही. तो उपरण्याचा एक भाग अंगावर घेतो. थोड्या वेळाने त्याचे डोळे झोपेने मिटू लागतात. परंतु आचार्य सारी हकीकत स्वत:लाच सांगत असल्याप्रमाणे बोलत राहतात.) त्याची आई तर भ्रमिष्टासारखी शाकंभरीच्या कट्ट्यावर बसून असे. संध्याकाळी आकाश अंधारू लागले व लोक घरी परतू लागले की, ती सर्वांच्या आधी परत येत असे. सारे जण ज्योतिर्गंगेच्या पाण्याविषयी बोलत. त्या वेळी आपले लक्ष दुसरीकडेच आहे असे ती दाखवी, परंतु जिकडे तिकडे सामसूम झाले की, घरात देवापुढे तुपाचा दिवा लावून ती थोडा वेळ डोळे पुशीत बसे... मी पाहिलं आहे ते सारं! आज अनंत इथं असता तर दिवसच्या दिवस आम्हाला उपाशी काढावे लागले नसते. बिचाऱ्या वत्सलेला आज दुपारीही खायला नव्हतं काही... (शामकडे वळून) बरं शामू, तू झोप आता. (बाहेर वारा घोंघावतो, छपरावर पाने गळतात व दार जोरात आपटते.)

**शामू** : दादा, हा आवाज कसला झाला? कुणी आलं की काय?

**आचार्य** : कुणी नाही. तू नीज आता. (पेटीतून एक पत्र्याची डबी काढतात. ते तिचे टोपण उघडून डबी हातावर पालथी करतात. आतून एक काळी गोळी बाहेर पडते.)

**शामू** : दादा, त्या डबीत काळी गोळी कसली?

**आचार्य** : (एकदम दचकतात व थरथरत्या हाताने डबी व गोळी लपवतात.) छे, कसली नाही. ते माझं एक औषध आहे. आज सांधे जरा जास्तच दुखत आहेत म्हणून ते घेतो आहे. सकाळपर्यंत बरे वाटेल.

(शामू जांभई देतो व कुशीवर वळून झोपी जातो. आचार्य सारे जिन्नस भराभर पेटीत घालतात व पेटीचे दार लावतात. शालीचा तुकडा बाहेर राहतो. आचार्य तो हातात घेतात व क्षणभर त्याच्याकडे पाहतात. थोड्या वेळाने तो शामू व वत्सलेला पांघरतात.

बाहेर वाऱ्याचा जोर बेफाम वाढतो, व दूर आंबराईच्या टोकाला प्रथम असल्यासारखा वाटणारा त्याचा घुमल्यासारखा आवाज वाढत वाढत घरापाशी येतो. वाऱ्यात अदृश्य असलेल्या शेकडो आकृती एकदम आत येण्यासाठी धडपडत असल्याप्रमाणे दार सारखे करकरते. दुभंगलेल्या भिंतीतून तर सापळ्यात सापडलेल्या रानमांजराच्या ओरडण्यासारखा

अत्यंत कर्कश आवाज ऐकू येतो. फांद्या एकमेकींवर आपटून कडकडून खाली येतात की काय असे वाटते.

खिडकीतून येणारा चंद्रप्रकाश जास्तच पसरतो व गजांच्या सावल्यांचे पट्टे जमिनीवरून शामू-वत्सलेच्या अंगावर सरकतात. पुढे काय होणार हे जणू पाहण्यासाठीच वारा मस्त बैलाप्रमाणे घराभोवतीच घिरट्या घालतो.

दारातील आकृती अद्याप स्तब्ध आहे. आकाशात शुभ्र ढग वेगाने सरकतात. एखादा ढग चंद्रावर आला की, साऱ्या सावल्या भुताप्रमाणे अदृश्य होतात. झाडांच्या जागी वेड्यावाकड्या भयानक आकृती दिसू लागतात. पण लगेच जरा जास्तच उजळलेला प्रकाश पुन्हा पसरतो. काळ्या आकृतींच्या जागी पुन्हा झाडे येतात. लपलेल्या जागांमधून सावल्याही बाहेर येतात.

आचार्य हळूहळू शामू-वत्सलेजवळ सरकतात. पाठीमागील उघड्या दरवाजातून एक बाई बाहेर येते. तिने चांगले रुपयाभर कुंकू लावले आहे. तिच्या गालांची हाडे वर आली असून तिचा चेहरा कुणाची तरी विनवणी करीत असल्याप्रमाणे अत्यंत केविलवाणा दिसतो.)

**आचार्य** : (शामू-वत्सलेच्या अंगावरून हात फिरवीत रुद्ध कंठाने) बाळांनो —

(शामू जागा होतो व झोपाळलेल्या नजरेने त्यांच्याकडे पाहतो.)

**शामू** : दादा, ती काळी गोळी कसली? काळी गोळी — (पण लगेच उपरणे अंगावर घेऊन तो झोपतो.

कुणी तरी चेहऱ्यावर वेताचा प्रहार केल्याप्रमाणे आचार्य एकदम मागे सरकतात. थोडा वेळ शामूकडे निरखून पाहतात, व नंतर ते एकदम मान वर करतात. त्यांचे डोळे पाण्याने भरतात, पण चेहरा दगडाचा झाल्याप्रमाणे अत्यंत क्रूर व भयानक होतो. तो चेहरा पाहून आनंद व उषा एकदम चरकतात. उषा बोलण्याचा प्रयत्न करते, परंतु फक्त घरघरल्यासारखा आवाज मात्र होतो. आनंद तिला सावरतो व दाराकडे वळतो, पण दारातील आकृती एकदम आत येते. आनंद एकदम जमिनीला खिळल्यासारखा होतो, व विस्फारित डोळ्यांनी तिच्याकडे पाहतो.

आचार्य हात वर उचलतात. त्यांची बोटे सारखी थरथरतात. मागे असलेली बाई एकदम पुढे येते. कुणी तरी कर्णकटू शीळ घालून सावल्यांमधील भुते बोलवीत असल्याप्रमाणे वाऱ्याचा सूं सूं आवाज येतो. आचार्य शामूच्या गळ्यावर हात ठेवणार, इतक्यात वाऱ्यावर शाकंभरीच्या देवळातील भजन ऐकू येते. आचार्य मागे सरकतात व त्यांची मान एकदम दुर्बल झाल्याप्रमाणे खाली जाते.)

**आचार्य** : देवा, तुझ्या मनात आहे तरी काय? अजून असले कुत्र्याच्या मोलाचे जिणे पुरे झाले नाही का? (एक क्षण स्तब्ध राहतात.) अनंत, तू केव्हा येणार त्या वेळी

ये. पण मला आता सोसवत नाही हे. तू तुरुंगात गेल्यामुळे सारे लोक तुझा तिरस्कार करतील. पण बाळ, मला तुझा फार फार अभिमान वाटतो. (त्यांचे डोळे पाण्याने भरतात व त्यांना पुढे बोलवत नाही.

ते एक दीर्घ श्वास घेतात, व बोटे पसरून आपले थरथरणारे हात शामू-वत्सलेच्या गळ्यावर ठेवतात. ती बाई एकदम त्यांच्या हातावर पडते. वत्सलेचे इवलाले पाय किंचित् हलल्यासारखे होतात. आकाशात एकदम पुष्कळसे ढग येतात. चंद्र झाकाळला जातो व एकदम सारा अंधार होतो.

थोड्या वेळाने ढग निघून जातात, हळूहळू मृत्यूसारखा फिक्कट, उदास चंद्रप्रकाश पसरतो. वारा दमून गेल्याप्रमाणे मधून मधून वाहतो.

शामू आणि वत्सला गोणपाटावर झोपल्यासारखी दिसतात. त्यांच्या अंगावर उपरणे पसरले आहे व वर शालीचा तुकडा आहे. त्यांच्या बाजूला मोकळ्या जमिनीवर आचार्य आडवे झाले आहेत. त्यांच्या हाताजवळ पत्र्याची डबी रिकामी पडली आहे.

मघाची ती बाई कुठे दिसत नाही. पण एका कोपऱ्यातील अंधारात कुणीतरी अस्फुटपणे हुंदके देत असल्याप्रमाणे आवाज करीत वारा एका फटीतून बाहेर निसटत आहे. ती काळी आकृतीही आता नाहीशी झाली आहे.

उषा एकदम ओरडते व मट्कन् खाली बसते. आनंदाचा चेहरा घामाने डबडबतो. तो तिला ओढीतच दाराकडे नेतो. परंतु ते दाराशीच थबकतात. एक अत्यंत विद्रूप चेहऱ्याचा मनुष्य काठी टेकीत आत येतो. त्याच्या छातीला पुष्कळशा पट्ट्या बांधल्या आहेत.)

**आनंद** : (घोगऱ्या आवाजात) अरे बापरे, हा अनंत की काय!

(अनंत त्याच्याकडे न पाहता आत येतो व आचार्यांपासून जरा अंतरावर पेटीजवळ उभा राहतो.)

**अनंत** : माझी वाट पाहून दमला असाल, पण मी तरी काय करणार! तुरुंगातून बाहेर पडल्याबरोबर अगदी शपथ, पाण्याचा थेंबही न घेता निघालो मी. पण माझं नशीबच तसलं. एक मिलिटरी मोटार आली धाड्धाड् करीत, आणि इतके दिवस पडलो तळमळत हॉस्पिटलमध्ये. आता तुम्ही मला ओळखणारही नाही. (कुणी काहीच बोलत नाही. शामू-वत्सलेच्या अंगावरील उपरणे जरा थरथरते.) अरे शामू, उठा की. आता तुमच्यासाठी मी एवढे रुपये आणले आहेत. (खिशातून तो एक जाडजूड पाकीट काढतो.) त्या मिलिटरी मोटारीचा प्रसाद आहे हा. अरे शामू, वच्छे –

(तो खाली वाकतो व शालीचा तुकडा हातात घेऊन उपरणे बाजूला करतो.)

**अनंत** : अरे देवा! (शालीचा तुकडा दूर भिरकावतो; तो आनंदाच्या अंगावर येऊन पडतो. आनंद एकदम तो हातात घेतो. अनंताच्या हातातील काठी निसटते व तो एकदम पेटीवर कोसळतो. छातीला बांधलेल्या पांढऱ्या पट्ट्या लालभडक होतात. दुसऱ्या क्षणी

त्याचे शरीर पेटीवरून सरकून धाडदिशी जमिनीवर पडते. त्याची मान एकदा दोनदा थरथरते, पण थोड्याच वेळात ती निश्चल होते.

फळीवरून एक उंदीर खाली येतो. अनंताजवळ येताच तो थांबतो. आपले निमुळते तोंड इकडे तिकडे फिरवीत तो काळजीपूर्वक त्याच्याकडे पाहतो व दुसऱ्या क्षणी खुशाल त्याच्या अंगावर चढतो.

उषेला ओढीत आनंद दारातून एकदम धावत जातो. आपल्या हातात शालीचा तुकडा आहे याचेही त्याला भान राहात नाही. समोरच पाऊलवाट आहे. पण ते काट्याकुंपणातून धावत जातात. उषेचे पाय खरचटून निघतात. शेताच्या एका बांधावर आनंद श्वास घेण्यासाठी थांबतो. दुरून दोनतीन माणसे येत असतात. एकाच्या हातात कंदील आहे.

नदीच्या बाजूने जाडजूड मिशांचा एक मनुष्य घुंगरे लावलेली काठी आपटीत येतो. त्याच्यापुढे बर्फासारखे शुभ्र दिसणारे दोन धिप्पाड बैल ऐटीत चालले आहेत, व त्यांची अणकुचीदार शिंगे चांदण्यात चकचकतात. त्यांच्या गळ्यात जाड दुव्याच्या साखळ्या असून मध्यभागी घंटा आहेत. त्यांच्या डौलदार चालण्याने त्या हलतात व एक विलक्षण मधुर लयबद्ध आवाज होतो.)

**आनंद** : कोण, हरबा पाटील की काय? बरं झालं, सुटलो! (एक दीर्घ निःश्वास सोडतो.) अहो, त्या आचार्यांनी आपल्या हाताने आपल्या मुलांचा जीव घेतला, आणि तो अनंतही अगदी निपचित पडला आहे.

**हरबा** : (त्याच्याकडे निरखून पाहात) मग काय वाईट झालं? काय होतं त्यांना आयुष्यात सुख? घासभर अन्नासाठी पोरे तडफडत असलेली पाहायची? कुणी कुत्र्यापुढे टाकतात तशी चतकोर भाकर नाही टाकली त्यांच्यापुढे. (जरा थांबतो.) शिवाय त्यांनी पोरे मारली, तो अनंत छातीला मार लागून मेला, हे सारे खरे. पण या साऱ्या गोष्टी बारा वर्षांपूर्वी घडल्या – बारा!

**आनंद** : आं! पण – पण मी तर आताच त्यांना बोललेलं पाहिलं!

**हरबा** : हे काय वेड्यासारखं बोलणं! अहो, मेल्याने अशी माणसे कुठं मरतात होय? ती आपणाला नेहमी दिसत नाहीत एवढेच. आता समोरून माणसे येत आहेत. नाकासमोर रस्ता आहे. जा तुम्ही आता. (हरबा काठी आपटीत निघून जातो.)

(कंदील घेतलेला मनुष्य जवळ येतो.)

**कंदील घेतलेला मनुष्य** : (कंदील वर करून) कोण आनंदराव? अहो, इथं काय करता? रात्रीचं या गावात कुणी येत नाही. आंबराईजवळ तुम्हाला दिसलं का कोणी?

**आनंद** : कुण्णी नाही. फक्त हरबा पाटील भेटला. म्हणून मी जरा उभा तरी आहे –

**मनुष्य** : (एकदम) हरबा दिसला तुम्हाला?

**आनंद** : दिसला म्हणजे! आता इथं होता ना माझ्याशी बोलत!

**मनुष्य** : अहो, मागे एकदा ज्योतिर्गंगेला तुफान पूर आला व त्यात हरबाचे बैल सापडले. त्यांना वाचवण्यासाठी घातली उडी हरबाने, आणि लागला वाहतीला. त्याचे प्रेतसुद्धा मिळाले नाही.

**आनंद** : पण – पण मी आत्ताच (एका झुडुपाआडून बाहेर पडत असलेल्या हरबाकडे तो विस्फारित डोळ्यांनी पाहतो. तोच त्याचा घसा एकदम कोरडा होतो, व तो एकदम खाली बसतो.) खरंच (अगदी हलक्या आवाजात पुटपुटतो), खरंच त्या बैलांची, हरबाची, कुणाचीच सावली पडत नाही चांदण्यात – सावली पडत नाही...

**मनुष्य** : बरं, चला झटकन् आता आणि हे घाणेरडं फडकं कुठलं तुमच्या हातात? (आनंदाच्या हातात असलेला शालीचा तुकडा चिमटीत धरून दूर फेकतो व तो वाऱ्यावर उडत आंबराईच्या दिशेने जातो.

इतस्तत: पसरलेल्या चांदण्यातील सावल्यांमधील दोन सावल्या चालू लागाव्या त्याप्रमाणे आंनद व उषा सुन्न मनाने चालू लागतात. मागे कुणी तरी हसल्यासारखे वाटते. पण वाऱ्याची झुळूक पानांमधून निसटताना तसा आवाज होतो एवढेच.)

विभाग पाचवा

# लघुनिबंध, ललितलेख

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
विभाग
३४६२
२६५८६
०५।३।८२

# प्रेम, प्रेम, प्रेम

कॉलेजला सुट्टी झाल्यामुळे माझा एक मित्र पुण्याहून बेळगावला आला आहे. आणि ती एक विलक्षण हकीकत घेऊनच. तो म्हणे आपल्या खोलीत स्वस्थ निजला होत आणि एकदम बाजूच्या खोलीतून ओरडणे, किंचाळणे ऐकू आले.

''प्रेम! अहाहा प्रेम! अयोयोयो प्रेम! अबबब प्रेम!.....''

काय झालं हे पाहण्यासाठी तो हळूच उठून पाहू लागला तोच –

त्याच्या कॉलेजातील एक कवी आपल्या पुढे एक कागद ठेवून ढसढसा रडत होता म्हणे! उपरिनिर्दिष्ट मित्र स्वत: कवी, संपादक किंवा शिंपी नसल्यामुळे व तो माझा मित्र असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही.

मला वाटते, त्याग व ध्येय हे अडीच अक्षरी शब्द सोडून दुसऱ्या कोणत्याही अडीच अक्षरांच्या शब्दांचा दुरुपयोग किंवा फाजील उपयोग या ''प्रेमा'' इतका झाला नसेल! खरंच, त्याग, प्रेम, ध्येय या साडेसात अक्षरांच्या साडेसातीने आजच्या मराठी वाङ्मयाला इतके ग्रासून सोडले आहे. अहो, म्हापणकर, अहो सवाई म्हापणकर, पाहा हो या साडेसातीचा मंत्रबिंत्र काही आहे की काय!

जो उठतो तो अगदी बेंबीच्या देठापासून ओरडतो, 'प्रेऽऽम!' लगेच दुसरा त्यावर भाष्य करतो, ''प्रेम स्वर्गीय आहे! अमुक आहे, तमुक आहे!'' (आणि तुझे टाळके आहे!) मला वाटते, यांतील तीन चतुर्थांश लोकांना तरी ''प्रेम'' ही भानगड कोणत्या महंमदअल्लीच्या दुकानात मिळते किंवा कोणत्या कॅफे इलाइटमध्ये ''सर्व्ह'' होते किंवा कोणत्या संपादकाच्या खिशातील जळलेला विडीचा तुकडा आहे, याचा पत्ता नसेल.

एकदा एक मनुष्य मोठ्या सचिंत विषण्ण मुद्रेने बसला होता. तोच एका वाटसरूने त्यास सांगितले, "अरे, असा का दुःखी होऊन बसतोस? त्या विदूषकाचे खेळ पहा व पोटभर हस. तो असताना कोणीही दुःखी होण्याची जरुरी नाही." त्या माणसाने सांगितले, "तो विदूषक मीच!"

तशीच परिस्थिती झाली आहे. कोणाला तरी विचारा, "तू अमुक गोष्टीत घातलेला प्रेमप्रसंग तू स्वतः कधी अनुभवला आहेस का?" तर तो हसून सांगेल, "अरे, प्रेमप्रसंग तर राहूच दे, प्रेम ही काय भानगड आहे हे तरी कोणाला माहीत आहे?" आणि जर एखाद्या नाटककाराने विनोदाकरिताच नाटके लिहिली तर हे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वर्गात पास झालेले बी. ए., एम्. ए. आकाशाकडे हात करून किंचाळतात, "हे वास्तववादी लिखाण नव्हे!" मला वाटते, या प्रेम-लेखकांचा आणखी एक हेतू असतो. आयुष्यात काही तरी "भयंकर व विचित्र" अनुभव आल्यामुळे धनुष्याकृती भुवयांची सर्वगुणसंपन्न नायिका निर्माण करून ते दुधाची तहान ताकावर भागवीत असावेत. तेवढेच समाधान. "Literature should provide an escape from hard realities of life." खडतर जगापासून क्षणभर दूर जाता येण्याचे साधन हे वाङ्मयाचे कार्य असावे हे जरा निराळ्या अर्थाने खरे करू पाहात असतील!

या प्रेमाने लघुकथा-कादंबऱ्यांना मात्र फारच मदत केली. कोणतीही कादंबरी उघडा, लघुकथा वाचा, या 'प्रेम' शब्दाचे अडीच अक्षरी भूत नाचत असलेले तुम्हास स्पष्ट दिसेल. मग नायक उच्च कलेचा भोक्ता असो अगर तीन आण्याला बोर्ड रंगवून देणारा पेंटर असो, खाकी विजार घालून उनाडटप्पूप्रमाणे हिंडणारा युवक असो अगर धुळीने मळून खाकीसारखे दिसणारे धोतर नेसणारा एखादा अजागळ कारकून असो, यांच्या राज्यात पूर्ण Universalisam प्रेम! प्रेम!! प्रेम!!!

ज्याप्रमाणे नदीचा प्रवाह समुद्राला मिळालाच पाहिजे त्याप्रमाणे कथानकाचा ओघ या प्रेमसागरात मिळालाच पाहिजे. आपल्याकडल्या प्रथितयश कादंबऱ्या घ्या, चित्रपट कंपन्या घ्या, प्रत्येक पात्रास या मणिकर्णिकेचे स्नान घडतेच!

लघुकथेत तर प्रेमावाचून पात्रच चालत नाही. प्रेम ही एक अतिशय भयंकर गोष्ट आहे. गवताप्रमाणे वाटेल तेथे निपजते व निवडुंगाप्रमाणे वाटेल त्या स्थितीत वाढते. कित्येकांचे ''प्रेम'' आगगाडीत जुळते, तर कित्येकांना कॉलेजमध्ये ''चान्स'' मिळतो. आणि पुष्कळ वेळा या आगंतुक प्रेमाचे पर्यवसान लग्नासारख्या भयंकर गोष्टीत होते. कित्येक गोष्टी मी वाचल्या आहेत, त्यात नायिकेचे लग्न बापाच्या हावरेपणाने अगर दुष्ट समाजरूढीमुळे (ही काय भानगड आहे याचा एकदा निकाल लावण्याकरिता एक कमिटी बसविली पाहिजे.) दुसऱ्याशी लग्न होते; आणि वरातीच्या वेळी नायक डोळे पुसत म्हणतो, ''ताई!'' मानसशास्त्राचा प्रश्न आहे म्हणून विचारतो. का हो फडके, मानसशास्त्राच्या दृष्टीने हे शक्य आहे का? मला वाटत नाही ते शक्य आहे!

अलीकडे ''वादळातील होड्या'' हे प्रकरण पसरणारसे दिसते. खांडेकरांच्या मोहक भाषेने नटलेली गोष्ट वाचल्याबरोबर चैतन्य पसरले व जिकडे तिकडे ''वादळातील होड्या! तिची नजर एक झाली व होड्या कायम एकत्र आल्या म्हणे!''

प्रेम म्हणताच मला एक गम्मत आठवली. मी एकदा कॉलेजकडे चालला होतो. मी माझ्या मित्राला विचारले, ''तो आपला हा कोठे राहतो?

''तो होय? प्रेमाच्या चाळीत.''

मी बेळगावच्या बहुतेक सर्व चाळी आठवल्या, पण छे:!

''अरे, बगाराम आहेस झालं. प्रेमाची चाळ म्हणजे कॉलेज रेसिडेन्सी. कॉलेज म्हणजे प्रेममंदिर. विद्यार्थी-विद्यार्थिनी म्हणजे रिक्रूट व (कान ताठ करा) रिक्रूटिणी! सर्दच झालो मी त्याची विद्वत्ता पाहून!

प्रेम म्हणताच बत्तीस दात दाखवून मुखरस पाघळणाऱ्या प्रेमवीरांस मला सांगावेसे वाटते, ''अरे पोरांनो, उगाच प्रेम प्रेम म्हणून चपटी छाती बडवू नका. प्रेमाच्या थापा मारू नका. खांडेकर, फडके व इतर दोन तीन लेखकच करू व सांगू द्यात प्रेमाच्या गोष्टी व तत्त्वज्ञान. तुम्हाला नाही जमायचे ते. कारण –

अनुभव हे लेखनाचे मीठ आहे!

# जीवनचित्रे

पावसाळा.

पावसाचे केवढे रुद्र स्वरूप दिसते! कुणीतरी विषारी फुंकर टाकावी त्याप्रमाणे आकाश काळवंडून जाते आणि अगदी वेडावल्याप्रमाणे पाऊस ओतू लागतो. आपल्यामध्ये आणि बाकीच्या जगात एखादे पटल निर्माण झाल्याप्रमाणे आजूबाजूची झाडे एकदम नाहीशी होतात, पण त्यांच्या फांद्यांचा कर्कश आवाज मात्र वाऱ्यावर राहतो. पायांखाली पाहता पाहता गुडघाभर पाणी फेसाळू लागते. आणि अशा पावसातही येथे राहण्याचा वेडेपणा ज्यांनी केला अशी पाखरे केविलवाण्या तऱ्हेने अंग चोरून पानापानामागे दडू लागतात. नारळीच्या बागांत झावळ्यांमध्ये वाऱ्याचा आवाज भयानक रीतीने घुमू लागतो, आणि खाली लहान लहान झोपड्यांत राहणारी बायकामुले किंचित् भयभीत चेहऱ्याने नदीवर गेलेल्या होड्यांची वाट पाहू लागतात. भाताची खाचरे पाण्याने भरून गेल्यामुळे चौकोनी तुकड्याप्रमाणे दिसू लागतात. पण त्या पावसाच्या निर्दय उन्मादातही रंगीबेरंगी पिरडुकांची पेंडकी घातलेल्या त्या बायका अगदी दबून काम करताना दिसतात. आजूबाजूला सारे अंधारून येऊ लागते. खाचरांच्या कडेला असलेली नारळांची झाडे काळीकभिन्न गूढ दिसू लागतात. आणि पाण्याने निथळत असलेली गुरे गावाकडे परतू लागली की, त्या बायकाही डोक्यावर गोणपाटाचे तुकडे टाकून त्यांच्यामागून तितक्याच निर्विकारतेने चालू लागतात... निसर्गाचे पान उलटते.

पावसाळा जाऊन हिवाळा येतो. नदीचे मस्तावल्याप्रमाणे दिसणारे पात्र संथ होते. नारळीच्या बागांमुळे हिरवेगार दिसणारे खालचे पाणी एकदम गोठून गेल्याप्रमाणे अगदी निश्चल दिसते व त्यात पाण्याच्या अगदी पृष्ठभागाजवळून उडत जाणारे पांढरेशुभ्र बगळे, त्यांच्या पंखांची होणारी लयबद्ध नीरव हालचाल, नारळींच्या झावळ्या, व त्यावर पसरलेले लखलखीत निळे आकाश सारे आरशाप्रमाणे स्पष्ट दिसते. उतरणीवरील हिरवे मखमली गवत पिवळसर होते. झाडांच्या गर्द राईत मध्येच दिसणारे पळसाचे झाड एखाद्या विशाल अग्निजिव्हेप्रमाणे लालभडक दिसते. झुडुपाझुडुपांत सतेज रेशमी पाने दिसू लागतात. व त्यांत डोळे अगदी दुखवून सोडणाऱ्या तांबड्या रंगाच्या लहान फळांचे घोसच्या घोस दिसू लागतात. करवंदीच्या जाळीत नाजूक वासाची ती फुले उमलतात व त्यावरच पसरलेल्या गुंजवेलीच्या शेंगा करपून पटकन उघडतात, आणि त्यासाठी हपापलेल्या लहान लहान मुली

कुणी आल्या नाहीत तर त्यांतील गुंजा खालील काटेरी कुंपणात एकामागोमाग अश्रूंप्रमाणे पडू लागतात. इतके दिवस कुठे नाहीसे झालेले अनेक आकर्षक रंगाचे पक्षी पुन्हा झाडावर जमतात. किरमिजी झाक असलेली आपली छाती फुगवून ऐटीत बसलेल्या पारव्याचे घुमणे पुन्हा वळचणीला ऐकू येते, व सारे घर भरून राहिलेल्या सुरंगीच्या धुंद वासाने मन भारावल्यासारखे होते. पण संध्याकाळी टेकड्यांमागे सारे आकाश उरी फुटल्याप्रमाणे लाल लाल झाले की, डोक्यावर गवताचे प्रचंड भारे घेतलेल्या त्या बायकांची रांग उतरणीवर दिसू लागते. खाली येईपर्यंत त्यांच्याभोवती अंधार जमतो, त्यात त्यांच्या दडपून गेलेल्या आकृती दिसेनाशा होतात. हिवाळ्याचे उन्हाळ्यात रूपांतर होते.

हवा तापल्याप्रमाणे झळझळू लागते, सर्वत्र डोळे दिपवणारा तप्त प्रकाश भरून राहतो, आणि मुठीएवढ्या सावल्या कशाबशा झाडांना चिकटून राहतात.. उन्हाने त्रस्त झालेली गुरे त्याच दरिद्री सावल्यांत कशीबशी खेटून राहण्याचा प्रयत्न करतात. या वडवानळात पाने पाहता पाहता नजरेसमोर करपून वेडीवाकडी होतात; आणि झाडांच्या हिरव्या गोपुरात सारी शांतता पसरते. काजूच्या झाडांत तांबडे पिवळे दिवे लावावेत त्याप्रमाणे रसरशीत फळे लटकू लागतात, जांभळीवर पिकलेल्या जांभळाच्या घोसांची काळीनिळी गर्दी होते, आणि थोड्याच दिवसांत, तापून लाल झालेल्या खडकावर अनवाणी चालणाऱ्या त्या बायकांच्या डोक्यावर टपोऱ्या करवंदांच्या टोपल्या दिसू लागतात. पुष्कळदा दुपारी रखरखलेल्या मैदानावर काटक्या गोळा करण्यासाठी त्या वणवण हिंडताना दिसतात, किंवा जवळ कुठेतरी काम चालू असल्यास त्या तापलेल्या धुळीत त्यांच्या श्रांत आकृती मातीचुना नेण्यासाठी इकडून तिकडे सावल्यांप्रमाणे निःशब्द हलत असतात...

निरनिराळी दृश्ये. पण तीन रंगीत मणी एकाच दोऱ्यात ओवावे त्याप्रमाणे त्यांना एकत्र जोडणारी तीच माणसे. निसर्गाचे फूल उमलते आणि कोमेजते. पण त्यांचे मात्र तेच कष्टमय जीवन सतत चालू राहते. जगण्यासाठी तीच केविलवाणी धडपड, जीवन बधीर करणारे तेच श्रम, आणि तीच ती मूक सहनशीलता...

विभाग सहावा

# इंग्रजी कथेचा मुक्त अनुवाद

# DINU'S BILL

*'नवयुग वाचनमाले' मध्ये (भाग ४) आचार्य प्र. के. अत्रे यांची 'दिनूचे बिल' नावाची कथा आहे. परचुरे प्रकाशन मंदिराच्या "फुले आणि मुले" (संकलक : डॉ. स. गं. मालशे, श्रीमती शिरीष पै, सौ. मीना देशपांडे; १९८२) या पुस्तकात ती समाविष्ट आहे. या पुस्तकातील कथांची भाषांतरे जी. एं. नी करावीत अशी कल्पना श्री. अप्पा परचुरे यांनी जी. एं. ना सुचवली. 'या पुस्तकातील 'दिनूचे बिल' या पहिल्या कथेचे भाषांतर करण्याचा प्रयत्न करून पाहातो.' असे म्हणून, त्याप्रमाणे जी. एं. नी* ***'Dinu's Bill'*** *हे भाषांतर केले. मूळ कथेचे हे निव्वळ भाषांतरच न राहाता, त्या कथेच्या आधारे जी. एं. नी केलेली ही नवनिर्मितीच झाली आहे.*

*पुढे जी. एं. नी 'दिनूचे बिल' या कथेचा केलेला मुक्त अनुवाद दिला आहे; आणि जी. एं. नी तो करताना मूळ कथेची नवनिर्मिती कशी केली आहे याची कल्पना येण्यासाठी आचार्य अत्रे यांची मूळ कथाही 'परिशिष्ट' म्हणून दिली आहे.*

*[संदर्भ : "'जी. ए.' नावाचे स्वप्न", अप्पा परचुरे; परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई; मार्च १९९०; पृ. २३-३०]*

Young Dinu's father was a medical practitioner. Sometimes Dinu used to go to the dispensary, and sit in the cushioned chair in the corner. The chair was very comfortable, and looked as if it was waiting to welcome him.

There was a counter running along the whole wall. It had a raised partition with a small arch- like window in it. The compounder sat behind it for his work.

Dinu could never see him fully. Sometimes his fingers pushed through the window a bottle, or neatly wrapped packets of pills and powder. If somebody bent down, and made some enquiry, a thick mustache, or a huge shining glass came to the window. The window was too small to show fully his mustache or spectacles.

Everybody called him Compounder. Dinu sometimes wondered about his real name. Compounder cannot be anybody's real name. Once he asked his father about it. He gave some difficult name and Dinu promptly forgot it. He asked his mother. She tried to remember it, but gave up. She said, "Call him just Compounder – like others, and they will understand. Everybody knows Compounder, nobody knows his real name."

Dinu was always to know about compounder, and his mysterious work behind the counter. Only once, he had taken courage, and had peeped round the edge of the counter. Compounder's back was turned towards him. He was pouring some red liquid in a measuring glass and holding it against light. All around him, there were various bottles, big and small, all filled with coloured medicines. When Dinu was lost in their magic, he heard a gruff voice – "And now, what do you want here, young doctor ?"

Dinu came back very fast, and sat in the chair, making himself very small. But Compounder did not chase him, and father smiled a little.

Many patients came to his father. Some did not have any appetite, while some others could not eat enough. Some could not get any sleep, while some others could do nothing but sleep. Some slept even in the chairs in the dispensary, when waiting for their turn. Father wrote prescriptions on small sheets of paper, and the patients took them to Compounder, who gave them bottles or pills. Sometimes father told them to have more milk, or apples or grapes. Dinu thought that it would be delightful to be in bed with a small, painless complaint, which required eating a lot of chocolates, ice-cream, sweet cakes and platefulls of strawberry jam. He asked his father whether there was any such small illness that required this diet. Father laughed so much that a huge shining glass came near the window, and stayed there for one full minute.

Sometimes, some patients put notes and coins on the table and said, "This is for your bill, Sir."

Dinu often wondered about the money and the bills. One day he said to father, "What is a bill ?"

Father said, "come here, I will show what a bill is." Then he showed him a paper which was like this :

| Item | Particulars | Amount |
|---|---|---|
| i) | Full check-up | Rupees Fifteen |
| ii) | House calls (three) | Rupees Fifteen |
| iii) | Daily mixtures (Eight days) | Rupees Twenty Four |
| | Total | Fifty Four Rupees |

"This is a bill; you see, I did some work for them. Should they not pay me for it?"

Dinu nodded, and looked at the bill carefully. After some time he smiled to himself.

When returning home, he was filled with many new ideas. He too had worked for Mother. Why shouldn't he send her his bill? It will be great fun. In addition, he could buy many lovely things with the money.

When he came home, he took out a blank sheet of paper out of his exercise book, and drew some lines on it to make it look a real bill. Then he wrote on it :

| Item | Particulars | Amount Rs. | Amount Ps. |
|---|---|---|---|
| i) | For bringing flowers from the garden | 1 | 00 |
| ii) | For taking a message to Aunt | 1 | 00 |
| iii) | For taking care of the baby (Two Hours)... | 5 | 00 |

He wrote Rupees five, but he crossed the figure and made it seven. The baby had pulled his hair twice, and bit his finger with its new and only tooth.

| | | | |
|---|---|---|---|
| iv) | For bringing one sweetcake from the bakery (without taking even a small piece)... | 3 | 00 |

He woundered whether he should include the bill for washing three cups, but he decided against it. He had broken the ear of one cup. Then he took out another sheet, and wrote a clean bill without scratches and crosses.

| Item | Particulars | Amount Rs. | Ps. |
|---|---|---|---|
| i) | For bringing flowers from the garden... | 1 | 00 |
| ii) | For taking a message to Aunt... | 1 | 00 |
| iii) | For taking care of the baby (Two Hours)... | 7 | 00 |
| iv) | For bringing one sweet cake from the bakery | 3 | 00 |
| | Total | 12 | 00 |
| | | Rupees Twelve | |

Mother was in the kitchen. He went to her room on tiptoes, and put the bill on her table. He came back quietly like a mouse, but he was immensely pleased.

Next morning, he was delighted to find the bill back, with a small heap of coins and notes. He took out his new handkerchief, and tied the money in it. He could not count all the delicious things he could buy with all that inexhaustible money. He was however surprised to find another bill. Mother had sent her bill to him. It was like this :

| Item | Particulars | Amount Rs. | Ps. |
|---|---|---|---|
| i) | For bringing you up since your birth. | No rupees | No paise |
| ii) | For sitting by your bedside day and night during your illness (Four times.) | No rupees | No paise |
| iii) | For Telling bed-time stories (so many!) | No rupees | No paise |
| iv) | For teaching you now to read and write | No rupees | No paise |
| | Total Bill | No Rupees | No Paise |
| | | Nothing | |
| | | | Mother |

Dinu's eyes were suddenly filled with tears, and words stuck in his throat. The bill fell from his hands. He took the money and went to his mother. He put it before her without

saying a single word. Then he put his head on her lap and sobbed. Mother ran her fingers through his hair and patted him. ''Dinu, my bill is now fully paid, and this is my receipt for it,'' She said and put a loving kiss on his wet cheek. ''And now look, who has come to meet you!''

It was only then that he saw Compounder sitting in the wicker chair. He was sitting straight on the edge of the chair, but very respectfully. He looked a bit frightened.

''So the young doctor had already started sending his bills.'' he said.

His voice now was not the gruff, dispensary voice at all. As a matter of fact, he was not the dispensary Compounder. He was wearing a long coat, and an old-fashioned black round cap. Except his grandfather, Dinu had not seen anybody wearing such a cap. His face was kindly, and his mustache and glasses did not look terrifying at all. He looked very friendly and Dinu liked him very much. He thought that Compuonder perhaps carried in his bulging coat pocket cloured pencils and peanuts, Lollypops and marbles. Perhaps he even knew stories about talking elephants, frogs becoming brave princes, and journeys to the moon and the Mars.

Compounder put his hand in his coat pocket and took out a transparent paper bag. He opened it carefully, and took out a red plastic ball. It was the reddest, the smoothest and the brightest ball Dinu had ever seen, and he lunged for it. ''No hurry, young doctor. It is for you all right,'' Compounder said.

''He had seen it some where, and was pestering me about it for one full week. So I had decided to go out this evening, and get it for him; but you shouldn't have spent on it.'' mother said.

''It is such a small, inexpensive thing,'' Compounder said, giving the ball to Dinu,'' Twice he had asked his father, too.''

Compounder was quiet for a moment. Then he said in a low voice, almost to himself, ''I would have liked my son also to

have sent his bill to me. I would have loved to send my bill to him. But it was not destined to happen.''

Mother said hurriedly, ''Won't you have a cup of tea ?''

''No, thank you, I must hurry, I have to meet two more young friends.'' Compounder said, getting up from the chair.

He said he was in a hurry, but he moved rather slowly. He pushed his feet clumsilly in the old dusty chappals, and walked towards the gate. When closing the gate behind him, he wiped his eyes with his fingers.

Mother pulled Dinu to her, and held him very tightly. Dinu was filled with many eager questions, and he was impatient to ask all of them. Why did not his son give him his bill ? Why did it not happen ? What was the son's name ?

One look at his mother's face told him that it was not the right time to ask her any questions, and all his questions sat down obediently in his mind. He did not say anything at all. Mother simply said, ''Poor compounder!'' and her eyes became moist.

# दिनूचे बिल

दिनूचे वडील डॉक्टर होते. दिनू कधी त्यांच्याबरोबर दवाखान्यात जाई. तेथे पुष्कळसे लोक येत. कोणी तपासून घेण्यासाठी येत, तर कोणी औषध घेण्यासाठी येत. कोणी येऊन म्हणे, "डॉक्टर, माझं पोट दुखतं. मला तपासा!" तर कोणी म्हणे, "डॉक्टर, माझं बिल किती झालं आहे, ते सांगा."

दिनू एका लहानशा खुर्चीवर बसून ते सारे पाहात असे; आणि ऐकत असे. बिल म्हणजे काय, ते अजून त्याला कळले नव्हते.

दिनूने एके दिवशी वडिलांना विचारले, "बाबा, बिल म्हणजे काय हो?"

डॉक्टरांनी टेबलावरचा एक कागद घेतला आणि दिनूला दाखविला. "हे बघ, याला बिल म्हणतात. वाच." डॉक्टर म्हणाले.

दिनू तो कागद वाचू लागला.

| तपशील | रु. | पैसे |
|---|---|---|
| रोग्यास तपासल्याबद्दल | ५ | - |
| दोनदा घरी येण्याबद्दल | ४ | - |
| आठ वेळा औषध दिल्याबद्दल | ३ | - |
| एकूण | १२ | - |

दिनू ते बिल किती तरी वेळ वाचीत होता. तो एकदम मध्येच हसला. त्याला काय वाटले कुणास ठाऊक; काही तरी विचार त्याच्या डोक्यात आला.

घरी जाताना त्याच्या मनात किती तरी विचार येत होते. आपण आईची पुष्कळ कामे काल केली. मग त्याबद्दल तिच्या नावावर बिल का करू नये? मोठी गंमत होईल. पैसे मिळतील, त्यांचा खाऊ आणू.

घरी गेल्यावर दिनू आपल्या खोलीत गेला आणि त्याने एका कागदावर आपल्या आईच्या नावाने एक बिल तयार केले.

| तपशील | रु. | पैसे |
|---|---|---|
| आज बागेतून फुले आणल्याबद्दल | - | १२ |
| बाळाला दोन तास सांभाळण्याबद्दल | १ | - |
| शेजारच्या काकूंकडे निरोप घेऊन गेल्याबद्दल | - | २५ |
| वाण्याकडून साखर आणण्याबद्दल | - | १२ |
| एकूण | १ | ४९ |

दिनू

आई बसत असे त्या खोलीत दिनू हळूच ते बिल ठेवून आला.

दुसरे दिवशी सकाळी दिनूला उशाजवळ बिलाचे पैसे व एक कागद दिसला. तो पैसे भराभर मोजून रुमालात बांधू लागला. कागद हातात घेऊन पाहतो तो काय, ते आईने त्याच्या नावाने केलेले बिल होते!

| तपशील | रु. पैसे |
|---|---|
| लहानपणापासून आतापर्यंत वाढविल्याबद्दल | काही नाही |
| चारदा आजारीपणात दिवस-रात्र जागून काळजी घेतल्याबद्दल | काही नाही |
| गोष्टी सांगून करमणूक केल्याबद्दल | काही नाही |
| वाचायला शिकवल्याबद्दल | काही नाही |
| एकूण | काही नाही |

आई

दिनूच्या डोळ्यांत एकदम पाणी आले. त्याचा गळा भरून आला. त्याच्या हातातला कागद गळून पडला. रुमालात अर्धवट बांधलेले पैसे घेऊन तो तसाच आईकडे गेला.

काही न बोलता त्याने आईला पैसे परत केले व तो आईच्या मांडीवर डोके ठेवून स्फुंदू लागला.

आईने दिनूला कुरवाळले व त्याचा मुका घेत ती म्हणाली, " तुझ्या बिलाचे पैसे मिळाले बरं, दिनू!"

विभाग सातवा

# बालसाहित्य

छोटी गोष्ट

## वीरांचे स्मारक

आम्हाला नाताळची सुटी होती. तेव्हा वसंतने आग्रह केल्यावरून मी त्याच्या गावी गेलो. त्याचे गाव खेडेगावापेक्षा मोठे होते. पण मला काही करमेना तेथे; म्हणून आम्ही गावाबाहेर अडीच मैल असलेल्या एका तलावावर जाण्याचे ठरविले.

तलाव काही फार मोठा नाही; पण अतिशय सुंदर आहे. चारी बाजूंस दाट झाडी आहे. त्याचे प्रतिबिंब पाण्यात पडत असल्यामुळे पाणी वाजवीपेक्षा जास्त खोल दिसे. आम्ही ज्या दगडावर बसलो होतो त्यापासून पंधरावीस हातांवर एक आंब्याचे झाड होते व त्याखाली दोन चौकोनी दगड पुरलेले दिसत होते. गवत व झाडांची मुळे यांनी त्यांचा निम्माअधिक भाग व्यापून टाकला होता. त्या दगडाला कुंकवाची दोन बोटे लावली होती.

"हा काय तुमच्या गावाचा देव आहे वाटतं?" मी जरा चेष्टेने विचारले.

"खरं आहे बुवा. तुला माहीत नाही त्या दगडाखाली काय आहे ते!" वसंत म्हणाला.

"आता आपण जेथे बसलो आहोत तेथे साडेतीनशे वर्षांपूर्वी एक मातीची भिंत उभी होती. ती अगदी पडून गेली; पण याच्यापुढे आणखी एक चारपाच फर्लांगांवर दुसरी दगडी भिंत होती. तिचे अवशेष मात्र अजून तुला दाखवू शकेन मी.

त्यावेळची परिस्थिती अतिशय भयंकर होती. आजचा दिवस गेला तेवढाच पदरात पडला. उद्याची शाश्वती नाही; आणि आमचे हे गाव तर अगदी रस्त्याला; त्यामुळे लोकांना अतिशय काळजीपूर्वक राहावे लागे. लोकांनी आपल्या शक्तीप्रमाणे संरक्षणाची तयारी केली. दोनदा तर त्यांनी शत्रूच्या टोळीचा पार फडशा उडवला; पण त्यांत त्यांचे तरुण तरुण लोक जखमी झाले व मेले. एक दिवस बातमी आली की, यवनांचे सैन्य खाली दक्षिणेत जाणार आहे.

झाले. गावात एकच हलकल्लोळ उडाला. बहुतेक पुरुष मंडळी हत्यारे घेऊन तयार झाली. मुख्य प्रश्न म्हणजे बायकामुले व मूल्यवान चीजवस्तू यांचा. त्यांना आतल्या गढीत पाठवले व अगदी मोजकी माणसे रक्षणास ठेवली. त्या गढीची जबाबदारी दलपत नावाच्या वीराकडे सोपविली. पुऱ्या साडेसहा फूट उंचीच्या या वीरास पाहताच समजून येई की,

हा अतिशय शूर आहे. त्याचा चेहरा निरनिराळ्या जखमांनी – एक तर अगदी ताजी होती – अत्यंत भेसूर दिसायचा; पण त्याच्या डोळ्यांत मात्र सात्त्विक शौर्याचे विलक्षण तेज दिसे. बाहेरील तटाची जबाबदारी जगदेव नावाच्या इसमाने स्वीकारली होती. हा मूळचा कोठला हे कोणासही माहीत नव्हते; पण त्याने आपल्या विलक्षण शौर्याने सर्व लोकांवर एक प्रकारचे वजन पाडले होते.

घनदाट अंधकारात दलपत पहारा करीत होता. त्याच्या हातात एक तोड्याची बंदूक होती. ती मध्येच तो खांद्यावर ठेवी किंवा हातात घेई. त्याला कोणीतरी येत असल्याची – पळत येत असल्याची – चाहूल लागली. तो कान देऊन ऐकू लागला. तोच समोरून कोणीतरी अतिशय जोराने पळत येत होते.

''कोण ते? एकदम उभे रहा.'' दलपत बंदूक रोखीत म्हणाला. पण ती व्यक्ती तशीच पळत आली पुढे.

दलपतने गोळी झाडली. ''आई ग,'' म्हणत म्हणतच ती व्यक्ती पडली. दलपत जवळ गेला. घनांधकारात त्याचा चेहरा दिसला नाही. पण तो काहीतरी बडबडत होता. ''फितुरी... शत्रू आत आले...''

तोच शत्रूचे सैन्य दौडत येत होते. लगेच दलपतने आपली बंदूक सरसावली; पण इतक्या लोकांबरोबर लढणार कसा तो?

सकाळी अजून अंगात धुकधुकी असलेला दलपत डोळे उघडून पाहू लागला. वर अनंत आकाशाशिवाय काही नव्हते. त्याच्या बाजूस मात्र कोणीतरी जखमी होऊन पडले होते.

दलपतने मोठ्या कष्टाने मान वळवून पाहिले तोच त्याला धक्का बसला. ''सदू, बाळा, माझ्या बाळा...'' होता होईल तो दलपत आपल्या मुलाकडे सरकला; पण तेथे जाईपर्यंतच तो मुलाला भेटावयास निघून गेला. गावकऱ्यांनी छातीस गोळी लागून मेलेल्या सदूस व सबंध शरीरभर जखमा झालेल्या दलपतला एका जागी पुरले व आठवण म्हणून दगड पुरून टाकले त्यांवर! बापलेक अमर झाले!

''– आणि बाबू,'' वसंत म्हणाला, ''हल्ली हा गाव जगदेवांच्या वंशजाकडे आहे.'' मी त्या दगडाकडे पाहिले. ते आंब्याचे झाड सळसळत होते व म्हणत होते, ''माझ्या बुंध्याशी दोन खरे मराठे निजले आहेत!''

## नवीन कोडी
## कोडे नंबर १
## शब्द ओळखा

| शब्दाचा मूळ अर्थ | पहिले अक्षर कापल्यानंतरचा अर्थ |
| --- | --- |
| संध्याकाळ (रजनी) | भक्तीण (जनी) |
| मृत्यू | लढाई |
| खाद्य | हस्त |
| वस्तू ठेवण्याची जागा | बसण्याचा पदार्थ |
| भांडे | फळातील गोड पदार्थ |

[या कोड्याचे उत्तर पुढील अंकात छापले आहे :]

| | |
| --- | --- |
| मरण | रण |
| भाकर | कर |
| कपाट | पाट |
| घागर गर | |

**करून तर पहा!**

## निकामी ग्लोब

तुम्हास पुष्कळ वेळा बॅटरीचे ग्लोब मिळतात ना? तसला एक ग्लोब घ्या व त्यास सुईने लहानसे भोक पाडा. ग्लोबच्या खालच्याच बाजूने भोक पाडणे सोपे असते. तरी पण भोक पाडण्याच्या वेळी काळजी घेतली पाहिजे. भोक पाडल्यानंतर त्यात एक थेंब पाणी टाका.

एक रुंद तोंडाची बाटली घेऊन तीत पाणी ओता व तो ग्लोब त्यात टाका. जर ग्लोबमध्ये पाणी जास्त झाले असेल तर तो साहजिकच तळाशी जातो. या वेळी त्यातील थोडे पाणी झाडून टाकले पाहिजे. ग्लोब अर्धा पाण्यात व अर्धा हवेत राहीतोपर्यंत पाणी काढून टाकावे.

आता बाटलीचे तोंड रबराने गच्च बांधावे. थोडीसुद्धा हवा आत जाऊ नये. नंतर वरचे रबर हळू हाताने दाबावे. ग्लोब पाण्याच्या तळाशी जाईल. पण हात काढताच तो पुन्हा वर येईल. तुमची जादू पाहून तुमचे बालमित्र आश्चर्यचकित होतील.

का ? आहे की नाही मजा ?

## अब्राहिम लिंकन

अब्राहिम लिंकन तुम्हास माहीत आहे ना ? त्याच्याविषयी पुष्कळच गोष्टी प्रसिद्ध आहेत. तो दिसावयास अतिशय धिप्पाड व उंच होता.

एक दिवस स्टेशनवर एक मुलगी उभी होती. तिच्याजवळ दोन जड ट्रंका होत्या. तिच्याजवळ हमालास द्यावयास पैसे नव्हते. तोच तिकडून एक उंच, धिप्पाड व साधे कपडे घातलेला मनुष्य आला.

''मुली, तू अजून का उभी आहेस ?'' त्याने विचारले.

त्या मुलीने सर्व हकीकत सांगितली. त्या मनुष्याने तिच्या दोन्ही ट्रंका डोकीवर घेतल्या व म्हटले, ''चल, तुझे घर दाखीव.''

''पण तुला द्यावयास माझ्याजवळ पैसे नाहीत.''

''चल, तुझे घर दाखीव.'' त्याने पुन्हा म्हटले.

नंतर त्या मुलीच्या पाठोपाठ जाऊन त्या मनुष्याने ते सामान तिच्या घरी पोहोचविले.

हा मनुष्य युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिकेचा प्रेसिडेंट अब्राहिम लिंकन होता !

**करून तर पहा !**

## जादूचा गोळा

तुम्हास माहीतच आहे की, सध्या लढाई चालू आहे. तीत सबमरीनचा उपयोग केला जात आहे.

या सबमरीन्स क्षणात पाण्यात जातात व क्षणात बाहेर येतात. त्या कशा ? हा जादूचा गोळा करून पहा.

बॅटरीमध्ये जे ग्लोब असतात ते जळल्यानंतर आपण फेकून देतो. त्यांचा पिवळा जो पत्रा दिसतो तो काढून टाकून फक्त काचेचाच गोळा तेवढा घेऊन त्याला एक बारीक

भोक पाडा. हा पत्रा जरी काढता आला नाही तरी हरकत नाही. अत्तराची लांबट बारीक तोंड असलेली बाटली किंवा लस ठेवतात ती बारीक तोंडाची लठ्ठ बाटलीसुद्धा चालेल. मग त्यात थोडे पाणी घाला. म्हणजे तो फुगा किंवा बाटली अर्धी पाण्यात व अर्धी बाहेर असावी. मग बाटलीच्या तोंडाला शक्यतो जास्त ताणून एक रबर गुंडाळा व दोरीने बांधून टाका. हे रबर सायकल-ट्यूबचे असले तर फारच बरे. त्या रबरास जरा दाबताच गोळा किंवा बाटली सावकाश खाली जाते. पण हात काढताच वर येते. आहे की नाही मजा?

दाबल्यानंतर गोळ्यातील हवेचा दाब कमी होतो व थोडे पाणी आत शिरते व गोळा जड होऊन खाली जातो; पण हात काढताच तो हलका होऊन वर येतो.

सबमरीनमध्ये आत पाणी घेण्याची व्यवस्था असते. पाणी आत घेतल्यावर ती जड होऊन खाली जाते. पण पंपाने पाणी बाहेर टाकताच पुन्हा वर येते.

## यातील गंमत शोधा

काका – काय रे रामू, तो दिवा तेथे कशाला उभा केला आहेस?
रामू – त्याच्याखालचा तो मोठा दगड रात्री दिसण्याकरिता.
काका – पण तो दगड कशाला?
रामू – (चिडून) कशाला म्हणजे? तो दिवा उभा करण्याकरिता.

## हास्यलहरी

पोलिस – अहो, थांबा. तुम्ही आपल्या सायकलीला दिवा लावला नाही...
गृहस्थ – आणि म्हणूनच मी तोंडात जळता चिरूट धरला आहे ना!

# माणसाची शिकार

गौतम बुद्ध ह्या जगद्विख्यात धर्मसंस्थापकाचे नाव न ऐकलेला मनुष्य विरळा. त्याने संस्थापिलेला धर्म चीन, जपान, तिबेटसारख्या दूरदूरच्या देशांत पसरलेला आहे. "प्राणिमात्रावर दया करा." हे बुद्धधर्माच्या तत्त्वांपैकी एक महत्त्वाचे तत्त्व आहे. आपण लोकांना सांगितलेले प्रत्येक तत्त्व अत्यंत काटेकोरपणे आचरणात आणण्याचा तो प्रयत्न करी. त्याच्याविषयी पुढील गोष्ट प्रसिद्ध आहे.

एकदा गौतम एका वनात चिंतन करीत बसला होता. तोच तेथे काही लोक आले व एका हरिणीला तेथील एका झाडाला बांधून चालते झाले. ती हरिणी गर्भिणी होती. त्या ओझ्यामुळे बिचारीला एक पाऊलसुद्धा सहज उचलता येत नव्हते.

गौतमाला हा प्रकार जरा विचित्रच वाटला. हे लोक येतात काय, एका दीन हरिणीला अशा वनात बांधून जातात काय, हे त्याला काहीच समजेना. त्याने जाणाऱ्या एका मनुष्याला त्याविषयी माहिती विचारली. तेव्हा तो म्हणाला –

"आमच्या सरदारसाहेबांना शिकारीचा नाद आहे. पण त्यांना शिकार हुडकण्याचा त्रास नको म्हणून आम्ही दररोज येथे एक हरीण बांधतो. आणखी थोड्या वेळात सरदारसाहेब येतील व या हरिणीला आपल्या बाणांनी ठार करतील."

गौतम त्या असहाय हरिणीकडे पाहात तेथे उभा राहिला. त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले. अखेर त्याने आपला निश्चय कायम केला. तो त्या हरिणीपाशी गेला व तिच्या मानेला बांधलेली दोरी त्याने सोडून दिली. मग तो त्या हरिणीच्या जागेवर बसला.

थोड्याच वेळात नेहमीप्रमाणे सरदारसाहेब शिकारीकरिता आले; पण त्यांना नेहमीच्या जागी हरीण वगैरे काही दिसले नाही. हरिणीच्या जागी एक संन्यासी मात्र बसला होता!

"ए भिकारड्या, कोण आहेस तू? कोणी बसविलं तुला इथं?" सरदारसाहेब कडाडले. गौतमाने डोळे उघडले. तो बिलकूल संतापला नाही. त्याने शांतपणे उत्तर दिले, "मला कोणी बसविलं नाही, सरदारसाहेब. मीच बसलो. शिकारीकरिता बांधलेली हरिणी मी सोडून दिली, पण त्यामुळे आपली बिलकूल गैरसोय होऊ देऊ नका. आपण माझीच शिकार करा. माणूस काय, हरीण काय, बाण लागल्यावर कोणालाही जखम होणारच."

सरदारसाहेबांचे डोळे खाडकन उघडले. त्यांना आज समजले की, माणसाप्रमाणे पशूंनाही जीव असतो! त्यांनी गौतमाचे पाय धरले व त्याची क्षमा मागितली.

गौतमाने सरदारसाहेबांना आपले विश्वविख्यात तत्त्व सांगितले, "प्राणिमात्रावर दया करा!"

## एक कोडे

कोणताही एक आकडा मनात धरा. त्याची दुप्पट करा. त्यात सहा मिळवा. बेरजेची निमपट करा. त्यातून तुम्ही धरलेला आकडा वजा करा. बाकी किती राहते ? सांगू ? तीन. होय की नाही ? (हे उत्तर कसे येते ते शोधा.)

## पैशाची किंमत कोणाला ?

रॉकफेलर नावाच्या एका अत्यंत श्रीमंत मनुष्याविषयी एक गोष्ट सांगतात. तो एकदा गाडीतून उतरल्यानंतर गाडीवानास एक शिलिंग देऊ लागला.

"काय साहेब, तुमचे चिरंजीव तर मला तीन शिलिंग देतात." गाडीवान म्हणाला. पण रॉकफेलरने अत्यंत शांतपणे उत्तर दिले, "त्याचा बाप लक्षाधीश आहे, माझा नाही !"

## मनोहरची दिवाळी

तात्यांची वाट पाहात मनोहर दारातच उभा होता. ऑफिसहून यायची नेहमीची वेळ होऊनही तात्या न आल्यामुळे तो जरा निराश झाला होता. पण रस्त्याच्या कोपऱ्यावरून तात्यांना येताना पाहून त्याच्या तोंडावर हास्य पसरले व तो धावतच तात्यांकडे गेला. "किती उशीर केलात." त्यांचे बोट धरीत मनोहर म्हणाला, "कितीतरी वेळ मी तुमची वाट पाहात उभा होतो. मग जायचं ना फटाकडे आणायला ?"

"अरे, जायचं तर खरंच; पण जरा दम धरशील ना ?" तात्या हसून म्हणाले.

तात्या आतून चहा पिऊन येईपर्यंत काही मनोहरला धीर धरवेना. त्याची सारखी चुळबूळ चालली होती. तात्या ज्या वेळी बाहेर आले, त्यावेळी त्याने त्यांचे बोट धरून जवळजवळ ओढतच बाहेर नेले त्यांना. "तात्या, खूप फटाकडे घ्यायचे हं मला. चंद्रज्योतीही पाहिजेतच –"

वाटेने मनोहर सारखा तात्यांना बजावीतच होता.

"अरे, जरा धीर धर ना, दुकान तरी येऊ दे." तात्या त्याला मधूनमधून समजावीत.

अखेरीस ते दुकान एकदाचे आले. गिऱ्हाइकांची खूप गर्दी झाली होती. दुकानदार आपल्या गड्यांना सारखे हुकूम सोडीत होता. फटाकड्यांच्या रंगीबेरंगी माळा लोंबत सोडल्या होत्या. वाऱ्याची जरा झुळूक आली की, त्या शेतातील जोंधळ्याच्या कणसांप्रमाणे डोलत.

तो दुकानदार तात्यांच्या चांगला ओळखीचा असल्यामुळे त्याने त्यांना आत बोलाविले. तात्या आत जाऊन खुर्चीवर बसले; पण मनोहर केव्हाच त्या गर्दीत मिसळला होता. फटाकड्यांचे निरनिराळे नमुने, बंदुकी, चंद्रज्योती तो निरखून पाहात होता. मध्येच तो तात्यांजवळ पळत आला.

"त्या हिरव्या डब्यांतलेच फटाकडे घ्यायचे. त्या लहान चंद्रज्योती नकोत. लांब आहेत ना, त्या पाहिजेत मला –" तो सांगू लागला.

तात्या व दुकानदार हसू लागले. त्याला पाहिजे होते ते ते जिन्नस दुकानदाराने बांधून दिले.

"एवढे दारूकाम घरी न्यायला हमालच केला पाहिजे एखादा." पैसे देता देता तात्या मिस्किलपणे म्हणाले.

मनोहरने ते सर्व सामान हातात घेतले व तो घरी जाण्याची घाई करू लागला. शेजारच्या वसंताला व सुरेशला केव्हा एकदा आपण आपले फटाकडे दाखवतो असे त्यास होऊन गेले होते; पण तात्यांच्या ओळखीचा एक गृहस्थ भेटल्यामुळे ते जरा बोलत उभे होते. पण मनोहरला दम धरवेना.

"तात्या, मी जातो पुढे. तुम्ही या मागाहून –" उतावीळपणाने तो म्हणाला.

तात्यांनाही त्या गृहस्थाबरोबर जावयाचे होते. त्यांनी 'बरे' म्हटले व ते त्या गृहस्थाबरोबर निघून गेले.

हातातील सामानाकडे मोठ्या अभिमानाने व उत्सुकतेने पाहात मनोहर चालला होता. आजूबाजूच्या गर्दीकडे त्याचे बिलकूल लक्ष नव्हते.

"ए मनोहर," कोणीतरी त्यास मागून हाक मारली.

मनोहरने मागे वळून पाहिले. त्याच्या वर्गातला सदू होता तो. दिवाळी एवढी जवळ येऊनही त्याने फाटका सदरा घातला होता. त्याची विजारही अगदी मळून गेली होती.

"काय रे मनोहर, काय आहे तुझ्या हातात ते?"

"ते आहेत फटाकडे. इलेक्ट्रिक फटाकडे म्हटलं इलेक्ट्रिक. असा भयंकर आवाज होतो –"

पण सदूचे त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. आशाळभूत नजरेने तो त्या सामानाकडे पाहात होता.

"तू घेत नाहीस का फटाकडे? दिवाळी आली आणि असला फाटका काय सदरा घालतोस?" मनोहरने विचारले.

"कसली दिवाळी न् काय!" सदू सांगू लागला, "माझा धाकटा भाऊ गोविंदा पाचसहा दिवस आजारी आहे. बाकीची मुले फटाके उडवताना पाहून आपणासही फटाकडे पाहिजेत म्हणतो. आम्हाला जेवायलाही पोटभर मिळत नाही आणि फटाकडे कोठले आणायचे?"

"च् च्" मनोहर उद्गारला. बराच वेळ तो विचार करीत होता.

"थांब, मीच देतो तुला फटाकडे."

सदूला आनंद झाल्यासारखे दिसत होते; पण भीत भीत त्याने विचारले –

"तुझे वडील रागावतील तुझ्यावर?"

"छे, आमचे तात्या फार चांगले आहेत."

ते सदूच्या घरी आले. त्याचा लहान भाऊ एका फाटक्या जाजमावर निजला होता. त्याची आई त्याच्याजवळच दीन चेहरा करून बसली होती. सदूने तिला सर्व हकीकत सांगितली. "देव उदंड आउक्ष देवो माझ्या बाळाला!" ती म्हणाली. तिचा चेहरा आनंदाने फुलला होता.

या दिवाळीला आपणाला फारच थोडे फटाकडे उडवायला मिळणार, याचे मनोहरला मुळीच दुःख वाटले नाही. त्याच्या डोळ्यांपुढे त्या आईचा आनंदी चेहरा सारखा दिसे.

त्या रात्री त्याला एक स्वप्न पडले.

जिकडे तिकडे हजारो पणत्या लावल्या आहेत, आपण व सदू फटाकडे उडवीत आहो, गोविंदा चंद्रज्योती घेऊन उड्या मारीत आहे व त्यांची आई आनंदाने फुललेल्या चेहऱ्याने आपणाकडे पाहात आहे. झोपेतच मनोहर खुदकन हसला.

स्वतः सुखी होण्याप्रमाणे दुसऱ्याला सुखी करण्यातही आनंद असतो, हे त्यास आज समजले होते!

## 'प्रिय मुग्धा, प्रिय लिट्ल मनीषा –'

[जी. एं. नी आपली मावसबहीण सौ. सुनीता (नंदा) पैठणकर ह्यांच्या मुली मुग्धा आणि मनीषा यांना ध्वनिफितीवर मुद्रित करून एक पत्र पाठवले आहे. ते मुग्धा-मनीषा यांच्या निमित्ताने असले, तरी त्याचे आवाहन सर्वच किशोर-किशोरींना आहे.]

प्रिय मुग्धा आणि प्रिय लिट्ल मनीषा, तुम्ही दोघी कुठच्या कुठे दोनशे मैलांवर पुण्याला जाऊन बसलात. त्यामुळे आम्हांला पाहिजे त्या वेळी तुमच्याशी काही बोलताच येत नाही. हां, आम्ही पत्रं पाठवतो. मग तुमची आई कधी तरी आठवण झाली, वेळ मिळाला तर उत्तर पाठवते. मुग्धा, तू देखील छोटी सुरेख पत्रं लिहितेस. पण हे सगळं काही खरं नाही. समोरासमोर बोलत राहण्याची सर त्याला कशी येणार? शिवाय लांबलचक मोठी पत्रं लिहायला तुला अजून थोडे दिवस जावे लागतील. लिट्ल तर अद्याप शाळेतदेखील जात नाही...

तू काही मराठी कविता किंवा गाणी शिकलीस का? मला वाटतं, या वयातच तू पुष्कळशा मराठी कविता शिकून घ्याव्यास. इंग्रजीचा तू जरूर चांगला अभ्यास कर. इंग्रजी भाषा एखाद्या राजवाड्यासारखी भव्य आहे. नंतर तुला इंग्रजी वाचनाची आवड निर्माण झाली तर तुला आयुष्यभर टिकेल असा आनंद मिळेल. एखाद्या झाडाला सतत वर्षभर फुलं येत असावीत त्याचप्रमाणं त्या आवडीनं तुला कायम आनंदाचा बहर मिळेल. परंतु काही झालं तरी मराठी आपली मायबोली आहे. आता बघ मुग्धा, इतरांनी तुला जरी किती शाबासकी दिली, तरी आईबाबांनी तुझं कौतुक केलं तर तुला जास्त आनंद वाटतो. होय की नाही? भाषेच्या बाबतीत तसंच घडतं. म्हणून आपण झाडासारखं जगायला हवं. झाड कसं उंच उंच होत आभाळातील सूर्य, चंद्र, चांदण्या यांच्या प्रकाशाकडे पाहात राहतं. पण ते कधी आपल्याला जीवन देणाऱ्या मातीला विसरत नाही की, आपली मुळं तिच्यातून वर काढत नाही. म्हणून मी म्हणतो, इंग्रजीचा खूप अभ्यास कर, पण मराठीकडे दुर्लक्ष नको.

तुला एखादं विशेष काही तरी आईला सांगायचं असेल किंवा आईला तुझ्या कानात एखादी गोष्ट बोलायची असेल तर तेव्हा इंग्रजी किती परकं वाटतं बघ तरी. याचं कारण, शेवटी आपली खरी भाषा म्हणजे मराठी हे आहे. शिवाय लहान वयातच आठवणीत राहिलेली गाणी किंवा कविता नंतर फार दिवस आपल्या ध्यानात राहतात.

मी लहान होतो त्या वेळी माझी आई पुष्कळ ओव्या म्हणून दाखवत असे. शिवलीलामृताचा अकरावा अध्याय वाचत असे. आजदेखील इतक्या वर्षांनंतर त्यातील मला पुष्कळसं आठवतं आणि ते सगळं अगदी तिच्याच आवाजात बरं का! नंतर शाळा-कॉलेजात शिकलेलं पुष्कळ मी अगदी विसरून गेलो. पण लहानपणी ऐकून पाठ

झालेल्या ओळी मात्र तशाच गंजून न जाता माझ्याजवळ राहिल्या आहेत. यासाठी तू आत्ताच शक्य होतील तेवढ्या कविता, श्लोक, ओव्या, स्तोत्रं शिकून घे. मोठी झाल्यावर तू कदाचित ज्ञानेश्वरी वाचशील किंवा वाचणारही नाहीस. मी स्वत:देखील काही तिचा अभ्यास केलेला नाही. तो तत्त्वज्ञानाचा एक ग्रंथ आहे. पण त्यातील काही ओव्या अतिशय मधुर आहेत. कविता निरनिराळ्या वृत्तांत आणि छंदांत लिहिता येते खरी, पण ओवीसारखी कोवळीक इतरत्र क्वचितच दिसते. खरं म्हणजे ओव्यांमधून मराठीच्या मायेचा हात आपल्या पाठीवरून फिरतो. त्यांतील काही ओव्या तू शिकून घ्याव्यास.

ज्ञानेश्वरांची मुक्ता नावाची एक लहान बहीण होती. एकदा ज्ञानेश्वरांना अतिशय मनस्ताप झाला आणि ते आपल्या खोलीचं दार बंद करून आत एकाकी बसले. त्या वेळी या धाकट्या बहिणीनं त्यांनी दार उघडावं म्हणून विनवणी करताना काही अभंग लिहिले. त्यांना ताटीचे अभंग म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनं या ओळी भव्य आहेत असं नाही. पण तो प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी आहे आणि त्यामुळे मला ते अभंग जिव्हाळ्याचे वाटतात.

ज्ञानेश्वरांना त्या वेळी एवढा कसला मनस्ताप झाला, तो कोणी दिला हे तुला नंतर त्यांचं चरित्र वाचल्यावर कळेल. हां, आता तुला काही श्लोकांचा, कवितांचा अर्थ पूर्ण कळणारही नाही. पण त्यामुळं फारसं काही बिघडत नाही. आज ना उद्या तुला तो कळेलच. एखादी बी रुजत घातल्यावर ती उगवायला काही दिवस जावे लागतातच. आणखीन एक गोष्ट लक्षात ठेव बरं का! अर्थ हा नेहमीच फार महत्त्वाचा असतो असं नाही. काही ओळी रंगीत फुलपाखरांप्रमाणं येतात. मग त्यांच्या पंखांवर बसून थोडा वेळ इकडे तिकडे गंमतीनं फिरून यायचं. कुठं जायचं, कशासाठी जायचं या गोष्टी असल्या ठिकाणी महत्त्वाच्या नाहीत.

तुला हातग्याची गाणी माहीत आहेत का? हातगा हा मुलींचा एक खेळ आहे. हत्तीचं चित्र मध्ये ठेवून मुली गोल फिरतात आणि गाणी म्हणतात. मग शेवटी खिरापत ओळखायची, आणि सगळ्यांनी ती खायची. तुझी आई तुला हातग्याच्या गाण्यांविषयी सांगेल. आज जर वेळ मिळाला तर शेवटी तुझी मावशी तुला एक गाणंही म्हणून दाखवील. ही गाणी फार जुनी आहेत, आणि ती कुणी लिहिली हे मलाही माहीत नाही. ती तुझ्या आईनं, तुझ्या मावशीनं लहानपणी म्हटली. त्यांच्या आईनं आपल्या लहानपणी म्हटली आणि तेव्हादेखील ती फार जुनी होती. आता बघ, त्या गाण्यांत एक गाणं असं आहे :

हणमंताची निळी घोडी, येता-जाता कमळे तोडी
कमळाच्या पाठीमागे होती राणी, अग अग राणी – इथे कुठे पाणी
पाणी भरले यमुना-जमुना....

या सगळ्याचा अर्थ काय हे मात्र मला विचारू नकोस. कारण मला तो माहीतच नाही. हा हणमंत कोण होता कुणास ठाऊक? पण मुग्धाबाई, तो माणूस मात्र अगदी रसिक बरं का! सारं जग धुंडाळून त्यानं निळ्या रंगाची घोडी शोधून आणली. घोडे तांबडे, पांढरे, काळे असतात. पण असल्या साध्या घोड्यांनी या श्रीमंतांचं समाधान होईल की काय? नाव काढू नको. त्याला घोडी पाहिजे ती अगदी निळ्याच रंगाची. आणि एवढ्या श्रमानं गुणवंत निळी घोडी आणल्यावर तो काय तिला कामाला जुंपील? छे! ही आपली इकडे तिकडे ऐटीत हिंडत राहिली. पण कशी हिंडली? तर येता जाता कमळं तोडत. इतर रंगांच्या घोड्या झुडपात तोंड घालतील, हरभरे खातील, अगदी फार तर झेंडूची फुलं तोडतील. पण ती मुलखावेगळी घोडी तसलं काही गावठी करणार की काय? ती येता जाता नुसती कमळंच तोडत राहणार. तू म्हणशील, कमळं पाण्यात असतात. येता जाता तिनं तोडावी इतकी का ती रस्त्याच्या कडेला असतील? अग, घोडी निळी असली की, असं कमळानं भरलेलं सरोवर आपोआप अगदी वर रस्त्यावरच येऊन बसणार.

आणखी गंमत पुढंच आहे. एक कमळ, त्यामध्ये काय असावं? तर या कमळाच्या पाठीमागे चक्क एक राणी होती. ती कुठल्या देशाची राणी होती देव जाणे. पण शहाण्या राणीप्रमाणं राजवाड्यात बसून सोन्याच्या वाटीतून केशरी दूध पिण्याऐवजी ती पाण्यात कमळाच्या मागे काय करीत होती हे मला अजूनही समजलं नाही. पण खरं सांगू का मुग्धा? मला त्यांचा जरी अर्थ समजला नाही तरी कमळं तोडणारी ही निळी घोडी पाहायला मला फार फार आवडलं असतं. पण ते पाहायला मिळतं याच गाण्यात. म्हणून मला आजही त्या ओळी म्हणाव्याशा वाटतात :

हणमंताची निळी घोडी, येता-जाता कमळे तोडी
कमळाच्या पाठीमागे होती राणी, अग अग राणी – इथे कुठे पाणी,
पाणी भरले यमुना-जमुना...

आता मी तुला मला आवडलेल्या काही कविता वाचून दाखविणार आहे. फार नाही, अगदी दोनचारच. मी सगळ्याच कविता वाचून दाखवू लागलो, तर तुम्हांला एक दिवस पुरणार नाही. यशवंत, माधव जूलियन यांच्या किंवा त्यानंतर विंदा करंदीकर, पाडगावकर यांच्या कविता नंतर कधी तरी. बालकवी नावाचे एक कवी बऱ्याच वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांच्या पुष्कळ कविता नादमधुर आहेत. त्यांची एक कविता मला फार आवडते. मी शाळेत असताना ती प्रथम वाचली, तेव्हा ती लक्षात राहिली. कॉलेजमध्ये असताना मला इतर कवितांबरोबर तिचा अभ्यास करावा लागला. नंतर कॉलेजमध्ये मला ती शिकवावी लागली. आज तसलं शिकणं, तसलं शिकवणं सारं संपून गेलं आहे. परंतु ती कविता मात्र माझ्याजवळ राहिली आहे. त्या कवितेचं नाव आहे 'औदुंबर' :

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासावळा झरा वाहतो बेटा-बेटांतुन
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें
पायवाट पांढरी तयांतुन अडवी-तिडवी पडे
हिरव्या कुरणामधुन चालली काळ्या डोहाकडे...

कसं छान सुरेख चित्र आहे, नाही? दीपावलीच्या भेटकार्डावर असावं त्याप्रमाणं नाजूक टवटवीत आहे. पण या ठिकाणी नाचत उड्या मारत धावायचं नाही बरं का! अगदी सावकाश बोलायचं, हळू पाऊल टाकायचं. कारण त्या ठिकाणी काय आहे माहीत आहे का तुम्हाला मुग्धाबाई? एखादा योगी पाण्यात पाऊल सोडून ध्यानस्थ बसावा त्याप्रमाणं पाण्यावर काळीशार सावली टाकत पाण्यात पाय सोडून तिथे औदुंबर बसला आहे :

झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर!

तुला चित्रं काढायला आवडतात. तुला निरनिराळे रंग आकर्षक वाटतात. त्याच बालकवींनी असलं एक रंगीत चित्र या कवितेत दाखविलं आहे :

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा
वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा
त्यांतहि हसली मंदपणें ती चंद्रकला राणी
कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी
इंद्रनिळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाला
चौबाजूला थाट दाटला हा हिरवाळीचा
सृष्टिसतीनें साज घेतला पाउसकाळीचा

जुन्या काळात माधव नावाचे कवी होऊन गेले. ते चिपळुणात राहात असत. फार वर्षांपूर्वी त्या ठिकाणी थोडे दिवस मी गेलो होतो. त्या वेळी मला त्यांना भेटता आलं असतं. पण आज, उद्या करत दिवस गेले. आणि अचानकपणं माझं तिथलं राहणंच संपून गेलं. ते घडलंच नाही. पण आज मात्र मला वाटतं, वेळात वेळ काढून आपण त्यांना भेटायला हवं होतं. त्यांनी पुष्कळ ऐतिहासिक कवितादेखील लिहिल्या आहेत. त्यांतील एका कवितेची सुरुवातच अशी जोरदार आहे :

तुडुम् तुडुम् हा झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा!

पण मला त्यांची 'हिरवें तळकोंकण' ही कविता फार आवडते. तुझा काय, माझा काय, कोकणाशी फारसा संबंध नाही हे खरं आहे. पण त्यांनी वर्णन केलेली आंबा, जांभूळ, पिंपळ ही झाडं; गोकर्ण-सुरंगीसारखी फुलं; काजू, फणस, नारळ असली फळं आपल्याकडेही होतात. म्हणून तुला ती ओळखीची वाटतील. त्यांचं कोकणावर फार प्रेम होतं. आणि प्रेम असलं की अंगणातील साधी कोरांटीदेखील अगदी जिव्हाळ्याची वाटते. त्यांनी कोकणातील साधी दृश्यंसुद्धा अतिशय रंगवून वर्णन केलेली आहेत. कोकण मुळातच रंगीत आणि सुगंधी आहे, पण त्याच्या मायेमुळे त्याच्याभोवती मऊ सोनेरी प्रकाश देखील दिसतो. आता एक वर्णन बघ हां :

सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नंदनवन!

. . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . .

कुठें आढळे फळभारानें लवलेली आवळी,
कुठें गाळिती भुळभुळ अपुली पक्क फळें जांभळी;
कुठें हलवितो पिंपळपानें पिंपळ पारावर,
कुठें वडाच्या पारंबीवर झोके घे वानर!. . .

. . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . .

कुठें थाट घनदाट कळकिचा, त्यांत संचरे कुणी
पुंगि बजावित फंदि मुशाफिर दर्यापुर सोडुनी!. . .

. . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . .

औदुंबर तरु अवधूताचा छाया दे शीतळ,
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तिचें बळ;
बघुनि पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ
आइन किंजळ करिती मांत्रिक-मंत्रवळा दुर्बळ...

. . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . .

धुंद सिंधुला मारवेलिची मर्यादा घालुन
उभी सैकतीं कोंकणदेवी राखित तळकोंकण;
निकट माजलीं निवडुंगांचीं बेटें कंटकमय
आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोचिंदे निर्भय;

मराठी ... ग्रंथालय ठाणे
निवड ३४६२
२६५४७
चव१९२

मागें त्यांच्या डुले नारळीपोफळिचें आगर
पुढें विराजे निळावंतिचें निळेंच जळमंदिर!
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित ऐसें नंदनवन
सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण.

त्यांनी एक छोटीशी गंमतीची पण कविता लिहिली आहे, बरं का मुग्धा. तू आता पोहायला जातेस, तिथं पाणी अगदी ओलं ओलं असतं, होय की नाही? पण तरी तू पोहून येतेस. अग, पाणी ओलं असणार नाही तर काय वाळवलेल्या पापडासारखं कोरडं राहील? पण ती गोष्ट बाळा नावाचा एक मुलगा होता त्याला बिलकुल कबूल नव्हती. तो एकदा पोहायला नदीवर गेला. पण पाणी ओलंचिंब आहे म्हणताच तो घरी परतला आणि आईला म्हणाला, "अग आई! ते पाणी फार ओलं आहे. ते टॉवेलनं चांगलं कोरडं कर. मग मी पोहायला शिकेन." आहे की नाही हा शहाणा बाळ्या? ऐक ती कविता :

शिकावया पोहायाला
नदीवरी बाळ्या गेला;
तसाच परि परतुनि आला
सांगु लागला आईला –
"आई! पाणी
ओलें म्हणूनी
आलों निघुनी,
कर आधीं कोरडें तया,
शिकेन मग मी पोहाया!"

आता मी जी कविता वाचून दाखवणार आहे ती समजायला थोडी अवघड आहे. पण नंतर तू मोठी झालीस, शिकून कॉलेजात गेलीस की, तुला तिचा अर्थ कळेल, अणि ती किती सुंदर आहे ते तुला समजून येईल.

प्रथम गुलाबाची कळी अगदी लहान हिरवे टोपडे घातलेली दिसते. पण थोडे दिवस थांबून बघ, तिच्यातूनच एक डौलदार सुगंधी फूल दिसू लागते. या कवितेचंदेखील तसंच आहे. मला तर ती कविता आवडतेच. पण ती मावशी, आई यांनादेखील आवडते. तुलासुद्धा ती आवडते का बघ. ऐक हं :

युगामागुनी चाललीं रे युगें हीं
करावी किती भास्करा, वंचना
किती काळ कक्षेंत धावूं तुझ्या मी
कितीदां करूं प्रीतिची याचना!

नव्हाळींतले ना उमाळे, उसासे
न ती आग अंगांत आतां उरे
विझूनी अतां यौवनाच्या मशाली
उरीं राहिले काजळी कोपरे!

परी अंतरीं प्रीतिची ज्योत जागे,
अविश्रांत राहील अन् जागती;
न जाणें, न नेणें कुठें चाललें मी,
कळे तूं पुढें आणि मी मागुती!

दिमाखांत तारे नटोनी थटोनी
शिरीं टाकिती दिव्य उल्का-फुलें
परंतू तुझ्या मूर्तिवाचून देवा,
मला वाटतें विश्व अंधारलें!

तुवां सांडलेले कुठें अंतराळांत
वेंचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशु,
तपाचार स्वीकारुनी दारुण.

पिसारा प्रभेचा उभारून दारीं,
पहांटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल —
होऊनिया लाजरा मंगळ.

निराशेंत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळीं उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधीं आर्जव!

परी भव्य तें तेज पाहून पूजून,
घेऊं गळ्याशीं कसे काजवे!
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे!

तळीं जागणारा निखारा उफाळून
येतो कधीं आठवानें वर
शहारून येतें कधीं अंग, तूझ्या –
स्मृतीनें उलें अन् सलें अंतर!

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेंच आहे मला भूषण!

[या सर्वांच्या शेवटी जीएंनी मुग्धाला उद्देशून एक कविता म्हणून दाखविली आहे. ती अर्थात् भाचीसाठी त्यांनी स्वत:च केलेली आहे. ती अशी :]

लाल पेरू लाल ग, गोरे तिचे गाल ग
कळी बसली रुसून ग, आई बघते हसून ग
लाड बाइचे लाड ग, पापे तिचे गोड ग
चिमणा राग सोड ग, तें डाळिंब फोड ग
मिनी येते धावुन ग, आई घेते उचलुन ग
तिला पापे चुकचुक ग, आम्ही मात्र टुकटुक ग

परिशिष्ट

# कथा-सूची

# कथा-सूची

"सोनपावले"मधील साहित्य वगळून जी. ए. कुलकर्णी यांच्या सर्व कथांची सूची येथे आद्याक्षरानुसार दिली आहे.

प्रथम कथेचे शीर्षक, नंतर उपलब्ध असेल तेथे त्या कथेचे प्रथम-प्रकाशन स्थल व काल, आणि ज्या कथासंग्रहात ती कथा समाविष्ट असेल, त्या कथासंग्रहाचे नाव[1], असा क्रम आहे.

प्रथम-प्रकाशन स्थल-काल नोंदी परिपूर्ण नाहीत. अधिक शोध घेऊन त्यांत परिपूर्णता आणता येईल. उपलब्ध अधिकांत अधिक माहितीचे येथे प्रथमच संकलन केले आहे.

| | **कथाशीर्षक** | **प्रथम-प्रकाशन स्थल, काल** | **कथासंग्रह** |
|---|---|---|---|
| १ | अखेरचा दिवस | 'साधना', दिवाळी अंक [१९६०-?] | हिरवे रावे |
| २ | अखेरचे घर | | ओंजळधारा |
| ३ | अंजन | | काजळमाया |
| ४ | अदृष्टाच्या वाटा | 'हंस' | पैलपाखरे |
| ५ | अंधार | 'माणूस' | कुसुमगुंजा |
| ६ | अंधाराची पावले | 'सत्यकथा', मार्च १९५५ | निळासावळा |

[1]जी. ए. कुलकर्णी यांचे कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| १ निळासावळा | १४ जाने. १९५९ | ९ अमृतफळे | १९८० |
| २ पारवा | सप्टें. १९६० | १० ओंजळधारा | १९८१ |
| ३ हिरवे रावे | सप्टें. १९६२ | ११ पैलपाखरे (अनुवादित दीर्घ कथांचा संग्रह) | १० जुलै १९८६ |
| ४ रक्तचंदन | सप्टें. १९६६ | १२ कुसुमगुंजा | १० जुलै १९८९ |
| ५ काजळमाया | १९७२ | १३ आकाशफुले आधारित कथांचा संग्रह | २९ सप्टेंबर १९९० |
| ६ रमलखुणा | जून १९७५ | | |
| ७ सांजशकुन | १९७५ | | |
| ८ पिंगळावेळ | १९७७ | | |

| | कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|---|
| ७ | अंधारातील हाक | 'वसंत', मार्च १९४४ | कुसुमगुंजा |
| ८ | अनंत | 'निषाद', दिवाळी अंक १९७४ | सांजशकुन |
| ९ | अनामिक | 'युगवाणी', ऑगस्ट-सप्टेंबर १९७३ | सांजशकुन |
| १० | अमरफूल | | अमृतफळे |
| ११ | अमृतफळे | | अमृतफळे |
| १२ | अवशेष | 'सत्यकथा', सप्टेंबर १९५५ | निळासावळा |
| १३ | अस्तिस्तोत्र | 'सत्यकथा', ऑगस्ट १९७१ | सांजशकुन |
| १४ | अहम् | 'मौज', दिवाळी अंक १९७५ | सांजशकुन |
| १५ | आरसापुराण | | ओंजळधारा |
| १६ | आसरा | 'प्रतिष्ठान', नोव्हेंबर १९६८ | सांजशकुन |
| १७ | इस्किलार | | रमलखुणा |
| १८ | ईर्षा | (हस्तलिखित) | कुसुमगुंजा |
| १९ | एक आंबा, दोन आंबे, तीन आंबे | | ओंजळधारा |
| २० | एक मित्र-एक कथा | 'हंस', दिवाळी अंक १९८७ | कुसुमगुंजा |
| २१ | एका देवाचा मृत्यु | 'साधना', दिवाळी अंक १९६५ | सांजशकुन |
| २२ | ऑर्फियस | 'सत्यकथा', सप्टेंबर १९७३ | पिंगळावेळ |
| २३ | कधीतरी | 'छंद', नोव्हेंबर-डिसेंबर १९५६ | कुसुमगुंजा |
| २४ | कवठे | 'रसिक', दिवाळी अंक १९७४ | पिंगळावेळ |
| २५ | कसाब | | काजळमाया |
| २६ | कळसूत्र | 'मौज', दिवाळी अंक १९७१ | काजळमाया |
| २७ | काकणे | 'सत्यकथा', नोव्हेंबर १९५८ | पारवा |
| २८ | कांचनमृग | 'आस्वाद', दिवाळी अंक १९६८ | सांजशकुन |
| २९ | काली | 'युगवाणी', जून १९७३ | सांजशकुन |

| | कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|---|
| ३० | काळी आजी | ‘धनुर्धारी’, १९४४ | कुसुमगुंजा |
| ३१ | कैरी | ‘सुगंध’, दिवाळी अंक १९७३ | पिंगळावेळ |
| ३२ | खुळा बाळ्या | | ओंजळधारा |
| ३३ | गाऱ्हाणे | ‘मराठवाडा’, दिवाळी अंक, ? | कुसुमगुंजा |
| ३४ | गिधाडे | | हिरवे रावे |
| ३५ | गीतपाखरू | ‘मराठवाडा’, दिवाळी अंक १९६५ | सांजशकुन |
| ३६ | गुंतवळ | ‘सत्यकथा’, जुलै १९५५ | निळासावळा |
| ३७ | गुलाम | ‘सुगंध’, दिवाळी अंक १९७१ | काजळमाया |
| ३८ | गोरिला | ‘प्रभा’, दिवाळी अंक १९६८ | सांजशकुन |
| ३९ | गोष्ट शेपटीची, गोष्ट शेवटची | | ओंजळधारा |
| ४० | ग्रहण | ‘मराठवाडा’, दिवाळी अंक,? | कुसुमगुंजा |
| ४१ | घर | ‘हंस’, दिवाळी अंक १९७४ | पिंगळावेळ |
| ४२ | चंद्रावळ | ‘सत्यकथा’, जानेवारी १९५६ | निळासावळा |
| ४३ | चांभार पोरगा | | ओंजळधारा |
| ४४ | चैत्र | ‘मराठवाडा’, दिवाळी अंक,? | कुसुमगुंजा |
| ४५ | छोट्या किकोसचा मृत्यु | | अमृतफळे |
| ४६ | जखम | | पारवा |
| ४७ | जन्म | ‘मराठवाडा’, दिवाळी अंक १९६२ | रक्तचंदन |
| ४८ | जीवन | ‘वसंत’, सप्टेंबर १९४६ | आकाशफुले |
| ४९ | जीवनस्वप्न | ‘अभिरुचि’, जानेवारी १९४७ | आकाशफुले |
| ५० | जीवनाचे वारे | ‘वसंत’, ऑक्टोबर १९४५ | आकाशफुले |
| ५१ | ठिपका | | काजळमाया |
| ५२ | डाग | ‘छंद’, नोव्हेंबर-डिसेंबर १९५५ | निळासावळा |
| ५३ | तपकिरी बी | (ध्वनिफितीवरून) | कुसुमगुंजा |
| ५४ | तळपट | ‘संदर्भ’, जानेवारी १९७५ | पिंगळावेळ |

| कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|
| ५५ तक्षक | 'मौज', दिवाळी अंक १९६० | हिरवे रावे |
| ५६ तीन सोनेरी केस | | ओंजळधारा |
| ५७ तुती | 'साधना', दिवाळी अंक १९६१ | हिरवे रावे |
| ५८ दीपस्तंभ : १ | 'युगवाणी', ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७३ | सांजशकुन |
| ५९ दीपस्तंभ : २ | 'युगवाणी', ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७३ | सांजशकुन |
| ६० दूत | | काजळमाया |
| ६१ देवपूजा | 'सत्यकथा', जानेवारी १९४२ | कुसुमगुंजा |
| ६२ नन्ना | | ओंजळधारा |
| ६३ नाग | 'सत्यकथा', ऑगस्ट १९५७ | पारवा |
| ६४ निरोप | 'हंस', फेब्रुवारी १९५७ | पारवा |
| ६५ निरोप | (ध्वनिफितीवरून) | कुसुमगुंजा |
| ६६ निळ्या चेहऱ्याची आकृति | 'मराठवाडा', दिवाळी अंक १९६८ | सांजशकुन |
| ६७ नीना | 'वसंत', डिसेंबर १९४४ | आकाशफुले |
| ६८ पंखपरी | | अमृतफळे |
| ६९ पडदा | 'सत्यकथा', एप्रिल १९५५ | निळासावळा |
| ७० पडद्याआड | 'हंस', जानेवारी १९५८ | आकाशफुले |
| ७१ पत्रिका | 'सत्यकथा', ऑगस्ट १९७० | सांजशकुन |
| ७२ परवाचा संसार | 'हंस', जून १९५७ | आकाशफुले |
| ७३ पराभव | 'साधना', दिवाळी अंक १९६२ | रक्तचंदन |
| ७४ पाणमाय | 'धरती', दिवाळी अंक १९७१ | सांजशकुन |
| ७५ पातक | 'मराठवाडा', दिवाळी अंक १९६८ | सांजशकुन |
| ७६ पारधी | 'हंस', दिवाळी अंक १९६१ | हिरवे रावे |
| ७७ पावशा भगत | | पैलपाखरे |

| | कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|---|
| ७८ | पाळणा | 'केसरी', दिवाळी अंक १९५९ | पारवा |
| ७९ | पिवळा पक्षी | (ध्वनिफितीवरून) | कुसुमगुंजा |
| ८० | पुनरपि | 'हंस', नोव्हेंबर (दिवाळी अंक) १९६७. 'दूत' या नावाने | काजळमाया |
| ८१ | पुरुष | 'सुगंध', दिवाळी अंक १९६३ | रक्तचंदन |
| ८२ | पेरू | | ओंजळधारा |
| ८३ | प्रदक्षिणा | | काजळमाया |
| ८४ | प्रवासी | 'सत्यकथा', ऑक्टोबर (दिवाळी अंक) १९७१ | रमलखुणा |
| ८५ | प्रसाद | 'सत्यकथा', ऑक्टोबर १९७४ | सांजशकुन |
| ८६ | प्रॉम्युथ्यूस | 'साधना', दिवाळी अंक १९६५ | सांजशकुन |
| ८७ | फलश्रुती | 'हंस', ? १९४९ | आकाशफुले |
| ८८ | फुंका | 'सुगंध', दिवाळी अंक १९७२ | पिंगळावेळ |
| ८९ | फेड | 'मराठवाडा',? | कुसुमगुंजा |
| ९० | बळी | | पारवा |
| ९१ | बळी | 'प्रतिष्ठान', डिसेंबर १९६८ | सांजशकुन |
| ९२ | बाधा | 'दीपावली', दिवाळी अंक १९६१ | हिरवे रावे |
| ९३ | बारसे | 'संदर्भ',? | कुसुमगुंजा |
| ९४ | बुद्धि आणि भाग्य | | ओंजळधारा |
| ९५ | भिंत | 'माणूस', दिवाळी अंक १९६३ | सांजशकुन |
| ९६ | भिंतीतून जाणारा माणूस | 'सत्यकथा', नोव्हेंबर (दिवाळी) १९५२ | आकाशफुले |

| | कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|---|
| ९७ | भूक | 'निषाद', दिवाळी अंक १९७५ | कुसुमगुंजा (आवृत्ती २) |
| ९८ | भूतखजिना | | ओंजळधारा |
| ९९ | भेट | 'हंस', फेब्रुवारी १९५६ | पारवा |
| १०० | भेट | 'माणूस', दिवाळी अंक १९६३ | सांजशकुन |
| १०१ | भोवरे | 'हंस', नोव्हेंबर (दिवाळी अंक) १९६६ | काजळमाया |
| १०२ | मरण नको असलेल्या मुलाची गोष्ट | | अमृतफळे |
| १०३ | माणसाचे काय, माकडाचे काय? | 'मराठवाडा', दिवाळी अंक १९६१ | हिरवे रावे |
| १०४ | माघारा | 'गावकरी', दिवाळी अंक १९६२ | रक्तचंदन |
| १०५ | माणूस नावाचा बेटा | 'सत्यकथा', ऑगस्ट १९५९ | हिरवे रावे |
| १०६ | माया | 'हंस', | पैलपाखरे |
| १०७ | मासा हसला त्याची गोष्ट | | अमृतफळे |
| १०८ | मुक्ती | 'दीपावली' दिवाळी अंक १९७४ | पिंगळावेळ |
| १०९ | मुखवटा | 'सत्यकथा', सप्टेंबर१९५६ | निळासावळा |
| ११० | मेला होता तो माणूस | 'हंस' | पैलपाखरे |
| १११ | यंत्र | 'नवल', ? १९७० | आकाशफुले |
| ११२ | यात्रिक | वाङ्मयशोभा', ?, १९६० | आकाशफुले |
| ११३ | यात्रिक | 'सत्यकथा,' ऑगस्ट १९७५ | पिंगळावेळ |
| ११४ | रक्तमुखी | 'सुगंध', दिवाळी अंक१९७४ | सांजशकुन |
| ११५ | रंगरेखा<br>१) चाहूल<br>२) दैव<br>३) मित्र<br>४) मत्स्यकन्या<br>५) तत्त्वज्ञान<br>६) स्मृती | | पारवा |

| कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|
| ११६ रत्न | | काजळमाया |
| ११७ रातराणी | | पारवा |
| ११८ रात्र झाली गोकुळी | | पारवा |
| ११९ राणी | 'सत्यकथा', जून १९५५ | निळासावळा |
| १२० राधी | 'हंस', दिवाळी अंक १९६५ | रक्तचंदन |
| १२१ राक्षस | 'दीपावली', दिवाळी अंक १९६० | हिरवे रावे |
| १२२ लई नाही मागणे | 'दीपावली', दिवाळी अंक १९६२ | रक्तचंदन |
| १२३ लग्न | 'मराठवाडा',? | कुसुमगुंजा |
| १२४ लक्ष्मी | 'दीपावली', दिवाळी अंक १९७५ | पिंगळावेळ |
| १२५ लांब नाकाची गोष्ट | | ओंजळधारा |
| १२६ लिरा | 'सत्यकथा', मार्च १९४२ | कुसुमगुंजा |
| १२७ वंश | | काजळमाया |
| १२८ वस्त्र | 'सुगंध', दिवाळी अंक १९६५ | रक्तचंदन |
| १२९ वहाणा | 'सत्यकथा', एप्रिल १९५६ | हिरवे रावे |
| १३० वारा आणि कमल | 'दीपावली' | कुसुमगुंजा |
| १३१ वासंती | 'नवयुग' | निळासावळा |
| १३२ विदूषक | | काजळमाया |
| १३३ वीज | 'हंस', दिवाळी अंक १९७३ | पिंगळावेळ |
| १३४ वेड | 'मराठवाडा', दिवाळी अंक १९६५ | सांजशकुन |
| १३५ व्यथा | | पारवा |
| १३६ शलॉट | 'सत्यकथा', नोव्हेंबर १९५९ | पारवा |
| १३७ शहाणा विणकर | | अमृतफळे |
| १३८ शिकाऱ्याच्या मुलाची गोष्ट | | अमृतफळे |
| १३९ शिक्षा | 'रहस्यरंजन', दिवाळी अंक १९६० | हिरवे रावे |

| | कथाशीर्षक | प्रथम-प्रकाशन, स्थल, काल | कथासंग्रह |
|---|---|---|---|
| १४० | शेवटचे हिरवे पान | | काजळमाया |
| १४१ | सर्प | 'युगवाणी', एप्रिल-मे १९७३ | सांजशकुन |
| १४२ | सर्पकुमार | | अमृतफळे |
| १४३ | संवेदना | 'वाङ्मयशोभा', जुलै १९५० | आकाशफुले |
| १४४ | सांगाडा | 'मौज',दिवाळी अंक १९५६ | निळासावळा |
| १४५ | साधू | 'मराठवाडा', दिवाळी अंक १९६५ | सांजशकुन |
| १४६ | सिनेमा | 'संदर्भ' | कुसुमगुंजा |
| १४७ | सूड | 'छंद', मे-जून १९५५ | निळासावळा |
| १४८ | सोडवण | 'हंस', दिवाळी अंक १९६२ | रक्तचंदन |
| १४९ | सोनेरी केसांचा राजपुत्र | | अमृतफळे |
| १५० | सोन्याचे क्षण | 'वसंत', जून १९४६ | आकाशफुले |
| १५१ | सोयरे | 'प्रतिष्ठान' ऑक्टोबर १९६८ | सांजशकुन |
| १५२ | स्लीला | 'मराठवाडा', दिवाळी अंक १९६० | हिरवे रावे |
| १५३ | स्वप्न | | काजळमाया |
| १५४ | स्वामी | 'दीपावली', दिवाळी अंक १९७३ | पिंगळावेळ |
| १५५ | हिरवी मखमल, गोरा हात | 'सत्यकथा' ऑक्टोबर १९५७ | निळासावळा |
| १५६ | होळी | 'मराठवाडा' | कुसुमगुंजा |
| १५७ | क्षुद्र | 'सत्यकथा', १९४१ | कुसुमगुंजा |

REFBK-0026547

# सोनपावले

५५८ ६८५८५५

